
म. ग्रं. सं. ठाणे
विषय इतिहास
स. नं. २८९




REFBK-0003953

[illegible]

[illegible]

[illegible]

आ. नो.

[illegible]

टा. नो.

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ-पुरस्कृत ग्रंथमाला

क्रमांक २० वा.

History of the Panse Family

# पानसे घराण्याचा इतिहास.

३९५३

REFBK-0003953

रावबहादूर केशव रंगनाथ पानसे,

रिटायर्ड, असिस्टंट इंजिनियर.

शके १८५१ ] आवृत्ति पहिली [ सन १९२९

किंमत तीन रुपये.

प्रकाशक: --
रावबहादूर केशव रंगनाथ पानसे
२९९ शुक्रवार, पुणें.

( सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन आहेत. )

मुद्रक:—
गोपाळ बळवंत जोशी,
आनंद छापखाना, सदाशिव पेठ, पुणें.

# प्रस्तावना.

प्रस्तुत ग्रंथाचे लेखक **रावबहादुर आप्पासाहेब पानसे** यांनीं आपल्या ग्रंथांत प्रस्तावना लिहून देण्यासंबंधानें आम्हांस अतिशय निकडीची विनंती केली. प्रस्तावना ही वाचक व ग्रंथांतील संकलित माहिती यांच्यांतील दुवा असून ती लेखकाच्या विशेष हेतूचें व परिश्रमाचें आविष्करण करण्याकरितां लिहिण्यांत येते, अशी आमची समजूत आहे. त्या दृष्टीनें पाहतां रावबहादुरांनीं संकलित केलेला 'पानसे घराण्याचा इतिहास' इतका उज्ज्वल व महाराष्ट्रीयांच्या परिचयाचा आहे कीं, त्यास प्रस्तावनेची जरूरी नाहीं. तथापि परंपरेस अनुसरून, त्यांनीं केलेल्या विनंतीस मान देणें अनेक कारणां-मुळें आम्हांस भाग पडलें. प्रस्तुत प्रस्तावना ही, पानसे घराण्यासंबंधानें आमच्या ठिकाणीं वसत असलेला उत्कट अभिमान व रावबहादूर पानसे यांनीं आपल्या उतार वयांत केलेल्या प्रयत्नाबद्दल आदर यांचें द्योतक आहे. इतकें सांगितलें म्हणजे पुरे.

मनुष्यमात्राचा स्वभावच असा आहे कीं, त्यास स्वतःच्या कुलाचा अभिमान असतो कोणाचा तो कृतींत दिसतो व कोणाचा तो दिसून येत नाहीं इतकेंच. ज्यांच्या ठिकाणीं स्वकुलाभिमान असल्याचें दिसून येत नाहीं, त्यांच्यांत तो नसतो असें म्हणतां येणार नाहीं. असें होण्याचीं अनेक कारणें संभवतील. अमुक थोर पुरुष माझ्या कुळांत होऊन गेले अथवा मी त्यांचा वंशज आहें असे स्वाभिमानाचे उद्गार अनेक वेळ आपण ऐकतों, व या मनोवृत्तींतच वरील विधानाची सत्यता दिसून येते.

स्वराज्यपराङ्मुख झालेल्या आपणां महाराष्ट्रीयांमध्यें आज एक प्रकारची उदा-सीनता उत्पन्न झाल्याचें दिसून येतें. आपले पूर्वज कसे, हा विचार मनांत आला म्हणजे या मानासिक औदासीन्यांत भर पडते, आणि म्हणूनच कीं काय, आपल्या पूर्वजांबद्दल योग्य तो अभिमान दाखविला जात नाहीं. राष्ट्राचा अभ्युदय होणें जरूर असल्यास हें औदासिन्य घालविण्यास आपण केव्हांतरी आरंभ केलाच पाहिजे. सुदै-वानें आपणांस अत्यंत उज्ज्वल अशी इतिहास-परंपरा आहे. ही परंपरा शोधून काढ-ण्यास फार प्राचीन काळाकडे जाण्याचें कारण नाहीं. सुमारें शंभर सवाशें वर्षांपूर्वींच आपल्या महाराष्ट्रांत स्वराज्य नांदत होतें. आपल्यामध्यें नवचैतन्य उत्पन्न होण्या-करितां आपण आपल्या पूर्वजांच्या तेजस्वी इतिहासाकडे दृष्टि वळविली पाहिजे. लेख-काच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे "पूर्वेतिहासाच्या अवलोकनानें स्वदेशाभिमान जागृत होतो, पूर्वजांच्या तेजस्वी कृतींची आठवण मनांत प्रेरणा उत्पन्न करिते व प्रस्तुत परिस्थितींत यशस्वी भविष्यकाळाचा मार्ग दाखविते."

वरील विचारसरणीस अनुसरून पाहतां आपल्याकडे विशिष्ट घराण्यांचे इतिहास जनतेपुढें येण्यास अलीकडे च सुरवात झाली आहे. अशा तऱ्हेच्या वाङ्मयांत आपटे घराण्याच्या इतिहासास अग्रस्थान मिळतें. त्यानंतर गोखले, रास्ते वगैरे घराण्यांचे

इतिहास प्रसिद्ध झाले. सुप्रसिद्ध पानसे घराण्याच्या इतिहासानें अशा तऱ्हेच्या वाङ्मयांत एक चांगल्या प्रकारची भर पडत आहे यांत शंका नाहीं.

स्वराज्याच्या उज्ज्वल कालांत पुष्कळ घराणीं पुढें आलीं. त्यांपैकीं पानशांचें घराणें होय. देशस्थ ब्राह्मण घराण्याचा हा पहिलाच इतिहास प्रसिद्ध होत आहे. याबद्दल लेखकाचें अभिनंदन करावें तितकें थोडेंच. लेखकानें अत्यंत परिश्रम घेऊन माहिती मिळवून प्रस्तुत इतिहास संकलित केला आहे. यांत पानसे घराण्यांतील तेवीस पिढ्यांचा म्हणजे सुमारें सहाशें वर्षांचा इतिहास वाचावयास मिळतो. या तेवीस पिढ्यांतील सर्व पुरुषांचा अत्यंत व्यवस्थित असा वंश-वृक्ष पुस्तकाच्या आरंभीं च देण्यांत आला आहे. तसेंच व्यक्तिविषयक माहिती देणारें एक प्रकरण पुस्तकाचे शेवटीं आहे. त्यावरून विद्यमान असलेल्या प्रत्येक पानसे उपनांवाच्या व्यक्तीस आपल्या घराण्यांतील पूर्वजांचीं नांवें कळण्याची व प्रसिद्ध पुरुषांचा परिचय होण्याची सोय झाली आहे; त्यामुळें पानशांना प्रस्तुत पुस्तकाबद्दल वाटणाऱ्या आपलेपणांत भर पडेल असा भरंवसा आहे

पानसे मूळचे राहणारे कोठले, त्यांच्या, उपशाखा कशा झाल्या, त्यांचा विस्तार कोठें कोठें कसा होत गेला, त्यांच्या इनाम जमिनी, इनाम गांवें, रहाते वाडे, ज्योतिष-कुलकर्णादि वृत्ति वगैरेंची संपूर्ण माहिती प्रस्तुत ग्रंथांत सविस्तर रीतीनें देण्यांत आली आहे.

पुस्तकांतील कांहीं कांहीं प्रसंग चमत्कृतिपूर्ण, मनोरंजक व पानशांच्या घराण्यांतील निरनिराळ्या व्यक्तींच्या आंगांतील धाडस, व्यवहारचातुर्य, प्रसंगावधान, शौर्य वगैरे गुणांचा वाचकांस परिचय करून देणारे आहेत. संकट-परंपरा ही मनुष्याच्या मोठेपणाची कसोटी असते, ह्या गोष्टीचा प्रत्यय पुस्तकांत जागोजागीं येतो. "बाले घाटाची दंतकथा" "महाराष्ट्रांतील पन्ना" "दिव्यासंबंधीं प्रकरणें" हीं वाचलीं असतां वरील गोष्ट सत्यास पटणारी आहे. पूर्वीच्या काळीं वतन संभाळण्यास किती कष्ट लागत, न्याय देण्याच्या पद्धति कशा असत, दिव्य करण म्हणजे काय वगैरे संबंधानें सविस्तर माहिती प्रस्तुत पुस्तकांत देण्यांत आली आहे.

स्वराज्याच्या अमदानींत विशेषतः पेशवाईच्या उत्तरार्धांत राज्यव्यवस्थेचीं जीं अनेक खातीं उपलब्ध होतीं, त्यांत तोफखान्याचा प्रामुख्यानें अंतर्भाव केला जाई. एक काल तर असा होता कीं, त्याकाळीं पानसे व तोफखाना हे शब्द पर्यायवाचक बनले होते. तोफखान्यास व्यवस्थित स्वरूप देण्यांत आल्यापासून त्याची व्यवस्था पानसे घराण्याकडेच होती. अशा प्रकारच्या महत्त्वाच्या खात्यावर पानशांची नेमणूक झाल्यामुळें इ. स. १७३६ ते १८१८ या कालांतील महाराष्ट्रांतील उलाढाली व लढाया, यांची हकीकत सदर पुस्तकांत आली असल्यास नवल नाहीं. या कालांतील पानसे घराण्याचा इतिहास म्हणजे महाराष्ट्राचा त्रोटक राजकीय इतिहासच होय असें म्हणतां येईल. वरील कालांतील राजकीय घडामोडींत कधीं प्रामुख्यानें तर कधीं दुय्यम अधिकारी म्हणून पानसे घराण्यांतील पुरुषांनीं भाग घेतल्याचें आढळून येतें. कांहीं कामें

-तर पूर्णपणें त्यांच्यावरच सोंपविण्यांत आलीं होतीं. यामुळें या काळांतील महाराष्ट्राच्या इतिहासांत पानशांच्या कर्तबगारीचें प्रतिबिंब दिसून येतें.

स्वराज्यसंरक्षणाच्या बाबतींत स्वामिनिष्ठ राहून पानशांनीं केलेली अमोल कामगिरी प्रस्तुत इतिहासावरून चांगली लक्षांत येईल. हिंदुस्थानचें राज्य मिळवितांना इंग्रजांना ज्यांच्यांशीं दोन हात करावे लागले, अशा लोकांपैकीं मराठे हे होत. मराठे हे इंग्रजांचे प्रबळ शत्रु असून इंग्रजांचे हिंदुस्थानांत जे पराजय झाले त्यांत वडगांवच्या लढाईतील पराजयाची गणना होते. पेशव्यांस ( मराठ्यास ) मिळालेल्या या विजयाचें श्रेय ज्यांच्याकडे येतें त्यांत भिवराव पानसे यांची गणना होते. भिवराव पानसे यांच्या त्या वेळच्या कर्तबगारीचें वर्णन शत्रुमित्रांनीं मुक्तकंठानें केलें आहे. इ. स. १८०८ नंतर मराठ्यांच्या पाडावाचीं चिन्हें दिसूं लागलीं व इ. स. १८१८ मध्यें तर मराठेशाहीचा अस्त झाला. ही गोष्ट डोळ्यांस स्पष्ट दिसत असून हि जे कर्तव्यनिष्ठ व शूर सरदार तिच्या बचावाचा शेवटला प्रयत्न करण्याकरितां लढले, त्यांत पानशांचा प्रामुख्यानें समावेश होतो. मराठेशाही बुडून इंग्रजी अमदानी सुरू होणार, तेव्हां इंग्रजांची बाजू घेऊन स्वार्थ साधून घ्यावा ही दृष्टि बापू गोखले, गणपतराव पानसे वगैरे सरदारांस शिवली नाहीं. ते अखेरपर्यंत स्वामिनिष्ठ राहिले व स्वामिकार्याकरितां त्यांनीं स्वार्थ झिडकारिला. पानशांचा मोठेपणा दाखविण्यास ही गोष्ट पुरेशी आहे.

ग्रंथाचे शेवटीं परिशिष्टें जोडलीं आहेत; त्यावरून ग्रंथांतील माहिती जुन्या अस्सल कागदपत्रांवरून घेतली आहे हें दिसून येईल. ग्रंथांतील विषयांची मांडणी मुद्देसूद रीतीनें केली असून भाषा हि सुबोध व विषयास साजेशी आहे.

पुस्तकाची छपाई व बाह्यांग हीं सुंदर झालेलीं आहेत. स्थळविषयक चित्रें व अलीकडील पानसे घराण्यांतील कांहीं गृहस्थांचीं छाया चित्रें यांच्या योगानें पुस्तकाच्या शोभेंत भर पडली आहे.

अस्तु. रावबहादूर के. रं. ऊर्फ आप्पासाहेब पानसे यांनीं सतत तीन चार वर्षे परिश्रम करून सदर इतिहास जनतेसमोर ठेविला आहे, याबद्दल त्यांचें अभिनंदन करावें तितकें थोडेंच आहे. त्यांच्या कामगिरीनें महाराष्ट्राच्या इतिहासांत खास भर पडली आहे. महाराष्ट्रांत पानसे घराण्यासारखीं जीं इतर घराणीं आहेत त्यांचे हि इतिहास अशाच रीतीनें प्रसिद्ध झाल्यास रा. ब. आप्पासाहेब यांस व आम्हांस अतिशय आनंद होणार आहे. पानसे घराण्यांतील विद्यमान पुरुष सदर ग्रंथास सढळ हातानें मदत करतीलच. पण इतर महाराष्ट्रीयांनीं हि आपुलकीच्या भावनेनें त्यास आश्रय द्यावा अशी आमची त्यांस आग्रहाची विनंती आहे. प्रस्तुत ग्रंथाच्या परिशीलनानें महाराष्ट्रीयांच्या विद्यमान पिढींत नवचैतन्य उत्पन्न होवो अशी ईश्वरापाशीं प्रार्थना करून ही लांबलेली प्रस्तावना पुरी करण्याची आम्ही परवानगी घेतों.

पुणें
ता. २९ माहे सप्टेंबर सन १९२९. } **गंगाधरराव नारायणराव मुजुमदार**

# पुरस्कार.

पानसे ( पानसी ) घराणें फार इतिहासप्रसिद्ध आहे. विशेषेंकरून आम्हां मराठ्यांत तोफखान्याचें अंग तितकें मजबूत नव्हतें; एरवीं वसईच्या युद्धप्रसंगीं चिमाजी अप्पांनीं व इतर अनेक प्रसंगीं इतरांनीं हि 'फिरंगी प्रत्यक्ष आगीचा पुतळा होता' असे भय-सूचक आश्चर्याचे उद्गार काढलेच नसते. बाबर चगताई हा तोफखान्याच्या बळावरच पानिपत व कनवा येथें हिंदुमुसलमान शत्रूंना चोपून 'फत्तेच्या मसनदी' वर बसला! उस्ताद अली कुली व मुस्तफा हे त्याचे अधिकारी या शतघ्निव्यापारांत प्रवीण होते. पुढें दक्षिणेंत हुसेन निजामशहा वगैरे मंडळीजवळ या भांड्यांचा पोख्त सरंजाम असे. विजापुरास लांडा कसब किंवा मुलुख-इ-मैदान इत्यादि प्रचंड तोफा अजून हि पड-लेल्या दिसतात. त्यावरून तोफांचा प्रचार दक्षिणेंत हि चांगला च होता असें दिसतें. परंतु पुढें मराठी राज्यांत तोफांचें प्राबल्य प्रारंभीं तरी विशेष दिसत नाहीं. आर-माराचे खात्यांत काय प्रकार असेल तो असो, परंतु फौजी खात्यांत तरी निदान थोरल्या बाजीराव साहेबांच्या वेळीं पुण्यांत तोफा ओतीत असले तरी या कामांत वर-चढपणा कांहीं मराठ्यांकडे नव्हता. पुढें पुढें तोफखाना अधिक सजविणें अवश्य पडून भाऊसाहेबांचे वेळेपासून मोगली पद्धतीकडे त्यांचा कल झुकत गेल्यामुळें तोफांचा आराबा बांधणें, गोल चालविणें इत्यादिक बाबींना मराठी लष्करांत महत्त्व आलें. तथापि या खात्याची 'उस्तादी' खास मराठे मंडळांत नव्हती. पानसे घराण्याची मोठी कामगिरी म्हणजे या नव्या खात्यांत त्यांनीं नांव कमाविलें ही होय.

पानशांच्या या बहुमोल कामगिरीचा वृत्तांत एकत्र व संकलित असा तयार होणें अत्यवश्य आहे. परंतु इतिहासाकडे समाजाचें लक्ष्य जावें तितकें अजून हि गेलेलें नाहीं. मात्र हळु हळु जागृति होत आहे आणि त्याचाच एक नवा पुरावा म्हणजे हा पानसे घराण्याच्या इतिहासाचा ग्रंथ होय.

हा ग्रंथ रावबहादुर केशवराव पानसे यांनीं लिहिलेला आहे. रावबहादुर केशवराव यांनीं खरोखरच आपल्या घराण्याची अमोल सेवा या पुस्तकाचे द्वारां केली आहे. ग्रंथलेखन किंवा इतिहास हा कांहीं रावबहादुरांचा विषय नव्हे. त्यांचा सर्व जन्म गेला बांधकाम-खात्यांत. परंतु स्वतःच्या कुळाविषयीं खरी कळकळ त्यांचे ठिकाणीं विशेष असल्यामुळें त्यांनीं हें कुलेतिहासरचनेचें दगदगीचें परंतु उपयोगाचें काम हातीं घेऊन फार चांगल्या प्रकारें तडीस नेलें हें त्यांस खरोखर फार भूषणावह आहे.

पानसे मंडळी दूरवर पसरलेली, त्यांच्या सर्व शाखांचा जेवढा इतिहास कागद-पत्रांच्या साहाय्यानें जुळवितां आला तेवढा च आप्पासाहेब यांनीं या ग्रंथांत जुळवून मांडला आहे. घराण्याचे कामगिरीचे मानानें मिळालेली माहिती पुष्कळ त्रुटित आहे, याला इलाज नाहीं. याच कारणांमुळें ग्रंथांतील प्रकरणांस हि कोठें कोठें त्रुटित किंवा

खंडित स्वरूप आलेलें आहे. हा ग्रंथ म्हणजे पहिला आराखडा आहे आणि म्हणून च "सर्वारंभा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृताः" हा न्याय येथें लागू करून मग च असे ग्रंथ पारखले पाहिजेत. आपला विषय नसतांना देखील रावबहादुर आप्पासाहेब यांनीं ही ग्रंथरचना केली ती खरोखर च फार प्रशंसनीय आहे असें आम्हांस वाटतें.

राष्ट्राचा इतिहास हा त्यांतील कुळांच्या इतिहासाचा च बनलेला असतो. यामुळें खरे व विस्तृत कुलेतिहास जितके होतील तितके आपणांस अवश्य पाहिजे आहेत. हे कुलेतिहास लिहितांना कुलाभिमान योग्य मर्यादेंत ठेवून सत्यकथनाची दृष्टि जागरूक राखली पाहिजे हें सांगावयास नको. उलट अशा पुस्तकांतून कुलाभिमानाचा अंश जरा अधिक दिसून आल्यास तिकडे 'चंद्रकलंकन्याया' नें च पाहिलें पाहिजे.

आपटे–बर्वे–गोखले–पटवर्धन इत्यादि घराण्यांचे इतिहास कै. गोविंदराव आपटे यांनीं तयार केले. नंतर आमच्या मंडळाच्या पुरस्कृत ग्रंथमालेंत वाठारकर-निंबाळकर घराण्याचा इतिहास प्रसिद्ध झाला. आज हा पानसे घराण्याचा इतिहास मंडळाच्या पुरस्कृत ग्रंथमालेंत दाखल होऊन कुलेतिहासग्रंथांत चांगली भर पडत आहे.

पुरस्कृत ग्रंथमालेंतील ग्रंथांत स्वीयमालेंतील ग्रंथांपेक्षां अधिक स्वातंत्र्य लेखकांस दिलेलें असतें. ग्रंथांतील किंवा लेखांतील विधानांची जबाबदारी सर्वस्वीं ग्रंथकाराची किंवा लेखकाची हें तत्त्व सर्वमान्य आहे. पुरस्कार करणाऱ्यांची जबाबदारी केव्हांही मर्यादित च असते. मंडळाचे बाजूनें पाहिलें तर सर्व ऐतिहासिक घराणीं मंडळास सारखीं. परंतु लेखकांचे किंवा शोधकांचे मतानें त्यांत तारतम्य येणें हि तितकेंच योग्य आहे. शिवाय पूर्वीं घराण्याघराण्यांमध्यें वितुष्टें होतीं किंवा एका घराण्याचे शाखांत वितुष्टें होतीं म्हणून ते अभिमान किंवा अभिनिवेश मिरवीत बसणें हें कांहीं आपलें ध्येय आतां असतां कामा नये. आतां नवी सृष्टि होत आहे; तिच्या घडणीस व सर्वांच्या प्रगतीस पोषक होईल अशीच आपल्या सर्व क्रियांची मांडणी आपणांस केली पाहिजे. यास्तव रावबहादुर यांनीं क्वचित् कोठें आपले अभिप्राय व्यक्त करतांना कमी अधिक लिहिलें असेल तर वाचकांनीं त्यांच्या शुद्ध हेतूंकडे लक्ष द्यावें, अशी आमची त्यांस विनंति आहे. ग्रंथ छापून निघाल्यावर आमचे अवलोकनासाठीं आला! पृ. ९८ वर एका ज्ञातीचा केलेला उल्लेख अधिक काळजीपूर्वक करावयास पाहिजे होता. असो, तरी कर्त्यांच्या कर्मापेक्षां शुद्ध हेतूंवर च नजर देण्यास कोणी विसरूं नये म्हणजे व्यर्थ वाद व गैरसमज माजणार नाहीं.

सुविख्यात सरदेसाई घराण्याचा सांगोपांग इतिहास नुकताच दोन मोठ्या खंडांत प्रसिद्ध झाला आहे. परंतु इतिहास प्रसिद्ध करून च ही मंडळी थांबली नाहींत, तर त्यांनीं श्री. दादासाहेब मावळंगकर अहमदाबाद यांच्या प्रेरणेनें **समस्त-सरदेसाई-संमेलन** भरविण्याची फार उत्तम कल्पना अमलांत आणून दोन संमेलनें पार हि पाडलीं. हें उदाहरण फार अनुकरणीय आहे असें आम्हांस वाटतें. म्हणून आम्हीं राव-

बहादुरांस व इतर पानसेकुलोत्पन्नांस सप्रेम सूचना करतों कीं त्यांनीं **पानसेकुल-संमेलनसंस्था** लवकर काढून कायम करावी. वाटल्यास जो सर्व कुलाचा परंपरेचा श्रीकृष्ण-जन्मोत्सव हल्लीं मंदावत चालल्याचें या इतिहासांत नमूद केलें आहे, तो च उत्सव यासाठीं कायम करावा आणि या उत्सवास **नवें कालानुरूप वळण** यावें. पानसे घराण्यांतील कोणा हि स्त्रीस किंवा पुरुषास, मुलास किंवा मुलीस शिक्षणाची किंवा हर प्रकारें उन्नति करून घेण्याची सोय करणें हा या संस्थेचा हेतु ठेवावा आणि चालू **सहकारी** तत्त्वावर संस्था उभारावी.या पुरस्कारांत ही सूचना एवढ्याचसाठीं केली कीं, अशा संमेलनाचे योगानें कुलेतिहासाची अधिक चांगली रचना होण्यास साहाय्य होईल. अशा स्वकुलसंमेलनाची पद्धति जर आपल्या समाजांत रूढ होईल तर कुलेतिहासाची माहिती परस्परपरिचयानें सहज मिळेल. इतर फायदे हि अनेक होतील.

दुसरी एक सूचना येथें करतों. जे जुने वाडे, मंदिरें, मूर्ति इत्यादि अद्यापि शिल्लक असतील त्यांचे मस्विदे-स्केचेस-काढून तयार करावे व मूळ ठिकाणीं एक प्रदर्शनागार करून तेथें घराण्यांतील महत्त्वाचे कागद,चित्रें,स्मारक वस्तु,वगैरे एकत्र समाईक ठेवाव्या. म्हणजे पुढील पिढ्यांस तसेंच इतरांस त्या एकदम दृष्टीस पडून मोठा लाभ होईल. मस्विदे अवश्य तयार करविले पाहिजेत. कारण जुन्या इमारती, मंदिरें हीं भराभर पडत झडत चाललीं आहेत. त्यांस चित्ररूपानें तरी आपण जगविलें पाहिजे. शिवाय अशा स्थळांच्या व वस्तूंच्या यथादर्शनपद्धतीच्या कांचा ( Stereoscopic Slides ) तयार करून ठेवाव्या. इमारती पडून गेल्या तरी त्यांचे देखावे यथास्वरूप आपणास दिसूं शकतील अशी ही नामी युक्ति आहे. मस्विदे करविणें पानसे मंडळीस अवघड नाहीं, कारण बहुतेक पानसे मंडळी या वास्तुशास्त्रांतच वाकब झालेली दिसत आहेत. त्यांनीं मनावर घेतल्यास हें कार्य सहज होईल. इतरांस उदाहरण होईल हें वेगळें च, आणि याचसाठीं येथें जाहीरपणें या सूचनेचा उच्चार केला आहे.

रावबहादूर आप्पासाहेब यांनीं हा सर्व कुलेतिहास शालिवाहन शकांत रचिला हें कित्येकांस रुचणार नाहीं; परंतु रावबहादुरांनीं साहजिकपणें केलेली ही गोष्ट पुष्कळ बोधप्रद आहे यांत संशय नाहीं.

बोलून चालून हा आराखडाच आहे. त्यांत कमी अधिक जरूर करावें लागेल. उदाहरणार्थ **फॉरेस्टरनें,** केशवराव पानसे रामकिशवीच्या लढाईंत १७ ऑगष्ट १७६३ त पडले असें म्हटलें आहे ( पृष्ठ ६८७।६८८ ). ही राक्षसभुवनची दंगल दिसते. उदगीरांत केशवराव पडले हे या ग्रंथांत रावबहादुरांनीं दाखविलें आहे. याचा अधिक उलगडा झाला पाहिजे. कांहीं अशुद्धें आतां च शुद्धिपत्रानें दूर होतील. पण अशीं स्थळें सबंध ग्रंथांत सुमारें वीस पंचवीस च आम्हांस आढळलीं. तसेंच सोबत जोडलेले मूळ कागद यांतील कित्येक जुन्या छापलेल्या वरूनच कोठें कोठें घेतले आहेत. ते छापिले त्या वेळीं हल्लीं झालेली माहिती व उलगडे झालेले नव्हते.

मं. ग्रं. नं. १७२

आतां त्या चुका दुरुस्त करण्यासारख्या आहेत. उदाः—वाडांचा सनदा–पत्रांचा खंड हा मोडी वाचनाच्या चुकांनीं ग्रासलेला आहे. त्यामुळें त्यावरून घेतलेल्या कागदांत लाइणींबद्दल कड्णी ( पृ. १७२ ) पडणें सहजच आहे. तीच गोष्ट विरामचिन्हांची. हीं चिन्हें मूळ कागदांत नसतात त्यापक्षीं न द्यावीं हें उत्तम. मुळांत जेवढा बदल कमी होईल तेवढा शास्त्राचे दृष्टीनें बरा.

असो. हा ग्रंथ तयार होत असल्याबद्दल व तो पाहण्याबद्दल आम्हांस कै. रावसाहेब सावळारामपंत पानसे यांनीं जातीनें येऊन खबर दिली होती. परंतु पुढें त्यांचे मृत्यूमुळें तो प्रसंग तितकाच राहिला; परंतु रावबहादुरांनीं हि तोच संकेत कायम ठेवून आयता ग्रंथ छापून मंडळाचे पुरस्कृत-मालेंत दाखल केला याबद्दल मंडळास फार संतोष वाटत आहे. या ग्रंथांत भर टाकून याच्या पूर्वीचा भाग शक्य तितका विस्तृत करण्यास आणि पुढें नवीन कर्तृत्वाचे नवीन भाग जोडण्यास पानसे मंडळी आळस करणार नाहींत अशी दृढ आशा व्यक्त करून हा प्रेमपुरस्कार संपवूं.

आश्विन शुद्ध ६ शके १८५१, पुणें.

मंडळाचे आज्ञेवरून
**दत्तो वामन पोतदार**
चिटणीस, भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, पुणें.

---

टीपः—हा ग्रंथ भा. इ. सं. मंडळाचे सभासदांस खास सवलतीनें म्हणून रु.२–८· किंमतीस मंडळाकडे मिळेल.

# आत्मनिवेदन.

सरकारी नोकरीची मुदत पूर्ण झाल्यानंतर इ. स. १९२४ सालीं आम्हीं पेन्शन् घेतलें. पुढें अन्य व्यवसाय न राहिल्यानें वाचनाकडे जास्त लक्ष लागलें. आपटे, बर्वे, गोखले–रास्ते वगैरे कोंकणस्थ ब्राह्मण घराण्यांचे इतिहास वाचण्यांत आले. त्यावरून आपल्या " पानसे " घराण्याचा हि इतिहास तयार करावा अशी मनांत इच्छा उत्पन्न झाली. पानसे घराणें हें फार जुनें असून एकेकाळीं मुत्सद्दीपणा, राजकारण, स्वामिभक्ति व क्षत्रिय-तेज वगैरे गुणांत प्रसिद्धीस आलेलें होतें. या घराण्याचा इतिहास लिहिल्यास त्यांतील वैभवशाली गतपुरुषांची कर्तबगारी जनतेपुढें येऊन, ऐतिहासिक माहितींत थोडीफार नवीन भर पडेल, असे विचार मनांत येऊन कार्यास सुरुवात केली. पूर्वकालीन ऐतिहासिक पुरुषांचीं चरित्रें हीं बहुमोल रत्नेंच होत व जों जों त्या चरित्रांचें मंथन करून सत्य बाहेर काढावें तों तों तीं जास्तच प्रकाशमान होतात व पुढील पिढींतील तरुणांच्या अंगांत आपलेपणा जागृत करवून त्यांस राष्ट्राभिमानी बनवितात. एका व्यक्तीची अगर घराण्याची ऊर्जितावस्था होण्यास जीं कारणें लागतात, तींच संबंध राष्ट्रास कारणीभूत होतात. याच कारणासाठीं भूतकालीन इतिहास अभ्यासिला जातो.

इतिहास-संशोधन करणाऱ्या अभ्यासकांनीं आजपर्यंत मोठ्या मेहनतीनें जें वाङ्मय प्रसिद्ध केलें त्याचा उपयोग आम्हीं या कामीं करून घेतला आहे. तसेंच त्यांच्याजवळ आम्हांस उपयोगीं पडणारा कांहीं जुना पत्र-व्यवहार प्रसिद्ध होण्याचा राहिला असल्यास त्यासंबंधीं तपास केला, परंतु तसा अप्रसिद्ध पत्रव्यवहार कोणाही जवळ असल्याचें आढळून आलें नाहीं. फक्त कांहीं पत्रे रा. रा. कृष्णाजी वासुदेव पुरंदरे यांचेपाशीं होतीं; तीं त्यांनीं आम्हांस देऊन त्यांचा उपयोग या पुस्तकाचे कामीं करून घेण्यास परवानगी दिली, याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहोंत.

सुमारें पन्नास पंचावन वर्षांपूर्वी आम्ही लहान असतां सोनोरी येथें जहागिरदार पानसे यांच्या घरीं जुन्या कागदपत्रांचीं बरींच दप्तरें होतीं हे आम्हास आठवत आहे. या हातीं घेतलेल्या कार्यास या कागदपत्रांचा उपयोग होऊन साधनसामुग्रीची उणीव पडणार नाहीं अशी आमची समजून होती; परंतु तेथें जाऊन पाहतां असें आढळून आलें कीं, सर्व कागद काळाच्या भक्ष्यस्थानीं पडून नाहींसे झाले होते; फक्त त्यांतून पुढें जरूर लागणारे कागद, ( सनदा वतनपत्रें वगैरे ) जें निराळें काढून जतन करून ठेविलें होतें तें **श्री. रामचंद्रराव गोविंदराव** व **गोपाळराव शंकरराव पानसे** यांनीं मोठ्या उत्सुकतेनें दाखवून त्यांचा या पुस्तकाचे कामीं उपयोग करून घेण्यास परवानगी दिली; तसेंच **श्री. विष्णु कृष्णराव पानसे** यांनीं जुनीं कागद-

पत्रें व इतर माहिती मिळविण्याचे बाबतींत परिश्रम घेऊन बरीच मदत केली; याबद्दल आम्हीं त्यांचे आभारी आहोंत.

पुणें प्रांतीं आगमन होण्यापूर्वीं पानशांची वस्ती पानगांवीं होती, म्हणून आम्हीं तेथें जाऊन जुनीं दप्तरें तपासिलीं. त्यांत एक जुना महत्त्वाचा लेख सांपडला. त्यांत पानसे हे मूळ कर्नाटकांतून आले, असा उल्लेख असून त्यानंतर त्यांनीं ज्या ज्या गांवच्या ज्योतिष--कुलकरणाच्या वृत्ति संपादन केल्या, त्या गांवांचीं नांवें व इतर बरीच माहिती दिली होती. लेखाच्या शेवटीं पानशांचा मूळ पुरुष गोविंदपंत याजपासून शके १६६२ पर्यंत निरनिराळ्या ठिकाणीं कायम वस्ति करून रहात असलेल्या सर्व पानसे घराण्याचा संगतवार वंश-वृक्ष हि लिहून ठेविला होता. या लेखाच्या आधारानें इतस्ततः पसरलेल्या घराण्याचा संगतवार वंश-वृक्ष तयार करण्यास बिलकूल पंचाईत पडली नाहीं. हाच वंशवृक्ष इतर घराण्यांच्या तुटक मिळालेल्या वंश-वृक्षावरून कायम करून त्यास आजपर्यंत पुढील झालेल्या संतति-वाढीच्या शाखा जोडून या पुस्तकाच्या आरंभीं तो दिला आहे. या वरील सांपडलेल्या लेखामुळें पानसे घराण्याबद्दल प्राचीन व महत्त्वाची माहिती, पूर्वीं जी संशयात्मक व उडाफ्यानें मिळाली होती, ती खात्रीलायक व सुसंगत रीतीनें देतां आली.

शिरवळ प्रांतीं, भोळी, तोंडल व लोणी या गांवीं जाऊन, तेथील पानसे मंडळींच्या संग्रहीं असलेल्या माहितीचा हि आम्हीं या कामीं उपयोग करून घेतला आहे.

वर सांगितल्या प्रमाणें जो वंश-वृक्ष आम्हीं तयार केला आहे, त्यांत चूक राहूं नये अशी जरी काळजी घेतली आहे, तरी कदाचित् चुकीची माहिती मिळाल्यामुळें त्यांत दोष रहाणें संभवनीय आहे. तरी त्यांत चूक आढळून आल्यास मेहेरबानीनें आम्हांस कळवावी म्हणजे द्वितीयावृत्तीचा सुदैवानें प्रसंग आल्यास ती दुरुस्त करण्यास ठीक पडेल.

वंश-वृक्षाकडे लक्ष दिल्यास असें आढळून येईल कीं, कांहीं घराण्यांच्या शाखा जोमदार आहेत, परंतु कांहीं घराण्यांच्या वठत चालल्या आहेत. उदाहरणार्थः—रामजी परशुराम व विसाजी परशुराम या दोन घराण्यांतील भरभराटीच्या काळांतील सात पिढ्या घेतल्यास, त्यांत एकंदर शंभर पुरुष निपजून त्यांपैकीं सातवे पिढीचे अखेरीस पन्नास पुरुष हयात सांपडतात. त्याचे उलट भोळीकर, तोंडलकर अगर वाठारकर पानशांच्या तितक्याच पिढ्यांचा हिशेब केल्यास अडतीस पुरुष निपजून शेवटीं सात आठ च पुरुषांची हयाती सांपडते. संतति–नियमन अगर संतति–संवर्धन या दोन्ही बाबतींत विचार करणाऱ्या एखाद्या आधुनिक चिकित्सकानें या कारणांचा शोध लावावा अशी आमची त्यास आग्रहाची सूचना आहे.

हें पुस्तक लिहिण्याच्या कामीं आम्हांस मुख्यत्वें राजकीय बाबींतील च सामुग्री मिळाली. प्रसिद्ध पुरुषांची खाजगी रहाणी, त्यांची दिनचर्या, आचार, विचार, धार्मिक व सामाजिक मतें वगैरे माहिती ही फार मनोरंजक व बोधप्रद असते. परंतु तशी

माहिती न मिळाल्यामुळें या पुस्तकांत ती उणीव राहिली आहे; त्यास आमचा निरुपाय आहे ही गोष्ट वाचकांनीं प्रामुख्यानें लक्षांत ठेवावी. एकाद्या जातीला अगर पक्षाला लागेल असा शब्द पुस्तकांत आल्याचें आम्हांला स्मरत नाहीं. तरी क्वचित् एकाद्या ठिकाणीं तसा शब्द पडला असल्यास तो सहेतुक पडला नाहीं असें वाचक समजतील.

पुस्तक-प्रसिद्धीच्या खर्चाच्या बाबतींत तो बराच आमचे अंदाजाबाहेर वाढणार म्हणून या कामीं आमचे स्नेही **श्री. सावळाराम कोंडदेव पानसे** यांनीं सढळ हातानें मदत करण्याचें कबूल केलें होतें; परंतु दुर्दैवानें हें पुस्तक छापखान्यांत जाण्यापूर्वींच त्यांचा अकालीं अंत झाला. त्यांचे पश्चात् त्यांच्या पत्नी **श्री. सीताबाई** यांनीं आपल्या पतीनें दिलेलें आश्वासन पूर्ण केलें. तसेंच भोर येथील प्रसिद्ध वकील **श्री. रा. रा. गहिनीनाथ माधवराव पानसे** यांनीं हि या कामीं उदारमनानें सहाय्य केलें याबद्दल आम्हीं दोघांचे हि फार आभारी आहोंत. शिवाय या पुस्तकाच्या प्रति घेण्याचें अगाऊ च ज्यांनीं आश्वासन दिलें, त्यांचे हि आम्ही आभार मानतों.

सरदार आबासाहेब मुजुमदार व भा. इ. सं. मंडळाचे उत्साही सेक्रेटरी श्री. दत्तो वामन पोतदार यांनीं फुरसत नसतांही आमच्या विनंतीस मान देऊन या पुस्तकास अनुक्रमें मार्मिक व सुंदर प्रस्तावना व पुरस्कार लिहून दिल्याबद्दल अ त्यांचे मन:पूर्वक आभार मानितों.

सरते शेवटीं या पुस्तकाचा वेळोवेळीं तयार झालेला भाग वाचून त्यांत उपयुक्त सुधारणा सुचविण्याचें व तसेंच प्रुफें तपासण्याचें व इतर बाबतींत, आपलेपणाचे भावनेनें केलेल्या मदतीबद्दल **श्री. सिद्धेश्वर वासुदेव सुभेदार,** शिक्षक प्रा. स्कू. ट्रे. कॉलेज पुणें यांचे व तसल्याच तऱ्हेची मदत केल्याबद्दल **श्री. लंबोदर वामन मांडके**, एम्. ए. शिक्षक ट्रे. कॉलेज पुणें यांचे आम्ही फार फार आभारी आहोंत.

कोजागरी पौर्णिमा शके १८५१
ता. १७ आक्टोबर १९२९

**केशव रंगनाथ पानसे.**

म. इ. मं. १७२

# अनुक्रमणिका.

पृष्ठ

**१ प्रकरण पहिलें.** ... ... ... ... ... १ ते १२

१ प्रास्ताविक (१). २ स्वराज्यांतील उदयोन्मुख घराण्यांचें वैशिष्ट्य. (१). ३ पानसे घराण्याच्या इतिहासाचीं साधनें. (२). ४ पानसे घराण्याची प्राचीन माहिती (२). ५ पानशांचें महाराष्ट्रांत आगमन (४). ६ गोविंदपंतांचें पाथरीस आगमन (५). ७ बालेघाटाची दंतकथा (६). ८ गोविंदपंतांचें वृत्तिसंपादन (८). ९ अठरा गांवांच्या वृत्ति (९). १० पानगांव परगण्याचें देशपांडेपण (१०).

**२ प्रकरण दुसरें** ... ... ... ... ... १३ ते ३१

१ महाराष्ट्रांतील पन्ना (१३). २ परशुरामपंत पानसे (१५). ३ पुणें-शिरवळ व वाई प्रांतांच्या वृत्ति (१६). ४ सोनोरी व दिवें येथील वृत्ति (१७). ५ म्हैसाळें येथील दिव्य (२०). ६ रामाजी गांवखंडेराव व विसाजी पानसे यांचा वाद (२१). ७ गोविंद विश्वनाथ व रामाजी गांवखंडेराव (२२). ८ मोहरीचें दिव्य (२३). ९ शिवाजी महाराजांची न्यायनिष्ठुरता (२७). १० सोनोरीच्या वृत्तीचें वाटप (२८). ११ रखमाजी परशुराम (३१).

**३ प्रकरण तिसरें.** ... ... ... ... ... ३२ ते ४०

१ पानशांचा राजाश्रय (३२). २ माणको विश्वनाथ व शिवाजी महाराज (३२). ३ पानशांना सरदारी (३४). ४ माधवराव शिवदेव व तोफखान्याची सरदारी (३५). ५ केशवराव पानसे व उदगीरची लढाई (३९).

**४ प्रकरण चवथें** ... ... ... ... ... ४१ ते ६२

१ भिवराव यशवंत व त्यांचे बंधु (४१). २ पानपतचें युद्ध व महिपतराव पानसे (४२). ३ निजामावरील स्वारींत भिवराव (४४). ४ पानशांनीं मिळविलेलीं कांहीं इनामें व जमिनी (४७). ५ दाक्षिणेंतील खळबळ (४८). ६ मौजे काळेगांव व इतर ठिकाणें येथील इनामें (५१). ७ हैदरअल्ली व कोल्हापूरकर यांजवरील मोहीम (५३). ८ बारभाई प्रकरण (५७).

**५ प्रकरण पांचवें.** ... ... ... ... ... ६३ ते ७९

१ भिवराव यांची तोतयावर रवानगी (६३). २ तोतयाचा शेवट व भिवरावावर सरकारचा विश्वास (६५). ३ जयवंतरावास तोफखान्याच्या मुजुमेचा अधिकार (६५). ४ सावशीची लढाई (६६). ५ कृष्णरावांचें धारातीर्थी पतन (६७). ६ शके १६९८–९९ मधील कांहीं गोष्टी (६९). ७ हैदरअल्लीवरील मोहिमेवर भिवरावांची नेमणूक (७०). ८ वडगांवची लढाई व भिवराव

पानसे ( ७३ ). ९ भिवरावांचा मृत्यु ( ७६ ). १० कृष्णराव व भिवराव यांच्या-वेळीं मिळालेल्या कांहीं इनामांची माहिती ( ७७ ).

**६ प्रकरण सहावें.** ... ... ... ... ... ८० ते ९७

१ पानशांच्या घरांतील वाटप ( ८० ). २ सिताराम अय्याचा खून ( ८३ ). ३ स्वराज्यांतील चोरीचा तपास लावण्याची पद्धति ( ८४ ). ४ पूर्वीच्या कांहीं चालीरीति ( ८५ ). ५ कर्नल गॉडर्डचा पराभव ( ८६ ). ६ बदामीचा वेढा व दोघे पानसे बंधु ( ८७ ). ७ टिपू व मराठे यांच्या चकमकी ( ८८ ). ८ टिपू-वरील दुसरी मोहीम ( ८९ ). ९ सचिवप्रकरण ( ९२ ). १० खर्ड्यांच्या लढा-ईंतील पानशांची कामगिरी ( ९३ ).

**७ प्रकरण सातवें.** ... ... ... ... ९८ तें १०५

१ श्रीमंत रावबाजी यांस पेशवेपद व नानास अटक ( ९८ ). २ पुण्यांत सर्जेरावी ( १०१ ). ३ वाघाचें बंड व बापू गोखल्याचा पराक्रम ( १०२ ). ४ करवीरकरांवरील स्वारी ( १०३ ).

**८ प्रकरण आठवें.** ... ... ... ... १०६ ते १२०

१ श्रीमंत रावबाजीची पानशांवर इतराजी ( १०६ ). २ खडकीची लढाई व स्वराज्याचा शेवट ( ११० ). ३ स्वराज्यसंरक्षणार्थ अखेरचा प्रयत्न ( ११३ ). ४ इंग्रजांचें जहागिरी खालसा करण्याचें धोरण ( ११५ ).

**९ प्रकरण नववें.** ... ... ... ... १२१ ते १२४

१ नीरथडीकर पानसे ( १२१ ).

**१० प्रकरण दहावें** ( स्थलवर्णन ). ... ... ... १२५ ते १३८


१ सोनोरी ( १२५ ) २ दिवें ( १३६ ). ३ पानगांव ( १३७ ). ४ नीर-थडीचीं गांवें ( १३८ ).


**११ प्रकरण अकरावें** ( उपयुक्त व मनोरंजक माहिती ). ... १३९ ते १४९


१ कुलदैवतें व कुलाचार ( १३९ ). २ उपास्यदैवतें व त्यांचे उत्सव ( १४० ). ३ पानसे घराण्याची शैक्षणिक प्रगति ( १४२ ). ४ जाधवांचें उपाध्येपण ( १४४ ). ५ पुरंदरे व पानसे यांचा शरीरसंबंध ( १४४ ). ६ पानसे आडनांवाचीं इतर घराणीं ( १४५ ). ७ तोफखान्यासंबंधीं मनोरंजक माहिती ( १४५ ). ८ तोफ-खान्याचा पसारा ( १४६ ). ९ निशाण मारण्याचें कौशल्य ( १४७ ). १० कला-वंतीण ( १४८ ). ११ फुलझाडांचा शोक ( १४८ ). १२ जेजुरी येथील खंडे-रावाची तरवार ( १४८ ). १३ चिलखत ( १४९ ).


**१२ प्रकरण बारावें** ( वंशविस्तारविवेचन ) ... ... १५० ते १७०


**१३ प्रकरण तेरावें, परिशिष्ट** ( वतनपत्रें, सनदा वगैरे ) ... १७१ ते २११


पानसे घराण्याचा
वंशवृक्ष


गोविंदपंत
एकोबा
भुतोबा
मेंगाजी बालाजी (न)
भुतोपंत सुखोपंत विठ्ठलपंत
परसोबा जनार्दन नानाजी
भुतोबा सुखोबा
बालाजी (१) परसोबा (२) नानाजी (३) लक्ष्मण
रामजी नारोबा
काशिनाथ (न)
बाप्पाजी मल्हार भुतोबा
साबाजी मोरोपंत रामजी गोविंद विराजी चिंतोबा
(न) (न) (न)
बहिरव रंगो बयाजी आबाजी राकजी
(न) (न) (न)
नागोपंत गणेशपंत
स्त्री पार्वतीबाई
चिंतोपंत काशिबा यादव बापूजी
(न) (न) (न)
खंडो समजी शिवाजी
(न)
महादाजी शिवाजी
भगवंत
केशव
बहिरव
चंद्राग
(न)
गंगाजी केसो
(न)
कान्हो
माणको
श्रीधर (ह) पांडुरंग (ह)
आनंदराव नारायण
धोंडोदेव शिवराम सिताराम राघो मोरो हरी त्रिंबक
(न) (न) (न) (न) (न)
बाबुराव महादेव
(न)
कृष्णराव
गणेश (ह)
रामाजी भिवा त्रिंबक हरी
हरी (न) (न) (न) (न)
हें घराणें तोडून येथें आहे
बहिरव
साबाजी रत्नाजी माणकोबा सोयरोबा
(न) (न) (न)
जिवबा
राघोबा खंडू (न) बालकृष्ण (न)
भिकाजी
नरसोपंत
विठ्ठल रंगोपंत भिकाजी आबाजी
(न) (न) (न) (न)



दिवे
नरसोबा (२) (पृष्ट १ वरील नं. २)
लक्ष्मीधर भट
नरसोबा
विठोबा
बाबाजी
पृष्ट ३ वर
नारोबा
विठ्ठलपंत
(नं)
कुसोबा
(न)
रामाजी
पृष्ट ६
विसाजी
पृष्ट ११
कृष्णाजी
केसो
रखमाजी
(न)
चिमणाजी
लक्ष्मण
मल्हार
महादाजी
श्रीपती
(न)
त्र्यंबक
(न)
चिमणाजी
लक्ष्मण
(न)
रखमाजी
कृष्णाजी
परशुराम
(न)
कोंडोपंत
(न)
रामचंद्र
(न)
भिकाजी
मुरार
(न)
मल्हारी
धोंडोपंत
(न)
बापू
(न)
रामचंद्र
(न)
कृष्णाजी
(न)
रावजी
(न)
पांडुरंग
परशुराम
कृष्णाजी
(न)
रामचंद्र
धोंडोपंत
(ह)
माधव
केशव
विनायक
नारायण
वासुदेव
(न)
रघुनाथ
(न)
महिपल
गोविंद
दिगंबर
(ह)
गजानन
(ह)
कृष्णा
(ह)
गणेश
(ह)
बापू
+
नथुराव
(ह)
बाबूराव
(ह)
( हें घराणें दिवे येथें आहे )


बाबाजी (पृष्ठ २ वरून)
बापूजी
रखमाजी (न)
बाबाजी
शिवाजी (न) (न)
गोमाजी (न)
निंबाजी
बापूजी
बाबाजी (बाजी)
विश्वनाथ (न)
सखाराम
चिंतोपंत
आत्माराम
राघोपंत (न)
यशवंत
अनंत
काशिनाथ (न)
चिंतोपंत
बोबाजी
सदाशिव
निंबाजी (ह)
हरी
विठ्ठल (न)
वामन
रामचंद्र
दत्तात्रय (ह)
कृष्णा (ह)
विठोबा
राजाराम (न)
गजानन (ह)
विनायक (ह)
पांडुरंग (ह)
धोंडोपंत (न)
स्त्री गंगुबाई
गणपती
गोविंद (ह)
अनंत (न)
मुरलीधर (ह)
प्रभाकर (ह)
श्रीधर (ह)
मोरु (ल)
(स्त्री शांताबाई)
बाबूराव (ह)
गोपाळ (ह)
चिंतोपंत
विश्वनाथ (न)
ज्ञानदेव (ह)
सोपानदेव (ह)
निवृत्ति (ह)
मधुकर (ह)
मुरलीधर (ह)
( हें घराणें दिवें येथें आहे )



वाटार
तान्हाजी ३
(पृष्ठ १ वरील नं. ३)
बाळाबा
अंताजी
परशुराम
गोविंदभट
रंगोपंत
सखोपंत
बापूजी
दूधाजी
रामजी
(न)
तानाजी
कुमाजी
कृष्णाजी
बाबूराव
गोविंदपंत
(न)
बापुजी (न)
न
तानाजी
राघोबा
(न)
(न) निरानदींत बूडूनमेला
सखाजी
सखोजी
दादाजी
बाबूराव
पृष्ठ ५ वर
अंताजी
कृष्णाजी
रामाजी
गोविंद
गोविंदराव
भगवंत
माणकोपंत
जिवाजी
मल्हारबाबा
बजाबा
आनंदराव
माधवराव
(न)
(न)
गंगाधर
(न)
नारायण
(न)
महिपती
रामाजी
(न)
सदाशिव
(न)
खंडोपंत
नारायण
(न)
रंगोपंत
(न)
भैराळपंत
दामाजीपंत
(न)
पांडुरंग
लक्ष्मण
खंडोपंत
माणिक
आबाजीपंत
(न)
माधव
(न)
केशव
(न)
नारायण
(न)
कृष्णा
(न)
लक्ष्मण
(हृ)
विनायक
गणपत
मोरु
(न)
चिंतामणी
(हृ)
विष्णू
(न)
कोंडोपंत
विश्वनाथ
धोंडोपंत
(हृ)
कृष्णा
(हृ)
खंडोपंत
(हृ)
भास्कर
दिनकर
(न)
पुरुषोत्तम
(हृ)
गणपती
(हृ)
गोविंद
(हृ)
भगवान
(हृ)
श्रीपाद
(हृ)
पांडुरंग
(न)
वामन
(हृ)
दत्तात्रय
(न)
गोपाळ
(हृ)
गोविंद
(हृ)
वासुदेव
भिकाजी
विष्णुपंत
नागोपंत
गणेश (न)
रामचंद्र
सिताराम
गोविंद
माधव
(न)
श्रीधर (हृ)
केशव
(हृ)
नरसिंह
(हृ)
भगवंत
(हृ)
सखाराम
(हृ)
अनंत
(हृ)
त्रिंबक
(हृ)
शंकर
(हृ)
त्र्यंबक
(हृ)
कृष्णा
(न)
सखाराम
(न)
नाना
गोपाळ
(न)
दाजी
(न)
गजानन
(न)
राजाराम
(न)
शंकर
(न)
शामजी
(न)
आण्णा
(हृ)
मधु
(हृ)
दिगंबर
(हृ)
(हें घराणें वाटार येथें आहे)

भोकी (वाई)


पृष्ठ ४ वरील नंबर २





( हें घराणें भोकी ता० वाई येथें आहे )





(हें घराणें दोन्ही ता. वाई येथे आहे)


हरिपंत
(पृष्ठ ६ वरून)
यादव
भगवंत
केशव
नारायण
भिकाजी
राजाराम
बाळाजी
सखाराम
गोविंद
विठ्ठल
श्रीपती (न)
गणेश
वामन
लक्ष्मण
बळवंत (न)
बळवंत
दामोदर (न)
बळवंत
शंकर (न)
सखाराम (ह)
तात्या (लक्ष्मण) (ह)
केशव (ह)
सखाराम (ह)
महादेव (ह)
नारायण (ह)
राम (ह)
रामचंद्र
सदाशिव (न)
पांडुरंग (ह)
यशवंत (ह)
नरहरी (ह)
धोंडोपंत (ह)
रघुनाथ (ह)
शंकर (ह)
दत्तात्रय (ह)
पांडुरंग (ह)
राघो
केसो
भैराळ
त्रिंबक
चिंतू
तात्या (त्रिंबक) (न)
मोरो
पांडुरंग
सदाशिव
भगवंत (भाजा) (न)
वामन
सदाशिव +
धोंडोपंत (ह)
बळवंत +
अंताजी (न)
आबाजी (न)

( हे घराणे दिवे येथें आहे. )



सोनोरी
पृष्ठ ६ वरून
विठोबा
विमणाजी
लखमाजी
मुकुंद
महादेव
निळोबा *
विसोबा
पांडुरंग(न)
विंठोबा
शामराव
गोपाळ
भुजंग
विठोबा
रायोपंत
अर्जोबा
जनोबा
त्रिंबक (न)
बाळकृष्ण (न)
मल्हार
केशव (न)
गणेश
महादेव (न)
रायोबा +
गजोबा
मार्तंड
नारायणराव
मल्हार
राम (न)
कृष्णराव
विष्णोपंत (न)
सखाराम (न)
लक्ष्मण
जयराम (न)
बळवंत (न)
रंगोपंत (न)
नारायण
महिपत (ह)
रामचंद्र (ह)
भगवान ह
प्रभाकर (ह)
गंगाधर
रंगोपंत
बाळकृष्ण
नारायण (न)
दत्तात्रेय
श्रीपती +
विठोबा +
पर्वतराव
बाळकृष्ण (ह)
मनोहर (ह)
अमृत (नाथू) (ह)
गोविंद (ह)
अनंत (ह)
गणपती +
हे घराणे नाशिक येथे आहे
महिपती
* निळोबा
कृष्णा (न)
भिकराव
हरी +
केशवराव
सदोबा (न)
आनंदराव
रायोबा
मोरोपंत
रामाजी
रामकृष्ण +
दत्तात्रेय +
रंगोबा
नारोबा
जनोबा
वामन
राघोजी (न)
दाजीबा
केसोपंत (न)
सखाराम +
बापू (न)
परशराम (न)
निळोबाचे मुलांपैकी रायोबा व मोरोपंत यांचे वंश सोनोरी, कोर्णीमापकर, ओळी व माझलगांव जी. व्हा बीड येथें आहेत ते पुढील पानावर दिले आहेत.
अमृत
विष्णू
केशव (ह)
दामोदर
गोपाळ
विष्णू (न)
(ह) सदाशिव
अनंत (ह)
हरी (न)
यशवंत (ह)
विनायक (ह)
भालचंद्र (ह)
दत्तात्रय (ह)





लोणीभापकर व भोळी ही घरें सोडून बाकीची मंडळी सोनोरी येथें आहेत

फक्त IP रामराव यांचें घराणें माझलगांव जि॰ बीड येथें आहे


तें पुढील पानावर दिलें आहे



माधवराव
(मागील पानावरून) पृष्ठ ९
गोपाळराव
वासुदेव
पांडोबा
राघोबा (न·)
रामराव
कोंडोपंत
बाळकृष्णपंत (एकनाथ) (न)
सावळारामपंत (न)
महादेव (न)
विठु (न)
विनायक (न)
हरी
निमाराव (बळवंत)
विठ्ठल
त्रिंबक (न)
केशव
बापूजी (ह)
गणपती (ह)
सदाशिव (भाऊराव) (न)
बापू (न)
यशवंत (ह)
भास्कर (ह)
(हे घराणें सोनोरी येथे आहे)
गोपाळ (ह)
भिवराव (ह)
मनोहर (ह)
बाळकृष्ण (ह)
दाजी (विष्णू)
शंकर
आण्णा (कृष्णाजी)
व्यंकटेश
रघुनाथ
त्रिंबकराव (ह)
नारायण (ह)
दवीदास (ह)
दुर्गादास (ह)
भगवान (ह)
रंगराव (ह)
माधवराव (ह)
त्रिंबकराव
व्यंकटेश (ह)
रामराव (ह)
विठ्ठल (ह)
कृष्ण (ह)
विनायक (ह)
हे घराणें माझलगांव जि० बीड येथे आहे



( सोनोरी )
बिसाजी ( स्त्री मागाबाई ) पृष्ठ २ वरून
त्रिंबक १
मोरो २
माणको ३
गोविंद ५
उद्धव ५
शामजी दत्तक पान १३ वरील नं ३
नं २, ३, ५, ५, पुढील पानावर दिले आहेत
आत्माजीवन
भगवंत (न)
शामजी
मल्हारी (हे घराणें सोनोरी येथें आहे)
रंगराव
मल्हारपंत
धोंडोपंत (न)
विठ्ठल
भगवंत
विनायक (आप्पा)
शामराव (आप्पा)
गणेश
दाजी (न)
दत्तात्रय (ह)
अनंत (ह)
रघुनाथ
शंभोराज (ह)
श्रीकृष्ण (ह)
आत्माराम
पांडुरंग
केशव
नारायण
विठ्ठल (ह)
मारेश्वर
अनंत (न)
केशव (ह)
बसंत (ह)
मधू (ह)
हेरंब (ह)
रामचंद्र (ह)
दामोदर (ह)
गजानन (ह)
विष्णू
वासुदेव
कृष्णाजी (ह)
शंकर ह
श्रीधर (ह)
पुरुषोत्तम (ह)
प्रभाकर (ह)
विनायक (ह)
नरहरी (ह)
प्रल्हाद (ह)
दिगंबर (ह)
अनंत (ह)
धोंडोपंत
भगवंत
गोपाळ
खंडेराव (न)
सखाराम
मार्तंड (ह)
लक्ष्मण (न)
यशवंत (ह)
गोविंद (ह)
लक्ष्मण
दिनकर (ह)
आत्माराम न
गोपाळ
काशिनाथ (न)
हरी (ह)
विष्णू (ह)
वामन
मार्तंड
नागेश (ह)
भालचंद्र ह
एकनाथ (ह)
सदाशिव (ह)
गोपाळ (ह)
दत्तात्रय (ह)




पृष्ठ ११ वरील नं. ३ चे भागको यांचें घराणें मोठें असलें मुळे नं. ४ व ५ हे पृष्ठ १४ वर घेतले आहेत व नंबर् ३ हे त्याचे पुढील पानावर घेतलें आहे.

पृष्ठ ११ वरील नं ३

माणको नं ३ { स्त्री १ भागूबाई, २ जिऊभाई } पानगांव

शिवदेव

शिवाजी
लक्ष्मण
शामजी ३
सखाजी ५ (पृ. १७)
अनंत ५ (न)
संभाजी ६ (पृ. १७)
शंकराजी ७ — काशिबा (न)
साबाजी ८ (न)

खंडोपंत (सदाशिव)

दत्तक पान ११ वर

शिवराव (शिवाजी स्त्री पार्वतीबाई) (भगवंत पान १७ वरील दत्तक) — खंडोपंत — कृष्णराव

भैराळ (स्त्री म्हाळसाबाई) — रघुनाथ (न)

खंडोपंत (दत्तक पृष्ट १२ वरून) (दाजिबा)

कृष्णराव — दत्तात्रय (हू) — कृष्णराव (हू), रघुनाथ (हू)
कृष्णराव (हू) — माणकेश्वर (हू), शंकर (हू)

शिवराव — दिगंबर (हू) — म्हाळसाकांत (हू), देविदास (हू), बापा (हू)

भैराळ (बापू) — रंगनाथ, लक्ष्मण, गोविंद (हू)
रंगनाथ — खंडेराव (हू), श्रीधर (हू)
लक्ष्मण — गोपाळ (हू)

हे घराणे पानगांव येथे आहे

१ माधवराव (राऊबाई) १७५५
२ यशवंतराव (बहिणाबाई) पृष्ठ १६ वर
३ महिपत (मैनाबाई) (न)
४ रामचंद्र (साकूबाई) (न)
५ केशव (१ राधाबाई) (२ काशीबाई) इ. १७६३

माधवराव — कृष्णराव (आनंदराव) १७७७

दत्तक यशवंतराव यांचे कनिष्ठ पुत्र पृष्ठ १६ वरून

केशव — व्यंकटराव — केशवराव इ० स० १७९० (न)


कृष्णराव — माधवराव (१८२०) { स्त्री १ रुक्मिणीबाई, २ वेणूबाई }


श्रीपती (स्त्री गंगाबाई) — दामोदर { स्त्री १ आनंदीबाई, २ जानकीबाई } दत्तक पृष्ठ १५

पूढील पानावर चालू (१५)


नं. ३ शामजी हे पृष्ठ ११ वर त्रिंबक याना दत्तक गेले आहेत.

पृष्ठ ११ वरील नं. ४ व ५






हें घराणें सोनोरी येथें आहे





* गणपतराव यांनीं वडील स्त्री सरस्वतीबाई इचे भावाचा मुलगा उडपी धारवाडकर या घराण्यांतील दत्तक घेतला.

⊗ दामोदर हा हेवळीकर यांचे घराण्यांतील गणपतरावाच्या बायकोच्या भावाचा मुलगा दत्तक घेतला.

पान १७

पृष्ठ १३ वरील नंबर ५ वरून




सूचना:

(ह) = हयात

(न) = नकल

■(ह) = हयात अज्ञान

\+ = तपास लागत नाहीं.

३८५३

# पानसे घराण्याचा इतिहास.

## प्रकरण पहिलें.

### १. प्रास्ताविक.

**श्रीशिवाजीमहाराजांनीं** स्थापिलेल्या "स्वराज्या" च्या अभिवृद्धीसाठीं सतराव्या व अठराव्या शतकांत महाराष्ट्रांतील अनेक घराण्यांनीं बहुमोल कामगिरी बजाविली असल्याचें इतिहासांत नमूद आहे. या घराण्यांत ब्राह्मण, मराठे व इतर जातींतील घराणीं हि पुढें आलीं होतीं, ब्राह्मणांत सुद्धां देशस्थ, कोंकणस्थ, कऱ्हाडे आदिकरून पोटशाखांतील कर्तबगार व्यक्तींना आपलें कर्तव्य दाखविण्यास वाव मिळाला होता. तो काल आपुलकीच्या स्वराज्याचा होता; स्वराज्यांत जसें विविध प्रकारच्या कर्तबगारींचें चीज होतें तसें परकीय अमलांत होत नाहीं. राष्ट्रांतील नरमणींची बुद्धि स्वराज्यांत प्रखरपणे चमकली जाते: तर परकीय अमलांत तिच्यावर उलट गंज चढला जातो, किंबहुना तो चढविला जाण्याचा बुद्धिपुरस्सर प्रयत्न केला जातो. हा त्रिकालाबाधित नियम असल्यानें त्याचें प्रत्यंतर सतराव्या शतकापासून विसाव्या शतकापर्यंतच्या काळांत दृग्गोचर होतें; तथापि पूर्वेतिहासाच्या अवलोकनानें स्वदेशाभिमान जागृत होतो व पूर्वजांच्या तेजस्वी कृतींची आठवण मनांत प्रेरणा उत्पन्न करते व प्रस्तुत परिस्थितींत हि मग ती अनुकूल असो, किंवा प्रतिकूल असो, यशस्वी भविष्यकालाचा मार्ग दर्शविते. एतदर्थ, उपरिनिर्दिष्ट घरण्यांपैकीं अशाच एका प्रमुख घराण्याचा पूर्वेतिहास प्रस्तुत ग्रंथांत संकलित करण्याचें योजिलें आहे. मराठी अमलांतील सैन्यव्यवस्थेसंबंधानें प्रश्न निघाला असतांना, मराठी सैन्याचा जो एक प्रमुख व महत्त्वाचा भाग म्हणजे तोफखाना त्याकडे वाचकांचें सहज लक्ष वेधतें. मराठ्यांच्या अशा तोफखान्यावर एका काळीं एका प्रख्यात घराण्यांतील कर्त्या पुरुषांची योजना झाली होती. तें घराणें-**सरदार पानसे**—यांचें होय. या घराण्याचा इतिहास हाच प्रस्तुत ग्रंथाचा विषय होय.

### २. स्वराज्यांतील उदयोन्मुख घराण्यांचें वैशिष्ट्य.

वर सांगितल्याप्रमाणें शिवाजीमहाराजांनीं स्थापन केलेल्या स्वराज्यांत महाराष्ट्रांतील निरनिराळ्या जातींतील अनेक घराणीं उदयास आलीं. मात्र या घराण्यांत एक प्रका-

रचा विशिष्टक्रम दृष्टीस पडतो. थोरल्या (शिवाजी) महाराजांपासून शाहूमहाराजांपर्यंतच्या कालांत व तदनंतरच्या पेशवाईच्या कालांत या वैशिष्ट्याचें स्वरूप दिसून येतें. पहिल्या कालांत घाटमाथ्यावरील देशस्थ ब्राह्मणघराणीं जितकीं उदयास आलीं, तितकीं पेशवाईंत आलीं नाहींत; मुळीं च आलीं नाहींत असें आमचें म्हणणें नाहीं. कारण, पुरंधरे, बोकील, दाणी, चंद्रचूड इत्यादि घराणीं या च काळांत पुढें आलीं; फार काय, पण आमचें स्वतःचें च घराणें पेशवाईंत जास्त पुढें आलें. तात्पर्य एवढें च कीं, पेशवाईंत पूर्वींपेक्षां देशस्थ घराणीं कमी उदयास आलीं आणि कोंकणांतील चित्पावनांचा शिरकाव राज्यांतील जबाबदारीच्या जागांवर उत्तरोत्तर जास्त होत चालला. असा बनाव बनणें त्यावेळीं साहजिक किंबहुना मानवी स्वभावाला अनुसरून च होतें. तथापि, देशस्थांवर अजिबात बहिष्कार टाकला गेला नव्हता, तर त्यांना हि पुढें येण्यास सवड ठेविली होती. अशा काळांत, वर सांगितल्याप्रमाणें आमचें "पानसे" घराणें उदयास आलें. या पानसे घराण्यानें महाराष्ट्राच्या इतिहासांत काय कामगिरी केली तिची माहिती यथानुक्रमानें पुढें देण्यांत आली आहे.

## ३. पानसे घराण्याच्या इतिहासाचीं साधनें.

ही माहिती देण्यासाठीं आतांपर्यंत प्रसिद्ध झालेलीं ऐतिहासिक साधनें व इतर साधनें (जितकीं आम्हांस मिळालीं) यांचा आम्हीं उपयोग केला आहे. ऐतिहासिक साधनांत, मुख्यतः कै. खरे शास्त्री यांचे "ऐतिहासिक लेखसंग्रहा" चे सर्व भाग, कै. इतिहासाचार्य विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांनीं प्रकाशित केलेलीं "मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें" (एकंदर २२ खंडांतील कांहीं खंड), काव्येतिहाससंग्रहांतून प्रसिद्ध झालेल्या बखरी, कै. वाड यांनीं पुणें येथील पेशवे दप्तरांतून निवडून काढलेल्या पेशव्यांच्या रोजनिशांचे सर्व भाग व कैफियती आणि वतनपत्रें वगैरे इतर भाग यांचा समावेश झाला आहे. या खेरीज इतिहाससंग्रह, भारतवर्ष व इतर ऐतिहासिक माहिती प्रसिद्ध करणारीं मासिकें आणि आतांपर्यंत प्रसिद्ध असलेले व निरनिराळ्या लेखकांनीं लिहिलेले मराठ्यांचे इतिहासग्रंथ हि उपयोगीं पडले आहेत. दंतकथांत जरी ऐतिहासिक सत्याचा भाग कमी असतो, तरी त्यांस मूळ आधार मात्र ऐतिहासिक कथानकांचा असल्यानें आम्हीं वृद्धांच्या मुखांतून ऐकलेल्या दंतकथांना हि ह्या पुस्तकांत (योग्य तें) स्थान दिलें आहे. या विरहित आम्हांला पानसे घराण्याच्या निरनिराळ्या शाखांत सांपडलेली लेखी व तोंडी माहिती सुद्धां आम्हीं ठिकठिकाणीं तारतम्यानें जमेस धरली आहे. याप्रमाणें आमच्या या पुस्तकाच्या आधाराचें (Sources of informations) हें असें सामान्य स्वरूप आहे.

## ४. पानसे घराण्याची प्राचीन माहिती.

पानसे यांचें मूळ आडनांव "**पानसी**" असून हे ऋग्वेदी, आश्वलायनसूत्री

देशस्थ ब्राह्मण होत; यांचें गोत्र **मुद्गल** असून त्याचे अंगिरस, भार्म्यश्व, व मौद्गल्य असे तीन प्रवर आहेत; **आश्वलायनानें** अंगिरसाऐवजीं तृक्ष याचें नांव दिलें आहे.

आज आम्हांस कागदपत्रांच्या पुराव्यानिशीं पानशांची ऐतिहासिक माहिती शा. शके १५०० पासूनची उपलब्ध झाली आहे. तत्पूर्वीची माहिती मात्र दंतकथांवरून एकत्र करावी लागत आहे. कै० वाड यांनीं "वतनपत्रें, निवाडपत्रें वगैरे" म्हणून जें पुस्तक तयार केलें आहे. त्यांतील "वतनपत्र ५ वें" हें पानशांच्या च संबंधाचें आहे. हें अत्यंत मोठें असून, त्यानें सदर पुस्तकाचीं १४ पृष्ठें व्यापिलीं आहेत; हें महत्त्वाचें असल्यानें व त्यांतील माहितीचा आम्हीं ठिकठिकाणीं आधार घेतला अस त्यामुळें तें सर्वंध वतनपत्र आम्ही आमच्या या पुस्तकाच्या शेवटीं परिशिष्टांत दिलें आहे ( परिशिष्ट क्रमांक १ पहा ). हें वतनपत्र "शके ६८, दुर्मतिनाम संवत्सर, फाल्गुन शुद्ध चतुर्दशी, मंदवासर, सुरु सन इसन्ने अर्बैन मया व अलफ" या दिवशींचें आहे; यांतील ६८ हा ( शिवाजी महाराजांचा ) राज्याभिषेक शक असून, इसन्ने अर्बैन मया व अलफ म्हणजे अरबी सन ११४२ हा होय; म्हणजे हें पत्र शालिवाहन शके १६६३ फाल्गुन शुद्ध १४ चें आहे. मोडकांच्या जंत्रींत या दिवशीं मंदवासर म्हणजे शनिवार येत नसून मंगळवार येतो ( बहुधा वाडांच्या पुस्तकांत नजरचुकीनें मंगळवाराऐवजीं मंदवासर छापिलें गेलें असावें ). हें वतनपत्र **खंडो शिवदेव** पानसे यांस पेशवे सरकारांतून मिळालें आहे; म्हणजे हे खंडोपंत शके १६६३ त विद्यमान होते असें ठरतें. या वतनपत्रांत खंडोपंत सांगतात कीं, "मौजे दिवें व मौजे सोनेरी या गांवांच्या ज्योतिष व कुळकरण या हक्कांच्या बाबतींत थोरल्या शिवाजीमहाराजांच्या वेळीं एक निवाड पत्र झालें होतें. सदर निवाड पत्र हि या शके १६६३ च्या वतनपत्रांत अक्षरशः उतरून घेतलें आहे. त्याचें वर्ष अरबी सन १०६९ शावान म्हणजे शके १५९० पौष हें होय. हें निवाड पत्र खंडोपंतांचे आजे **गोविंद विश्वनाथ** यांच्या नांवाचें आहे. त्यांत गोविंदपंत सांगतात कीं, "उपर्युक्त दोन्ही हक्क आपले पणजे **लक्ष्मीधर भट** यांनीं प्रथम मिळविले" गोविंदपंतांचा काल शके १५९० चा असल्यानें दर पिढी सामान्यतः २० वर्षांची धरून, त्यांच्या पणजांचा म्हणजे लक्ष्मीधर भटांचा काल शके १५३० च्या सुमारास येतो. हा अंदाजानें काढलेला काल बरोबर असल्याचा पुरावा या च वतन पत्रांत पुढें आला आहे. लक्ष्मीधर भटास वरील हक्क शके १५२७ च्या पूर्वीं मिळाले होते असा स्पष्ट उल्लेख या पत्रांत आहे; म्हणजे शके १५२७ च्या पूर्वीं लक्ष्मीधर भट हे विद्यमान असून त्यांनीं वरील दोन गांवांच्या वतनाचे दोन हक्क संपादन केले होते हें नक्की ठरतें. या वेळीं लक्ष्मीधरांचें वय २५ ते ३० पर्यंत असणें असंभवनीय नाहीं, म्हणजे त्यांचा जन्म शके १५०० च्या सुमारास झाला असावा; म्हणून आम्हीं वर म्हटल्याप्रमाणें पानशांची ऐतिहासिक माहिती शके १५०० पासून मिळते.

## ५. पानशांचें महाराष्ट्रांत आगमन.

पानसे हे मूळचे कर्नाटकांतील रहिवासी होते. या गोष्टीस आज प्रत्यक्ष लेखी आधार आढळत नाहीं; तथापि आमच्या अनुमानास एक अप्रत्यक्ष परंतु लेखी आधार सांपडतो. जी पहिली पानसे मंडळी कर्नाटकांतून इकडे महाराष्ट्रांत वस्तीस आली, त्या मंडळींचीं नांवें लिहिण्याच्या पद्धतीवरून याचा निर्णय होतो. त्यांनीं आपल्या नांवांच्या शेवटीं "वा" हा प्रत्यय लाविलेला आहे. कानडींत हा "वा" "आप्पा" या अर्थानें बहुमानार्थी लावीत असावेत. कर्नाटक व महाराष्ट्र यांच्या सीमेवर दोन्ही भाषा प्रचारांत असल्यानें असा महाराष्ट्रकन्नडमिश्रित एकत्र शब्दसंघटनेचा चमत्कार चालू असणें यांत मोठेसें आश्चर्य नाहीं. त्या प्रांतांतील त्या वेळची जुनी कागदपत्रें पाहिलीं असतां ही गोष्ट प्रत्ययास येईल. अशा कागदपत्रांतून हीं "वा" प्रत्ययान्त नांवें पुष्कळ आढळतील. कर्नाटकांतून पानशांचा जो मूळ पुरुष महाराष्ट्रांत आला त्याच्या मुलाचें व नातवांचीं, नांवें अनुक्रमें **एकावा**, **भुतावा** आणि **परसावा** अशीं होतीं. महाराष्ट्रांत स्थायिक होऊन तीन चार पिढ्या गेल्यानंतर या कानडी नांवांत फरक पडून इकडील महाराष्ट्रीय नांवें या कुटुंबांत ठेवण्यांत येऊं लागलीं. कर्नाटकांत "एक" हें नांव फार रूढ आहे. तंजावरच्या भोंसले राजघराण्यांत हें नांव आपल्याला आढळून येईल. थोरले शहाजीराजे यांचे धाकटे पुत्र, ज्यांनीं तंजावर येथें आपली गादी स्थापिली व जे शिवाजीमहाराज यांचे सावत्र भाऊ होते, त्यांचें खरें नांव "एकोजी, येकोजी" असें च होतें. मराठी बखरकारांनीं एकोजीचें व्यंकोजी केलें आहे. सारांश, कर्नाटकांत येकोजी हें नांव फार रूढ आहे, एवढें च येथें सांगण्याचा आमचा मुद्दा आहे.

कर्नाटकांतील अनेक घराणीं गंगथडी किंवा भीमथडीच्या भागांत राहावयास येऊन सुमारें ४५० वर्षें झालीं. स्वदेश सोडून परदेशांत जाऊन वस्ती करण्यास मुख्यतः दोन कारणें लागतात; एक अस्मानी किंवा दुसरें सुलतानी. अवर्षण, अतिवृष्टि, रोगांची सांथ वगैरे कारणें अस्मानींत येतात, तर राजाचा जुलूम, अधिकाऱ्यांचा आततायीपणा इत्यादि कारणें सुलतानींत येतात. पहिला प्रसंग वर सांगितल्याप्रमाणें ४५० वर्षांपूर्वीं कर्नाटकांत गुदरला होता. तो म्हणजे प्रसिद्ध "दुर्गादेवी"चा दुष्काळ. हा दुष्काळ शके १३९० पासून शके १३९७ पर्यंत सारखा सात वर्षें पडला होता, असें कै. वि. का. राजवाडे यांनीं **सरस्वतीमंदिर** या मासिकांत एका अस्सल कागदावरून सिद्ध असल्याचें प्रसिद्ध केलें आहे. या दुष्काळांत कर्नाटकांतील बरीचशीं घराणीं महाराष्ट्रांत आलीं. महाराष्ट्रांत हि त्या वेळीं या दुष्काळाचा परिणाम बरा च जाणवला होता. तथापि, कर्नाटकापेक्षां तो सौम्य स्वरूपाचा होता; त्यामुळें हीं कानडी घराणीं महाराष्ट्रांत येऊन राहिलीं. दंतकथा सांगते, कीं, हा दुष्काळ १२ वर्षांचा होता, पण आतां वर सांगितलेल्या कागदावरून तो ७ वर्षांचा होता असें सिद्ध झालें आहे.

असो. या पुढील लक्ष्मीधरापर्यंतची माहिती, पानगांव तालुके बार्शी जिल्हा सोलापूर येथें जें पानसे यांचें जुनें दफ्तर आहे त्यांतून घेतली आहे; या दफ्तरांत थोडेसे जुने कागदपत्र शिल्लक राहिले आहेत; बाकी पुष्कळसे कागद निरनिराळ्या कारणांनीं नष्ट झाले. अस्सल कागदपत्र कसे नाहींसे झाले याचें एक उदाहरण दुर्दैवानें येथें नमूद केल्याशिवाय आमच्यानें राहवत नाहीं. एका गांवीं आम्ही जुने कागदपत्र पाहण्यास गेलों असतां असें नजरेस आलें कीं, कांहीं दप्तरें व पुष्कळसे सुटे कागद एका दाणे सांठविण्याच्या कणगींत खच्चून दाबून भरले होते. ते बाहेर काढतांना त्यांतून विंचू, झुरळे व इतर जातींचे बरेच किडे बाहेर निघाले. कांहीं कागदांचा अगदीं बारीक झालेला चुरा हि, घमेलीं दोन घमेलीं कणगींत निघाला. अशा रीतीनें कागदपत्रांची अनास्था झाल्यामुळें जुने लेख फार च दुर्मिळ झाले आहेत. याच कागदांत एक यादी सांपडली. तिचा आरंभ असा आहे, "पानसी यांच्या कुलवृत्ती, वंशावळी, शके १६६२ रौद्रनाम संवत्सरे, अस्सल बरहुकुम नक्कल केली, सुरू सन ११५०" गणिताप्रमाणें शके १६६२ ला रौद्रसंवत्सर येतो; पण सुरू सन ११५० न येतां ११४० येतो. तेव्हां ११५० जो दिला आहे तो फसली सनाचा आहे म्हणजे "सुरू सन" या ऐवजीं फसली सन असें लिहावयास पाहिजे होतें (परकी सनांच्या गैर माहितगार लेखकाचा हा प्रमाद आहे). वरील उताऱ्यावरून ही यादी पूर्वीच्या दुसऱ्या एका अस्सल यादीवरून नक्कल केलेली आहे असें सिद्ध होत असल्यानें तिला विश्वसनीय धरण्यास हरकत नाहीं. ही यादी खंडो शिवदेव यांच्या वेळची असली पाहिजे असें यादीच्या शकावरून च उघड होत आहे.

## ६. गोविंदपंतांचें पाथरीस आगमन.

या दुष्काळांत पानसे यांचें मूळपुरुष **गोविंदपंत** (पहिले) [वतनपत्र पांचव्यांत उल्लेखिलेले खंडोपंताचे आजे 'गोविंद विश्वनाथ' ह्यांस आपण गोविंदपंत (दुसरे) असें म्हणूं.] हे कर्नाटक सोडून सोलापूर जिल्ह्या जवळील (सांप्रत निजामच्या राज्यांतील बीड जिल्ह्यांत असलेल्या) पाथरी गांवीं आले, व तेथें त्यांनीं वसति केली (शके १३९०). त्यावेळीं पाथरी हा परगणा होता व तो परगणा ज्या प्रांतांत होता त्या प्रांतास बालाघाट हें नांव होतें. बालाघाट याचा सामान्य अर्थ 'घाटावरलि प्रदेश उर्फ घाटमाथा' असा आहे. याप्रमाणें नर्मदेच्या अलीकडे दक्षिण हिंदुस्थानांत असे चार बालेघाट आहेत. पैकीं पहिला वऱ्हाडांतील आजिंठ्याचा घाटमाथा, दुसरा नागपूर प्रांतांतील, तिसरा हैद्राबाद निजाम संस्थान व सोलापूर जिल्हा यांच्या मधील व चौथा म्हैसूर संस्थान आणि बल्लारी, कडाप्पा, अनंतपूर, कर्नूल यांच्या ईशान्येकडील होय. या चारांपैकीं तिसऱ्या बालाघाट प्रांतांत वरील पाथरी हें गांव होतें. गोविंदपंत इकडे आले तेव्हां त्यांचें सर्व कुटुंब त्यांच्या बरोबर च होतें. कुटुंबांत त्यांचा पुत्र **एकावा** व एकावाचा पुत्र म्हणजे च त्यांचा

नातू भूतावा हे ही होते. एकावा हे गोविंदपंताचे एकुलते एक चिरंजीव होते. इकडे, त्यानंतर, थोड्या दिवसांनीं गोविंदपंत निवर्तले. या एकंदर हकीगतीवरून गोविंदपंत बालेघाटी जेव्हां आले, तेव्हां त्यांचें वय ( नातवासह तीन पिढ्या जमेस धरून ) निदान ६५ वर्षांचें असावें असा अजमास बांधल्यास तो फारसा चुकणार नाहीं. शके १३९० च्या सुमारास गोविंदपंत हे जवळ जवळ ६५।७० वर्षांचे होते असें दुसऱ्या हि एका प्रमाणावरून सिद्ध होतें.

मागें आपण ठरविलें आहे कीं, लक्ष्मीधर हे शके १५२७ च्या पूर्वी विद्यमान असून त्यांचा जन्म १५०० च्या सुमारास झाला असावा. मशार निल्हे गोविंदपंतां-पासून हे लक्ष्मीधर नववे पुरुष आहेत. ( परिशिष्ट वंशावळ पहा ). दर पिढीस वीस वर्षें ही ऐतिहासिक कालगणना ध्यानांत धरून गोविंद पंताचा काल काढल्यास तो ( १५००–१८० = ) शके १३२० चा येतो, म्हणजे शके १३२० मध्यें गोविंद पंतांचा जन्म धरल्यास शके १३९० मध्यें त्यांचें वय ७० वर्षांचें होतें असें सिद्ध होतें, आणि वर आम्हीं जो अनुमानानें त्यांचा काल ठरविला होता त्यास ह्या ताळ्या-मुळें पुष्टि च मिळते. सारांश, ही गोष्ट ध्यानांत घेतल्यास पानसे यांची आज सर्वांत जुनी माहिती शके १३२० पासूनची मिळूं शकते. अस्तु.

## ७. बालेघाटाची दंतकथा.

बाला ( वरला ) घाटाचा रूढ अर्थ आम्हीं वर दिलाच आहे आणि तो सामान्य-पणें खरा हि आहे. तथापि, ह्या नांवाबद्दल पाथरीकडील म्हणजे याबालाघाटांतील प्रांतां-तच एक दंतकथा प्रचलित आहे, ती येथें देतों. दंतकथा अगदीं टाकाऊ असतात असें एक मत विद्वान् लोकांत रूढ आहे हें आम्हांस ठाऊक आहे; पण आम्हांस मात्र तें सर्वस्वीं ग्राह्य वाटत नाहीं. दंथकथेंत स्थूलरूपानें ऐतिहासिक सत्य असतें, म्हणजे तिचा पाया ऐतिहासिक असतो व मग वरील इमारत माल कदाचित् बरीच भर टाकून सज-विलेली असूं शकेल असें आमचें मत आहे. पराचा कावळा होण्यास मूळ ठिकाणीं निदान पंखाचें तरी अस्तित्व असणें भाग आहे. शास्त्रकारांनी दंतकथांस प्रामाण्याची योग्यता दिल्याचें न्यायशास्त्रकार प्रशस्तपादाचार्य न्यायभाष्यांत सांगतात. "ऐतिह्यमप्य-विनथेमाप्तोपदेशएव" प्रमाणम्; या साठीं ऐतिहासिक दंतकथा तरी 'ह्या खोट्या असतात' अशा सबबीवर विद्वान् मंडळींनीं अगदीं त्याज्य ठरवूं नयेत अशी आमची त्यांना विनंति आहे. भुसांतून पाखडून ज्याप्रमाणे धान्याचे कण काढतां येतात त्या प्रमाणें चिकित्सेची दृष्टि लावून अशा दंतकथांचा उलगडा अधिकारी पुरुषांना करतां येण्याजोगा आहे. असो. बालेघाटाची दंतकथा पुढीलप्रमाणें आहे:—

पाथरी येथें **बाळंभट** या नांवाचे एक ज्योतिषी रहात होते. ज्योतिषशास्त्रांत त्यांची प्रगति चांगली असून त्यांचा लौकिक आसपासच्या प्रांतांत दूरवर पसरला होता आणि त्या प्रांतांतील अनेक लोक अनेक प्रसंगीं ज्योतिषविषयक सल्ला घेण्यास त्यांच्या-

कडे येत असत. त्याच वेळीं दुर्गादेवीच्या दुष्काळाचा प्रसंग येऊन ठेपला. दुष्काळा[illegible] एक दोन वर्षें बाळंभटांनीं पुढें भयंकर दुष्काळ पडणार आहे, बारा (१२ [illegible]) [illegible]ांत धान्याचा कण दृष्टीस पडणार नाहीं, त्यामुळें गुराढोरांचा व माणसांचा [illegible] संहार होईल असें भविष्य वर्तविलें आणि त्यावर तोड म्हणून असें सांगितलें कीं, आतां पासून एक दोन वर्षांत जेवढा धान्यसंग्रह करून ठेवणें शक्य असेल, तेवढा संग्रह लोकांनीं वेळींच करून ठेवावा आणि मग तो पुढें अवर्षणाच्या बारा वर्षेपर्यंत पुरवावा. बाळंभटाच्या भविष्यावर लोकांचा विश्वास असल्यानें पायरीच्या आसपासच्या प्रांतांतील बहुतेक सर्व लोकांनीं जवळ जवळ बारा वर्षे पुरेल इतका धान्याचा संग्रह करून ठेविला होता. त्यामुळें त्या प्रांतांत दुर्गादेवीचा दुष्काळ तितकासा जाणवला नाहीं; ही हकीगत शेजारच्या प्रांतांत पसरल्यामुळें तेथील दुष्काळ पीडित लोक पाथरी परगण्यांत धनधान्यवंतांच्य आश्रयास येऊन राहिले. याच कारणानें पानसे यांचें मूळपुरुष मशारनिल्हे गोविंदपंत हे ह्या प्रांतीं आले. दुष्काळ संपल्यावर ही बातमी **बेदरच्या बादशहास** समजली, तेव्हां त्यास मोठा आनंद होऊन त्यानें बाळंभटास बेदरास बोलावून नेऊन त्यांचा मोठा गौरव केला आणि त्यांना कांहीं जहागीर हि देण्याची इच्छा दर्शविली. पण दामाजीपंताप्रमाणें बाळंभटांनीं जहागीर स्वीकारण्याचें नाकारलें (याच दुष्काळांत मंगळवेढ्याचे ठाणेदार दामाजीपंत यांची धान्य लुटविल्याची हकीकत घडली होती व त्या वेळचा तोच बेदरचा बादशहा* बाळंभटांना जहागीर घेण्याबद्दल आग्रहकरीत होता; हें बहुश्रुत वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल )! त्या निस्पृह बाळंभटानीं बादशहास सांगितलें कीं, जहागीर घेण्याजोगें महत्त्वाचें असें कोणतेंच कार्य मीं केलेलें नाहीं, भविष्य वर्तविण्यांत फक्त मीं माझें कर्तव्य तेवढें बजाविलें आहे. अर्थात् त्या बद्दल पारितोषिक स्विकारणें हा माझा धर्म नाहीं. बादशहानें पुष्कळ आग्रह केला, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. अखेर बादशहानें त्यांतले त्यांत एक निराळीच तोड काढली. पाथरी गांव ज्या प्रांतांत होतें त्या प्रांतास बाळंभटाच्या स्मरणार्थ तेव्हां पासून "बालाघाट" हें नांव द्यावें असे त्यानें फर्मान सोडलें आणि त्यामुळें त्यावेळेपासून आजमितीपर्यंत त्या टापूस 'बालाघाट' हें नांव चालू राहिलें आहे; अशी दंतकथा आहे.

---

* **बेदरचा बादशहा:**—या वेळीं बहामनी वंशांतील राजाचा ताबा या प्रांतावर होता. या राजघराण्याची मुख्य राजधानी कलबुर्गा येथें होती. पुढें बहामनीशहा या राजानें शके १३५४ त बेदर शहर वसविलें व तेथें तो दरबार भरवूं लागला. यामुळें बेदरचें राज्य असा बोलण्याचा परिपाठ पडला. दुर्गादेवी दुष्काळाच्या वेळीं बहामनी वंशांतील महंमदशहा [ दुसरा ] हा बादशहा राज्य करीत होता. बहामनी राज्याचे पांच तुकडे होऊन त्यांपैकीं बेदरचें निराळें राज्य शके १४१४ मध्यें स्थापिलें. गेलें.

निजामच्या राज्यांतील या बालेघाटांत पूर्वीं एकंदर ३१ महाल होते असे **भारतवर्षांत** आलेल्या एका उल्लेखावरून समजतें. बालेघाटांत पाथरी व माहूर हे दोन सरकार होते. पाथरी सरकारांत १ हवेली ( पाथरी ) २ वालूर ३ परभणी ४ नाचण गांव ५ भोगांव ६ टाकळी ७ झरी ८ कौसाडी ९ रोवली १० लाखणगांव व ११ जिंतूर असे अकरा महाल होते. माहूरसरकार यांत १ हवेली ( माहूर ) २ अनसिंगे ३ खेड ४ भिंगाली ५ पुसद ६ तामसे ७ चिपोली ८ चिकणी ९ दारभण १० टोकी ११ सोहते १२ नांदापूर १३ सिंदखेड १४ सटाळे १५ गिरोली १६ मोहगीर १७ किव्हाटे १८ हळद १९ वाढवण व २० कन्हाटे असे वीस महाल होते.

## ८. गोविंदपंतांचें वृत्ति-संपादन.

महाराष्ट्रांत वृत्ति ( वतन ) ही संस्था फार प्राचीन आहे. कै० वि. का. राजवाडे यांनीं आपल्या " महाराष्ट्राचा वसाहतकाल " या अत्यंत विद्वत्ताप्रचुर व संशोधनात्मक निबंधांत या संस्थेचा इतिहास दिला आहे. त्यांत त्यांनीं असें सिद्ध केलें आहे कीं आर्यांनीं नर्मदोत्तर भारतवर्ष सोडून व विंध्य ओलांडून दण्डकारण्यांत ऊर्फ भावी महाराष्ट्रांत ज्या वेळीं वसाहती केल्या, त्या वेळीं या वृत्ति त्यांनींच उत्पन्न केल्या. वसाहतकर्म चालू असतां त्या वसाहतींचें ऐहिक व पारलौकिक भरणपोषण करण्यासाठीं निरनिराळ्या जातींतील अधिकृत व स्वतंत्र व्यक्तींची ऊर्फ कारूंची गरज भासूं लागली. त्यामुळें अशा व्यक्ति निवडून काढून त्यांच्याकडे तीं तीं कामे सोंपविण्यांत आलीं आणि त्याबद्दल त्यांच्या पदरीं ह्या वृत्ति बांधल्या. त्यामुळें त्यांना चरितार्थ चालविण्यास अडचण पडली नाहीं व वसाहतींचेंहि हें कार्य विनबोभाट चालू लागलें. सारांश, गांवगाड्यांतील अलुते, बलुते किंवा कारू नारू यांची व त्यांच्या वृत्तींची उत्पत्ति ही अशी आहे.

अशा बलुतेदारांची सामान्य संख्या बारा असते. त्यांत प्रांतभेदानें थोडाफार फरक पडतो. या बारा बलुतेदारांत जोसपणा व कुळकरण हीं कामें करणारे जोशी व कुळकर्णी हे येतात. या वृत्तींवर सरकारचा ताबा नसे. कारण, सरकार ( ऊर्फ राजशासन ) ही संस्था वृत्तिसंस्था स्थापन झाल्यानंतरची आहे. त्यामुळें निरनिराळीं सरकारें ऊर्फ राजवटी आल्या किंवा गेल्या तरी वृत्तींना अपाय होत नसे व वृत्तिवंतांवर कठिण प्रसंग ( म्हणजे वृत्तिच्छेदन ) गुदरत नसे. अस्मानी सुलतानी कोसळली तर एवढें च होई कीं उपाशी पोटाचा वृत्तिवंत आपलें पोट भरण्यासाठीं दुसऱ्याजवळ आपली वृत्ति गहाण ठेवी, किंवा अगदीं निरुपाय च झाल्यास विकी. दुष्काळासारख्या व सरकारी जुलुमासारख्या प्रसंगीं अशा गोष्टी घडत असत. अशा वेळीं ह्या वृत्ति थोडक्या रकमेंत विक्रीस निघत.

दुर्गादेवीचा दुष्काळ तर अशा प्रसंगांपैकीं एक मोठा प्रसंग होता. त्याचा फायदा घेऊन बरोबर आणलेल्या पैक्याचा उपयोग करून गोविंदपंतांनीं पाथरीच्या आस-

 म. ३. 

पासच्या कांहीं गांवांच्या जोसपणाच्या व कुळकरणपणाच्या वृत्ति संपादन केल्या आणि पंतांच्या नंतर त्यांच्या एकावा व भुतावा या मुलांनातवांनीं हि कांहीं वृत्ति विकत घेतल्या. या तिघांपैकीं कोणीं कोणतीं गांवें मिळविलीं याचा नक्की शोध अद्यापि लागत नाहीं. तत्कालीन आवश्यक तें शिक्षण एकावा व भुतावा यांना मिळालें होतें, हें येथें निराळें सांगण्याची विशेष जरूरी नाहीं. त्या काळीं जरी मुसलमानी अंमल महाराष्ट्रांत सुरू झाला होता, तरी राज्ययंत्र चालविण्यास बहुतेक हिंदूंची च मदत घेतली जात असे. लष्करी खात्यांत मुसलमानांचा भरणा जितका भरपूर असे, तितका मुलकी खात्यांत नसे. याचें कारण उघड च होतें. स्वतःचें राज्य टिकविण्यासाठीं तत्कालीन मुसलमान पादशाहांना आपल्या जातभाईंची गरज अवश्य वाटत असे. मुलकी खात्यांतील बहुतेक पोटखात्यांत, विशेषतः हिशेबी पोटखात्यांत ब्राह्मणांचाच भरणा पुष्कळ होता. गांवांचें कुळकरण तर (थोडेसे अपवाद सोडल्यास) ब्राह्मणांच्याकडे पिढ्यान् पिढ्या चालत आलें होतें; खेरीज तें गांवगाड्यांतील एक विशिष्ट अंग होतें. त्यामुळें वर सांगितल्याप्रमाणें निरनिराळ्या राज्यकर्त्यांनीं त्यांत फेरफार करण्याचा जोराचा प्रयत्न केला नाहीं. यासाठीं कुळकरण (व इतर वृत्ति) चालविण्याचें शिक्षण त्या वृत्तिवंतांच्या घराण्यांत आनुवंशिक मिळत असे; त्यास अनुसरून हें शिक्षण गोविंदपंतांनीं आपल्या मुलास व नातवास दिलें असणें साहजिक आहे. गोविंदपंतांनीं कुळकरण व जोसपण या वृत्ति इकडे आल्यानंतर जरी मिळविल्या तरी तेवढ्या काळांत आपल्या मुला-नातवांस शिक्षण देण्यास त्यांना विशेष अडचण पडली नाहीं.

## ९. अठरा गांवांच्या वृत्ति.

### ( भुतावांची कार्यव्याप्ति. )

गोविंदपंतांचे नातू भुतावा ह्यांच्या वेळीं पानसे यांच्याकडे बालाघाट प्रांतांतील अठरा गांवांच्या ज्योतिष व कुळकरण यांच्या वृत्ति होत्या असा उल्लेख एका (आमच्या संग्रहांतील) जुन्या टिपणांत आढळतो. मागें सांगितल्याप्रमाणें दुर्गादेवीच्या दुष्काळाचा फायदा घेऊन या १८ गांवांपैकीं कांहीं गांवांच्या वृत्ति गोविंदपंत, एकावा व भुतावा यांनीं प्रथम खरेदी केल्या व बाकीच्या गांवांच्या वृत्ति पुढें सवडी सवडीनें संपादन केल्या. या वृत्ति पुढें वंशपरंपरेनें कांहीं काळपर्यंत त्याच घराण्यांत चालत होत्या. हीं अठरा गांवें पुढील प्रमाणें:—

**१ बाभूळगांव बुद्रुक २ बाभूळगांव खुर्द ३ विटफूट ४ मांडवें ५ आळेगांव ६ पारें ७ पारोदें ८ पालवण ९ नांदुरें १० पारगांव मोटेचें ११ एलंब १२ चौसाळें १३ वाढवण १४ पिंपळगढी तेल्याची १५ पाथरी उर्फ पाथेर १६ निंब गणेशाचें १७ शिवगण आणि १८ खातरें.**

हीं बहुतेक सर्व गांवें सांप्रत निजाम हैद्राबाद संस्थानांत असून, त्यांपैकीं पहिलीं

पांच गांवें उस्मानाबाद जिल्ह्यांत आणि पुढील तेरा गांवें बीड जिल्ह्यांत आहेत. या अठरा गांवांपैकीं हल्लीं पानसे यांच्याकडे फक्त पहिल्या पांच गांवांच्या च कुळकरण व ज्योतिषपणाच्या वृत्ति चालत आहेत; पुढील तेरा गांवांच्या वृत्ति चालत नाहींत. त्या वृत्ति मध्यंतरींच्या काळांत त्यांच्या हातून नाहींशा झाल्या; त्या केव्हां व कशा गेल्या तें निश्चितपणें सजमण्याइतकीं तूर्त बळकट साधनें उपलब्ध नाहींत. हीं अठरा गांवें पूर्वी बालाघाट प्रांतांत होतीं व गोविंदपंत हे त्या प्रांतांतील पाथरी गांवीं येऊन राहिले होते, त्यामुळें त्यांना व त्यांच्या मुलांनातवांना या वृत्ति संपादणें सुकर गेलें. या अठरा गांवांत पाथरी हें गांव आलें च आहे. हीं सर्व गांवें परस्परांपासून सरासरी दोन दोन, तीन तीन, कोसांच्या अंतरावर आहेत.

भुतावा ऊर्फ भुतोपंत पानसे यांचा जम या प्रांतीं चांगला बसला होता. भुतावाचे आजे गोविंदपंत यांचा काळ आपण मागें शके १३२० ते १३९० असा धरला आहे. त्यांचा मुलगा एकावा यांचा जन्म १३४० च्या सुमारास झाला. त्यांचा मृत्युशक मात्र आढळत नाहीं. त्यांचे पुत्र भुतावा यांचा जन्म वीस वर्षांची पिढी धरल्यास अजमासें शके १३६०।७० च्या दरम्यान झाला असावा असें अनुमान करितां येतें.

## १०. पानगांव परगण्याचें देशपांडेपण.

### ( मेंगाजी पानसे यांची कामगिरी. )

भुतावा ऊर्फ भुतोपंत हे नक्की कधीं वारले याचा शोध लागत नाहीं. त्यांना **मेंगाजी** व **बाळाजी** असे दोन पुत्र होते. मागें ५ व्या पोट प्रकरणांत उल्लेखलेल्या शके १६६२ च्या यादींत, मेंगाजी यांनीं पानगांव परगण्याचें देशपांडेपण व कसब्याचें महाजनपण चालविल्याचा उल्लेख आहे. ह्या दोन वृत्ति बहुधा मेंगाजी यांनीं संपादन केल्या असाव्यात असें वाटतें. तत्पूर्वी हीं वतनें विशेषतः त्यांपैकीं देशपांडेपण हें एका मुसलमान घराण्याकडे चालत होतें अशी माहिती मिळते. तें मेंगाजींनीं कसें मिळविलें व केव्हां मिळविलें ह्याची जी माहिती मिळते ती अशीः—

त्या वेळीं ( म्हणजे शके १३९० ते १४०० च्या सुमारास ) पानगांव परगणा हा परंडे सरकारांत होता व त्या परगण्यांत बावीस गांवें होतीं. हल्लीं हीं गांवें सोलापूर जिल्ह्यांत बारशी तालुक्यांत असून, तीं पानगांवच्या आसपास तीनचार कोसांच्या अंतरावर आहेत. खुद्द पानगांव हें हि बारशी तालुक्यांत च आहेः तें बारशीपासून जवळ असल्यामुळें त्याला बारशी-पानगांव असें म्हणण्याचा प्रघात आज सुमारें तीनशें वर्षांपासून पडला आहे. परंडे परगण्यांतील बावीस गांवांपैकीं १७ गांवांचीं नांवेः—

**१ कसबे पानगांव, २ कौरफळें, ३ पडशिंगें, ४ सुरडी, ५ मालवंडी, ६ गुणपोळी ७ तुर्क पिंपरी, ८ पिंपरी ९ हिंगणी, १० पिंवळगांव,**

**११ पानगांव, १२ काळेगांव, १३ डंडेगांव १४ तडवेल, १५ वैराग, १६ घाणेगांव, १७ ...गांव, १८ ते २२ पर्यंतच्या ५ गांवांचीं नांवें मिळत नाहात.**

या बावीस गांवांचें देशकुळकण म्हणजे देशपांडेपण व खुद्द पानगांव कसब्याची महाजनकी मेंगाजींनीं मिळविली. मेंगाजीचा जन्म वीस वर्षांची पिढी या प्रमाणानें शके १३८० ते १३८५ च्या सुमाराचा ठरतो त्या नंतर त्यांनीं हें वृत्ति-संघटनाचें कार्य आपल्या ऐन उमेदीच्या म्हणजे शके १४१५ च्या शुमारास केलें असलें पाहिजे. याप्रमाणें वतन मिळविल्यावर मेंगाजीनें पाथरी गांव सोडून आपली कायमची वसती पानगांव येथें केली.

पानगांव येथें पानशांच्या पूर्वीचें जें ब्राह्मण जातीचें वतनदार देशपांडे घराणें त्याचें आडनांव गिरी असें होतें. बहामनी राजवटींत हें ब्राह्मणघराणें बाटलें गेलें कारण, मेंगाजीला " गिरी आडनांवाच्या मुसलमान जातीच्या देशपांडे याजकडून वतन मिळालें " असा मजकूर आमच्या जुन्या **कागदांत** व मागें सांगितलेल्या शके १६६२ च्या यादींतही आढळतो. गिरी देशपांड्याच्या कडून सरकारचा कांहीं अपराध घडला म्हणून बेदरच्या पातशहानें त्यांच्या कडील देशपांडेपणाचें वतन काढून तें मेंगाजीस दिलें असाहि उल्लेख दुसऱ्या एका कागदांत आहे. परंतु सरकारास असें करणें भाग पडण्यास गिरी यांच्या हातून कोणता अपराध घडला तें स्पष्ट कोठेंच सांगितलेलें आढळत नाहीं. त्या काळीं सरकारी वसूल थकल्यास अशीं वतनें जप्त करीत असत. या वेळीं मेंगाजी हे पाथरीस सुखवस्तु राहात असून त्यांचा तेथें जम बसला होता. त्यामुळें सरकारी वसूल वेळच्यावेळीं देण्याची हमी देऊन त्यांनीं सरकारनें जप्त केलेलें गिरींचें देशपांडेपण स्वतः विकत घेतलें. याप्रमाणें पानगांव परगण्यांचें पूर्वीचे देशपांडेपण बाटून मुसलमान झालेल्या गिरी आडनांवाच्या मूळच्या ब्राह्मण घराण्याकडे होतें व त्यानंतर मेंगाजी पानशाकडे आलें; पण त्यामुळें या दोन घराण्यांत वांकडें आलें आणि गिरींनीं पानशांच्या घराण्यावर चांगला सूड उगविला. तो प्रकार पुढील प्रकरणांत देऊं.

मेंगाजी यांस बाळाजी नांवाचा एक धाकटा भाऊ होता, हें ह्या प्रकरणाच्या आरंभींच आहे. मेंगाजी हे पानगांवीं राहावयास आल्यावर त्यांनीं पानगांव परगण्याच्या देशपांडेपणाचें काम पाहाण्यास प्रारंभ केला. तेव्हांपासून त्या त्या प्रांतीं पानसे यांस 'देशपांडे' म्हणून लोक ओळखूं लागले व हल्लीं हि त्याच नांवानें लोक त्यांस ओळखतात. तिकडे बालेघाटांतील १८ गांवांचें ज्योतिष व कुलकरण करण्याचें काम त्यांनीं या बाळाजी वर सोंपविलें. बाळाजी हे पाथरीस राहून तें काम करीत. बाळाजीस पुढें पुत्र न झाल्यानें त्यांचा निर्वंश झाला .बहुत करून यानंतर २५।३० वर्षांच्या कालांत वरील १८ गांवांच्या ज्योतिष कुळकरणाच्या वृत्ति पानशांच्या घराण्यांतून निघून दुसऱ्याच्या ताब्यांत

गेल्या असल्या पाहिजेत. एकंदरींत मोठ्या श्रमानें मिळविलेल्या या वृत्ती पांच पन्नास वर्षांच्या कालांत पानसे यांच्या घराण्यांतून नाहींशा झाल्या ही मोठी नुकसानीची गोष्ट घडली, एवढें माल खरें. पानगांव हें वरील १८ गांवांपासून सुमारें १०।१२ कोसांचे अंतरावर आहे.

मैंगाजी यांचा काल कधीं झाला तें समजत नाहीं, पण तो आजमासें त्यांचे वयाचे चाळिशीचे सुमारास म्हणजे शके १४२० च्या सुमारास झाला असावा. त्यांना **भुतोपंत, सखोपंत,** व **विठ्ठलपंत** या नांवांचे तीन पुत्र होते. त्यांची हकीकत देतांना पुणें-शिरवळ प्रांताचा संबंध येतो आणि इतर बऱ्याच दुसऱ्या गोष्टी मध्यें येतात, त्यामुळें तो मजकूर पुढच्या स्वतंत्र प्रकरणांत दिला आहे.

# प्रकरण दुसरें.

## पानसे यांचें पुणें-शिरवळ प्रांतीं आगमन.

पहिल्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें पानगांव परगण्याचें देशपांडेपणाचें वतन मेंगाजी पानसे यांनीं मिळविल्यानंतर, त्यांच्यांत व पूर्वीच्या गिरी आडनांवाच्या बाटग्या मुसलमान देशपांड्यांच्या घराण्यांत वैर माजलें; आणि गिरी घराण्यानें पानसे घराण्यावर सूड उगवला. मेंगाजी जिवंत होते, तावत्काळपावेतों गिरींचें सूड घेण्याचें कांहीं एक जमलें नाहीं. मेंगाजी वारले व मग गिरींनीं उचल केली. मेंगाजींचा, वडील व कर्तृत्ववान् पुत्र भुतोपंत हा होता, म्हणून पहिल्यानें गिरींनीं त्याचा खून केला. नंतर त्यांनीं संधी साधून पानसे यांच्या घरांतील सुमारें दहा बारा पुरुषांचे खून केले. सखोपंत व विठ्ठलपंत हे हि त्यांत मारले गेले. त्यांच्यांत पुरुष कोणी उरला नाहीं. त्यांची बायकामुलें भीतीनें गांव सोडून दुसरीकडे पळून गेलीं.

## १. महाराष्ट्रांतील पन्ना.

गिरींनीं हा जो खुनाचा सपाटा चालविला त्यांतून फक्त एक लहान मुलगा मोठ्या आश्चर्यकारक रीतीनें वांचला गेला. भुतोपंताचा जेव्हां खून झाला, तेव्हां त्यांना एकुलता एक मुलगा होता; तो फार लहान म्हणजे अवघा वर्षा दोन वर्षांचा होता. भुतोपंताताच्या घरीं त्यांच्या आजोबाच्या वेळची एक कुणबिण आश्रित होती. ती मराठा जातीची असून तिचे आडनांव **तिखांडे** होतें. तिची सर्व हयात पानसे यांच्या घरीं गेल्यानें तिला पानसे मंडळी आपल्या घरच्या मंडळींपैकींच एक, असें वागवीत. पूर्वीच्या काळीं अशी मालकाच्या घरीं पिढ्यान् पिढया टिकून राहणारीं नौकर माणसें मोठमोठ्यांच्या पदरीं असत. हीं माणसें विश्वासू व धन्याच्या घराण्यासाठीं वाटेल तें करणारीं, प्रसंगीं स्वतःचे प्राण हि पण देणारीं अशीं असत. सांप्रतच्या पिढीस याची कल्पना येणार नाहीं. कारण, हल्लीं, भाडोत्रीपणा जसा इतर सर्व बाबतींत पसरला आहे, तसा धनी व नौकर यांच्या संबंधांत हि तो आला आहे. त्यामुळें स्वामिनिष्ठ चाकर व चाकरांची कदर जाणणारे धनी यांचें दर्शनच दुर्मिळ होत चाललें आहे.

भुतोपंताच्या घरीं जेव्हां पुरुषांचे खून भराभर पडूं लागले व निर्वंशाची वेळ येऊन ठेपली, तेव्हां तिखांडे कुणबिणीनें पुढील युक्ति करून पानशांचा वंश कायम ठेविला. याबद्दल त्यापुढील पिढींतील सर्व पानसे मंडळी तिची ऋणी आहेत. भुतोजीपंताच्या या एकुलत्या एक मुलाचें नांव **परसावा** ऊर्फ **परसोजी** ऊर्फ **परशुराम** असें होतें. बाईनें परशुरामाच्या आईस सांगितलें कीं, मुलास येथें ठेविल्यास 'गिरी' मंडळी त्याचा नाश करतील यांत शंका नाहीं, त्यासाठीं त्याला येथून गुपचूप पळवून लांब दुरच्या ठिकाणीं नेऊन ठेविला पाहिजे. ही मसलत परशुरामाच्या आईस एकाएकीं पटली

नाहीं. कारण, सध्यां तिच्या समाधानाला आधार काय तो एक परशुराम च होता. त्यांत हि तो अगदीं लहान, तेव्हां त्याला आपल्यापासून दूर करून आपण एकटें रहावें ही गोष्ट तिच्या दुःखानें पोळलेल्या अंतःकरणास मानवेना. परंतु, तिखांडे वाईनें सर्व परिस्थिति समजून सांगितल्यावर व आपण हट्टानें परशुरामास येथें ठेवून घेतल्यास कांहीं दिवसांनीं त्यास कायमचें च मुकण्याचा प्रसंग येईल त्यापेक्षां कांहीं वर्षें त्याचा वियोग सहन करणें चांगलें, असा पोक्त विचार करून तिनें परशुरामास पळवून लावण्याविषयीं आपली कबुली दिली.

त्या नंतर एके दिवशीं रात्रीं कुणबिणीनें परशुरामास गुपचूपपणें आपल्या घरीं आणलें. नंतर दुसरे दिवशीं सकाळीं शेतावरील लोकांस भाकरी पोहोंचविण्यासाठीं भाकरीची पाटी डोकीवर घेऊन ती निघाली. भाकऱ्या पोंचविण्याचें काम तिच्याकडे मधून मधून असल्यानें कोणास तिचा संशय आला नाहीं. सावधपणें गांवांतून बाहेर पडून तिनें प्रथम शेताचा रस्ता धरला; पण बरीच दूर गेल्यावर व कोणीं आपला पाठलाग करीत नाहीं असें पाहिल्यानंतर तिनें शेताचा रस्ता सोडला व ( पुणें जिल्ह्यांतील ) इंदापूरचा मार्ग धरला.

त्यावेळीं प्रवासाचीं साधनें म्हणजे घोडें किंवा गाडी हीं होतीं, पण तीं दोन्ही या प्रसंगीं कुणबिणीला निरुपयोगी होतीं. त्यामुळें पानगांवाहून इंदापूर पर्यंतचा सर्व प्रवास तिनें पायीं च केला. इंदापूर हें गांव त्या वेळीं परगण्याचें असून व्यापाराची उतारपेठ होती. पानगांवच्या थेट पश्चिमेस सुमारें पन्नास मैलांवर इंदापूर आहे. मध्यंतरीं सीना व भीमा या नद्या आणि अष्ट्याचा व टेंभुर्णीचा असे दोन डोंगर आहेत. अशा बिकट मार्गांतून सावधतेनें कुणबिणीनें ५।७ दिवसांचा प्रवास करून आपली भाकरीची ( ! ) पाटी इंदापुरास आणली. तेथें आल्यावर तिनें एका घराच्या ओट्यावर आपली ती पाटी ठेविली. घराची ओटी, आंगण वगैरे स्वच्छ दिसल्यानें हें कोणातरी पांढरपेशाचें घर असेल असें जाणून तिनें घरमालकाचा तपास केला. तेव्हां तिला समजलें कीं, ह्या घराचे मालक ब्राह्मण असून ते इंदापूर परगण्यांतील शेळगांवचे कुलकरणी आहेत. या कुलकरण्यांचें आडनांव " वाघ " असें होतें.

ही माहिती काढल्यानंतर तिनें वाघांना हांक मारली व त्यांना आपण कोण व आपल्या भाकरीच्या पाटींत खरोखर काय आणलें आहे ह्याबद्दलची सविस्तर माहिती सांगितली. वाचकांना सांगावयास नको च कीं, त्या पाटींत निव्वळ भाकऱ्या नसून, भाकऱ्यांच्या आंत भुतोपंताचा मुलगा परशुराम हा लपविलेला होता. कुणबिणीनें प्रवासांत त्याची फार काळजी घेतली होती व त्याची सर्व प्रकारची व्यवस्था हि ठेविली होती. वाघांनीं ही हृदयद्रावक हकीकत ऐकल्यावर त्यांचें मन खरोखरच कळवळलें. त्यांना आतांपर्यंत पुत्रसंतति नव्हती. अशा वेळीं असा आपल्या घरीं आयता चालून आलेला मुलगा पाहून त्यांना ईश्वराच्या लीलेचें कौतुक वाटलें व आनंद हि झाला

त्यांनीं, आपण मुलाला संभाळण्यास व त्याला आपल्या मुलाप्रमाणें वागविण्यास तयार आहों, असें कुणविणीस सांगितलें. त्यावर तिनें त्यांच्यापासून शपथ घेऊन त्यांच्या हवालीं परशुरामास केलें. तेव्हां वाघांनीं आपल्या पत्नीस बोलावून तिला ही सर्व हकीकत सांगितली; ती ऐकून पत्नीस हि फार आनंद झाला. व तिनें आपण परशुरामाची धर्माची आई होण्याचें नक्की केलें. या प्रमाणें परशुरामावरील गंडांतर कायमचें टळलें. त्यांत हि दैवयोग असा कीं, वाघ हे हि पण पानसे यांच्या प्रमाणेंच देशस्थ ब्राह्मण होत. दोन तीन दिवस तेथें राहून कुणबीण तेथून परत निघाली व कांहीं दिवसांनीं परत पानगांवीं येऊन तिनें परशुरामाच्या मातोश्रीस ही सर्व गोष्ट सांगून तिची काळजी दूर केली.

ही त्या तिखांडे कुणबिणीची स्वामिभक्तीची गोष्ट वाचून कोणाला स्वराज्यांतील त्या स्वामिभक्त पन्ना दाईची आठवण होणार नाहीं बरें ? राजपुतान्यांतील पन्नेची गोष्ट पुष्कळांच्या आठवणीची आहे. परशुरामाच्या आईनें कुणविणीचा हा उपकार जाणून तिला आपल्या वाड्याशेजारीं एक घर बांधून दिलें. त्या घरांत अद्यापपर्यंत या तिखांडे बाईचा वंश नांदत आहे. परशुरामाच्या आईसंबंधीं पुढील हकिकतीची नोंद आढळत नाहीं. परंतु कांहीं दिवसांनीं ती इंदापुरास आपल्या मुलाजवळ आली असली पाहिजे व तेथेंच तिचा अंत झाला असावा. याप्रमाणें पानसे यांच्या एका शाखेचें आगमन पुणें–शिरवळ प्रांतीं झालें. मेंगाजी यांचा काळ मागें शके १३८० ते १४२० असा दिला आहे. त्यांचे पुत्र भुतोपंत यांचा काळ त्या मानानें शके १४०० ते १४४० चा येतो आणि त्यांचा एकुलता एक मुलगा परशुराम याचा जन्म साधारण शके १४३० च्या सुमारास येतो. म्हणजे परशुराम पानसे हे पुणें–शिरवळ प्रान्तीं शके १४३२।३३ किंवा ठोकळ मानानें १४४० च्या सुमारास आले.

## २. परशुरामपंत पानसे.

वर सांगितलेले परशुरामपंत ऊर्फ परसावा यांना शेंळगांवकर वाघ आडनांवाच्या कुलकरण्यांनीं आश्रय दिला व त्यांना आपल्या मुलाप्रमाणें संभाळून तत्कालीन आवश्यक असलेलें शिक्षण हि दिलें. वाघांना पुत्र नव्हता हें मागें सांगितलेंच आहे, त्यांना फक्त एक मुलगी होती. त्यांची वृद्धावस्था झाल्यानें या पुढें संततीची आशा खुंटली होती. त्यामुळें वाघांनीं आपली मुलगी आपल्यापासून दूर होणार नाहीं व परशुरामाचा हि सहवास आपल्याला अंतरणार नाहीं अशी युक्ति काढली. त्यांनीं परशुरामाची घरची सर्व माहिती काढली; तींत नांवें ठेवण्यासारखें कोणतेंच न्यून आढळलें नाहीं. वाघांनीं परशुरामाचा व्रतबंध त्यावेळच्या चाली प्रमाणें सातव्या वर्षीं केला आणि नंतर त्याला आपली मुलगी देऊन घरजांवई केलें. या नंतर १०।१२ वर्षें परशुराम हा श्वशुर गृहींच रहात होता. त्यानंतर तो शिरवळ येथें रहावयास गेला.

## ३. पुणें-शिरवळ व वाई प्रांतींच्या वृत्ति.

### ( भुतोपंतांचें दिव्य. )

परशुरामपंत मोठे झाल्यावर त्यांनीं वाई, व पुणें, ह्या परगण्यांत आणि त्याच्या शेजारच्या शिरवळ आणि जुन्नर परगण्यांत ज्योतिष व कुळकरण या दोन वृत्ति संपादन केल्या. या परगण्यांतील ज्या गांवांच्या वृत्ति संपादन केल्या तीं गांवें:—

**१ मांडवगण, २ गणेगांव ( शिरूर ), ३ गाधाडी, ४ कालगांव, ५ गणेगांव ( परगणे जुन्नर ), ६ नांदगांव, ७ लोणी, ८ भवाळी, ९ तोंडल व १० गुणंद.**

या दैहा गांवांपैकीं पहिली दोन गांवें ( मांडवगण व गणेगांव ) सांप्रत शिरूर पेट्यांत असून, त्या पुढील तीन गांवें ( गाधाडी, कालगांव व गणेगांव ) जुन्नर तालुक्यांत व त्या पुढील एक गांव ( नांदगांव ) भीमथडी तालुक्यांत आहे. लोणी व भवाळी हीं दोन गांवें वाई तालुक्यांत असून तोंडल व गुणंद हीं पंत सचीव यांच्या जहागिरींत आहेत. या दहा गांवांच्या ज्योतिष व कुळकरणाच्या वृत्ति परशुरामपंतांनीं ज्या मिळविल्या त्या वंशपरंपरेच्या होत्या. त्यामुळें त्या तेव्हांपासून पुष्कळ वर्षेपर्यंत पानसे घराण्याकडे चालू राहिल्या. त्या नंतर कांहीं काळानें पुणें जिल्ह्यांतील पहिल्या सहा गांवांच्या वृत्ति पानशांच्या हातून कायमच्या च गेल्या. त्या कशा नाहींशा झाल्या त्याचा नक्की शोध अद्यापि लागत नाहीं. पुढील चार गांवें म्हणजे लोणी, भवाळी, तोंडल व गुणंद येथील ज्योतिष व कुळकरण मात्र अद्यापपर्यंत पानशांकडे चालू आहे.

परशुरामपंतांनीं या वृत्ति संपादन करून आपला काल सुखानें घालविला. त्यांना भुतावा ऊर्फ भुतोपंत नांवाचा एक च मुलगा होता. परशुरामपंताचा जन्म वर दर्शविल्याप्रमाणें अजमासें शके १४३० चा असावा. त्यांनीं आपल्या वयाच्या तिशी पस्तिशीच्या कालांत हें वृत्तिसंपादनाचें कार्य केलें. भुतावाचा जन्म शके १४५० च्या आगेमागें धरण्यास हरकत नाहीं. या भुतोपंतांची माहिती विशेष आढळत नाहीं. त्यांनीं जास्त वृत्ति संपादन केल्या होत्या किंवा नाहीं तें समजत नाहीं. बहुधा त्यांनीं आपलें आयुष्य शांतपणानें घालवून वरील दहा गांवांच्या वृत्तींचें जतन केलें असावें. भुतोपंतांना **बाळावा, परसावा** व **तानाजी** या नांवाचे तीन पुत्र होते. या तीन पुत्रांचा वंशविस्तार पुणें प्रान्तांत होऊन त्यांनीं व त्यांच्या वंशजांनीं पुढें अनेक वृत्ति व इनामें मिळविलीं; त्यामुळें यांची हकीकत या पुढें एकत्र न देतां निरनिराळी देण्याचें ठरविलें आहे. भुतोपंताच्या वरील तीन पुत्रांपैकीं मधला मुलगा जो परसावा याचा वंशविस्तार मोठा असल्यानें व त्यानें सोनोरी हें पानशांचें मुख्य गांव मिळविल्यामुळें प्रथम त्याच्या शाखेची माहिती देण्यांत येत आहे.



तळ्याचा देखावा (सोनोरी.)



मल्हारगडाच्या पूर्व बाजूचा देखावा ( सोनोरी. )

भुतोपंतांचे दोन ठिकाणीं माल ओझरते उल्लेख आढळतात, पण त्यांचा काल व प्रसंग स्पष्टपणें दिलेला कोठेंच सांपडत नाहीं. मागें सांगितलें आहे कीं, परशुरामपंतांनीं दहा गांवांचें ज्योतिषकुळकरण संपादिलें होतें; या दहा गांवांपैकीं मौजे भवाळी येथील रहिवासी भवाळ यांनीं परशुरामपंतांच्या पश्चात् भुतोपंताच्या वेळीं भांडण उपस्थित केलें. त्यांचें म्हणणें असें होतें कीं, भवाळी, तोंडल व गुणंद या तीन गांवांच्या ज्योतिष कुळकरणाच्या वृत्ति मूळ आमच्या (भवाळांच्या) आहेत; त्यांशीं पानशांचा संबंध नाहीं. भुतोपंतांचें म्हणणें या वृत्ति आपले वडील परशुरामपंत यांनीं मिळविल्या. भवाळाचा त्यांत संबंध नाहीं. या दोहोंतील वाद सरकारांत जाऊन सरकारानें तो पंचायतीकडे सोंपविला. तेव्हां पंचायतीनें त्या दोघा वादीप्रतिवादींस दिव्य करावयास सांगून तंटा मिटविण्याची तोड काढली (दिव्याचें वर्णन प्र० २–८ मध्यें पहावें.). हें दिव्य मौंजे मोहरी तर्फ गुंजणमावळ येथें झालें. हें गांव त्या काळीं दिव्य करण्याबद्दल प्रख्यात असे; येथें पुष्कळ वेळा दिव्यें झाल्याचे उल्लेख जुन्या कागदपत्रांतून आढळतात. पानसे व भवाळ या दोहोंपैकीं पानसे यांनीं दिव्य केलें व त्यांत भुतो परशराम पानसे हे दिव्यांत उतरून खरे झाले आणि भवाळ हे खोटे झाले. अर्थात् वरील गांवांच्या ज्योतिष व कुळकरणाच्या वृत्ति भुतोपंत पानसे यांच्या खऱ्या ठरल्या. भुतोपंताचे एवढे च ओझरते उल्लेख सांपडतात. या भुतोपंताचा दुसरा मुलगा परशुराम उर्फ परसावा म्हणून होता हें वर आलें च आहे; त्या परसावास **लक्ष्मीधर** नांवाचा एकुलता एक मुलगा होता. या च लक्ष्मीधरानें मौजे सोनोरी येथील ज्योतिष व कुळकरण या दोन वृत्ति संपादन केल्या; पहिल्या प्रकरणांत सांगितलेले लक्ष्मीधर ते हे च होत.

## ४. सोनोरी व दिवे येथील वृत्ति.

### (लक्ष्मीधरांचा उदय.)

लक्ष्मीधर हे चांगले व्युत्पन्न वैदिक होते. त्यांच्या वेळीं सोनोरी येथें 'गिधवे' या आडनांवाचें एक ब्राह्मण घराणें होतें. त्या घराण्याकडे मौजे सोनोरी येथील ज्योतिष व कुळकरण या दोन वृत्ति फार काळापासून मिरासी चालत होत्या. सोनोरी प्रमाणें च मौजे दिवें येथील हि ज्योतिष व कुळकरण, या गिधव्यांकडेच होतें. या दोन गांवांचा उल्लेख एका अस्सल वतनपत्रांत (परिशिष्ट क्रमांक २) आला आहे. या खेरीज दुसऱ्या एका कागदांत दिवें, सोनोरी, चांबळी वगैरे पांच (आणीक दोन गांवांचीं नांवें दिलीं नाहींत; कागदांत नुसतें 'वगैरे' च म्हटलें आहे.) गांवांचे गिधवे हे कुळकरणी होते असा उल्लेख आला आहे. त्याच कागदांत पुढें नमूद केलेली हकीकत दिली आहे. लक्ष्मीधराच्या काळीं जे गिधवे उपनांवाचे गृहस्थ होते, त्यांस पुत्रसंतति नसून फक्त दोन मुलीच होत्या. त्यांपैकीं थोरली मुलगी चांबळींचे 'अत्रे' घराण्यांत दिली होती. लक्ष्मीधर हे सोनोरीच्या पंचक्रोशींत विद्वान् वैदिक म्हणून फार प्रख्यात होते. त्या पंचक्रोशींत

किंबहुना आसपासच्या वीस पंचवीस कोसांच्या टापूंत या शास्त्रांत त्यांचा हात धरणारा कोणी नव्हता. ही त्यांची कीर्ति गिधवे यांस माहीत होती; शिवाय, लक्ष्मीधरांना मागें सांगितलेल्या दहा गांवांपैकीं कांहीं गांवांचें जोसपण व कुळकरण मिळालें होतें च. हें त्यांचा पणजा परसावा ऊर्फ परशुरामपंत भुताजी यानें कमाविल्याची हकीकत मागें आली च आहे. वरील दहा गांवांपैकीं कांहीं गांवें लक्ष्मीधराच्या चुलत्याच्या वांटणीला गेलीं होतीं व कांहीं त्यांच्या स्वतःच्या वांट्यास आलीं होतीं. सारांश, लक्ष्मीधर हे खाऊन पिऊन सुखवस्तु व विद्वान् होते. ही त्यांची माहेती गिधव्यांना लागल्यामुळें त्यांनीं आपली धाकटी मुलगी देऊन लक्ष्मीधरास आपले जांवई करण्याचें निश्चित् केलें आणि लक्ष्मीधराच्या घराण्यांतील वडील मंडळींची त्या योजनेस त्यांनीं संमति मिळविली. यांत आणखी एक गोष्ट गिधव्यांनीं साधली. परशुराम भुताजी ( लक्ष्मीधराचे पणजे ) पुणें प्रांतीं आल्यावर व त्यांनीं दहा गांवांच्या वरील सांगितलेल्या वृत्ति संपादन केल्यावर या गिधव्यांची कुलोपाध्यायाची हि वृत्ति संपादन केली होती. लक्ष्मीधरास जांवई केल्यानें कुलोपाध्यायास कन्यादान केल्याचें हि पुण्य गिधव्यांचे पदरांत अनायासें पडणार होतें. या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन गिधव्यांनीं आपली धाकटी मुलगी लक्ष्मीधर यांस दिली. कांहीं वर्षांनीं गिधवे हे वयोवृद्ध झाले. स्वतःस पुत्र नाहीं असें पाहून त्यांस संसाराचा वीट आला आणि मग काशीवास करावा असें त्यांनीं ठरविलें. हा बेत नक्की झाल्यावर त्यांनीं आपल्या पांच गांवांच्या वृत्तींचे वांटे केले· त्यांपैकीं तीन गांवांच्या वृत्ति वडील जांवई अवे यांस इनाम दिल्या आणि मौजे दिवें व मौजे सोनोरी या दोन गांवांच्या वृत्ति धाकटे जांवई लक्ष्मीधर यांस वंशपरंपरा इनाम करून दिल्या व आपण कुटुंबासह काशीस निघून गेले. कांहीं दिवसांनीं त्यांचा अंत काशीस च भागीरथीतीरीं झाला.

लक्ष्मीधरांस या दोन गांवांच्या दोन वृत्ति कधीं मिळाल्या त्याची नक्की मिति मिळत नाहीं. तत्रापि परिशिष्ट १ यांत आलेल्या उल्लेखावरून मागें. सांगितल्याप्रमाणें हा काळ शके १५२१ च्या आधींचा असावा येवढें मात्र खास.

लक्ष्मीधर हे वैदिक असल्यानें त्यांचें लक्ष्य कुळकरणपणाकडे विशेष नसे, म्हणून त्यांनीं दिवें आणि सोनोरी येथील जोसपण संभाळलें आणि या दोन गांवांचें कुळकरण चालविण्यास एक गुमास्ता ठेविला. लक्ष्मीधरांस तीन पुत्र झाले. त्यांत **परशुराम** ऊर्फ परसावा हा पहिला, **विठोबा** हा दुसरा व **बाबाजी** हा तिसरा होता. लक्ष्मीधर हे वृद्ध झाल्यावर त्यांनीं वृत्ति चालविण्याचें काम मुलांकडे सोंपविलें. त्यांनीं परशुरामास मौजे दिवें येथील कुळकरण करण्यास नेमिलें. बाबाजी यास भिक्षुकी शिकविली होती, त्यामुळें तो दोन्ही गांवांचें जोसपण करी. विठोबाचें लक्ष्य व्यापारांत असल्यामुळें तो नेहमीं बाहेर गांवीं धंद्याकरितां हिंडत असे. सोनोरीचें कुळकरण चालविण्यास कोणी नसल्यामुळें वर सांगितलेल्या गुमास्त्याकडे च तें काम कायम केलें. विठोबाला एक

मुलगा **नारोबा** नांवाचा झाला. तो जाणता झाल्यावर सोनोरीचें कुळकरण करूं लागला. परशुराम लक्ष्मीधर यांस सहा पुत्र झाले; त्यांचीं नांवें **लुखोबा, रामाजी, विसाजी, कृष्णाजी, केसोपंत** व **रखमाजी** अशीं होतीं. त्यांत लुखोबा वडील असल्यानें वास्तविक सोनोरीचें कुळकरण त्याच्या च कडे यावयाचें, परंतु परशुरामपंत वारले त्यावेळीं हे सहा भाऊ लहान होते. त्यामुळें वर सांगितल्याप्रमाणें त्यांचा चुलत भाऊ नारोबा याकडे च तें काम राहिलें. विसाजी परशुराम यांचे मामा सासवड येथील राहणारे "दाणी" उपनांवाचे होते; त्यांची कांहीं शेतजमीन वगैरे मिळकत सोनोरीस होती. या दाणीनें **कृष्णाजी गांवजी** गांवखंडेराव नांवाच्या माणसास आपला मानस पुत्र म्हणवून त्याच्याकडे आपली सोनोरी गांवचीं शेतें खंडानें लावून दिलीं होतीं. दाणीनें लुखोबा आदिकरून आपले सहा भाचे लहान असल्यानें सोनोरीच्या कुळकरणावर त्यांची अनावस्था संपेपर्यंत या कृष्णाजी गांवखंडेरावाची गुमास्ता म्हणून नेमणूक केली. एक दोन वर्षे झाल्यावर लुखोबादि बंधु जाणते होऊन त्यांचें तत्कालीन ठरलेलें शिक्षण हि पूर्ण झालें. तेव्हां पूर्वीं ठरल्याप्रमाणें त्यांनीं कृष्णाजीस काढून टाकून सोनोरीचें कुळकरण आपल्या हातीं घेतलें. दिव्याचें कुळकरण या पूर्वीं च त्यांनीं आपल्याकडे घेतलें होतें.

या नंतर कांहीं दिवसांनीं सोनोरीचा पाटील **नाईकजी काळे** व लुखोबा यांत कुळकरणाच्या मुशाहिऱ्यावरून भांडण उपस्थित झालें, व त्यांत नाईकजीनें लुखोबास हाणमार केली. तेव्हां लुखोबानें वैतागानें कुळकरणाचें काम सोडून दिलें, व तो दिव्यास जाऊन राहिला. त्यावर नाईकजीनें कृष्णाजी गांवखंडेरावास बोलावून आणून त्याच्याकडे फिरून तें काम दिलें. तेव्हां कांहीं दिवसांनीं लुखोबानें कृष्णाजीस सांगितलें कीं, मीं मुद्दाम पाटलाच्या रागावर काम सोडिलें असतां, तूं हें काम करतोस, हें चांगलें नाहीं. लुखोबानें असें सांगितल्यावर कृष्णाजीनें काम करण्याचें बंद केलें व तो सासवडास जाऊन राहिला. तेव्हां दाणीनें लुखोबाची समजूत केली कीं, अशानें वृत्तीचें नुकसान होतें. तुमचें व पाटलाचें भांडण मी मिटवतों तोंपर्यंत, कृष्णाजीस गुमास्ता ठेवावें. तें लुखोबानें कबूल केलें. परंतु नाईकजी व लुखोबा यांच्यांतील तंटा दाणी यांस अखेरपर्यंत मिटवितां आला नाहीं.

या नंतर कांहीं दिवसांनीं सासवडचा एक रहिवासी दत्तो राखे नांवाचा होता, तो नाईकजी पाटील याच्या बाजूचा होता. तो दिव्यास येऊन लुखोबाकडे उतरला. त्याची व लुखोबाची नाईकजीच्या बाबतींत बोलाचाली होऊन मारामारी झाली, व त्यांत लुखोबांनीं दत्तो राखे याच्या तोंडांत मारली. त्यामुळें पुढें दत्तोबाचा मुलगा रंगभट राखे चिडून काशीस गेला व तेथें त्यानें गिधव्यांचा शोध केला. लक्ष्मीधरास ज्या गिधव्यांनीं सोनोरी व दिवें येथील वृत्ति इनाम दिल्या होत्या त्यास पुत्र नव्हता. त्याचे वंशज मात्र तेथें नांदत होते. त्यांची भेट राखे यानें घेतली व त्यांचे मनांत लुखोबा विरुद्ध बरेंच

भरविलें. त्यानें त्यांस सांगितलें कीं, पानसे हे या दोन गांवांच्या दोन्ही वृत्ति बळजवरीनें उपभोगितात; त्या वास्तविक तुमच्या आहेत. हें ऐकून ते गिधव्याचे वंशज काशीहून सोनोरीस आले. त्यांनीं लुखोबाजवळ तपास केला. तेव्हां लुखोबानें त्यांस लक्ष्मीधर यांस पूर्वीच्या गिधव्यानें दिलेलें इनाम-पत्र दाखविलें व त्यांची खातरी केली. यामुळें या गिधव्यांनीं हि लुखोबा व विसाजी यांना आपल्या नांवांनीं दुसरें तसेंच पत्र करून दिलें. तें शके १५४९ मधील असून त्यांत पूर्वीच्या पत्राचा उल्लेख आहे. शके १५४९ मधील या गिधव्यांचीं नांवें **रंगो त्र्यंबक** व **गणेश त्र्यंबक** अशीं आहेत. हे दोघे भाऊ संन्यास घेऊन काशीस राहिले होते; त्यांनीं लुखोबास वर सांगितल्याप्रमाणें इनामपत्र करून दिल्यानंतर ते पुन्हा काशीस परत गेले. त्यानंतर कांहीं दिवसांनीं लुखोबा हे वारले.

## ५. म्हैसळें येथील दिव्य.

लुखोबा वारले तरी नाईकजी पाटील व पानसे यांचें भांडण मिटलें नाहीं. या तंटेभांडणांत आणखी एक भानगड उपस्थित झाली. जेजुरीच्या खंडोबाचा एक भक्त पाडांगला आडनांवाचा होता; पानसे व पाटील यांचें भांडण चालू असतां त्याचा फायदा घेऊन पाडांगलानें सासवडच्या सरकारी मोकाशाकडे तक्रार केली कीं, " सोनोरी व दिवें या दोन्ही गांवांच्या ज्योतिष-कुळकरणाच्या वृत्ति प्राचीन काळापासून आपल्या आहेत, म्हणजे गिधव्यांच्या हि पूर्वीपासून त्या आपल्या असून गिधव्यांचा व पानशांचा त्या वृत्तींशीं कांहीं एक हक्क-संबंध नाहीं. " यावेळीं सासवडचा मोकाशी राघो निंबाजी म्हणून होता. तो हि जेजुरीच्या खंडोबाचा भक्त असून पाडांगल्याचा स्नेही होता. पाडांगल्यानें या स्नेहाचा फायदा घेऊन राघोजीपुढें फिर्याद नेली. त्या वेळीं विसाजी परशराम पानसे जिवंत होते. पाडांगल्याची व राघोजीची ओळख होती तरी राघोजीनें दिव्य करण्याचा निकाल दिला. त्याप्रमाणें कोंकणांत म्हैसळें‡ येथील श्रीअमृतेश्वराच्या देवालयांत हें दिव्य झालें. ( माहिती प्र० २-८ मध्यें पहावी ). विसाजी पानशांनीं दिव्य करून खरा काढला. अर्थात् पानसे खरे झाले, व पाडांगला खोटा ठरला. म्हैसळच्या थळकऱ्यांनीं पानसे खरे झाल्याचें थळपत्र ( म्हणजे दिव्यांतील निवाडपत्र* ) करून दिलें. त्यास अनुसरून सासवडच्या ( राघो निंबाजी ) मोकाशानें हि विसाजीच्या तर्फेच निकाल दिला.

---

‡ म्हैसळें—हा गांव मुरूड जंजिऱ्याजवळ आहे. या गांवीं फार पुरातन व प्रसिद्ध असें शंकराचें स्थान असून त्यास अमृतेश्वर असें म्हणतात.

* दिव्यांतील वतनपत्र—पानशांचे घरास आग लागली त्यांत हें जळून गेलें ( परिशिष्ट १ पहा ).

## ६. रामाजी गांवखंडेराव व विसाजी पानसे यांचा वाद.

वरील प्रकार घडल्यानंतर कांहीं दिवसांनीं सोनोरी गांवचा नाईकजी काळे पाटील वारला व त्याचे **हंसाजी आणि रत्नोजी** नांवाचे दोन पुत्र पाटिलकी करूं लागले- त्यांचे कारकीर्दींत एकदां मोठा दुष्काळ शके १५५१ चा पडला. त्या दुष्काळांत विसाजी पानसे यांच्या घरास आग लागून त्यांत त्यांची सर्व चीजवस्त जळाली. तींत गिधव्यांचें मूळचें पहिलें लक्ष्मीधर भटास दिलेलें इनामपत्र व म्हैसळें येथील दिव्यांतील थळपत्र वगैरे महत्त्वाचे सर्व कागद जळाले. विसाजीस चार भाऊ होते हें वर आलें च आहे. इतक्यांच्या कुटुंबाचा योगक्षेम सोनोरीस राहून चालविणें जड जाऊं लागलें. तेव्हां विसाजीपंत हे रोजगारानिमित्त पुण्यास आले. त्या वेळीं हंसाजी व रत्नोजी पाटील हे हि पुण्यास सरकारी कामानिमित्त आले होते. सोनोरीचें कुळकरण गुमास्ते या नात्यानें कृष्णाजी गावखंडेरावाकडे होतें हें मागें सांगितलें च आहे. या सुमारास कृष्णाजी वारला होता व त्याचा मुलगा रामाजी हयात असून, तो च पानशांच्या तर्फे गुमास्ता म्हणून सोनोरीचें कुळकरण चालवीत होता. रामाजी गांवखंडेराव हा हि, पानसे व पाटील पुण्यास आले, त्या वेळीं पुण्यास आला होता.

या वेळीं, पुणें प्रांत, शहाजी भोसले यांच्या जहागिरींत असून त्यावर त्यांच्या तर्फे दादोजी कोंडदेऊ हे सुभेदार होते व ते पुण्यास च रहात होते. पुण्यास हंसाजी, रत्नोजी, रामाजी व विसाजीपंत या सर्वांच्या भेटी झाल्या. तेव्हां पाटील बंधू विसाजीपंतास म्हणाले कीं, तुमच्या बंधू (लुखोबा) चें व आमच्या बापा (नाईकजी) चें भांडण होतें; तें त्यांच्याबरोबर गेलें. आपणांस आतां आपसांत भांडण्यास कांहीं कारण नाहीं. आपण दोघे मिरासभाऊ आहों. तुम्ही सोनोरीचें ज्योतिष व कुळकरण सुखानें खाणें, त्यास विसाजीपंत कबूल झाले. मग त्यांनीं रामाजी गांवखंडेराव याच्यापाशीं कुळकरणाचें दप्तर मागितलें. रामाजीनें आठ दिवसांनीं दफ्तर आणून देतों, म्हणून मुदत मागितली व तो सोनोरीस परत आला. तेथें हंसाजी पाटलाचा आणीक एक भाऊ होता, त्याचें नांव हौजी होतें. रामाजीनें त्याला वश करून घेऊन सांगितलें कीं, तूं पाटिलकी कर व मी कुळकरण करतों आणि पानसे नुसतें (हल्लीं चालवितात तसें) जोसपण चालवितील. हौजीनें तें कबूल केलें; पण त्यामुळें हंसाजी व हौजी यांच्यांत तंटा वाढला. रामाजीनें हें पाहून कर्नाटकांत पलायन केलें. तेव्हां विसाजीपंतानें हंसाजीस या एकंदर प्रकारा- बद्दल ठपका दिला; पण हंसाजीचें हौजीपुढें कांहीं चाललें नाहीं. त्यामुळें विसाजीपंतानें सोनोरी सोडून कोंकणांत जाऊन व्यापार सुरू केला. इकडे हंसाजी व हौजी यांचा तंटा- विकोपास जाऊन हौजीनें हंसाजीस ठार मारिलें. त्यानंतर कांहीं दिवसांनीं विसाजी- पंताचा हि कोंकणांत अंत झाला.

## ७. गोविंद विश्वनाथ व रामाजी गांवखंडेराव.

विसाजीपंत वारल्यावर त्यांचा एक पुत्र **गोविंदराव** म्हणून होता, तो मोठा झाल्यावर रोजगारानिमित्त कोंकणांतून निघून पुण्यास आला. या वेळीं पुण्यास शिवाजी महाराज यांनीं स्थापिलेल्या स्वराज्याचा अंमल वसून त्यांच्यातर्फे तेथें **नारो सुंदर** या नांवाचा सुभेदार काम करीत होता. त्यास गोविंदरावानें आपली सर्व हकीकत सांगितली, तेव्हां त्यानें गोविंदरावाच्या नांवाचें कुळकरण चालविण्याबद्दलचें आज्ञापत्र दिलें. परंतु, गोविंदरावानें स्वतः कुळकरण न चालवितां आपला एक गोत्रज ( भाऊ ) **रखमाजी बापूजी** पानसे म्हणून होता, त्यास गुमास्ता नेमून त्याच्याकडे कुळकरणाचें काम सोंपविलें. त्या नंतर रामाजी गांवखंडेरावानें, शिवाजी महाराजांकडे जाऊन खोटें च सांगितलें कीं, सोनोरीचें कुळकरण आपल्याकडे पांच पिढ्यांपासून आहे व पानसे बळजबरीनें कुळकरण करीत आहेत; महाराजांनीं हा वाद तोडण्यास नारो सुंदर सुभेदार यांस सांगितलें. परंतु गोतसभा भरून जो निवाडा व्हावयाचा तो झाला नाहीं. असें असतां रामाजीनें सोनोरीस येऊन रखमाजी गुमास्त्यास खोटें च सांगितलें कीं, **शिवाजीमहाराजांनीं** आपल्या नांवानें कुळकरण केल्याचें आज्ञापत्र दिलें आहे व तसाच ठाणेदाराचा हि हुकूम आहे; तरी तूं माझें ( रामाजीचें ) कुळकरण आहे असें लिहून दे. पण रखमाजीनें तें ऐकलें नाहीं. गोविंदरावास **त्र्यंबकराव** नांवाचा एक वडील भाऊ होता. रखमाजीनें ठाणेदाराकडे अर्ज केला कीं, सोनोरीचें कुळकरण त्र्यंबक विश्वनाथाचें आहे; रामाजीचा कांहीं संबंध नाहीं. त्र्यंबक विश्वनाथ हे पुण्याकडे सुभ्याचें कचेरींत कामावर होते. त्यांचें व संभाजी मोहिते ( शहाजी राजांचे मेव्हणे ) यांचें वांकडें होतें, त्यामुळें हा वाद पुढें चालला नाहीं. त्यानंतर अफझुलखानाची मोहीम व शाएस्ताखानाची स्वारी झाली. या दोन मोहिमांमुळें पुणें प्रांत बरा च उध्वस्त झाला. तेव्हां महाराजांनीं प्रजेस पुन्हा वसती करण्यासाठीं कौल ( अभयपत्रे ) दिले. त्या वेळीं गोविंद विश्वनाथ हे हजर होते; रामाजी गांवखंडेराव गैरहजर होता. तो औरंगाबादेस मोंगलाकडे जाऊन मिळाला. मध्यंतरीं, मोंगलांचा अंमल पुणें प्रांतावर असतां रामाजीनें औरंगाबादेहून मोंगली सुभेदाराचा हुकूम सोनोरीच्या मुकदमास व पुणें प्रांताच्या देशमुख देशपांड्यास आणला कीं, रामाजीच्या व गोविंद विश्वनाथाच्या तंट्याचा निकाल करणें. तेव्हां पुण्याच्या ठाणेदारानें लोणी, आळंदी, पिंपळें, बनपुरी, आंबोडी, सोनोरी, सासवड, दिवें, सुपें व कुंभारवळण या दहा गांवांतील मिरासदारांच्या लेखीं साक्षी आणविल्या. त्यांत साक्षीदारांनीं खरा च मजकूर लिहिला होता. "दिवें व सोनोरी येथील ज्योतिष व कुळकरण मूळचें गिधव्यांचें, त्यांनीं पानशांस मिरास करून दिलें. लुखोबाचा मामा सासवडकर दाणी याचे मार्फतीनें कृष्णाजी गांवखंडेराव यास गुमास्ता नेमिला होता. तो मालक नसून पानशाच्या वतीनें मुतालिक ( गुमास्ता ) होता." असा मजकूर या साक्षीपत्रांत होता. तो पाहून पुण्याच्या ठाणेदारानें कुळ-

करण गोविंद विश्वनाथ पानसे यांच्या नांवाचें करून तसा हुकूम काढला. मात्र गोत सभेपुढें महजर व्हावयाचा राहिला. कारण रामाजी गांवखंडेरावानें गोतसभेपुढें वाद मांडण्याचें कबूल केलें नाहीं. यानंतर पुण्यास शिवाजीमहाराजांचा अंमल पुन्हा बसला, त्या वेळीं राजगडच्या सरकारी न्यायसभेपुढें हा वाद पुन्हा चालला. त्यांत रामाजी खोटा ठरला. त्यामुळें, त्यानें सांगितलें कीं, “ मौजे सोनोरीचे मोकदम, मोख्तेसर, बलुते व हमशाही गांवांचे गोहीदार गोत हुजूर आणून त्यांच्या कडून निवाडा करवावा.” त्याप्रमाणें मागें सांगितलेलीं दहा गावें व शिवाय मौजे बेलसर व हिवरें अशा बारा गांवांतील मोकदम, मोख्तेसर, बलुते व हमशाही गोत यांच्या तोंडी व लेखी जबान्या सरकारानें घेतल्या. त्यांत फक्त एका साक्षीदाराखेरीज बाकीच्या सर्व साक्षीदारांनीं गोविंद विश्वनाथाच्या बाजूच्या, म्हणजे च खऱ्या साक्षी दिल्या. मागें आलेल्या हौजी पाटलाच्या जानोजी नांवाच्या मुलानें तेवढें सांगितलें कीं, रामाजी गांवखंडेराव हा खरा कुळकरणी आहे. गोतसभेचा असा एक नियम दिसतो कीं, तेथें झालेला निवाडा एकमतानें झाला पाहिजे. तसा तो न झाला तर वादीप्रतिवादींपैकीं कोणास हि तो अमान्य करावयास सवड असते. मात्र अमान्य केल्यावर दोघांनीं दिव्य करावें लागतें. या नियमाप्रमाणें या राजगडच्या सरकारी न्यायसभेपुढें जी गोतसभा झाली, तींत एकमतानें निर्णय न झाल्यानें सरकारानें दोघां हि वादीप्रतिवादींस निरनिराळें दिव्य करण्यास परवानगी दिली.

## ८. मोहरीचें दिव्य.

### ( ‘ दिव्या ’चें सविस्तर वर्णन. )

दिव्य हें एखाद्या पुरातन प्रसिद्ध शंकराचे देवालयांत देवासमोर करीत असत. अन्यायी व लबाड लोकांवर दया माया न करतां त्यास कडक व भयंकर शिक्षा करणारें हें तामसी वृत्तीचें दैवत असल्यामुळें या दैवताच्या समोर तें करावें लागत असे. दिव्य करण्याचें स्थळ व दिवस न्यायसभा अगाऊ ठरवून देत असत. सरकारच्या हुकुमाप्रमाणें गुंजण मावळ तर्फेतील मौजे मोहरी* येथील श्री अमृतेश्वराच्या देवळांत गोविंद विश्वनाथ पानसे आणि रामाजी कृष्ण गांवखंडेराव यांनीं निरनिराळें दिव्य केलें. त्या काळीं मनुष्यकृत पुराव्यानें तंट्याचा निकाल झाला नाहीं तर हा दिव्य करण्याचा शेवटचा एक दैवी प्रकार होता. दिव्यांत जो सुरक्षित बाहेर पडेल तो खरा ठरे व ज्याचें नुकसान होई तो खोटा ठरे. हातास फोड येणें, गुरेंढोरें मरणें, घरांस आग लागणें वगैरे गोष्टींचा समावेश या नुकसानींत करीत. या दिव्यावर तत्कालीन लोकांचा भरंवसा चांगला बसलेला दिसतो. कारण, त्या काळीं न्यायाचा शेवटचा प्रकार म्हणजे हें दिव्य असे. आज जसें प्रिव्ही कौन्सिल म्हणजे न्यायदानाचें अखेरचें ठिकाण समजलें जातें, तसें त्या काळीं दिव्य करणें म्हणजे न्यायाचा शेवटचा प्रकार समजला जाई. सांप्रतच्या काळी या दिव्याच्या प्रकारावर कोणाचा भरंवसा असो किंवा नसो

* मोहरी— हा गांव भोर संस्थानांत नसरापुरापासून सुमारें दोन तीन मैलांवर असून तेथील अमृतेश्वराचें स्थान फार पुरातन काळापासून प्रसिद्ध आहे.

तो प्रश्न निराळा; पण त्या वेळीं या प्रकारास वादीप्रतिवादी या दोघांना हि कबुली द्यावी लागे व त्यांत झालेला निर्णय त्यांना अखेरचा म्हणून मान्य करावा च लागे. अशा या दिव्याची माहिती समजण्यासाठीं मूळच्या कागदांतील सारांश थोडक्यांत पुढें देतों. ( परिशिष्ट क्रमांक १ पहा. )

पानसे व गांवखंडेराव यांना सरकारनें दिव्य करावयाचें नेमून दिल्यावर त्या दोघांकडून प्रथम पुढील प्रमाणें राजीनामे लिहून घेतले. दोघांनीं वेगवेगळालीं दिव्यें करावीं; त्यासाठीं दोन तपेल्या घ्याव्यात, दोन ताम्हनें घ्यावींत, व दोन रवे६ द्यावत, आणि दोघांनीं बरोबरच दिव्यें करावींत. जो खरा होईल त्याला कुळकरणाची वृत्ति वंशपरंपरा मिळेल, जो खोटा होईल त्याची वृत्ति काढून घेतली जाईल, दोघे खरे झाले तर ( असें सहसा होत नसे ) वतन दोघांत निम्मे निम्मे वांटून मिळेल, दोघे खोटे झाल्यास ( असें हि सहसा होत नसे ) दोघांना हि वतनावरून हांकलून दिलें जाईल, या प्रमाणें दोघांनीं राजीनामे लिहून दिले.

त्या नंतर सरकारानें **बाबाजी मोरदेव चिटणीस** व **मलकोजी कदम** नांवाचा हुजुरातींतील एक अंमलदार या दोघांस सरकारतर्फेचे मुख्य अधिकारी म्हणून मोहरीस पाठविलें. या शिवाय अष्टप्रधानांचे कारकून व हुजरे हि रवाना झाले. त्यांच्या अध्यक्षतेखालीं दिव्य व्हावयाचें होतें. दिव्याच्या वेळीं मौजे सोनोरीचे मोकदम व बलुते आणि मौजे मोहरीचे हि मोकदम, वाजे ( इतर ) प्राश्णिक ( प्रश्न विचारणारे ) लोक व हमशाही गोत हजर होते. या सर्वांपुढें प्रथम गोविंद विश्वनाथ पानसे यांनीं सांगितलें कीं, गिधव्यांनीं आपल्या पूर्वजांस कुळकरण मिरास करून दिलें असून त्यांच्याशीं गांवखंडेरावाचा कांहीं संबंध नाहीं. त्यानंतर रामाजी कृष्ण गांवखंडेरावानें सांगितलें कीं, कुळकरण पूर्वीपासून आमचें आहे, गिधवी किंवा पानसे यांचा कांहीं संबंध नाहीं. या प्रतिज्ञेनंतर साक्षीदारांच्या साक्षी घेतल्या. प्रथम पानशांकडून दिव्य करविलें. दिव्य बहुधा रविवारीं करीत असत. त्यांस अनुसरून शनिवारीं पानसे व गांवखंडेराव यांच्या उजव्या हातांच्या बोटांचीं नखें न्हाव्याकडून काढविलीं. नंतर हातांस लिंबू आणि साबण लावून बोटें स्वच्छ केलीं आणि मग निरनिराळ्या कापडांच्या पिशव्यांत हातांचे पंजे घालून, पिशव्या बांधून त्यांवर सरकारी अधिकाऱ्यांच्या मुद्रेच्या मोहरा केल्या आणि दोघांना निरनिराळ्या कोठड्यांतून पहाऱ्यांत ठेविलें. पिशव्या घालण्यापूर्वीं पंजावरील व बोटांवरील बारीक सारीक सर्व खाणाखुणा टिपून ठेवण्यांत आल्या. रविवारीं दुसरे दिवशीं दिव्यास प्रारंभ झाला. वेळ सकाळची पहिल्या प्रहराची होती. श्रीअमृतेश्वराच्या देवळांत दोघे सरकारी अधिकारी, दोघे वादीप्रतिवादी आणि मागें सांगितलेले दोन्ही गांवांतील मोकदम, बलुते व प्राश्णिक मंडळी जमली. दिव्याचा प्रकार साधारण पुढीलप्रमाणें असेः—ज्या ठिकाणीं दिव्य होत असे, त्या ठिकाणीं सात मंडळें काढलेलीं असत व त्यांच्या शेवटीं एक अग्निकुंड असे. या अग्निकुंडांत साधारण अच्छेर वजनाचा एक लोखंडी गोळा लोहाराकडून लाल होईपर्यंत तापवीत

च तो तितका तापला आहे कीं नाहीं हें पाहण्यासाठीं कुंडाबाहेर काढून त्याच्यावर वाळलेलें गवत टाकीत. तें गवत एकदम पेटलें म्हणजे गोळा पाहिजे तेवढा तापला असें समजत. मग ज्याला दिव्य करावयाचें असेल त्याच्या हाताची पिशवी, मोहर फुटली नाहीं अशी खात्री करून, काढून घेत. कारण अग्निबाधा होणार नाहीं अशीं कांहीं औषधें असत, तीं हा गृहस्थ पहारेकऱ्यांस लांचलुचपत देऊन व पिशवी काढून हातांस लावण्याचा संभव असे. यासाठीं मोहरेची खात्री करावी लागे. अशी खात्री झाल्यावर या गृहस्थाच्या दोन्ही हाताच्या ओंजळींत पिंपळाचीं पांच सहा पानें ठेवित व त्यांना तूप चोपडीत. नंतर त्यानें दिलेली शपथेवरील जबानी व कधीं कधीं राजीनामा त्याच्या डोईस बांधीत, त्यास चीरपत्र किंवा भालपत्र म्हणत. मग त्याच्याकडून जबानींतील सर्व मजकूर पुन्हा वदवून घेत. नंतर महाराकडील पाणी आणून एका कुंडांत ठेवीत आणि त्याच प्रमाणें मांगाकडील पाणी दुसऱ्या कुंडांत ठेवीत व त्याच्याकडून त्याची शपथ घेववीत. तसेंच मांगामहारांचें वस्त्र आपल्या मस्तकावर ( जर आपण खोटें बोलूं तर ) बसो, अशी हि शपथ घेववीत. शपथ-क्रिया झाली म्हणजे त्याच्या ओंजळींतील त्या तूप चोपडलेल्या पानांवर, लोहार आपल्या सांडसानें तो तापून लाल झालेला लोखंडी गोळा ठेवी. पुढें, दुसरा वादी आपल्या वस्त्राची छाया या दिव्य करणाऱ्या वाद्याच्या डोकीवर करी. नंतर हा वादी तो गोळा घेऊन एका मंडळांतून चालून दुसऱ्या मंडळांत व तेथून तिसऱ्या मंडळांत जाई. या प्रमाणें सात हि मंडळें चालून गेल्यावर पलीकडे एक वाळलेल्या गवताची पेंढी ठेवलेली असे तिच्यावर तो गोळा टाकी. गोळा टाकल्यावर त्या गवतानें पेट घेतला पाहिजे; म्हणजे इतकी क्रिया होई पर्यंत त्या गोळ्याची उष्णता कमी होतां कामा नये. इतका प्रकार झाल्यावर, पुन्हा, या गृहस्थाच्या हातांस पिशवी घालून मोहोर करून कोठडींत पहाऱ्यांत ठेवीत. दोन दिवस कोठडींत ठेविल्यावर तिसरे दिवशीं वरील सर्व न्याय देणाऱ्या लोकांसमोर त्याला आणून व पिशवीची मोहोर फुटली नाहीं अशी खात्री करून घेऊन मग पिशवी उघडीत. त्या नंतर दिव्य करण्या-पूर्वीं हातांच्या ज्या खाणाखुणा टिपून ठेविल्या असत त्या पूर्णपणें ताडून पाहात. पूर्वीपेक्षां जास्त खुणा, उदाहरणार्थ, फोड, फुटकुळ्या वगैरे ( भाजलेल्या खुणा ) दिस-ल्यास, ज्या मनुष्यास दिव्य करावें लागलें, तो दिव्यांत खोटा ठरला असें ठरवून सर्व न्यायसभा त्याच्याविरुद्ध निकाल देई. जर त्याचे हात पूर्वी प्रमाणेंच असतील, फोड वगैरे आले नसतील, तर तो वादी दिव्यीं उतरला अथवा दिव्यांत खरा ठरला. असें ठरवून, सभा त्याच्या बाजूनें निकाल लावी.

दिव्याचे अनेक प्रकार श्रुतिस्मृतीमधून सांगितलेले आहेत; त्यांपैकीं त्याकाळीं महाराष्ट्रांत फक्त दोन प्रकार प्रचारांत होते. वर सांगितलेला एक व खालीं दिलेला दुसरा.

या दुसऱ्यांत, हातांत तापलेला गोळा घेण्याऐवजीं, ताम्हनांतून किंवा कढईतून कडकडीत तापलेल्या तेलांतून सोन्याचा रवा (तुकडा) काढीत असत. मात्र पहिल्या प्रकारांत दोन्ही हात उपयोगांत आणीत आणि दुसऱ्यांत फक्त उजवा हात उपयोगांत आणीत. बाकीची कृति दोहों प्रकारांत सारखीच असे. या पानसे–गांवखंडेराव वादांत अमृतेश्वरीं जें दिव्य झालें तें दुसऱ्या प्रकारचें होतें.

वर सांगितल्याप्रमाणें रविवारीं सकाळीं पहिल्याप्रहरीं न्यायसभा भरून, गोविंद विश्वनाथ व रामाजी कृष्ण यांस आणून त्यांच्या हाताच्या पिशव्या काढल्या. सात मंडलाच्या पलीकडे दोन खोल ताम्हनें निरनिराळीं ठेविलीं. प्रत्येक ताम्हनांत अडीच शेर तेल व अडीच शेर तूप एकत्र करून घातलें व तें खूप कडकडीत तापविल्यावर त्यांत सोन्याचे दोन रवे टाकले. हा रवा साधारण दोन मासे भार वजनाचा असतो. पानसे व गांवखंडेराव यांच्या हातांच्या पिशव्या काढून त्यांच्या डोक्यावर त्यांच्या शपथे-वरील प्रतिज्ञे (जबान्यां) चीं चीरपत्रें बांधून, दोन वेगवेगळ्या काढलेल्या साती मंडळांतून त्यांना चालविलें. ताम्हनापाशीं आल्यावर, प्रथम गोविंद विश्वनाथ पान-शांनीं आपल्या ताम्हनांत हात घालून त्या कडकडीत तेलातुपांतून सोन्याचा रवा बाहेर काढला. त्यानंतर रामाजी गांवखंडेरावानें आपल्या ताम्हनांत हात घातला, परंतु रवा बाहेर काढण्यापूर्वीच बोटें भाजलीं. रवा बाहेर काढतां आला नाहीं. रामा-जीची ही गोष्ट त्याच वेळीं न्यायसभेनें पाहिली. तथापि दिव्याच्या नियमाप्रमाणें त्या वेळीं निकाल न देतां, पुन्हा दोघांच्या हातांस पिशव्या घालून व त्यांवर मोहरा करून त्यांना पाहऱ्यांत ठेविलें. सोमवारचा दिवस त्यांस तसेंच ठेऊन, मंगळवारीं म्हणजे दिव्याच्या तिसऱ्या दिवशीं या दोघांनां पहाऱ्यांतून बाहेर काढलें. व पुन्हा न्यायसभेपुढें आणलें. तेथें आल्यावर सर्वांच्या देखत त्यांच्या हातांच्या पिशव्या सोडल्या व हात पाहिले. त्यांत पानसे यांच्या हातास कांहीं इजा झाली नाहीं असें दिसून आलें. गांवखंडेराव याच्या हातास पोळल्यामुळें फोड आलेले दिसले. अर्थात् नियमाप्रमाणें पानसे खरे झाले व गांवखंडेराव खोटे झाले. तेव्हां सभेनें, मौजे सोनो-रीचें कुळकरण गोविंद विश्वनाथ पानसे यांचें कायम ठरवून त्यांनीं तें लेकरांचे लेकरीं म्हणजे वंशपरंपरा करावें, रामाजी गांवखंडेरावाचा त्या वतनाशीं कांहीं संबंध नाहीं असें निवाडपत्र दिलें. हें दिव्य शके १५९० कीलकसंवत्सर, माघ शुद्ध त्रयोदशी, बुधवारीं झालें. (गणित करून पाहिलें असतां शके १५९० सालच्या माघ शुद्ध त्रयो-दशीस बुधवार येतो.)

वरील निवाडपत्र घेऊन दोघे वादीप्रतिवादी हे राजगडास शिवाजीमहाराजांकडे आले; तेथें महाराजांच्या राजसभेनें तें पाहून व रामाजीचे भाजलेले हात हि पाहून पानसे हे सोनोरीचे खरे कुळकरणी असून गांवखंडेरावाचा त्या कुळकरणाशीं कांहीं संबंध नाहीं, त्यानें आतांपर्यंत आपल्यापाशीं कुळकरणाच्या कामाबद्दल जीं कांहीं

कागदपत्रें ठेविलीं असतील तीं पानशांस परत करावीं, जीं खोटीं निवाडपत्रें आपल्या बाजूचीं करून घेतलीं असतील तीं रद्द समजावींत आणि हें कुळकरण गोविंद विश्वनाथ पानसे यांनीं या पुढें वंशपरंपरा करावें, असा एक राजमुद्रांकित व राजसभेतील सभासदांच्या मुद्रांचा महजर (राजसभेनें दिलेलें निवाडपत्र) करून दिला आणि सोनोरीच्या सरकारी अधिकाऱ्यास त्याची नक्कल हुकूम म्हणून पाठविली.

याच वेळीं म्हणजे शके १५९० च्या माघ वद्य प्रतिपदा शनिवारीं (खरे जंत्रीं प्रमाणें या दिवशीं शनिवार येत आहे) वरील निकालान्वयें राजगड येथें गोविंदपंत पानसे यांस रामजी कृष्ण गांवखंडेराव यानें एक अजीत पत्र (जितपत्र) लिहून दिलें. त्यांतील मजकूर असा कीं, " तुमचे चुलते लुखो परशुराम यांनीं सोनोरीच्या कुळकरणावर आपल्यास मुतालिक (गुमास्ता) म्हणून ठेविलें होतें, पण, आपण बेइमान होऊन सरकारास गैर वाजवी सांगून त्यांच्या कडून आपल्या नांवचे कांहीं हुकूम काढून आणले. हें आपण खोटें कृत्य केलें. अमृतेश्वराच्या दिव्यांत आपण हरलों, तुम्ही खरे झालां; आपल्याला देवानें मिराशी वेगळें केलें, देवा घरीं, राज घरीं व गोत घरीं आपण खोटें झालों, तमाम लोकांनीं तुम्ही खरे म्हणून टाळी पिटली; म्हणून सभानायकांनीं हें जितपत्र लिहावयास मला सांगितलें तें लिहून दिलें. तुम्ही सोनोरीचें कुळकरण वंशपरंपरा खाणें, माझा किंवा माझ्या वंशजांचा त्याच्याशीं कांहीं संबंध नाहीं, अशा मजकुराचें हें जितपत्र आहे. याप्रमाणें हा सोनोरीच्या कुळकरणाचा तंटा संपून तें पानशांकडे कायम झालें. वरील शिवाजीमहाराजांचें राजपत्र, गिधव्यांचें दानपत्र, मोहरी दिव्याचें थळपत्र, व रामाजी गांवखंडेरावाचें अजीत पत्र, अशीं चार पत्रें, पुढें जीर्ण झाल्यामुळें, गोविंद विश्वनाथ पानसे यांचे नातु खंडो शिवदेव यांनीं, शाहु महाराजांच्या राजवटींत साताऱ्यास जाऊन वरील कागदान्वयें एक राजपत्र शके १६६४ फाल्गुन शुद्ध चतुर्दशीस करून घेतलें. (परिशिष्ट क्रमांक १ पहा.)

## ९. शिवाजीमहाराजांची न्यायनिष्ठुरता.

वरील गोविंद विश्वनाथ व रामाजी खंडेराव यांच्या वादांत जानोजी बिन हौजी काळे सोनोरीकर पाटील यानें खोटी साक्ष दिल्याचें मागें आलेंच आहे. दिव्यांत रामाजीपंत खोटा ठरला तेव्हां या जानोजीस शिवाजीमहाराजांनीं खोटी साक्ष दिल्याबद्दल जीभ कापण्याची शिक्षा दिली. महाराजांची न्यायनिष्ठुरता प्रसिद्ध च आहे. ही शिक्षा अमलांत आली असती, पण गोविंद विश्वनाथ यांनीं महाराजांजवळ दया भाकून या शिक्षेऐवजीं सरकारांत दंड भरून जानोजीची सुटका करविली. दंडाची रक्कम गोविंदपंतांनीं भरली. या उपकाराबद्दल जानोजीनें व समस्त गांवकऱ्यांनीं सोनोरी येथील तरटीचें सहा रुक्याचें एक शेत वंशपरंपरेनें पानसे यांस इनाम करून दिलें; मात्र त्याचा राजभाग गांवकऱ्यांनीं भरावयाचा असें ठरविलें. सरकारनेंहि तें गांव निस-

वर्तीचें ठरवून आपल्याकडून इनाम करार केला. या गोष्टीवरून शिवाजीमहाराजांची न्यायनिष्ठुरता जशी प्रत्ययास येते तशीच गोविंद विश्वनाथ पानसे यांची दयार्द्रबुद्धि हि समजते. ज्या जानोजीनें त्यांच्या विरुद्ध साक्ष देऊन त्यांना दिव्य करण्याच्या उपद्व्यापांत पाडलें, त्या च जानोजीची सरकारी शिक्षा रद्द करण्याबद्दल गोविंदपंतांनीं आपल्या पदरास खार लावून घेऊन रदवदली केली. अर्थात् अशा प्रकारचे सत्त्वस्थ, व शत्रुमित्रांस सारख्या दृष्टीनें लेखणारे गोविंदपंत दिव्यांत उतरले म्हणजे खरे ठरले यांत कांहीं नवल नाहीं.

## १०. सोनोरीच्या वृत्तींचें वांटप.

या प्रमाणें गोविंदपंतांनीं बाहेरचा वाद जिंकला खरा, पण, आतां घरांतील वाद शिल्लक राहिला. मागें सांगितले च आहे कीं, गोविंदपंतांनीं सोनोरीच्या कुळकरणावर आपला गोत्रज भाऊ रखमाजी बापूजी पानसे यांस नेमिलें होतें. हा रखमाजी पानसे बाबाजी लक्ष्मधिर याचा नातू होय. हा पानशांच्या सोनोरीच्या ज्योतिषकुळकरणाच्या वृत्तींतील एक निम्मा तक्षीमदार होता.

लक्ष्मीधर यांना तीन पुत्र परशुराम, विठोबा व बाबाजी. परशुरामाचा नातू गोविंद विश्वनाथ यांनींच वरील दिव्य केलें, विठोबास नारोबा या नांवाचा एक मुलगा होता. पुढें नारोबास पुत्र न झाल्यामुळें निर्वंश झाला. म्हणून सर्व वृत्तीची मालकी परशुराम व बाबाजी या दोघां भावांकडे आली. रखमाजी हा बाबाजीचा नातू असल्यानें तो निम्म्या वृत्तिचा मालक न्यायानेंच होता;

ज्या वेळीं रामाजी गांवखंडेराव व गोविंद विश्वनाथ यांच्यांत वाद चालू होता, त्यावेळीं गोविंदपंतांनीं रखमाजी बापूजी यास विचारलें कीं, "सोनोरीच्या ज्योतिष व कुळकरण या दोन वृत्तींत आमच्या प्रमाणें तुमची हि एक तक्षीम (वांटणी) आहे. सध्यां रामाजी हा आमच्या विरुद्ध उठला असून त्यानें सरकारांत या वृत्तीबद्दल वाद चालविला आहे. वादांचें निराकरण करण्यास आम्ही जातों च आहों. पण, तुम्ही हि आम्हांला या कामीं सामील होऊन मदत करावी. कारण आमच्या प्रमाणें तुमची हि निम्मी वृत्ति या वादामुळें अडचणींत येण्याचा संभव आहे. तरी यासाठीं वाद चालविण्याचें एक समा (इकी) पत्र करून द्या." रखमाजीस, **बाबाजी**, **शिवाजी** आणि **गोमाजी** या नांवांचे तीन भाऊ होते. गोविंदपंतांनीं केलेली ही सूचना या चार भावांना पसंत पडली नाहीं. ते म्हणाले कीं, समापत्रांत नांव घातलें म्हणजे वादासाठीं जो खर्च येईल त्यापैकीं निम्मी रक्कम आपणास द्यावी लागेल. पण, तेवढी रक्कम देण्यास आम्हांस सामर्थ्य नाहीं. म्हणून आम्ही या भानगडींत पडत नाहीं. गोविंदपंतांनीं स्वतःच्या खर्चानें वाद चालवावा, वादांत यश आल्यास आम्ही आपली निम्मी तक्षीम त्यांना देऊन टाकूं. याप्रमाणें रखमाजी आदिकरून चार भावांनीं सांगितल्यावर गोविंदपंतांनीं एकट्यांनीं (आपले सख्खे भाऊ, त्र्यंबक, मोरोपंत, माणकोपंत व उद्धवराव

यांच्यांसह ) हा वाद चालवून, अखेरीस त्यांत वर सांगितल्या प्रमाणें यश मिळविलें. परंतु, हें यश त्यांना महागांत पडलें; कारण, या भांडणांत त्यांना फार खर्च पडून कर्जबाम झालें, त्यामुळें वादाच्या निकालानंतर गोविंदपंतांनीं पुन्हा रखमाजीस व त्याच्या भावांस विनंती केली कीं, मागें तुम्हीं मदत केली नाहीं, पण आतां तरी करावी; निम्मे खर्च तुम्ही द्यावा व स्वतःची निम्मे तक्षीम राखावी. वास्तविक सोनोरीच्या ज्योतिषकुळकरण या दोन्ही वृत्तींत रखमाजीची अर्धी वांटणी असल्यानें त्यानें वरील वादाबद्दल झालेल्या खर्चाचा निम्मे खर्च सोसणें योग्य च होतें. पण, त्याच्याजवळ पैसा नव्हता व कर्ज काढून रक्कम भरावी तर कर्जापायीं स्वतःची तक्षीम च सावकाराच्या पदरीं पडावयाची. तेव्हां तक्षीम दुसऱ्याच्या घरांत जाऊं नये, घरांतल्या घरांत रहावी असा शहाणपणाचा विचार करून, रखमाजी व त्याचे भाऊ यांनीं यावेळीं आपली निम्मे तक्षीम खर्चाच्या मोबदल्यांत गोविंदपंतादि भावांस राजीखुषीनें देऊन टाकली व याबद्दलचें पत्र शके १५९० फाल्गुन वद्य तृतीया, बुधवार या दिवशीं करून दिलें; म्हणजे मोहरीचें दिव्य झाल्यानंतर एक महिन्यानें हें वांटपपत्र झालें. ( खरे जंत्रीप्रमाणें वरील तिथीस बरोबर बुधवार च येतो. )

या गोष्टीनंतर साठ पांसष्ठ वर्षांनीं रखमाजी पानसे याचा पुतण्या **निंबाजी बाबाजी** यानें गोविंदपंताचा मुलगा **रामचंद्र** व नातु **खंडो शिवदेव** आणि त्यांच्या तक्षिमेंतील इतर भाऊबंद यांच्यांशीं तंटा सुरू केला. त्याचें म्हणणें कीं, रखमाजीच्या वेळीं तो गरीब असल्यानें, त्याला गोविंदपंताचा निम्मा खर्च देतां आला नाहीं, पण, सध्यां आपली स्थिति सुधारली आहे; तरी तो निम्मा खर्च व आतांपर्यंतचें त्याचें व्याज घेऊन, तुम्ही आपल्या वृत्तीची निम्मे तक्षीम ( जी रखमाजी व त्याचे भाऊ यांनीं गोविंदपंतास खर्चाच्या पोटीं दिली होती, ती ) आपल्याला परत द्यावी. पण, ही गोष्ट रामचंद्र गोविंद वगैरे मंडळी कबूल करीनात. तेव्हां या दोन्ही पक्षांत हा वाद वाढून तो तीन चार ठिकाणीं मिटविण्याचे प्रयत्न झाले, पण, ते फुकट गेले. शेवटीं, एकदां इतर कोणी भाऊबंद जवळ नाहींत अशी संधि पाहून, निंबाजी बाबाजी यानें रामचंद्र गोविंद याचा चुलतभाऊ बाळाजी मोरेश्वर याच्यापासून, दिवे गांवीं, बलात्कारानें आपली निम्मे तक्षीम सोडल्याचा कागद लिहून घेतला. पण, बाळाजी हि कच्चा नव्हता. त्यानें त्या कागदांत, तुकाराम बोवाची एक मेख ठोकून ठेविली. सर्व कागद लिहून झाल्यानंतर शेवटीं, " बिकलम " अशीं अक्षरें लिहून त्याच्यापुढें लेखकानें सही करण्याची पद्धति त्या काळीं होती. त्याप्रमाणें बाळाजीनें सर्व कागद लिहून " बिकलम " हीं अक्षरें लिहिलीं व त्याच्यापुढें स्वतःची सही न करतां " जुलम " असा शब्द लिहिला आणि कागद निंबाजीच्या हवालीं करून ताबडतोब घरीं आला. गडबडींत असल्यानें निंबाजीनें तें पाहिलें नाहीं.

या वेळीं खंडो शिवदेव हे मौजे करंदी परगणे नेवासें येथें होते. त्यांच्याकडे लगो-

लग जाऊन बाळाजीनें ही गोष्ट त्यांस सांगितली. बाळाजीच्या पत्राची गोष्ट पुढें उघडकीस आल्यामुळें, निंबाजीनें खंडोपंताचा चुलता संभाजी माणको यांस कर्जाच्या पेंचांत अडकवून त्याच्याकडून आपल्याला पाहिजे तसें पत्र लिहून घेतलें. तेव्हां रामचंद्र गोविंद यांनीं पुरंदरास जाऊन, तेथील सरकारी अधिकाऱ्याजवळ तक्रार केली. तेव्हां, त्या अधिकाऱ्यानें, पुढें निकाल करण्यांत येईल असें सांगून, तावत्काल सोनोरीच्या कुळकरण व ज्योतिष या दोन्ही वृत्ति सरकारांत अमानत ठेविल्या. त्यानंतर तीन चार वर्षांच्या अवधींत बाळाजी मोरेश्वर व रामचंद्र गोविंद हे वारले. संभाजी माणको याचा भाऊ लक्ष्मणपंत व त्याचा पुतण्या खंडोपंत हे यापूर्वींच, या तंटाभांडणांमुळें नेवाशाकडे रहावयास गेले होते. सोनोरीस गोविंद गोपाळ ( रामचंद्र गोविंद यांच्या चुलतभावाचा मुलगा ) व जगजीवन शामजी यांचीं लहान लहान मुलें तेवढीं रहात होतीं, कांहीं दिवसांनीं खंडोपंत व लक्ष्मणपंत हे सोनोरीस परत आले.

पूर्वीं सांगितलें आहे कीं, भुतो परशराम यांनीं पुणें प्रांतांत नीरथडीच्या पांच गांवीं ( भवाळी उर्फ भोळी, तोंडल, गुणंद, लोणी वगैरे ) वृत्ति संपादन केल्या होत्या. या वेळीं त्यांच्या वंशांतील जिवाजी सावाजी, महादाजी चिंतामण, खंडो नागनाथ व कान्हो केशव हे विद्यमान होते. यांच्या गांवीं जाऊन खंडो शिवदेव व लक्ष्मण माणको यांनीं त्यांच्या जवळ आपली भाऊपणाची वांटणी मागितली. पण त्यांनीं ती दिली नाहीं. तेव्हां खंडो शिवदेव साताऱ्यास पंतसचिवाकडे गेले. सचिवांनीं या दोघा वादीप्रतिवाद्यांनां मौजे चांदक प्रांत वांई हें स्थळ नेमून दिलें. तेथें गोतसभा भरून गोतानें वरील पांच गांवांत सहावी तक्षीम पाडून ती खंडो शिवदेव व लक्ष्मण माणको यांस जिवाजी साबाजी वगैरे मंडळी कडून देवविली.

या प्रसंगानंतर लक्ष्मण माणको व खंडो शिवदेव हे चुलते-पुतणे श्रीमंत थोरले बाजीराव साहेब पेशवे यांना, मौंजे खंडेराजोरी ( प्रांत मिरज )येथें त्यांच्या फौजेचा मुक्काम असतां, जाऊन भेटले व निंबाजीचा आणि आपला वाद तोडावा म्हणून त्यांनीं श्रीमंतांस विनंति केली. तेव्हां श्रीमंतांनीं त्यांना सासवडास पाठवून तेथील देशपांडे मल्हार तुळदेव पुरंधरे व महादाजी अंबाजी पुरंधरे यांना त्यांचा तंटा तोडण्यास आज्ञा केली. त्यांनीं उभयतां वाद्यांस आपसांत समजूत करण्याचा प्रयत्न करावयास सांगितलें. त्याप्रमाणें निंबाजी व खंडोपंतादि भाऊ आपसांत वाद तोडावयास बसले. निंबाजीनें म्हटलें कीं, सोनोरीच्या कुळकरण व ज्योतिष दोन्ही वृत्तींतील आपल्या हिश्शाचा वांटा पूर्वीं रखमाजीपंतांनीं तुमच्या वडिलांस दिला आहे; तो सर्व च आम्ही परत मागतों, पण तुम्ही देत नाहीं, तर आतां निदान ज्योतिषाचा वांटा तरी तेवढा द्या व कुळकरण आपल्याकडे ठेवा. तथापि, हें हि म्हणणें खंडोपंताचा पक्ष मान्य करीना. तेव्हां निंबाजीनें निराळें च प्रकरण उपस्थित केलें. त्यानें सांगितलें कीं, नीरथडीच्या

पांच गांवांत तुमच्या प्रमाणें आमचा हि भाऊपणाचा वांटा पडतो. तुम्हीं नुकताच या पांच गांवांत सहाव्या ताक्षिमेचा वांटा मिळविला आहे; तरी त्या सहाव्या तक्षिमेंत आम्हांला चौथ्या तक्षिमेचा वांटा मिळावा; म्हणजे तुमच्या वांट्याच्या तक्षिमेपैकीं एक चतुर्थांश भाग आम्हांला मिळावा व उरलेला तीन चतुर्थांश भाग तुम्ही घ्यावा. आम्हीं आमच्या वांट्याचा आणिक एक चतुर्थांश भाग तुम्हांस दिला, त्या मोबदला सोनोरीच्या ज्योतिषपणांतील निम्मा वांटा आम्हांस द्या व तुम्ही निम्मा घ्या आणि त्या खेरीज सोनोरीचें कुळकरणाची सबंध वृत्ति तुम्हीच करा, आम्हांला नको. ही तडजोड अखेरीस खंडो शिवदेव व लक्ष्मण माणको यांनीं मान्य केली आणि त्याप्रमाणें पुरंधरे बंधूंस कळविलें. सारांश हा पानशांच्या घरांतील वाद अशा रीतीनें शके १६६०, कालयुक्त संवत्सरे, कार्तिक शुद्ध त्रयोदशी, सोमवारीं घरीं च मिटला. ( परिशिष्ट क्रमांक २ पहा ).

## ११. रखमाजी परशुराम.

लक्ष्मीधर यांना परशुराम ऊर्फ परसावा नांवाचा पुत्र असून त्या परसाव्यास सहा पुत्र होते व त्यांत रखमाजी म्हणून एक मुलगा होता, हें पूर्वीं सांगण्यांत आलें च आहे. रखमाजी हे सर्वांत धाकटे होते. त्यांनीं विवाह केला नाहीं; अखेरपर्यंत ते ब्रह्मचारी च राहिले. लहाणपणापासून त्यांची वृत्ति विरक्तीची होती, त्यामुळें संसाराच्या मायाजाळांत ते सांपडले नाहींत. त्यांचें आचरण शुद्ध, सात्त्विक असून ते आचारानें शास्त्रशुद्ध वागणारे होते. परंतु दुर्दैवानें ते फार दिवस वांचले नाहींत. त्यांचा अंत दिवें येथें अकालीं झाला. पुढें आपल्या पुतण्यांच्या स्वप्नांत येऊन त्यांनीं सांगितलें कीं, माझी या गांवीं योग्य जागीं स्थापना करावी. माझी पानसे घराण्यावर पूर्ण कृपा आहे; कोणत्या हि मंगलकार्यांत माझ्या कृपेमुळें विघ्नांचा विध्वंस होईल, कार्यांत अडथळा येणार नाहीं; रखमाजीच्या इच्छेप्रमाणें दिवें येथें त्यांची मुंजा म्हणून स्थापना केली. हल्लीं दिव्यास, कातोबाच्या देवळाच्या मुख्य दरवाजांत शिरण्यासाठीं ज्या पायऱ्या आहेत, त्यांच्या पश्चिम बाजूस एक जुनाट घडीव दगडाचा पार व त्यावर मोठा पिंपळाचा वृक्ष आहे. या पारावरच रखमाजी यांची मुंजा म्हणून स्थापना केलेली आहे. अद्यापपर्यंत लग्नमुंज वगैरे मंगलकार्यांत या मुंजास प्रथम अक्षत देण्याची व विघ्न-नाशनार्थ त्याची प्रार्थना करण्याची चाल तेथील पानसे घराण्यांत रूढ आहे. रखमाजीची पुण्यतिथि श्रावण वद्य सप्तमी रोजीं असते. हा कोणत्या शकांत वारला त्याचा शोध अद्यापि लागत नाहीं. पुण्यतिथि मात्र रखमाजीचे पुतणे माणको विश्वनाथ यांच्या वेळेपासून आजपर्यंत अव्याहत पाळिली जात आहे. परशुरामपंताच्या सहा पुत्रांपैकीं दोघांचें नकल झाले व चौघांचा मात्र वंश वाढला; तो वंश दिवें व सोनोरी येथें सांप्रत नांदत आहे.

# प्रकरण तिसरें.

## पानशांचा राजाश्रय.

लक्ष्मीधर यांचा पुत्र परशुराम याच्या वंशांतील पुरुषांची गोविंद विश्वनाथ यांच्या पर्यंतची हकिकत गेल्या प्रकरणांत सांगण्यांत आली आहे. परशुराम लक्ष्मीधर यांस विठोबा या नांवाचा एक भाऊ होता; विठ्ठलपंतास नारोबा म्हणून एक मुलगा झाला. या नारोबास मात्र पुत्र न झाल्यानें त्याच्या शाखेचें नक्कल झालें. परशुराम लक्ष्मीधर यांचा दुसरा भाऊ बाबाजी नांवाचा होता. त्याच्या शाखेंत रखमाजी बापूजी झाले. या रखमाच्या वंशजाचा सोनोरीच्या पानशांच्या वृत्तीमध्यें अर्धा वांटा पडला; तो अद्यापि चालू असून या शाखेस अर्धलीचे हिस्सेदार असें नांव अजून संबोधिलें जातें.

आतां, परशुराम लक्ष्मीधर यांच्या वंशजाची माहिती देतों. परशुरामास **लुखाबा, रामाजी, विसाजी, कृष्णाजी, केशव** व **रखमाजी** असे सहा पुत्र झाले; त्यांत लुखावा व रखमाजी यांचा निर्वंश झाला. दुसरा पुत्र रामाजी यास तुकोबा व विठोबा नांवांचे दोन पुत्र झाले. त्यांपैकीं तुकोबाचा वंश चालला व विठोबाचे नक्कल झाले. केशव परशुराम यांच्या वंशाचें हि एक दोन पिढ्यांत नक्कल झाले. विसाजी परशुराम व कृष्णाजी परशुराम यांचा वंश मात्र बरा च वाढला. विसाजी परशुराम यांचे वंशजांस पुढें राजाश्रय मिळून तोफखान्याची सरदारी मिळाली. त्यामुळें आतां या शाखेची माहिती या पुढें देण्यांत येत आहे.

विसाजी परशुरामास एकंदर पांच पुत्र झाले; **त्र्यंबकपंत, मोरोपंत, माणकोपंत, गोविंदपंत** व **उद्धवपंत** अशीं त्यांचीं नांवें होतीं. त्र्यंबकपंत हे वडील असून त्यांनीं रोजगारानिमित्त सोनोरीं सोडिली होती. ते शहाजी राजे भोंसले यांच्या कारकीर्दीत पुणें जुन्नर भागांतील सुभ्याचे कचेरींत सरकारी कामगार होते. शहाजी राजे यांचे मेव्हणे संभाजी मोहिते यांचें व त्र्यंबकपंत यांचें चांगलेंसें नसल्यानें, त्र्यंबकपंत यांचे बंधु गोविंदपंत व रामाजी गांवखंडेराव यांचा जो सोनोरीच्या कुळकरणाबद्दल वाद चालला होता, त्यांत अडथळा उत्पन्न झाला वगैरे हकिकत मागें आली आहे. गोविंदपंत हे बहुधा सोनोरीस राहून तेथील वृत्तींचा कारभार पहात असत. माणकोपंत हे चंदीचंदावरचे राजापाशीं दिवाणगिरीचे ( शके १६०५ च्या सुमारास ) कामावर होते. ( सरदार यशवंतराव वामन पानसे यांनीं इ. स. १८८३ ता. २६ एप्रिल रोजीं दक्षिणेंतील सरदारांचे एजंट मे. कार्डो साहेब यांस घराण्याचे हकिकतीचें पाठविलेलें पत्र. )

## २. माणको विश्वनाथ व शिवाजीमहाराज.

माणकोपंत यांना एकंदर आठ पुत्र झाले. त्यांचीं नांवें अनुक्रमें **शिवाजी, लक्ष्मण, रामजी, सखाजी, अनंत, संभाजी, शंकराजी** व **साबाजी** अशीं



रावबहादूर केशव रंगनाथ पानसे.
असिस्टंट इंजिनियर.

होतीं. या प्रमाणें माणकोपंताच्या मुलावाळांचा विस्तार मोठा असल्यानें सोनोरीस राहून तेथील निम्म्या वृत्तीवर ( निम्मे वृत्तीचा वांटा रखमाजी बापूजीच्याकडे गेला होता ) उदरनिर्वाह करणें त्यांना जड वाटूं लागलें. त्यामुळें राजदरबारीं किंवा सरकारी कचेरींत नौकरी शोधण्याची त्यांनीं खटपट चालविली. त्यांचे वडील बंधु त्र्यंबकपंत हे सरकारी चाकरींत होते च. त्यांच्या वशिल्याचा माणकोपंतांनीं उपयोग करून घेतला.

त्र्यंबकपंताचें व शहाजी राजांचे मेव्हणे संभाजी मोहिते यांचें वैमनस्य होतें. शिवाजीमहाराजांनीं, स्वराज्यस्थापनेस आरंभ केल्यावर, आपले सावत्र मामा, जे हे संभाजी मोहिते, त्यांना आपल्या बाजूस वळविण्याचा प्रयत्न केला, तथापि, तो सफळ झाला नाहीं; म्हणून महाराजांनीं संभाजचिं ठाणें सुपें ( व सर्व सुपें महाल ) काबीज केलें. नंतर त्यांनीं मामास शहाजी राजाकडे पाठवून दिलें. या खटपटींत त्र्यंबकपंताचें अंग असावें, असें आम्हांस वाटतें. आमच्या म्हणण्यास दोन पुरावे आहेत. एक त्र्यंबकपंत व सुभेदार ( किंवा मोकाशी ) संभाजी मोहिते यांचें वांकडें होतें व दुसरें या प्रसंगानंतर कांहीं दिवसांनीं शिवाजीमहाराजांनीं माणकोपंताच्या तीन चार मुलांना आपल्या पदरीं ठेविलें. महाराज माणसांचे मोठे पारखी होते व त्यामुळें आपल्या कार्याला जे उपयोगीं पडतील त्यांचा ते आस्थापूर्वक संग्रह करीत असत; अर्थात्, जे आधीं च उपयोगीं पडले त्यांचा योगक्षेम चालविणें त्यांचें ब्रीद च होतें. त्यामुळें असें वाटतें कीं, माणकोपंताच्या मुलांना जवळ करण्यांत महाराजांनीं जी धोरणी दृष्टि दाखविली तिचा संबंध आम्ही म्हणतों त्या प्रमाणें लागतो; म्हणजे सुपें महाल मोहित्या कडून काबीज करण्याच्या राजकारणांत त्र्यंबकपंत हे महाराजांच्या उपयोगीं पडले असावेत; असो.

एकदा ( वरील प्रसंग घडल्या नंतर ) शिवाजीमहाराज यांची स्वारी सासवडास आली, त्या वेळीं माणकोपंत हे सासवडास गेले व महाराजांना जाऊन भेटले. तेव्हां महाराजांनीं पंताचें नांव, गांव विचारून एकंदर हकीकत विचारली. पंतांनीं ती सर्व सांगून आपण ( आधींच सरकार–चाकरींत असलेले ) त्र्यंबकपंत पानसे यांचे धाकटे बंधु होत असें सांगितलें. त्यावर महाराजांनीं भेटण्याचा उद्देश विचारिला. तेव्हां पंत म्हणाले मला आठ पुत्र असून, माझा परिवार मोठा आहे; त्यामुळें एवढ्यांचा योग-क्षेम सोनोरीच्या वृत्तीवर भागत नाहीं, यासाठीं महाराजांनीं मुलांना आपल्या पदरीं बाळगण्याची व त्यांच्या कडून चाकरी घेण्याची कृपा करावी. महाराजांनीं " बहुत बरें " म्हणून पंताच्या चार पुत्रांना सरकारी नौकऱ्या दिल्या. शिवाजीपंत यांस आपल्या जवळ हुजूर कचेरींत ठेविलें, लक्ष्मणपंत यांस बारगिरीची असामी दिली, व संभाजीपंत यास तंजावरास ( आपले सावत्र बंधु ) व्यंकाजी राजे यांच्या दरबारीं पाठविलें. शिवाजीपंत हे जास्त हुशार व तत्पर दिसल्यानें महाराजांनीं त्यास आपल्या खाजगीकडे

नेमिलें. शिवाजीमहाराजांच्या पश्चात् संभाजीमहाराज व राजाराममहाराज यांच्या राजवटींत हे चार हि भाऊ बहुधा आपापल्या कामावर रुजू राहिले असावेत. औरंगझेबानें शाहुमहाराज यांस आपल्या जवळ नजरबंदींत ठेविलें होतें, त्या वेळीं शिवाजपंत व त्यांचे पुत्र खंडेराव व लक्ष्मणरावाचे चिरंजीव माधवराव हे महाराजांजवळ होते, असें एका कैफियतींत* लिहिलेलें आढळतें. तींत लक्ष्मणरावास शाहुमहाराजांनीं पंधरा हजार रुपयांचा सरंजाम दिल्याचा उल्लेख आहे.

## ३. पानशांना सरदारी.

शाहुमहाराज गादीवर बसल्यानंतर हि वरील पानसे बंधु सरकारच्या चाकरींत होते. खंडो शिवदेव यास खाजगी खात्यांत नौकरी होती व माधवराव शिवदेव यास पागेंत चाकरी होती. सन सबा अशरीन मया व अलफ, सफर, ६०९ ( शके १६४८ आश्विन शुद्ध ११ ) रोजीं सरकारांतून माधवराव यांस त्यांच्या छोट्याशा पागेनिशीं माळव्यांत पाठविण्यांत आलें. या वेळीं माळव्याचा कारभार मोंगलाकडून निघून मराठ्यांच्या ( पेशव्यांच्या ) हातीं आला होता. शके १६४८ च्या विजयादशमीनंतर श्रीमंत ( थोरले ) बाजीरावसाहेब यांनीं आपल्या ढाला कर्नाटकाकडे फिरविल्या. त्यामुळें माळव्यांत संरक्षणासाठीं जी फौज रवाना झाली, तिच्यांत च माधवराव यांचा हि समावेश झाला. या कामगिरीवर असतांना माधवराव यांनीं आपल्यावरील जबाबदारी उत्तम प्रकारें पार पाडल्यामुळें श्रीमंतांची मर्जी त्यांच्यावर बसली व त्यांनीं त्यांस शाहु महाराजांकडून आपल्याकडे घेण्याची इच्छा महाराजांजवळ प्रदर्शित केली. माधवराव हे शूर असल्यानें, व पेशव्यांनीं त्यांची शिफारस केल्यामुळें महाराजांनीं माधवराव यास पेशव्यांच्या दिमतीस दिलें. या वेळेपासून पानशांची कामगिरी व नेमणूक पेशव्यांचे हातांखालीं झाली. ही गोष्ट शके १६५७ त घडली. यानंतर, पेशवे, जेव्हां जेव्हां मोहिमांवर जात, तेव्हां तेव्हां आपल्या बरोबर माधवराव यांस त्यांच्या पागेनिशीं घेत असत.

भोपाळच्या लढाईत श्रीमंतांनीं निजामाचा सपशेल पराभव करून, त्याला कोंडलें ( शके १६५९ पौष ); या लढाईंत माधवराव यांनीं बहुत पराक्रम केल्यामुळें श्रीमंतांची मर्जी त्यांच्यावर पहिल्यापेक्षां जास्त बसली आणि त्यांनीं शाहु महाराजांजवळ माधवरावांची प्रशंसा करून, त्यांची पूर्वीची जी तैनात होती ती वाढवून घेतली. हा तैनात जाबता, इहिद्दे आर्बैन मया व अलफ, जमादिलावल ६०९ ( शके १६६२ श्रावण शुद्ध ११ ) चा आहे. या जाबत्यांत माधवराव यांस तिसऱ्या प्रतीचा पोषाख ( दोन वस्त्रें ); सरकारांतून देण्याची नेमणूक झाली. तदनंतर शके १६६४ आषाढ शुद्ध षष्ठी रोजीं शाहुमहाराज यांनीं खंडो शिवाजी यास त्यांनीं पूर्वीं औरंग-

---

* सरदार केशवराव बापूराव पानसे यांची कैफियत ( भारत वर्ष ).

झेबाचे कैदेंत असतांना केलेली सेवा, व नंतर खाजगीकडे करीत असलेली नौकरी मनांत आणून मौजे गिर्वी तालुके इंदापूर हा संबंध गांव आणि कसबे बावडें येथें एक चाहूर जमीन व मौजे शेटफळ येथें अर्धा चाहूर जमीन इनाम करून दिली. ( परिशिष्ट क्रमांक ३ पाहा. )

यापुढें, उत्तरोत्तर माधवराव यांस सरकारांतून मानसन्मान मिळत गेला. सल्लास अर्बैन मया व अलफ, जमादिलावल ६०७ ( शके १६६४ आषाढ शुद्ध ८ ) रोजीं सरकारानें माधवराव यांस आबूदागिरीचा मान देऊन, खर्चासाठीं नेमणूक करून दिली. त्यानंतर दोन वर्षांनीं ( शके १६६६ ), सरदारीची तैनात पूर्वींपेक्षां जास्त वाढवून, सरकारानें त्यास निराळा तैनात जाबता करून दिला. याप्रमाणें, माधवराव यांची उत्तरोत्तर ऊर्जितावस्था होत चालली.

## ४. माधवराव शिवदेव व तोफखान्याची सरदारी.

माधवराव हे प्रथम पागे होते, असें वर आलें आहे. त्या वेळीं त्यांना तत्कालीन रिवाजाप्रमाणें अगदीं प्रथम सालीना तीनशें रुपयांची नेमणूक सरकारांतून मिळत असे. ती पुढें वाढत वाढत नऊ हजारांपर्यंत वाढली. आमच्या संग्रहीं माधवरावांच्या या तैनातीचा नक्कल केलेला एक जाबता आहे, त्यांत या वाढीचे आंकडे दिले आहेत; ते पुढें देतों.

शके १६५७ मध्यें ही तैनात वार्षिक ३०० रुपये होती, ती एक वर्ष चालून पुढील सालीं म्हणजे शके १६५८ मध्यें ३५० रुपये झाली. ( याच वेळीं माधवराव हे पेशव्यांच्या दिमतीस गेले होते. ) त्यानंतर चार वर्षांनीं म्हणजे शके १६६१ मध्यें ३५० रुपयांची नेमणूक ५३३ रुपये झाली. या जाबत्याची तारीख मागें दिली च आहे. या च वेळीं माधवरावांना तिसऱ्या प्रतीचा पोषाख मिळाला. पुढें शके १६६४ मध्यें आबदागिरीचा मान मिळाल्यामुळें नेमणूक हि वाढवावी लागली; ती आतां ५८३ रुपये झाली. पुढल्या वर्षीं म्हणजे शके १६६५ मध्यें ७६७ रुपये तैनात करण्यांत आली; ती एक वर्ष चालून शके १६६६ त ९८४ रुपये पर्यंत वाढविण्यांत आली. त्यानंतर दोन वर्षांनीं म्हणजे शके १६६८ मध्यें ही रक्कम १३२२ रुपयांवर गेली; पुन्हा दोन वर्षांनीं ( शके १६७० ) १८५३ रुपये नेमणूक करण्यांत आली. ती हि दोन वर्षें चालून शके १६७२ त एकदम ३३०९ रुपयांची तैनात करार झाली. या पुढें जी नेमणूक झालेली आढळते ती तोफखान्याचे अंमलदार म्हणून जो सरंजाम मिळाला त्या वेळची असावी असें वाटतें.

पेशव्यांकडे स्वतंत्र तोफखाना प्रथम फारसा नव्हता. छत्रपतींच्या खास फौजेंत जो काय असेल तो व पेशव्यांच्या फौजेंत जो थोडासा होता तो; एवढा च तोफखाना त्यांत होता. थोरल्या शिवाजीमहाराजांच्या पश्चात् श्रीमंत नानासाहेब पेशवे यांच्या कारकीर्दीच्या मध्यभागापर्यंत मराठ्यांनीं जीं युद्धें केलीं तीं बहुतेक गनिमी काव्याचीं व

घोडदुळी असल्यानें त्यांत उत्तम व सर्वांगपूर्ण तोफखान्याची विशेष जरूरी भासली नाहीं. शके १६७६ चे सुमारास कुकडी नदीवर निझामाशीं मराठ्यांचें जें युद्ध झालें त्या वेळीं निझामाकडील पाश्चात्यांच्या हाताखालीं व त्यांच्या कवाइतीनें तरबेज झालेला तोफखाना पाहून पेशव्यांना आपल्या सैन्यांतील तोफखान्याची उणीव तीव्रतेनें भासली. निझामाचा तोफखान्यावरील दरोगा ( मुख्य अंमलदार ) बुसी नांवाचा एक तज्ज्ञ फ्रेंच माणूस होता. त्याच्या हाताखालीं मुझफरखान नांवाचा एक गारदी नायब अधिकारी होता. त्याला हि तोफखान्याची चांगली माहिती होती. जमल्यास त्याला आपल्या पदरीं ठेवावें अशी खटपट पेशव्यांनीं चालविली. परंतु प्रथम ही गोष्ट जमेना. पुढें कांहीं दिवसांनीं मुझफर व बुसी यांच्यांत बेबनाव झाला व मुझफर पेशव्यांच्याकडे आला. पेशव्यांनीं त्याला आपल्या नौकरींत घेऊन त्याच्या सल्ल्यानें तोफखान्याची सुधारणा करावी म्हणून पानशांस हुकूम दिला.

मागें सांगितलें आहे कीं, साताऱ्यास खास छत्रपतींच्या फौजेंत थोडासा तोफखाना होता. शाहुमहाराजांच्या अमदानींत वरील प्रसंगाच्या सुमारास माधवराव शिवदेव ( लक्ष्मण ) यांचे बंधु यशवंतराव शिवदेव ( लक्ष्मण ) हे त्या तोफखान्यावर दरोगा म्हणून होते. तेव्हां त्यांना व माधवराव यांना हि पेशव्यांनीं मुझफरपासून तोफखान्याचें शिक्षण घेण्यास सांगितलें. कांहीं दिवसांनीं उभयतांचें शिक्षण पुरें झालें. पुढें पुरंधरे ( पेशव्यांचे कारभारी ) व मुझफर यांच्यामध्यें कांहीं कामानिमित्त वितुष्ट आल्यानें मुझफरनें पेशव्यांची नौकरी सोडली. तेव्हां तोफखान्याच्या दरोग्याचें काम, माधवराव व यशवंतराव या दोघां भावांपैकीं, माधवराव जास्त शूर व साहसी असल्यानें, त्यांच्याकडे सोपविलें गेलें. त्या जागेवर त्यांची नेमणूक होऊन, त्यांना त्या जागेची तैनात मिळूं लागली ( शके १६७५ ). पुढें मुझफरनें पेशव्यांची नौकरी सोडून सावनूरच्या नवाबाची नौकरी पतकरली. पुढें श्रीमंत सदाशिवराव भाऊसाहेब यांनीं नवाबाचा पराभव केल्यानंतर मुझफर हा पुन्हा पेशव्यांच्या तोफखान्यांत पानशांच्या हातांखालीं नौकर म्हणून राहिला होता.

माधवराव यांच्या हातांखालीं, यशवंतराव व त्यांचे सख्खे धाकटे बंधु महिपतराव हे दोघे काम करीत होते, त्यांच्या कर्तबगारीवर त्यांना सरदारी मिळाली. माधवराव यांना तोफखान्याची मुख्य सरदारी दिली, तेव्हां त्यांना वार्षिक तैनात ८८४५ रुपयांची होती व ती त्यांच्या मृत्युपर्यंत चालू होती, असा उल्लेख आमच्या जवळील तैनात जाबत्याच्या नकलेंत आढळतो. त्यानंतर तोफखान्याच्या सरदारीबद्दल वार्षिक सरंजाम रोख ३२०० रुपयांचा असून खेरीज पोषाक एक हजार रुपयांचा मिळे. ही रक्कम वरील ८८४५ रुपयांच्या रकमेपेक्षां निराळी होती, कीं, तिच्या पोटांतील होती, हें नक्की समजत नाहीं. बहुधा ती पोटांतील असावी असें वाटतें. एका कैफियतींत, माधवराव व यशवंतराव यांस " इतलाखी नेमणूक जातीस सरंजाम रुपये ७५ हजार व स्वारी बद्दल ९० हजार असें सालीना " करून दिल्याचा उल्लेख आला आहे.

शके १६७५ मध्यें श्रीमंत नानासाहेब पेशवे यांनीं माधवराव व त्यांचे चार बंधु त्यास मौजे सोनोरी येथें पंधरा बिघे जमीन इनाम दिली (परिशिष्ट क्रमांक ४ पहा). त्यावरून या वेळीं हे सर्व बंधु एकत्र होते.

यशवंतराव * यास मुख्य तोफखान्याची सरदारी मिळाली असें एके ठिकाणीं लिहिलेलें आढळतें, पण, तें चुकीचें दिसतें. कारण श्रीमंत बाळाजी बाजीराव पेशवे यांच्या रोजनिशींत तोफखान्याच्या कारभाराची जी सनद श्रीमंतांनीं दिलेली आहे, ती माधवरावाच्या नांवाची आहे, यशवंतरावाच्या नाहीं. (वाड. वा. बा. पे. रो. भा. १ पृष्ठ १८०). तसेंच इतिहासकार रा. गो. स. सरदेसाई यांनीं वरील माहिती गृहित धरून माधवराव हे यशवंतरावाचे पुत्र होत असें जें आपल्या पुस्तकांत लिहिलें आहे (म. रि. म. वि. २ पृ. ३९४) तें अगदीं चूक आहे. माधवराव व यशवंतराव हे सख्खे भाऊ होते. त्यांत माधवराव हे वडील असून यशवंतराव धाकटे होत.

तोफखान्याच्या कारभाराची सरकारी सनद माधवराव यांस जी मिळाली, तिच्यांत तोफखान्यांत एकंदर व्यवस्था व कायदेकानु कोणत्या प्रकारचे असत ते दिले असल्यानें, ती सनद पुढें देतों.

"माधवराव शिवदेव यांजकडील तोफखान्याचे कारभारास येणेंप्रमाणें. राऊत वगैरे लोक नेहमीं व निसबतीचे आहेत, त्यांचा रोजमुरा वांटावयाचा करार.

दिवाण व मजमदार व फडणवीस व सबनीस यांनीं बसोन वांटणी हातांवर द्यावी. वांटणी फडणविसांनीं लिहावी......कलम १

राऊत वगैरे लोक नेहमीं (चे) व निसबतीस (असलेले) देखील (व) काबडी यांची हजिरी घेणें. सरदार (तोफखान्यावरील मुख्य सरदार) व दिवाण व मजमदार व फडणवीस व सबनीस यांनीं महिन्यांत एक, दुसरी हजेरी घेणें ते घ्यावी. हजेरी लिहिणें व नेहमीं हजेरी घेणें ते सबनिसांनीं घ्यावी. अवघे बसोन हजेरी घेतील त्याजवर एकुणात (एकूण संख्येचा शेरा) मजमदारांनीं करावी. तारीख फडणविसांनीं करावी. ....कलम १

रोखा पत्र वगैरे हरएक लिहिणें, तें कोणीं लिहावें व हुजरून सनदपत्र येईल तें कोणापाशीं विल्हे लावावी त्याचा करारः—

फडणविसांनीं लिहावी, मजमदारांनीं निशाण (शेरा) करावें. कागदपत्र फडणविसांजवळ ठेवीत जाणें......कलम १

नेहमीं (चे) व निसबतीचे लोक यांची अडिसरी (धान्य रूपाचा पगार) व कामाठ्यांचा पीठ पैसा व उंटांच्या व बैलांच्या वगैरे चंदीचा दाणा व किरकोळ (माल

---

* दामोदरराव गणेश (कैफियती वाडकृत) यांचे कैफियतींत मुख्य सरदारी यशवंतराव यास मिळाली. परंतु त्याबद्दलची सनद त्यांनीं आपले वडील बंधु माधवराव यांचे नांवची करून घेतली असा उल्लेख आहे.

जो ) हुजुरून पावतो, त्याची यादी अगर चिठ्ठी आकारून हुजूर लेहून देणें त्याचा करारः–( ती ) फडणीसांनीं आकारून द्यावी. सरदारांनीं व दिवाणांनीं व मजमदारांनीं पाहून...समजावून विल्हे लावून घ्यावी......कलम १

लोकांची कबजे ( पावत्या ) करावयाचा करारः–( ती ) फडणिसांनीं करावी ( व ) मजमदारांनीं पाहून विल्हे लावून घ्यावी.........कलम १

पोत्याची चिठ्ठी व कोठीची चिठ्ठी ( व ) रोखापत्र होईल तें फडणविसांनीं लिहावें. दिवाण व सरदार...व मजमदारांनीं निशाण करावें. कीर्दीवर एकुणात मजमदारांनीं करावी............कलम १

लोकांचा व राबत्यांचा तैनात जावता लिहिणें व हुजूरून करार करून घेणें, रदबदल करणें, हें सर्व सरदारां समागमें दिवाण व मजमदार अगर सबनिसांनीं आणावें. ( करावें ), हुजुरून मखलासी करून......फडणविसाजवळ द्यावी......कलम १

येणेप्रमाणें सात कलमें कारखान्याची करार करून दिल्ही असेत. सदरहू प्रमाणें वर्तणूक करणें, म्हणोन मशारनिल्हेचे ( माधवरावांच्या ) नांवें सनद. ”

ही सनद खमस खमसैन मया व अलफ, जमादिलावल ६०९ या दिवशीं म्हणजे शके १६७६ फाल्गुन शुद्ध १० रोजीं माधवराव यांस पेशवे सरकारांतून मिळाली.

याप्रमाणें माधवरावांचा उत्तरोत्तर उत्कर्ष झाला. वसई, साष्टी वगैरे मोहिमांत पेशव्यांचे फौजेबरोबर माधवराव होते असें एका कैफियतींत लिहिलें आहे ( दामोदरराव गणेश यांची कैफियत वाडकृत ). सावनूरकर नबाबावर श्रीमंत पेशवे यांनीं शके १६७७ त जी मोहीम केली, तींत माधवराव होते आणि सावनूर ज्यावेळीं पेशव्यांनीं सर केलें, त्या वेळच्या अरेतुरेच्या लढाईत माधवराव सरकारकामीं आले. ही लढाई शके १६७७ फाल्गुन शुद्ध ११ रोजीं झाली. या लढाईत, ज्या मुजफरखानाकडून माधवरावांनीं शिक्षण घेतलें त्याच खानाच्या तोंडास तोंड देण्याचा प्रसंग त्यांस आला. खानाच्या तीन चौक्या माधवरावांनीं उधळून लाविल्या व सव्वा लाख गोळे फेकून नबाबाचा किल्ला भाजून काढला व सावनूर काबीज केलें. ( रा. खंड ३ ले. ४७२ तें ४७७. ) यावेळीं मुझफरखान पळून गेला. त्यानें नबाबास फिरून तोंड दाखविलें नाही. परंतु पेशव्यांकडे फिरून येऊन पानशांचे हातांखालीं तो तोफखान्यांत नौकर राहिला. या सावनूरचे लढाईत माधवरावांचे बंधु यशवंतराव हे हि होते. दोघे बंधु समरांगणीं शत्रूंशीं लढत असतां माधवरावास गोळी लागून ते तत्काळ युद्धभूमीवर पतन पावले व यशवंतरावाचे पायास भाल्याची जबर जखम झाली. ही जखम पुढें बरी होण्यास बरेच दिवस लागले. या मर्दुमकीबद्दल यशवंतराव यांस अंबारी व साहेब नौबद असें पारितोषिक मिळालें. याप्रमाणें माधवराव शिवदेव तोफखान्याचे पहिले सरदार यांचा शेवट झाला. माधवराव यांच्या पत्नीचें नांव **राऊबाई** असें होतें. त्यांना अखेरपर्यंत पुत्र न झाल्यानें त्यांनीं आपला पुतण्या ( यशवंतरावाचा मुलगा ) **कृष्णराव** यास दत्तक घेतलें होतें.

माधवरावाचे धाकटे बंधु यशवंतराव व महिपतराव यांना माधवरावांचे हाताखालीं सरदारी मिळाल्याचें मागें लिहिलें च आहे. वसईचें युद्ध, डभईची मोहीम, महंमद बंगषवरील स्वारी, भोपाळची लढाई वगैरे युद्धांत यशवंतराव हे पेशवे सरकारच्या फौजेबरोबर होते. त्यांना पूर्वी तीनशें स्वारांची सरदारी होती, ती शके १६६० च्या नंतर पांच शें स्वारांची करण्यांत आली, म्हणजे यशवंतराव हे पांच शें घोडदळांचे पागे झाले. त्याच वेळीं त्यांना ( स्वतः जातीस व फौजेस मिळून ) सरकारांतून सरंजाम करार करून देण्यांत आला. यशवंतराव हे नक्की कधीं वारले, ती मिति मिळत नाहीं. त्यांच्या पत्नीचें नांव **बहिणाबाई** असें असून त्यांना **भिवराव, जयवंतराव, सखारामपंत, विश्वासराव, पुरुषोत्तमराव** व **कृष्णराव** असे सहा पुत्र झाले. पानशांचा अत्यंत भरभराटीचा काळ या सहा बंधूंच्या कारकीर्दीत च आला; त्यामुळें त्यांची हकीकत पुढें स्वतंत्र दिली आहे.

## ५. केशवराव पानसे व उदगीरची लढाई.

यशवंतरावांना केशवराव नांवाचे एक धाकटे भाऊ होते; ते हि पेशव्यांच्या फौजेबरोबर जात असत. गुजराथेंत श्रीमंत राघोबा दादा पेशव्यांच्या ज्या मोहिमा शके १६०४ त झाल्या त्यांत केशवराव हजर होते. सदर मोहिमांत केशवरावांनीं सरकारचाकरी बहुत पराक्रमानें केल्यामुळें, विरमगांव परगणा व दसकुरोई परगणा ( गुजराथ प्रांत ), या दोन परगण्यांतील मजमु व फडणिशी यांचे दरख श्रीमंत नानासाहेब पेशवे यांनीं त्यांना करार करून दिले होते. या हकांची सरकारी सनद शके १६७४ फाल्गुन शुद्ध ४ ची आहे. हें उत्पन्न कुंपनी सरकारचा अंमल सुरू होईपर्यंत या घराण्याकडे सुरळीत चाललें होतें; शके १७४० च्या सुमारास तें इंग्रजांनीं बंद केलें. त्याबद्दल त्या वेळीं दामोदर गणेश पानसे यांनीं इंग्रजांकडे तक्रार केली होती. केशवराव हे उदगीरच्या मोहिमेंत पडले. उदगीरचें युद्ध म्हणजे मराठ्यांनीं गाजविलेल्या अनेक पराक्रमांपैकीं एक मोठा पराक्रम होय. या युद्धांत केशवरावांनीं तोफांचा भडीमार करून शत्रूस जेरीस आणलें. यांच्या माऱ्यापुढें शत्रूच्या तोफा बंद पडल्या व सैनिक दशदिशां पळूं लागले. या प्रसंगीं शत्रूकडील हत्ती व तोफा केशवरावांनीं पाडाव करून आपल्या गोटांत आणिल्या.

या युद्धाचें वर्णन अनेक ठिकाणीं आलें आहे. राजवाडे यांच्या पहिल्या, तिसऱ्या व चवथ्या खंडांत, पेशव्यांच्या बखरींत, पेशवे दफ्तरांतील सनदपत्रांतील माहितींत वगैरे जागीं ही हकीकत आढळते. राजवाडे यांच्या पहिल्या खंडांत पुढील मजकूर आहे. " मोंगलास, उदागिरीस, नजीक बेदर येथें गांठ श्रीमंताची पडली. तेथें युद्ध जाहलें. परंतु तें माफक. त्याजवर मोंगल अवशास आला. वाटेस युद्ध होत आला. अवशाहून धारूरास येणार. २० कोस अवशाहून धारूर. त्यास तीन मुकाम, दहा कोस मोंगल आला. धारूरास र॥ व्यंकटराव निंबाळकर, लक्ष्मणजी खंडागळे व

आणखी कांहीं मराठे, ऐसी सात आठ हजार फौज जमा झाली. ते सामील करून घ्यावी याजकरितां मोंगल चालिला. तों श्रीमंत भाऊसाहेब, दादासाहेब, यांणी मनसुबा केला जे, दहा कोस धारूर राहिले. धारूरास ( निझाम ) गेला, मराठे मिळाले म्हणजे विचार पडेल, हें उत्तम नाहीं. तो ( मनसुबा ) करार झाला. माघ वद्य द्वितीयेस रविवारीं मोंगलाचें कूच आहे. युद्ध उत्तम करावें; मरेल तो मरो. याप्रमाणें मातबर सरदार होते; त्यांशीं सर्वांहीं करार याजप्रमाणें केला. त्याप्रमाणें प्रातःकाळीं कूच जहालें. दोन प्रहरां मुकामास न येतां, तळावर अर्ध कोसावर मोंगल आवळून राहिला. आम्हांकडील तोफ लागली. त्याजवर दोन प्रहरां युद्ध जाहलें. त्याजकडील चंडोल ( पिछाडीची फौज ) अगदीं बुडविला. दहा अकरा हत्ती ( व ) पंधरा पावेतों तोफा आणिल्या. त्याजकडील, याजखेरीज सात आठ मातबर सरदार मारिले गेले. गाडदी प्यादे यांस मीत नाहीं. याजप्रमाणें आम्हांकडील पांच सात जण, केशवराव पानसे तोफखाने यांचे दरोगे, याजप्रमाणें पांच सात ( सरदार ) ठार ( झाले )...याजमुळें दहशत मोंगलानें फार खादिली. मोंगलानें सल्ल्यावर घातलें. " ( पृष्ठ २५६, २५७ ).

याप्रमाणें या लढाईंत शके १६८१ फाल्गुन शुद्ध चतुर्थीस केशवराव हे स्वर्गवासी झाले. यास राधाबाई व काशीबाई अशा दोन बायका होत्या. दामोदरराव गणेश यांनीं लिहिलेल्या कैफियतींत ( कैफियत यादी वाडकृत ) असें म्हटलें आहे कीं, " केशवराव ( हे ) खुद्द नबाबा ( निझामचे ) चे हौद्यावर जातीनें चढले, तेव्हां खवासनीष यानें जोडगोळी मारली, ती कपाळास लागून सरकारच्या कामांत अखेर जाहले. सबब मोठे सरदारीची खिळत ( सन्मानाचा पोषाक ) यशवंतराव ( केशवरावाचे वडील बंधु ) यांस सरकारांतून दिल्ही " ( वाड कैफियती यादी वगैरे पृ. १२३ ). केशवरावास व्यंकटराव या नांवाचा एक पुत्र होता. या व्यंकटरावाला केशवराव नांवाचा मुलगा झाला. या केशवरावास संतति न झाल्यामुळें या शाखेचा पुढें निर्वंश झाला. हे केशवराव शके १७१२ त वारले.

# प्रकरण चौथें.

## भिवराव यशवंत व त्यांचे बंधु.

माधवराव शिवदेव वारल्यानंतर, तोफखान्याची मुख्य सरदारकी त्यांचे पुत्र **कृष्णराव** यांस सरकारांतून मिळालीं; त्या बरोबरच फौजेच्या सरदारीचीं वस्त्रें **भिवराव यशवंतराव** यांस मिळाली. या पुढें, कृष्णराव माधव यांच्यापेक्षां भिवराव यशवंत व त्यांचे बंधु, त्यांतल्या त्यांत **जयवंतराव व सखारामपंत** यांची कामगिरी तत्कालीन इतिहासांत जास्त महत्त्वाची झालेली आढळते. त्यामुळें त्यांची माहिती येथें प्रामुख्यानें देत आहों; अर्थात् तदनुषंगानें कृष्णराव माधवराव व इतर पानसे मंडळी यांचीहि माहिती येईलच.

कृष्णराव यांस जो तोफखान्याच्या दरोग्याचा सरंजाम मिळाला तो वडिलापेक्षां थोडासा ज्यास्त होता. माधवराव यांस त्यांच्या कारकीर्दीच्या अखेरीस ८८४५ रुपयांची तैनात होती असें मागें सांगितलें आहे. त्यांच्या मृत्यूनंतर दुसऱ्या वर्षी म्हणजे शके १६७८ मध्यें कृष्णराव यांस जी तैनात मिळाली तिचा आंकडा आमच्या जवळील तैनात जावत्यांत १०२०० रुपयांचा आढळतो. त्यानंतर दोन वर्षांनीं त्यांची बढती होऊन १६६०० रुपयांची नेमणूक झाली. पुढें एक वर्षानें म्हणजे शके १६८१ च्या सुमारास नेमणुकीची रक्कम २१३४१ रुपयांची करण्यांत आली. त्यानंतर क्रमाक्रमानें तिची वाढ पुढील प्रमाणें होत गेल्याचा दाखला मिळाला आहे. शके १६८७ मध्यें २३२४५ रुपये, शके १६९६ मध्ये ५०००० रुपये आणि शके १६९९ चे सुमारास ६७००० रुपये; यापैकीं शके १६८१ च्या पौष शुद्ध नवमीच्या तैनात जावत्यांत पोषाक ४०० रुपयांचा केला व बाकीच्या नख्त नेमणुकीबद्दल तितक्या वसुलाचीं गांवें त्यांस जहागीर दिलीं, असा उल्लेख आढळतो. याच कृष्णराव व भिवराव यांनीं मौजे **सावरदरी** येथील निम्मे पाटिलकी वतन **कणसे पाटील** यांजपासून एक हजार रुपयांस विकत घेतलें. त्याचें राजपत्र शके १६८८ मध्यें श्रीमंत थोरले माधवराव साहेब पेशवे यांनीं करार करून दिलें. ( परिशिष्ट क्रमांक ५ पहा. )

उदगीर येथें श्रीमंत भाऊ साहेब पेशवे यांनीं अपूर्व यश संपादन केलें होतें. तत्पूर्वी श्रीमंत रघुनाथराव दादा साहेब पेशवे यांनीं उत्तर हिंदुस्थानांत एक दोन मोहिमा केल्या होत्या; आणि एका मोहिमेंत तर भिमथडीच्या घोड्यांना अटकेचें पाणी पाजून व अटकेवर मराठी झेंडे फडकावून मराठ्यांना अपूर्व यश मिळवून दिलें होतें. हें जरी सर्व खरें होतें तरी राजकीय बंदोबस्त करणें व मराठ्यांची सत्ता उत्तरेंत दृढमूल करून अबदाल्ली सारख्या परक्या शत्रूस आणि दिल्ली येथील मराठ्यांच्या विरुद्ध असलेल्या मुसलमानी पक्षास काबूंत ठेवणें हें त्यांना साधलें नाहीं. याला कारण,

दादासाहेब यांचा स्वभाव होय असें कांहीं इतिहासज्ञांचें म्हणणें आहे; तर दुसऱ्या कांहीं इतिहासज्ञांचें असें मत आहे कीं, दादासाहेबांकडे फारसा दोष नसून त्या वेळीं उत्तरेंत असलेले मराठी साम्राज्याचे जे सरदार त्यांच्यांतच एकराष्ट्रीयत्वाची असावी तितकी जाणीव नव्हती. असा हा विद्वानांतील मतभेद आहे. आम्हांला त्यांत निर्णय देण्याचा अधिकार नाहीं; पण, आमच्या अल्प मतीस असें वाटतें कीं, वरील दोन्ही पक्षांच्या म्हणण्यांत, कोणाहि एकाच पक्षाचें म्हणणें नितांत सत्य नाहीं. दोघांच्या हि म्हणण्यांत थोडा फार सत्याचा अंश आहे. या सुमारास दादासाहेब वयानें तरुण असल्यानें त्या वयांत आढळणारें विवेकापेक्षां विकारप्राबल्य त्यांच्या हि ठायीं अधिक होतें. त्या प्राबल्यास युक्तीनें दाबणारे मुत्सद्दी सरदार त्या वेळीं उत्तरेंत अगदीं च नव्हते असें नाहीं; पण जे कोणी होते त्यांच्यांत एकराष्ट्रीयत्वाची भावना असावी तितकी प्रखर नव्हती. त्यांची दृष्टि मराठी साम्राज्याच्या चिरकालिक कल्याणापेक्षां आपल्या फायद्याकडे बाजवीपेक्षां जास्त होती. या सरदारांत शिंदे घराणें मात्र मध्यवर्ति सरकारच्या नफ्यातोट्याकडे आपल्या स्वार्थापेक्षां अधिक लक्ष घाली. यामुळें उत्तरेंत परक्या शत्रूंशीं एकमुखानें किंवा एक जुटीनें तोंड देण्यास किंवा आपला राज्यकारभार भक्कम पायावर स्थापण्यास पेशव्यांना सवड मिळाली नाहीं. दादासाहेबांच्या अपयशाचें व त्यानंतरच्या पानपताच्या हि अपयशाचें ( अनेक कारणांपैकीं ) हें एक कारण होतें; असो.

## २. पानिपतचें युद्ध व महिपतराव पानसे.

पानिपतप्रकरण उदर्गीरनंतर उद्भवलें, किंबहुना त्याचा आरंभ तत्पूर्वीं एक दोन वर्षें झाला होता. अबदालीचा कायमचा निकाल लावून दिल्लीवर आपला कायमचा शह ठेवणें जरूर होतें. दिल्लीहून पातशहाचें हि पेशव्यांना बोलावणें आलें होतें. नुक्ताच भाऊसाहेबांनीं निजामावर जय मिळविला होता व दादासाहेब उत्तरेकडून आले ते विशेष फायदा न करतां आले होते, त्या मुळें श्रीमंतांनीं अखेरीस भाऊसाहेबांना च मोहिमेवर पाठविण्याचें निश्चित केलें. मोंगलाईतील सिंदखेड ( जाधवरावांचें जहागिरीचें गांव ) नजीक पूर्णा नदीचे कांठीं पटदूर म्हणून एक गांव आहे; तेथें श्रीमंत नानासाहेब पेशवे यांनीं शके १६८१ च्या रंगपंचमीस दरबार भरवून वरील योजना निश्चित केली. त्या नंतर सात दिवसांनीं ( वद्य एकादशीस ) भाऊसाहेब हे आपल्या सैन्यानिशीं उत्तरेकडे निघाले . ज्या तिथीस हें कूच सुरू झालें, त्या तिथीनंतर जवळ जवळ दहा महिन्यांनीं पानपताच्या युद्धाचा शेवट होऊन श्रीमंत भाऊसाहेब हे रणभूमीवर गारद झाले !

पानपतच्या युद्धाची माहिती मराठी इतिहासाच्या बहुश्रुत वाचकांस साधारणतः ठाऊक आहेच. त्यामुळें त्याची तपशीलवार माहिती येथें देण्याची अवश्यकता नाहीं. पटदुराहून निघतांना भाऊसाहेबांबरोबर जवळ जवळ पन्नास हजार फौज व बळवंतराव मेहेंदळे, नाना पुरंदरे, महिपतराव चिटणवीस, लक्ष्मण बल्लाळ, भवानी शंकर, इब्राहीमखान वगैरे सरदार मंडळी होती. पानशांपैकीं **महिपतराव लक्ष्मण** हे हि

या मंडळींत होते. दामोदरराव गणेश पानसे यांच्या कैफियतींत महिपतराव यांचा उल्लेख या पानपत प्रकरणांत आला आहे. त्यास दुसरी कडे हि आधार सांपडतो. शालिग्राम यांनीं प्रसिद्ध केलेल्या ऐतिहासिक पोवाड्यांत पानपतच्या मोहिमेचे तीन पोवाडे छापले आहेत; त्यांपैकीं **सटवा रामा** नांवाच्या शाहिरानें जो पोवाडा केला आहे, त्या पोवाड्यांत महिपतराव पानसे यांचे नांवाचा उल्लेख आला आहे. भाऊसाहेबांच्या बरोबर जी फौज पानपतास गेली तिच्या वर्णनांतः—

" धाकले नाना कुळक्षरी त्यांच्या मोहरले फुल शहर। **महिपतराव** ते हि **पानसे** तोफखान्याचे सरदार ॥ " असा महिपतरावांचा उल्लेख आहे.

शके १६८२ पौष शुद्ध अष्टमी बुधवार या दिवशीं पानपतावरील रणकंदन झालें आणि " श्रीहरी त्या अमित्रा ( अब्दाली ) कडील फौजेस सन्मुख जाहला, श्री. पेशवे बहादूर यांस विन्मुख जाहला याजमुळें सर्व नाश जाहला " ( पाणिपत बखर पान ४५ ). या महायुद्धाचा मराठी साम्राज्यास जबर धक्का बसला. सगनभाऊ म्हणतो कीं, " नवलाख बांगडी ( या युद्धांत ) फुटली असा हाहाकार। दक्षिण बुडाली सती पडल्या महामूर ॥ " त्यांत आणखी श्रीमंत नानासाहेब पेशवे याच वेळीं वारले व त्यामुळें मराठी साम्राज्यावर मोठें च संकट कोसळलें. ही परिस्थिति पाहून मराठ्यांच्या शत्रूंस वाटलें कीं, " आतां सज्जनगडच्या गोसाव्याचें भगवें निशाण फाटलें व भिमथडीच्या तट्टांची धांव गंगथडीच्या अलीकडेच खुंटली. " पण अद्यापि शिवाजीमहाराजांनीं स्थापिलेल्या " हिंदवी राज्या " वर प्रभु रामचंद्राची कृपादृष्टि होती, म्हणून थोड्याच दिवसांत श्रीमंत थोरले माधवरावसाहेब यांनीं पानपतची विसकटलेली घडी पुनश्च बसविली; असो.

पानपतच्या युद्धांत ज्या वेळीं मराठ्यांच्या सैन्याची दाणादाण होऊन तें वाट सांपडेल तिकडे पळत सुटलें त्या वेळीं एक पठाण सरदार महिपतराव पानसे यांचा पाठलाग करूं लागला. पठाणानें पानशांस गांठलें; दोघांची बरीच झटापट झाली, तींत महिपतराव यांनीं त्या पठाण सरदारास अखेर अल्लाचें घर दाखविलें. या झटापटींत महिपतराव यांचे तोंडावर तरवारीचा एक जोराचा वार लागला. पानपताहून जी सरदार मंडळी व इतर फौज परत देशीं आली, त्यांत महिपतराव हे हि परत आले. महिपतरावांची नेमणूक पानपतच्या युद्धापूर्वीपासून तोफखान्याकडे च होती. यांच्याशिवाय आणीक हि पानशांपैकीं कांहीं मंडळी पानपतावर गेली होती. त्यांचा नक्की शोध अद्यून लागत नाहीं. तत्रापि, रामाजी परशुराम पानसे यांच्या शाखेंतील **सदाशिवपंत** हे पानपतास गेल्याचा व तेथें गारद झाल्याचा उल्लेख कागदोपत्रीं आढळतो.

या सदाशिवपंताच्या वडिलांचें नांव **निळोबा** असून निळोबाच्या बापाचें नांव **विठ्ठलपंत** असें होतें; आणि हे विठ्ठलपंत रामाजी परशुराम यांचे नातू होत. सदाशिवपंतास संतति न झाल्यामुळें त्या शाखेचें पुढें नकल झालें. महिपतराव इकडे

आल्यावर लवकर च वारले. त्यांची तोंडावरील जखम बरी व्हावी म्हणून पुष्कळ खटपट करण्यांत आली, परंतु त्या खटपटीस यश आलें नाहीं. अखेर त्या दुखण्यांत च त्यांचा अंत झाला. यांच्या स्त्रीचें नांव **मैनाबाई** असें होतें.

तिकडे पानपत-प्रकरण चालू असतां इकडे शके १६८२ सालीं श्रीमंत नानासाहेब पेशवे यांनीं मौजे खामगांव ( टेक ) येथें अर्धा चाहूर जमीन पानशांस इनाम दिली ( परिशिष्ट क्रमांक ६ पहा ).

ही जमीन पूर्वीचें माधवराव शिवदेव यास इनाम देण्याचें ठरलें होतें, पण राजपत्र होण्यापूर्वीं ते वारल्यानें कृष्णराव वगैरे बंधूंच्या नांवें या वेळीं पेशव्याकडून इनाम पत्रें करून देण्यांत आलीं.

## ३. निझामावरील स्वारींत भिवराव.

मागें सांगितल्या प्रमाणें पानपतचा धक्का बसल्यानें श्रीमंत नाना साहेब पेशवे यांनीं आपला अवतार संपविला. त्या नंतर श्रीमंत माधवराव साहेब यांची पेशवाईच्या गादीवर स्थापना झाली. परंतु, त्या वेळीं श्रीमंतांचें वय लहान असल्यानें रघुनाथराव दादासाहेब हेच कारभार पहात असत. आरंभीं जरी चुलत्यापुतण्यांत एक विचारानें राज्यकारभार चालविण्याचें ठरून त्या प्रमाणें वागणूक होती तरी पुढें कांहीं दिवसांनीं त्या ठरावांत बिघाड झाला आणि दादासाहेब हे माधवरावापासून फटकून बाहेर निघाले. या प्रमाणें पेशव्यांचे घरांत दुफळी होऊन भाऊबंदकी माजली; शिवाय, पानपताच्या युद्धामुळें त्यांच्या सैन्याचा हि जोर कमी झाला होता. अर्थात् या नाजूक परिस्थितीचा फायदा या वेळीं घेण्याचें पेशव्यांच्या शत्रूंनीं ठरविलें, यांत कांहीं नवल नाहीं. उत्तरेंत मुसलमानांनीं त्यांच्या विरुद्ध काहूर उठविलेंच होतें. त्यांत भर घालण्यासाठीं दक्षिणेंत हि निझामानें पुन्हा कारवाई सुरू केली.

या वेळीं विठ्ठल सुंदर हे निझामाचे दिवाण होते. साडेतीन शहाण्यांपैकीं हे एक होत. त्यांच्या मनांत या संधीचा फायदा घेऊन पेशव्यांचें पारिपत्य करावें असें आलें. विठ्ठलपंत हा हिंदु असून त्याला "हिंदवी राज्य" बुडविण्याची खटपट करण्यास कांहीं दिक्कत वाटली नाहीं. या वरून त्या काळीं एकराष्ट्रीयत्वाची, एकधर्मभावनेची अथवा एकजातीयत्वाची भावना राष्ट्रांतील कर्तबगार पुरुषांत व मुत्सद्यांत कितपत वास करीत होती याची स्पष्ट कल्पना येईल. या भावनेच्या अभावामुळें किंवा अत्यल्प प्रमाणामुळेंच त्या वेळीं हिंदुस्थानची हानि झाली; आणि त्या नंतरच्या काळांत किंबहुना प्रत्यक्ष आज हि ती भावना जितक्या उत्कटत्वानें वास करावयास हवी तितकी नसल्यानें सांप्रतहि हिंदुस्थानची हानि होत आहे, हें आपल्या दृष्टीपुढें आहेच. असो.

विठ्ठल सुंदर हा यजुर्वेदी ब्राह्मण असून त्यानें निझामची गादी राखण्यांत अतिशय खटपट केली होती. या मुळें त्याच्यावर निझामाची फार मर्जी बसलेली होती; त्यास

निझामानें आपल्या मुख्य दिवाणाची जागा देऊन "राजे प्रतापवंत" ही पदवीहि दिली होती. यावेळीं निझामअली, विनायकदास, मुरादखान वगैरे मंडळीच्या मनांत पेशव्यांवर स्वारी करण्याचें या विठ्ठलपंतानें भरविलें.

"गनिमाच्या राज्यांत फूट आहे. राघोबा व माधवराव यांचा आपसांत बेबनाव आहे. ऐशियांत स्वारी करून गनीम मोडून आपला अंमल बसवावा." असा मनसुबा ठरून विठ्ठल पंताची नेमणूक ही कामगिरी पार पाडण्याकडे झाली. पेशव्यांचें पेशवे-पद आपल्याकडे घेण्याची हि महत्त्वाकांक्षा पंतानें बाळगिली होती. या वेळीं पेशव्यां-कडील कांहीं (प्रतिनिधि, घाटगे, घोरपडे, पवार, निंबाळकर वगैरे) रुष्ट सरदार हि आंतून पंतास मिळाले होते. ही जोड ह्या संधीस लाभल्यामुळें त्यास चांगलें उत्तेजन मिळालें. वर सांगितल्या प्रमाणें उत्तरेंत मुसलमानांनीं धुमाकूळ चालविला होता, तर दक्षिणेंत हि हैदरनें मराठी राज्यास त्रास देण्यास सुरवात केली होती. त्यामुळें हैदरच्या तोंडावर कांहीं फौज पाठविणें पेशव्यांना भाग होतें. ही वेळ साधून विठ्ठलपंतानें आपल्या सैन्याचे चार भाग करून, तो पुण्याच्या रोखानें कूच करीत निघाला; निघतांना त्यानें उद्दामपणानें पेशव्यांना निरोप पाठविला कीं, "आपलेकडील जे सरदार आमच्याकडे येऊन मिळाले आहेत, त्यांचे प्रांत, किल्ले वगैरे जें कांहीं तुम्हीं जप्त केलें आहे तें सर्व त्यांचें त्यांस परत द्यावें व आम्ही जो कोणी कारभारी नेमूं त्याच्या सल्ल्यानें तुम्ही राज्यकारभार चालवावा." हा निरोप रघुनाथराव दादासाहेब यांस कळला त्यावेळी त्यांना फार राग आला. त्यांनीं गृहकलह तात्पुरता बंद ठेवून निझा-मास तोंड देण्याची तयारी केली. राज्यांतील एकंदर फौज इतस्ततः पांगलेली असून आपलेकडील कांहीं सरदार प्रतिपक्षास फितुर झालेले आहेत अशा स्थितींत निझामास प्रत्यक्ष समोरासमोर तोंड देणें बरें नव्हे. यावेळीं गनिमी काव्यानें दोन डाव खेळावे हें बरें; असे ठरलें. प्रथम त्याच्या राज्यांत धुमाकूळ घालून त्याला प्रारंभींच पायबंद द्यावा असें, सखारामबापू, नारो शंकर, विंचूरकर, पुरंदरे, पानसे इत्यादि मुत्सद्यांच्या विचारानें दादासाहेबांनीं ठरविलें; आणि त्या प्रमाणें व्यवस्था करण्यास सुरुवात झाली.

इकडे निझाम धारूरा वरून पुण्याकडे वळला. त्यानें वाटेवरील पेशव्यांचा प्रांत लुटून जाळून पोळून फस्त केला. नंतर तळेगांवावरून त्यानें सैन्य थेट पुण्यावर चालून आलें. परंतु पुण्याच्या लोकांस सरकारानें अगाऊ सूचना दिलेली असल्यामुळें गांव साधारणतः अगोदरच उजाड झालेलें होतें. निझामाच्या सरदारांनीं गांवास आग लावून व इतर अनेक प्रकारें त्रास देऊन गांवकऱ्यांचा अनन्वित छळ केला. जे सरदार प्रामा-णिकपणें पेशव्यांस चिकटून राहिले त्यांचे पुण्यांतील राहते वाडे व पुण्यानजीकचीं गांवें लुटून त्यांस त्यांनीं आगी लावून दिल्या. याचवेळीं पुण्यांतलि पानशांचा वाडा

जाळला गेला आणि तोफखानाहि लुटला गेला. हिवरे व सासवड हीं दोन्ही गांवें याच वेळीं शत्रूनें जाळलीं.

सुमारें पन्नास वर्षांपूर्वी, आमच्या लहानपणीं, पानसे घराण्यांतील, एक वृद्ध बाई या प्रसंगाची हकिकत अशी सांगत असे कीं, सासवड व हिवरें हीं गांवें निझामाच्या सैनिकांनीं प्रथम लुटून जाळून फस्त केल्यावर मग शत्रूचा मोर्चा सोनोरी गांवाकडे वळला. पानसे मंडळींतील सर्व कर्ते पुरुष या वेळीं हैद्राबादेकडे मोहिमेवर असल्यामुळें शत्रुसैन्याचा प्रतिकार करण्यास गांवीं पुरुष मंडळी कोणी नव्हती. निझामाच्या सैन्यांपैकीं जो सरदार गांवें जाळण्याच्या मोहिमेवर होता तो पानशांचा लेकवळा होता. तो जेव्हां सोनोरीवर, चाल करून आला तेव्हां पानशांच्या घरांतील बायकांनीं त्यास ओळखून जवळ बोलावून घेतलें व सांगितलें कीं, तूं आमच्या अन्नावर पोसलेला असून आतां असा बेइमानी कां झालास ? हे त्यांचे मार्मिक शब्द ऐकून तो सरदार खजील झाला व लुटालूट वगैरे कांहीं न करतां तसाच परत गेला. पूर्वीच्या काळीं शत्रूच्या गोटांत असलेल्या सज्जन वीरांत हि कांहीं प्रसंगीं सदसद्विचारांची ज्योत अंतःकरणांत जागृत होत असे; असें यावरून दिसून येतें. वरील कथेंत बरेंच सत्य दिसतें सबब ती येथें मुद्दाम दिली आहे.

या सुमारास पर्जन्यकाळ जवळ आल्यामुळें निझाम आपल्या राज्याकडे परत वळला. या त्याच्या मागें फिरण्याला या खेरीज दुसरें हि एक कारण होतें; तें म्हणजे तो पुण्याकडे आल्यानंतर त्याच्या राज्यांत त्यास पायबंद बसावा म्हणून दादासाहेबांनीं केलेली स्वारी हें होय. ही स्वारी थेट हैद्राबादेपर्यंत झाली व तिकडे दादासाहेबांनीं आपला दरारा इतका बसविला कीं, निझामाला ताबडतोब मागें वळणें भाग पडलें. निझामाची स्वारी हैद्राबादेकडे परत जात असतां गंगेस पूर आल्यामुळें औरंगाबादे-जवळच्या राक्षसभुवन नांवाच्या गांवीं तो मुक्कामास राहिला. ही बातमी समजतां च दादासाहेब त्याच्या वर चालून गेले. दोघांत वीस कोसांचे अंतर होतें, व दोघांच्या मध्यें जानोजी भोसले हे, फौजेसह रोंख धरून बसले होते. त्यांच्या दहशतीनें निझा-मानें गंगापार होण्याचा बेत केला आणि तो स्वतः रात्रीं कांहीं सैन्यानिशीं पलीकडे गेला. इतक्यांत दादासाहेब आपल्या फौजेनिशीं व भिवराव पानसे आपल्या तोफ-खान्यासुद्धां एकदम निझामाच्या बाकी राहिलेल्या फौजे वर घसरले. त्या वेळीं भयं-कर युद्ध होऊन खासा विठ्ठल सुंदर यास तोफेचा गोळा लागून तो ठार झाला; तसें च विनायकदास हि कामास आला. चकमकींत मुरादखान याला जिवंत पकडण्यांत आलें. याप्रमाणें या युद्धांत भिवराव पानसे यांनीं आपल्या तोफखान्याची कामगिरी उत्तम तऱ्हेनें बजाविली व पेशव्यांस जय मिळाला. ही लढाई शके १६८५ श्राव-णांत झाली.

## ४. पानशांनीं मिळविलेलीं कांहीं इनामें व जमिनी.

शके १६८१ च्या सुमारास कृष्णाजी माधवराव व भिवराव यशवंतराव पानसे यांनीं मौजे सावरदरी येथील निम्मे मोकदमी म्हणजे पाटिलकी विकत घेतली, ती पेशवे सरकारांनीं शके १६८८ मध्यें करार करून दिली. ही निम्मे पाटिलकी अजून पर्यंत पानसे यांचे घराण्यांत चालत आहे.

रामाजी परशुराम पानसे हे शके १६२५ च्या सुमारास होऊन गेले. त्यांना **विसाजी** व **कृष्णाजी** नांवांचे दोन बंधु होते. त्यांत रामाजीच्या शाखेंत **रंगोपंत** झाले. त्यांना **रामाजी** याच नांवाचा एक मुलगा होता. हे रामाजी रंगो, शाहू महाराजांच्या कारकीर्दीमध्यें सातारा येथें राजदरबारांत सभासद या अधिकारावर होते. सभासदाचें काम म्हणजे, राज्यकारभारप्रसंगीं विशेषतः न्यायनिवाड्याच्या वेळीं राजास सल्ला-मसलत देणें हें असे; म्हणजे हल्लींच्या प्रांतिक किंवा वरिष्ठ कायदेमंडळांतील कार्यकारी मंत्र्या ( एक्झिक्युटिव्ह कौन्सिलर ) सारखें असे. रामाजीपंतास या कामाबद्दल सालिना साडे तीनशें होनांची तैनात होती. शाहु छत्रपतींच्या पश्चात् मराठी साम्राज्याचा राज्यकारभार साताऱ्याहून पुण्यास पेशवे सरकाराकडे आला, त्या वेळीं या सभासदांच्या साताऱ्यांतील जागा कमी करण्यांत आल्या. त्यामुळें रामाजीपंताची जागा व अर्थात् वेतन ही या वेळीं बंद झालें, तसेंच त्या जागेसाठीं म्हणून जी कांहीं जमीन त्यांना मिळाली होती, ती हि परत सरकारजमा झाली. पुढें, त्यांच्या चिरंजीवांनीं म्हणजे **विठ्ठल रामाजी** यांनीं या अन्यायाबद्दल पुष्कळ तक्रारी केल्या; त्यावरून, सरकारानें विठ्ठल पंतास किल्ले वंदन येथें असामी दिली, पण पुढें शके १६८८ (श्रावण) मध्यें वंदनगड येथील सदरची असामी, श्रीमंत थोरले माधवराव साहेब पेशवे यांच्या आज्ञेनें सखाराम बापू बोकील यांच्या दिमतीस सदर किल्ला दिल्यामुळें त्यांच्या कडे गेली. त्यासाठीं विठ्ठल पंतास मौजे कालंदबाडी परगणे निंब येथें बरीचशी जमीन वंदन-गडच्या खर्चाकडे लावून दिलेली होती त्यांतून पंधरा बिघे जमीन असामी ऐवजीं म्हणून सरकारानें दिली व ती हि त्यास पुरेना म्हणून आणखी दहा बिघे जमीन त्याच गांवां-पैकीं दिली. त्या शिवाय शके १६८९ मध्यें किकवी येथें आणखी चार बिघे जमीन विठ्ठलपंतास दिली, या प्रमाणें असामी ऐवजीं पंचवीस बिघे जमीन घेऊन विठ्ठलपंत घरीं बसले.

त्यावेळीं प्रत्येक गडाच्या आसपासच्या चार पांच कोसांच्या टापूंतील जमिनी त्या त्या गडाच्या एकंदर खर्चासाठीं म्हणून तोडून देण्याची वहिवाट असे. या लहानशा टापूस त्या त्या गडाचा " घेरा " असें नांव असे. हल्लीं सुद्धां, सिंहगडच्या आसपासच्या टापूस " सिंहगड घेरा " म्हणून नांव पुण्याच्या कलेक्टर हपिसांतील रेकार्डांत नमूद आहे.

वरील जमि[illegible]ळचे एकंदर कागदांपैकीं दोन कागद सखाराम भगवंत यांच्या नांवचे व एक कागद किकवीच्या मुकदम यांच्या नांवचा आहे ( परिशिष्ट क्रमांक ७-८-९ ). ही जमीन इंग्रजी अंमलापर्यंत पानशांकडे इनाम म्हणून चालू होती; इंग्रजी अंमल झाल्यानंतर शके १७७७ च्या ( इ. स. १८५५ ) सुमारास त्या जमिनीवर निमजुडी बसविण्यांत आली. सदरची जमीन अद्यापपर्यंत विठ्ठल पंताचे वंशजाकडे चालू आहे.

विठ्ठलपंतास **रंगोबा** या नांवाचे भाऊ असून, रंगोपंतास **विष्णुपंत** ऊर्फ रावजी या नांवाचा मुलगा होता. सातार्‍यास प्रतापसिंह महाराजांच्या कारकीर्दीत हे रावजी खाजगीकडे नौकर होते. पुढें राजद्रोहाचे आरोपावरून इंग्रज सरकारांनीं महाराजांची उचलबांगडी करून त्यांना काशीस नेऊन ठेविलें. मागें सातार्‍यास या राजद्रोहाचे कटांत जी मंडळी होती, त्यांची धरपकड सुरू झाली. या कामीं आपल्यावर हि कांहीं बालंट येईल, या भीतीनें रावजींनीं पांचवड गांवीं बाळाजीपंत नातू यांची गांठ घेतली; व त्यांचे मार्फतीनें इंग्रज अधिकार्‍याची भेट घेऊन, या कटाशीं आपला बिलकूल संबंध नाहीं अशी त्याची त्यांनीं खात्री केली. त्या अधिकार्‍यानें तुमचें नांव अद्याप आमचे चौकशींत निष्पन्न झालें नाहीं सबब काळजी करूं नये असें सांगितलें. पुढें रावजी हे दिवें येथें आपले घरीं येऊन राहिले. महाराजांच्या विरुद्ध त्यावेळीं, असलेली मंडळी आपल्यास या कटांत गोंवतील अशी धास्ती रात्रंदिवस रावजी यास असल्यामुळें ते दिवें गांव सोडून आपले वतनाचे, शिरवळ प्रांतीं असलेल्या, लोणी गांवीं रहाण्यास गेले व तेथें घरशेती करून त्यांनीं कायमची वस्ती केली. त्या वेळेपासून त्यांचे वंशज तेथेंच कायमचे नांदूं लागले.

## ५. दक्षिणेंतील खळबळ.

यानंतर म्हणजे शके १६९१ मध्यें पेशवे सरकारची कर्नाटकांत हैदरअल्लीवर तिसरी स्वारी झाली. या स्वारींत श्रीमंत थोरले माधवरावसाहेब यांनीं हैदरअल्लीस चांगलेंच नमविलें. वास्तविक हैदर म्हणजे एक विलक्षण अकलेचा सेनापति होता. त्याची लढण्याची तर्‍हा एकच नव्हती. त्यानें थेट मद्रासेवर चढाई करून मद्रासकर इंग्रजांची नुकती च पुरी खोड मोडली होती. या प्रमाणें त्याच्या मागचा इंग्रजांचा वेध कमी झाल्यानंतर त्यानें मराठी राज्यास उपद्रव देण्यास प्रारंभ केला. दोन वर्षांपूर्वी पेशव्यांनीं त्याच्यापासून बाळापूर, शिरें वगैरे जितका मुलुख घेतला होता, तितका सर्व परत घेण्याच्या उद्योगास आतां त्यानें आरंभ केला. तसेंच कर्नाटकांत पेशवे सरकारचीं जीं, चित्रदुर्ग, हरपनहळ्ळी वगैरे संस्थानें होतीं त्यांस त्यानें उपद्रव दिला; त्यांच्यापासून जबरदस्तीनें खंडणी घेतली व तुंगभद्रा उतरून मराठी राज्यांत धुमाकूळ घालण्यास त्यानें सुरुवात केली. त्याला अद्यापि श्रीमंत थोरले माधवरावसाहेबांचा दरारा, मुत्सद्दीपणा व सेनापतित्व यांची पुरी जाणीव झाली नव्हती. वास्तविक



मल्हारगडच्या उत्तर बाजूचा देखावा, ( सोनोरी ).



कै. सरदार गणपतराव दामोदरराव पानसे. C. S. कलेक्टर.

पानपताच्या धक्क्यानें मराठी साम्राज्याची इमारत मुळापासून इतकी हादरली होती कीं, त्या वेळीं हिंदुस्थानांत असलेल्या मराठेतर राज्यकर्त्यांना असें वाटलें होतें कीं, आतां ही इमारत वर्षा दोन वर्षांत ढासळून जमीनदोस्त होईल. पण हा त्यांचा अंदाज चुकीचा ठरून आणखी पन्नास वर्षें तिचें आयुष्य वाढविण्यास त्या वेळीं जर कोणाचे विशेष गुण कारणीभूत झाले असतील, तर ते श्रीमंत थोरल्या रावसाहेबांचे च होत. पण अजून ही गोष्ट स्वानुभवानें हैदरच्या प्रत्ययास यावयाची होती.

हैदर तुंगभद्रा उतरल्याचें वर्तमान ऐकून श्रीमंतांनीं मिरजेस व अथणीस पटवर्धन, रास्ते वगैरे सरदारांना एकदम फौजा जमा करण्याचे हुकूम सोडून आपण खुद्द पुण्यास हि सैन्य जमविण्याची जारीनें तयारी चालविली. गोपाळराव पटवर्धन व आनंदराव रास्ते आधींच पुढें निघाले आणि सावनूरजवळ तीस कोसांच्या अंतरानें मराठे व हैदर यांचे तळ पडले. तेव्हां हैदरनें धाकदपटशा देऊन सावनूरकर नवाबापासून गुपचुपपणें चाळीस हजार होन खंडणी घेऊन तुंगभद्रा ओलांडली. श्रीमंत पेशव्यांची स्वारी शके १६९१ च्या दसऱ्यानंतर पुण्याहून निघाली. स्वारींत पटवर्धन, धायगुडे, रास्ते, सावनूरकर, कडपे व कर्नूळकर नबाब, कित्तुरकर, अक्कलकोटकर, नागपूरकर, नरगुंदकर, गायकवाड मुरारराव घोरपडे वगैरे सरदार व हुजरांत पागा, पथकें आणि तोफखाना मिळून एकंदर सुमारें पाऊण लक्ष फौज गुंतली होती. तोफखान्यांत ५० तोफा असून मल्हारराव, कृष्णराव माधव, भिवराव यशवंत व जयवंतराव यशवंत हे पानसे सरदार बरोबर होते. हैदरची फौज पाऊण लाखाच्यावर होती व त्याचा तोफखाना उत्तम होता. श्रीमंतांनीं मसलत ठरवून आपण स्वतः श्रीरंगपट्टणच्या रोखें निघाले व गोपाळराव पटवर्धनांस हैदरच्या तोंडावर ठेवून त्याचा पिच्छा पुरविण्याची त्यांस आज्ञा केली. श्रीमंतांबरोबर मल्हारराव, भिवराव व कृष्णराव (आनंदराव) हे पानसे सरदार होते. वाटेंत जातां जातां श्रीमंतांनीं बुद्धेहाळ, हागलवाडी, चिकनायकनहळ्ळी, कंदिकिरे, नागमंगळ वगैरे ठाण्यांवर तोफांचा मारा करून तीं कावीज केलीं. चिकनायकनहळ्ळीपासून एक लक्ष पस्तीस हजार रुपये खंडणी श्रीमंतांनीं घेतली. कंदिकिरे येथील ठाणेदारानें थोडा नेट धरल्यानें मराठ्यांनीं आपल्या तोफा चालवून तट पाडून ठाणें कावीज केलें. नागमंडळ ठाणें साधारण मोठें होतें पण तें तोफांचे मारे लावून जमीनदोस्त केलें आणि त्यापुढील बेलूर ठाणें घेऊन तेथें फौज व दारूगोळा भरपूर जमा करून ठेवला. हैदर हा पेशव्यांच्या भयानें, मसूरच्या झाडींत जो एकदां दडी मारून बसला तो बरे च दिवस बाहेर च पडला नाहीं. श्रीमंतांची त्याला या वेळीं जबरदस्त दहशत पडली. श्रीमंत थेट दक्षिणेस चिक्कबाळापूरपर्यंत गेल्यानें हैदरनें झाडी सोडून चळवळ सुरू केली. त्याचा सरदार मीर रेझा हा देवदुर्गाकडे चालला असतां, त्याचेवर मल्हारराव उर्फ मलबा पानसे यांनीं आठ हजार स्वारांनिशीं हल्ला केला, पण रेझा हा मल्हाररावांच्या हातून निसटला. या हैदरावरील तिसऱ्या

स्वारींत श्रीमंतांनीं अनेक विकट किल्ले व ठाणीं सर करून घेतलीं, त्यांत कोठें हि त्यांना अपजय आला नाहीं, याचें कारण त्यांचें शौर्य व दक्षता हें तर आहे च, पण त्यांचें पायदळ व नामांकित तोफखाना हीं हि मुख्य कारणें होतीं. जीव धोक्यांत घालण्याच्या सर्व प्रसंगांत श्रीमंत जातीनें सर्वांच्या पुढें असत, मोर्च्यांत रात्रंदिवस रहात व सुरुंग खोदण्याच्या वेळीं ते स्वतः हजर रहात. रेझा निसटल्यावर मल्हाररावांनीं कोल्हार परगण्यांतील तमाम ठाणीं हस्तगत केलीं आणि कोल्हारचा किल्ला हि घेतला. या वेळीं श्रीमंत बेंगरुळापर्यंत गेले होते, परंतु हैदरचें सैन्य नजीक असल्याची बातमी लागल्यामुळें, त्यावर झडप घालण्यास मिळावी या साठीं ते सपाट्यानें परत फिरले, पण त्या धूर्तानें तो यांचा डाव ओळखून भयानें श्रीरंगपट्टणास पळ काढला. या वेळीं पावसाळा नजीक आल्यानें श्रीमंतांनीं त्याचा पाठलाग व केला नाहीं. हैदर पळाल्यानंतर गोपाळराव पटवर्धन रिकामे झाले, तेव्हां श्रीमंतांनीं त्यांना निजगल्लच्या किल्ल्यास वेढा घालण्यास सांगितलें. त्याप्रमाणें शके १६९२ चैत्र वद्य षष्ठीस गोपाळरावांनीं त्या किल्यास वेढा घातला. तें स्थळ निसर्गतः मजबूत असून आंत शिबंदी चांगली असल्या मुळें तें लवकर हातीं येईना; सबब आपल्या पायदळ व तोफखान्यानिशीं खुद्द श्रीमंताची स्वारी पटवर्धनांचे मदतीस आली. मराठ्यांनीं पानशांच्या करवीं तोफा लावून निकराचा हल्ला केल्यावर तो किल्ला वैशाख शुद्ध पंचमीच्या दिवशीं ताब्यांत आला. किल्ल्यावर हल्ले होत असतां एके दिवशीं श्रीमंत माधवराव साहेब व नारायणराव साहेब हे तो हल्ला पहात उभे होते, त्या वेळीं नारायणराव यांना गोळीची हलकीशी जखम झाली अशी नोंद आढळते. खरे यांच्या ऐ. ले. संग्रहांत या जखमेसंबंधानें जी हकिगत दिली आहे तींत "श्रीमंत राजश्री रावसाहेब हल्याचे वेळीं उभे होते, त्यांचे पाठीमागें श्रीमंत राजश्री नारायणरावसाहेब उभे होते. त्यांचे उजवे हाताचे मनगटावर गोळी चाटून गेली. हलकी (जखम) आहे" (पृ. १६१९) इतकाच मजकूर आहे. त्या वरून असा बोध होतो कीं, सदरची गोळी शत्रुपक्षांकडील असावी. पण भिवराव पानसे यांनीं घरीं पाठविलेलें एक पत्र (परिशिष्ट क्रमांक १० पहा) मिळालें आहे. सदरचें पत्र निजगलचा किल्ला घेतल्यानंतर सतरा दिवसांनीं लिहिलेलें आहे. पत्रांत स्पष्ट म्हटलें आहे कीं "राम तोफ फुटून श्रीमंत नारायणराव यांचे हातास चाटती गोळी लागली." या वरून पेशव्याकडील च राम तोफ डागली जात असतां फुटली व धाकट्या श्रीमंतांस जखम झाली. ही माहिती नवीन आहे. याशिवाय या पत्रांत जी माहिती आली आहे, तिच्याशीं खरे यांच्या ऐतिहासिक लेखसंग्रह खंड भाग चवथ्यांतील माहितीचा उत्तम मेळ बसतो. निजगळचा "किल्ला तोफांशिवाय हस्तगत व्हावयाचा नाहीं" असें गोपाळराव पटवर्धन म्हणत होते (ऐ. ले. सं. पृ. १६०९). "तोफांचें सामान चांगलें असावें" अशी त्यांची श्रीमंताकडे मागणी होती, (कित्ता १६१२). "तोफा चांगल्या असाव्या, त्यांत आनंदराव (कृष्णराव) माधव

( पानसे ) यांस पाठवावें; नाहीं तरी खैराती तोफा आल्यास ठीक नाहीं. डोंगरावरी तोफा चढवाव्या लागतात " ( किता ) असें म्हणून गोपाळरावांनीं आनंदराव पानसे यांस पाठविण्याबद्दल लिहिलें आहे. यावरून किल्ला घेण्याच्या या कामांत पानशांच्या, विशेषतः ( आनंदराव ) कृष्णराव माधव पानसे यांच्या तोफखान्यानें उत्कृष्ट कामगिरी बजाविली, हें उघड दिसतें.

याप्रमाणें या स्वारीचा शेवट झाला. या स्वारींत मराठ्यांनीं हैदरचा सुमारें एक कोट उत्पन्नाचा मुलुख लुटून फस्त केला, तरी हि हैदर हा पेशवे मागत होते तेवढी खंडणी देईना आणि तह हि करीना. तेव्हां श्रीमंतांनीं सर्वांच्या विचारें असें ठरविलें कीं, आपण स्वतां देशीं जावें व पावसाळा संपल्यानंतर दसरा करून पुन्हा इकडे यावें व तोंपर्यंत करनाटकांत कांहीं मराठी फौज छावणीस ठेवावी. ठरल्याप्रमाणें फौजेवर मुख्य त्र्यंबकराव मामा पेठे यांना नेमिलें व त्यांच्या मदतीस मुरारराव घोरपडे, पटवर्धन, रास्ते, गायकवाड, आनंदराव गोपाळ इत्यादि सरदार ठेविले. तोफखान्यापैकीं आनंदराव माधव पानसे हे मदतीस राहिले. यांच्या जवळ या वेळीं पांच तोफा होत्या व त्यांचा मुक्काम मुतलावी येथें होता. नंतर कांहीं हुजुरांत, नारो शंकर, साबाजी भोंसले, आप्पा बळवंत, मल्हारराव पानसे, भिवराव पानसे व इतर कांहीं सरदार यांस बरोबर घेऊन श्रीमंत परत फिरले. ते शके १६९२ च्या ज्येष्ठ वद्य पंचमीस पुण्यास येऊन पोहोंचले.

पुण्यास परत आल्यानंतर पानसे यांनीं मौजे काळेगांव येथील वतनें खरेदी केलीं. त्या संबंधीची हकीकत पुढीलप्रमाणें आहे.

३५५३.

## ६. मौजे काळेगांव व इतर ठिकाणें येथील इनामें.

पानशांच्या घराण्यापैकीं भोळी तोंडलच्या शाखेंत **काळंभट** * यांचा पुरुष शके १५८० च्या सुमारास होऊन गेला. त्यास **व्यंकाजी** व **काशीपंत** नांवाचे दोन पुत्र झाले. व्यंकाजीपंतास **त्र्यंबक, कृष्णाजी, रघुनाथ** व **नरहर** नांवांचीं चार मुलें होतीं, त्यांत कृष्णाजी शिवाय बाकीच्यांचें नक्कल झालें. कृष्णाजीस पुत्र नसल्यानें त्यानें **हरि** नांवाचा पुत्र दत्तक घेतला. काळंभटाचा दुसरा पुत्र काशीपंत व त्याचा पुत्र **गोविंदपंत** होय. गोविंदपंतास दोन पुत्र होते. एक व्यंकाजी व दुसरा हरि. या हरीस कृष्णाजी व्यंकाजी यांनीं दत्तक घेतलें. या हरि कृष्णाजीस **आनंदराव, कृष्णाजी, गोविंद, रघुनाथ, महादाजी** व **विश्वनाथ** इतकीं मुलें झालीं.

---

* काळभंट व त्याच्या वंशजांचीं जीं नांवें दिलीं आहेत तीं मुद्गल गोत्री पानशांच्या वंशवेलांत सांपडत नाहींत. खडके आडनांवाचें मुद्गल गोत्री घराणें पानसे यांनीं भाऊ मानल्यामुळें तें पानसे आडनांव लावूं लागलें. त्यांच्या घराण्यांतील हे पुरुष असावेत असें वाटतें. या घराण्याची वस्ती हल्लीं शिरवळ प्रांतीं भोळी या गांवीं आहे.

वरील मंडळींतील त्र्यंबक व्यंकाजी यांनीं काळेगांवची पाटिलकी, महाजनकी व शेटेपण हीं वतनें खरेदी केलीं. वरवाजी बिन जानजी पाटील कुटे राहणार काळेगांव परगणे नेवासें सरकार अहंमदनगर याचे मालकीची मिराशी पाटिलकीची तिसरी तक्षीम शके १६१५ च्या सुमारास ८०१ रुपयांस पानशांनी खरेदी केली व मौजें मजकुरीं नवे पेठेची वसाहत केली. त्याचें शेटेपण व महाजनकी वतन दरोबस्त या वरील रकमेंत खरेदी केलें. त्या वतनावर असतांना, पानसे यांनीं, तेथें वाडा बांधला व कालेश्वराचे मागें विहीर बांधली. पुढें, विपरीत काळ आल्यावर त्र्यंबकपंत देशांतरास गेले. त्यांचे बंधु कृष्णाजी व्यंकटेश हे वतन वहिवाटून खात होते. त्यांनीं पुढें गुमास्ता ठेविला व आपण साताऱ्यास रोजगारानिमित्त आले. साताऱ्यास त्यांनीं हरिपंतास दत्तक घेतलें व पुढें ते गुजराथेंत सोनगडाकडे रोजगारासाठीं गेले; ते तिकडेच वारले. त्यामुळें इकडे वतनाची पूसतपास कोणीं केली नाहीं. त्याचा फायदा घेऊन गुमास्त्यानें वतनाचा महजर, शके १६२० बहुधान्यनाम संवत्सरे ज्येष्ठ वद्य १ रोजीं, शामजी नाईक मांडे यांचेकडे ९५१ रुपयांस गहाण ठेविला. शिवाय, मूळचे खरेदीखतापैकीं कांहीं देणें, तसेंच राहिलें होतें. वतन गहाण ठेवून गुमास्त्यानें जें कर्ज काढलें त्यास व्याज दरमहा दर शेंकडा पांच रुपये होतें !

पुढें, शके १६९० च्या सुमारास श्रीमंत पेशवे सरकारची स्वारी या प्रांतांत आली; त्या वेळीं त्यांच्या सैन्यांत कृष्णाजी माधवराव वगैरे पानसे मंडळी होतीं. सैन्याचा मुक्काम सांवखेडें येथें असतांना काळेगांवच्या या वतनाची हकीकत कृष्णाजीपंतास समजली. त्यावर त्यांनीं तेथें त्या संबंधाची पुरी चौकशी केली. त्यानंतर श्रीमंतांची स्वारी पुण्यास परत आल्यावर कृष्णराव यांनीं हरिपंतांच्या मुलांचा शोध केला. हरिपंतास वर सांगितल्याप्रमाणें सहा मुलें असून तीं या वेळीं भोळी, तोंडल येथें रहात असत. त्यांना कृष्णरावांनीं बोलावून आणलें व वतनाचा प्रश्न काढला. त्यावर, त्यांनीं “ आमचा पडता काळ आहे, सबब आमच्यानें हें कर्ज फिटून उत्पन्न मोकळें होणार नाहीं, तरी आम्हांस दहा हजार रुपये दिल्यास, त्यांतून हें सारें कर्ज वारून, सर्व इनाम जमीन, वाडा, तुम्हांस खरेदी देतों. ” असें सांगितलें. त्यावरून कृष्णरावादि पानशांनीं त्यांना रुपये दिले आणि कृष्णाजी माधवराव, जयवंतराव यशवंत, सखाराम यशवंत, विश्वासराव यशवंत, पुरुषोत्तम यशवंत, भिवराव यशवंत व व्यंकटराव केशव पानसे रहाणार सोनोरी यांनीं, शके १६९१ विरोधी नाम संवत्सरे ज्येष्ठ वद्य नवमी बुधवारीं, वरील वतनांचें खरेदीपत्र आपल्या नांवांनीं करून घेतलें. तेव्हांपासून आतांपर्यंत हें वतन या घराण्याकडे सतत चालू आहे. दुसऱ्या एके ठिकाणीं हें खरेदीपत्र या वर्षाच्या विजया दशमीला झाल्याचा उल्लेख आहे. तसेंच आमच्या आढळण्यांत शके १६८५ च्या सुमारचें एक वांटपपत्र आलें, त्यांत या पाटिलकीच्या वतनाचा नामनिर्देश केलेला आहे.

या च वर्षी, पानशांच्या कर्नाटकांतील कामगिरीवर खूष होऊन, श्रीमंत थोरले माधवरावसाहेब पेशवे यांनीं आश्विन वद्य प्रतिपदेस मौजे दिवें येथें आणखी नवीन तीस बिघे जमीन, कृष्णाजी माधवराव व भिवराव यशवंत यांना योगक्षेमार्थ म्हणून इनाम करून दिली ( परिशिष्ट क्रमांक ११ पहा ). पुढें त्याच जमिनीपैकीं पंधरा बिघे जमीन पानसे यांनीं आपले उपाध्ये घोडे यांना दिली. कृष्णाजीपंत व भिवराव यांच्याप्रमाणें कर्नाटकांत मल्हार ( ऊर्फ मलबा ) जगजीवन यांनीं हि सरकारचाकरी उत्कृष्टपणें बजाविली होती. तेव्हां त्यांना हि इनाम देणें आवश्यक झालें होतें; त्यामुळें त्यांना व त्यांचे बंधु शामराव यांना श्रीमंतांनीं दिवें येथें च दुसरी पंधरा बिघे जमीन नवीन इनाम करून दिली, अद्यापि ती त्यांच्या वंशजांकडे चालत आहे ( परिशिष्ट क्रमांक १२ पहा ).

याचवेळीं आणखी एका जुन्या भानगडीचा निकाल पानशांनीं आपल्या तर्फे करून घेतला. मौजे वेलवंडी येथील महाजनकी व औटकी ( आवटीपणाचें वतन ) हीं दोन्ही वतनें पुष्कळ दिवसांपासून पानशांचीं होतीं. मध्यंतरीं सदरचा गांव सगुणाबाई शिंदे यांस इनाम मिळाला. तेव्हां पानशांच्या या वतनी हक्कांना अडथळे उत्पन्न झाले. शिवाय जोंपर्यंत शेतसारा ऐन जिनसी वसूल होत असे, तोंपर्यंत पानशांना औटकीचें उत्पन्न बिन तक्रार मिळत असे. पण, पुढें गांव ( शिंद्यातर्फें ) खंडानें देण्यांत आला. त्यामुळें पानशांना हें औटकीचें उत्पन्न मिळेनासें झालें. त्याची तक्रार पानशांनीं मधून मधून चालविली होती, पण या तक्रारीस त्या वेळीं विशेष यश आलें नाहीं. कर्नाटकांतून परत आल्यानंतर मात्र पानशांनीं या प्रकरणीं जोराची तक्रार केली. तेव्हां श्रीमंत माधवरावसाहेबांनीं सगुणाबाईच्या संमतीनें, या हक्काच्या ऐवजीं, सदर गांवीं रयतेच्या मालकीच्या जामिनीपैकीं नवीन ७२ बिघे जमीन, कृष्णराव व भिवराव यांच्या नांवांनीं इनाम करून दिली. ही जमीन अझूनपर्यंत पानशांच्या घराण्याकडे चालू आहे. या प्रमाणें, हैदरावरील तिसऱ्या स्वारींत पानशांनीं बराच पराक्रम गाजविल्यानें श्रीमंत पेशवे सरकारांनीं त्यांनाही नवीन इनामें करून दिलीं. कृष्णराव, भिवराव व मलबा यांच्या सारखे एकनिष्ठ व स्वामिभक्त सरकार–चाकरींत प्राणांकडे हि न पाहणारे सेवक, जसे त्या वेळीं होते, तसे च, असल्या सेवकांची बूज राखणारे आणि त्यांना मोठ्या योग्यतेस पोहोंचविणारे श्रीमंत थोरल्या माधवरावसाहेबासारखे जाणते धनी हि पण त्या काळीं होते. त्यामुळें पराक्रमाचें चीज चांगलें होऊन वीरवृत्तीस उत्तेजन मिळालें. आतां तो काळ बदलला. सांप्रत तसे चाकर नाहींत व धनी तर नाहींत च नाहींत. हा सर्व या काळाचा महिमा होय.

## ७. हैदरअली व कोल्हापूरकर यांवरील मोहीम.

हैदरावरील या तिसऱ्या स्वारीचें शेंपूट अद्यापि कायम राहिलेंच होतें. पेशवे व पानशांची कांहीं मंडळी परत पुण्यास आली व कर्नाटकांत त्र्यंबकराव मामा पेठे छाव-

णीस राहिले आणि त्यांच्या मदतीस पटवर्धनादि जे सरदार राहिले त्यांत आनंदराव ( कृष्णराव ) माधव पानसे राहिले वगैरे हकीगत वर आली च आहे. त्र्यंबकरावांनीं १६९२ च्या पावसाळ्यांत हि हैदराचा प्रांत काबीज करण्याचा सपाटा चालविला होता. तरीपण तो तह करीना, म्हणून पुण्याहून सरकारांतून आप्पा बळवंत व मल्हारराव पानसे यांना १० हजार स्वार, १५ हजार गारदी व बहुतेक तोफखाना देऊन, पेठे मामांच्या मदतीस पाठविण्यांत आले. श्रीमंत माधवरावसाहेब स्वतः स्वारीवर निघून कांहीं मुक्कामावर गेलेही होते; पण मध्येंच प्रकृति बिघडल्यानें ते परत पुण्यास आले. त्याबद्दल त्यांनीं श्रीमंत गोपिकाबाई साहेबांना एक पत्र लिहिलें आहे. त्यांत लिहिलें आहे कीं, " आप्पा बळवंत मेहेंदळे व मलवा ( मल्हारराव ) पानसे यांना पाठवितों ' ( खरे ऐ. ले. सं. पृ. १७४२ ). त्याप्रमाणें आप्पा बळवंत व मलबा पानसे यांची तिकडे रवानगी झाली. ही रवानगी शके १६९२ च्या पौष शुद्ध त्रयोदशीच्या पूर्वी झाली. कर्नाटकांत आनंदराव ( कृष्णराव ) माधव पानसे हे अगोदरपासून होते च. या आनंदरावांनीं बहुधा एखादा यज्ञ वगैरे केला असला पाहिजे असें दिसतें. कारण, त्यांना वामनराव पटवर्धांनीं आपल्या एका पत्रांत " आनंदराव दीक्षित तोफखाना " असें संबोधिलें आहे ( कित्ता १७५८ ). ही गोष्ट नवीन आढळली असें या वरून समजण्यास हरकत नाहीं. कारण पानसे दप्तरांत अद्यापि ही माहिती लिहिलेली उपलब्ध झाली नाहीं; असो. त्र्यंबकराव मामांनीं या सुमारास हैदरचा जेवढा प्रांत काबीज केला, तेवढा घेतांना ज्या लढाया झाल्या, त्या लढायांत प्रत्यक्ष समरांगणावर आनंदराव ( कृष्णराव ) पानसे हजर होते व त्यांच्या तोफखान्यानें त्या लढायांत उत्कृष्ट कामगिरी हि केली. एकदां तर हैदराची तीस चाळीस हजार फौज एके ठिकाणीं मुक्कामास असतां सखाराम हरि व आनंदराव पानसे यांनीं त्यांच्या थेट लष्करां ( गोटा ) पर्यंत जाऊन कहीं लुटली. उंट, तट्टें व पांच सात हजार बकरीं वळवून आणलीं. ( हैदरच्या ) गोटाच्या आसपास एक कोसाच्या अंतरें भाल्यास पासोड्या बांधोन, त्यामुळें मातबर फौज आली. अशी दिखाई देऊन, आनंदराव तोफखाने व भवानजी जाधव यांस वाट तीट पाहावयास पाठविलें. ( मराठ्यांची ) " फौज मातब्बर असती, तर काम पोख्त झालें असतें. पण, बातमीस तीन शें राऊतांसहित गेल्यासारखें त्यांनीं काम केलें " ( कित्ता १७७२, १७७३ ). म्हणजे, मराठ्यांची ही सारी फौज तीन शें च होती व ती हि हैदराचा तलास काढण्यासाठीं गेली होती; असें असतां सखाराम हरि ( गुप्ते ) व आनंदराव ( पानसे ) यांनीं ही अतिशय बहादूरीची व अत्यंत धाडसाची गोष्ट केली ( शके १६९२ फाल्गुन ). याखेरीज मुरुमकोंडाच्या, ( भाद्रपद ) व मोती तलावाच्या ( फाल्गुन ) लढाईत हि पानशांच्या तोफखान्यानें बरीच महत्त्वाची कामगिरी बजाविली. मोती तलावाच्या लढाईत तर " सरकारच्या तोफा लागू झाल्या तेव्हां हैदर पेचांत च आला " ( कित्ता ). पुण्याहून निघालेले अप्पा बळवंत व मलबा पानसे हे श्रीरंगपट्टण येथें शके १६९३ च्या चैत्रांत जाऊन दाखल झाले व तत्काळ, श्रीरंग

पट्टणास त्र्यंबकराव मामांनीं जो वेढा दिला होता त्यांत ते सामील झाले. पानशांचे "गोळे (हैदरच्या) राजवाड्याजवळ उतरतात" (कित्ता). याप्रमाणें हैदर मका कोंडला गेल्यानें अखेरीस त्र्यंबकरावांनीं सांगितल्याप्रमाणें, तो दातीं तृण धरून मराठ्यांस शरण आला व अखेरीस तह केला. ही त्याच्यावरील तिसरी मोहीम खलास झाली. (त्याच मोहिमेंतील पाईन घाटावरील त्र्यंबकराव मामांच्या स्वारींतसुद्धां पानशांनीं आपली कामगिरी उत्तम प्रकारें बजाविली आहे.).

कर्नाटकांत याप्रमाणें मोहिम चालू असतां, इकडे सातारकर भोसल्यांचे नेहमींचे प्रतिस्पर्धी कोल्हापूरकर यांनीं सातारकरांच्या राज्यांत धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली. शके १६८५।८६ च्या सुमारास पेशवे सरकारांनीं कोल्हापूरकरांपासून चिकोडी व मनोळी हे दोन परगणे घेतले होते. व ते पांच वर्षें आपणाकडे ठेवून पुन्हा कांहीं शर्तींवर त्यांस परत दिले होते. पण, त्या करारांतील अटींप्रमाणें कोल्हापूरकर वागले नाहींत; म्हणून पुन्हा ते परगणे आपल्या ताब्यांत घेण्याचा पेशव्यांनीं निश्चय करून रामचंद्र नाईक परांजपे व भिवराव पानसे यांच्याबरोबर सहा हजार फौज व तोफखाना देऊन त्यांस कोल्हापूरकरांवर शके १६९२ कार्तिक शुद्धांत पाठविलें. शिवाय वरील सरदारांच्या कुमकेस म्हणून, नरसिंगराव धायपुडे व अक्कलकोटकर भोसले हे धारवाडास होते, त्यांना हि त्यास जाऊन मिळण्याची आज्ञा केली. त्या आज्ञेप्रमाणें ते त्यांना येडूर मांजरी या ठिकाणीं जाऊन मिळाले. नंतर या सर्व फौजा मिळून त्यांनीं चिकोडी तालुक्यांतील कोल्हापूरकरांचीं सर्व ठाणीं काबीज केलीं आणि भोज, कागल हीं मातब्बर ठाणीं हि घेऊन कोल्हापुराजवळ येऊन तळ दिला. तेव्हां निरुपाय होऊन कोल्हापूरकरांनीं चिकोडी व मनोळी या दोन्ही परगण्यांच्या सोडचिठ्या देऊन, स्वारीखर्चासाठीं एक लक्ष दहा हजार रुपये दिले व पेशव्यांशीं तह केला. हा जय घेऊन पानसे व परांजपे हे पुण्यास परत आले. या स्वारींत, कर्नाटकांत मुतलाबी येथें (मागें सांगितल्याप्रमाणें) छावणीसाठीं जो तोफखाना ठेविला होता तो भिवरावांनीं आणविला होता. मुख्यतः त्याचेच सामर्थ्यावर कोल्हापूरकरांचा लवकर पाडाव करतां आला.

वरील कर्नाटकाच्या मोहिमेंत पानशांच्या संबंधीचा आणखी एक प्रसंग घडला, तो, येथें सांगण्यासारखा आहे. "मोती तलावा" ची लढाई झाल्यानंतर त्र्यंबकराव मामांनीं मेळकोटे या हैदरच्या मजबूत ठाण्यावर हल्ला करून, तें ठाणें काबीज केलें. या हल्ल्यांत आनंदराव माधव वगैरे पानसे मंडळी होती. ठाणें पडल्यावर मराठ्यांच्या सैन्यांतील बाजारबुणग्यांनीं तें गांव लुटलें. हें गांव विशिष्टाद्वैत मताचें मूळ स्थान असल्यानें, तेथें त्या पंथाचे गुरु रामानुजाचार्य राहात होते. येथें विष्णूचें एक पुरातन देवस्थान आहे, त्याला तिकडे चिलपिल्लराय असें म्हणत. बाजारबुणग्यांनीं हें देऊळ लुटलें व त्याची मोडतोड केली. या सुमारास या देवळांतील एक लक्ष्मीनारायणाची

मूर्ति आनंदराव पानसे यांनीं मिळविली आणि देवळांतील चंदनाचे खांब हि घेतले. या मूर्तीची स्थापना, पानशांनीं, परत आल्यानंतर आपल्या सोनोरी गांवीं केली. मूर्ति वॅ चंदनी कोरीव खांब ( सहा ) कर्नाटकांतून आणल्याची गोष्ट पानसे घराण्यांत अद्यापि प्रचलित आहे व ती मूर्ति आणि पानशांनीं बांधिलेला मल्हारगड किल्ला हीं श्रीमंत थोरले माधवरावसाहेब सोनोरीस आले त्यावेळीं त्यांचे पाहण्यांत आलीं व त्यांनीं तीं पाहून, बहुत आनंदित होऊन देवास एक गांव इनाम देण्याचे कबूल केलें. परंतु, श्रीमंत सोनोरीहून परत गेल्यानंतर थोड्याच दिवसांत निवर्तल्यामुळें गांव ( वनपुरी ) मिळावयाचा तो तसाच राहिला. मूर्ति कधीं आली व तिची स्थापना कधीं केली याचा नक्की शक अद्यापपर्यंत आम्हांस आढळला नाहीं. तथापि, वरील सर्व बाबी लक्ष्यांत घेतल्या, म्हणजे आम्हीं वर दिल्याप्रमाणें, मूर्ति मेलकोट्याहून आणली व लगेच तिची स्थापना सोनोरीस झाली असें स्पष्ट दिसतें. ही मूर्ति फार च सुंदर असून, शुभ्र व अतिशय स्वच्छ अशा पाषाणाची आहे. भगवान् विष्णु हे शेषावरील गरुडावर बसले असून त्यांच्या वामांगीं लक्ष्मी आहे. भगवंताच्या चार हि हातांत, शंख, चक्र, गदा व पद्म हीं त्यांचीं आयुधें असून चेहऱ्यावर मंद स्मित झळकत आहे. मूर्तीची उंची साधारण मनुष्या येवढी असून, तो एक सबंध च पाषाण आहे. श्रींच्या खर्चाबद्दल, सरकारनें, मौजे वनपुरी तर्फ कऱ्हेपठार हा गांव, पूर्वी वज्रगडाकडे सरंजामास होता तो तिकडून काढून पानशांना इनाम दिला. ( शके १६९७ फाल्गुन शुद्ध एकादशी, परिशिष्ट क्रमांक १३ पहा. ) तो अद्यापि देवस्थानाकडे चालत आहे.

या प्रसंगास कांहीं दिवस लोटल्यावर मराठी राज्यास धक्का देणारी अशी एक गोष्ट घडली, ती म्हणजे श्रीमंत थोरले माधवरावसाहेब पेशवे यांचें निधन ही होय. हैदरावरील मोहिमेचा शेवटचा निकाल लावण्यासाठीं म्हणून श्रीमंत पुण्याहून शके १६९३ मध्यें निघाले, पण मध्यें च दुखणें जास्त झाल्यामुळें, ते परत पुण्यास आले. श्रीमंतांची प्रकृति गेल्या एक दीड वर्षापासून बरीच बिघडली होती व औषधोपचार सुरू च होते. शेवटीं वैद्यांनीं निदान केलें कीं श्रीमंतांना राजयक्ष्मा झाला. तेव्हां श्रीमंतांनीं आपलें उपास्य दैवत जें गणपति त्याच्या पायांजवळ निरंतर राहण्यास सांपडावें, म्हणून, श्री क्षेत्र थेऊर येथें येऊन वास्तव्य केलें. त्या वेळचे प्रसिद्ध वैद्य गंगा विष्णु रणछोड व रूपेश्वर बावा यांनीं या रोगावर बरेच औषधोपचार चालविले होते, परंतु, ते सर्व व्यर्थ झाले. शके १६९४ च्या श्रावणापासून प्रकृति फार बिघडली. तेव्हां तेथें च राज्यकारभाराचीं कामें होऊं लागलीं. आणि राज्यांतील निरनिराळ्या ठिकाणीं असलेली विश्वासांतील मंडळी हि जमा झाली. या मंडळींत त्र्यंबकराव मामा पेठे, नाना व मोरोबा फडणीस, सखाराम बापू, रास्ते, बारामतीकर, पांच पटवर्धन, काळे, पाटणकर वगैरे व्यक्ति होत्या. त्यांत च आनंदराव ( कृष्णराव ) व मलबा पानसे हे हि हजर होते. पानशांवर श्रीमंतांची मर्जी चांगली होती. श्रीमंतांनीं या वेळीं सरदारांना, मुत्सद्यांना इतकें च नव्हे तर कारकून, खिजमतगार यांना हि कोणास कांहीं, कोणास कांहीं

( म्हणजे इनामें, बक्षिसें वगैरे ) देऊन सर्वांना संतोषित केलें व आपल्या पश्चात् राज्यकारभार कसा करावयाचा तें हि सर्वानुमतें ठरविलें. मलवावर श्रीमंतांची इतकी मर्जी होती कीं, " या दुखण्यांत राज्यकारभाराच्या महत्त्वाच्या कागदपत्रांवर जेथें खुद्द श्रीमंतांच्या मखलाशा ( मंजुरीचे शेरे ) व्हावयाच्या असत तेथें त्या श्री. नारायणरावसाहेब यांच्या हातून करवून वरकड ( सर्व काम ) राजश्री मलबा पानसे व ( महादाजीपंत ) गुरुजी यांजकडून करावितात. " ( खरे ऐ. ले. सं. पृ. १९०२ ). कार्तिक शुद्ध द्वादशीस श्रीमंतांनीं सर्व प्रायश्चित घेतलें. कार्तिक वद्य अष्टमी बुधवारीं तोंडानें " गजानन, गजानन " असें म्हणत म्हणत श्रीमंत कैलासवासी झाले !

या वरील प्रसंगापूर्वी पानशांनीं मौजे सावरदरी ( तालुका खेड जि. पुणें ) येथें एक व्यापारी पेठ बसविली ( शके १६८५ ) तेव्हां सरकारनें, त्या पेठेंत व्यापारी, उदमी वगैरे लोकांनीं येऊन व्यापार सुरू करावा, दुकानें घालावीं, या बाबद त्यांच्यापासून सरकार नेहमीं जो कर घेई तो पांच वर्षे माफ केला ( परिशिष्ट क्रमांक १४ पहा ).

जेजुरी येथील गांवचें व यालेचें शेटेपण, मानपान, इनाम जमीन व वाडा वगैरे पूर्वीपासून धनवडे यांचा होता. शके १६९३ च्या सुमारास या घराण्यांत हैबती वीन खंडोजी धनवडे म्हणून एक पुरुष झाला. त्याच्याशीं वाद घालण्यासाठीं या वेळीं दुसरा एक प्रतिस्पर्धी उभा राहिला. त्या भांडणांत हैबतीस फार खर्च आला, तो त्याच्या आहाराच्या बाहेर गेल्यानें त्यानें आपलें निम्में वतन शके १६९३ वैशाख शुद्ध त्रयोदशीस, लक्ष्मण चिंतामण धडफळे, पाषाण गांवचे पाटील यांस पांच शें रुपयांस विकलें. पुढें, म्हणजे शके १६९५ विजयनाम संवत्सरे आषाढ शुद्ध दशमीस धडफळे यांनीं तें निम्में वतन, कृष्णाजी माधवराव, भिवराव यशवंत, सखाराम यशवंत, विश्वासराव यशवंत, पुरुषोत्तम यशवंत व व्यंकटराव केशव पानसे यांस पंधरा शें रुपयांस विकत दिलें. त्यांत शेटेपणाच्या अर्ध्या वतनाच्या वृत्तीखेरीज, इनामी अर्धी जमीन ३७॥ बिघे होती. मानापमानांत, शिराळ शेटाच्या दिवशीं शिरपाव, चांभाराकडून दरसाल एक जोडा, लग्नाच्या वेळीं प्रथम गंध लावण्याचा व विडा घेण्याचा वगैरे मान होते. गेल्या पन्नास वर्षांखालीं पानशांनीं ही वृत्ति विकून टाकिली; सध्यां पानशांकडे हें वतन व मानपान राहिलें नाहींत.

## ८. बारभाईप्रकरण.

श्रीमंत नारायणरावसाहेब पेशवे यांची राजवटी थोडी झाली तींत पानशांनीं काय कामगिरी केली त्याचा स्पष्ट उल्लेख अद्यापपर्यंत आम्हांस कोठें आढळला नाहीं म्हणून ती माहिती येथें दिली नाहीं. तथापि कोठें कोठें सधून थोडे फार उल्लेख आढळतात ते असेः–श्रीमंतांच्या वधानंतर कट कोणीं व कां केला वगैरेची गुप्त चौकशी सुरू झाली. त्या वेळीं वध करणारांपैकीं एक तुळया पवार याची जबानी घेतली असतां, त्यानें

सांगितलें कीं, "महंम्द यूसफ नांवाचा गारदी हा सुमेरसिंगाचा परम स्नेही होता. तो या कटांत होता व त्यानें माझें मन वळवून मला कटांत गोविलें. कटांत सर्व मिळून सतरा माणसें प्रमुख होतीं व त्यांत च "तोफखाना आमचे कडेस आहे" असें सांगणारा एक मनुष्य होता." यावरून सकृद्दर्शनीं असें दिसतें कीं, तोफखानेवाले पानशांपैकीं कोणी तरी या कटांत असावा. परंतु, त्यास प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष असा कसलाच पुरावा मिळत नाहीं. शिवाय, येथें हेंहि लक्षांत घ्यावयास पाहिजे कीं, मूळ कट जो झाला तो श्रीनारायणरावसाहेब यांस धरून कैदेंत ठेवावें व श्रीमंत दादासाहेब यांस गादीवर बसवावें, या दोन गोष्टी साधण्यासाठींच झाला; आणि मूळ कटांत भवानराव प्रतिनिधि, मोरोबादादा फडणीस, सदाशिव रामचंद्र, चिंतो विठ्ठल वगैरे मोठे सरदार व खुद्द श्रीमंत दादासाहेब हे होते; पण, श्रीमंतांना मारावें असा जो कट नवीन उत्पन्न झाला, तो निराळ्याच लोकांचा असून तो आयत्या वेळीं व अत्यंत गुप्तपणें उभारला गेला आणि त्यांची दखलगिरी वर सांगितलेल्या मंडळीला नव्हती. एवढें च नव्हे तर खुद्द श्रीमंत दादासाहेबांना हि नव्हती. हा दुसरा कट बायका, आणि दुष्ट व मतलबी लोक यांचा असावा. महंमद यूसफ वगैरेंची बारीक चौकशी करून हरिपंत तात्या फडके यांनीं नाना ( फडणिसां ) ना जी हकीकत सादर केली त्यांत त्यांनीं आपलें असें च मत प्रदर्शित केलें आहे. मोरोबा दादा यांच्या सतराशें पुतळ्या व सदाशिव रामचंद्र यांजकडील एक हजार मोहरा कटवाल्या पुढारी मंडळीकडे आल्या होत्या, त्यांचा विनियोग गारद्यांना अनुकूल करून घेण्याकडे झाला होता असें शाबित झालें. सारांश, मोठा कट ( म्हणजे "श्रीमंतांना धरावें" हा ) निराळा व धाकटा कट ( म्हणजे "श्रीमंतांना मारावें" हा ) निखालस निराळा होता. पुढें म्हणजे श्री. दादासाहेब गादीवर आल्या वेळीं त्यांच्या फौजेंत मल्हारराव ऊर्फ मलबा पानसे हे होते असें आढळतें: पण इतर मंडळीप्रमाणें ते बाह्यात्कारी होते. त्या वरून एवढेंच फार तर ठरेल कीं, मोठ्या कटांत ज्याप्रमाणें ( वर नांवें सांगितलेली ) कांहीं मंडळी होती, त्याप्रमाणें कदाचित् मल्हारराव हे ही एक असतील. धाकट्या कटाशीं त्यांचा किंवा दुसऱ्या कोणत्या हि पानशांचा निश्चयें करून बिलकूल संबंध नव्हता, व तसा दुरून वास येण्याजोगा यत्किंचित् हि पुरावा आढळत नाहीं, असो. श्रीमंतांचा वध शके १६९५ भाद्रपद शुद्ध त्रयोदशीस झाला. फाजल व खरकसिंग या दोन गारद्यांच्या इष्टेटी पुढें सरकार जमा करण्यांत आल्या, हें काम भिवराव पानशाकडे सोंपविण्यांत आलें होतें. अर्थात् या गोष्टीवरून हि आमच्या वरील म्हणण्यास आधार मिळतो. शिवाय श्रीमंतांच्या वधानंतर तमाम मुत्सद्दी कोतवाल चावडीवर जमा होऊन पुढें काय करावें याबद्दल विचार करूं लागले. तेव्हां भिवराव पानसे यांनीं तोफखान्यांतून शिड्या व तोफा शनवार वाड्याजवळ आणून तटास शिड्या लावल्या व वाड्याचा तट तोफांनीं उडवून देऊन आंतील गारदी पकडण्याचा मनसुबा केला. पण वाड्यांत पार्वतीबाईसाहेब, गंगाबाईसाहेब, सगुणाबाईसाहेब वगैरे खाशी मंडळी असल्यानें

तोफा डागूं नका असा सल्ला मुत्सद्यांनीं दिला. या कारणामुळें पानसे यांनीं तोफा परत काढून घेतल्या. यावरून स्पष्ट दिसतें कीं पानसे मंडळींचा या कटांत बिल्कूल संबंध नव्हता.

श्री. दादासाहेब गादीवर आल्यानंतर कांहीं दिवसांनीं " बारभाईचें कारस्थान " उभारलें गेलें. या कारस्थानाचे मुख्य सूत्रचालक बापू व नाना हे असून, त्यांना मोरोबा फडणीस, त्र्यंबकराव मामा, हरिपंत फडके, रास्ते, पटवर्धन, धायगुडे, कृष्णराव काळे, नारो आप्पाजी, बाबूजी नाईक, भिवराव पानसे व मल्हारराव पानसे यांची मदत होती. कारस्थानांत असें ठरलें कीं, श्री. मातुश्री गंगाबाईसाहेब राज्याच्या मालक, बापू मुख्य कारभारी, नाना दुय्यम कारभारी व त्र्यंबकराव मामा मुख्य सेनापति असे व्हावें आणि श्री. दादासाहेब यांना पदच्युत करावें. ही मसलत सिद्धीस जाण्यासाठीं प्रथम दादासाहेबांना पुण्याहून दूर काढणें जरूर होतें. त्याच सुमारास निझामानें मराठी राज्याविरुद्ध खटपटी चालविल्यामुळें दादासाहेबांनीं प्रथम त्याच्यावर स्वारी करण्याची तयारी केली. ते बरोबर बरीच फौज घेऊन तिकडे निघाले. अर्थात् बारभाईना पाहिजे होती ती संधि यामुळें आपोआपच लाभली. दादासाहेबांबरोबर जी सरदार मंडळी होती, तींत नाना, बापू, विनिवाले, त्र्यंबकराव मामा, आप्पा बळवंत, भवानराव प्रतिनिधि वगैरे सरदार असून भिवराव पानसे हि होते. निझामाच्या प्रदेशाची नासाडी करून दादासाहेबांनीं खुद्द निझामास बेदरच्या किल्ल्यांत कोंडले, तेव्हां निरुपायानें तो शरण आला; हे काम आटोपून दादासाहेब हे दक्षिणेंत हैदराकडे वळले. त्या दरम्यान बापू, नाना, मोरोबा, हरिपंत तात्या हे कांहीं ना कांहीं तरी एकेक सबब सांगून श्रीमंतांच्या फौजेंतून निसटून परत पुण्यास आले आणि प्रसिद्ध अशा " बारभाईच्या कारस्थानास " त्यांनीं हात घातला. नारो आप्पाजीनें पुणें शहर ताब्यांत घेतलें व श्री. मातुश्री गंगाबाईसाहेब व श्री. मातुश्री पार्वतीबाईसाहेब यांना पुरंदर किल्ल्यावर नेऊन ठेविलें; दादासाहेबांच्या पक्षपाती लोकांच्या घरादारांच्या जप्त्या केल्या. नाना व बापू यांनीं छत्रपतींकडून दादासाहेब यांना पदच्युत करविलें आणि पेशवाईचीं वस्त्रें श्री. गंगाबाई साहेबांच्या नांवें व कारभाराचीं वस्त्रें आपल्या नांवें आणविलीं. निझाम ( अल्ली ) यास व साबाजी भोसल्यास त्यांनीं आपल्याकडे ओढलें.

याप्रमाणें कारस्थान रंगतां च कारभाऱ्यांनीं दादासाहेबांस बंडखोर ठरविलें. हें वर्तमान दादासाहेबांस समजल्यावर त्यांचे डोळे उघडले; पण ते फार उशिरा उघडले. त्यांनीं लगेच हैदरावरील स्वारी सोडून आपला मोर्चा पुण्याकडे फिरविला. त्यांनीं या स्वारीपूर्वीं जी फौज जमा केली होती, त्या " फौजेचा कारभार सखाराम हरि, मलबा पानसे व बाजीपंत अण्णा या त्रिवर्गास सांगितला " होता ( ऐ. ले. सं. पृ. २०३९ ). यावरून असें वाटतें कीं, सखाराम हरि व बाजीपंत अण्णा यांच्या

प्रमाणें च मलबा पानसे हे दादासाहेबांच्या मर्जीतील असावेत. पुन्हा, एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, "फौजेच्या बोलाचालीचा अखत्यार राजश्री सखाराम हरि वर आहे. राजश्री मलबा हि उगी च जवळ असतात" (कित्ता २०५३). निझामावर जाण्यापूर्वीं इंग्रजांनीं "घाटाखालीं वसई वगैरे प्रांतीं उपद्रव करावयाचा मनसुबा केला आहे, याज करितां कांहीं फौज व गारदी सामान देऊन राजश्री मलबा पानसे यास पाठविणार आहेत" (कित्ता २०५८). मलबा यांस अशा कामगिरीवर पाठविण्याच्या योजनेवरून ते मनापासून कोणाकडे असावेत हें नीट समजतें. वाहेरून जरी दादासाहेबाकडे त्यांचें बसणें उठणें असे तरी त्यांचा ओढा बाराभाईकडे होता. हें यावरून सिद्ध होतें. ही गोष्ट शके १६९५ च्या आश्विनांतील होती. निझामावरील स्वारींत पानसे मंडळी होती. या सालच्या कार्तिकांत तोफखाना वाटेंत च येऊन मिळाला. बारभाईचें कारस्थान उभारतांना सखाराम बापूंनीं पटवर्धनाच्या वकिलास सांगितलें होतें कीं, "देशस्थ मंडळी हि सर्व आमच्या लगामीं च आहेत" (कित्ता २०८९). यावरून पानसे मंडळी बारभाईना अनुकूल होती हें उघड दिसतें. निझामास बेदर किल्ल्यांत कोंडल्याचें वृत्त वर आलें च आहे. त्या वेळीं पेशव्यांकडे दोन शें तोफा होत्या व मुख्यतः या तोफांच्या जबर माऱ्यानें च निझाम त्या वेळीं शरण आला.

पूर्वीं सांगितल्याप्रमाणें बारभाईनीं दादासाहेबांवर फौज पाठविण्याचें ठरवून त्र्यंबकराव मामास सेनापति नेमिलें. मामांनीं, भोसले, निझाम वगैरेंना मिळवून दादासाहेबाकडे रोख वळविला. या सर्व गोष्टी दादासाहेबांना समजल्यावर त्यांनीं हैदरावरील स्वारी तशी च सोडून आपला हि रोख मामांच्या बाजूस फिरविला. त्या वेळेस राजश्री भिवराव पानसे दिमत तोफखाना व गोपाळ नाईक तांबेकर यांस, संधानासाठीं श्रीमंतांनीं रवाना केलें. इकडे दादांच्या सैन्यांत असलेले पटवर्धनादि जे सरदार बारभाईना मिळाले होते, त्यांना नाइलाज जाणून सामोपचारानें कांहीं तरी निमित्तानें दादासाहेबांनीं देशीं परत लावून दिलें. पुढें दादासाहेब व बारभाईचे सेनापति त्र्यंबकराव मामा यांची लढाई पंढरपूरनजीक कासेगांव गोपाळपुरावर झाली. तींत मामा जखमी होऊन शत्रूचे हातांत सांपडले, ते दुसरे दिवशीं वारले. लढाई सुरू होण्यापूर्वीं दादांनीं कृष्णराव पानसे तोफखान्यांच्या नांवची चिठ्ठी पाठविली कीं, "संधान केल्यास उभय पक्षीं बरें." परंतु समेटाचीं बोलणीं सुरू होण्यापूर्वीं च लढाईस तोंड लागलें. मामा हातीं सांपडल्यामुळें दादासाहेबांस हुरूप आला. पुढें मामांच्या जागेवर हरिपंत तात्या नेमले गेले व त्यांनीं दादांचा सारखा पिच्छा पुरविला. तात्यांच्या बरोबर निझाम व भोसले होते च. इतक्यांत श्रीमंत सवाई माधवरावसाहेब यांचा जन्म झाला (शके १६९६ अधिक वैशाख शुद्ध सप्तमी). तेव्हां दादासाहेबांनीं समेटाचें बोलणें लाविलें.

तथापि, दादांच्या इतर खटपटी व कारस्थानें आंतून सुरू च होती. अखेर,

समेटाचें फिसकटलें व इंग्रजांची मदत घेण्यास दादा गुजराथेकडे वळले. अर्थात् सरकारी फौज हरिपंतांच्या हातांखालीं होती. ती हि त्यांच्या पाठीवर निघाली (शके १६९६ पौष). या फौजेंत पटवर्धन, रास्ते, पानसे व हुजरात यांची फौज मुख्य होती आणि मुख्यतः या च फौजेच्या बळावर हरिपंतांनीं इंग्रज व दादासाहेब यांना तोंड देऊन त्यांचा पराभव केला. दादांचा साथी गोविंदराव गायकवाड नडियादकडे पळाला होता त्याचे वर हरिपंत तात्यांनीं, आप्पा बळवंत, आनंदराव गोपाळ, मलबा पानसे यांना रवाना केलें. ही गोष्ट शके १६९६ च्या फाल्गुनांत झाली. यावरून, या वेळीं मलबा हे सर्वस्वीं बारभाईंच्या बाजूस होते हें स्पष्ट ठरतें. तिकडे महीच्या कांठीं तात्यांनीं दादासाहेबांचा चांगलाच मोड केला (माघ वद्य २). तेव्हां भटकत भटकत दादासाहेब सुरतेस गेले. तेथें इंग्रजांनीं दादापासून आपल्या फायद्याचे असे बरेच करार करून घेऊन, त्यांचे मदतीस कर्नल कीटिंग व त्याच्या हाताखालीं तीन हजार फौज व पंधरा वीस तोफा कायमच्या दिल्या.

कीटिंग याची इच्छा, मराठ्यांनीं आपल्यास बिलगावें व मग आपण तोफांनीं त्यांना भाजून काढावें अशी होती. पण तात्या फार धूर्त होते. आपलीं माणसें त्यांना विनाकारण मारावयाचीं नव्हतीं, म्हणून ते सहसा कीटिंगच्या फौजेवर हल्ले न चढवितां हटकून दादांच्या फौजेशीं बिलगत असत. पण त्याचा अर्थ भलता च करून कीटिंग यानें फुशारकी मारली कीं, तात्या आपल्यास भितात. पण ही त्याची घमेंड शके १६९७ वैशाख वद्य चतुर्थीस तात्यांनीं चांगली च जिरविली. दादा व कीटिंग हे या दिवशीं नापार येथून कूच करून निघाले. एक कोस जातात, न जातात, तों त्यांच्या पिछाडीवर एका झाडींतून तोफखान्याचा भडीमार सुरू झाला. त्यावर मराठ्यांनीं जोराचा हल्ला करून थेट इंग्रजांचें गोरें लष्कर होतें, तेथपर्यंत मारामार करून इंग्रजी-फौज कापून काढली व त्यांच्या दोन तोफा फोडून टाकिल्या. या लढाईत मराठ्यांनीं गोरे आफिसर व सोजीर तीनशेंपर्यंत कापून काढले. दादांच्या कडील हि पुष्कळ माणसें मारलीं गेलीं व बरींच जखमी झालीं. तात्या कडील राजश्री जयवंतराव पानसे यांस गोळी लागली. "इजा फार आहे. खैर होईलसें वाटतें" (कित्ता २३१९). सारांश इंग्रजांचा रेंच चांगला च मोडला. या नंतर पावसाळा सुरू झाल्यामुळें मलबा पानसे सोनगडास छावणी देऊन राहिले.

बारभाई यांचेवर वरील संकट आलें असतां इकडे त्यांचे शत्रु करवीरकर, कित्तुरकर, हैदर वगैरे सर्वांनीं च एकदम उचल केली. तेव्हां कोल्हापूरकरावर कोन्हेरराव पटवर्धन यांस प्रथम पाठविलें व त्यांच्या मदतीस कृष्णराव पानसे याजबरोबर तोफा देऊन त्यांस तिकडे रवाना केलें. अनेक अडचणीमुळें ही मोहीम फायदेशीर रीतीनें पार पडली नाहीं. कृष्णरावांनीं तोफांच्या माऱ्यांनीं या वेळीं कित्तूरकरांचें बंड पार मोडून टाकलें. इंग्रजांनीं या खळबळींत आपला कांहीं च फायदा होत नाहीं असें पाहून पुरंदर येथें शके १६९७ फाल्गुनांत बारभाईंशीं तह केला.

कोल्हापूरकरांनीं पुन्हा शके १६९८ च्या पौषांत दंगल चालविली, व चिकोडीचें ठाणें घेऊन मनोळीवर स्वारी केली. तेव्हां रामचंद्र गणेश व कृष्णराव पानसे यांना पेशवे सरकारांनीं त्यांच्या समाचाराकरितां पाठविलें. वडगांवाजवळ उभय पक्षांत लढाई होऊन करवीरकरांचा माघ वद्य सप्तमीस मोड झाला व पेशव्यांच्या सैन्यास बरीच लूट सांपडली. तेव्हां कोल्हापूरकर महाराज पन्हाळ्यास पळून गेले. नंतर पेशव्यांच्या सैन्यांनीं एकदम कोल्हापुरास जाऊन शहरास वेढा दिला. दोन दिवस कृष्णराव पानशांनीं तोफांचा जबर मारा करून, शहरांतील आदितवार पेठ लुटली. तेथें शंकराचार्यांचा एक मठ होता, त्यांत पुष्कळ ब्राह्मण आपलें वित्त घेऊन राहिले होते. लष्करचे पेंढारी मठाच्या आसपास गेल्यावर, मठांतून त्यांच्यावर गोळ्या आल्या. तें निमित्त ठेवून, पेंढाऱ्यांनीं मठांत शिरून दरोबस्त मठ लुटला. पुढें गांवांतील ब्राह्मणांच्या विनंतीस मान देऊन कृष्णरावांनीं तोफा बंद केल्या व ते कागलाकडे वळले. नंतर कागल, चिकोडी, एकसंबें, भोज वगैरे ठाणीं कृष्णराव पानसे यांनीं काबीज केलीं.

कोल्हापूरच्या वरील लुटींत, शंकराचार्यांचें एक पाचेचें चंद्रमौळीश्वराचें नित्य पूजेचें लिंग होतें, तें पटवर्धनांस मिळालें. हल्लीं, तें जमखिंडीकरांकडे आहे. तसेंच एक गोपाळकृष्णाची मूर्ति कृष्णराव पानसे यांना सांपडली. ती सांप्रत, गणपतराव दामोदर पानसे ( कलेक्टर ) यांच्या देव्हाऱ्यांत आहे. ही मूर्ति या घराण्यांत कोल्हापूरच्या वरील लुटींत मिळाली अशी आख्यायिका वृद्धमुखांतून परंपरेनें चालत आलेली आहे.



[library stamp]

# प्रकरण पांचवें.

## १. भिवराव यांची तोतयावर रवानगी.

श्री. दादासाहेबांनीं पुरंदरच्या तहांत स्वस्थ बसावयाचें कबूल केलें होतें, आणि इंग्रजांनीं हि त्यांना आश्रय देऊं नये असें ठरलें होतें. परंतु, आपण "बारभाईच्या" हातीं सांपडलों तर ते आपला जीव घेतील असा दादांनीं बहाणा केला. इंग्रजांना हि दादासाहेब आपल्या बगलेंत पाहिजे च होते; म्हणून त्यांनीं त्यांना सुरतेंत दोन शें लोकांनिशीं ठेवून घेतलें. तेथें राहून स्वस्थ वाटेना, म्हणून सुरतेजवळ अश्विनीकुमार येथें स्नानास जातों असा बहाणा करून, दादासाहेब बाहेर पडले ते थेट दमण येथें पोर्तुगीजांकडे आश्रयार्थ आले. आतां, इंग्रजांची आपल्याला उघड उघड मदत मिळणें कठिण, असें जाणून दमणास आल्यावर त्यांनीं तेथील अधिकाऱ्यामार्फत गोंव्याच्या गव्हर्नराशीं बोलणें लाविलें कीं, आम्हांस तुमच्या मुलुखांत जागा द्या, नाहीं तर, जळमार्गें हैदराकडे पोहोंचवून द्या. ही बातमी पुण्यास कळतांच बारभाईनीं, पुण्यास असलेल्या फिरंग्यांच्या वकिलास तंबी दिली. त्यानें गोंव्यास ही हकीकत कळविल्यावरून, तेथील गव्हर्नरनें दादासाहेबांस साफ कळविलें कीं, परवडत असेल तर, तुम्हीं फक्त पंचवीस माणसांनिशीं दमणच्या किल्ल्यांत राहावें. या व्यतिरिक्त आम्ही तुम्हांस कोणती हि मदत करण्यास तयार नाहीं. हें ऐकून श्रीमंत निराश होऊन परत मुंबईस येऊन तेथेंच राहिले; आणि त्यांचे दत्तक पुत्र अमृतराव हे दोन तीन हजार फौज, इतर लवाजमा व तोफा घेऊन तारापुरच्या ठाण्यांत आश्रयास राहिले. त्यांची उपेक्षा करणें धोक्याचें असल्यामुळें त्यांच्या बंदोबस्तास बारभाईंनीं भिवराव पानसे हे या वेळीं तोतयाचें प्रकरण आटोपून मोकळे झाले होते त्यांची तिकडे रवानगी केली (शके १६९८ कार्तिक). परंतु, भिवराव येत आहेत असें ऐकून, ते येण्यापूर्वींच अमृतराव हे सडे तारापुराहून निघून मुंबईस जाऊन राहिले. त्यांची फौज व तोफा वगैरे सर्व सामान तारापुरच्या ठाण्यांत होतें, तें भिवरावांनीं तारापुरास वेढा घालून आपले स्वाधीन करून घेतलें (मार्गशीर्ष) व बेलापुराजवळ येऊन तळ दिला (खरे ऐ. ले. सं. २७३४).

या पूर्वींच तोतयाचें प्रकरण उद्भवलें होतें. श्री. सदाशिवराव भाऊसाहेब पानपतावर मृत्यु पावले ही गोष्ट खरी असतां, कांहीं दिवसांनीं, एका छलपुराकडील कनोजानें कांहीं मराठ्यांच्या साहाय्यानें आपण च भाऊसाहेब आहोंत म्हणून जाहीर केलें आणि फौज जमा करण्यास प्रारंभ केला. या कनोजाचें नांव सुखलाल असें असून, त्याच्या व भाऊसाहेबांच्या चेहऱ्यांत बरेंच साम्य होतें. असल्या खुळास केव्हां हि

थोडी फार मदत मिळते, व त्याप्रमाणें कांहीं सरदार मंडळी तोतयाला मिळाली. या तोतयाची हकीकत इतिहासज्ञांना माहीत आहेच. थोरल्या माधवरावसाहेबांनीं त्याला पकडून बंदींत ठेविलें होतें. त्याची रवानगी या किल्ल्यावरून त्या किल्ल्यावर अशी होत असे. शके १६९८ च्या वैशाखाच्या सुमारास तोतया रत्नागिरीच्या किल्ल्यांत अटकेंत होता. या वेळीं रत्नागिरीचा सुभा रामचंद्र नाईक परांजपे या सावकाराकडे होता. नाईक हा तोतयास फितुर होऊन त्यानें तोतयाला कैदेंतून सोडलें व त्याच्या नांवाची द्वाही फिरविली. पुढें तोतयानें हजारों सैनिक जमविले आणि कोंकण प्रांत काबीज करण्याचा सपाटा लाविला ( ज्येष्ठ ). विजयदुर्ग व देवगड हे किल्ले त्याच्या स्वाधीन झाले, एवढेंच नाहीं तर पेशवे सरकारांचें आरमार, धुळप या सरदारांकडे होतें, तें हि त्या सरदारानें तोतयाच्या हवालीं केलें. त्यामुळें त्याला बळ येऊन त्यानें अंजनवेल व गोवळकोट हे दोन किल्ले घेतले. या प्रमाणें तोतया " शेणाचा होता, तो लोखंडाचा झाला. " यामुळें, कारभाऱ्यांना त्याच्याकडे लक्ष देणें जरूर झालें. त्यांनीं एका सरदारास दोन हजार गारद्यांनिशीं त्याच्यावर पाठविलें. हीं फौज अंजनवेलीच्या जवळ गेली व लढाईस तोंड लागणार तोंच आयत्या वेळीं ते गारदी कोंकणचे राहणारे असल्यानें, फितूर होऊन उलट तोतयासच मिळाले. तेव्हां तो सरदार व त्याचे कांहीं आरब तेवढे निसटून घांट चढून प्रतापगडच्या आश्रयास आले. नंतर, तोतयानें सुवर्णदुर्गावर स्वारी केली. हा किल्ला हरिपंत फडक्यांच्या पुतण्याकडे होता. तोतयानें किल्ला घेऊन फडक्यांस कैदेंत ठेविलें आणि अंबा घांट चढून मलकापूर हि घेतलें. त्यानंतर त्यानें बहुतेक उत्तर कोंकण हस्तगत केलें, तेव्हां तिकडील माणकर, सुर्वे वगैरे कित्येक सरदार हि त्याला मिळाले. या पूर्वींच हरबा अण्णा पटवर्धन, व्यंकटराव घोरपडे इचलकरंजीकर इत्यादि वजनदार सरदार त्याला सामील झाले होते. इंग्रज, करवीरकर व हैदर यांनीं त्याला उत्तेजन दिलें होतें तें निराळेंच. या सर्व कारणांनीं त्याला जोर येऊन, जवळच्या वीस हजार फौजेनिशीं, तोतयानें बोरघांट चढून राजमाची हि घेतली. सिंहगडचा किल्लेदारसुद्धां या वेळीं त्याला अनुकूल होण्याचा रंग दिसूं लागला ( आश्विन ).

इतकें झाल्यामुळें, आतां यापुढें तोतयाची उपेक्षा करणें अशक्य झालें म्हणून बारभाईंनीं भिवराव पानसे यांना हाताखालीं दोन हजार पायदळ व तोफा देऊन त्याच्यावर पाठविलें आणि शिंदेहोळकरांना भिवराव यास कुमक करण्यास आज्ञा केली ( शके १६९८ भाद्रपद ). त्यांत महादजी शिंदे यांनीं या कामीं मनापासून हातभार लाविला, एवढेंच नव्हे तर, या मोहिमेचा सर्व भार त्यांनीं खुषीनें आपल्या शिरावर घेतला. होळकरांनीं मात्र मनापासून काम केलें नाहीं ( ख. ऐ. ले. सं. २६७०-२६७१ ). पाटीलबावांनीं सिंहगडाखालील तोतयाची जी आरबांची चौकी होती ती मारून काढली, व तेथें होळकरांस ठेवून आपण बोरघांटाकडे वळले. इकडे



कै. सरदार यशवंतराव वामनराव पानसे.



कै. सरदार गोविंदराव बापुराव पानसे.

पाटीलबावा तेथें जाऊन पोहोंचण्यापूर्वीच भिवराव पानसे यांनीं तोतयाशीं दोन तीन लढाया मारून त्याला मागें रेटलें होतें. या शिवाय त्याजकडील कर्णा व निशाणें हिसकावून आणलीं होतीं. त्याचें हजार दीड हजार माणूस हि कापून काढलें होतें ( कित्ता २६९१ ). नंतर राजमाचीच्या पायथ्यास तोतयाचा गोट होता त्यावर पाटीलबावांनीं हल्ला करून व शेंकडों लोक मारून तोतयाच्या उरलेल्या फौजेची दाणादाण उडविली ( आश्विन शुद्ध पौर्णिमा ). तेव्हां त्याची फौज उधळली व खुद्द तोतया दोन तीनशें लोकांनिशीं पळून कोंकणांत निसटला. त्याच्या पाठीवर पाठलाग करण्याकरितां पाटीलबावांचा दिवाण बाळाराव गोविंद हा तत्काळ निघाला. पटवर्धनांचा वकील म्हणतो कीं, या प्रकरणांत " शिंदे व राजश्री भिवराव यांनीं ( मेहनत ) फार केली " ( कित्ता २६९४ ). या वेळीं तोतयानें किल्ले राजमाची येथें गडदेंत सोनें व रुपें ठेविलें होतें; तें मजमदार प्रांत वसई यांनीं मोजदाद करून आणलें. त्यापैकीं ९९८७१३ किंमतीच्या पुतळ्या व ११९८६८७ किंमतीचें सोनें, १२३२६६४ किंमतीचें रुपें व ७५० रुपये किंमतीची एक माळ मिळून २४७७१८८ चा माल भिवराव यांचे कीर्दीस जमा केलेला आढळतो ( स. मा. रा. २०१३९ ).

तोतया निसटला तो बेलापुरास येऊन गलबतांत बसून मुंबईस इंग्रजांच्या आश्रयास जाण्यासाठीं निघाला. ही बातमी रघूजी आंग्रे यांना कळल्यावरोबर, त्यांनीं ताबडतोब जाऊन तोतयाचें गलबत पकडलें व त्याला त्याच्या सर्व लोकांनिशीं कैद केलें. तेव्हां त्यानें रघूजीपासून वचन घेतलें कीं, माझी चौकशी झाल्याखेरीज मला शिक्षा होऊं नये. त्याप्रमाणें रघूजीनें वचन दिलें व तोतयास घेऊन ते पुण्यास आले. पाटीलबावा हि त्यांना वाटेंत येऊन मिळाले.

## २. तोतयाचा शेवट व भिवरावांवर सरकारचा विश्वास.

तोतयाची चौकशी सुरू झाली; तींत रामशास्त्री, गोपीनाथ दीक्षित, हरिपंत फडके, बाबूजी नाईक वगैरे पंच होते. या सर्वांच्या मतें तोतया खोटा ठरला. नंतर त्याची धिंड काढून शहरांत मिरविली. मग मेखसूनें त्याचें डोकें फोडून त्याला देहांत शासन देण्यांत आलें ( शके १६९८ मार्गशीर्ष शुद्ध अष्टमी ). तोतयाच्या पारिपत्यास भिवराव यांस जेव्हां सरकारांतून पाठविण्यांत आलें तेव्हां त्यांच्याजवळ अधिकारदर्शक म्हणून पेशव्यांच्या मुतालकीची शिक्केकट्यार देण्यांत आली होती. याचा अर्थ असा कीं, मसलत संबंधानें कोंकणांत किल्ल्यास वगैरे कौल, सनदा, पत्रें द्यावीं लागतील त्यांवर शिक्के करीत जाणें ( परिशिष्ट क्रमांक १५ पहा ). सरकारचा येवढा मोठा भरंवसा भिवरावांवर होता हें यावरून समजून येतें.

## ३. जयवंतरावांस तोफखान्याच्या मजुमेचा अधिकार.

या तोतयाच्या गडबडीच्या वेळीं पानशांची तैनात वाढविण्यांत आली. शके १६९७ ज्येष्ठ शुद्ध पौर्णिमा या दिवशीं सरकारांतून जो तैनात जाबता ठरला गेला त्यांत

जातीचा व फौजेचा असे दोन निरनिराळे सरंजाम दिले आहेत. पैकीं फौजेचा सरंजाम तीन लक्षांचा असून त्याच्यासाठीं लावून दिलेला प्रांत तुंगभद्रेच्या अलीकडील कर्नाटकांत दिला होता, आणि जात सरंजामासाठीं सोलापूर व नगर जिल्ह्यांतील पन्नास हजार रुपये वसुलाचीं गांवें लावून दिलीं होतीं. याच वेळीं तोफखान्याच्या मजुमेचा अधिकार जयवंतराव यशवंत पानसे यांचे नांवें करून दिला.

## ४. सावशीची लढाई.

इकडे, कोल्हापूरकरांवर रामचंद्र गणेश कानडे, कोन्हेरराव पटवर्धन व कृष्णराव पानसे हे तिघे सरदार जे मागें पाठविले होते, त्यांचें आपसांत पटत नव्हतें. इतक्यांत त्यांना पुण्याहून सरकारचा हुकूम आला कीं, दुसरीकडे हैदरानें गडबड माजविली आहे, त्यासाठीं पांडुरंगराव पटवर्धन, कोन्हेरराव पटवर्धन व कृष्णराव पानसे यांनीं तिकडे जावें, व कानडे आणि परशुरामभाऊ यांनीं कोल्हापूरकरांवर दाब बसण्यासाठीं तेथेंच रहावें ( शके १६९८ भाद्रपद ).

पांडुरंगराव, कोन्हेरराव व कृष्णराव पानसे हे धारवाडच्या रोखें जात असतां, त्यांना गुत्तीकर व गजेंद्रगडकर घोरपडे येऊन मिळाले. या फौजेनें लक्ष्मेश्वर, बेटगिरी, मिश्रीकोट, कलघटगी, हुबळी वगैरे ठाणीं घेतलीं ( मार्गशीर्ष ). हैदराचा सरदार श्रीपतराव या वेळीं बंकापुरास जाऊन तळ देऊन बसला व त्यानें हैदराकडे मदत मागितली. त्यामुळें हैदरानें महंमद अल्ली यास कवायती पायदळ व तोफा देऊन त्याचे कुमकेस पाठविलें. त्यास दादासाहेब पेशवे यांचे सरदार बर्वे व आबाजी महादेव हे हि येऊन मिळाले. तेव्हां, पांडुरंगराव पटवर्धनांनीं पुण्यास मदत मागण्याविषयीं पत्रें लिहिलीं. तें वर्तमान ऐकून कारभाऱ्यांनीं निझामास आपल्याकडे वळवून घेतलें व हरिपंत तात्यांना तिकडे पाठविण्यांत आलें. परंतु, ते येण्यापूर्वीं पांडुरंगराव यांनीं अदूरदृष्टीनें सावशी येथें हैदराचा सरदार कुमदान याच्याशीं तोंड भिडविलें. प्रथम शिवराव घोरपडे, कृष्णराव पानसे वगैरे सरदारांनीं आदल्या रात्रीं सावधपणानें संरक्षण केल्यामुळें कुमदानानें त्यांच्यावर हल्ला चढविला नव्हता. कुमदानानें आपला तोफखाना व पायदळ आदले दिवशीं एका तुरीच्या शेतांत लपवून ठेविलें होतें. मराठे आपल्या माऱ्यांत आल्यावर मागील बाजूस तुरींत लपविलेल्या सैन्यानें एकदम मारा सुरू केला. मराठ्यांचे सैन्यांत डावी बाजू गुत्तीकर घोरपडे यांजकडे, उजवी बाजू कोन्हेराव पटवर्धन यांजकडे व मध्यें पांडुरंगराव व कृष्णराव पानसे तोफखान्यासह होते. प्रथम मराठ्यांनीं बराच वेळ तोंड देऊन टिकाव धरला. पण, अखेरीस त्यांना मागें पाय काढावा लागला. माऱ्यांत कोन्हेरराव पटवर्धन ठार झाले आणि पांडुरंगराव व इतर बरी च सरदार मंडळी जखमी होऊन शत्रूच्या हातीं सांपडली ( मार्गशीर्ष अमावास्या, शके १६९८ ). फक्त कृष्णराव पानसे व जनोबा पटवर्धन हे नरगुंदास कसे तरी सुखरूप परत आले. तेथून कृष्णराव तोफखान्याचे कायम ठिकाणीं

मुतलावीस आले. ही बातमी समजतां च परशुरामभाऊ कर्नाटकांत तांतडीनें उतरले. त्यांना मदत करण्यासाठीं सरकारानें पुण्याहून धायगुडे व मेहेंदळे यांची फौजेनिशीं रवानगी केली.

सावशीच्या लढाईंत मराठ्यांच्या " बरोबर ( साऱ्या ) तोफा दोन लहान होत्या ......कुमदानच्या पांच सात तोफा होत्या......( मराठ्यांनीं ) दोन तोफा सुरू केल्या, परंतु, त्या लागू झाल्या नाहींत......पल्लेदार तोफा गोटांतील आणविल्या ( परंतु )......त्या तोफा जाऊन पोहोंचल्या नाहींत. थोर तोफा असत्या तर कामगिरी होती " ( कित्ता २७८७–२७८८ ) याप्रमाणें या लढाईंत उतावळी फार झाली. या युद्धांत " आनंदराव माधव ( पानसे ) तोफखान्याकडील " हे हि हजर होते ( कित्ता २७८९ ). या वेळीं कुमदानानें पेशव्यांकडील तोफखान्यांतील एक नौबत व अंबारीसह तीन हत्ती व सात तोफा काबीज केल्या.

## ५. कृष्णरावांचें धारातीर्थीं पतन !

कुमदानानें धारवाडच्या किल्ल्यास वेढा दिला व मराठ्यांचें तें नाक्याचें बळकट ठिकाण काबीज करण्याचा उद्योग आरंभिला. याच दिवशीं परशुरामभाऊ पटवर्धन हे कोल्हापुराकडून येऊन मनोळीस दाखल झाले होते. मनोळी व धारवाड यांत चवदा कोसांचें अंतर आहे. भाऊंनीं लगेंच गनिमी लढाया सुरू केल्यामुळें कुमदानानें धारवाडचा वेढा उठवून तो हुबळीस जाऊन राहिला. एकट्या भाऊंनीं त्याला तोंड देण्यासारखें नव्हतें म्हणून त्यांनीं पुण्यास मदतीची मागणी केली व त्यावरून धायगुडे, फांकडे वगैरे सरदारांस भाऊंचे मदतीस पाठविण्यांत आलें; हें मागें सांगितलें च आहे. ती मदत येईपर्यंत भाऊंनीं मनोळी सोडून सौंदत्तीस छावणी केली. त्यानंतर खुद्द हरिपंततात्या पुण्याहून निघाले. " तात्या समागमें चार तोफा आहेत व तोफखान्यावरचे सखारामपंत पानसे हि समागमें आहेत " ( फाल्गुन शके १६९८. ख. ऐ. ले. सं. २९०७ ). कुमदान व करवीरकर यांनीं एकत्र मिळून थेट पुण्यावर येऊन दादासाहेबांना गादीवर बसवावें असें हें एक त्यांचें मोठें कारस्थान होतें, पण तें वर सांगितल्याप्रमाणें भाऊंच्या कर्नाटकांत जाण्याच्या योगानें विसकटलें. तत्रापि या वेळीं हैदरास, कित्तूर, नवलगुंद, डंबळ, हाळीहाळ, वगैरे ठिकाणचे देसाई फितुर होऊन मिळाले होते. त्यांना प्रथम कबजांत आणण्याचें काम भाऊंनीं हातीं घेतलें. इकडे हरिपंत तुंगभद्रेपर्यंत आले आणि ठरल्याप्रमाणें निझाम हि त्यांना तेथें येऊन मिळाला. तेव्हां हैदरानें स्वतः तात्या व निझाम यांच्या सैन्याकडे रोख फिरविला. मध्यंतरीं " कुमदानाकडील सूत्र रा. कृष्णरावजी ( पानसे ) यांच्या मार्फतीनें महिनाभर " भाऊंकडे लागलें होतें. परंतु, हैदरानें बोलाविल्यावरून कुमदान तिकडे गेला ( कित्ता २९२५ ).

भाऊंनीं प्रथम डंबळकर देसायावर रोख धरला; त्यांनीं गदगचें ठाणें व पन्नास हजार रुपये खंडणी घेऊन त्याच्याशीं समेट करण्याचा बेत केला होता, व देसाई हि त्याला प्रथम कबूल झाला. परंतु तात्यांची फौज निझामाकडे गेल्याचें पाहून तो बदलला. तेव्हां भाऊंनीं त्याचीं हरलापूर, उमंचगी वगैरे ठाणीं घेतलीं आणि खंडणी हि वसूल केली. नंतर, त्याचें हिरेहाळ नांवाचें मजबूत ठाणें होतें, त्यास वेढा घातला. पंधरा दिवस निकराची लढाई झाली. या वेळीं " यादवाडाहून व मुदलावीहून दोन दोन तोफा " आणल्या होत्या ( कित्ता २९२९ ). तसेंच एक " मेंढा तोफ सावशीचे लढाईपासून नरगुंदास च आजपर्यंत होती......ती उदईक येथें ( डंबळ नजीक ) येईल " असें भाऊ एका पत्रांत लिहितात ( कित्ता २९३६ ). हिरेहाळचें " ठाणें जबरदस्त च आहे. गांवास तोफा लाविल्या आहेत. मोर्चे हि कायम केले आहेत. परंतु, बाहेर आसरा कांहीं च नाहीं. याजमुळें मोर्चे लवकर चालत नाहींत. " अशी लढाई चालू असतां हि डंबळकर हा एकीकडे तहाची वाटाघाट करीत च होता. " मोर्चे देऊन आज आठ दिवस झाले अद्याप गांव आयास ( जेरीस ) आला नाहीं. " या आठ दिवसांतील लढाईत एके दिवशीं कृष्णराव पानसे हे एका हल्ल्यांत कपाळास गोळी लागून कामास आले. " कृष्णरावासारखा माणूस या खेड्यावर पडला, तेव्हां गांव घेऊन सरकारचें ठाणें च बसवावें असें आहे. " याप्रमाणें, कृष्णरावांविषयीं परशुरामभाऊंचें प्रेम व आदर हीं होतीं. हें पत्र वैशाख वद्य तृतीयेचें ( शके १६९९ ) आहे. म्हणजे त्या तिथीपूर्वी कृष्णराव हे मृत्यु पावले ( कित्ता २९४० ). भाऊ आणखी एके ठिकाणीं म्हणतात कीं, " कृष्णरावासारखा सरदार येथें हिरेहाळावर पडला, वाईट गोष्ट जहाली. काल ( वैशाख वद्य त्रयोदशी ) पासून डंबळकराकडून बोलणें लागलें आहे कीं, चार रुपये अधिक उणे माथीं मारावे, परंतु हिरेहाळचे मोर्चे उठवावे. कृष्णराव येथें पडले, तेव्हां आमचे मतें गांव कापून च काढावा असें आहे " ( कित्ता २९४७ ). सारांश, कृष्णराव गेल्यानें सरकारचा एक फार मोठा व शूर सरदार नाहींसा झाला व बहुत नुकसान झालें, हें यावरून उघड दिसतें. तिसरें दिवशीं म्हणजे अमावास्येस गांव भाऊंच्या हातीं पडला. त्या लढाईत जनोबा पटवर्धन यांना खांद्यावर बंदुकीची गोळी लागली. ऐशीं हजार खंडणी घेऊन तह झाला. शिवाय " कृष्णराव पानसे येथें पडले, त्यांच्या कुटुंबाकडे ५०० रुपयांचा गांव ( डंबळकर ) संस्थानिकांनीं इनाम चालवावा असें ठरलें ( कित्ता ). पुण्याचा पटवर्धनांचा वकील म्हणतो कीं, " कृष्णराव पानसे यांसी गोळी कपाळास लागून ठार जाहले म्हणोन लिहिल्यावरून बहुत च खेद जहाला ! कृष्णराव यासारखा मनुष्य होणें नाहीं; त्यांचे भाऊबंध आहेत, परंतु त्यांची गोष्ट दुसरी. त्यांचे साम्यतेस जोडावीशी नाहीं. राजश्री भीवराव चांगले आहेत. वरकड भाऊबंद पुढें निभावयाचे आहेत. होणारास उपाय नाहीं. थोरल्या महार्णवां ( सावशीच्या लढाई ) तून वांचले. खेड्यावर अशी गोष्ट जहाली. उपाय नाहीं......राजश्री चिमाण्णा पानसे पुण्यांत च होते,

त्यांस वर्तमान सांगितलें. त्यांणींच तीं पत्रें ऐन जिनसी भिवराव यांजकडे पाठविलीं. नववे दिवशीं चिमाप्पास कळलें. तसींच पत्रें सोनोरीस गेलीं. आम्ही चिमाप्पाच्या घरीं गेलों होतों. एक दोन दिवसांत सोनोरीस जातों. चिमाप्पा आजच ( ज्येष्ठ शुद्ध चतुर्थी ) सोनोरीस गेले " ( कित्ता २९५४ ). या पत्रावरून कृष्णरावांची योग्यता पुण्यास सरकार दरबारीं केवढी होती हें स्पष्ट ठरतें. त्याबद्दल आणखी विशेष सांगण्याची गरज नाहीं.

डंबळकर देसायाकडून कृष्णराव पानसे यांच्या कुटुंबास जो ५०० रुपये उत्पन्नाचा गांव इनाम मिळणार होता म्हणून वर आलें आहे, तो गांव रामभाऊंच्या विद्यमानें देसायानें, कृष्णराव यांचे चिरंजीव माधवराव व श्रीपतराव यांस देण्याचें कबूल केलें. पुढें सदरचा गांव **गंगापूर** ( जि. धारवाड ) शके १७१४–१७१५ च्या सुमारास प्रत्यक्ष इनाम मिळाला ( परिशिष्ट क्रमांक १६ पहा ).

## ६. शके १६९८–९९ मधील कांहीं गोष्टी.

या सुमारास कोल्हापुरकरांनीं हि उपद्रव दिल्यामुळें त्यांच्यावर पेशवेसरकारांनीं महादजी शिंदे यांना पाठविलें. पाटीलबावांच्या मदतीस पानशांचा तोफखाना होता व त्याच्या जोरावरच त्यांनीं कोल्हापुरकरांस शरण येण्यास भाग पाडलें. प्रसिद्ध महांकाळी तोफ, ही टेंबलाईच्या माळावरून सुरू करण्यांत आली होती. त्यामुळें तटास भगदाडें पडलीं व गांवांत फार नुकसान झालें. तेव्हां पाटीलबावांनीं सांगितलेल्या सर्व अटी कोल्हापुरकर महाराजांनीं कबूल केल्या.

कृष्णरावांच्या पतनानंतर शके १६९९ मध्यें पेशवे सरकारांनीं सोनोरी हा गांव माधवराव कृष्ण व भिवराव यशवंत पानसे यास ( मोकास अमलाखेरीज ) कुलबाब, कुलकानूंसह इनाम करून दिला ( परिशिष्ट क्रमांक १७ पहा ). याच सुमारास मौजे सावरदरी हा गांव हि दाभाडे यांनीं भिवराव यास इनाम दिला. छत्रपतींनीं व पेशव्यांनीं हि तो गांव करार करून दिला ( परिशिष्ट क्रमांक १८ पहा ).

श्रावण मासांतील दक्षिणा जेव्हां पर्वतीच्या रमण्यांत वांटीत असत, तेव्हां निरनिराळ्या दरवाजावर निरनिराळे प्रमुख सरदार बसवीत व त्यांच्या हस्तें दक्षिणा वांटीत. खुद्द पेशवे सरकार या कृत्यास प्रारंभ करून देत व थोडा वेळ दक्षिणा वांटून मग परत जात. मागाहून त्यांचे सरदार पुढील दक्षिणा वांटण्याचें काम पुरें करीत. शके १६९९ च्या श्रावणांत, शुद्ध षष्ठी, शनिवार, सकाळीं दीड प्रहरास दक्षिणा वांटण्यास प्रारंभ झाला. रमण्यास एकंदर पांच दरवाजे होते. त्यांपैकीं पांचवा दरवाजा भिवराव यशवंत पानसे यांच्याकडे होता. त्यांच्या विद्यमानें तेथें जी दक्षिणा वांटली ती ४१८९ रु. असून, ती १९२२ माणसांस वाटण्यांत आली होती ( स. मा. रो. भा. ३ पृ. १९७ ).

या वर्षीं, भिवराव यांस परगणे सुतोंडा सरकार दौलताबाद याचा दहा हजारांचा जहागीर अंमल पेशवे सरकारांनीं, राऊतांचे सरंजामासाठीं लावून दिला. हा अंमल प्रथम कबीर महंमद खान याच्याकडे होता. पण, सदर प्रांत, ज्यावेळीं निझामाची साठ लक्षांची जहागीर पेशव्यांना मिळाली, त्यावेळीं तींत आला होता, त्यांतील त्यांनीं पानशांना सदरचा अंमल लावून दिला ( परिशिष्ट क्रमांक १९ पहा ).

## ७. हैदरअल्लीवरील मोहिमेवर भिवरावांची नेमणूक.

मागें सांगितल्याप्रमाणें हैदरावर हरिपंततात्या हे हुजुरात घेऊन गेले होते. तत्पूर्वी परशुरामभाऊ हि तिकडे च होते. परंतु बरसातीमुळें पेशव्यांची ही फौज कर्नाटकांत अडकून पडली. पावसाळ्यानंतर तात्या व भाऊ यांनीं या हैदरावरील पांचव्या स्वारीस प्रारंभ केला ( कार्तिक शके १६९९ ). या वेळीं निझामाची हि ससैन्य मदत मराठ्यांना होती. प्रथम हुलकावण्या दाखवीत दाखवीत मराठ्यांनीं हैदराला डोंगराळ मुलखांतून बाहेर काढून मैदानांत आणिलें. हैदर हा नेहमीं अडचणीच्या जागीं राहून मराठ्यांना त्रास देत असे, आणि अशानें मैदानांत येऊन तोंड देण्याचें टाळीत असे. मराठ्यांचा तळ या वेळीं रारावी येथें व हैदर याचा दरोजी येथें होता. दोघांत अंतर चवदा कोसांचें होतें. मराठे या वेळीं स्वस्थ न बसतां भोंवतालच्या प्रांतांतून खंडण्या गोळा करण्याचें काम करीत होते. अनागोंदीचा संस्थानिक हैदराच्या सूत्रानें चालत होता व त्याच्या जोरावर तो मराठ्यांना खंडणी देत नव्हता. सबब त्याचें कंपली हें जबरदस्त ठाणें घेण्याचें काम सखारामपंत पानसे यांच्याकडे सोंपविण्यांत आलें. " अनागोंदीची खंडणी झाली पाहिजे, यास्तव सखारामपंत पानसे यांस पाठवून कंपलीस तोफा लाविल्या आहेत. त्यास जाबसालास वकील येणार म्हणोन रदबदल केल्यावरोन तोफा मना केल्या " ( मार्गशीर्ष शुद्ध सप्तमी ). पुढें सखारामपंत हे भाऊंच्या फौजेसह पुढें निघाले. " मार्गीं बल्लारीकरांचा एक गांव ( ठाणें ) होता. तो चव्या घोड्यानिशीं दोन घटकांत हल्ला करून तोफांच्या माऱ्यांनीं घेतला. आंत हैदरखानाचे प्यादे होते ते] कापून काढले " ( ख. ऐ. ले. सं. ३०८९ ). पांचव्या स्वारींतील या व पुढच्या लढायांत पानशांचा तोफखाना चांगलाच उपयोगीं पडला. कारण, हैदराजवळ मोठमोठ्या अशा पंधरा तोफा होत्या. त्यासाठीं पानशांनीं हि दोन ( मोठया ) तोफा मुतलावीस होत्या त्या आणविल्या. " या तोफांचीं नांवें **सत्य-शकल** व **फत्तेजंग** अशीं होतीं ( कित्ता ३१५८ ). या सुमारास मराठ्यांच्या सैन्यांत मानाजी शिंदे ( फांकडे ) हा सरदार होता. त्याचा ओढा पूर्वीपासून दादा-साहेबांच्याकडे होता. त्यामुळें या संधींत दादासाहेबांचे जे हस्तक हैदराकडे होते त्यांनीं त्याला फोडलें. हैदरानें मानाजीस पुष्कळसे होन पाठविले होते, त्यांपैकीं पाऊण लाख होन भाऊंनीं पकडले व फितुरीचा कागद हि धरला. तेव्हां त्याच्या गोटावर भाऊंनीं हल्ला केला, पण खासा मानाजी पळून गेला. या गडबडींत मानाजीनें तोफखाना,

पानसे, नरसिंगराव धायगुडे, मालोजी नाईक निंबाळकर व खंडेराव दरेकर यांचे तीन चार गोट लगत होते ते हि लुटले ( पौष शुद्ध दशमीच्या पूर्वी ).

इकडे कोल्हापुरकरांनीं ही संधि साधून पुन्हा बंडाळी चालविली, तेव्हां त्यांच्या-वर पेशव्यांनीं महादजी शिंदे यांना पाठविलें. त्यावेळीं पुण्याच्या सरकारी मोठमोठ्या तोफा ( महांकाळीसारख्या ) पाटीलबावांनीं नेऊन कोल्हापुरकरांशीं लढाया देऊन त्यांना नामोहरम केलें. " सरकारांतून महांकाळी तोफ शिंद्याकडे रवाना जाली. " ( ऐ. ले. सं. ३१४४ ). ही हकीकत शके १६९९ च्या फाल्गुनांतील होय.

वास्तविक कोल्हापुरकरांस बंडाळी करण्यास उत्तेजन हैदर व दादासाहेबांचे पक्ष-पाती मोरोबा फडणीस वगैरे मंडळींकडून मिळालें. मोरोबानें तर या वेळीं फार मोठा व्यूह रचला होता. त्यानें होळकरांस फोडलें. कर्नाटकांतील परशुरामभाऊ व हरिपंत तात्या यांच्या फौजेंत असलेले नरसिंगराव धायगुडे यांना हि फोडून त्यांच्या मार्फत फौजेंत हि फितुरी केली. इतकेंच नव्हे तर, खुद्द सखाराम बापूस हि वळविण्याचा प्रयत्न करण्यास कमी केलें नाहीं. बापूचें सर्वसामान्य धोरण नेहमीं धूर्ततेचें असे. विरुद्ध पक्षांत आपसांत कलह लावून द्यावयाचा व मग त्यांतील प्रत्येक पक्षाला आपली गरज लागेल असें करावयाचें. बापू हा " खेळया " होता, तेव्हां या कार-स्थानांत " वृद्धाचे हि खेळ आहेत " ( कित्ता ३१६६ ) असें त्यावेळीं लोकमत बाहेर आलें होतें. नाना मात्र सरदार व संस्थानिकांकडून आंतून पैसे घेऊन गबर होत व बाहेरून एकच पक्ष धरल्याचा बाणा बाळगण्याचा आव आणीत. पेशवाईवरील या प्रसंगाची बातमी कर्नाटकांत समजली त्यावरून तात्या व भाऊ यांनीं पानावर पान ठेवून, हैदरावरील या स्वारीचा शेवट लाविला व तें तत्काळ परत पुण्याकडे वळले. तसेंच पाटीलबावांनीं हि कोल्हापुरकरांस तंबी देऊन त्यांना गप्प बसविलें आणि आपण नानांना सर्व प्रकारें सहाय्य करण्याचें ठरविलें व तसें त्यास कळविलें. पण नानांनीं एकंदर परिस्थिति पाहून मोरोबाशीं कांहीं अटींवर समेट केला आणि इंग्रजांस घेऊन दादासाहेब जे पुण्यास येऊन पेशवाईचे गादीवर बसणार होते, तें कांहीं दिवस लांबणीवर पाडलें. या वेळचें मोरोबांचें व बापूंचें कारस्थान इतकें बिकट होतें कीं, त्यावेळीं त्यांना " आपल्या वस्त्राचा देखील विश्वास ( राहिला ) नाहीं. " या एकंदर गोष्टी शके १७०० च्या चैत्र वैशाखांतल्या होत.

या वेळीं पाटीलबावांना भेटण्यासाठीं बापूंनीं मोरोबास साल्पें घाटांत नेलें होतें; त्यांच्या बरोबर तेव्हां इतर जी मंडळी होती तींत अप्पा बळवंत, रामचंद्र गणेश, भिवराव पानसे वगैरे सरदार लोक होते. भिवराव हे बहुधा नानांच्याच बाजूस चिकटून असत. ज्यावेळीं नाना व बापू यांच्यांत समेट झाला, तेव्हां भिवराव यांनीं ती बातमी सखारामपंत पानसे यांस व त्यांनीं परशुरामभाऊस कळविली. भाऊ म्हणतात कीं, " तोफखान्याच्या गृहस्थाची चिठी आली त्यांतील भाव ' निःसंदेह

राजश्री उभयतां ( बापू व नाना ) एकत्र झाले. गुंता राहिला नाहीं. लौकर किल्या-( पुरंदर ) समीप यावें. तुम्ही हरिपंततात्यांस घास दाणा उकळीत बसतां हें ठीक न केलेंत. लौकर तात्यांस मिळून त्यांचे मर्जीप्रमाणें वर्तणूक करावी, म्हणोन दोन चिठ्या राजश्री ( सखाराम ) बापू पानसे यांस भिवराव यांच्या आल्या. जवळयावर राजश्री बापू पानसे यांची भेट झाली. चिठ्या पाहिल्या. आमचें व ( बापू ) पानसे यांचें बोलणें झालें." ( त्यांत बापूंनीं भिवराव यांस पुण्याकडलि खरी बातमी काढण्यासाठीं जें पत्र लिहिलें होतें त्यांतील जो पुढील मजकूर होता तो भाऊस सांगितला. ) बापूंनीं, भिवरावास लिहिलें कीं, " तुमच्या चिठ्या आल्या. हें काय करितां ? रोज एक करितां. सारें राज्य बुडालें. मी घरीं ( सोनोरीस ) जाणार होतों, परंतु तुम्ही राजश्री हरिपंततात्यांस लिहिलें यास्तव आलों" ( ख. ऐ. ले. सं. ३२६६ ). यावरून भिवराव व सखारामपंत यांची नाना फडणिसांच्या ठिकाणीं निष्ठा व त्याबरोबर च श्री. सवाई माधवराव साहेब यांच्या विषयींचा आदर हीं स्पष्ट दृग्गोचर होतात. भिवराव हे इकडे पुण्याकडे पूर्वींच आले होते व सखारामपंत हे मागें हरिपंत तात्यांच्या सैन्यांत कर्नाटकांत राहिले होते. तात्या जेव्हां कर्नाटकांतून परतले, तेव्हां सखारामपंत हि परत आले. जवळे गांवीं त्यांचा मुक्काम असतां, भिवरावांनीं पुण्याकडील ही सारी हकिकत सखारामपंतांस व त्यांच्या तर्फे तात्या व भाऊ यांना कळविली. मोरोबाशीं नानांनीं समेट केल्यामुळें सखारामपंत पानसे रागावले व त्या भरांत त्यांनीं भिवरावांस " रोज एक करितां राज्य सारें बुडालें " असे शब्द लिहिले होते. या हकीकती शके १७०० च्या वैशाखांतील झाल्या वर सांगितल्याप्रमाणें दिव्याच्या घाटाजवळ पाटिलबावा व सखाराम बापू यांची भेट झाली, व तात्पुरता समेट झाला. या वेळीं " ( भिवराव ) पानशांच्या मार्फतीनें बोलणें होतेंच. तोच संकेत धरून येथ पावेतों आलों " म्हणून हरिपंततात्यांनीं बापू व पाटीलबावा यांस सांगितलें ( कित्ता ३२८१ ) होतें.

हा तात्पुरता समेट होता, असें वर म्हटलें आहे तें खरें होतें. कारण मोरोबा फडणिसांस क्षमा करण्यांत आली खरी, पण ते स्वस्थ बसून नव्हते. त्यांच्या कटांतील पुष्कळांना निरनिराळ्या शिक्षा सरकारांतून दिल्या गेल्यानें ते चिडले व पुन्हा फितुरी चाळे करूं लागले. तेव्हां नानांनीं त्यांस धरून आणून गुळटेकडी वर कैदेंत ठेविलें व तेथून त्यास नगरचे किल्यांत रवाना केलें. तेथें ते बावीस वर्षें कैदेंत होते.

हरिपंत तात्या व परशुरामभाऊ हे परत पुण्याकडे आल्यावर हैदरास कर्नाटकांत मोकळें रान सांपडलें. तेव्हां, तुंगभद्रा पार होऊन त्यानें थेट मलप्रभेपर्यंतचा प्रांत काबीज केला. एवढेंच नव्हे तर त्यानें तेरदाळ, जमखंडी व यादवाड हीं ठाणीं घेऊन धारवाड हि हस्तगत केलें. तेव्हां, त्याच्यावर जाण्यासाठीं कारभाऱ्यांनीं परशुराम-भाऊ व भिवराव पानसे यांना पाठविण्याचें ठरविलें. इकडे करवीरकरांनीं बंडाळी चालविली व तशांत इंग्रजांनीं मुंबईस फौज जमविल्याची बातमी हि येऊन थडकली

तेव्हां, कारभाऱ्यांना पंचाईत पडली व भाऊंना त्यांनीं निरा नदीच्या आसपास तळ देण्यास व कांहीं दिवस तेथेंच थांबण्यास सांगितलें.

या वेळीं भिवराव पानसे यांना पाठवावें व भाऊंना ठेवून घ्यावें असा बापूंचा बेत होता. भिवराव हे कदाचित्, बापूंचा व त्यांचा स्नेह असल्यामुळें बापूंच्या जाळ्यांत अडकले जाण्याचा संभव आहे असें नानाच्या मनास वाटून त्यानें भाऊंना सांगितलें कीं, " भिवराव पानसे यांस पाठवावें तर फौज ( आपल्या ) लगामींची जाते हें ठीक नाहीं. आज पावेतों जें केलें त्याचें सार्थक तुम्हीं निघाल्यास होतें " ( कित्ता ३३४३ ). तेव्हां अखेर भाऊ " बरोबर तोफखाना नेमिला......तो मुहूर्तानें सासवडाहून येखदपुरास आला......समागमें पानसे राजश्री राजबा ( पुरुषोत्तमपंत ) येणार " ( कित्ता ३३६२ ). त्याप्रमाणें ते भाऊंच्या बरोबर निघाले.

## ८. वडगांवची लढाई व भिवराव पानसे.

इंग्रजांनीं या सुमारास मुंबईस फौजा जमा केल्याची व पुण्यावर चालून येऊन दादासाहेबांना पेशवाईच्या गादीवर बसविण्याची तयारी चालविली होती. मध्यंतरीं इंग्रजांनीं दादासाहेबांचा पक्ष सोडावा म्हणून पुणें सरकारनें त्यांस दहशत बसण्यासाठीं फ्रेंचांशीं राजकारण करण्याचा डौल घातला. पण, त्यामुळें इंग्रजांना वाटलें कीं, मराठ्यांनीं आपल्याला मुंबईहून हकलण्यासाठीं ही खटपट चालविली आहे. तेव्हां ती सिद्धीस जाण्यापूर्वींच आपण दादासाहेबांना गादीवर बसवून मराठी दरबार आपल्या हातांत आणावा. पूर्वीं, या बेतास गव्हर्नर जनरल वॉरन् हेस्टिंग्ज हा विरुद्ध होता. पण, मुंबईकर इंग्रजांनीं त्याच्या मनांत वरील भीति भरवून दिल्यानें त्यानें हि या मसलतीस आपली परवानगी दिली. एवढेंच नव्हे, तर त्यानें बुंदेलखंड, माळवा, नेमाड या मार्गानें मुंबईकरांच्या कुमकेस सहा पलटणें रवाना केलीं. पण या वेळीं इंग्रजांना काळ अनुकूल झाला नाहीं. कारण, त्यांचा असा धावडाव चालू असल्याच्या बातम्या शके १७०० च्या पावसाळ्याचे अगोदरच नानांना समजल्या होत्या व इंग्रजांना बोलावणाऱ्या मोरोबादि मंडळींना त्यांनीं कैदेंत टाकून बरीचशी परिस्थिति आपल्या कह्यांत आणून ठेविली होती. तत्रापि, दादासाहेबांचे पक्षपाती चिंतो विठ्ठल वगैरेंनीं राज्यांत बंडें उठविलीं. खुद्द तुकोजी होळकर हा हि आंतून दादासाहेबांना फितूर होता. बोरघाट चढून दादासाहेब वर आले म्हणजे, आपण तुम्हांस मिळूं, असें त्यानें त्यांना कळविलें होतें.

हें सर्व साधलें असतें तर, दादासाहेबांचा बेत सिद्धीस जाता हि पण, इंग्रजांची मुंबईची व कलकत्त्याची फौज एकत्र झाली नाहीं. शिवाय कोल्हापूरकर, सुरापूरकर, शिवनेरकर वगैरे बंडखोरांचा बंदोबस्त ताबडतोब केल्यामुळें अधिकारपदारूढ पेशव्यावर उठलेलें हें एवढें प्रचंड काहूर नानांच्या मुत्सद्दीपणानें अवघ्या एक दोन महिन्यांत वितळून गेलें.

मुंबईच्या बातम्या प्रत्यहीं नानांना कळत असत. शके १७०० च्या मार्गशीर्षांत इंग्रजांची चार हजार फौज मुंबईहून निघाली. तेव्हां, नानांनीं कर्नाटकांत मोहीम करण्याचें रहित केलें. इंग्रजांबरोबर श्री. दादासाहेब, अमृतराव ( दत्तक पुत्र ) व दिवाण चिंतो विठ्ठल हे, दोन तीन हजार फौज आणि तोफखाना घेऊन निघाले होते. यांच्याजवळ बाजारबुणग्यांचें एवढे लटांबर होतें कीं, तें घेऊन बोरघाटाच्या माथ्यावर येण्यास त्यांना पक्का एक महिना लागला. तेवढ्या अवधींत पुण्यास मराठी फौज तयार झाली. इतक्यांत इंग्रजांची विनी घेऊन इष्टूर फांकडा घाट चढून वर आल्याची बातमी आली. तेव्हां, त्याचा मुकाबला येण्यास इकडून सात तोफा चार हजार पायदळ व पाच हजार घोडदळ यांसह भिवराव पानसे यांना तोंडावर पाठविलें " बोरघाटावर खंडाळें म्हणून तळें आहे. तेथें पांच हजार गारद व पांच तोफा याप्रमाणें ( इंग्रजांचा ) सरंजाम आला आहे " या नंतरची हकीकत पुढील प्रमाणें घडली " पानसे व बाजीपंत अण्णा वगैरे फौज तळेगांवावर पाठविली आहे......इंग्रजांनीं तळे किल्ला आहे त्यास मोर्चे दिले होते. ऐशास गांवांतून लेक मोर्चावर पडून मारामारी केली. दीडशें माणूस कापून काढलें. दोन तोफा व जेजाला वीस पाडाव केल्या. मोर्चे गेले... ...**भिवराव पानसे** यांनीं......इंग्रजांवर चालून जाऊन तोफेचे गोळे व बाण टाकिले. तेव्हां, ते हि तयार होऊन येऊं लागले: तेव्हां यांनीं मागती मारगिरी करून ( त्यांना ) मागें सारिलें. **इष्टूर फांकडा** इकडील तोफेचा कारल्याच्या मुकामीं गोळा लागून ठार जाहला .....**कर्नेल कां** बाण लागून जेर जाहला......श्री. दादासाहेब लकडकोट घालून बातेऱ्या बांधोन अडचणीच्या जागेंत राहिले......राजश्री भिवराव पानसे व बाजीपंत अण्णा सडी फौज व तोफा ( खाना ) घेऊन गेले. तलावावरून पहिल्या दिवशीं तोफा लाविल्या. तोफातोफांची लढाई झाली. दुसरे दिवशीं ज्या जागेवर पानसे यांनीं तोफा लाविल्या होत्या, तेथें त्यांचें ( इंग्रजांचें ) सामान, जागा, धरून राहुट्या देऊन राहिलें. पानसे दुसरे दिवशीं गेले, तोफा लाविल्या तेव्हां ते ( इंग्रज ) वाटोन ( पुढें चालून ) आले......तिसरे दिवशीं लांब पल्याच्या तोफा नेऊन लागू केल्या...( इंग्रजांच्या ) राहुट्यांवर मार दिला...इंग्रजांनीं राहुट्या काढल्या, त्याजकडील जायां जखमी जाहले.......पानसे यांजपासून घाट तीन कोस आहे. पानसे यांजवळ पांच हजार फौज जमली; कारभारी यांजजवळ उभयतां ( शिंदे होळकर ) सरदार सुद्धां वीस हजार फौज आहे. घाटाखालीं वसि हजार फौज रवाना जाहली. दुरोखें शह त्यांस ( इंग्रजास ) बसेल. श्रीमंतांच्या पुण्यप्रतापें दुष्टाचें पारिपत्य होईल. हिंदुस्थानचे इंग्रज.. ....हुसंगाबादेकडे अलीकडे दोन तीन मजली अलीकडे आले......शुक्रवारीं ( पौष वद्य ) षष्ठीस श्री. दादासाहेब इंग्रज सुद्धां तळेगांवावर आले......रविवारपर्यंत तळेगांवीं च होते. सोमवारीं रात्रीस दादासाहेब व इंग्रज पांच पलटणे सुद्धां निघोन माघारे गेले. त्यांच्या मागें तीन पलटणें व बुणगें जाऊं

लागले. ही चाहूल, छबिन्यास (पेशवे) सरकारची फौज होती, त्यांस समजलें आणि मागें लागोन गेले....(बाकीच्या हि) फौजा धांवून गेल्या. तेव्हां छकडे वगैरे सांपडले...... तळेगांवानजीक वडगांव आहे. तेथें दोन तीन पलटणें दिवस उगवतां गांठ पडली. सरकारच्या तोफा लाविल्या. तोफा त्यांज (इंग्रजां) कडील बंद केल्या...ते निघोन गेले (पळाले)...इंग्रजांचा मोड जाहला. चार पांचशें माणूस मारिलें. पांच तोफा व दोन गरनाळा सरकारांत पाडाव आणिल्या. शिवाय दोन हजार बंदुका वगैरे लूट सांपडली. घाटाखालीं, खोपवलीस (इंग्रजाची) फौज बसली....इंग्रजांची रस्त मनाकेली," (ऐ. ले. सं. पृ. ३३८० ते ३३९७). याचा सारांश असा कीं, इष्टूरची व भिवरावांची लढाई झाली, तेव्हां इष्टूरच्या मदतीसाठीं सारें इंग्रजी लष्कर घाटचढून वर आले. त्यामुळें शिंदे होळकर व उभयतां कारभारी व हरिपंत तात्या वानवडीस होते ते हि तळेगांवच्या रोखें आले. पानशांनीं आपल्या पराक्रमाची पराकाष्ठा केली. ते लढत असतां खंडाळें येथें, ले. क. के. हा त्यांचा बाण लागून जखमी झाला व कारलें येथें पानशांच्या सबासिकल या तोफेचा गोळा लागून इष्टूर फाकडा (कॅप्टन स्टूअर्ट) पौष वद्य द्वितीयेस ठार झाला. अशी स्थिति पाहून, पूर्वीं ठरल्या प्रमाणें, तुकोजी होळकरानें श्री. दादासाहेबांना येऊन मिळण्याचें टाळलें. चिंतो विठ्ठलाच्या म्हणण्या प्रमाणें आणखी जी कांहीं इतर फौज इंग्रजांना मिळणार होती ती हि मिळाली नाहीं. इंग्रज तळेगांवास पळाला. तेथें पाटिल बाबांनीं त्याच्यावर हल्ला केला व त्याला धुडकावून दिलें. तेव्हां पौष वद्य सप्तमीच्या रात्रीं इंग्रज तळेगांवाहून पळून मुंबईस निघाला. तेव्हां सर्व मराठी फौजा त्याला बिलगल्या. इंग्रज वडगांवाकडे निघाला. वडगांव गांठण्यास त्याला दुसरा दिवस लागला. मराठ्यांनीं त्याला तेथें घेरून कोंडलें. अखेरीस मराठे म्हणतील त्या अटींवर तह करणें इंग्रजांना भाग पडलें. महादजी शिंद्यांच्या मार्फत तह झाला. या तहांतील शर्तींप्रमाणें श्री. दादासाहेब आपण होऊन तेरा तोफा व बारा तेराशें गारद्यांसह पाटीलबाबांच्या गोटांत माघ शुद्ध प्रतिपदेस येऊन उतरले. या लढाईंत पानशांच्या हाताखालीं तोफखान्यावर मुसा नाराज व नरोन्हा या नांवाचे दोन फ्रेंच अंमलदार होते, पैकीं नरोन्हा जखमी झाला.

या प्रकरणांत आणखी एका बड्या धेंडास पेंचांत आणून नाना फडणीस यांनीं सर्व राज्यकारभार निष्कंटक करून आपल्या हातांत आणला. इंग्रज घाट चढून आला, त्या वेळीं धोंडभट व जोतीभट या उभयतांनीं कांहीं फितुरीच्या चिठ्या मृदंगांत घालून चालविल्या असतां त्या पानसे यांनीं पकडून पाटीलबोवांच्या स्वाधीन केल्या. त्या चिठ्या सखाराम बापूंना श्री. दादासाहेब व चिंतो विठ्ठल यांजकडेस फितुरी करण्याकरितां आपल्या स्वदस्तुरच्या पाठविल्या असा बापूवर आरोप होता. त्या चिठ्या बजिन्नसच पाटीलबावांनीं बापूच्यापुढें टाकिल्या व या फितुरीच्या गुन्ह्याबद्दल त्यांना तेथेंच कैद करून सिंहगडास रवाना केलें. त्या चिठ्या आज उपलब्ध नाहींत. यामुळें

त्या बापूंनींच स्वहस्तें लिहिल्या किंवा त्यांच्यावर हें बालंट उभारलें गेलें हें निश्चित करितां येत नाहीं. या आरोपाबद्दल बापूनीं आपल्या बचावाची कोणती बाजू पुढें मांडली हें हि आज पुढें आलेलें नाहीं. यावरून कोणातरी बापूच्या हितशत्रूचें हें कृत्य असावें असा संशय आल्यास तो अनाठायीं नाहीं. बापूचा अंत अखेर कैदेंतच झाला. त्यांच्या शत्रूंनीं अखेर यांतच संतोष न मानतां जारणमारणविद्येच्या प्रयोगानें बापूंच्या चिरंजीवास हि वेड लाविलें. बापूसारख्या थोर शूर व राजकारणपटु मुत्सद्यावर राजद्रोहासारखा भयंकर आरोप येऊन कैदेंतच त्याचा अंत व्हावा हा एक दैवदुर्विलसिताचाच प्रकार होय !

## ९. भिवराव यांचा मृत्यु !

यानंतर एक दोन महिन्यांनीं भिवराव यांची प्रकृति एकाएकीं बिघडली. त्यामुळें ते घरीं आराम वाटेल यासाठीं सोनोरीस गेले. आठ चार दिवसांतच त्यांची प्रकृति जास्त बिघडून त्यांचा या दुखण्यांत शके १७०० फाल्गुन वद्य सप्तमी उजाडतां सोमवारीं अंत झाला. त्यांचे मागें त्यांची स्त्री **उमाबाई** या सती गेल्या. भिवराव शूर, मुत्सद्दी व नाना फडणवीस यांच्या बाजूचे होते. शूरांची योग्यता शूरच जाणतो. भिवरावांबद्दल प्रसिद्ध योद्धे परशुरामभाऊ पटवर्धन म्हणतात, "भिवराव कर्ता माणूस. यंदा इंग्रजांचे लढाईंत फारच मेहनत त्यांनीं केली होती. तसा मनुष्य होणें दुस्तर. श्रीच्या इच्छेस इलाज नाहीं. भिवराव बहुत थोर, शहाणे, एकनिष्ठ, साल मजकुरीं व गुदस्तां व तोतयाचे मसलतींत बहुतच मेहनत केली होती. गुदस्तां बहुतां प्रकारें नानांच्या मसलतीस उपयोगीं पडले. पुढें हि निष्ठेनेंच सेवा करावी असें माणूस. परंतु, आयुष्यमर्यादा पुरली त्यास इलाज नाहीं. मोठी धूरच या काळांत गेली. तोफखान्याचा बंदोबस्त चांगला राखीत होते" ( ऐ. ले. सं. ३४०२ ). यांत भिवराव यांच्या सर्व चरित्राचें सार आलें आहे असें आम्हांस वाटतें. आम्ही तें सांगण्यापेक्षां तत्कालीन एका प्रसिद्ध युद्धकुशल पुरुषानें जें सांगितलें आहे तें त्यांच्याच शब्दांत आम्हीं वर दिलें आहे. त्यावरून मराठी राज्यघटनेच्या कामीं भिवराव यांनीं काय किंमतीची कामगिरी केली हें सुज्ञ वाचकांच्या सहज च लक्षांत येईल.*

---

*भिवराव वारले त्या वेळीं त्यांच्या नांवें ३९२७५८१४ रुपयांचा सरंजाम चालत होता. तळेगांवच्या लढाईतील त्यांचें शौर्य पाहून पेशव्यांनीं त्यांना चौघडा व जरीपटक्याचा मान दिला. तसेंच जुन्या एका पत्रांत ( शके १७०० कार्तिक वद्य सप्तमीचे ) त्यांना फौजेच्या खर्चासाठीं नव्वद हजारांचा सरंजाम दिला असा उल्लेख आहे.

भिवराव यांना लहान मोठे मिळून, जयवंतराव, सखारामपंत, विश्वासराव पुरुषोत्तमपंत व कृष्णराव असे पांच बंधु होते. भिवराव यांस संतति झाली नाहीं, म्हणून त्यांनीं आपला पुतण्या नीलकंठराव जयवंत यास दत्तक घेतलें होतें. नीलकंठराव हे शके १७१२ त वारले. यांना पोटीं पुत्रसंतान कांहीं च नव्हतें.

## १०. कृष्णराव व भिवराव यांच्या वेळीं मिळालेल्या कांहीं इनामांची माहिती.

शके १६८२ च्या सुमारास माधवराव शिवदेव यांस श्रीमंत नानासाहेब पेशवे यांनीं मौजे **कासुर्डी** ( ता. पुरंदर जि. पुणें ) येथें अर्धा चाहूर जमीन इनाम दिली; परंतु, त्याचीं राजपत्रें व्हावयाचीं राहिलीं होतीं. तीं शके १६८९ मध्यें झालीं ( परिशिष्ट क्रमांक २० पहा ). हें पत्र कृष्णराव, भिवराव, व्यंकटराव वगैरेंच्या नांवाचें आहे.

मौजे **खानवडी** ( ता. पुरंदर जि. पुणें ) येथें श्रीमंत नानासाहेब पेशवे यांनीं लक्ष्मण चिंतामण धडफळे यांस तीस बिघे जमीन इनाम दिली होती, ती त्यांनीं आपले जांवई माधवराव कृष्ण यांस शके १६९५ कार्तिक वद्य पंचमी रोजीं आंदण दिली. अद्यापि ही जमीन पानशांकडे चालत आहे.

मौजे दिवें येथें पानशांनीं पूर्वीं कांहीं जमिनी इनाम मिळविल्या होत्या च. त्यानंतर शके १६९७ फाल्गुन शुद्ध एकादशीस श्री. सवाई माधवरावसाहेब यांनीं कृष्णाजी माधवराव व भिवराव यशवंत यांस पंचेचाळीस बिघे नवीन जमीन इनाम दिली.

मौजे जेजुरी येथें शके १७०० माघ शुद्ध तृतीयेस माधवराव कृष्ण व भिवराव यशवंत पानसे यांना श्री. सवाई माधवरावसाहेब यांनीं सोळा बिघे जमीन इनाम दिली ( परिशिष्ट क्रमांक २१ पहा ).

मौजे सावरदरी हा गांव शके १६९७ मध्यें पानशांना इनाम मिळाल्याचें वर सांगितलें च आहे. पण त्या गांवचा सरदेशमुखी व पाटिलकीचा हक्क सेनापति दाभाडे यांचा होता. तो शके १६९९ कार्तिक शुद्ध षष्ठीस सगुणाबाई दाभाडे यांनीं भिवराव यशवंत यांना वंशपरंपरेनें बहाल करून दिला ( परिशिष्ट क्रमांक २२ पहा ).

मौजे सावरदरी व मौजे तुळजापूर हीं गांवें पानशांना पूर्वीं च इनाम मिळालीं होतीं. मात्र त्यांतील मोकास बाब ही इनाम दिली नव्हती. मोकासा ही बाब खास पेशवे सरकारांची असे व ती वसूल करण्यासाठीं, पेशवे हे आपल्या तर्फे एखाद्या सरदारास नेमीत असत. शके १७०० च्या मार्गशीर्ष पौर्णिमेस पुरंदरास माधवराव व भिवराव यांनीं विनंति केल्यावरून, श्री. सवाई माधवरावसाहेब यांनीं त्यांना सदर दोन्ही गांवांचा मोकासा हक्क इनाम करून दिला ( परिशिष्ट क्रमांक २३ पहा ).

याच वेळीं मौजे आळंदी ( चोराची ) येथें माघ शुद्ध त्रयोदशीस श्री. सवाई माधवरावसाहेब यांनीं माधवराव कृष्ण व भिवराव यशवंत यांना अर्धा चाहूर जमीन इनाम दिली.

मौजे **नाणवली** हा गांव महादजी शिंदे यांनीं शके १७०० माघ वद्य त्रयोदशी रोजीं माधवराव कृष्ण व भिवराव यशवंत यांस ( सर देशमुखी व मोकासा या हक्कां-

खेरीज ) इनाम दिला ( परिशिष्ट क्रमांक २४ पहा ). हा गांव पाटील बाबांनीं इनाम देण्यास एक कारण घडलें होतें. पाटील बाबा या वेळीं उत्तरेंतून इकडे आले होते व त्यांचा पुणें येथील कारभाऱ्यांशीं अद्यापि एक जीव झाला नव्हता. अशा वेळीं विश्वासराव पानसे यांना त्यांनीं आपल्या विश्वासांत घेतलें होतें. ( बहुधा त्यांच्या तर्फे पाटील बाबा व नाना फडणीस यांची दिलजमाई झाली असावी. भिवराव तर या खटपटींत होते हें वर आलेंच आहे. ) त्या साठीं पाटील बाबांनीं हें इनाम दिलें असावें. हा गांव इंग्रजी अम्मल सुरू होई पर्यंत पानशांकडे होता. इंग्रजी झाल्या नंतर शिंदे यांनीं महाराष्ट्रांतील आपला कांहीं प्रांत ( आपलें माळव्यांतील राज्य-सलग राहण्यासाठीं म्हणून ) इंग्रजांना दिला व त्याच्या मोबदल्यांत उत्तर हिंदुस्था-नांत स्वतःसाठीं नवीन ( इंग्रजांचा ) प्रांत मिळविला. त्या मोबदल्यांत नाणवली गांव इंग्रजांच्या खालशांत गेला. त्या ऐवजीं उत्तरेकडे पानशांना आपण दुसरा गांव देऊं असें ग्वाल्हेर दरबारानें ठरविलें होतें; परंतु, त्या मोबदला जो गांव मिळावयाचा तो अद्याप पर्यंत मिळाला नाहीं. माशानें माणिक गिळलें !

मौंजे पानगांव, सरकार परंडे येथील मोकासा, निंबाजी नाईक निंबाळकर यांजकडे, पेशवे सरकारांनीं दिला होता; तो त्यांच्या कडून काढून घेऊन त्यांनीं माधवराव कृष्ण व भिवराव यशवंत यांना शके १७०० च्या मार्गशीर्ष वद्य द्वितीयेस दिला ( परिशिष्ट क्रमांक २५ पहा ).

याच वर्षीं दिवे या गांवीं श्री. सवाई माधवरावसाहेब यांनीं माधवराव कृष्ण व भिवराव यशवंत यांना आणखी साडेवीस बिघे जमीन इनाम करून दिली.

मौंजे **तुळजापूर** हा गांव इनाम मिळाल्याचें एक पत्र आढळलें आहे; तें वर सांगितलेल्या मोकासा इनामाच्या नंतर दोन दिवसाचें आहे. या वरून असें दिसतें कीं, गांव इनाम दिल्याचें पूर्वीं ठरलें असावें व राजपत्र मात्र व्हावयाचें राहिलें असावें. त्या नंतर प्रथम मोकासा इनाम करून त्याचें इनाम पत्र घेतलें असावें व मग सबंध गांवचें इनाम पत्र घेतलें असावें किंवा हें गांवचें इनाम पत्रवार व्हावयाचें राहिलें असावें ( परिशिष्ट क्रमांक २६ पहा ).

[ हे तुळजापूर नगर जिल्ह्यांत आहे. सोलापुराकडे असलेलें भवानीचें प्रसिद्ध तुळजापुर तें हें नव्हें. ]

शके १७१४ सालीं पानसे यांच्या घराण्यांत ज्या वृत्ति, जमिनी, पाटील कुळ-करणादिक वतनें, वाडे, इनाम गांवें वगैरे चालत होतीं, त्यांची एकत्र यादी आढळली आहे तीः--

**१ इनाम जमिनी**—मौंजे सोनोरी येथील इनाम—

१ मार्तंडाचा बाग. २ गणपतीचा बाग. ३ पांढरी शेत.
४ वळतीचें कुरण. ५ मांगदरा. ६ हत्तीचें शेत. ७ पठार.

मौजे बावडे तालुके इंदापूर येथील इनाम.
मौजे कासुर्डी येथील इनाम चाहूर एक.
मौजे दिवें येथील इनाम.
मौजे काळेगांव येथील इनाम.
मौजे आळंदी ( चोराची ) येथील इनाम.

२ **जोशी कुळकरणी वतनें**:-१ मौजे सोनोरी, २ मौजे दिवें, ३ मौजे शिवरें


३ **शेटेपण**:--१ मौजे सोनोरी. २ मौजे दिवें. ३ मौजे जेजुरी, ४ मौजे बेलवंडी ५ मौजे काळेगांव.

४ **पाटिलक्या**:--१ मौजे काळेगांव. २ मौजे सावरदरी.

५ **वाडे**:—१ मौजे सोनोरी २ मौजे दिवें. ३ कसबे पंढरपूर ४ कसबे पानगांव.

६ **मोकासा**—१ कसबे पानगांव २ मौजे सोनोरी.

७ **इनाम गांवें**:—१ मौजे सोनोरी. २ मौजे तुळजापूर. ३ मौजे सावरदरी. ४ मौजे वनपुरी. ५ मौजे नाणवली. ६ मौजे सांगवी. ७ मौजे गंगापूर.



# प्रकरण सहावें.

## १. पानशांच्या घरांतील वांटप.

कृष्णाजी माधवराव व भिवराव यशवंत हे वारल्यानंतर पानशांचा मुख्य सरंजाम माधवराव कृष्ण यांच्या नांवानें सुरू झाला. माधवरावाबरोबर सखारामपंत हे तोफखान्याचें कामकाज पाहात असत. माधवराव यांच्या कारकीर्दीत १६२३१ रुपयांचा सरंजाम ठरला गेला. त्यांत ५८२१ रुपये नक्त मिळत होते. बाकीच्या १०४१० रु. बद्दल गांवें वगैरे जहागिरीदाखल मिळालीं होतीं.

कृष्णराव माधव वारले त्या वेळीं भाऊबंदांसकट हा सरंजाम ६७ हजार रुपयांचा होता. पुढें १७०० मध्यें तो ६८ हजारांचा झाला आणि शके १७०१ मध्यें त्याची ७४११७ रुपयांपर्यंत वाढ झाली. या ७४११७ रु.च्या सरंजामांत पुढीलप्रमाणें भाऊबंदांची वांटणी होती.

शके १७१० व १७१२ सालीं झालेल्या वांटणीपत्रकांच्या नकला आढळल्या आहेत, त्या हि खालीं दिल्या आहेत.

## शके १७०१ चें वांटणी–पत्रक.

| नांव | स्वतःसाठीं | शागीर्दपेशासाठीं | कापडासाठीं | एकूण. |
|---|---|---|---|---|
| १ माधवराव कृष्ण ... | १५००० ... | २३१ ... | १००० ... | १६२३१ |
| २ सखाराम यशवंत ... | ७००० ... | २३१ ... | १००० ... | ८२३१ |
| ३ गणपतराव विश्वासराव | ८००० ... | २३१ ... | ५०० ... | ८७३१ |
| ४ श्रीपतराव कृष्ण ... | १००० ... | ० ... | ० ... | १००० |
| ५ नीलकंठराव भिवराव... | १५००० ... | २८६ ... | १००० ... | १६२८६ |
| ६ जयवंतराव यशवंत... | १०००० ... | २३१ ... | ५०० ... | १०७३१ |
| ७ रंगराव पुरुषोत्तम ... | ४००० ... | २३१ ... | ५०० ... | ४७३१ |
| ८ केशवराव व्यंकटेश... | ७००० ... | १७६ ... | १००० ... | ८१७६ |
| एकूण | ६७००० | १६१७ | ५५०० | ७४११७ |

## शके १७१० चें वांटणी–पत्रक.

| | शागीर्दपेशासुद्धां स्वतःसाठीं | कापड. | एकूण. |
|---|---|---|---|
| १ माधवराव कृष्ण ... | १५२३१ ... | ४०० ... | १५६३१ |
| २ नीलकंठराव भिवराव... | १५६८६ ... | ४०० ... | १६०८६ |

[illegible] पानसे.

डा. गोविंदराव विनायक पानसे. B E

| | शागीर्दपेशासुद्धां स्वतःसाठीं | | कापड. | | एकूण. |
|---|---|---|---|---|---|
| ३ जयवंतराव यशवंत ... | १०२३१ | ... | २०० | ... | १०४३१ |
| ४ सखाराम यशवंत ... | ७२३१ | ... | ४०० | ... | ७६३१ |
| ५ गणपतराव विश्वनाथ | ८२३१ | ... | २०० | ... | ८४३१ |
| ६ केशवराव व्यंकटेश ... | ७१७६ | ... | ४०० | ... | ७५७६ |
| ७ रंगराव पुरुषोत्तम ... | ४२३१ | ... | २०० | ... | ४४३१ |
| ८ गोपाळराव जयवंत ... | ५०० | ... | ८०<br>* १००० पालखीबद्दल | } | १५८० |
| ९ श्रीपतराव कृष्ण ... | ६२१ | ... | ६०<br>* १०००पालखीबद्दल | } | १६२१ |
| १० बळवंतराव नरसिंह*... | १००० | ... | १२०<br>*१०००पालखीबद्दल | } | २१२० |
| | | | | | ७५५३८ |
| शिवाय कारकून मुजुमदार वगैरेबद्दल ... ... ... ... | | | | | २००० |
| नीलकंठराव भिवराव यांचे हत्तीचे नेमणुकीस ... ... ... | | | | | ८०० |
| नगारखान्याबद्दल ... ... ... ... ... ... ... | | | | | ३००० |
| | | | | | ८१३३८ |

## शके १७१२ चें वांटणी-पत्रक

| नांव | | | | | रुपये. |
|---|---|---|---|---|---|
| १ माधवराव कृष्ण | ... | ... | ... | ... | १५००० |
| २ नीलकंठराव भिवराव | ... | ... | ... | ... | १५००० |
| ३ जयवंतराव यशवंत | ... | ... | ... | ... | १०००० |
| ४ सखाराम यशवंत | ... | ... | ... | ... | १०००० |
| ५ व्यंकटराव केशव | ... | ... | ... | ... | ७००० |
| ६ पुरुषोत्तम यशवंत | ... | ... | ... | ... | ४००० |
| ७ श्रीपतराव कृष्ण | ... | ... | ... | ... | १००० |
| ८ विश्वासराव यशवंत | ... | ... | ... | ... | ८००० |
| वरील आंकडे स्वतःसाठीं असलेल्या रकमेचे असावेत असें वाटतें. | | | | | |
| शागीर्द व कापड यांसाठीं मिळणारी रक्कम वेगळी असावी. | | | | | ७०००० |

---

*बळवंतराव नरसिंह हे कोण, यांनीं काय कामगिरी केली वगैरेचा तपास लागत नाहीं.

| | |
|---|---|
| शिवाय–पालख्या ९. दर पालखीस १००० रु. प्रमाणें ... | ९००० |
| शागीर्द २८ ... ... ... ... | १६८० |
| सोनोरीची शिवंदी गडसुद्धां ... ... ... | ३००० |
| कापड ... ... ... ... ... | २००० |
| | ८५८८० |

वरील शके १७०३ च्या वांटणी–पत्रका लगत सरंजामास जीं गांवें दिलीं होतीं, त्यांची यादी गांवचे उत्पन्नासह दिलेली आहे ती अशी:—

| गांवाचें नांव | उत्पन्न रुपये | गांवाचें नांव | उत्पन्न रुपये |
|---|---|---|---|
| १ पानगांव पो सुरडी | १५७४०८७ | १३ पालवण पैकीं गांवें १९ | २५२०८१५ |
| २ मौजे मालवडी ... | १७८६८१ | १४ मौजे सुशी .. ... | १८३८१० |
| ३ मौजे पिंपरी ... | १७७१८१०८९ | १५ मौजे तांदुळवाडी ... | १७४८११ |
| ४ मौजे घाणेगांव ... | १८१०८१२८३ | १६ मौजे भाईरे ... ... | १२०० |
| ५ मौजे साकत ... | १४७१८८८९ | १७ नांदुरे पैकीं गांवें ४ ... | ३००० |
| ६ मौजे मानेगांव ... | १२९७८७८६ | १८ मौजे दहिवडी प्रांत सांगोलें | २००० |
| ७ मौजे गुळपोळी... | १५८०८११ | १९ शेत सनदा ... ... | २०० |
| ८ मौजे उंडेगांव ... | ९१०८११ | २० वेलवंडी, चांभार गोंदें ... | ११२४८४ |
| ९ मौजे काळेगांव... | ८१२ | २१ अहिर वाडी गांवें ४ ... | ५२४८८७ |
| १० मौजे पडसांगवी | ९९४८३८६ | २२ आळंदी तर्फ सांडस ... | २०२०८८ |
| ११ मौजे रास्तापूर... | ५१४८१०८६ | २३ मौजे कोंडाणें ... ... | १२६० |
| १२ तर्फ मानूर पैकीं मुरशतपूर, सोनगांव, नायगांव | १३५६८१२ | २४ डोंगरगण ... ... | १९५४८१० |
| | | २५ शेवगांव वगैरे गांवें ४ | २४७५८८ |
| | | | ४०१३७८४८३ |

जयवंतराव यशवंत हयात असतां त्यांचे चिरंजीव गोपाळराव हे सरकारच्या फौजां-बरोबर स्वारी शिकारीवर जात असत. त्यांत त्यांनीं मर्दुमकीचीं कामें बरीं च केलीं, यामुळें त्यांना शके १७०१ च्या चैत्र शुद्ध अष्टमीस स्वतंत्र पालखीचा मान मिळाला. त्या साठीं एक हजार रुपये हि सालिना सरकारांतून मिळूं लागले. त्या वेळीं पाल-खीचा मान, सरकारानें कोणास दिल्यास, त्याच्या खर्चासाठीं म्हणजे, भोई, दिवटे, पालखीचें कापड वगैरे करितां म्हणून दर वर्षीं एक हजार रुपये सरकार देत असे. ही खर्चाची नेमणूक तत्कालीन कागद पत्रांतून पुष्कळदां आढळते. जयवंतराव यांनीं **महीच्या** युद्धांत पराक्रम गाजविल्याचें मागें आलेंच आहे. या खेरीज **गोहदचा** किल्ला मराठ्यांनीं घेतला, तेव्हां हि त्यांनीं मर्दुमकी केली. विशेषतः यांच्या शौर्यानें च गोहदगडावर पेशव्यांचें निशाण चढलें. आनंदमोगरी, बावापीर घाट व रासदेहर वगैरे

भागांतील मोहिमांत त्यांनीं उत्कृष्ट कामगिरी केली; म्हणून पेशवेसरकारनीं तोफखान्याच्या मजूमचा दरख व मौजे सांगवी तर्फ सांडस हा गांव जयवंतरावाच्या मातोश्रीचे खर्चाकरितां इनाम करून दिला ( परिशिष्ट क्रमांक २८ पहा ). जयवंतराव यांच्या मातोश्री पुढील आयुष्य धर्मकृत्यांत घालविण्यासाठीं या वेळीं भीमातीरीं राहण्यास गेल्या होत्या. हा गांव शके १७४२ पर्यंत जयवंतरावांच्या वंशजांकडे होता. पुढें जयवंतरावाचे चिरंजीव गोपाळराव वारल्यानंतर त्यांच्या दोन स्त्रिया येसूबाई व निराबाई आपसांत भांडूं लागल्या. भांडणाचा निकाल होई पर्यंत इंग्रज सरकारांनीं गांव जप्तींत ठेविला, व बायांस पेन्शन करून दिलें. तें बायांच्या मृत्यूपर्यंत चालू होतें. नंतर पुढें जयवंतराव यांचे नातू नारायणराव गोपाळ यांनीं गांवची जप्ती उठवावी म्हणून इंग्रजांस विनंति केली. परंतु गांवाबद्दल पेनशन दिलें आहे, सबब गांव परत देतां येत नाहीं, असें इंग्रज सरकारांनीं सांगितलें, तेव्हां पासून आतां पर्यंत गांव मिळण्याची खटपट पुष्कळ केली, परंतु गांव मिळाला नाहीं.

## २. सीताराम अय्याचा खून.

शके १७०३ च्या सुमारास सोनोरी येथें एक गोष्ट घडली. गोष्ट जरा विशेष प्रकारची घडली, त्यामुळें तिचा परिणाम पानशांच्या घराण्यावर, तेव्हांपासून आज-काल पर्यंत घडत आला आहे. आज हि मधून मधून तो परिणाम या घराण्यास जाणवत आहे. ही गोष्ट पुढील प्रमाणें आहे.

सोनोरी येथें पानशांचे घरीं सीताराम अय्या नांवाचा एक तेलंगी ब्राह्मण शागीर्द म्हणून नौकरीस होता. शागिर्दाचें काम म्हणजे देवपूजेचें साहित्य तयार करणें, पाट पान करणें यजमानांचें सोवळें ओवळें ठेवणें वगैरे असे. त्यानें पुष्कळ दिवस नौकरी केली. म्हातारपणीं यजमानांची परवानगी घेऊन त्यानें देशीं जाण्याचें ठरविलें. परत जातांना त्याच्या मतीस विकार होऊन, त्यानें देवघरांतील देवांच्या अंगावरील सोन्यामोत्यांचे दागिने चोरले. ते घेऊन तो सोनेरी सोडून निघाल्यानंतर थोड्याच वेळानें ही गोष्ट उघडकीस आली. तेव्हां, त्याचा संशय येऊन, तत्कालीन रीतीस अनुसरून ही बातमी पानशांनीं पाटलाच्या कानांवर घातली. पाटलानें त्या गांवच्या रखवालदार व बेरड लोकांना बोलावून आणून त्यांना ह्या चोरीचा तपास लावून चोर व चोरीचा माल घेऊन येण्याचा हुकूम केला. बेरडांपैकीं कांहीं जणांनीं त्या ब्राह्मणाचा माग काढून दिवे घाटाच्या आसपास त्याला धरलें. त्यांनीं त्याला पकडलें खरें, परंतु तो सोनोरीस परत येईना, तो सशक्त व धट्टाकट्टा असल्यानें त्यानें बेरडांशीं दोन हात केले. त्या वेळीं बरीच धिंगामस्ती झाली व एक दोन बेरड जखमी हि झाले. त्यामुळें चिडून त्या बेरडांनीं ह्या ब्राह्मणास तेथें ठार केलें व चोरीस गेलेला माल परत आणला. हा ब्राह्मण मेल्याचें ऐकून पानशांच्या मनास धक्का बसला. पुढें हें वर्तमान पुण्यास सरकारांत

समजलें. तेव्हां ब्रह्महत्या झाल्याचें समजल्यामुळें सरकारानें या प्रकरणाची चौकशी चाल-विली; त्या कामांत दिवे व सोनोरीच्या पाटलास सर्व बेरड पकडून पुण्यास पाठविण्या-बद्दल हुकूम आला. त्या प्रमाणें सर्व बेरडांना पुण्यास पाठविण्यांत आलें. तेथें त्यांची सर्व चौकशी झाली व खरी हकीकत समजल्यानंतर बेरडांना दोषमुक्त करून सोड-ण्यांत आलें.

या ब्रह्महत्येचा परिणाम मात्र पानशांच्या मनावर त्या वेळीं बराच झाला व अद्यापि हि भाविक पानसे मंडळींच्या मनावर तो थोडा बहुत अंमल करीत आहे. हा ब्राह्मण पिशाच्च झाला असून तो पानसे घराण्याला मधून मधून त्रास देतो अशी या भाविक मंड-ळींची समजूत आहे. तो पिशाच्च रात्रीं बेरात्रीं घरांत फिरतो, घरांतील बायका मुलांना त्रास देतो, त्यांच्या शरीरप्रकृति नीट राहूं देत नाहीं व वंशवृद्धि होऊं देत नाहीं, इत्यादि प्रत्ययाच्या गोष्टी होतात असें सांगतात. याला उपाय म्हणून ते मधून मधून मांत्रिक व दैविक वगैरे उपचार करीतच असतात. सीताराम अय्या हा ब्रह्मचारी होता सबब त्याचे नांवानें प्रत्येकानें निरनिराळे पिंपळाचे वृक्ष लावून त्यास दगडी पार बांधून त्यावर त्याची स्थापना केली आहे. हा सर्व धार्मिक भावनेचा परिणाम आहे. पण, ती खरी आहे असें मानणारा समाज, ती खोटी आहे असें मानणाऱ्या समा-जापेक्षां मोठा आहे, एवढें मात्र खरें !

## ३. स्वराज्यांतील चोरीचा तपास लावण्याची पद्धति.

स्वराज्यांत खेड्यापाड्यांनीं चोरीचा शोध लावण्याची रीति जुने कागदपत्र पहात असतां आम्हांस आढळली, त्याबद्दल येथें थोडीशी हकीकत सांगितली, तर ती अप्रा-संगिक होणार नाहीं; असें समजून ही माहिती देतों. स्वराज्यांतील ही तपासाची पद्धति बिन खर्चाची, बिन खटपटीची व लवकर निकालांत निघणारी अशी असे. त्यासाठीं आपला गांव सोडून जावें लागत नसे. शिवाय, तपास करणाऱ्या अंमलदारांच्या कचेऱ्यांत हेलपाटे घालणें, हरघडी तेथील अपमानकारक संभावना सहन करणें हा ही त्रास नसे. चोरीच्या मालास मुकलेलें पुरविलें, पण अधिकाऱ्यांची त्रासदायक चौकशी नको अशी हल्लींसारखी परिस्थिति त्यावेळीं नव्हती. गांवांत ज्याच्या घरीं चोरी होई तो चोरीची खबर गांवच्या मुकदमा ( पाटला ) स देई. पाटील गांवच्या सर्व महार रामोशी बेरड वगैरे रखवालदारांस बोलावून आणून त्यांना त्या चोरीचा तपास लावण्यास फर्मावी. त्यांनीं चोरीचा तपास न लाविल्यास त्यांच्याकडून चोरीस गेलेला माल भरून घेण्यांत येई, म्हणजे एक प्रकारें चोरीची हमीदारी या रखवालदारांवर टाकण्यांत येई; आणि त्याला कारण हि तसेंच असे. कारण चोर लोक बहुधा याच वर्गांतील असत. पाट-लानें हुकूम दिल्या नंतर हे रखवालदार चोरीचा माग काढीत. तो माग आपल्या गांवच्या बाहेर निघून जर दुसऱ्या गांवांत गेला असें आढळलें तर, त्या दुसऱ्या गांवच्या

रखवालदारांच्या अंगीं ती चोरी सोंपवीत व त्याचें काम पुरें होई म्हणजे यापुढें त्या दुसऱ्या गांवच्या रखवालदारांनीं एक चोरी तरी पकडून द्यावी किंवा आपल्या गांवांतून चोराचा माग तिसऱ्या गांवी गेला आहे असें तरी सिद्ध करून द्यावें. या शिवाय त्यांना तिसरा उपाय नसे. अशा रीतीनें या गांवाहून त्या गांवीं या प्रमाणें तपास करीत. चोर जेथें गेला असेल तेथपर्यंत माग काढून, अखेर चोर पकडीत. एकाद्या गांवांतून पुढें माग निघत नसेल व त्या गांवींहि चोर सांपडत नसेल, तर त्या गांवच्या रखवालदारांना वर सांगितल्या प्रमाणें चोरीच्या मालाची भरपाई करावी लागे. सारांश, एक तर चोर सांपडून त्याच्याकडून मालकास माल परत मिळे किंवा न सांपडला तरी रखवालदारांकडून मालाची किंमत मिळे. अशा रीतीनें स्वराज्यांत घर बसल्या चोरीस गेलेला माल मिळे, अगर मालाची किंमत मालकास मिळे.

वरील तपासाच्या पद्धतीमुळें चोऱ्या फारशा किंबहुना मुळीं च होत नसत. पूर्वीं वृद्ध माणसांच्या तोंडून असें ऐकण्यांत येत असें कीं, खेड्यांपाड्यांत घरांस कुलुपें लावण्याची फारशी पद्धति नव्हती, दारास कडी घालून घरच्या मालकानें खुशाल बाहेर जावें, चोरीची धास्ती त्यास बिलकूल नसे. कांहीं कांहीं कोनाकोपऱ्यांतील खेडेगांवांत, अद्याप ही रीति आढळून येते.

## ४. पूर्वींच्या कांहीं चाली-रीति.

पूर्वीं प्रत्येक जातींतील लोकांस आपले पेहराव, समाजांतील वागणूक, लग्न कार्यांतील मिरवणुकी वगैरे संबंधानें हि पूर्वापार चालत आलेल्या नियमानुसार वागावें लागत असे. गुरव, सुतार, सोनार, न्हावी, धोबी, माळी, चांभार, महार वगैरे प्रत्येक जातींतील लोकांनीं आपलीं पागोटीं कोणत्या तऱ्हेनें बांधावीं, अंगरखे, बंड्या कोणत्या तऱ्हेच्या कराव्या, धोतरें कोणत्या तऱ्हांनीं नेसावीं, गंध कसें लावावें, मिरवणूकी कशा रीतीनें काढाव्या वगैरे अगदीं बारीक सारीक गोष्टींत हि निर्बंध घालून दिलेले असत. या नियमांचें उल्लंघन झाल्यास गांवकरी पंच त्या संबंधांत पंचाईत बोलावून त्याची चौकशी करीत व झालेल्या गुन्ह्यांबद्दल दंडाची शिक्षा करीत.

सोनोरी येथें मंगनाथ वल्लद बकनाक महार यांनीं आपल्या मुलाचे लग्नाचे वेळीं नवरा नवरी घोड्यावर बसवून ग्रामदैवत भैरवनाथ याचे दर्शनाकरितां मिरवत आणली. महारांनीं मिरवणूक बैलावर बसून काढली पाहिजे, हा त्या वेळचा नियम मोडल्याबद्दल गांवपंचानें त्यांस प्रश्न विचारला. त्यांनीं पुण्याकडे अशी मिरवणूक काढतात असें सांगितलें. पंचांनीं तसा पुरावा दाखल करण्याबद्दल त्यास पंधरा दिवसांची मुदत दिली. महार लोकांत घोड्यावरून मिरवणूक काढण्याची त्या वेळीं कोठें च चाल नसल्यामुळें मंगनाक यास तसा पुरावा मिळाला नाहीं. शेवटीं त्यांनीं झालेल्या चुकीबद्दल माफीची याचना करून असें वर्तन फिरून घडणार नाहीं, असें पत्र लिहून

दिलें. त्यावरून त्यास पंचानें माफी दिली. हें माफी--पत्र वैशाख वद्य ७ चें आहे. शकाचा आंकडा कसरीनें गिळंकृत केल्यामुळें समजण्यास मार्ग नाहीं. वरील घालून दिलेल्या नियमानें पूर्वीं मनुष्य पाहिल्या बरोबर त्याची जात समजत असे. आतां अशा तऱ्हेचे निर्बंध नाहींसे झाले आहेत. यजमानानें पुढें पाठविलेल्या चाकरास यजमान समजून त्याची वरदास्त ठेविली गेल्याचीं उदाहरणें अलीकडे घडलीं आहेत !

## ५. कर्नल गॉडर्डचा पराभव !

वडगांवचा तह होऊन इंग्रज--मराठ्यांचें युद्ध जरी थांबलें तरी तो तह कायमचा टिकला नाहीं. तहांत ठरल्याप्रमाणें श्रीमंत दादासाहेब हे पाटीलबावाबरोबर झांशी-कडे कायम राहण्यासाठीं म्हणून निघाले असतां, वाटेंत शके १७०१ च्या आषाढ महिन्यांत निसटून ते सुरतेस गेले व फिरून इंग्रजांच्या कच्छपीं लागले. इंग्रजांनीं हि त्यांना मदत देण्याचें कबूल करून त्याप्रमाणें क. गॉडर्ड याचे हाताखालीं सैन्य देऊन त्याची गुजराथेंत रवानगी केली. इकडे पेशव्यांनीं त्यास तोंड देण्याकरितां पाटील-बावा व होळकर यांना पाठविलें. शिवाय मागाहून दसऱ्याच्या मुहूर्तानें **विश्वासराव पानसे** यांजबरोबर तोफखाना देऊन त्यांची हि रवानगी केली. या वेळीं हि इंग्रजांनीं क. हार्टली याजबरोबर सैन्य देऊन त्यास क. गॉडर्ड याचे मदतीस पाठविलें. गॉडर्ड यांनीं जलदी करून प्रथम उभई व अमदाबाद हीं पेशवे सरकारचीं ठाणीं काबीज करून नंतर वसई घेतली; आणि कल्याणचें ठाणें सर करून बोरघाटापर्यंत चौक्या बसविल्या. या वेळीं इंग्रजांनीं आपल्या सैन्याचा मुख्य तळ वज्रजेगिणी ( हल्लींची वज्राबाई ) जवळ ठेविला होता. या वेळीं हरिपंत तात्यांचा मुक्काम दहिवेलीस व विश्वासराव पानसे यांचा बदलापुरास होता. इंग्रजी सैन्याचा बेत पुण्यावर स्वारी करण्याचा असल्यामुळें, तें बोरघाट चढून खंडाळ्याच्या मुक्कामास आलें. हरिपंत तात्यांनीं व पाटीलबावांनीं, ही गोष्ट ध्यानीं येतां च आपला तळ कारल्यास दिला व इंग्रजी सैन्याचे तोंडावर मारा सुरू केला. पानशांनीं आपला तोफखाना बदलापुराहून इंग्रज सैन्याच्या पिछाडीस आणून त्या बाजूनें हल्ला सुरू केला. अशा रीतीनें पानशांनीं इंग्रजी सेनेचा कोंडमारा करून त्यांची रसद बंद केली. शके १७०३ च्या चैत्र शुद्ध अष्टमीस इंग्रज हे आपल्या तीन पलटणी, ७०० घोडदळ, व दहा तोफा बरोबर घेऊन रसद आणीत असतां त्यांचेवर हल्ला करून चार हजार बैल, उंट, छकडे, तोफेचे गोळे, डेरे व इतर बरेंच सामान पेशव्यांच्या सैन्यानें लुटलें. क. गॉडर्ड यास रसद मिळेना, तेव्हां तो सैन्यानिशीं बारवाईकडे पळून जात असतां, पानशांनीं त्याज-वर तोफांची मारगिरी करून तीन कोस त्याचा पाठलाग केला. या मारगिरींत क. गॉडर्ड याचा भाचा व क. पारकर ( एक दुय्यम अधिकारी ) हे ठार झाले. क. गॉडर्ड पुढें मोठ्या हलाखीनें आणि कष्टानें पनवेलीस गेला. श्रीमंतांचे पुण्येंकरून इंग्रेज नामो-हरम झाला. या वेळीं गॉडर्ड म्हणाला " मराठी फौजेचें बळ भारी. त्यांत समोर उभे

राहून लढाई होत नाहीं. गोळा मारतां च चार चहूंकडे जातात. फिरून या फौजेस जमा कोण करतो ? ही कवाईत कोण्या तऱ्हेची ? या कवाईतीनें मराठी फौज आम्हांस सांपडत नाहीं. "

इकडे पुण्यास नानांनीं कारस्थान करून नागपूरकर भोंसले, निझाम, व हैदर यांना मिळवून सर्वांनीं एकदम उठून इंग्रजांस सतावून सोडण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें थेट मद्रासपर्यंत चाल करून हैदरनें इंग्रजांचा पिच्छा पुरविला. तेव्हां इंग्रजांनीं अखेरीस मराठ्यांशीं तहाचें बोलणें लाविलें व पाटीलबावांनीं मध्यस्थी करून शके १७०४ ( सन १७८२ ) अधिक ज्येष्ठांत सालबाईचा तह घडवून आणला. अशा रीतीनें हें युद्ध थांबलें.

## ६. बदामीचा वेढा व दोघे पानसे-बंधु.

शके १७०६ मध्यें टिपूनें पेशव्यांच्या प्रांतावर स्वारी केली. तत्पूर्वी बिदनुरास इंग्रजांची एक सबंध फौज कैद करून त्याला पाहिजे तसा तह त्यांच्याकडून त्यानें करून घेतला होता. त्यामुळें त्यास आपल्या सामर्थ्याचा गर्व झाला होता. त्यानें पेशव्यांचीं नरगुंद व कित्तूर हीं संस्थानें काबीज करण्यास फौज पाठविली व तीं हस्तगत केलीं. इकडे, आपला वकील पुण्यास पेशव्यांच्या दरबारीं पाठवून त्यानें सल्याचें बोलणें चालू च ठेविलें होतें. टिपू अत्यंत विश्वासघातकी होता. त्याची प्रतीति मराठ्यांना या व पुढील प्रसंगीं चांगली च आली. या वर्षी पेशवे व निझाम यांच्या फौजेची तयारी नसल्यानें, त्यांनीं टिपूकडे दुर्लक्ष्य करून पेस्तर सालीं त्याच्यावर मोहीम करण्याचें निश्चित केलें. हें वर्तमान समजल्यावर टिपू फार च शेफारला. त्यानें घटप्रभा व मलप्रभा दुआबांतील पेशव्यांचा प्रांत घेऊन, थेट मिरजेवर हि स्वारी करण्याची तयारी केली. तेव्हां नानांनीं त्याच्यावर स्वारी करण्यासाठीं तयारी चालविली. नागपूरकर भोंसल्याची समजूत पाडून, मदतीस येण्याविषयीं नानांनीं त्याचें वचन घेतलें. शके १७०७ च्या श्रावण महिन्याचे अखेरीस हरिपंत तात्यांनीं सुमुहूर्तानें वानवडीवर डेरे दिले. कार्तिक अखेर सर्व फौजा जमा झाल्या. तुकोजी होळकर पुण्यांत च होते. ते व तात्या कूच करून निघाले. मागून चार पांच दिवसांनीं खुद्द नाना व आपल्या तोफखान्यासह जयवंतराव आणि सखारामपंत पानसे हे दोघे बंधु त्यांच्या पाठोपाठ निघाले. मुधोजी भोंसले हि वाटेंत त्यांना येऊन मिळाले. पुढें त्या सैन्यास यादगिरी येथें निझामअली आपल्या सैन्यासुद्धां येऊन सामील झाला. टिपूचा एक सरदार सैदबुरान हा कित्तूरकडे होता, त्याचा समाचार घेण्यास त्याच्या तोंडावर गणेशपंत बेहेरे हे गेल्या वर्षापासून बसले च होते. त्यांच्या मदतीस आतां होळकरांना पाठविण्यांत आलें. नानांनीं व निझामानें प्रथम बदामी काबीज करण्याचें ठरविलें. पण बदामीजवळ जातां च दोघांत कांहीं कारणांनीं बेबनाव झाल्यामुळें निझामअली स्वतः परत निघाला. नानांनीं त्याची पुष्कळ समजूत घातली, पण तो राहीना. माल

त्यानें आपल्या तहवारजंग नांवाच्या एका सरदारास पंचवीस हजार सैन्य देऊन मराठ्यांच्या मदतीस ठेविलें.

टिपूनें बदामीच्या किल्ल्याचा बंदोबस्त फार उत्कृष्ट ठेविला होता; त्यांत हि तो किल्ला पूर्वीपासून मजबूत म्हणून प्रसिद्ध होता. अशा त्या किल्ल्यास मराठ्यांनीं वैशाखांत अक्षय्य तृतीयेस वेढा देऊन मोर्चेबंदी केली. आंतील लोकांनीं मराठ्यांचे मोर्चे उठवावे म्हणून शिकस्त केली, तथापि दररोज त्यांचे मोर्चे पुढें पुढें सरकत च होते. इतक्यांत पाऊण लाख फौज घेऊन टिपूनें पट्टण सोडून बदामीकडे रोख वळविल्याची बातमी आली; तेव्हां नानाचा धीर सुटला. किल्ल्यास वेढा घालून अठरा दिवस झाले, तरी किल्ला हस्तगत होत नाहीं हें पाहून नानांनीं परत पुण्यात जाण्याचा बेत केला. जयवंतराव पानसे यांस हा बेत कळतां च ते नानाकडे गेले व म्हणाले कीं, वेढा पूर्ण होऊन आतां च शत्रूची गळचेपी सुरू जाहली आहे. या वेळीं आपण घावरण्याचें कांहीं च कारण नाहीं. नानास रणांगणावरलि युद्धकौशल्याचें ज्ञान अगदीं बेताचें च असल्यामुळें, या बोलण्यावर त्यांचा भरंवसा बसेना. जेव्हां जयवंतराव यांनीं छातीस हात लावून प्रतिज्ञेनें सांगितलें कीं, दोन दिवसांत किल्ला सर करतों, तसें न झाल्यास आपल्यास वाटेल तें करावें. नानांनीं ही गोष्ट मान्य करून पुण्यास परत फिरण्याचा बेत रहित केला. पानशांनीं रात्रंदिवस काम चालवून किल्ल्याचे तटाखालीं भुयारें खोदून त्यांत दारूचे बुधले भरले व शत्रूवर बाहेरून तोफांचा मारा करून त्यास किल्ल्याबाहेरील, चालविलेल्या या उद्योगाचा सुगावा लागूं दिला नाहीं. नंतर तोफांची नीट मांडणी करून मारागिरी सुरू केली. जयवंतराव व सखारामपंत हे दोघे पानसे बंधु, मोठमोठ्या तोफा स्वतः डागूं लागले. किल्ल्यांत शत्रुसैन्याची अशा रीतीनें धांदल उडवून दिल्यावर, त्यांनीं युक्तीनें तटाखालील सुरुंगांस आग लावून दिली. त्या सुरुंगांच्या धडाक्यामुळें तट जागजागीं पडून त्यांत अनेक खिंडारें झालीं व शत्रु उघडा पडला. अशा रीतीनें विसाव्या दिवशीं म्हणजे वैशाख वद्य सप्तमीस पानशांनीं केलेल्या प्रतिज्ञेप्रमाणें किल्ला पेशव्यांच्या ताब्यांत आला.

बदामी घेतल्यावर नाना पुण्याकडे परत फिरले. त्यांच्या बरोबर जयवंतराव पानसे हि पुण्यास आले. जयवंतराव यांची प्रकृति अलीकडे बिघडत चालली होती म्हणून आराम घेण्यासाठीं ते पुण्यास आले. बदामी घेण्यांत मुख्यतः तोफखान्याची मदत चांगली झाली. तोफांच्या अभावीं हा बळकट किल्ला पेशव्यांच्या हातीं आला नसता. बदामी नंतर सखारामपंतांनीं आपला तोफखाना टिपूचीं ठाणीं घेण्याकरितां गजेंद्रगडाकडे नेला, व मोठ्या शौर्यानें तें ठाणें त्यांनीं काबीज केलें.

## ७. टिपू व मराठे यांच्या चकमकी.

कर्नाटकांत या वेळीं. सावनूरकर नबाब संकटांत सांपडला होता. त्याला टिपूचे जरबेंतून सोडविण्यासाठीं बेहरे व होळकर यांनीं एका अहोरात्रींत चाळीस कोसांची

मजल मारून सावनूर गांठलें. तेव्हां सावनूरास असलेली टिपूची फौज पळून गेली. त्यानंतर टिपूनें मराठ्यांच्या मुख्य फौजेवर रात्रीचे चोरटे हल्ले अनेकदां केले. मराठे नेहमीं सावध असल्यानें त्याचा कांहीं उपाय चालला नाहीं. एकदां तर पहाटेच्या वेळीं प्रहर रात्र असतां खासा टिपूनें आपल्या सरंजामासुद्धां निघून, दोन टोळया करून तो नीट चालून आला. त्यानें छबिन्यावरून गोटाच्या अघाडीस तोफांची व बाणांची मारगिरी फार केली. सरकारची फौज तयार होऊन त्याच्या तोंडावर उभी राहिली. "सरकारच्या तोफा हि लागू केल्या......सूर्योदयापासून दोन प्रहर पावेतों परस्परें तोफांची मारगिरी जाहली. शत्रु तेथून माघारा अस्तमानास गेला." या मोहिमेंत पुणें येथील "तोफखान्यांतून बाणांची तरतूद होत आहे व तोफा थोर, रवाना करावयासाठीं बाहेर काढल्या......चाळीस शेरी तोफ एक आहे" या हकिकती-वरून इतक्या मोठ्या तोफा जयवंतरावांनीं बरोबर घेतल्या होत्या. एकदां शके १७०८ मार्गशीर्ष महिन्यांत टिपूनें एका बारींत मराठ्यांना कोंडलें होतें. त्यांत मोठमोठ्या तोफा अडचणीचे जागीं सांपडल्या. परंतु पानशांनीं आपल्या कौशल्यानें सर्व तोफां-सह ती फौज संकटांतून सुरक्षित बाहेर काढली. पुढें माघ महिन्याचे सुमारास तह करण्यासाठीं टिपूनें आपले वकील पेशव्यांकडे पाठविले. ते "होळकराचे अघाडीस... तोफखान्याचे पलीकडे" उतरले होते. सारांश या टिपूवरील पहिल्या मोहिमेंत पानशांनीं आपली कामगिरी चांगली बजाविली.

शके १७०९ च्या श्रावण मासीं दक्षिणा वांटतांना गणपतराव पानशांकडे दुसरा दरवाजा होता व तिसऱ्या दरवाज्यावर माधवराव कृष्ण हे असून त्यांनीं २८४१४ रु. ची दक्षिणा वांटली ( रावबाजी रोजनिशी पृ. २२७ ).

या नंतर दोन वर्षांनीं म्हणजे १७१२ मध्यें जयवंतराव यशवंत हे वारले. ते स्वारी शिकारीस जाणें झालें तर अग्निहोत्राच्या सर्व तयारीनिशीं जात असत. बरोबर त्यांची स्त्री हि असे. पानशांच्या घराण्यांत जयवंतराव हे फार धाडसी व शरीरानें धिप्पाड होते.

## ८. टिपूवरील दुसरी मोहीम ( धारवाडचा वेढा. )

बदामीच्या वेढ्याची म्हणजे च टिपूवरील पहिल्या मोहिमेची हकीकत वर आली आहे. त्यानंतर शके १७११ मध्यें पुन्हा टिपूवर दुसरी मोहीम करण्यास मराठे तयार झाले. वास्तविक या मोहिमेस मूळ प्रारंभ इंग्रजांकडून झाला व त्यांनीं निझाम आणि मराठे यांना मदतीस म्हणून बोलावून घेतलें. टिपूचा मुलुख जो जिंकला जाईल तो तिघांनीं आपसांत सारखा वाटून घ्यावा या अटीवर या मोहिमेसाठीं मराठ्यांनीं व निझामानें इंग्रजांना मदत देण्याचें ठरविलें. मराठ्यांचें सेनापतित्व **परशुरामभाऊ पटवर्धन** यांच्याकडे देण्यांत आलें. भाऊबरोबर पंचवीस हजार फौज व **माधव-राव कृष्ण पानसे** यांजबरोबर तोफखान्याचा मुबलक सरंजाम होता. तोफ-

खान्यांत मोठमोठ्या " पंधरा तोफा होत्या. बाकीच्या येणें आहेत. बैल आणावयासाठीं गेले आहेत. तोफखान्याचे सरदार रा. कृष्णराव पानसे यांचे चिरंजीव येतात. " त्याप्रमाणें शके १७१२ ज्येष्ठ शुद्ध पंचमीस " माधवराव कृष्ण स्वारीसमागमें यावयाकरितां आज मुहूर्त करोन निघोन बाहेर येऊन उतरले आहेत " ( खरे ऐ. ले. सं ४३३५ ). भाऊ हे सैन्य घेऊन तासगांवास आले व तेथेंच इंग्रजांचीं दोन पलटणें त्यांना येऊन मिळालीं. पावसाळा अर्धा अधिक संपल्यानंतर श्रावणांत भाऊंनीं तासगांवाहून कूच केलें. त्यावेळीं " तोफखाना पलटणासुद्धां गोकाक नजीक ( कृष्णा ) पार व्हावयास पाठविला. " तो " पार झाला. त्यास मनोळीच्या सुमारें जाण्याविषयीं पुढें भाऊंनीं आज्ञा केली, आणि त्यास मिळण्याविषयीं रामचंद्रपंत अप्पास कळविलें. स्वतः भाऊंनीं कृष्णापार होऊन व एकोडीचें ठाणें घेऊन टिपूचे प्रांतांत " हंगाम सुरू केला. " त्यांत त्यांनीं धारवाडचा किल्ला काबीज करण्याचें काम महत्त्वाचें ठरवून तिकडे रोख फिरविला. परंतु, धारवाड घेतांना शत्रूचा पायबंद आपल्यास बसूं नये म्हणून प्रथम त्यांनीं हुबळी, दोदवाड, मिस्त्रिकोट, लक्ष्मेश्वर, जडे, अनवटी वगैरे शत्रूचीं अनेक ठाणीं तोफांच्या बळावर हस्तगत केलीं आणि मग धारवाडास येऊन किल्ल्यास वेढा दिला ( भाद्रपद ).

धारवाडचा किल्ला मूळचाच मजबूत असून, टिपूनें या वेळीं त्याची आणखी जास्त मजबुती केली होती. किल्ल्यांत तेरा हजार शिबंदी व पन्नास साठ तोफा होत्या. हा किल्ला घेण्याचें फार बिकट काम आहे, म्हणून निझाम, इंग्रज व पेशवे यांच्या सेनापतींनीं एके ठिकाणीं बसून, कोणी कोणत्या बाजूनें किल्ल्यावर मारा करावा याबद्दलची योजना निश्चित केली. त्यांत किल्ल्यावर चढाई करण्याचा पहिला मान पेशव्यांस द्यावा असें सर्वानुमतें ठरल्यावरून माधवराव पानसे यांनीं आपल्या हातांनीं पहिली तोफ डागली. तिचा गोळा अचूकपणें किल्ल्यांत जाऊन पडला. हा शुभ शकुन समजून सर्व सैन्यांतील लोकांस हुरूप आला. अशा रीतीनें वेढ्याचें काम सुरू झालें. वेढा सुरू झाल्याचे दिवशीं " सरकारच्या तोफा लागू करून सवाशें दीडशें पर्यंत गोळे किल्ल्यांत टाकिले. " याप्रमाणें बहुधा रोज मराठ्यांची व आंतील किल्लेदाराची गोळागोळी होत असे. तत्रापि एकट्या तोफांच्या बळावर किल्ला लवकर हस्तगत होणार नाहीं, असें जाणून किल्ल्यांत जाणारी रसद लुटण्याचा हि एक प्रयत्न चालविला. पानशांनीं या धारवाडच्या वेढ्यांत ज्या प्रख्यात व लांब पल्ल्याच्या तोफा बरोबर घेतल्या होत्या त्यांतील प्रमुख तोफांचीं नांवें राम, दुर्गा, हणमंत, अस्मानतडाखा याप्रमाणें होतीं. पानशांचें म्हणणें कीं, " किल्ल्यास मोर्चे लावणें तेव्हां किमानपक्ष दहा हजार गारदी व पंचवीस तोफा पाहिजेत. " मध्यंतरीं रोज सकाळपासून तोफा किल्ल्यावर डागून मारा करीत व संध्याकाळीं परत गोटांत आणीत. मोठ्या तोफांसाठीं पुण्यास पत्र लिहून तेथून तोफा आणविल्या. " पुण्याहून गरनाळ रवाना झाली. "

तोफांचा सतत मारा व रसदीचा तुटवडा यामुळें किल्ल्यांतून दररोज दहा, वीस, पन्नास माणूस पळून जाऊं लागले. या वेळीं पुण्याहून नीलकंठराव भिवराव व केशवराव व्यंकटेश हे दोघे तोफखान्याचे मदतीस आले होते. त्यांनीं कांहीं तोफा किल्ल्याजवळील मैराळ नांवाच्या टेकडीवर नेऊन तेथून किल्ल्यावर मारा सुरू केला. हा मारा पूर्वींपेक्षां जास्त कारागर होऊं लागला. आश्विन शुद्ध नवमीस शत्रूनें मराठ्यावर किल्ल्यांतून जोराचा मारा केला. या दिवशीं दोघांत मातबर लढाई झाली. तींत दोन्ही पक्षांचें नुकसान झालें. या च दिवशीं माधवराव पानसे यांनीं दोन लहान तोफा घेऊन धारवाडच्या पेठेवर हल्ला केला, व शत्रूचें बरेंच नुकसान करून पेठ काबीज केली. पुढें किल्ला लवकर हस्तगत होत नाहीं म्हणून पेशव्यांच्या दिमतीस असलेला इंग्रज क. फ्रेडरिक यानें आपण स्वतः किल्ला घेतों अशी बढाई मारून व सर्व प्रकारची तयारी करून एके दिवशीं किल्ल्यावर हल्ला चढविला, परंतु किल्ल्यांतलि लोकांनीं वरून भयंकर आगीचा वर्षाव करून इंग्रजांना परत फिरण्यास भाग पाडलें. या हल्ल्यांत इंग्रजांचें पुष्कळ नुकसान झालें व घमेंडखोरीनें कोणाचें न ऐकल्यामुळें फजिती हि पदरीं पडली.

तोफखान्यांत या सुमारास साऱ्या दहा तोफा होत्या. त्यांपैकीं एक बिडी तोफ " होती ती फुटली. " बाकी नऊ राहिल्या, त्यांत दोन जंबुरे आहेत, ते उपयोगीं पडावयाचे नाहींत, बाकी राहिल्या सात; पैकीं पांच बिडी आहेत. त्यांचें बहुत बार काढतां येत नाहींत, फार बार काढल्यास जाया होतील हें भय. बाकी दोन तोफा मात्र पंचरशी चांगल्या आहेत. तेवढ्या मात्र चालतात. " यासाठीं पुण्याहून कारखान्यांतील मोठमोठ्या तोफा मागविल्या होत्या. कारण, " किल्ल्यावर चाळीस तोफा " होत्या. शत्रूस रसद न मिळूं देतां किल्ल्यांतील लोकांचा उपासमार करून किल्ला घ्यावा असा बेत होता. तरी पण, त्यांतल्या त्यांत त्या वेळीं कांहीं तोफा थेट किल्ल्यापर्यंत नेऊन व जोराचा मारा करून किल्ल्यावरील तोफा पाडाव केल्या. यानंतर पुण्याहून चार मोठ्या तोफा व चार हजार फौज पाठविली. ती मार्गशीर्ष अखेर धारवाडास येऊन पोहोंचली. या सर्व तोफा लावून फिरून किल्ल्यावर मारा केला. त्या वेळीं किल्ल्याचा फत्ते बुरूज ढासळला.

या वेळीं किल्ल्यांत कडक दुष्काळ पडून आंतील लोकांची विपत्ति वाढली. त्यांत मराठ्यांनीं आंतील लोकांस पाणी हि मिळूं देण्याचें बंद केलें. किल्ल्यांत फक्त एक च विहीर होती. तिचें पाणी दहा पांच हजार लोकांस कसें पुरणार ? म्हणून किल्लेदारानें भाऊकडे तहासाठीं वकील पाठविला, पण तह जमेना. इतक्यांत पानशांनीं तोफांच्या जोरावर खंदक हि काबीज करून घेतला. तेव्हां बद्रिजमाल खान किल्लेदार शरण आला. सात महिने किल्ल्यास वेढा पडला होता. कार्नवालीस यानें या वेळीं टिपूस दुसरीकडे अडकवून ठेविल्यामुळें त्याच्याकडून बद्रिजमालास बिलकुल मदत झाली नाहीं. त्यामुळें खानानें आपण होऊन किल्ला पेशव्यांचे हवालीं केला; व शके १७१३ चैत्र शुद्ध तृतीयेस पेशव्यांचें निशाण किल्ल्यावर चढलें.

या मोहिमेंत तोफखान्यांतील तोफांच्या माऱ्यांनीं खंदक काबीज करते वेळीं, नलिकंठराव भिवराव व केशवराव व्यंकटेश पानसे हे दोघे बंधु ठार झाले. या दोघांचे नातें आजा नातूचें होतें. या दोघां शूर व कर्त्या पुरुषांचा मृत्यु एका च वेळीं झाल्या-मुळें पानशांचे घरांत मोठा आकांत झाला. दोघांस हि पुत्रसंतति झाली नव्हती. दोघांच्या हि विधवा स्त्रिया त्यांच्या मागें हयात होत्या. हें सर्व दुःख स्वामिनिष्ठ पानशांनीं स्वराज्याच्या संरक्षणाकरितां गिळून या प्रसंगांत हि आपली वीरवृत्ति ढळूं दिली नाहीं.

## ९. सचिवप्रकरण.

शके १७१५ च्या सुमारास सचिवप्रकरण उद्भवलें असतां त्याच्या चौकशीचें काम सखारामपंत पानसे यांच्याकडे आलें होतें. या प्रकरणाची थोडक्यांत हकीकत पुढीलप्रमाणें आहे:— श्री. रघुनाथराव चिमणाजी सचिव हे शके १७१३ च्या सुमारास वारले आणि त्यांच्या जागीं त्यांचे पुत्र शंकरराव यांची स्थापना झाली. ते वयानें लहान असल्याच्या सबबीवर पेशवे सरकारांतून नानांनीं त्यांचें संस्थान चाल-विण्यासाठीं बाजीराव मोरेश्वर नांवाचा आपला एक हस्तक कारभारी म्हणून नेमला. सचिवांना सावत्र आई असून तिचें व त्यांचें वांकडें पडलें. ही सावत्र आई व कारभारी यांचें एकचित्त झालें व कारभारी, बाईच्या तंत्रानें वागूं लागला. त्यामुळें सचिवांचें व कारभाऱ्याचें वांकडें आलें. एके दिवशीं सचिवांनीं " मातोश्रीस अर्ज केला जे, वडिलांचा काळ होऊन फार दिवस झाले, अतःपर केश ठेवणें हें लोक-विरुद्ध आहे. बाईस हें मान्य होईना; सबब बलात्कारानें तिचे केश काढविले " त्या-मुळें मायलेंकरांतील भांडण जास्त विकोपास गेलें; आणि सचिवांच्या दौलतींत एकी-कडे सचिव व दुसरीकडे त्यांची सावत्र आई आणि बाजीराव दिवाण असे दोन पक्ष उघड उघड होऊन बखेडे माजत चालले. बाजीराव हा नानांनीं नेमलेला असल्या-मुळें त्यास वाटे कीं, आपण कांहीं केलें तरी चालेल. एके दिवशीं सचिवांच्या तयार केलेल्या स्वयंपाकांत आचाऱ्याकडून कोणीं विष घालविल्याचें उघडकीस आलें. तेव्हां, तत्काळ पंतसचिव हे घरांतून बाहेर पडले व कामापुरता लवाजमा बरोबर घेऊन जेजुरी येथें येऊन राहिले. त्यावर बाजीराव दिवाण यानें नानांना खोटें च कळविलें कीं, पंतांनीं सरकारची शिस्त मोडून बंड उभारलें आहे; तरी तें मोडण्यासाठीं सर-कारांतून स्वार शिबंदी पाठवावी. शिवाय नानांच्या विश्वासांतील एक तेलंगी ब्राह्मण होता त्याला मध्यस्थीबद्दल द्रव्य देण्याचें कबूल करून, बाजीरावानें त्याजकडून नानाला भलतें च समजाविलें. तेव्हां पांच सातशें स्वार व गारदी, शामराव बल्लाळ हिवरेकर याच्या हातांखालीं देऊन, नानांनीं त्यास बाजीरावाकडे मदतीस पाठविलें. त्यांना घेऊन बाजीरावानें राजगडास वेढा दिला, परंतु किल्लेदारानें त्याची डाळ शिजूं दिली

नाहीं. मग खास पंतसचिवांना धरावें किंवा साधल्यास मारून टाकावें असा बेत करून बाजीरावानें हिवरेकर यास पांच हजार रुपये व त्याचे जमातदार व कारकून यांना सोन्याचीं कडीं वगैरे बक्षिसें देऊं केलीं आणि त्यांस आपल्या दुष्ट मसलतींत सामील करून घेतलें. मग शामरावांचे लोक बरोबर घेऊन बाजीराव जेजुरीस अचानक गेला व पंतसचिव सोंवळ्यानें देवतार्चन करीत असतां त्यांच्यावर त्यानें छापा घातला. पंतांजवळ त्यावेळीं सारे दहा बारा माणूस होतें. प्रथम गारद्यांनीं खासा स्वारी सचिव यांच्यावर पांच सात गोळ्या घातल्या; पण, सुदैवानें त्यांना एकहि लागली नाहीं. मग ते गारदी जवळ येऊन पंतांना धरूं लागले, तेव्हां, पंतांनीं व त्यांच्या लोकांनीं गारद्यांशीं मोठ्या शौर्यानें दोन हात केले. त्या प्रसंगीं सचिवाकडील पांच दहा शिपाई व कांहीं ब्राह्मण मारले गेले, त्यांच्या पूजेच्या मूर्ति भ्रष्ट झाल्या व खुद्द पंतांना तरवारीच्या दोन जखमा झाल्या. त्यांच्या पत्नीस ( ही प्रख्यात सखारामपंत बापू बोकील यांची कन्या ) हि जखमा झाल्या. याप्रमाणें झाल्यावर पंतांना पकडून एक वस्त्रानिशीं बाजीरावानें जेजुरी येथें कैदेंत ठेविलें व त्यांची सर्व मालमत्ता लुटून घेतली. दुसरे दिवशीं हें वर्तमान पुण्यास महादजी शिंदे यांस कळलें. या वेळीं नानांचा कांहीं तरी दोष काढावा व तो श्रीमंतांना दाखवून त्यांची मर्जी नानांवर खप्पा करवून कारभारीपण आपल्याकडे घ्यावा अशी पाटीलबावांच्या अंतर्यामीं जबर-दस्त इच्छा होती. तेव्हां, ही आयतीच संधि आल्यावर, ते ती फुकट कशी घाल-विणार ? वरील बातमी समजतांच पाटीलबावांनीं भर कचेरींत ( सरकार वाड्यांत ) जाऊन नानांची बहुत निर्भर्त्सना केली व श्रीमंतांना विनंति केली कीं, " असें होणें फार वाईट, याचा बंदोबस्त स्वामींनीं करावा अथवा मला आज्ञा झालिया मी करीन." याप्रमाणें पाटीलबावांनीं विनंति केल्यावर, श्रीमंतांनीं बाबूराव केशव व राघोपंत गोडबोले यांस सरंजाम देऊन सचिवपंतांना आणण्यासाठीं पाठविलें. तोंच शिंद्यांनीं घाई करून जेजुरीस पलटण पाठवून पंतांना आपल्या गोटांत पुण्यास आणिलें व त्यांचा मान मरातब ठेविला. " त्यावर चौकशी सखारामपंत पानसे व सदाशिवभट दाते यांनीं सांगितली. पागेंत बसून मनास आणतात. " मग चौकशी अंतीं ज्या शागिर्दानें वपनसमयीं बाईस स्पर्श केला त्याचे हात तोडावे, विष घालणाराचा वध करावा, व इतर गारदी वगैरे व खुद्द बाजीराव मोरेश्वर यास त्यांचे अपराधाचे मानानें कडक शिक्षा द्याव्या असें सुनावलें व त्या श्रीमंतांच्या व नानांच्या सल्ल्यानें अमलांत आणिल्या. पानशांचा व पाटीलबोवांचा स्नेह पूर्वीपासून होता हें जाणून नानांनीं मुद्दाम या कामांत सखारामपंत यांना चौकशी कामदार नेमिलें व त्यांनीं दिलेला निकाल अमलांत आणिला ( शके १७१५ चैत्र ).

## १०. खर्ड्याच्या लढाईतील पानशांची कामगिरी.

शके १७१६ सालीं मराठ्यांच्या इतिहासांतील शेवटचा मोठा शौर्याचा व अभि-मानाचा एक प्रसंग घडला; तो म्हणजे खर्ड्याची मोहिम हा होय. या मोहिमेंत

मराठी साम्राज्याचें जें वैभव दृग्गोचर झालें तें अखेरचें च होय. त्यानंतर तसा विजयाचा व अभिमानास्पद प्रसंग आला नाहीं. हा काळ म्हणजे शिवशाहीचा मध्यान्हीचा काळ होय. त्याच्यापुढें मराठ्यांच्या स्वराज्यसूर्यास उतरती कळा लागली. अर्थात् स्वराज्याबरोबर च स्वराज्यनिष्ठ सरदारांचे हि दिवस उलटण्यास प्रारंभ झाला. त्यास अनुसरून पानसे घराण्याला हि पडता काळ आला. त्यामुळें, या एकंदर कारणांसाठीं या शेवटच्या पण महत्त्वाच्या मोहिमेच्या वृत्तांताचा थोडासा विस्तार येथें करण्याचें योजिलें आहे.

या प्रसंगीं दक्षिणेंत मराठे व निझाम यांच्यांत सलोखा नांदण्यापेक्षां त्यांच्यांत बिघाड माजलेला असणें हे जास्त स्वाभाविक होतें. कारण, श्री. बाळाजी विश्वनाथ पेशवे यांनीं व्यवस्था केल्याप्रमाणें निझामाच्या ( किंवा एकंदर मोंगलाई ) राज्यांतून चौथ व सरदेशमुखीचा वसूल साल दरसाल मराठ्यांनीं घ्यावयाचा होता. पण निझामाला हें आपल्यावर लादलेलें ओझें कसें तरी करून झुगारून द्यावयाचें होतें. पेशवाईच्या स्थापनेपासून श्री. थोरले माधवरावसाहेब पेशवे यांच्या राजवटीच्या अखेरीपर्यंत मराठे व निझाम यांच्यांत जीं जीं युद्धें झालीं त्या युद्धांना मुख्यतः हें च कारण असे. श्री. नारायणराव साहेबांच्या वधानंतर मराठी राज्यांत जी दुफळी झाली, ती निझामाच्या पथ्यावर पडली. पुणें दरबारला त्या वेळीं श्री. राघोबादादा यांच्यांशीं व त्यांची बाजू घेऊन आलेल्या इंग्रजांशीं सतत तोंड द्यावें लागत असल्यामुळें, त्यांस इकडे निझामाशीं मैत्री ठेवणें भाग पाडलें. आपल्या दरएक कामगिरीस सहाय्य मिळावें यासाठीं पुणें दरबारानें निझामास तीस लक्ष रुपये उत्पन्नाची जहागीर व दौलताबादचा किल्ला दिला. तथापि, पेशव्यांना, निझाम जी मदत करी, ती मनापासून करीत नसे च.

यावेळीं उत्तर हिंदुस्थानांत महादजी शिंदे यांनीं दिल्लीचा पातशहा आपल्या ताब्यांत घेऊन त्याच्या राज्यावर एक प्रकारें पुणें दरबारची देखरेख कायम केली व बादशहाचा प्रतिनिधि म्हणून महादजी महाराष्ट्रांत मिरवूं लागले. बीड परगण्याची मागणी बादशहाच्या नांवानें या वेळीं पाटिलबावांनीं निझामाजवळ केली, ती त्यानें नाकारली; यामुळें पाटिलबोवास फार राग आला. पेशवे सरकारची हि बाकी निझामाकडे आतां दोन कोटीं वर होऊन गेली होती, ती हि तो देईना. सारांश या कारणामुळें मराठ्यांना निझामावर मोहिम करणें भाग पडलें.

या वेळीं प्रथम निझामाचा दिवाण मशीर उल्मुल्क यानें निझामास सल्ला दिला कीं, मराठे सांप्रत, तीस लक्ष रुपये उत्पन्नाचा प्रांत मागत आहेत, तर तो त्यांस देऊन भांडण मिटविण्यापेक्षां, त्या रकमेंत च सैन्य उभारून मराठ्यांशीं लढाई करावी हें जास्त बरें. हें म्हणणें निझामास स्वाभाविक पसंत पडलें व त्याप्रमाणें त्यानें युद्धाची तयारी चालविली. इतक्यांत त्याच्या सुदैवानें महादजी शिंदे व हरिपंत तात्या फडके

[stamp]

हे दोघे हि अकस्मात् कालवश झाले. त्यामुळें निझामाला अस्मान् ठेंगणें झालें. पेशव्यांचे वकील गोविंदराव काळे यांनीं आपल्या सरकारच्या बाकीची मागणी केली असतां मशीरनें त्यांना सांगितलें कीं, नानांनीं स्वतः येथें येऊन आम्हास हिशेब समजावून द्यावे. याच वेळीं निझामाच्या दरबारांत, काळे यांचे समक्ष, पेशवे व नाना यांचीं सोंगें आणवून निझामानें त्यांचा अपमान केला व पेशव्यांचें राज्य घेऊन त्यांना काशीस स्नानसंध्या करण्याकरितां पाठवूं असें तो म्हणाला. अर्थात् इतक्या निकरावर गोष्टी आल्यानंतर, पेशव्यांना त्याच्यावर मोहिम करणें अपरिहार्य झालें.

निझामाजवळ यावेळीं मुसा रेमु वगैरे फ्रेंचांच्या हातांखालीं शिक्षण घेतलेलीं तेवीस पलटणें होतीं; शिवाय त्याचा तोफखाना हि जय्यत तयार होता. सर्व मिळून त्याची फौज एकलक्ष दहा हजार होती. "साठ सहस्र पठाण बुंदी, तीन शें तोफा थोर अखंडी" असा त्याचा निव्वळ स्वतःचा सरंजाम होता. इकडे पेशवे सरकारांनीं हि आपली जय्यत तयारी चालविली. दौलतराव शिंदे पुण्यास होते, त्यांची फौज हिंदुस्थानांतून आणविण्यांत आली. नागपूरकर भोंसले, होळकर, रास्ते, पटवर्धन, विंचूरकर, घोरपडे, निंबाळकर, प्रतिनिधि यांना व दुसऱ्या अनेक सरदारांना बोलावून घेतलें. निझामाप्रमाणें पेशवे यांनीं बॉइड नांवाच्या एका इंग्रजाच्या हातांखालीं "इंग्रजी पलटणें सजून तयार" केलीं होतीं, तीं हि तयार झालीं. श्रीमंतांनीं एकंदर फौजेपैकीं कांहीं जमातींच्या कवाईती पाहिल्या" या कवाईतींत शिंद्यांचे "पांच हजार गाडद व आठ तोफा होत्या" शके १७१६ कार्तिक वद्य द्वादशीस हुजुरातीचे मुख्य सरदार बाबा फडके डेरे दाखल झाले व तिकडे निझाम हि बेदराहून निघून त्याच्या आधींच डेरे दाखल झाला होता. श्रीमंत सवाईरावसाहेब हे खासा या मोहिमेवर नाना फडणीस यांच्यासह निघाले होते. अघाडीस सरकारी तोफखाना घेऊन गणपतराव विश्वासराव, माधवराव कृष्ण व सखाराम यशवंत पानसे हे या फौजेंत होते. या तोफखान्यांत २१२ तोफा होत्या. अशा थाटाचा जो "दिला बिनीवर तोफखाना" ( शालिग्राम पोवाडे पृ. १४२ ) असा तोफखाना बाळगणाऱ्या "पानशांची बहु मर्यादा" (शिस्त) होती. सखारामपंताबद्दल बाळा लक्ष्मण शाहीर म्हणतो कीं, "सखाराम पानसे भले हैत झुंझणार, बारा कोस लांबी रूंदी ज्या फौजेचे तळ पडती". इतकी फौज प्रचंड होती. गारपीर, वडगांव, थेऊर यांवरून ही फौज नगराकडे वळली. निझाम हि तिकडून परंड्यास आला. वाटेंत जोगाईचें अंबें या क्षेत्राचा त्यानें विध्वंस केला. त्याचा रोख पाहून श्रीमंतांनीं सीना नदी गांठली. धानोरे येथून बाबा फडके यांना ६०-७० हजार फौजेनिशीं अघाडीस पाठविलें. या वेळीं निझाम हि फडक्यांच्या सैन्यापासून पंचवीस कोसावर येऊन पोहोंचला होता. निझामानें यावेळीं श्रीमंतांकडे तहाचें बोलणें चालविलें; परंतु श्रीमंतांनीं मशीर यास कैदेंत ठेवून आमच्या सल्लयानें कारभार चालवावा अशी अट घातली, ती त्याला कबूल होईना. या अटी नाकारून तो पुढें चाल

करून खर्डे गांवच्या किल्ल्या नजीक खैरा नदीवर येऊन उतरला. तेव्हां, त्याला अडविण्यासाठीं शिंदे व होळकर हे पुढें गेले, आणि त्यांच्या मदतीस श्रीमंतांनीं परशुरामभाऊ पटवर्धन यांस सेनापति नेमून बरोबर " तोफखाना " झाडून देऊन पाठविलें ". तोफखान्या बरोबर या वेळीं सखारामपंत पानसे हे होते, ते फाल्गुन वद्य द्वितीयेस घोडें गांवास आले. निझाम त्यांच्यापासून दीड कोसावर होता. संध्याकाळीं निझामानें त्यांच्यावर हल्ला केला. या वेळीं सखारामपंत पानसे यांनीं तोफांचा मारा केल्यामुळें निझाम माघारा फिरला. याच वेळीं भोसल्यांनीं सपाटून बाणांचा वर्षाव केल्यामुळें असदअल्ली मागें हटला व मुसा रेमूच्या मदतीस जाऊं लागला, ही संधि साधून गणपतराव पानशांनीं त्याजवर एक तोफांची फैर झाडली, त्या मुळें असदअल्लीच्या फौजेची दाणादाण झाली, मागून रेमूची फौज व इतर मोंगल फौज यांची हि तीच अवस्था झाली. इतक्यांत संध्याकाळ होऊन अंधार पडला. दिवसभर शत्रुसैन्याशीं निकरानें सामना देण्याचें काम पडल्यामुळें, पेशव्यांकडील सैन्यास संबंध दिवसांत अन्न पाणी मिळालें नाहीं. रात्रीं सर्व तळावर सामसूम झाल्यावर मराठ्यांचें सैन्यांतील कांहीं लोक तृषाक्रांत झाले, सबब पाण्याचा तपास काढण्यास तळाबाहेर निघाले. रात्र अंधेरी असल्यामुळें चुकीनें हे लोक निझामाचे गोटांत शिरले. निझामाचे सैन्यांतील लोकांस हा आकास्मित छापा आल्याचा भास होऊन दोन्ही सैन्यांमध्यें धुमश्चक्री माजली. बंदुकीचे बार व गलबला ऐकल्या बरोबर दोन्ही सैन्यांतील लोक उठून गोळा गोळी सुरू झाली. आपण कोणत्या पक्षांतील लोकांस मारतों हें हि एकमेकांस समजेना. पुढें चंद्रोदय झाल्यावर पानशांनीं आपल्या तोफा शत्रु सैन्यावर रोखून शेंकडों लोक मारिले. या वेळीं दोन्ही पक्षाकडील कांहीं नामांकित सरदार ठार झाले. निझाम घाबरा होऊन खर्ड्याच्या गढींत आश्रयास गेला, व त्याच्या सैन्यांनीं तोफखाना तळावरच टाकून पलायन केलें. या सर्व तोफा दुसरे दिवशीं पानशांच्या हातीं लागल्या. निझाम गढींत शिरल्यावर पेशव्यांचे सैन्यांनीं गढीस वेढा घातला व त्यामुळें आंतील सैन्यांस रसद मिळेनाशी झाली. खुद्द निझामास हि पाणी प्यावयास मिळेना. पाणी बारा रुपयांस एक पखाल व एक रुपयास अच्छेर दाणा, या प्रमाणें तळावर महागाई झाली. अशा स्थितींत हि गढीवर तोफांचा मारा सुरू होताच. इतकी हलाखी झाल्यावर पेशवे सरकारांनीं सांगितलेल्या अटी निझामानें मान्य करून तह केला; व अपमान करणाऱ्या मशीरास पेशव्यांच्या ताब्यांत दिलें. विजयश्रीनें माळ घातल्यानंतर सवाईरावसाहेब मोठ्या विजयानंदानें परत फिरून पुण्यास दाखल झाले. या लढाईत शिंद्यांकडील व सरकारच्या ( पानशांच्या दिमतींतील ) तोफखान्यानें महत्त्वाची कामगिरी केल्याचें इतिहासांत नमूद आहे. एक पोवाडकार म्हणतो कीं " पानशावर रावसाहेबांची ( पेशव्यांची ) " रीझ " ( मर्जी ) होती. खर्ड्याची मोठी लढाई फाल्गुन वद्य पंचमीस झाली.



कै. कृष्णराव मार्तंड पानसे, B. A.



कै. दामोदर रंगनाथ पानसे. L. M. E.

या मोहिमेंत पानशांनीं चांगली कामगिरी केल्यामुळें पुढें पेशवे सरकारांनीं हिंगणी मुकामीं त्यांना पूर्वींची तैनात वाढवून एक नवीन तैनात–जावता करून दिला. या वेळीं सरकारच्या तोफखान्याची मुख्य सरदारकी माधवराव कृष्ण यांच्या नांवानें होती. त्यांच्या भाऊबंदांना तोफखान्यांत निरनिराळे अधिकार देऊन त्यासाठीं निरनिराळ्या तैनाती दिल्या होत्या. तोफखान्याच्या खर्चाबद्दल दोन लक्ष, व फौजेच्या सरंजामाबद्दल तीन लक्ष अशी नेमणूक असून शिवाय चौघड्याचा व मल्हारगड ह्या किल्ल्याचा सरंजाम पृथक् होता.

वर सांगितलेंच आहे कीं, खर्ड्याची लढाई म्हणजे मराठी साम्राज्यदिवाकराचा मध्याह्न काळ होय. त्या लढाईनंतर या सूर्यास उतरती कळा लागली. या उतरत्या काळांतील एक जबरदस्त धक्का बसणारी गोष्ट म्हणजे श्रीमंत सवाई माधवरावसाहेब पेशवे यांचा शोचनीय अंत ही होय. या हि धक्क्यांतून साम्राज्य तगवून धरण्यासाठीं पटवर्धन, नाना, पानसे, वगैरे मुत्सद्दी व वीर पुरुष यांनीं पराकाष्ठेचे श्रम केले, पण रावबाजीसारखे अनिश्चित बुद्धीचे मालक गादीवर कायम झाले आणि पूर्वींचे जुने स्वामिभक्त सरदार, मुत्सद्दी नाहींसे झाले त्यामुळें नानांचे त्या वेळचे श्रम फुकट गेले. पुढें कांहीं दिवसांनीं नानांनींही स्वर्गवास केला आणि एका इंग्रजानें म्हटल्याप्रमाणें "मराठी साम्राज्यांतील शहाणपण लयास जाऊन" तेथें परक्यांना हात शिरकविण्यास सुसंधि लाभली; असो.



# प्रकरण सातवें.

## १. श्रीमंत रावबाजी यांस पेशवेपद व नानांस अटक.

श्रीमंत रावबाजी हे गादीवर बसण्यासाठीं नाना प्रकारच्या खटपटी करूं लागले. घटकेंत नाना फडणीस यांना आपला हेतु पूर्ण करण्याची विनंति करावी, घटकेंत दौलतराव शिंद्याला हातीं धरून नानांच्या विरुद्ध जावें, अशा गोष्टी ते करूं लागले. या सुमारास शिंद्याच्या फौजेंत व दरबारांत शेणव्यांचें प्रस्थ बहुत माजलें होतें. नानांच्या हातचा कारभार काढून घेऊन त्यांना कैदेंत ठेवावें व आपण पेशव्यांचे कारभारी व्हावें असा मनसुबा त्यांनीं रचिला. आपल्याला पकडण्याचें ठरलें आहे हें पाहून नानांनीं पुण्याहून साताऱ्याकडे प्रयाण केलें. यानंतर शिंद्यांनीं श्रीमंताजवळ, आपल्या मदतीनें ते गादीवर आले म्हणून पूर्वी ठरल्याप्रमाणें सव्वा कोट रुपयांची मागणी केली. तेव्हां श्रीमंताचे डोळे उघडले. नंतर साताऱ्यास जाऊन पेशवाईचीं वस्त्रें घेण्याचीं राहिलीं होतीं, त्यासाठीं श्रीमंत पुण्याहून निघाले. वाटेंत अनेक खटपटी व कलागती शिंद्यानें केल्या. त्या गडबडींत परशुराम भाऊ हे नानांच्या विरुद्ध जाऊन शिंद्यांच्या शेणव्यास मिळाले. या एकंदर उलाढालींचें अखेर पर्यवसान श्रीमंत रावबाजी यांना प्रतिबंधांत ठेवून पेशवाईच्या गादीवर श्री. धाकटे चिमाजी आप्पा यांना बसविण्यांत झालें. श्री. चिमाजी अप्पा यांचें दत्तविधान श्री. मातोश्री यशोदाबाईसाहेब यांच्या मांडीवर शके १७१२ च्या वैशाखाच्या सुमारास झालें. या कारस्थानांत पानसे मंडळी कोणाच्या बाजूस होती तें नक्की समजत नाहीं. पण, दत्तविधानाच्या नंतर सरदार मंडळींनीं जे आहेर केले, त्या वेळीं पानशांचें नांव आलेलें आहे. त्या वेळीं माधव कृष्ण यांनीं २२५॥ रुपयांचा व सखाराम यशवंत यांनीं २१६। रुपयांचा अहेर केला होता.

नाना कारभारांतून काढले गेले. नंतर त्यांनीं इंग्रज, भोंसले व निझाम यांना आपल्या बाजूला मिळविलें. एवढें च नव्हे तर खास दौलतराव शिंद्यास फोडून त्यांच्या शेणवी कारभाऱ्यास ( बाळोबा पागणीस ) त्यांनीं कैद करविलें. व मग त्यांना अनुकूल असलेल्या परशुरामभाऊस हि त्यांनीं पकडविलें ( आश्विन शके १७१८ ). ही नानांची मुत्सद्देगिरीची मसलत मोठी वाखाणण्याजोगी होती. यानंतर नानांनीं रावबाजी यांना गादीवर बसविलें आणि पूर्ववत् आपल्या हातीं कारभार घेतला. ज्या दिवशीं श्रीमंत गादीवर बसले त्या दिवशीं तोफखान्याचे दरोग्यास हुकूम झाला होता कीं, "सवाई-राव साहेब पुरंदराहून पुण्यास रहावयास आले त्या वेळीं तोफांचे जितके बार केले असतील तितके आजच्या प्रसंगीं करावे" या हुकुमावरून दरोग्यानें साठ बार केले.

या सुमारास सरकारी तोफखान्याचे अधिकारी पानसे मंडळी पुढील प्रमाणें होती; माधवराव कृष्ण, जयवंतराव, सखारामपंत व गणपतराव विश्वनाथराव. सरंजामी

फौजेच्या तत्कालीन सरदार मंडळींत हि गणपतराव, सखारामपंत, पुरुषोत्तमराव व रंगराव यांचीं नांवें आढळतात.

पुरुषोत्तमराव हे हमेश पुणें मुक्कामीं राहून मोहिमेवरील सरदारांस तोफखान्याकडील सरंजाम रवाना करणें, हुजूर श्रीमंताजवळ राहणें, त्यांची सल्लामसलत घेणें, तोफ-खान्यासंबंधीं हिशेब ठेवणें वगैरे कामें करीत असत. यामुळें यांचें नांव कोणत्याहि मोहिमेंत आलें नाहीं. याखेरीज पेशव्यांचे खास सेनेंत दहा हजार घोड्यावर हे पाग-नीस होते. यांस पुत्रसंतति नव्हती म्हणून जयवंतरावाचे कनिष्ठ चिरंजीव रंगराव यांस त्यांनीं दत्तक घेतलें होतें.

रंगराव हे हि पुण्यास राहून वडिलांस मदत करीत असत. हत्तीवर बसण्याची कला यांना पूर्णपणें अवगत होती. हल्लीं हत्तीवर हौदा अगर अंबारी घालून मिरवणुकींत फिरणारे महात आहेत; परंतु लढाईत हत्तींचा उपयोग कसा करावा हें त्यांस माहीत नाहीं. आपल्या हिंदुस्थानांत अत्यंत प्राचीन काळापासून लढाईंत हत्तींचा उपयोग करीत असत. चतुरंग दळांत गज-दळ हें अवश्य असे, व ती परंपरा स्वराज्य नष्ट होईपर्यंत अविच्छिन्न चालू होती. हातघाईच्या लढाईंत हत्तींच्या सोंडेंत लांब लांब चारपासून आठपर्यंत पट्टे अगर सांखळ्या देत, व त्याला शत्रु-सेनेच्या गर्दींत घुसवीत. मग तो आपली सोंड जलद ( पट्ट्याच्या हातांनीं ) फिरवून सपासप शत्रुसेनेचा धुव्वा उडवी. अशा वेळीं त्याचेजवळ जाणें फार धोक्याचें असे. त्यांत त्याला दारु पाजून धुंद करीत. अशा तऱ्हेनें हत्तीवर बसून शत्रु-सेनेंत घुसण्याचें शिक्षण रंगराव यांनीं घेतलें होतें. शके १६९१ सालीं पेशवे सरकारच्या पदरीं अशा तऱ्हेनें शिक्षण घेतलेले जे वीस महात होते, त्यांत रंगराव यांचें नांव आढळतें.

सखारामपंत पानसे शके १७१८ चे सुरुवातीस वारले; म्हणून त्यांचे चिरंजीव यशवंतराव व पुतणे गणपतराव यांच्या नांवें फौजेचा सरंजाम पेशवे यांनीं निम्मे-निम करून त्यांचीं सनदा-पत्रें शके १७१८ ज्येष्ठ शुद्ध सप्तमीस करून दिलीं. तोफ-खान्याची मुख्य सरदारी गणपतराव यांचे नांवें होती. यशवंतराव यांचेकडे १३४४० रु.चा जात-सरंजाम होता, तो त्यांचेकडे शके १७४० पर्यंत चालला. पुढें कंपनी सरकारानें तो अकरा हजारांचा केला; तो शके १७४८ पर्यंत चालू राहिला. यशवंत-राव यांस संतति न झाल्यामुळें त्यांची पत्नी यमुनाबाई यांनीं वामनराव नांवाचा मुलगा दत्तक घेतला. वामनराव यांना हा सरंजाम मिळाला नाहीं. नुसती इनाम-वृत्ति तेवढी त्यांच्याकडे ठेविली. पुढें वामनरावांनीं पूर्वीचा सरंजाम चालविण्याबद्दल सरकार-दरबारीं बरीच खटपट केली, परंतु तिचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

पुणें येथील खुन्या मुरलीधराचें देऊळ प्रसिद्ध आहे.[१] मुरलीधराची मूर्ति अतिशय सुंदर आहे. ती त्या वेळचा विख्यात मूर्तिकार बखतराम यानें घडलेली आहे. हें देऊळ तत्कालीन पुण्यांतील प्रसिद्ध सावकार दादा गद्रे यांनीं बांधून शके १७१९ चैत्र

शुद्ध प्रतिपदेस त्यांत देवाची स्थापना केली. स्थापनेच्या बंदोबस्तासाठीं नाना फडणीस यांचे कांहीं अरब व पेशवे सरकारचीं दोन पलटणें आलीं होतीं. त्यांच्यांत क्षुल्लक कारणावरून तंटा सुरू झाला आणि अखेर त्याचें पर्यवसान गोळीबारापर्यंत होऊन कांहीं माणसें मेलीं. गद्रे यांनीं नानांच्या घरीं जाऊन त्यांच्या कानावर ही हकीकत घातली. तेव्हां नानांनीं दंगा मोडण्यासाठीं आपला चोपदार प्रथम पाठविला, तो त्या गर्दीत जखमी झाला. मग हत्यारबंद अरबांची एक तुकडी पाठविली. ती तुकडी पोंचण्यापूर्वींच गणपतराव पानसे यांना खबर लागल्यावरून ते तेथें गेले होते. लगेच त्यांनीं दंगा मोडिला. या भानगडींत गणपतराव पानसे यांच्या आवडत्या " श्याम-सुंदर " नांवाच्या घोड्यास गोळी लागली व त्यामुळें तो तीन पायांवर उभा राहिला. तो घोडा पुढें निकामी झाल्यामुळें गोळी घालून त्यास ठार केलें. वरील देवतेच्या स्थापनेचे वेळीं खून पडल्यामुळें या मुरलीधरास " खुन्या मुरलीधर " असें नांव मिळालें व तें अद्यापपर्यंत चालू आहे.

श्री. रावबाजी हे क्षणिकचित्त असल्यानें व त्यांचा कोणावर हि भरंवसा नसल्यानें त्यांनीं आपली गादी स्थिर होण्यासाठीं वाटेल त्या माणसाशीं वाटेल तसे उघड किंवा गुप्त करार केले होते. वास्तविक नाना फडणीसांनीं त्यांना गादीवर आणलें होतें, पण, त्यांच्यावर हि श्रीमंतांचा विश्वास नव्हता. नानांची त्यांना विनाकारण भीति वाटत असे, आणि त्यामुळें त्यांनीं नानांच्या विरुद्ध दौलतराव शिंद्यांशीं एक गुप्त करार केला होता. नाना हे रावबाजी यांना गादीवर बसविण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होते, तर त्याच वेळीं दुसरीकडे त्यांना फसवून गोत्यांत आणण्यासाठीं रावबाजी एक जाळें विणीत होते. या जाळ्यांत एकटे नाना च सांपडले नाहींत, तर मराठी साम्राज्य हि सांपडलें. हें जाळें असें होतें:—फितुरीमुळें कुप्रसिद्धीस आलेला कागलचा सर्जेराव घाटगे त्याची मुलगी बायजाबाई ही फार देखणी व सुंदर असल्यामुळें दौलतरावांच्या मनांतून तिच्याशीं लग्न लावावयाचें होतें. पण शिंद्यांची जातकुळी कमी असल्यानें आपण त्यांना मुलगी देणार नाहीं असें सर्जेराव म्हणत असे. हें त्याचें म्हणणें बाह्या-त्कारी असे व आंतून अशी इच्छा होती कीं, स्वतःस पुष्कळ दौलत व अधिकार मिळाल्यास शिंद्यास मुलगी द्यावयाची. हा त्याचा मनोदय श्री. रावबाजी यांना माहीत होता. त्यामुळें त्यांनीं गुप्तपणें सर्जेरावाशीं करार केला कीं, सर्जेरावांनीं शिंद्यास मुलगी द्यावी व तसें त्यानें केल्यावर श्रीमंतांनीं शिंद्यांची दिवाणगिरी सर्जेरावास द्यावी व सर्जेरावांनीं त्याबद्दल दोन कोट रुपये शिंद्यास द्यावे. या मध्यस्थीबद्दल शिंद्यांनीं श्रीमंतास गादीवर बसविण्याविषयीं नानांस मदत करावी.

पुढें, श्रीमंत रावबाजी गादीवर आले. यापूर्वीं महाडास असतां नानांनीं दौलत-रावाशीं असा करार केला होता कीं, श्रीमंतांना गादीवर बसविण्यासाठीं नानास मदत करावी व त्याबद्दल नानांनीं एक कोट रुपये शिंद्यास द्यावे. शिंद्यांनीं श्रीमंतास विचारलें

 ३९५३ 

कीं, नाना देतात ती रक्कम घेऊन त्यांच्या हवालीं आपल्याला करूं किंवा सर्जेरावांचे मार्फत ठरल्याप्रमाणें मला दोन कोट रुपये आपण देतां ? तसे देत असाल तर नानांचें पारिपत्य मी करतों. तेव्हां श्रीमंतांनीं दुसरी गोष्ट कबूल केली. नानांना उघड उघड कैद करणें शिंद्यांना अशक्य होतें; सबब त्यांनीं साठ लक्ष रुपये द्यावे असा नानाकडे तगादा लावला. नानांनीं सांगितलें कीं, गंगापार झाल्यानंतर तुम्हांस रक्कम देईन. परंतु ती पुण्यास च देण्याबद्दल शिंद्यांनीं हट्ट धरिला व प्रकरण हातघाईवर आणलें.

शेवटीं दौलतरावानें आपल्या पदरचा एक फ्रेंच सेनापति मायकेल फिलोज ( " मुकीर " ) यांस मध्यस्थी करण्याचे मिषानें नानाकडे पाठविलें. नानांनीं व त्यांनीं मिळून कराराच्या याद्या केल्या व शिंदे स्वतः नानास भेटून त्या त्यांनीं मान्य केल्या. आतां दिलजमाई झाल्यानें नाना हे परत भेटीसाठीं शिंद्याचे गोटांत गेले, व तेथें दौलतरावांशीं बोलत असतां, पूर्वीं ठरविल्याप्रमाणें, त्या युरोपियन मुकीरानें ( शके १७१९ पौषांत ) एकदम येऊन नानास कैद केलें. नाना कैद झाल्यानंतर पुण्यास सर्वत्र बेबंदशाही सुरू झाली.

## २. पुण्यांत सर्जेरावी.

श्रीमंतांनीं शिंद्यास दोन कोट रुपये कबूल केले होते, पण तेवढी रक्कम त्यांच्याजवळ नव्हती म्हणून सर्जेरावास नानांच्या मर्जींतील पुण्यांत राहणाऱ्या लोकांकडून ती वसूल करण्यास परवानगी दिली. प्रथम त्यानें नानांच्या पक्षाच्या, बाबा फडके, परचुरे, काळे, पिंगळे, चक्रदेव वगैरे मंडळींना कामानिमित्त सरकारवाड्यांत बोलावून आणून कैद केलें; आणि त्यांच्या घरांच्या जप्त्या करून अतोनात पैसा उकळला. तसें च इतर प्रतिष्ठित व सावकार लोकांना हि छळून त्यानें त्यांच्या घरांस खणत्या लावून पैसा वसूल केला. या च गडबडींत दौलतरावाचें व बायजाबाईचें लग्न झालें.

यानंतर सर्जेराव हा खास नानांच्या वाड्यांत च रहावयास आला व तेथें तो गांवांतील लोकांस आणून छळूं लागला. याप्रमाणें कहर चालू असतां शके १७२० वैशाख शुद्ध द्वितीया बुधवारीं प्रातःकाळीं तोफखान्याकडील सखारामपंत पानसे यांचे चिरंजीव यशवंतराव हे सरकारें वाड्यांत घोड्यावरून येत होते, त्यांस सर्जेराव घाटग्याचा सरदार नेवासकर देशमूख यांनीं घोड्याखालीं उतरावयास लावून नानाचे वाड्यांत चौकींत आणून बसविलें आणि त्यांचा घोडा पळवून नेला. हें वर्तमान सखारामपंतास समजलें. त्यावरून त्यांनीं तीन चार तोफा व बाणदार तयार करून नेवासकराचें पारिपत्य करावें या विचारानें बुधवार चावडी पावेतों ते आले. ही बातमी श्रीमंतास समजतांच त्यांनीं " तुमचा मुलगा सोडवून आणवितों, तुम्ही माघारें जाणें " असें सांगून पाठविलें, त्यावरून ते माघारे गेले. मग श्रीमंतांनीं आबा काळे

याचा कंपू तयार करून तोफा नानांच्या वाड्या पलीकडे शिऱ्यांवर ( उंचावर ) नेल्या आणि आज्ञा केली कीं, तोफा लावून वाडा पाडून टाकणें, आणि पानसे यांचा मुलगा धरला आहे तो सोडवून आणणें. हें ऐकून नेवासकर घाबरला आणि त्यानें पानसे यांचा मुलगा सरकारच्या हवालीं केला. याप्रमाणें सर्जेरावीचा प्रताप पानसे घराण्यास हि जाचला.

या वेळीं श्रीमंतांनीं महादजी बावांच्या बायकांना हातीं धरून दौलतरावास पेंचांत आणिलें, तेव्हां दौलतरावानें नानांस सोडून श्रीमंतांना अडचणींत आणण्याचें ठरविलें. नानांनीं पंचवीस लक्ष रुपये देऊन दौलतरावाचा व बायांचा समेट करून द्यावा व दौलतरावानें पुन्हा नाना यास पेशव्यांचे कारभारी करावें असा तह ठरून नानांची सुटका झाली. नानांनीं हि दौलतरावास तावडतोब दहा लक्ष रुपये रोख दिले. इतक्यांत सर्व अनर्थाचें मूळ जो सर्जेराव यास दौलतरावानें कैद केलें; यामुळें पुण्यांत तात्पुरती स्थिरस्थावरता झाली.

## ३. वाघाचें बंड व बापू गोखल्याचा पराक्रम.

धोंडी वाघ हा पहिल्यानें पटवर्धन व करवीरकर यांच्या सैन्यांत नौकर होता. पुढें ही नोकरी सोडून तो हैदरच्या सैन्यांत नौकरीस राहिला व हळुहळू मोठ्या साहसानें व शौर्यानें योग्यतेस चढला. जेव्हां मराठे व इंग्रज यांनीं टिपूवर मोहीम केली, त्या वेळीं वाघानें टिपूची नौकरी सोडली व धारवाडच्या आसपास लुटारूपणा सुरू केला. पेशव्यांनीं धोंडोपंत गोखले यांची शके १७१६ त त्यावर रवानगी केली. गोखल्यांनीं त्याचा मोड करून त्यास टिपूच्या राज्यांत हुसकावून दिलें. त्या वेळीं त्या भयंकर वाघानें धोंडोपंताच्या रक्तानें मिशा लाल करण्याची घोर प्रतिज्ञा केली. टिपूच्या राज्यांत आल्यावर टिपूनें त्याची सुंता करून त्यास मुसलमान केलें आणि मोठ्या अधिकारावर नेमिलें. पुढें कांहीं दिवसांनीं तो टिपूचें हि ऐकेनासा झाला. तेव्हां त्यास पकडून श्रीरंगपट्टणच्या किल्ल्यांत कैदेंत ठेविलें.

टिपूचें सर्व राज्य इंग्रजांनीं काबीज केल्यावर पट्टणच्या किल्ल्यांतील सर्व बंदिवान सोडले, त्यांत वाघ हि सुटला. सुटका होतांच त्यानें सात आठ हजार शिपाई जमवून फिरून इंग्रजांचे मुलखांत गडबड माजविली. तेव्हां वेलस्लीनें पेशव्यांजवळ त्याला पकडण्यासाठीं मदत मागितली. पेशव्यांनीं शके १७२२ च्या आषाढ महिन्यांत धोंडोपंत गोखले याजबरोबर सैन्य देऊन त्यास इंग्रजांच्या मदतीस पाठविलें. धोंडोपंत व त्यांचे पुतणे आप्पासाहेब हे वाघाच्या तोंडावर गेले असतां वाघानें त्यांना एका झाडींत कोंडलें. या गर्द झाडींत धोंडोपंत आपला घोडा वाघाच्या अंगावर घालीत असतां, मध्यें एका झाडाच्या फांदीचा त्यांचे मस्तकास तडाखा बसून ते घोड्यावरून खालीं पडून बेशुद्ध झाले. इतक्यांत वाघानें अचानक येऊन तेथें त्यांचा वध केला व त्यांच्या रक्तानें आपल्या मिशा रंगविल्या. हें भयंकर कृत्य झाल्याचें ऐकून सेनानी बापू

गोखले यास फार क्रोध आला व या अधम वाघास ठार केल्याशिवाय आपण पागोटें घालणार नाहीं अशी त्यांनीं प्रतिज्ञा केली. नंतर बापू, पटवर्धन सरदार, गणपतराव पानसे व गोविंदराव सखदेव हे आपापल्या पथकांसह वेलस्ली यास जाऊन मिळाले. मग सर्वजण वाघाचे मागें फिरत असतां, नंदीहाळजवळ कवटाळभानूच्या मैदानांत वाघाची गांठ पडली. चहूंबाजूंनीं गणपतराव यांनीं तोफा उभ्या करून वाघास कोंडलें. वाघानें बाहेर पडून पळून जाण्यासाठीं बरीच धडपड केली; परंतु तिचा कांहीं उपयोग झाला नाहीं. तोफांच्या भडीमारानें वाघाचें बरेच सैन्य जखमी झालें व तो स्वतः एका अडचणीच्या जागीं आश्रयास जाऊन उभा राहिला. बापू गोखले यांनीं हें पाहून त्वेषानें त्याच्यावर चाल केली व सिंहाप्रमाणें उडी मारून वाघाला ठार केलें. याप्रमाणें त्यांनीं आपली भीष्म प्रतिज्ञा पुरी केली.

मागें सांगितल्याप्रमाणें परशुरामभाऊंनीं शके १७२१ च्या वैशाखांत करवीरकरावर स्वारी केली. या स्वारीचा शेवट पट्टणकुडी येथील लढाईंत झाला. लढाईंत भाऊ जखमी होऊन करवीरकरांच्या हातीं सांपडले. करवीरकर महाराजांनीं त्यांना त्वेषानें "मारा" म्हणून सांगितलें; तेव्हां जवळ असलेल्या विश्वासराव गाईकवाडानें तरवारीचे वार करून या प्रख्यात सेनापतीच्या शरीराचे तुकडे तुकडे केले. याप्रमाणें अशा अमानुष रीतीनें शके १७२१ आश्विन वद्य चतुर्थीस भाऊंचा शेवट झाला.

## ४. करवीरकरांवरील स्वारी.

भाऊंचा असा शोचनीय शेवट झाल्यामुळें पुणें दरबारांत फार गडबड उडाली. नाना फडणीस यांना फार दुःख झालें. या कृत्याचें उसनें घेण्याचा त्यांनीं तत्काळ निश्चय केला. शिंदे व त्यांचे कारभारी बाळोबा पागनीस यांची हि संमति त्यांना मिळाली. शिंद्याकडे स्वारीचें पुढारीपण देण्यांत आलें. भाऊंचे चिरंजीव रामचंद्र आण्णा यांनीं तर शत्रूवर सूड उगविण्याचा निश्चयच केला होता. नानांनीं फौजेच्या व "सरकारी तोफखान्याच्या खर्चाकरितां आगाऊ पांच लाख रुपये दिले. या फौजेंत सुमारें तीन हजार स्वार, शिंद्यांची पांच पलटणें, शिवाय इतर पायदळ असून गणपतराव पानसे हे सरकारी तोफखाना घेऊन निघाले होते. "राजश्री गणपतराव पानसे मुहूर्तें करून डेऱ्यास गेले" ( खरे ऐ. ले. सं. पृ. ६१६७ ). हें संकट येत आहेसें पाहून करवीरकरांनीं पुणें दरबाराशीं तहाचा घाट घातला, पण तो फिसकटला. पुण्याच्या फौजेची व रामचंद्र अण्णाच्या सैन्याची गांठ रेटरें येथें पडली. मग हें सर्व सैन्य कोल्हापूरकडे निघालें. वाटेंत पानशांनीं करवीरकरांच्या शिराळें या मजबूत ठाण्यावर तोफांचा मारा करून तें काबीज केलें; व वारणेवर करवीरकरांची थोडीशी फौज होती तिला पिटाळून लाविलें. पेशव्यांचें सर्व सैन्य शके १७२१ च्या माघ शुद्धांत पन्हाळ्याचे माचीस पोंहचलें. त्या वेळीं त्यांनीं खालील प्रमाणें आपल्या सैन्याचा व्यूह रचिला. सर्वांच्या पुढें पानशांचा तोफखाना, त्याचे मागें डावे बाजूस चिंतामणराव व हरिपंत

पटवर्धन, उजव्या बाजूस शिंदे व विंचूरकर यांचीं पथकें व वेळोवेळीं पुढील फौजेस कुमक करण्याकरितां सर्वांच्या पिछाडीस स्वतः अप्पा, या प्रमाणें रचना करून त्यांनीं शत्रूच्या गोटावर हल्ला केला. तोफखान्यांतील पुढील तीन मोठ्या तोफा पहिल्यानें सुरू केल्या. त्यांचा मारा होतांच करवीरकरांची फौज उधळली व किल्ल्याच्या आश्रयास पळाली नंतर आप्पांनीं कोल्हापुराकडे रोंख फिरवून टेंबलाईवर येऊन मुक्काम केला. राजधानीवर आलेलें संकट पाहून कोल्हापूरकरांची फौज पन्हाळ्याहून परत कोल्हापुरास आली. दुसऱ्याच दिवशीं लढाई होऊन कोल्हापूरकरांचा पराभव झाला. या पराभवामुळें कोल्हापूरकर महाराज पन्हाळ्यास रहावयास गेले. त्यानंतर शिवरात्रीच्या दिवशीं पहाटे पेशव्यांच्या फौजेनें पन्हाळ्याच्या माचीवर अकस्मात् हल्ला केला, व त्यांत महाराजांच्या तोफा काबीज करून त्याच तोफा त्यांच्या सैन्यावर रोंखून मारा सुरू केला. तेव्हां महाराज व सारी फौज, पळून गडामध्यें घुसली. या धांदलींत बरीच मंडळी पेशव्यांकडील सैन्याचे हातीं लागली. त्यांत महाराजांचा आवडता सरदार विश्वासराव गाईकवाड हा हि सांपडला. त्याला पाहतांच आप्पांचा त्वेष अनावर होऊन त्यांनीं त्यास ठार मारले व अशा रीतीनें परशुरामभाऊंचा अधमपणानें खून करणारास पुरें प्रायश्चित्त दिलें. यानंतर कोल्हापुरावर मोर्चे लागू केले. बाहेरून शहरास मजबूत कोट असल्या कारणानें तो पडल्याशिवाय हल्ल्यांचें काम यशस्वी होणार नाहीं हें जाणून पानशांनीं आपल्या दोन " दिवाल तोडी " तोफा मोर्च्यांचे डावे बाजूस उभ्या करून त्यांचा भयंकर मारा सुरू केला. प्रथम ब्रह्मपुरींतील इमारती पाडून अडचणी नाहींशा केल्यावर तीन चारशें हात लांबीचा तट पाडून तो जमीनदोस्त केला. व सर्व तोफा पुढें सरकवीत अगदीं तटाजवळ दोन अडीचशें हातांचे अंतरावर नेऊन भिडविल्या. या योगानें शहरावर तोफांचा मारा अचुक होऊं लागला. या असह्य माऱ्यामुळें व शत्रुसैन्यांस बाहेर पडण्यास दुसरी वाट नसल्यामुळें, त्याची अगदीं गाळण उडून गेली. (शके १७२१ फाल्गुन शुद्ध चतुर्दशी.)

याच वेळीं नाना फडणीस यांचा देहांत झाल्याची बातमी येऊन थडकली. यामुळें सर्वांस अतोनात दुःख झालें. या अनिष्ट प्रकारामुळें वेढ्याचें काम ढिलाईनें चाललें. या वेढ्याचें काम फार जोखमीचें असल्यानें पानशांनीं " सवाई लक्ष्मण " नांवाची तोफ, या ठिकाणच्या माऱ्यास योग्य अशी, नवीन करविली. ती गणपतराव स्वतः च डागीत असत. या सुमारास रामचंद्र आप्पांनीं मिरजेस बाळासाहेब पटवर्धनांना एक पत्र लिहिलेलें उपलब्ध झालें आहे, त्यांत ह्या तोफेचा मजकूर आला आहे. ते म्हणतात " तोफेचे गाडे तयार होण्याचा मजकूर लिहिला, त्यास गाड्याचें उपयोगी समयास थोर लाकूड मिळत नाहीं व लोखंड हि तसेंच " या करितां " अस्मान तडाख्याचे (या नांवाची एक प्रचंड तोफ होती) सामान सवाई (लक्ष्मण) तोफेस लावून, तेंच लौकर तयार करण्याविषयीं आज्ञा पाहिजे. गोळ्यांचे फर्म्याचा व पानसे यांच्या पत्रांचा

मजकूर लिहिला, त्याचवरून मशार निल्हे (पानसे) यांचें पत्र व गोलंदाज वगैरे इकडून रवाना केले च आहेत. तेथें आल्यानंतर जे फर्म्यांस गोळे मिळतील ते देऊन रवाना व्हावें" (खरे ऐ. ले. सं. पृ. ६२४६). यावरून सवाई लक्ष्मण व अस्मान तडाखा या दोन मोठ्या तोफा या स्वारींत होत्या. कोल्हापुरास पाण्याचा पुरवठा गांवच्या जवळच्या पद्माळें, रंकाळें, वरुणतीर्थ वगैरे तळ्यांपासून व जिंतीच्या ओढ्यापासून होई. त्यामुळें प्रथम ह्या पाण्याच्या पुरवठ्याचीं ठिकाणें ताब्यांत घेतलीं; त्यामुळें गांवांतील लोकांचे फार हाल होऊं लागले. गांवांतील लोकांनीं व महाराजांनीं हि या अरिष्टशमनार्थ देवास अनुष्ठानें बसविलीं होतीं व स्वतः महाराज हि संधि सांपडली म्हणजे पन्हाळ्याहून उतरून पेशवे सरकारच्या मोर्च्यांवर हल्ले करीत असत. महाराज धूर्त असल्यानें त्यांनीं या वेळीं नानांच्या मृत्यूचा व पेशव्यांच्या दरबारांत बजबजपुरी माजल्याचा फायदा घेऊन, शिंद्यास वश करून घेतलें. कोल्हापूरकर महाराजांनीं या वेळीं शिंद्यास बरीच रक्कम चारली. या मोहिमेचें आद्य कारण रामचंद्र आप्पा हें असल्यामुळें त्यांना कोल्हापुराहून हालविणें शिंद्यास जरूर होतें. यासाठीं पैशावर दृष्टि ठेवून स्वराज्याला घातूक होणारीं कृत्यें करणाऱ्या दौलतराव शिंद्यानें आप्पावर दोन लाख रुपयांची वरात काढली आणि ती वसूल करण्यासाठीं जी लष्करी तुकडी पाठविली, तिला असा हुकूम देऊन ठेविला कीं, रक्कम तावडतोब वसूल करावी, तसें न झाल्यास आप्पांना एकदम कैद करावें. हीं बातमी कळतांच आप्पांनीं रात्रींच आपल्या विश्वासांतील गोखले, पानसे, जाधव वगैरे सरदार मंडळी जमवून मसलत केली व तींत ठरल्याप्रमाणें दुसरे दिवशीं सूर्योदयापूर्वी कोल्हापूरचा वेढा उठवून त्या सर्वांनीं आपल्या सैन्यासह कर्नाटकाकडे कूच केलें. दौलतरावासारख्या नादान माणसाच्या या कृत्यामुळें करवीरकरावरील स्वारीचा असा शेवट होऊन, पुणें दरबारचा दरारा नाहींसा झाला.

यानंतर कोल्हापूरकरांचा एक हस्तक बाळकृष्ण गंगाधर यानें बंड उभारलें, त्यावर नाना पुरंदरे व गणपतराव पानसे यांनीं स्वारी करून त्याचा पराभव केला. नंतर गणपतरावांनीं आपला तोफखाना शिंद्याकडे फिरविला. या वेळीं शिंद्याजवळ फौज फारशी नव्हती, या मुळें तो पळून गेला. गणपतरावाजवळ या प्रसंगीं पांच हजार सैन्य व मुबलक तोफा होत्या. शिंदा निसटून गेल्यामूळें पानशांनीं तें सैन्य गलगलें, गडदीहाळ वगैरे ठिकाणच्या बंडखोर जहागीरदारांचे मुलखांत नेऊन त्यांना नरम केलें.

# प्रकरण आठवें.

## १. श्रीमंत रावबाजींची पानशांवर इतराजी.

श्रीमंत बाजीराव रघुनाथ पेशवे हे अनिश्चित मनाचे पुरुष होते; शिवाय त्यांच्या भोंवतीं हलक्या मनाच्या लोकांचा गराडा नेहमीं असे. राष्ट्राचा अधःपात व्हावयाची वेळ आली म्हणजे राष्ट्रांत स्वार्थी, अदूरदृष्टि व स्वदेशावमानी लोकांचा भरणा व्हावयाचा असा एक अबाधित नियम आहे. तो नियम या काळीं म्हणजे शके १७२२–२३ च्या सुमाराम, मराठी साम्राज्यास लागू पडलेला दृग्गोचर होतो. " खूप शर्तीनें राज्य राखणाऱ्या नाना " चा अंत होऊन गेला व मग पुणें दरबारांत सारें स्वार्थी लोकांचें मंडळ उरलें. या काळचा इतिहास अद्यापि पूर्णपणें उपलब्ध झाला नसल्यानें त्याच्या तपशिलांत न शिरण्याचें आम्हीं ठरविलें आहे. त्यामुळें फक्त जेथें जेथें पानसे घराण्याचा संबंध येईल तेवढी च हकीकत यापुढें देण्यांत येईल.

तुकोजी होळकर हे आपल्या आयुष्याच्या अखेरी अखेरीस नानांना पूर्णपणें मिळून त्यांच्या तंत्रानें चालत होते. त्यामुळें त्यांच्यावर श्रीमंत बाजीरावसाहेबांचा कायमचा रोष झाला. या दोन घराण्यांतील हें वितुष्ट नानांच्या पश्चात् फार विकोपास गेलें. त्याचा परिणाम यशवंतराव होळकरांनीं धीट बनून पुण्यावर स्वारी केली व पुण्यास आग लावून दिली. त्यावेळीं यशवंतरावानें पुणें शहरास फार त्रास दिला. पुणें शहरावर खंडणी तर बसविण्यांत आली च होती, पण पुण्याच्या आसपासच्या गांवांतून हि खंडणी वसूल करण्यांत आली. दिवें येथें, या वेळीं सखाराम बापूजी पानसे यांच्या जमाखर्चांत पुढील उल्लेख आलेला आहे. " शके १७२४ दुंदुभिनाम संवत्सरे पौष मास १० रुपये होळकर यशवंतराव यांचे खंडणीबद्दल दिले. " तसें च " शके १७२४ फाल्गुन मास होळकरांचे खंडणीबद्दल जाधवांनीं शिपाई दारीं बसविला त्याचे सिध्याबद्दल एक रोजचे चार आणे ८४ ". सारांश, यशवंतराव होळकरांचा चटका खुद्द पुण्यास जरी बरा च बसला, तरी त्याची थोडी फार झळ पुण्याच्या आसपासच्या गांवांस हि लागली.

वरील हकीकत खुद्द पुणें व त्याचे आसपासचे मुलुखाबद्दलची आहे. परंतु, नगर, सालापूर, पंढरपूर, अक्कलकोट, सातारा वगैरे भागांत होळकराचें सैन्य टोळ्याटोळ्यांनीं घुसून गांवोगांव लुटालूट व जाळपोळ करून शिवाय जबरदस्तीनें खंडणी हि वसूल करीत होतें. या सैन्यांत बाळकृष्ण गंगाधर व जिवाजी यशवंत हे प्रमुख होते. यांचें पारिपत्य करण्याकरितां पुण्याहून गणपतराव पानसे व बापू गोखले यांची रवा-

नगी झाली. या धामधुमींच्या संधीचा फायदा घेऊन पंढरपूर येथील कुळकर्णी गोविंद जोती थिटे यांनीं कांहीं लोक जमा करून लुटालुटीस आरंभ केला. गणपतरावास ही बातमी कळतांच ते तातडीनें सोलापुराहून पंढरपुरास आले, व थिट्याचा मोड करून माघ वद्य १३ रोजीं त्यांनीं त्यास जिवंत पकडून कैदेंत ठेविलें. नंतर बाळकृष्ण गंगाधर याचा पाठलाग करून चैत्र शुद्ध तृतीया शके १७२३ रोजीं त्यास पकडलें व त्याची पुण्यास रवानगी केली. तसेंच जिवाजी यशवंत याचा मांडवगण येथें मोड झाल्यामुळें तो नर्मदापार पळून गेला. अशा रीतीनें होळकराचे सैन्याचा मोड करून त्यास या दोन सरदारांनीं नर्मदेपलीकडे पिटाळून लावलें. अशा रीतीनें फिरून शांतता प्रस्थापित केली.

जयवंतराव यशवंत हे शके १७१२ सालीं वारले. त्यांना भिवराव नांवाचे पुत्र होते. या भिवरावाचे चुलते भिवराव यशवंत हे होते. अर्थात् ते वारल्यावर च या धाकट्या भिवरावांचा जन्म झाला असला पाहिजे; त्याखेरीज हयात चुलत्याचें नांव पुतण्यास ठेवतां येणें अशक्य होय. पहिले भिवराव हे शके १७०० मध्यें वारले, त्यामुळें, त्या शकाच्या नंतर या दुसऱ्या भिवरावांचा जन्म झाला असावा, हें उघड होय. जयवंतरावानंतर त्यांची सरदारी या भिवराव जयवंताच्या नांवें झाली. या भिवरावांच्या नांवचीं सरकारी आज्ञापत्रें शके १७२४ पासून आढळतात. यापुढील पेशवे सरकारच्या स्वाऱ्या-शिकाऱ्यांत या भिवरावाचें अंग होतें. या भिवरावांना गोपाळराव या नांवाचा एक वडील भाऊ होता. तो कर्नाटकातील एका लढाईंत सरकारच्या कामास आला. एवढा एके ठिकाणीं उल्लेख आढळतो. यापेक्षां गोपाळरावासंबंधानें ज्यास्त माहिती मिळत नाहीं.

कर्नाटकांत ज्या लढाया झाल्या त्यांतून पानसे हे आपल्या तोफखान्यानिशीं जातीनें हजर असत. याच वेळीं त्यांनीं आपल्या तोफा तयार करण्याचा कारखाना वाढवून त्यांत मोठमोठ्या नामांकित तोफा तयार केल्या. या वेळीं भिवराव यशवंत, गोपाळराव जयवंत, रंगराव पुरुषोत्तम, गणपतराव विश्वासराव व माधवराव कृष्ण या पानसे घराण्यांतील प्रमुख व्यक्ति होत्या. एकाच कामावर असे भाऊबळ वांटल्यामुळें व तें सर्व एकजुटीनें स्वामिकार्याकरितां झटत असल्यामुळें, कर्नाटकांत झालेल्या हालचालींत विजयश्रीची माळ मिळविण्यांत यांची कर्तबगारी बरीच उपयोगीं पडली, या मुळें यांचें वजन दरबारांत पुष्कळ च वाढलें. हें वाढलेलें वजन व पूर्वीं नाना फडणिसाचें कारस्थानांत पानशांनीं त्यांना बरीच मदत केली होती हें शल्य खुद्द श्री. रावबाजी, त्यांचे कारभारी माणकेश्वर व सल्लागार मुत्सद्दी त्र्यंबकजी डेंगळे वगैरे कुटिल लोक यास असह्य होऊन त्यांनीं कांहीं तरी निमित्तानें पानशांचा पाडाव करावा व त्यांचें वाढतें तेज कमी करावें असें कारस्थान चालू केलें होतें. त्यास पोषक असे खालीं लिहिलेले प्रसंग त्यांनीं घडवून आणविले.

१ लाः—रास्त्याच्या इष्टेटीची जप्ती करावी व पांडूजी कुंजर व त्र्यंबकजी डेंगळे यांचे मताप्रमाणें हरएक प्रसंगीं वागावें म्हणोन श्री. बाजीराव साहेब यांनीं पानशांस हुकूम दिला. तो त्यांनीं मानिला नाहीं.

२ राः—पानशांनीं कर्नाटकांतील स्वाऱ्यांत लुटालूट करून अगणित संपत्ति आणली असून, सरकारांत तिचा भरणा केला नाहीं. सबब, त्याबद्दलचा त्यांनीं हिशेब द्यावा अशी श्रीमंतानीं मागणी केली त्यावर स्वारींत सैन्याच्या व तोफखान्याच्या अवाढव्य खर्चामुळें आपल्यास उलटें देणें जाहलें आहे असें पानशांनीं श्रीमंतांस सांगितलें. परंतु श्रीमंतांस तें पटलें नाहीं.

३ रा—बाजीराव साहेब यांनीं आपलीं एकंदर नऊ लग्नें केलीं तरी हि त्यांची विषयवासना पूर्ण झाली नाहीं, त्यामुळें ते मधून मधून वाम मार्गाचा अवलंब करीत व त्यांच्या सभोंतालच्या सल्लागारांची या कामीं त्यांना मदत मिळे. गणपतराव पानसे यांची स्त्री सरस्वतीबाई ही फार रूपसंपन्न असल्याची बातमी श्रीमंताचे कानावर गेली. पुढें एके दिवशीं कांहीं निमित्तानें सरकारांतून बाईंना भोजनाचें आमंत्रण दिलें गेलें. परंतु श्रीमंतांचें दुवर्तन सर्वांस ठाऊक असल्यानें सरस्वतीबाईनीं तें आमंत्रण स्वीकारलें नाहीं. इतकेंच नव्हे तर कोणत्या हि कारणास्तव यापुढें श्रीमंतांच्या वाड्यांत पाऊल टाकावयाचें नाहीं, असा त्यांनीं संकल्प केला. आमंत्रण नाकारिलें, हा आपला मोठा अपमान झाला म्हणून भोंवतालच्या कुटाळ मंडळींनीं श्रीमंतांच्या मनांत पानशाविषयींच्या रोषांत भर घातली.

वरील कारणांमुळें श्रीमंतांचा पानशाविषयींचा द्वेष जास्त च वाढत चालला. गणपतरावांनीं एक वेळ श्रीमंतांची समक्ष गांठ घेऊन त्यांचा गैरसमज दूर करावा ह्या हेतूनें आपले घरीं कांहीं सरदारांस मेजवानी देण्याचें ठरवून त्या निमित्त श्रीमंतास भोजनास पाचारण केलें. या प्रसंगीं सरस्वतीबाई आपल्या दृष्टीस तरी पडतील अशा आशेनें श्रीमंतांनीं तें आमंत्रण स्वीकारिलें. भोजनाचे वेळीं आचारी, वाढपे या पुरुष वर्गाखेरीज त्यांचे दृष्टीस बाईमनुष्य कोणीं च पडलें नाहीं. भोजनोत्तर, पुढील चौकांत पानसुपारीची बैठक घातली होती. माजघरांत वाटेवर कांहीं बायका बसल्या असून त्यांचे मधून पुढील चौकांत श्रीमंत आले. येतांना वाटेंत त्यांनीं माजघरांत बसलेल्या त्या बायका पाहिल्या; तेव्हां त्या सर्व बायका विधवा आहेत असें रावबाजींना दिसून आलें. पुढील चौकांत आल्यावर गणपतराव यांनीं श्रीमंतापुढें उभें राहून हात जोडून विनंति केली कीं, माजघरांतून येतांना आपण ज्या सर्व स्त्रिया पाहिल्या त्या सर्व माझ्या भावजया, चुलत्या वगैरे असून त्यांचे पति स्वामिकार्याकरितां युद्धांत पडल्यानें आज त्या वैधव्यदशेंत आयुष्याचे दिवस कंठीत आहेत. सर्वांच्या पतींनीं स्वामिकार्यासाठीं देह झिजविले असून शत्रूवर चढाई करतांना रणभूमीवर शिरें अर्पण केलेलीं आहेत. हा सर्व आमच्या स्वाऱ्याशिकाऱ्यांचा जमाखर्च आहे. तो स्वामींनीं

घ्यानीं आणावा, व जमाखर्चाची तोंड मिळवणी करून घ्यावी. हें भाषण ऐकून श्रीमंतास गहिंवर आला व डोळ्यांस पाणी आलें.

या प्रसंगाचा श्रीमंतांचे मनावर झालेला परिणाम फार दिवस टिकला नाहीं. शके १७२९ च्या सुमारास श्रीमंतांनीं आतां इंग्रजांशीं सलोखा झाल्यामुळें लढाईचा प्रसंग नाहींसा झाला आहे, या सबबीवर पानशांकडील तोफखान्याचें काम काढून तें त्यांचा आवडता मंत्रि त्र्यंबकजी डेंगळे यांच्याकडेस सोंपविलें. पानसे यांच्या पदरीं रूपराम चौधरी नांवाचा तोफखान्याकडे एक अधिकारी होता, त्याला त्र्यंबकजीच्या हातांखालीं दुय्यम सरदारी दिली आणि पानसे यांच्याकडील तोफखान्याच्या अधिकाराचें सर्व काम काढून घेतलें. अर्थात् त्या कामासाठीं मिळालेली सरंजामी तैनात हि त्याबरोबर च काढून घेण्यांत आली हें वेगळें सांगणें नको च. फक्त जात–सरंजाम चाळीस हजारांचा ठेवण्यांत आला; आणि त्याखेरीज इनामें ( गांव, वतनें, मानपान वगैरे ) चालू ठेविलीं. अशा रीतीनें श्रीमंतांनीं व त्यांच्या दुष्ट व अदूरदर्शी सल्लागारांनीं जुन्या स्वामिनिष्ठ व पिढींजाद सरदारांस लहरीसरशी एका झटक्यांत दूर करून आपला मतलब साधला.

रूपराम चौधरी हा रजपूत असून प्रथम पानशांचे तोफखान्यांत गाडीवान म्हणून नौकर राहिला. पुढें तो आपल्या कर्तबगारीनें वाढत वाढत मोठ्या योग्यतेस चढला. त्याच्यावर पानशांचा हि चांगला भरंवसा होता. रूपराम हा शके १७३६ च्या ज्येष्ठ वद्य अमावास्येस मृत्यु पावला. त्यास औरस पुरुष संतति झाली नाहीं म्हणून त्यानें दत्तक पुत्र घेऊन त्याचें नांव रामचंद्र असें ठेविलें. रामचंद्र हि निपुत्रिक च मरण पावला. याचा वाडा शुक्रवार पेठेंत पंचमुखी मारुतीजवळ असून तो आजपर्यंत भाजेकर व चितळे यांच्या ताब्यांत होता. वाड्यानजीक रूपराम यानें एक मोठा हौद बांधिला असून त्यास अद्याप चौधऱ्याचा हौद या नांवानें च लोक ओळखितात. स्वतंत्र नळ बांधून ह्या हौदांत पाणी आणलेलें होतें. परंतु हल्लीं म्युनिसिपालिटीनें तो नळ बंद करून खडकवासल्याच्या तलावांतील पाणी ह्या हौदांत सोडलें आहे.

रूपराम चौधरी यांनीं आपल्या अधिकाराच्या वेळीं एक नंग्या गोसाव्यांची पलटण तयार करून चाकरीस ठेविली होती व तिची सरदारकी त्यानें मनोहरगीर गोसावी यांस दिली होती.

वर सांगितलें आहे कीं, पानशांकडील तोफखान्याचें काम काढून तें रावबाजींनीं आपला प्रिय त्र्यंबकजी डेंगळे यास दिलें. हा त्र्यंबकजी पहिल्यानें पेशव्यांचे पदरीं जासूद म्हणून नोकरी करीत होता. बातम्या व पत्रें पोंचविण्यांतील याची चलाखी पाहून श्रीमंतांची याजवर मर्जी बसली; व ती वाढत जाऊन अखेर त्यानें श्रीमंतांजवळून तोफखान्याची सरदारी मिळविली. त्र्यंबकजीकडे तोफखान्याचें काम, प्रत्यक्ष श्री. रावबाजींनीं दिलें होतें किंवा नाहीं व दिलें असल्यास त्याला कितपत अधिकार

सुपूर्त केला होता, याचा सरकारी कागदोपत्रीं दाखला आम्हांस मिळाला नाहीं. तथापि शके १७३९ च्या खडकीच्या लढाईंत हा तोफखाना पानशांच्या दिमतीस असल्याचें कागदपत्रांवरून सिद्ध होत आहे. यावरून त्र्यंबकजीकडे तोफखान्याचें काम प्रत्यक्ष गेलें नाहीं असें आमचें मत आहे.

याच वेळीं कान्होजीराव डफळे हे जतच्या गादीवर होते. रावबाजींची यांच्यावर हि गैरमर्जी झाल्याकारणानें त्यांचें संस्थान जप्त करून तें त्र्यंबकजी डेंगळ्याचे ताब्यांत द्यावें असा हुकुम झाला. या जप्ती हुकुमास कान्होजीरावानें जुमानलें नाहीं. तो तसाच दप्तरीं कागदावरच राहिला. या हकीकतीवरून याप्रमाणें च पानशांचा तोफखाना त्र्यंबकजीचे ताब्यांत गेला नव्हता, या आमचे मतास पुष्टि मिळते.

या सुमाराची हकीकत म्हणजे मराठीसाम्राज्याची प्रयाणकालाची कहाणी होय. ती साद्यंत नीटपणें मांडतां येईल अशी पहिल्या दर्जाचीं अगर दुय्यम दर्जाचीं पण अस्सल साधनें अजून व्हावीं तितकीं उपलब्ध झालेलीं नाहींत. फक्त एक दोन स्वदेशीयांनीं लिहून ठेविलेल्या बखरी व इंग्रज लोकांनीं लिहिलेल्या हकीकती हीं च काय ती त्या विषयाची सामग्री. पण पहिल्यांत आलेली माहिती त्रोटक आहे व दुसऱ्यांत दिलेली हकीकत उघड उघड एक तर्फी आहे. यासाठीं या प्रसंगाची आम्ही जी हकीकत देणार आहों ती हि त्रोटक च दिली जाणार हें उघड आहे. पुढें मागें अस्सल ऐतिहासिक पत्रें वगैरे साधनें मिळाल्यास या माहितींत कमीजास्त फेरफार करणें अवश्य होईल. शिवाय या काळची माहिती मनास डागण्या देणारी असल्यानें आम्हीं कागदपत्रांपलीकडे खोलांत न शिरतां फक्त पानसे घराण्याचा संबंध जेथें व जेवढा येईल तेवढी च हकीकत यापुढें देणार आहों.

## २. खडकीची लढाई व स्वराज्याचा शेवट.

नाना फडणीसांच्या पश्चात् पेशवाईच्या कारभाराची माळ माणकेश्वर नांवाच्या हरिदासबोवांच्या गळ्यांत पडली. श्रीमंतांच्या भोंवतीं सर्व स्वार्थी व नादान लोकांचा पूर्णपणें गराडा पडला. त्या मतलबी लोकांनीं पाहिलें कीं, मराठी साम्राज्य आतां सर्व बाजूनें पोखरलें गेलें असून तें लवकरच कोसळून पडेल. तेव्हां त्याच्या नंतरची सत्ता दक्षिणेंत बलवत्तर होईल तिला एव्हांपासून फितूर होऊन आपली कातडी व जहागिऱ्या शाबूत ठेवाव्या असा बेत पुष्कळ सरदारांनीं केला आणि त्याप्रमाणें तो बेत त्यांनीं हळू हळू अमलांत आणण्यास सुरवात हि केली. ही परिस्थिति श्रीमंतांना समजत नव्हती असें नाहीं. त्या साठीं त्यांनीं जी उपाययोजना केली, ती उंदरानें आपण होऊन मांजराच्या खालीं आश्रयास जाण्यासारखी होती. या मांजरानें वसईच्या तहापर्यंत आपले पंजे मऊ कापडाच्या हातमोजांनें झांकले असल्यामुळें त्याचें खरें स्वरूप पहिल्यानें श्रीमंतांच्या ध्यानांत आलें नाहीं. श्रीमंत एकदा पंजाच्या पकडींत पक्के सांपडले असें ठरल्यावर ह्या मांजरानें आपले हातमोजे काढून टाकून आपलीं तीक्ष्ण नखें बाहेर काढलीं व उंदराला

आपली मर्जी होती तावत्काळ खेळत ठेवून शके १७४० च्या सुमारास मराठी साम्राज्याच्या नरडीस नख दिलें.

गंगाधर शास्त्री पटवर्धन यांचा खून त्र्यंबकजी डेंगळ्यानें केला असें कंपनी सरकारच्या अधिकाऱ्यांनीं ठरवून प्रथम त्यास आपल्या स्वाधीन करून घेतलें. आणि राज्यकारभार अव्यवस्थितपणानें चालतो सबब राज्याच्या रक्षणार्थ इंग्रजानीं रायगड, सिंहगड, व पुरंदर हे तीन किल्ले, श्रीमंतांकडून हमी दाखल आपले ताब्यांत घेतले. एवढेंच नव्हे तर, त्याच्या भरतीस छत्तीस लाखांचा स्वतंत्र प्रांत हि हातांखालीं घातला. या प्रकारामुळें श्रीमंतास वाईट वाटून, गेलेला प्रांत परत मिळविण्यासाठीं त्यांनीं तयारी चालविली व अठ्ठावीस हजार फौज गोळा केली. फौजेचें आधिपत्य शूर सरदार बापू गोखले यांना देण्यांत आलें.

इंग्रजांनीं हि आपली लढाईची तयारी जारीनें चालविली. इंग्रजांनीं पेशव्यांचें सैन्य फितुरीनें आंतून पोखरून ठेविलें होतें व त्यांच्याकडून लांच खाल्याशिवाय पेशव्यांचें सैन्यांत राहिलेले असे सोंवळे सरदार फारच थोडे होते. ही परिस्थिति जाणूनच सरदार विंचुरकर व सरदार बारामतीकर काळे यांनीं या वेळीं लढाईचा प्रसंग आणणें फायद्याचें नाहीं म्हणून श्रीमंतांना परोपरीनें विनवून सांगितलें परंतु त्याचा बिलकुल उपयोग झाला नाहीं. पेशवे सरकारची लढाईची तयारी, व त्याबद्दल होणारे गुप्त बेत हे इंग्रजास, या गुप्त बेतांतच असलेल्या मुत्सद्यांकडून दररोज नेमके कळत असत. पेशव्यांकडील गुप्त बेत व खलबतें आठ दिवस चालू होतीं. या आठ दिवसांच्या अवधींत इंग्रज अधिकाऱ्यांस आपल्या सैन्याची जमवाजमव करण्यास पुरेसा वेळ मिळाला. नगर व मुंबईहून या अवधींत त्यांनीं आपलीं कवायती पलटणें व घोडदळ पुण्यास आणवून गारापेराजवळ छावणी दि.ली. पेशवे सरकारांनीं निपाणकर, अक्कलकोटकर, निंबाळकर, घोरपडे, जाधव, विंचूरकर, पटवर्धन, राजे बहादूर, भोईटे, पानसे, पुरंदरे वगैरे तमाम सरदार आपापल्या पथकानिशीं जमा केलें. मुख्य सेनापतित्व बापू गोखले यांचेकडेस दिलें. गोखल्यांनीं आपल्या सैन्याचा तळ इंग्रज सैन्यासमोरच कांहीं अंतरावर दिला. आश्विन वद्य एकादशीच्या दिवशीं सकाळीं पेशव्यांचें सैन्य लकडीपुलाच्या बाजूनें नदी उतरून खडकीकडे जात होतें. दुपारीं श्रीमंत पर्वतीस जाण्याचे निमित्तानें बाहेर पडले. त्यांच्या बरोबर पांच हजार सैन्य होतें. वाटेंत पानशांच्या वाड्यांजवळ जरीपटक्याच्या निशाणाचा दांडा मोडला, यामुळें अपशकून होऊन सर्वांची हिंमत खचली. नंतर निशाणास नवा दांडा घालून स्वारी पुढें गेली. स्वारीबरोबर बापू गोखले, पुरंदरे व गणपतराव पानसे हे सरदार होते. पर्वतीच्या तळाशीं पोंचल्यावर पहिल्या पायरीवर बापू गोखले घोड्यावरून खालीं उतरले व श्रीमंतांच्या पायावर डोई ठेवून विनंति केली कीं, मला लढाई करण्यास आज्ञा असावी. तेव्हां श्रीमंतांनीं आज्ञा दिली. नंतर बाकीच्या सरदारांनीं पायांवर डोया ठेऊन श्रीमंतांचा निरोप घेतला, आणि आपआपल्या फौजेसह औंध

(पुण्याजवळील) येथील मैदानांत येऊन इंग्रजांशीं लढाई देण्याचे तयारीनें ते उभे राहिले. इकडे श्रीमंत पर्वतीवर गेले. लढाईस प्रारंभ तिसरे प्रहरीं चार वाजण्याच्या सुमारास झाला. या वेळीं पेशव्यांचे कारभारी, मोर दीक्षित हे फितूर झाले होते. तसेंच बाळाजीपंत नातू व यशवंतराव घोरपडे हे तर पहिल्यापासून पेशव्यांकडील बातम्या फोडून अलपिष्टनला मदत करीत होतेच. श्रीमंतांकडे या वेळीं वीस हजार घोडदळ, आठ हजार पायदळ, व वीस तोफा होत्या. गणपतराव यांचे मदतीस माधवराव कृष्ण पानसे हे होते. हें सैन्य चतुःशृंगीच्या टेकडीपासून संगमावरील रेसिडेन्सीपर्यंत पसरलें होतें. इंग्रजांचें सैन्य हि पुष्कळ असून मराठ्यांच्या सैन्यासमोर दीड मैल अंतरानें उभे होतें. पेशव्यांच्या सैन्यांत डाव्या बगलेकडे मोर दीक्षित व विंचूरकर, उजव्या बाजूस बापू गोखले व मध्यें गणपतराव पानसे यांचा तोफखाना याप्रमाणें रांग धरून होतें. ही रांग धरीत असतां अलपिष्टन हा रेसिडेन्सी सोडून मेण्यांत बसून दापोडीच्या सैन्यास मिळण्यासाठीं डावे बगलेकडील सैन्यांतून गेला. तो एकटाच होता तरी मोर दीक्षित वगैरेंनीं त्याची नुस्ती वास्तपुस्त हि केली नाहीं. या वेळीं श्रीमंत हे पर्वतीवर उत्तरेकडील गच्चीवर बसून लढाई पहात होते. पानशांनीं सुरुवातीस महांकाळी व दर्या भवानी या दोन तोफांचे मोरे सुरू केले. प्रथम कांहीं वेळ तोफांनीं आवाज दिले व पुढें त्यांनीं जाब देण्याचें नाकारीलें याचें कारण फितुरी हें होय. ही फितुरी पुढील प्रमाणें झाली होती.

पानशांच्या तोफांच्या माऱ्यापुढें आपला टिकाव लागणें कठिण अशी भीति इंग्रज सेनापतीस नेहमीं असे. ही भीति, लढाई सुरू होण्यापूर्वी जी अवधि मिळाली त्या अवधींत एका स्वराज्यद्रोही नीच मनुष्यानें दूर केली. त्यांनीं तोफखान्यांतील दारूचे कोठारांतील नोकर फितूर करून दारूचें पोत्यांत भाजकी बाजरी मिसळून ठेविली. हा खेळ वेळींच खेळून ठेविल्यामुळें ऐनवेळीं पानशांस तोफांनीं दगा दिला.

लढाई रात्रींच्या आठ वाजेपर्यंत चालली होती, पुढें ती काळोख पडल्यावर थांबली. झालेल्या लढाईंत कोणत्याच पक्षास जय मिळाला नाहीं. इंग्रज–लेखक पेशव्यांच्या सेनेचा पराभव झाल्याचें लिहितात, परंतु तें साफ चुकीचें आहे. लढाई संपल्यानंतर तोफखान्यांत फितुर करणारे देशद्रोही वीर अलफिष्टन साहेबाकडे बक्षिस मागण्याकरितां गेले. त्या वेळीं त्यानें त्या नीचांची निर्भर्त्सना करून त्यांना जन्मभर कैदेंत कुजत ठेवण्याचें पारितोषिक दिलें.

मराठ्यांकडे सर्वत्र फितुरी माजल्यानें आपला पराजय झाला असें खोटें च वर्तमान श्रीमंतांना फितूर झाल्यापैकीं कोणी एकानें सांगितलें. त्या समयीं त्यांनीं पर्वती सोडली व वापदेवाचा घांट गांठला.

रात्रीं रणभूमीवर राहिलेल्या आपल्या तोफा परत कशा काढाव्या याची पानशांना अडचण पडली. तरी हि तसल्या अडचणींतून त्यांनीं दहा तोफा काढल्या व त्या



कै. श्री. बळवंतराव त्र्यंबकराव पानसे.



श्री. गहिनीनाथ माधवराव पानसे,
B. A. LL. B.

रात्रींच्या रात्रीं सिंहगडास पाठवून दिल्या ( मागें सिंहगड इंग्रजांस दिला असें लिहिलें आहे. पण कांहीं दिवसांनीं तो व इतर किल्ले त्यांनीं मराठ्यांना परत केले होते ). पहाटे पुन्हा थोडीशी चकमक झडली. तेव्हां पानशांकडील मंडळीनें " घोड्यांच्या तोफांचे व ज्या दोन तोफा तळावर राहिल्या होत्या, त्यांचे बार काढिले. प्रातःकाळ झाल्यावर आबा पुरंदरे यांनीं महंकाळी काढण्याची सल्ला दिली, तों फिरंगी याज-कडील तोफेचा गोळा दहा हातांवर पडला. " त्यामुळें गणपतरावांचा नाइलाज झाला. मग ते, गोखले व पुरंदरे आठ तोफांसह श्रीमंतांच्या शोधासाठीं बापदेव घांटाकडे निघून गेले. इकडे दर्याभवानी व महंकाळी ह्या प्रसिद्ध तोफा इंग्रजांच्या हातीं लागल्या. त्यांनीं त्यांच्या कानांत खिळे ठोकून त्या नादुरस्त केल्या. या तोफा अशा स्थितींत बरेच दिवस याच मैदानांत होत्या व त्या तशा स्थितींत असलेल्या स्वतः डोळ्यांनीं पाहिलेलीं कांहीं माणसें आज हयात आहेत. खडकीकडील बर रोड, जो होळकर पुलावरून युरोपियन बोट-क्लबाकडे जाणाऱ्या रस्त्याशीं काटकोन करून खडकी गांवाकडे वळतो, त्या रस्त्याचे एका बाजूस हल्लीं ज्या दोन तोफा पुरलेल्या दिसतात त्या च या असाव्यात असें कांहींचें म्हणणें आहे. नंतर बाळाजीपंत नातूनें दुसरे दिवशीं पुण्यावर इंग्रजांचें निशाण फडकाविलें. तेरे पितर सरग भये ! यांत नातूनें महाराष्ट्रावर महदुपकार करून ठेविले ! !

## ३. स्वराज्यसंरक्षणार्थ अखेरचा प्रयत्न.

बापदेव घांटाकडून श्रीमंत तसेच पुढें जेजुरीस गेले. त्या ठिकाणीं गोखले व गण-पतराव पानसे हे त्यांना भेटले. गणपतरावाबरोबर त्यांचे चिरंजीव दामोदरराव हि होते. नंतर ही सर्व मंडळी साताऱ्यास जाऊन पुढें पंढरपुराकडे वळली. इंग्रज सेना-पति त्यांचे मागें पाठलाग करीत होता. पंढरपुराजीक आष्टे गांवीं दोन्ही सैन्यांची गांठ पडली. श्रीमंतांनीं स्वस्थ बसून रहावें, आम्ही इंग्रज सेनेशीं सामना करतों असें बापूनें व गणपतरावानें परोपरीनें विनविलें. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. श्रीमंत एकटे च तेथून निघाले ते नर्मदा उतरून अशीरगडाचे आश्रयास आले. तेथें ते आपण होऊन इंग्रज सेनापति मालकम साहेब यांच्या स्वाधीन झाले. यानंतर त्यांनीं पेनशन् घेऊन अखेरपर्यंत इंग्रजांनीं दिलेल्या तुकड्यावर पिंड पोषित ब्रह्मवर्तास काळ काढिला !

गणपतराव पानसे व त्यांचे चिरंजीव दामोदरराव हे दोघे अष्टयास असतां माधव-राव कृष्ण हे हि तेथें येऊन त्यांना मिळाले. पानशांनीं व बापूनीं अशा वेळीं पळ काढणें नामर्दपणाचें लक्षण समजून लढाईस तोंड दिलें. अष्टें येथें च युद्ध करीत असतां बापूंचा अंत झाला !! पानसे हे पुढें आपले तोफखान्यानिशीं विजापुराकडे गेले. इंग्रज सेनापति त्यांचा पाठलाग करीत च होता म्हणून ते सोलापूरास येऊन तेथील किल्ल्याचे आश्रयानें राहिले. किल्ल्यांत असतांना त्यांनीं इंग्रज सेनेशीं दोन हात

करून अखेरचा निर्णय लावून घ्यावा असें ठरविलें, व त्याप्रमाणें जोराची इंग्रजी सैन्यास त्यांनीं टक्कर हि दिली. परंतु दुर्दैवानें या त्यांच्या शेवटच्या प्रयत्नांत त्यांना यश आलें नाहीं.

या शेवटच्या सोलापूरच्या प्रसंगाचें वर्णन प्रत्यक्ष स्वतः गणपतरावांच्या चिरंजिवांनीं केलें आहे तें त्यांच्या च शब्दांत पुढें देतों.

" यापुढें श्रीमंत निघून देशावर गेले. ते समयीं सरकारचे आज्ञेनें गोखले वगैरे सरदार यांजकडील पायदळ व ( पानशांचा ) तोफखाना घेऊन गणपतराव व आम्ही ( दामोदरराव ) चंदनवंदन येथें होतों. त्या तोफखान्यांपैकीं पांच तोफा व नवी फौज पायदळ घेऊन, जनरल मंदरोल ( मनरो ) हा कर्नाटकांतून सात पलटणें घेऊन, नवाब पोलादजंग बहादूर ( निझामाचा एक सरदार ), सात पलटणें व पोलादजंग याजकडील फौज दुल्लेखान ( याच्या हातांखालची फौज ) मदतीस घेऊन ( आमच्यावर चालून आला तेव्हां त्याची व आमची ) सोलापूर मुक्कामीं लढाई झाली. त्या लढाईचे पूर्वीं " सीना व भीमा मध्य देश घेऊन, फौज व तोफखान्यासुद्धां खर्चाचा बंदोबस्त करून देतों " म्हणून इंग्रज बहादूर यांजकडील बोलणें आलें होतें. परंतु आपले खानदानीवर नजर देऊन लोभ न धरितां शके १७४० मध्यें ( तारीख ६ माहे मे १८१८ ) लढाईच घेतली. त्या लढाईंत प्रथम बसते घोडीस गोळा लागून ठार पडली. तेव्हां सरदार पडले असें फौजेच्या मनांत येऊन बेहवा गर्दी जहाली. परंतु खैर होऊन, फौज पायदळ एकत्र करून इंग्रजावर चालून घेतलें. तों उजवे हातास गोळीची जखम लागून बहुत जेरीस येऊन दोन घटका आराम होण्याकरितां बाजूस बसले. इंग्रज बहादूर यांनीं तळावर चालून आल्यानंतर किल्ल्यांतून लढाईस सुरुवात झाली. लढाई सरंजाम वरकड बंदोबस्ताप्रमाणें दोन्ही बाजूंचे समसमान सबब तहाचें बोलणें उभय पक्षीं होऊन तहनामा ७८ रजब सन सलान अशर ता. १४ मे सन १८१८ इसवींत जहाला. "

पेशव्यांनीं ज्या गणपतराव पानशांचा अपमान करून त्यांचेकडील तोफखाना काढून त्यांची स्थिति पंख उपटलेल्या पक्ष्याप्रमाणें केली; त्याच गणपतरावानें संकटकाळीं आपले स्वामीचे संरक्षणार्थ धांव घेतली. यावरून त्यांची योग्यता वाचकांच्या लक्षांत येईल. चहूंबाजूनें आभाळ फाटलें असतां व खुद्द खाविंद हि रस्ता फुटेल तिकडे पळत असतां, आपण स्वीकारलेल्या कार्यांत यशाचा वांटा आपणास किती मिळेल हें ते पूर्णपणें जाणून होते. अशा प्रसंगांत असतांना हि शत्रूंनीं दाखविलेल्या लालूचीस न भुलता समरांगणावर गोळी लागून बेशुद्ध होऊन पडेपर्यंत ते आपलें कर्तव्यकर्म करीत होते. ही कर्तव्यनिष्ठा त्यांना इह व पर लोकीं भूषविणारी झाली यांत संशय नाहीं. गणपतरावांशीं इंग्रज अधिकाऱ्यांनीं जो अखेरचा तह केला तो हि न पाळतां या प्रामाणिक व थोर घराण्याची पुढें कशी वाट लाविली हें पुढील हकीकतीवरून लक्षांत येईल.

गणपतरावाशीं जो तहनामा ठरला " त्या तहनाम्यांतील चौथ्या कलमांत सरंजामाचा वगैरे पेशजीप्रमाणें वंदोबस्त करून द्यावा असा करार ठरला असतां, एलफिस्टन साहेबांनीं १३२१८ रुपयांची जहागीर व पेनशन करून दिलें. तें आश्विन शुद्ध दशमी शके १७४७ पावेंतों (वडील विद्यमान असेपर्यंत) चाललें. पुढें तो सरंजाम व पेनशन् आमचे (दामोदरराव यांचें) नांवें चालवावें, परंतु ते समयीं आम्ही दौलतराव शिंदे अलिजा बहादुर यांजपाशीं होतों. पुणें मुक्कामीं मातोश्रींनीं आमचा गैरवाका समजावून आपले नांवें दोन हजार रुपये दरसाल पेनशन् करून घेतलें. तें हल्लीं चालत च आहे. (मातोश्रींच्या गैरवाक्याची) चौकशी ता. २८ सप्टेंबर १८२७ रोजीं होऊन इनामवृत्ति, घरवाडा आमचा आम्हांस देवविला. त्यास इनामवृत्तीचें उत्पन्न अजमासें १००० रु. पर्यंत आहे, सबब जातीचे बंदोबस्ताविषयीं अर्ज केला असतां " विलायतेस लिहिलें गेलें आहे, उत्तर आलें म्हणजे वंदोबस्त करून देऊं. म्हणून स. १८२९ पासून हुकूम होत आहे " म्हणून दामोदररावांनीं आपल्या कैफयतींत इंग्रज सरकाराकडे स. १८३२ मध्यें तक्रार केली आणि पेशवे सरकारांतून जो मानमरातब चालत होता त्यांत आणि कंपनी सरकारनें आतां चालविलेल्या मानमरातबांत काय फरक आहे तें पुढे लिहिल्या प्रमाणें सांगितलें आहे. " पेशवे सरकारांतून चौघडा, जरीपटका आदिकरून साहेब सलतबतची सरदारी करीत होते. कंपनी सरकारांतून (त्या ऐवजीं) वडिलांचे जातीस सरंजाम देऊन चालविलें. (पण) हल्लीं आम्हांस सरकारांतून सरंजाम किंवा पेनशन् कांहीं एक चालत नाहीं. फक्त सरदार लोकांचे दुसरे प्रतींत (नांव) घालून दसऱ्याचा पोषाख वडिलाप्रमाणें देतात. " या एकंदर उताऱ्यावरून गणपतराव व त्यांचे चिरंजीव दामोदरराव यांची बरीचशी माहिती व कंपनी सरकारचें त्यांच्याशीं झालेलें वर्तन याचा पुष्कळसा बोध होईल.

## ४. इंग्रजांचें जहागिरी खालसा करण्याचें धोरण.

अष्टीच्या लढाईंत गणपतराव व माधवराव पानसे यांनीं बापूंना आपल्या तोफखान्याच्या मदतीनें चांगलें सहाय्य केलें, तदनंतर माधवराव हे जेजुरीकडे परत फिरले व पुढें सोनोरीस आपल्या गांवीं आले. स्वराज्य नष्ट झाल्यामुळें त्यांना इकडे राहणें बरें वाटेना, सबब ते काशीवासास गेले व तेथें शके १७४३ सालीं वारले.

इंग्रजी अंमल राजरोसपणें सुरू झाल्यानंतर जुने जहागीरदार व सरंजामदार यांच्या जहागिरी व सरंजाम हीं पुढें चालवावीं किंवा नाहीं याबद्दल अलफिष्टन साहेबांच्या देखरेखीखालीं इंग्रजांनीं एक चौकशी मंडळ नेमिलें. त्यानें पूर्वीचे दाखले पाहून कांहीं जहागिरी जप्त केल्या व कांहीं पुढें चालविण्याचें आश्वासन दिलें. माल सरंजामदारांना स्वतःजवळ फौज बाळगण्याची मनाई केली. इतर सरदारांप्रमाणें पानसे यांची हि चौकशी झाली व अलफिष्टनानें जो निकाल दिला त्यांत पुढील सारांश ग्रथित आहे.

"of the family of Topkhana, who left the Peshawa after the affair of Ashta and went to Jejuri. He pleaded his brother's ill-health. The family and Jagir are of old standing"

अलपिनाष्टनें पुढें म्हटलें आहे कीं, माधवराव पानसे यास सरंजामाबद्दल ७१९३ रुपये एक पिढीपर्यंत चालू ठेवावे. त्या प्रमाणें त्यांनीं कलकत्त्याच्या सुप्रीम गव्हर्नमेंट कडे रिपोर्ट केला होता. त्यावर फेर चौकशी होऊन ठरविलेली रकम कमी करून ५४८४ रुपयांची नेमणूक द्यावी असा निकाल करून तो मंजूरीसाठीं विलायतेस पाठविला. हा रिपोर्ट ता. १५ आक्टोबर १८१९ रोजीं केला.

वास्तविक स्वराज्य नष्ट झालें तेव्हां ( शके १७४० ) माधवराव कृष्ण यांच्याकडे दहा हजार चारशें दहा रुपयांचा सरंजाम चालत होता. कलकत्त्याच्या वरिष्ट सरकारानें साधारण त्याच्या निम्मे रकम मंजुर केली. पानसे सरदार अखेर पर्यंत स्वामिनिष्ठ राहून श्रीमंतांच्या बाजूस चिकटून राहिल्यामुळें इंग्रजांनीं त्यांचें एवढें नुकसान केलें, मात्र वरील सरंजामी उत्पन्नाखेरीज इतर इनामी उत्पन्न जेवढें होतें तेवढें करार केलें.

या सुमारास ज. वेलस्ली यानें तोफखानेवाले पानसे सरदारांच्या सरंजामाची एक तपशीलवार यादी केलेली आढळते तींत ३५८००० रु. सरंजाम दाखविला आहे. त्याचा तपशीलः—

| | |
|---|---|
| १६२००० | हुनगुंद. |
| २१००० | हलसंगी |
| १८००० | म्हमदापूर |
| ३०००० | मल्हारगड |
| ४२००० | मुतलावीं |
| ४५००० | हिपरगे |
| ४०००० | वैराग पानगांव |
| ३५८००० | |

सखारामपंत पानशांच्या वंशांत त्यांच्या नातवापासून सरंजामी उत्पन्न चाललें होतें. इतलाखी उत्पन्नाबद्दल कोठें उल्लेख आढळला नाहीं. म्हणून ती धाकटे बाजीरावसाहेब यांची देणगी होती, असें गृहित धरून इ. स. १८२२ ते १८२५ या सालच्या दरम्यान इंग्रज सरकारानें ती जप्त केली असावी. याखेरीज फक्त खाजगी मिळकत, इनाम जमिनी, गांवें, वाडे वगैरे या शाखेकडे व पानशांच्या इतर शाखांकडे चालू राहिले व ते अद्यापपर्यंत चालत हि आहेत.

शके १७४७ च्या सुमारास गणपतराव विश्वासराव पानसे वारले. त्यांस संतति नसल्यानें त्यांनीं आपल्या मेहुणीचा मुलगा दामोदर यास दत्तक घेतलें. दामोदरराव यांच्या जनक वडिलांचें नांव गोविंदराव असून आडनांव उडपी धारवाडकर असें होतें. या दत्तकाच्या परवानगीसंबंधानें गणपतराव यांनीं सरकारांत एक अर्ज गुदरला, त्याचा सारांश पुढीलप्रमाणें होताः—

" राजश्री गोविंदराव उडपी हे आमचे साडू. त्यांची स्त्री व आमची स्त्री उभयता सख्या बहिणी. यांचा पुत्र पांच महिन्यांचा आमचे स्त्रीनें ( ओटींत ) घेतला. याचें कारण आम्हांस संतति होत होती, परंतु ती नष्ट होई; म्हणोन पुत्र घ्यावा असें म्हणणें स्त्रीपाशीं आमचें जहालें. त्यावरून तिनें हा पुत्र शके १७२४ दुंदुभि नाम संवत्सरे सालीं आणून, पुत्रत्व करून आम्हीं स्वगोत्रानें जातकर्मादि संस्कार केले. नंतर व्रतबंध जहाला. चार शिष्ट ब्राह्मण व भाऊबंद होते, ते समयीं कोणाचे मतें ( दत्त ) विधान करावें, कोणाचे मतें दानप्रतिग्रह जाला, संस्कार जहाले. आतां विधानाची जरूरी नाहीं असें होतें. उपनयनादिक आपले हातें जहाले आहे, तरी त्यापेक्षां विधान न केल्यास चिंता नाहीं, म्हणोन, त्या वेळेस न केले. हल्लीं आमचे स्त्रीचे शरीरास समाधान नाहीं. तिचे अंतःकरणीं, विधान झालें म्हणजे यथास्थित ( होईल ), व चार ( शिष्ट ) म्हणतात, हा पुत्र पूर्वविधि करून जहाला च आहे; परंतु, विधान करावें म्हणजे उत्तम. त्यावरून अर्जी लिहिली आहे; वगैरे " याप्रमाणें अर्ज केल्यावर सरकारांतून परवानगी मिळाली.

दामोदररावांच्या मुंजीचे वेळीं, पुण्यांतील विठ्ठलरावतात्या विंचूरकर, चिंतोपंत देशमुख, नारायणरावदादा वैद्य यांच्यासारखी प्रतिष्ठित मंडळी आली होती. त्या वेळीं हि दत्तविधानाचा होमहवन वगैरे विधि झाला च पाहिजे कीं काय, असा प्रश्न निघाला असतां, मुलाचें सर्व जातककर्म गणपतरावभाऊंनीं केलें आहे सबब होमहवन करण्याची जरूरी राहिली नाहीं म्हणून शास्त्रार्थ निघाला. पुढें मुलाची मुंज गणपतरावांच्या मांडीवर लागली. मुंज लागल्यानंतर सरस्वतीबाई मरण पावल्या. दामोदरराव जसजसा मोठा होत चालला तसतसा उमाबाई ( सावत्र आई ) त्याचा द्वेष करूं लागली. तो उत्तरोत्तर जास्त वाढत चालला. त्याचा परिणाम चांगला होणार नाहीं असें पाहून गणपतराव यांनीं दामोदररावास रोजगारानिमित्त ग्वाल्हेरीस पाठविण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें शिंदे सरकारास स्वदस्तूरचें पत्र लिहिलें. शिवाय पत्रांत नाणवली हा गांव पूर्वीं महादजी शिंदे यांनीं पानशांना इनाम करून दिला होता, पण तो दौलतराव शिंद्यांनीं परत घेतला, तरी तो सोडवून द्यावा असें त्यांत लिहिलें होतें. दामोदरराव ग्वाल्हेरीस गेल्यावर तेथें त्यांचें चांगलें स्वागत झालें व त्यांचे खर्चास शिंद्यांनीं दरमहा एक हजार रुपयांची नेमणूक करून दिली. पुढें कांहीं दिवसांनीं इकडे गणपतरावांची प्रकृति बिघडली, तेव्हां त्यांनीं दामोदररावास, पाठविण्याबद्दल शिंद्यांस

पत्र लिहिलें, परंतु दामोदरराव हे वेळेवर इकडे येऊं शकले नाहींत. गणपतराव अत्यवस्थ झालेले पाहून उमाबाईंनीं दुसरा दत्तक घेण्याविषयीं त्यांस विनंति केली, पण ती त्यांनीं साफ अमान्य करून प्राण सोडिला. गणपतरावांचे पश्चात् त्यांच्या घरीं मोठी चोरी झाली. त्या चोरींत बराच ऐवज गेला. शिवाय उमाबाईनें बऱ्याच मौल्यवान् जिनसा आपले माहेरीं ( शिवापूरचे देशपांडे ) नेऊन ठेविल्या. पुढें दामोदरराव हे इकडे परत आल्यावर त्यांना ही सर्व हकीकत समजली. शिवाय उमाबाई असें म्हणूं लागल्या कीं, तूं परगोत्री असून तुझें दत्तविधान सशास्त्र झालें नाहीं म्हणून तुझी या इष्टेटीवर मुळीं च मालकी नाहीं. तेव्हां दामोदररावांनीं एजंट व गव्हर्नर –इन–कौन्सिल मुंबई यांच्याकडे फिर्याद केली. त्यांनीं चौकशी करून ता. २८ सप्टेंबर १८२७ रोजीं निकाल दिला व त्यांत दामोदररावांचें दत्तविधान शाबीत ठरविलें. यावर उमाबाईनें अपील केलें, त्याचा हि निकाल ता. ११ मे १८३१ रोजीं दामोदररावासारखा झाला.

या तंट्यांत दामोदररावांच्या बहुतेक इष्टेटीची वाताहत झाली. या दाव्याचे वेळीं असिस्टंट पोलिटिकल एजंट यानें घरांतील जंगम जिनगीची जप्ती केली. त्यावेळीं पंचांचे मतें त्याची किंमत ७७१७०८१०८३ रुपये झाली. या जप्तीच्या यादींत देवांच्या व माणसांच्या अंगावरील जे दागदागीने नमूद केले आहेत ते बरेच मूल्यवान् असून विविध प्रकारचे आहेत. त्यांचीं नांवें सुद्धां सांप्रत आपल्याला नवीं वाटतील. गणपतीपुढील उंदीर, गोपालकृष्णाखालील शेष हे हिऱ्यांचे खडे बसवून नकशीकाम केलेले होते असें यादींत नमूद आहे. यावरून त्यांच्या संपत्तीची एकंदर कल्पना होईल.

या सुमारास म्हणजे शके १७४९ आषाढ वद्य पंचमीस यशवंतराव सखाराम पानसे हे मृत्यु पावले. तेव्हां त्यांची स्त्री यमुनाबाई यांनीं भाऊबंदांपैकीं एक मुलगा दत्तक घेऊन त्याचें नांव वामनराव असें ठेविलें.

यशवंतराव यांचें नांव सरदार पटांत दुसऱ्या क्लासामध्यें दाखल होतें व त्यास दरसाल पोषाख मिळत असे. नंतर हा मान त्यांची स्त्री यमुनाबाई यांस मिळाला. यमुनाबाईच्या पश्चात् त्यांचे दत्तक पुत्र वामनराव यांस हा मान मिळाला. परंतु त्यांचे हयातीअखेर पोषाख बंद झाला व पुढें त्यांचे चिरंजीव यशवंतराव यांचें नांव सरदार पटांत दाखल झालें.

कृष्णराव माधव हे शके १७७० मध्यें कार्तिक वद्य द्वितीयेस वारले. तेव्हां त्याजकडील सरंजाम इंग्रजसरकारानें जप्त करून त्याच्या निम्मे आकाराचें पेनशन कृष्णरावांचे वडील पुत्र गोपाळरावबापू व धाकटे गजाननराव यांना नेमून दिलें. कृष्णरावाकडे १०४१० रु. सरंजाम चालत होता असा दाखला आढळतो. त्याऐवजीं गोपाळराव यांना ४०३८११८१ रुपये व गजाननरावास २०० रु. व त्यांची मातोश्री दुर्गाबाई यांना १२० रु. याप्रमाणें वांटणी करण्यांत आली. या बायांच्या पश्चात् त्यांच्याकडे

चालू असलेली रक्कम गोपाळराव व गजाननराव यांना त्यांच्या हयातीपर्यंत [illegible]-शनें मिळेल असा ठराव ता. २० जुलै १८४९ रोजीं झाला. त्यानंतर गोपाळराव हे शके १७९९ आषाढ शुद्ध अष्टमीस व गजाननराव इ. स. १८९० सालीं वारले आणि वरील ठरावान्वयें हें पेनशन त्यांच्या पश्चात् अजिबात बंद करण्यांत आलें.

पेशवाई नष्ट झाल्यावर इंग्रज सरकारचें राजकीय धोरण ( पोलिटिकल पॉलिसी ) कसें होतें हें सांगणें अवश्य आहे. अलपिष्टन यानें त्या वेळीं दक्षिणेंतील सरदारांची व जहागिरदारांची एक यादी केली व त्या यादींत दोन वर्ग पाडले. पहिल्या वर्गांत इ. स. १७५१ सालापर्यंत ज्यांना जहागिरी मिळाल्या त्यांचा समावेश केला; व दुसऱ्या वर्गांत तदनंतरच्या जहागिरींचा समावेश केला. पहिल्या वर्गाच्या जहागिरी मोंगल बादशहा व सातारकर छत्रपति यांनीं दिलेल्या आहेत असें समजून त्या वंशपरंपरेनें चालविल्या जाव्यात व दुसऱ्या वर्गांतील, पेशव्यांनीं दिल्या असल्यानें त्यापुढें जप्त केल्या जाव्यात असें ठरविलें होतें. वास्तविक अलपिष्टननें सर्व जहागिरींना धक्का लावण्यांत येणार नाहीं असें वचन दिलें होतें. पण पुढें तें वरील ठरावानें मोडण्यांत आलें. याबद्दल फार गवगवा होऊं नये व जहागिरदार एकदम गरिबींत येऊं नये म्हणून अशी युक्ति केली कीं, जे जहागीरदार हयात आहेत त्यांच्या हयातीपर्यंत ती जहागीर त्यांच्याकडे तशीच्या तशीच चालेल, त्यांच्या पश्चात् त्यांच्या मुलाकडे जहागिरीच्या रकमेपैकीं निम्मे रक्कम रोख पोलिटिकल पेनशन म्हणून देण्यांत येईल आणि मुलाचे हयातीनंतर हें पेनशन अजीबात बंद करण्यांत येईल. ही घटना वाचकांच्या स्पष्टपणें लक्षांत येण्या-साठीं त्या वेळीं झालेला सरकारचा ठराव पुढें देत आहों. तो फार विस्तृत आहे. त्यांतील पहिल्या तेरा कलमांत, जहागिरी नव्या कोणत्या.व जुन्या कोणत्या यांतील भेद दाख-वून त्या पुढें कोणत्या तऱ्हेनें चालवाव्या याचा ऊहापोह केलेला आहे. शेवटील आठ कलमांमध्यें कांहीं जहागिरदारांनीं केलेल्या तक्रारींचा उल्लेख करून त्यांचा त्यांत निकाल हि दिलेला आहे, या शेवटच्या आठ कलमांत पानसे घराण्याचा संबध नसल्यामुळें फक्त पाहिलीं तेरा कलमें दिलीं आहेत ( परिशिष्ट क्रमांक २९ पहा ).

वर उल्लेखिलेल्या ठरावास अनुसरून माधवरावांच्या पश्चात् इंग्रजांनीं कृष्णरावाकडे त्यांच्या हयातीपर्यंत तो सरंजाम चालू ठेविला व त्यांच्या मागें हा सरंजाम इ. सन १७५१ च्या नंतरचा आहे असें ठरवून, वर सांगितलेल्या ठरावाप्रमाणें निम्मे केला, आणि गोपाळराव व गजानराव यांच्या मृत्यूनंतर तो अजिबात च बंद केला. कृष्णाजी माधवराव हे ता. १२ नोवेंबर १८४८ सालीं वारले.

पानसे घराण्यांत, प्रत्येक भावाकडे किती सरंजाम होता व तो सालोसाल कसा वाढत गेला हें दाखविणारी एक यादी आम्हांस आढळली आहे. बहुधा इंग्रजी अंमल सुरू झाल्यानंतर ज्या वेळीं पानशांचा सरंजाम खालसा केला; त्यावेळीं ही यादी आपल्या तक्रारी अर्जास जोडण्यासाठीं तयार केली असावी. यादीवरून असें दिसतें

कीं, पेशवाईअखेर पानशांकडे १०३७२४ रुपयांचा सरंजाम चालू होता, याशिवाय भिवराव यशवंत, महिपतराव लक्ष्मण व केशवराव लक्ष्मण हे निपुत्रिक वारल्यामुळें त्यांच्याकडे असलेला ७६५८८ रुपयांचा सरंजाम होता; तो पेशवे सरकारांनीं पूर्वीच जप्त केला होता. ही यादी समग्र च दिली आहे ( परिशिष्ट क्रमांक ३० पहा ).

पानशांच्या संबंधीं राजकीय बाबतींत आतां फारसें कांहीं लिहावयाचें राहिलें नाहीं. स्वराज्य असल्याशिवाय स्वातंत्र्य नाहीं व स्वातंत्र्याशिवाय राष्ट्रांतील व्यक्तीस आपल्या गुणांचा विकास करण्यास वाव सांपडत नाहीं. शिवाजी महाराजांनीं स्वराज्याची मुहूर्त मेढ रोंविल्यापासून पानशांनीं आपला त्यांत शिरकाव करून घेतला व सुमारें दीडशें पावणे दोनशें वर्षांच्या काळांत ते आपल्या गुणानें व शौर्यानें पुढें आले. शौर्य, मुत्सद्दीपणा, प्रामाणिकपणा, व स्वामिभक्ति हे गुण यांचे अंगीं विशेष प्रामुख्यानें वसत असून खऱ्या क्षत्रियास शोभणारें क्षात्रतेज हि त्यांच्या ठिकाणीं प्रखर तेजानें होतें. राष्ट्राच्या दुर्दैवानें स्वराज्याचीच इमारत कोसळून पडल्यामुळें राष्ट्रांतील व्यक्तींचे गुण जागचे जागीं विराम पावले. जहागिरदार व सरंजामदार यांस एका पिढींत न करितां दोन पिढ्यांत पण जमीनदोस्त करावें, अशा भावनेनें ज्या ठिकाणीं राज्यकारभाराचें धोरण ठरविलें जातें, तेथें पांच पन्नास वर्षांतच, दात पाडलेल्या नागाप्रमाणें, राष्ट्रानें नुसती तोंडानेंच बडबड करावी, अशी स्थिति झाल्यास त्यांत कांहींच नवल नाहीं.

पूर्वार्ध समाप्त.

# पानसे-घराण्याचा इतिहास.

## उत्तरार्ध.

### प्रकरण नववें.

### नीरथडीकर पानसे.

आतांपर्यंत दिवें-सोनोरीकर म्हणजे च तोफखानेवाले पानसे यांची हकीकत आली आहे. आतां त्यांच्याखेरीज, पानशांचें दुसरें जें एक घराणें शिरवळ प्रांतीं जाऊन राहिलें त्याची माहिती थोडक्यांत देऊं. या घराण्यास नीरथडीकर पानसे असें म्हणतात.

मागें सांगितलें च आहे कीं, पानगांव येथून पुणें प्रांतीं जो पानशांचा मूळ पुरुष आला, त्याचें नांव परशुरामपंत ऊर्फ परसावा असें होतें. तो वाघ यांच्या घरीं लहानाचा मोठा झाल्यावर त्यानें पुणें प्रांतीं जुन्नर, शिरूर व भिमथडी या भागांतील कांहीं गांवांचें ज्योतिष व कुळकरणपण हीं वतनें मिळविलीं. त्यास भुतावा नांवाचा एक मुलगा झाला. भुतोपंतास पुढें तीन मुलगे झाले. वडील बालावा, मधला परसावा व धाकटा तानाजी. यांपैकीं तानाजी यानें शिरवळ प्रांतीं येऊन भोळी,* लोणी,

---

*भोळी ( भवाळी ):—हा गांव इतिहासप्रसिद्ध आहे. फलटणच्या गादीवर मुधोजीराव निंबाळकर हे शके १५५१ सालीं बसले. त्यांस दोन स्त्रिया होत्या. वडील स्त्रीच्या पोटीं बजाजी व सईबाई आणि धाकटीच्या पोटीं साबाजी व जगदेव अशीं अपत्यें झालीं. सईबाई हिचें लग्न शिवाजी महाराज यांच्याबरोबर शके १५६१ त झालें. साबाजी व जगदेव या दोघा भावांचा विचार आपल्या बापास दूर करून गादी मिळविण्याचा होता. या कामीं साबाजीनें विजापूरकरांकडून सैन्याची मदत घेऊन भोळी गांवाजवळ बापावर चाल केली. या लढाईंत साबाजीनें बापास पकडून एका वडाच्या झाडाखालीं त्यास ठार मारिलें. या वडाचे झाडास पुढें " बाप-मारी वड " असें नांव पडलें. हा वड सांप्रत अस्तित्वांत नाहीं. मुधोजीरावास ठार केल्यावर आपल्या वडील भावाचा (बजाजी) कांटा दूर करण्यासाठीं त्यास पकडून त्यानें बादशहाचे स्वाधीन केलें. बादशहानें बजाजीस मुसलमानी दीक्षा देऊन मुसलमान करून टाकलें. पुढें शके १५७३ सालीं बजाजी परत आला व शिवाजी महाराजांस स्वराज्य स्थापनेच्या खटपटींत मदत करूं लागला. शिवाजी महाराजांच्या मातोश्री जिजाबाई हिनें बजाजीस शंभूमहादेवाचे देवळांत देवासमोर प्रायश्चित्त देऊन हिंदुधर्मांत घेतलें व या शुद्धीच्या कार्यास जनतेचा पाठिंबा मिळविण्याकरितां बजाजीच्या मुला ( महादजी )-बरोबर आपली नात सखुबाई ( शिवाजीची कन्या ) हिचें लग्न लावून दिलें.

गुणंद व तोंडल या चार गांवांच्या ज्योतिष–कुळकरणाच्या वृत्ति संपादन केल्या आणि आपलें वास्तव्य हि त्या गांवीं च केलें. तानाजीस पुढें बालावा, अंताजी व परशुराम असे तीन पुत्र झाले. यांपैकीं अंताजी यानें वरील चार गांवांशेजारी असलेल्या वाठार वुद्रुक ( चोराचें ) गांवचें ज्योतिष–कुळकरणपणाचें वतन पूर्वीच्या माणके आड–नांवाच्या वतनदारापासून विकत घेतलें. हे माणके माणकी गांवचे रहिवासी होते. अंताजीच्या वेळीं या घराण्यांत खालाई नांवाच्या एका बाईकडे या वतनाची मालकी होती. एकदां तिला पैशाची गरज लागली, त्यामुळें शके १५१२ चें सुमारास तिनें एकवीस होनांस ही वृत्ति अंताजीस विकत दिली. हें वाठार वुद्रुक ( चोराचें ) सांप्रत कोरेगांव तालुक्यांत आहे. भोळी व लोणी हीं गांवें हि वाई तालुक्यांत आहेत. गुणंद व तोंडल ( गावडे ) हीं शिरवळापासून दोन कोसांवर सचिवांचे हद्दींत आहेत आणि तोंडल ( वंजाऱ्याचें ) हें शिरवळाहून दोन कोसांवर पुरंदर तालुक्यांत आहे. सांप्रत या पांच हि गांवांचीं वतनें पानशांकडे चालू आहेत. याशिवाय, सदरहू गांवांत त्यांनीं सातारकर छत्रपति, पेशवे व इतर संस्थानिक यांच्यापासून कांहीं इनामी जमिनी हि मिळविल्या आहेत. माल दिवे–सोनोरीकर पानसे घराण्याप्रमाणें या पानसे घराण्यानें राजदरबारीं कामें केल्याची माहिती आढळत नाहीं. फक्त अलीकडे वाठार गांवीं रहाणाऱ्या बाबूराव सखाजी नांवाच्या एका पुरुषानें ग्वाल्हेर संस्थानच्या फौजेंत जाऊन नौकरी धरली व पुढें त्यास पंचवीस स्वारांची असामी मिळाली अशी माहिती मिळते. या शाखेंतील घराण्यांत ऐतिहासिक कागदपत्रें हि फारशीं मिळालीं नाहींत.

वरील बाबूराव सखाजीच्या वेळीं खालाई माणके या बाईच्या भाऊबंदांनीं वाठार, लोणी व तोंडल या गांवांच्या ज्योतिष–कुळकरणाच्या वृत्तींबद्दल तंटा उपस्थित केला; पण छत्रपति धाकटे राजाराम यांनीं शके १६६५ भाद्रपद शुद्ध त्रयोदशीस बाबूरावांच्या बाजूचा निकाल देऊन तसें आज्ञापत्र त्यांनीं श्रीमंत नानासाहेब पेशवे यांच्या नांवानें दिलें आहे. या आज्ञापत्रांत या वादासंबंधीं पुष्कळ च माहिती आली आहे, तिचा कामापुरता सारांश पुढें देतों.

बाबूराव साबाजी यास जिवाजी साबाजी, कान्हो केशव, खंडो शिवदेव, माधवराव लक्ष्मण व दादाजी नानदेव या भाऊबंदांचें सहाय्य होतें आणि प्रतिवादींत यादो रघुनाथ, नारो यादव, व खंडो बापूजी माणके हे भाऊबंद होते. या शके १६६५ मधील भांडणापूर्वी शके १६४२ मध्यें हि हें भांडण उपस्थित झालें होतें. त्यावेळीं रत्नाजी बहिरव व केसो राम पानसे हे वादी व यादव रघुनाथ व बापूजी काशी माणके हे प्रतिवादी होते. हा वाद खंडो बल्लाळ चिटणीस यांचे समोर चालून माणके खोटे ठरले; तेव्हां पानशांना तोंडल व लोणी या गांवांच्या वृत्तींबद्दल राजपत्रें करून मिळालीं असें असतां माधव रघुनाथ, यादोपंत आणि खंडो बापूजी माणके हे पुन्हा भांडावयास लागले. शके १६६५ त तोंडल व लोणी या गांवांच्या ज्योतिष–कुळकरणाच्या

सबंध वृत्तीची मागणी न करतां ते निम्म्या वृत्तीच्या मालकीबद्दल तंटा करूं लागले. हा वाद साताऱ्यास श्रीमंत नानासाहेब पेशवे यांच्याकडे गेला. पण त्यांना मोहिमेवर जावयाचें असल्यानें त्यांनीं हा वाद छत्रपति रामराजे यांच्याकडे पाठविला.

या वेळीं, पानशांनीं सांगितलें कीं, " भोळी, तोंडल, गुणंद ( परगणे शिरवळ ) व लोणी, तोंडल ( प्रांत पुणें ) हीं पांच गांवें आमचीं पुरातन मिरासी ( ज्योतिष-कुळकरणाच्या वृत्तीचीं ) आहेत. फार पूर्वीं शिरवळ परगण्यांतील तीन गांवांबद्दल भवाळ यांनीं आमच्या विरुद्ध तंटा उपस्थित केला. त्याचा निकाल मोहरी गांवीं तेथील देशपांडे यांचे समोर दिव्य होऊन आमच्या सारखा होऊन आमचे पूर्वज भुतो परशराम खरे झाले. त्या नंतर पुन्हा शिरवळचे परभुणे यांनीं याच गांवाबद्दल वाद चालविला. तेव्हां मौजे वाटेगांव प्रांत बत्तीस शिराळें येथें दिव्य होऊन साबाजी बापदेव पानसे हे खरे झाले व त्यांच्यासारखा निकाल झाला. त्या वेळीं या प्रांताचा मोकासा गणोजीराव निंबाळकर यांचेकडे होता व परभुणे हे त्यांचे पदरीं नौकर होते. त्यामुळें आपल्या विरूद्ध निकाल झाला असतां हि परभुण्यांनीं निंबाळकर यांचे वशिल्याचे जोरावर बळजबरीनें वरील तिन्हीं गांवांचा भोगवटा चालविला. तेव्हां जिवाजी साबाजी, कान्हो केशव, खंडो शिवदेव व माधवराव लक्ष्मण या पानसे मंडळींनीं यादो रघुनाथ व नारो यादव परभुणे यांच्या विरुद्ध सरकारकडे तक्रार नेली. तेव्हां तत्कालीन नियमाप्रमाणें त्रिपुटीचा कुलकर्णी नरहर विश्वनाथ यांस पानशांच्या तर्फे व जानो बल्लाळ वाघ अहिरेकर यास परभुण्यातर्फे जामीन घेतलें आणि पंचाकडे वाद तोडण्यास दिला. त्यांत मल्हारपंत पुरंदरे सरपंच होते. पंचांनीं शिरवळ येथील केदारेश्वराचे देवळांत दिव्य करावयाचें ठरविलें. त्या वेळीं असा एक शास्त्रार्थ निघाला कीं, एकाच घराण्यांतील पुरुषास एकाच बाबींबद्दल दोन वेळा दिव्यें करितां येत नाहींत. सबब पानशांना आतां दिव्य करतां येणार नाहीं; कारण, मागें त्यांनीं वाटेगांवीं दिव्य केलें आहे. पानशांनीं नामदेव भट बिन पन्हंभट खडके या नांवाचे त्यांचे एक स्नेही होते त्यांस पाठिराखे भाऊ करून त्यांच्याकडून आपल्या तर्फे शिरवळास दिव्य करविलें. दिव्य करण्यापूर्वीं पानसे व नामदेव भट यांच्यांत असा करार ठरला कीं, नामदेव भटानें हें दिव्य पानशांसाठीं करावें व त्याबद्दल पानशांनीं नामदेव भटास व त्याच्या वंशजास भाऊ मानून भोळी, तोंडल, लोणी आणि गुणंद या चार गांवच्या ज्योतिष कुलकरणाच्या वृत्तींत निम्मे वांटा द्यावा. नामदेव भटाचें गोत्र हि पानशांप्रमाणें मुद्गलच होतें. वरील करार ठरल्यानंतर, शिरवळास शके १६४२ विश्वावसु संवत्सरीं चैत्र शुद्ध नवमी मंगळवारीं नामदेव भटानें पानशांसाठीं दिव्य केलें; त्यांत भटजी खरे ठरून परभुणे खोटे झाले. तेव्हां त्या निकालाप्रमाणें सरकारनें आपलीं राजपत्रें हि करून दिलीं.

या प्रसंगानंतर नामदेव भट लवकरच वारले. त्यांस पुत्रसंतति नव्हती म्हणून त्यांचे भाऊबंद उपर्युक्त यादव रघुनाथ वगैरे ह्या वृत्तीवर हक्क सांगू लागले. पानशांचें

म्हणणें, हे भाऊबंद नामदेवभटांचे सीधे वंशज नाहींत, तेव्हां त्यांचा हक्क वतनावर नाहीं. त्यामुळें हा तंटा श्रीमंत नानासाहेब पेशवे यांच्याकडे गेला. तेथें आपसांत तडजोड होऊन भोळी व तोंडल या गांवच्या वतनांत नामदेव भटांचे भाऊबंदास पानशांनीं निम्मे वांटणी दिली. सांप्रत भोळी गांवांत या नामदेव भटाच्या भाऊबंदांचे वंशज विद्यमान असून त्यांना आतां खडके या नांवानें तेथें कोणी न ओळखतां पानसे याच नांवानें ओळखतात.

वरील पांच हि गांवें नीरा नदीच्या कांठावर मैल दोन मैलांच्या अंतरावर असून शिरवळाहून महाबळेश्वराकडे जी सरकारी सडक जाते तिच्यालगत आहेत. वाठार येथें पानशांचा एक मोठा वाडा आहे. तो बाबूराव सखाजी यांनीं बांधला. वडगांवकर पोतनीस हे बाबूरावाचे मामा. पोतनीसांनीं ज्या वेळीं वडगांवीं आपल्यासाठीं एक वाडा बांधला; त्यावेळीं जें सामान शिल्लक राहिलें तें त्यांनीं बाबूरावास दिलें व त्या सामानानें बाबूराव यानें हा वाडा बांधला असें सांगतात.

सदर पांच गांवें मावळालगत असल्यानें त्यांत मावळी पीक होतें. म्हणजे विशेषतः भात पिकतें. याखेरीज बाजरी, मूग, वाटाणा हीं धान्यें हि होतात. आंबे व केळीं यांच्या बागा हि या गांवांत आहेत. दरेक गांवाची वस्ति साधारण हजार बाराशाचे आंत आहे. पाऊसपाणी भरपूर असल्यानें पीक उत्तम येतें व त्यामुळें गांवांत सुबत्ता असून लोक सुखी आहेत.

या गांवांच्या संबंधीं पुढील माहिती लक्षांत ठेवण्यासारखी आहे. वाठार नांवाचीं दोन गांवें असून, त्यांपैकीं वाठार बुद्रुक ( चोराचें ) हें प्रसिद्ध असून तें वाई तालुक्यांत आहे व दुसरें वाठार खुर्द हें जवळ च सचिवांच्या हद्दींत विचित्रगड तालुक्यांत आहे. त्याचप्रमाणें तोंडल नांवाचीं गांवें हि दोन आहेत. पैकीं एक पुरंदर तालुक्यांत व दुसरें वरीलप्रमाणें विचित्रगड तालुक्यांत आहे. या दरेक गांवाची लोकसंख्या सुमारें सहा सात शें असून प्रत्येक गांवीं एक ब्राह्मणाचें घर आहे व तें पानशांचें च आहे. वाठारकर पानशांचे कुलोपाध्याय वीर येथील रहिवासी खिरे आडनांवाचे आहेत. भोळी, तोंडल व लोणी येथील, पानशांचे कुलोपाध्याय थिटे आडनांवाचे आहेत. सोनोरी येथील पानसे यांचे उपाध्ये घोडे यांनीं च या कुलोपाध्यायांच्या नेमणुका करून दिलेल्या आहेत.

# प्रकरण दहावें.

## स्थलवर्णन.

या प्रकरणांत पानसे घराण्यानें जेथें जेथें कांहीं इमारती, किल्ले, घरठाण वगैरे बांधले व वस्ति केली, त्या त्या ठिकाणांची माहिती देण्याचें योजिलें आहे. त्यांत प्रथम सोनोरी गांवाची व तेथील इमारतींची माहिती देतों.

## १. सोनोरी.

मौजे सोनोरी ऊर्फ सोनौरी ( सोनपुरी ) हें गांव हल्लीं पुणें जिल्ह्यांत पुरंदर तालुक्यांत आहे. येथून पश्चिमेस सुमारें एका कोसावर दिवें हा गांव आहे. दिवें घाट हा सह्याद्रीच्या ज्या फांट्यावर आहे, त्या च फांट्याच्या पायथ्याशीं दिवें घाटापासून पूर्वेस दीड कोसावर सोनोरी गांव आहे. गांवालगत उत्तरेस अर्ध्या कोसावर डोंगराच्या एका सुळक्यावर मल्हारगड हा किल्ला आहे. डोंगराच्या अर्धचंद्राकृति खोऱ्यांत गांव वसलें आहे, त्यामुळें जवळ जाईपर्यंत गांव दिसत नाहीं. गांवांत बहिरोबा, मारुति व महादेव अशीं तीन जुनाट देवळें आहेत. हीं व दिवें येथील कातोबाचें देऊळ अशीं सर्व एका च वेळीं बांधलेलीं आहेत. त्यावरून हीं दोन्ही गांवें बरीं च जुनाट वसलेलीं असावीं असें दिसतें. वरील जुनाट देवळांखेरीज विठोबा, रामचंद्र, गणपति, महादेव, देवी वगैरे देवांचीं हि देवळें आहेत. मात्र, तीं अर्वाचीन आहेत. या ( व दिवें ) गांवच्या ज्योतिषकुळकरणाच्या वृत्ति मागें सांगितल्याप्रमाणें मूळ गिधवे यांच्या होत्या; त्या त्यांनीं आपले जांवई पानसे यांस आंदण दिल्या; त्या अव्याहत आजपर्यंत पानशांकडे चालत आहेत. आणि तेव्हांपासून पानशांची या ( व दिवें ) गांवांत कायमची वस्ति झाली आहे. हल्लीं पानशांच्याखेरीज गांवांत घोडे व ब्रह्मे या आडनांवांचीं आणखी ब्राह्मण घराणीं आहेत. याशिवाय इतर वस्ति शेतकऱ्यांची आहे. त्यांत "**काळे**" या आडनांवाच्या मराठे कुणब्यांचीं घरें जास्त आहेत. सोनोरीची पाटीलकी या काळ्यांपैकीं एका घराण्यांत चालू आहे.

**घोडे**:—हे पानसे यांचे कुलोपाध्याय आहेत. यांचे मूळ पुरुष अनंत भट हे, पुणें शहर वसण्यापूर्वीं पुणें–वाडींत म्हणजे हल्लींच्या कसबा पेठेंतील केदारेश्वराच्या देवळाच्या जागेंत एक खोपटी बांधून त्यांत राहून केदारेश्वर महादेवाची उपासना करीत असत. त्या वेळीं पुणेंवाडीवर मुसलमानी अंमल होता. त्या मुसलमान बादशहाचा कारभारी ब्राह्मण जातीचा होता. त्याची केदारेश्वरावर विशेष भक्ति होती. बादशहास ती त्याची हिंदु देवतेवरील भक्ति सहन न होऊन त्यानें एके दिवशीं बळजबरीनें देवळांत शिरून आपल्या हातांतील तलवारीनें शिवलिंगास वार केला, तेव्हां पिंडींतून

रक्त पेकुं लागलें. हें पाहतांच बादशहा फार घावरून गेला व केलेल्या कृत्या-बद्दल देवाची प्रार्थना करून त्यानें क्षमेची याचना केली. पुढें त्यानें दगडी देवालय बांधून त्यांत नवीन शिवलिंगाची स्थापना केली व देवाच्या खर्चासाठीं जमिनी इनाम करून दिल्या. आज जें शिवलिंग दिसतें तें हें बादशहानें स्थापिलेलें असून मूळ लिंग त्या खालीं आहे. बादशहानें इनाम दिलेल्या जमिनी अद्यापि या घोडे घराण्याकडे चालू आहेत. या घराण्यांतील कोणा पुरुषानें व केव्हां सोनोरीस जाऊन पानशांचें उपाध्येपण मिळविलें तें समजत नाहीं. पानशांनीं त्यांच्या योगक्षेमार्थ वेळोवेळीं इनाम जमिनी दिल्या, त्या अद्यापि त्यांच्याकडेस चालू आहेत.

**ब्रह्मे**:—हे ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण, खेड तालुक्यांतील चाकणचे रहिवाशी. शंकर-भट व रामभट ब्रह्मे हे दोघे बंधु चांगले विद्वान् व वैदिक कर्मांत पारंगत असे होते. यां दोघांचा मुक्काम वांई येथें असतां, त्यांची व जयवंतराव यशवंत पानसे यांची गांठ पडली. जयवंतरावांनीं अग्निहोत्र घेतलें होतें. त्यांनीं या दोघा भावांची विद्वत्ता पाहून त्यांस सोनोरीस आपल्या आश्रयास आणलें. त्या दिवसापासून म्हणजे सुमारें दीडशें वर्षांपासून हे सोनोरीस कायमचे राहूं लागले. पुढें यांच्या चरितार्थासाठीं पानशांनीं निरनिराळ्या प्रसंगीं त्यांना जमिनी इनाम करून दिल्या. शके १६९९ सालीं कृष्णराव माधव यांच्या उत्तरकार्यानिमित्त पांच बिघे व शके १७१९ सालीं श्रीपतराव दामोदर यांचे उत्तरकार्याकरितां तीन बिघे मिळून एकंदर आठ बिघे जमीन सोनोरी गांवच्या हद्दींत, गोपाळ बागेपैकीं, इनाम करून दिली. तसेंच शके १७२९ सालीं पुंडलिकराव गोपाळ व शके १७३८ त उमाबाई भ्रतार भिवराव यशवंत, यांच्या उत्तरकार्यानिमित्त अनु-क्रमें पांच व तेरा मिळून अठरा बिघे जमीन दिवे गांवचे हद्दींत इनाम करून दिली. या सर्व इनाम जमिनी ब्रह्मे यांच्या वंशजाकडे हल्लीं चालू आहेत. याशिवाय सोनोरी गांवा-जवळ असलेल्या चार पांच गांवांतील कुलोपाध्यायाच्या वृत्त्या हि यांनीं संपादन केल्या आहेत.

सोनोरी हा गांव डोंगरालगत वसला असल्यानें गांवच्या जमिनीपैकीं निम्मे अधिक जमीन मुरमाळ असून बाकीची मध्यम प्रतीची आहे. दिवें व सोनोरी हीं दोन्ही गांवें पूर्वीं विड्याच्या पानाविषयीं व अंजिराविषयीं प्रसिद्ध होतीं. परंतु अलीकडे सुमारें १५–२० वर्षांत पावसाच्या दुर्भिक्ष्यामुळें पानमळे नाहींसे झाले. अंजिराचे बाग मात्र थोडे फार शिल्लक आहेत. अंजीर फार उत्तम प्रतीचा पिकतो. या भागांतील दिवें, सोनोरी, वनपुरी गुऱ्होळी, उरुळी, अंबोडी वगैरे गांवांत जसा उत्तम अंजीर होतो, तसा इतरत्र होत नाहीं. कारण इकडील जमीन, हवा व पाणी या पिकास फार पोषक आहे. हल्लीं संत्र्या-मोसंब्यांचें पीक काढण्याकडे लोकांचें लक्ष असल्यानें त्यांची लागवड दिवें व सोनोरी येथें वाढत आहे; तसेंच डाळिंबाच्या बागांची हि आवड लोकांत उत्पन्न झाली आहे. दोन्ही गांवांत बाजरी हें मुख्य पीक असून मूग, उडीद वगैरे दुय्यम पीक होतें. जमीन

कसदार नसल्यामुळें येथील शेतकरी लोकांचें बागाइती पीक करण्याकडे ज्यास्त लक्ष आहे; यामुळें प्रत्येक गांवीं सुमारें दीडशेंवर विहिरी खोदिल्या आहेत. तरी सुद्धां अलीकडे दहा पंधरा वर्षांत भरपूर पाऊस पडत नसल्यामुळें बागाइती विहिरीस पाण्याचा पुरवठा भरपूर नाहीं, सबब पावसाळ्यानंतरच्या आठ महिन्यांत शेतकऱ्यांना पोटासाठीं पुणें-मुंबई पाहावी लागते.

सोनोरीची व दिव्याची हवा चांगली असून उन्हाळ्यांत पारा १०५-१०६ अंशांचेवर जात नाहीं. पावसाचें मान २४ इंचांपर्यंत असतें; परंतु गेल्या दहा बारा वर्षांत तें निम्यावर येऊन बसलें आहे. गांव रहदारीच्या रस्त्यापासून दूर व डोंगराच्या खोऱ्यांत वसला असल्यानें सांथीचे रोग सहसा होत नाहींत. आतांपर्यंत फक्त एकदांच प्लेगचा प्रादुर्भाव येथें झाला व तो हि परगांवचे पच्छाडलेले रोगी येऊन त्यांच्या संसर्गानें झाला.

गांवास एक ओढा आहे; चांगला पाऊस पडला तर त्याचें पाणी चैत्रापर्यंत टिकतें, त्यामुळें गांवांत घरोघर विहिरी असून त्यांना ४०।५० फुटांवर कायमचें पाणी लागतें; व तें बारा महिने कायम टिकतें. विहिरीच्या तळांत ३०-३५ फुटांपर्यंत काळा व कडक पाषाण फोडावा लागतो. सर्व विहिरी गोड्या पाण्याच्या असून त्यांतील पाणी स्वच्छ, रुचकर व पाचक असें आहे. शुद्ध हवा आणि विपुल व पौष्टिक पाण्याचा भरपूर पुरवठा असल्यानें कित्येक वेळां सासवड येथील दिवाणी कोर्ट सोनोरीस आलेलें आहे. गांवांतील देवळें, वाडे वगैरे मुबलक जागेमुळें कोर्टाचा पसारा येथें सहज समावला जातो.

सोनोरी हा गांव श्रीमंत माधवराव नारायणराव पेशवे यांनीं शके १७०४ मध्यें जयवंतराव यशवंत पानसे यांस त्यांची व त्यांच्या पूर्वजांची स्वामिसेवा मनांत आणून त्यांच्या मातोश्रीच्या क्षेम-कल्याणासाठीं वंशपरंपरेनें इनाम करून दिला, तो अद्यापि त्यांच्या वंशजांकडे चालू आहे.

गांवची लोकसंख्या इ. स. १९०१ मध्यें ९०२, १९११ त ९७८ व १९२१ मध्यें ७४८ होती. जी लोक संख्या कमी झाली ती मुख्यत्वें ब्राह्मण व बेकार शेतकरी यांची आहे. भाऊबंदकीच्या वांटण्यामुळें जमीन-जुमला विभागला गेला. त्यामुळें निर्वाहाचें साधन कमी झालें. शिवाय मुलांच्या शिक्षणाच्या सोईसाठीं ब्राह्मण मंडळीस पुणें मुंबईकडे बाहेर जाणें भाग झालें. त्यामुळें सोनोरीची वस्ती कमी होऊन जुने मोठमोठे वाडे रिकामे पडले आहेत.

पानशांनीं सोनोरीस वस्ति केल्यावर जसजसी त्यांची भरभराट झाली, तस तशी त्यांनीं तेथें इमारती देवळें वगैरे बांधून गांवास शोभा आणली. पहिल्यानें राहाण्यासाठीं वाडा बांधला. नंतर शत्रूपासून संरक्षण करण्यासाठीं जवळ च डोंगरावर माऱ्याचें ठिकाण पाहून किल्ला बांधला आणि मग सुखस्वास्थ्य पूर्ण लाभल्यावर गणपति, विठोबा, रामचंद्र यांचीं देवळें हि बांधिलीं. या देवळांतील देवांच्या पूजे-अर्चेसाठीं

पेशव्यांकडून त्यांनीं इनाम गांवें मिळवून देवांची व्यवस्था लावून दिली. ती अद्याप सुरळीत चालू आहे.

**वाडाः**—हा गांवच्या ईशान्य कोपऱ्यास असून किल्ल्यासारख्या मजबूत तटानें वेष्टित असा बांधला आहे. त्याची लांबी दक्षिणोत्तर ३८० व पूर्वपश्चिम ३२५ फूट आहे. तटाची जाडी नऊ फूट असून उंची १९ फूट आहे. शिपायास पहारा करण्यासाठीं तटावर चौफेर रस्ता आहे, व बंदुकांच्या माऱ्यासाठीं त्याला जंग्या हि ठेविल्या आहेत. बाहेरून आंतला माणूस दिसूं नये म्हणून दर्शनी बाजूस सहा फूट उंच तट बांधिला आहे. वाड्यास अंबारी सह हत्ती आंत येतील असे दोन मोठे दरवाजे आहेत. दरवाज्याच्या झडपास मोठमोठे लोखंडी कांटे बसविले आहेत. वाड्याचा मुख्य दरवाजा पूर्वेस व दुसरा पश्चिमेस आहे. वाड्यास चारी कोपऱ्यास चार व पश्चिम दरवाज्याच्या बाजूस दोन मिळून सहा बुरूज आहेत. साधारणपणें पुणें येथील शनवार वाड्यासारखी तटाची व दरवाज्यांची बांधणी आहे. वाड्याच्या आंत, सांप्रत, भाऊबंदकीमुळें चार वांटण्या होऊन चार वाडे झाले आहेत व त्यामुळें वाड्याचें मूळचें रूप पालटून गेलें आहे. मधून मधून हत्तीघोड्यांच्या पागा, मोठमोठ्या चौकांचीं जोतीं, पडक्या भिंती व आंतील कारंजीं हीं पूर्वींचीं वैभव दाखविणारीं अवशिष्ट चिन्हें आढळतात. पिवळा चौक, हिरवा चौक, माणिक चौक अशी चौकांस निरनिराळीं नांवें होतीं असें सांगतात.

पूर्वीं, वाड्याच्या पूर्व दरवाज्याबाहेर ब्राह्मण वस्ति होती, तिच्या खुणा (जोतीं, भिंती, विहिरी वगैरे) अद्यापि दिसतात. या भागांत कांहीं पिशाच्चबाधा झाल्यानें तेथून ही वस्ती उठून पश्चिम दरवाज्याकडे गेली, ती सध्यां तिकडे च कायम झाली आहे. पश्चिम दरवाज्यालगत, हल्लीं मुरलीधराचें देऊळ, मोकाशाचा वाडा व महादेवाचें देऊळ हीं आहेत. त्या जागेतून पूर्वीं ओढा वाहात होता, तो पश्चिमेस हटवून त्या जागेवर हीं वरील देवळें व ब्राह्मण वस्ति वसली आहे. या नव्या वस्तीस खुद्द पेशव्यांनीं व पानशांनीं आर्थिक मदत केल्याचा दाखला सांपडतो.

वाड्यास खर्च किती आला व त्याचें काम पूर्ण केव्हां झालें वगैरे माहिती अद्यापि मिळाली नाहीं. तथापि तो शके १६८२ ते १६८४ या दरम्यान बांधला गेला असावा असें वाटतें. हल्लीं सर्व वापर वाड्याच्या पश्चिम दरवाज्यानें होतो, त्यामुळें तो च मुख्य दरवाजा अशी चुकीची समजूत झाली आहे, पण मुख्य दरवाजा पूर्वेचा च होय. वाड्यांत एक गणपतीचें व दुसरें लक्ष्मीनारायणाचें अशीं दोन देवळें आहेत.

**गणपतीचें देऊळः**—हें देऊळ लहान असून वाड्याच्या पूर्व दरवाज्या शेजारीं उजव्या बाजूस आहे. वाड्यांत पानशांची स्वारी शिरण्यापूर्वीं पहिल्यानें विघ्नहर्त्या गणपतीचें दर्शन घेऊन नंतर दरवाज्यांतून वाड्यांत यावें अशा योजनेनें हें देऊळ बांधलेलें आहे.



श्री. विठोबा व रामचंद्र यांचीं देवळें (सोनोरी.)



वाड्याच्या दरवाज्याचा देखावा (सोनोरी.)

**लक्ष्मीनारायणाचें देऊळः**—यांतील मूर्ति स्फटिकाची असून फार सुंदर आहे. प्रथम सिंहासन, त्यावर शेष, शेषावर गरूड व गरुडाचे खांद्यावर नारायण आरूढ झाले असून, त्यांनीं कटीवर लक्ष्मीस घेतलें आहे, अशी या मूर्तीची रचना आहे. मुख्य देवळाच्या चाऱ्ही कोपऱ्यांवर चार लहान देवळें बांधलीं असून त्यांत देवी, सूर्य, गणपति व महादेव यांची स्थापना केली आहे. सारांश हीं पांच देवळें मिळून एक विष्णुपंचायतन झालें आहे. मुख्य देऊळ व सभामंडप दगडी बांधला असून मंडपाच्या तिन्ही बाजूंनीं कमानी आहेत. लक्ष्मीनारायणाची मूर्ति मूळची कर्नाटकांतून आणली अशी माहिती मागें आलेली च आहे. मूर्तीबरोबर आणलेले चंदनाचे खांब सासवड येथील श्रीसोपानदेवाच्या देवालयास, त्याच्या जीर्णोद्धाराच्या वेळीं पानशांनी दिले वगैरे हकीकत मागें येऊन गेली च आहे. या मूर्तीसंबंधानें अशी एक दंतकथा सांगण्यांत येते कीं, या मूर्तीची भक्तिभावानें सेवा करणारा एक बैरागी होता. तो मूर्तीच्या मागोमाग कर्नाटकांतून सोनोरीस आला; व मूर्ति परत मिळविण्यासाठीं त्यानें पुष्कळ खटपट केली; पण ती व्यर्थ झाल्यावर त्यानें वाड्याच्या मोठ्या दरवाज्यांत धरणें धरून शरीरत्याग केला. त्याच्या आत्म्याच्या शांत्यर्थ तेव्हांपासून आजपर्यंत दर सणावारीं त्याच्या प्राणोत्क्रमणाच्या जागीं त्याची पूजा करून त्यास नैवेद्य अर्पण करण्याची चाल प्रचलित आहे. यावरून या दंतकथेंत सत्य असावें असें वाटतें. देवळाचे आवारांत एक विहीर आहे. पूर्वी तिच्या पाण्याचा उपयोग करून देवळाच्या आवारांत एक फूलझाडांचा बगीचा केला होता. आतां तो नाहींसा झाला असून, त्यांत फक्त बकूळ, व अशोक यांचे वृक्ष आज शिल्लक राहिले आहेत.

**विठोबा व रामचंद्र यांचीं देवळें:**—हीं देवळें वाड्याच्या बाहेर पश्चिम दरवाजाजवळ तटाशेजारीं एकाच चवुत्र्यावर आहेत. एका देवळांत श्रीविठोबा-रखुमाई व दुसऱ्यांत श्रीरामचंद्र, सीता व लक्ष्मण यांच्या मूर्ति आहेत. दोन्ही देवळांस सभामंडप एक च असून, त्यांस विटांच्या कमानींच्या भिंती आहेत, व मंडपास चुनेगची आच्छादन आहे. विठोबासमोर गरूड व रामचंद्रजीचे समोर मारुति यांचीं लहान लहान देवळे आहेत. विठ्ठलरखुमाईच्या मूर्ति काळया दगडाच्या व राम, सीता, लक्ष्मण यांच्या पांढऱ्या दगडाच्या आहेत. देवळाच्या आवारांत चारी बाजूंनीं दगडी पायऱ्या असलेली कुंडाकृति एक मोठी विहीर आहे. तीस "रामतीर्थ" असें म्हणतात. त्यांतील पाणी बारा महिने कायम टिकत असल्यामुळें, मोटेची व्यवस्था करून देवळाचे आवारांत फुलझाडांचा सुंदर बगीचा केलेला होता; आम्हीं तो प्रत्यक्ष पाहिला आहे. सांप्रत तेथें नुसती रखरखीत जमीन आहे. हीं देवळें वाडा बांधून झाल्यानंतर, पुढें पांच सात वर्षांत बांधलीं गेलीं असावीं. देवाच्या पूजे-अर्चेसाठीं पेशवे सरकारांनीं वनपुरी हा गांव पानशांस वंशपरंपरेनें इनाम करून दिला व तो अद्याप पानसे घराण्याकडे चालत आहे. वनपुरी हा गांव सोनोरीच्या आग्नेयीस एक कोसावर आहे. मूळची रामाची मूर्ति भंगली म्हणून शके १७४७ सालांत हल्लीं अस-

लेल्या मूर्तीची स्थापना केली गेली. जुनी भंगलेली मूर्ति रामतीर्थांत टाकिली आहे व ती अद्याप कुंडाचे तळाशीं पडलेली आहे.

**किल्ला**:—सह्याद्रीचा जो एक फांटा पुरंदर किल्ल्याच्या उत्तरेस पूर्वपश्चिम पसरला आहे, त्यावर दिवें घाटाच्या पूर्वेस सुमारें तीन मैलांवर एका सुळक्यावर हा किल्ला **माधवराव** कृष्ण व **भिवराव** यशवंत पानसे यांनीं बांधिला आहे. हा सोनोरी गांवचे हद्दींत असून गांवचे उत्तरेस सुमारें दीड मैलावर आहे. या कामास शके १६८५ मध्यें सुरुवात होऊन पुढें तो दोन वर्षांनीं पुरा झाला. या डोंगराचे उत्तरेस पायथ्याशीं सदर्न मराठा रेल्वेवरील आळंदी स्टेशन आहे. किल्ल्यास दुहेरी तट असून प्रत्येक तटास, हत्ती जातील असे मोठाले दरवाजे आहेत. यांशिवाय आंत जाण्यास आणखी चोरवाटा आहेत. आंतील तटाचे आवारास बालेकिल्ला म्हणतात. तटाचा पाया खोदीत असतां एके ठिकाणीं रक्त वाहूं लागलें, तेव्हां त्या ठिकाणीं मल्हारीचें वास्तव्य आहे, असें समजून पानशांनीं त्याची प्रार्थना केली कीं, किल्ल्यास मी आपलें नांव देईन. प्रार्थना पुरी होतां च रक्त वाहाणें बंद झालें. पुढें या प्रार्थनेप्रमाणें मल्हारीची स्थापना करून किल्ल्यास **मल्हारगड** असें नांव दिलें. किल्ल्यांत एक मल्हारीचें व एक महादेवाचें अशीं दोन देवळें आहेत. पाण्याच्या सोईसाठीं किल्ल्यांत एक माटीव दगडांनीं बांधलेलें टाकें व तीन विहिरी आहेत. त्यांचें पाणी कधीं आटत नाहीं. मल्हारी व शंकर यांचीं हीं दोन्हीं देवळें माठीव दगडांनीं बांधिलेलीं असून, त्यांस उत्तम नकशीदार शिखरें आहेत. मल्हारीची मूर्ति घोड्यावर म्हाळसेसह बसलेली काळ्या पाषाणाची आहे. महादेवाचे देवालयांत शाळुंका व पिंडी यांची स्थापना केलेली आहे. देवालयासभोंवतीं बिल्ववृक्षांचीं झाडें लाविलीं असून तीं आज कायम आहेत.

किल्ल्याचा बाहेरील तट तेरा फूट उंच व सहा फूट रुंद असून आंतील पांच फूट उंच व तितकाच रुंद आहे. बाहेरील तटाचा घेर ७०० यार्ड आहे. पुरंदर व मल्हारगड या दोन किल्ल्यांमध्यें सुमारें पंधरा सोळा मैलांचें अंतर आहे. या दोन किल्ल्यांमधील प्रदेश सपाटीचा असल्यामुळें शत्रूस छपून रहाण्यास जागा नाहीं. पुरंदर किल्ल्याची उंची समुद्रसपाटीपासून ४९०० फूट आहे व मल्हारगडची ३३०० फूट आहे. किल्ल्याचे उत्तर बाजूस डोंगराचा भाग भिंतीसारखा खोल असून ती खोली २००० फूट आहे व याच भिंतीसारख्या उभ्या असलेल्या भागाच्या पायथ्याशीं आळंदी रेल्वे स्टेशन आहे. पुरंदर किल्ला हा फार जुना व मजबुतीचें ठिकाण म्हणून शिवाजी महाराजांपासून पेशवाईच्या अखेरीपर्यंत या किल्ल्याचें फार महत्त्व होतें. या किल्ल्यावर शत्रूचा नेहमीं डोळा असे. किल्ल्यावर चढाई करून जाण्यास दिवेंघाटाशिवाय दुसरा मार्ग नव्हता. कारण पश्चिम बाजूस सह्याद्रीची ओळ असून त्यावर जागजागीं किल्ले बांधून शत्रूचा मार्ग त्या बाजूनें अडविला होता. दिवे घाटां-

तून वर चढून येण्यास प्रतिबंध करण्यासाठीं पिलाजीराव जाधव यास नेमिलें होतें. यांनीं घाटाच्या माथ्यावर एक किल्लेवजा मोठा वाडा बांधून त्यांत ते राहून शत्रु-सैन्याचा मार्ग अडवीत होते. हा वाडा हल्लीं कायम आहे. डोंगराच्या उत्तरेकडील भाग भिंतीसारखा दोन हजार फूट उंचीचा असल्यामुळें व त्या भागावर पुरंदर किल्ल्यांतून मारा होण्यासारखा नाहीं म्हणून शत्रूस आपल्या सैन्यासह या ठिकाणीं राहून योग्य संधीची वाट पहात बसण्यासारखी आश्रयाची ही जागा आहे. या जागेवर आश्रय घेण्याची संधि शत्रूस मिळूं नये म्हणून पानशांनीं विचार करून या ठिकाणीं हा किल्ला बांधला. हल्लीं किल्ल्याचा तट जागजागीं पडून नादुरुस्त झाला आहे. अलीकडे चोरटे लोकांस लपून बसण्यास हा किल्ला ही चांगली जागा झाली आहे. **उमाजी नाईक व वासुदेव बळवंत फडके** यांचे बंडाचे वेळीं बंडखोर लोक, या किल्ल्याचे आश्रयानें रहात होते. मिलिटरी लोकांची त्यांचे मागें सारखी दौड असल्यानें गांवकऱ्यांस त्या वेळीं फार त्रास झाला.

किल्ला बांधल्यापासून त्यावर म्हणण्यासारखी मोठी वस्ति झाली नाहीं. मात्र पेशवे सरकारांनीं शिबंदी ठेवण्यासाठीं वार्षिक तीन हजारांची नेमणूक पानशांस करून दिली होती असा कागदोपत्रीं उल्लेख आढळतो. किल्ला बांधिल्यानंतर कर्नाटकांतील स्वाऱ्यांत पानसे गुंतल्यामुळें व तदनंतर लवकर च पेशवाई नष्ट झाल्यामुळें पानशांचे पुढील बेत जागचेजागीं राहिले. किल्ला बांधण्यास किती खर्च आला याचा दाखला सांपडत नाहीं.

**भिवकुंड**:—भिवराव पानसे हे सोनोरीस शके १७०० त फाल्गुन वद्य षष्ठि सोमवारीं वारले. त्यांच्याबरोबर त्यांची पत्नी सौ. उमाबाई यांनीं सहगमन केलें. त्यांच्या दहनभूमीवर भिवराव यांची समाधि व उमाबाई यांचें तुळशीवृंदावन बांधलें आहे. लगत च कुंडाकृति चारी बाजूंनीं पायऱ्या असलेली एक विहीर बांधली आहे व तिला भिवकुंड असें नांव दिलें आहे. समाधि, तुळशीवृंदावन व कुंड हीं हल्लीं उत्तम स्थितींत आहेत. कुंडास जिवंत पाण्याचे झरे असून त्याचें पाणी बारा महिने टिकतें. समाधीच्या व वृंदावनाच्या नित्यपूजेसाठीं कुलोपाध्याय घोडे यास भोंदतालची चार बिघे जमीन इनाम दिली आहे. त्यांत आंब्याचीं, नारळीचीं व सुपारीचीं झाडें असून केळीचा हि बाग होता. हें आमच्या लहानपणीं पहाण्यांत आहे. परंतु हल्लीं तेथें कांहीं नसून जमीन उघडी रखरखीत पडलेली आहे. पूजा वगैरे आज कांहीं होत नसून समाधीसभोंवतीं गवत व कांटेरी झाडें उगवलेलीं आहेत. लग्नमुंजीच्या शुभ कार्यारंभीं समाधीजवळ जाऊन अक्षत देण्याची पद्धत आजपर्यंत चालू आहे. परंतु या प्रसंगीं कांटेकुंपणांतून मोठ्या कष्टानें समाधीपर्यंत जावें लागतें. ही स्थिति पाहून त्या पवित्र मृतात्म्यास आपल्या वंशजांबद्दल काय वाटत असेल बरें ? पानसे मंडळींनीं या बाबतींत लक्ष्य घालून आपल्या वडिलांचें अनृणि होणें जरूर नाहीं काय ?

**तळें:-** पानसे यांनीं राहण्यासाठीं वाडा, देवळें, किल्ला वगैरे बांधले. पुढें त्यांना त्यांचे पागेंतील हत्ती, घोडे, उंट वगैरे जनावरांस पाणी पाजण्याची व तसेंच त्यांना धुण्याची व पोहून काढण्यासाठीं भरपूर पाण्याच्या सांठ्याची उणीव भासूं लागली. **सोनोरी** गांवचे पूर्वेस **मोहनदरा** या नांवचें मोठें शिवार डोंगराच्या पायथ्याशीं आहे. तेथील शेतकरी लोकांस व त्यांच्या जनावरास पिण्याच्या पाण्याची सोय नसल्यामुळे. त्यांनीं **महिपतराव** लक्ष्मण व रामराव लक्ष्मण पानसे, यांस विनंती केली कीं, गांवच्या सोनवणी नांवाच्या थळांत आम्हांस एक तळें बांधून द्यावें. ही गोष्ट पानसे यांनीं तावडतोब कबूल केली व त्याप्रमाणें एक मोठें चिरेबंदी अष्टपैलू तळें बांधिलें. त्याची प्रत्येक बाजू सत्तर फूट लांब आहे. तळ पक्क्या काळ्या खडकापर्यंत खोदला असून तो उतरता असल्यामुळें त्यांत पाणी सहाफुटांपासून वीस फूट खोलीपर्यंत राहतें. तळें बांधल्यावर त्याचे कांठीं चार बिघे जमीन समस्त थळकऱ्यांनीं पानसे यांस बागबगीचा व फुलझाडें यासाठीं इनाम करून दिली. हें तळें शके १६९१ सालीं बांधिलें. तळ्यावर गुराढोरांस व माणसांस पाणी पिण्याशिवाय इतर कोणताही हक्क गांवकऱ्यास दिला नाहीं. अशा रीतीनें पानशांनीं हें तळें बांधून स्वार्थ आणि परमार्थ साधिला.

**मोकाशाचा वाडा:—** पानगांवकर पानसे घराण्यास सोनोरी येथील मोकासपणाबद्दल सध्यां इंग्रज सरकारांतून नक्त रक्कम मिळते. त्यामुळें त्या शाखेंतील पुरुषांना सोनोरीस मोकाशी या नांवानें ओळखितात. यांनीं सोनोरीस एक वाडा बांधिला आहे, त्यास मोकाशाचा वाडा म्हणतात. हा वाडा शके १६९० च्या सुमारास शिवाजी खंडेराव पानसे यांनीं बांधिला असावा. हल्लीं वाडा नाहींसा झाला असून भोंवतालचा ८।१० फूट उंचीचा दगडी तट उभा आहे. तटानें सुमारें दीड एकर जागा व्यापिली आहे. आंत एक बांधीव दगडी विहीर, एक तुळशीवृंदावन व एक तळघर आहे. तळघरांत पैसा सांठविलेला आहे अशा समजुतीनें वाड्याच्या पुढील वंशजांनीं त्याची पाडापाड पुष्कळ केली, पण पैका हातीं लागला नाहीं! या वाड्याजवळ एक उत्तम नक्षीचें व घडीव दगडाचें सांभाचे देऊळ मोकाशांनींच बांधलेलें आहे. देवळालगत एक चिरेबंदी दगडाची पाय विहीर बांधली असून तिच्या आंत ओंवरी काढून १०।१२ ब्राह्मण स्नानसंध्येस बसतील अशी सोय केली आहे. विहिरीच्या पाण्याचा पिण्यापुरता हक्क गांवास देऊन त्याऐवजीं गांवांतील रयते कडून विहिरीलगत चार बिघे जमीन देवाचे फुलझाडाकरितां इनाम करून घेतली आहे. त्यांत पूर्वी सुंदर बगीचा होता; परंतु हल्लीं तो नाहींसा झाला आहे. वाडा बांधल्यानंतर एक दोन वर्षांतच ही विहीर व देऊळ हीं बांधलीं असावीं. वाड्यास, विहिरीस व देवळास खर्च किती झाला या बद्दल नक्की माहिती मिळत नाहीं.

**मुरलीधराचें देऊळ:-** हें देऊळ व त्यांतील मूर्ति ह्या सोनोरीस प्रेक्षणीय वस्तूंतील अपूर्व वस्तु होत. मूर्ति पाहणाराचें चित्त अत्यंत आनंदित होतें. हें देऊळ

लक्ष्मीधर भटाचे नातू, रामाजी परशुराम यांच्या शाखेंतील निळकंठ विठ्ठल यांनीं शके १६९० अगर त्या सुमारास बांधलें असावें. याविषयीं पुढील एक कथा घराण्यांत चालू आहे. पानसे घराण्यांत दरवर्षीं श्रावण महिन्यांत जन्माष्टमीचा उत्सव होत असतो हें मागें आलेंच आहे. अशा एका वार्षिक उत्सवांत निळकंठरावाच्या घरचीं बायकामाणसें कीर्तनास वाड्यांत जात असतां, देवडीवाल्यानें त्यांना अटकाव केला; त्यामुळें तीं परत आलीं. याचा राग येऊन निळकंठराव हे बडोद्यास गेले. तेथें त्यांनीं सरकार चाकरी करून बराच पैका जमविला व तो घरीं आपल्या मुलाकडे पाठवून त्यास मुरलीधराचें देऊळ बांधण्यास सांगितलें. त्याप्रमाणें मुलानें हें देऊळ बांधलें. पुढें निळकंठराव नौकरी सोडून सोनोरीस आल्यानंतर मागें बडोद्यास असें उघडकीस आलें कीं, निळकंठरावांनीं सरकारी पैशांची अफरातफर केली. तेव्हां त्याचा जाब घेण्यास त्यांना सोनोरीस धरणें पाठविलें. निळकंठरावांनीं अफरातफर झालेल्या सर्व पैशांचा हिशेब त्यांचे पुढें ठेविला व सांगितलें कीं, हा सर्व पैसा देवाच्या कामीं लाविला असून त्यापैकीं एक कवडी हि घर खर्चासाठीं खर्चिली नाहीं. तेव्हां मला व देवाला दोघांना हि धरून न्यावें. आम्ही दोघे हि सरकारचे गुन्हेगार आहोंत. यामुळें धरणे-कऱ्यास पंचाईत पडली व त्यानें बडोदेसरकारास ही गोष्ट कळविली. बडोदें सरकारानें एकंदर परिस्थिति जाणून धरणेकऱ्यास परत बोलाविलें व ती रक्कम देवस्थान-खात्यांत खर्चीं टाकिली. कृत्यापेक्षां हेतूकडे लक्ष देऊन ही गोष्ट मिटविण्यांत आली. तो काळ स्वराज्याचा होता, त्या मुळें या प्रसंगाचा परिणाम स्वराज्यास साजेसाच झाला.

देवाची मूर्ति काळ्या पाषाणाची आहे. श्रीगोपालकृष्ण कुंजवनांत आपल्या दीड पायावर उभे राहून मुखानें मुरली वाजवीत आहेत; भोंवतालच्या कळपांतील गाई त्या मुरलीच्या मधुर आलापास मोहित होऊन प्रेमानंदानें शेपूट उभारून धांवत येत असून त्यांपैकीं एक गाय लडिवाळपणानें पाय चाटीत आहे व दुसरी निश्चल स्थितींत एकाग्र चित्तानें श्रीकृष्णमुखाकडे लक्ष्य वेधून पहात आहे अशा रीतीची मूर्तीची बनावट आहे. देवाचें बालरूप आहे. वनांत गाई राखण्याच्या वेळेचें असल्यामुळें तें विवाह होण्याच्या पूर्वींचे आहे, हें उघड आहे. प्रभावळींत मध्यावर उभी आहे ती रुक्मिणीची मूर्ति पांढऱ्या दगडाची असून कोणी हौशी भक्तानें तिची स्थापना मागाहून केलेली आहे. प्रभावळ काळ्या पाषाणाचीच असून सुंदर नकशीची आहे. मूर्तीची उंची साडेतीन फूट आहे.

देऊळ काळ्या घोटीव पाषाणाचें असून हा पाषाण बारामतीजवळील पणदरे गांवचे खाणींतील आहे. आज हि या पणदरे गांवच्या खाणींतील दगड प्रसिद्ध आहेत. देवळाचें शिखर फार उंच व नकशीदार, पुण्यांतील तुळशीबागेच्या राममंदिरावरील शिखराप्रमाणें प्रेक्षणीय आहे. सभामंडप व दोन्ही बाजूच्या दुमजली इमारती सध्यां पडल्या आहेत. तसेंच आवारांत असलेला देवळा सभोंवतालचा बगीच्या हि हल्लीं नामशेष

झाला आहे. बेलांचे, अशोकाचे, बकुळांचे व आवळ्यांचे वृक्ष मात्र आज त्या जागीं कायम आहेत. देऊळ बांधण्यापूर्वी या जागीं हल्लीं गांवास लागून असलेला ओढा वहात होता, तो हटवून त्या जागी भराव घालून हें देऊळ बांधलें आहे. देवळास एक लाख रुपये खर्च झाला असें सांगतात. देवाच्या अंगावरील हिऱ्यामोत्यांच्या दागिन्यांची एक याद सांपडली आहे. देऊळ बांधणाऱ्यांच्या वंशांतील कै. रा. रा. **सावळाराम कोंडदेव** पानसे यांनीं देवळाची डागडुजी करून सध्यां देवळास नवीन सभामंडप बांधला आहे. पूजाअर्चा व नंदादीप यांची हि व्यवस्था त्यांनीं केली असून ती आपल्या पश्चात् अखंड टिकविण्याची योजना ते करणार होते. परंतु त्यांच्या अकालीं मृत्यूमुळें ती त्यांचे हातून झाली नाहीं.

**अन्याचा वाडाः—** मल्हार जगजीवन ( जगजीवन शामजी यांचे पुत्र ) ऊर्फ मलबा पानसे यांची माहिती मागें येऊन गेलीच आहे. यांच्यावर श्रीमंत दादासाहेब पेशवे यांची विशेष मर्जी असे. हे मुत्सद्दी होते. श्रीमंत थोरले माधवरावसाहेब पेशवे यांचा मुक्काम सोनोरीस शके १६९३ च्या आश्विन शुद्ध द्वादशीस पडला होता. त्या वेळीं त्यांच्या बरोबर मलबा होते. पानशांचा वाडा, देवळें, किल्ला वगैरे पाहिल्यावर श्रीमंतांनीं मलबास त्यांचा वाडा दाखविण्यास सांगितलें, तेव्हां त्यांनीं आपलें लहानसें घर दाखविलें. त्यावर तुम्हांस हें घर शोभत नाहीं, नवीन मोठा वाडा बांधा आम्ही खर्चाची रक्कम देतों अशी श्रीमंतांनीं आज्ञा केल्यावरून दोन वर्षांत मलबांनी हा वाडा बांधला व खर्च सरकारनें दिला. मलबास संतती नव्हती. त्यांचे बंधु जगजीवनराव यांचें टोपण नांव अन्याजीपंत असें होतें. अन्याजीपंत व त्यांचीं मुलें पुढें वाड्यांत राहूं लागली. यावरून या वाड्यास अन्याचा वाडा हें नांव मिळालें. वाड्याची लांबी, रुंदी प्रत्येकीं सुमारें दोनशें फूट आहे. त्याच्या भोंवतीं दगडी तट आहे. वाडा दोन चौकी असून मजबूत बांधणीचा आहे. सांप्रत भाऊबंदकीमुळें वाड्याच्या वांटण्या होऊन निरनिराळ्या खोल्या झाल्यानें, पूर्वीचें स्वरूप नष्ट झालें आहे.

**बहिरोबाचें देऊळः—** हे गांवच्या मध्यावर आहे. दक्षिणेंतील बहुतेक गांवांची वस्ती दोन हजार वर्षांपूर्वीची आहे असें इतिहाससंशोधकांनीं ठरविलें आहे. या प्रमाणें सोनोरी गांव हि फार प्राचीन काळीं वसलेला असून हें देऊळ हि त्या वेळीं बांधलेलें असावें. दक्षिणेंत राक्षसांपासून प्रजेस फार पीडा होऊं लागल्यामुळें काशीहून विश्वेश्वरानें आपल्या गणांपैकीं बहिरवनाथाची रवानगी त्यांचें पारिपत्य करण्यासाठीं केली अशी पुराणांतरीं हकीगत आहे. गांवोगांव या देवाचीं देवळें असून त्यास ग्रामदैवत मानलें जातें. गांवांतील सर्व लोकांची या देवावर फार भक्ति आहे.

विशेषतः सोनोरी गांवांतील लोकांचा दृढ विश्वास बसण्यासारखी गोष्ट अशी आहे कीं, गांवच्या सीमेंत कोणा हि माणसास अगर जनावरांस सर्पदंश झाल्यास त्यास ताबडतोब देवासमोर आणून ठेवल्यास त्याची विषबाधा उतरते. गेल्या कित्येक वर्षांत

या वाघेनें कोणी हि ह्या गांवांत मृत्यु पावला नाहीं. चालू पन्नास वर्षांत, सुमारें पंधरा वीस प्राण्यांस सर्पदंश झाला परंतु त्यांपैकीं कोणी हि दगावला नाहीं, असें आमचे स्वतःचे पाहाण्यांत आहे.

**सोनेश्वर महादेव व मारुतीचें देऊळः**—हीं दोन्ही देवळें दगडी असून वरील बहिरोबाच्या देवळाच्या समकालीन बांधणीचीं आहेत.

**देवीचें देऊळः**–हें गांवापासून दक्षिणेस सुमारें दोन मैलांवर सासवड व सोनोरी या दोन गांवाच्या मध्यावर आहे. सोनोरीच्या पाटील काळे आडनांवाच्या घराण्यांपैकीं एक गृहस्थ पूर्वीं देवीचा भक्त होता; तो नियमानें दरवर्षीं तुळजापुरास तेथील देवीच्या दर्शनास जात असे. तो वृद्ध झाल्यावर त्याला जाववेना म्हणून देवीनें त्याला दृष्टांत दिला कीं, मी तुझ्या गांवांतील रोहीं थळांत ओढ्याच्या काठीं येऊन बसलें आहें. त्या ठिकाणीं येऊन माझें दर्शन घेत जावें. तुजला यापुढें तुळजापुरास येण्याचें कारण नाहीं. दृष्टांताप्रमाणें त्या जागीं देवीची स्थापना करून तो पाटील भक्ति करूं लागला. पुढें भिवराव यशवंत पानसे यांनीं शके १६८६ मध्यें देवीस दगडी देऊळ बांधलें. देवळांतील मूर्ति महिषासूर मर्दिनीची असून अष्टभुजा आहे. देऊळ बांधल्यावर पानगांवकर शिवाजी खंडेराव पानसे यांनीं देवळाभोंवतीं फरशी व ओढ्यांत उतरण्या करितां दगडी पायऱ्या बांधल्या. पायऱ्या पुराच्या पाण्यानें हल्लीं वाहून गेल्या आहेत. हें स्थान फार कडक म्हणून लोकांची या देवीवर फार भक्ति आहे. सुमारें पन्नास वर्षांपूर्वीं वामन भट मंजिरे या नांवाचा एक ब्राह्मण गृहस्थ दिवे गांवीं रहात होता. त्यास महारोगाची बाधा झाली, म्हणून त्यानें देवीच्या देवळांत राहून अनुष्ठान केलें, सुमारें सहा महिन्यांनीं त्याची बाधा दूर झाली; हें आम्हीं समक्ष पाहिलें आहे. सासवड, दिवे, अंबोडी वगैरे पंचक्रोशींतील लोक दर मंगळवारीं व शुक्रवारीं देवीच्या दर्शनास येतात. दरवर्षीं कार्तिक शुद्ध पौर्णिमेस या ठिकाणीं यात्रा भरते. त्या दिवशीं सोनोरी येथील बहिरोबाची प्रतिमा पालखींतून मोठ्या समारंभानें देवीच्या भेटीस घेऊन जातात. देवीची पूजा करण्याचा हक्क गांवचे गुरवाचा आहे. पूर्वीं कांहीं कारणामुळें पाटील काळे, देवीच्या पूजेचा हक्क सांगूं लागले. यामुळें दोघांत तंटा होऊन तो गांवपंचापुढें आला. पंचानीं एक मतांनीं शके १७५३ कार्तिक शु॥ १० रोजीं खालीं दिल्या प्रमाणें निकाल देऊन तो वाद मिटविला.

नवरात्रांत देवीवर बांधलेल्या कडाकण्या पैकीं, पांच कडाकणी, व गोंधळाच्या उसांपैकीं एक ऊंस पाटील यास द्यावा.

भंदे घेतल्यास भंदेवाल्याच्या हातांस नाडा बांधण्याचा मान व भंद्याच्या उत्पन्नापैकीं निम्मे उत्पन्न काळे यानीं घ्यावें.

मांसाचा नैवेद्य काळे यांनीं घ्यावा व जत्रेच्या वेळीं प्रसाद व विडा पहिल्यानें काळे यास द्यावा.

हें निकाल–पत्र गोपाळराव माधव पानसे कुलकरणी यांच्या स्वदस्तुरचं आहे.

मूळची मुर्ति कोणीं अविंधानें सुमारें पंचवीस वर्षांपूर्वी फोडली. म्हणून सोनोरी येथलि नारायण आत्माराम पानसे यांनीं खटपट करून हल्लींची मूर्ति स्थापन केली आहे.


**दसराः**—दसऱ्याच्या दिवशीं सीमोल्लंघनाची मिरवणूक काढण्याची चाल गांवो-गांव आहे; परंतु सोनोरी येथें ती ज्या रितीची निघते तशी क्वचित्‌च कोठें असेल बहिरोबा देवाची प्रतिमा पालखींत ठेवून दुपारीं सुमारें तीन वाजतां मिरवणूक गांवा-बाहेर पडते. मिरवणुकींत सोनोरींतलि सर्व लहान थोर, स्पृश्यअस्पृश्य पुरुष मंडळी जमावानें पालखी बरोबर असते. पालखी दिवे व सोनेरी या गांवच्या सीमेवर जाते, त्याच वेळीं दिवे गांवांतील सर्व समाज सोनोरी गांवांप्रमाणेंच तेथील कातोबाची पालखी घेऊन त्या ठिकाणीं येतो वहिवाटीप्रमाणें देवाच्या पालख्या एक मेकाला डावी उजवी घालून मानपान देण्याचा समारंभ झाल्यावर शमी–पूजन होतें. नंतर सोन्याची देवाण घेवाण होऊन सायंकाळीं सर्व समाज आपआपल्या गांवीं परत फिरतो. मिरवणूक परत गांवांत शिरल्यावर घरोघरच्या स्त्रिया आपआपल्या दरवाज्यासमोर येऊन देवास पंचारती घेऊन ओंवाळतात. या मिरवणुकींत गांवांतील लोक आतषबाजीची दारू उडवितात. अशा रीतीनें मिरवणूक रात्रींच्या बारा वाजतां बहिरोबाच्या देवळांत येतें, नंतर देवाची आरती होऊन जो तो आपआपल्या घरीं जातो.

## २. दिवें.

या गांवची थोडीशी माहिती सोनोरीच्या माहितींत आली च आहे. हें गांव पुरंदर तालुक्यांत, पुण्याहून पुरंदर किल्ल्यास जातांना जो घांट लागतो, त्या घाटाच्या माथ्या-वर सडकेच्या पूर्वेस पाव कोसावर आहे. गांवची हद्द फार मोठी असून तींत पूर्वी शेतकऱ्यांच्या सोईसाठीं बारा वाड्या वसल्या होत्या. आज त्यांपैकीं पांच अस्तित्वांत आहेत. त्यांचीं नांवें, १ जाधवाची २ काळ्याची ३ झेंड्याची ४ ढमाची व ५ ढुमाची. त्यांपैकीं घाटाच्या माथ्यावर जाधवाची वाडी आहे. तींत जाधवांचा एक मोठा किल्ले-वजा वाडा आहे. हे जाधव मूळचे हवेली तालुक्यांतील नांदेड गांवचे रहिवासी. मराठीराज्याच्या अमदानींत नांदेडहून ते येथें आले व चार बिघे जमीन खरेदी करून त्यांनीं हा वाडा बांधला. दिवें घाटांतून पुरंदरगडाकडे शत्रूस जातां येऊं नये, म्हणून सातारा व पुणें दरबारनें जाधवांना या ठिकाणीं रहावयास सांगून हा किल्लेवजा वाडा बांधावयास सांगितलें. महाराष्ट्रांत बहुतेक गांवीं मारुति व बहिरोबा या देवांची स्थापना केलेली आहे. बहिरोबास निरनिराळ्या गांवीं कातोबा, जोतिबा, पोटोबा, चांगोबा वगैरे निरनिराळीं नांवें दिलेलीं आहेत. दिवें येथें कातोबा हें नांव दिलेलें आहे. शके ९४७ आनंद नाम संवत्सरे ज्येष्ठ शुद्ध दशमी शुक्रवारचा एक ताम्र-



कै. सावळाराम कोंडदेव पानसे, अ. इंजिनियर.



श्री मुरलीधराचे देवळाचा देखावा, ( सोनोरी. )

१३७

पट सांपडला असून त्यांत या कातोबाच्या देवळाचा उल्लेख आहे ( राजवाडे खंड [illegible] पृ. ४०५ ). तसेंच एका जुन्या मिरासपत्रांत बेदरच्या बादशहाचा अंमल दिवें गांवावर होता, असा दाखला सांपडला आहे. यावरून हें देऊळ सुमारें दीड दोन हजार वर्षांपूर्वीचें बांधलेलें असावें.

दिवें गांव सासवडकर पुरंदरे यांस इनाम आहे. येथें ब्राह्मणांची अशी वस्ति फक्त पानसे यांची च आहे. जाधव यांचें उपाध्येपण हि पानसे यांच्याकडे च आहे. दिवें येथें जनावरास पाणी पिण्याकरितां पानशांनीं एक तलाव खोदला आहे.

दिवें येथें व्यापारी पेठ वसविण्याबद्दल छत्रपति शाहु महाराजांनीं शके १६३० मध्यें पिलाजी जाधव यास आज्ञा केली. तत्संबंधीचें एक पत्र आढळलें आहे. त्याचा सारांश पुढीलप्रमाणें:—

“ राज्याभिषेक शके ३४ सर्वधारी नाम संवत्सरे शाहु छत्रपति महाराज यांनीं पिलाजी बिन चांगोजी जाधव यास मौजे दिवें येथें पेठ वसविण्यास सोईचें गांव आहे, तरी पेठ वसवावी, तिचें नांव शाहुपुरी असें ठेवावें. त्यास तुम्हांस पेठेचें सेटेपण इनाम वंशपरंपरेनें दिलें असे. सासवड येथें सेटेपणाचें जे हक्क आहेत ते च तुम्ही अनुभवावे. सासवडखेरीज इतर ठिकाणचे वाणी उदमी आणावे. वतन वंशपरंपरेनें खावें. ”

यावरून व्यापाराच्या वृद्धीसाठीं स्वराज्यांत कसे प्रयत्न होत असत तें दिसून येतें.

## ३. पानगांव.

हा गांव सोलापूर जिल्ह्यांतील बार्शी तालुक्यांत बार्शीरोड स्टेशनपासून उत्तरेस सहा कोसांवर आहे. याला बार्शी पानगांव या नांवानें लोक ओळखितात. गांव कसब्याचा असून वस्ति सुमारें तीन साडेतीन हजार आहे. हवा उष्ण परंतु बार्शी सोलापूर येथील हवेपेक्षां थोडी थंड असून उन्हाळ्यांत पारा ११३ अंशांपर्यंत जातो. हवा कोरडी व निरोगी असल्यानें ती आरोग्यदायक आहे. वार्षिक पावसाचें मान अठरा इंचाचें आहे. प्रांत सुपीक असून मुख्य पीक ज्वारी, तूर, कापूस, गहूं व भुईमूग यांचें आहे. कापूस चांगला निपजतो. म्हणून त्याची सरकी काढून गठ्ठे करण्याचे कारखाने बार्शी वगैरे ठिकाणीं झाले आहेत. तसेंच बार्शी व सोलापूर या ठिकाणीं कापड विणण्याच्या हि गिरण्या आहेत.

पानगांव येथें पानशांचे दोन वाडे आहेत. पैकीं एका वाड्याचा नुसता दगडी तट तेवढा शिल्लक असून आंत गोपाळकृष्णाचें देऊळ आहे यास वेणुमाधव असें म्हणतात. हा वाडा सोनोरीकर पानशांच्या मालकीचा आहे. दुसरा वाडा शाबूत असून त्यांत पानगांवकर पानशांची वस्ति आहे. पानगांवकर पानशांस देशपांडे या नांवानें इकडे लोक ओळखितात. ब्राह्मण-वस्तींत केसकर, दीक्षित, घुमरे, पुराणिक, शेटे, गोळे वगैरे आडनांवांचीं घराणीं आहेत. येथें पानशांनीं एक मोठी बारव

बांधलेली आहे, तिचा उपयोग पाणी पिण्यासाठीं सर्व गांवास होतो. येथील पानशांचे कुलोपाध्याय दीक्षित या उपनांवाचे आहेत.

**१ वेणुमाधवाचें देऊळः**—देऊळ दगडी बांधलेलें असून आंत मुरलीधराची मूर्ति स्थापन केलेली आहे. देऊळ कधीं व कोणीं बांधलें याजबद्दल माहिती मिळत नाहीं. देवाची पूजा गोळे आडनांवाच्या ब्राह्मणाकडे असून, त्यास त्याबद्दल तीन बिघे जमीन पानशांनीं इनाम करून दिली आहे. शिवाय इंग्रज सरकारच्या तिजोरींतून सालीना सात रुपये देवाच्या खर्चासाठीं नक्त नेमणूक आहे.

**२ खंडोबाचें देऊळः**—हें देऊळ गांवालगत गांवाच्या पूर्वेस शिवाजी खंडेराव पानसे यांनीं शके १६९९ सालीं बांधलें. देऊळ दगडी असून आंत खंडेरावाची मूर्ति काळ्या पाषाणाची आहे. देवाचें पुजारीपण पानगांव येथील खानदारे या आडनांवाच्या मराठे घराण्याकडे चालू आहे. त्यास पूजा व इतर खर्चाबद्दल पानशांनीं तीस बिघे जमीन इनाम करून दिली आहे. ही इनाम जमीन त्या घराण्याकडे अद्याप चालू आहे.

## ४. नीरथडीचीं गांवें.

या गांवीं ( भोळी, तोंडल, गुणंद, लोणी, आणि वाठार ) वर्णन करण्यासारखें कांहीं नाहीं. फक्त वाठार येथें पानशांचा एक वाडा आहे. त्याबद्दलची हकीकत मागें दिली आहे.

# प्रकरण अकरावें.

## कांहीं उपयुक्त व मनोरंजक माहिती.

### १. कुलदैवतें व कुलाचार.

महाराष्ट्रांतील-ब्राह्मणवर्गांत मुख्यतः देशस्थ ब्राह्मणांची च वस्ति जास्त आहे. बहुतेक या ब्राह्मण घराण्यांतील कुलदैवतें व कुलाचार एका च नमुन्याचीं आहेत. दक्षिणेंत गांवोंगांवीं बहिरोबा हे ग्रामदैवत असल्यामुळें घरोघर त्याची स्थापना कुल-दैवतांत होणें यथार्थ आहे. शिवाय जेजुरीचा खंडोबा व तुळजापूरची भवानी हीं प्रत्येक घरीं कुलदैवतांत आहेत. हीं तीन मुख्य दैवतें इतरांप्रमाणें पानसे घराण्यांत हि फार प्राचीन काळापासून आहेत. मुंज, लग्न वगैरे मंगल कार्यारंभीं अक्षत देण्याची व कार्य आटोपल्यावर मुंजा मुलानें, अगर नूतन परिणित वधूवरानें या देवाच्या दर्शनास जाण्याची वहिवाट पूर्वापार चालू आहे. तुळजापूर गांव फार लांब, मुसलमान राजांचे हद्दींत व प्रवासाची विशेष दगदग, या कारणांमुळें तेथील देवीच्या दर्शनास जाण्या-ऐवजीं पुरंदर तालुक्यांतील न्हावी गांवचे यमाईस जाण्याचा परिपाठ पडला व तो च आतां प्रचारांत आहे. न्हावी गांवची यमाई तुळजापूरच्या देवीचें च ठाणें आहे अशी पानसे घराण्यांत समजूत असल्यामुळें या यमाई देवीची प्रतिमा कुलदैवतांत येऊन तीन दैवतांची चार दैवतें झालीं. अशा च रीतीनें, कांहीं संकट आलें असतां मूल होण्याकरितां, अगर एखादें महत्त्वाचें इच्छित कार्य प्राप्त होण्याकरितां, निरनिराळ्या प्रसंगीं देवतेस नवस करून कार्यसिद्धि झाल्यावर त्या देवतेची प्रतिमा करून कुलदैव-तांत स्थापिली आहे. भोळ्या व भाविक देशस्थ ब्राह्मण समाजांत अशाच कारणांमुळें दैवतांची संख्या वाढत गेली. कलकत्त्याची महंकाळी, कोल्हापूरची महालक्ष्मी, मुद्गल येथील मुंजा वगैरे देवतेच्या प्रतिमांच्या स्थापना कांहीं पानशांच्या कुलदैवतांत आहेत. या कारणांमुळें प्रत्येकाच्या घरीं यांची एकच नियमित संख्या राहिली नसून पांच, सात, अकरा अशी अनियमित संख्या झाली. मुख्य तीन दैवतांच्या पूजेअर्चेचे दिवस सर्वांच्या घरीं सारखे च आहेत चैत्री पौर्णिमा, श्रावणी पौर्णिमा, आश्विन महिन्यांतील नऊ दिवसांचें नवरात्र, मार्गशीर्ष महिन्यांतील चंपाषष्ठीचें सहादिवसांचें नवरात्र व माघ आणि फाल्गुन महिन्यांतील पौर्णिमा हे सरसहा सर्वत्रांच्या घरीं कुलधर्माचे दिवस पाळण्यांत येतात. दररोज होणाऱ्या पूजेअर्चेखेरीज वरील दिवशीं, तळी भरणें, आरती करणें व ब्राह्मण-सुवासीन पंक्तीस घेणें हीं कृत्यें मुख्यत्वें करावीं लागतात. याशिवाय आश्विन महिन्यांतलि नवरात्रांत सप्तशितीचा पाठ, चंपाषष्ठीचे नवरात्रांत मल्हारीमहात्म्याचा पाठ प्रत्येकाच्या घरीं असतो. लग्नमुंजीसारख्या शुभ कार्याच्या

अखेरसि गोंधळ डाका, घालण्याचा रिवाज आहे. याशिवाय ज्यांच्या घरीं वरील तीन कुलदैवतांशिवाय जास्त दैवतें आहेत त्यांचे दिवस हि वरील प्रमाणेंच विधियुक्त साजरे करावे लागतात.

मूल जन्मल्यानंतर एक दोन वर्षांच्या अंत सोनोरी येथलि व दिवें गांवचे हद्दींतील जाधवांच्या वाडींतील अशा दोन ठिकाणच्या सटवाईच्या दर्शनास आईनें मुलासह जाण्याची वहिवाट अद्याप कायम आहे.

## २. उपास्यदैवतें व त्यांचे उत्सव.

माणको विश्वनाथ पानसे यांच्या घराण्यांत पूर्वीपासून श्रीरामचंद्राची उपासना होती. त्यामुळें ते व त्यांचे वंशज हे ही उपासना, यथाप्रमाण उत्सव करून चालवीत असत. पानशांचीं जीं शिक्कामोर्तबें उपलब्ध आहेत, त्यांत पहिल्या ओळींत "श्रीराम चरणीं तत्पर" हीं च अक्षरें आहेत. हें रामभक्त घराणें नंतर कृष्णभक्त कसें बनलें, या बद्दलची पुढील आख्यायिका आहे.

एके दिवशीं सोनोरीस कृष्णराव माधव यांचा मुक्काम असतां, दुपारच्या जेवणाच्या वेळीं एक ब्राह्मण आला व फार क्षुधा लागली आहे असें त्यानें सांगितलें. कृष्णरावांनीं भोजनाची तयारी आहे, स्नान संध्या लवकर आटोपून येण्यास सांगितलें. ब्राह्मणानें आपलें बोजकें दिवाणखान्यांत ठेवलें व तो रामतीर्थाकडे स्नानास गेला. बरा च वेळ झाल्यानें कृष्णरावांनीं त्याच्या तपासासाठीं माणूस पाठविला, पण तो तेथें भेटला नाहीं; तेव्हां तो कुंडांत बुडाला असेल असें वाटून पाणबुड्याकडून कुंडांत शोध केला परंतु त्याचा तपास लागेना. म्हणून आसपासच्या तळीं विहिरी हि शोधिल्या; तरी हि त्याचा पत्ता लागला नाहीं. याप्रमाणें शोधांत असतां सायंकाळ झाली. घरांतील सर्व मंडळी उपाशी असल्यानें त्यांनीं आपले भोजन उरकिलें, पण ब्राह्मणाचा शोध लागल्याखेरीज आपण अन्नग्रहण करणार नाहीं असें कृष्णरावांनीं ठरविलें. रात्रीं ते निद्रिस्थ असतां, तो ब्राह्मण त्यांच्या स्वप्नांत आला व त्यानें सांगितलें कीं, "आपण भक्तीनें प्रसन्न होऊन तुझ्या घरीं आलों आहों. माझें स्वरूप दिवाणखान्यांतलि बोचक्यांत सांपडेल. त्याची भक्तिभावानें पूजाअर्चा करीत जा. यामुळें तुझें व तुझ्या वंशजांचें उत्तरोत्तर कल्याण होईल." इतकें सांगून तो ब्राह्मण अदृश्य झाला. लागलीच बोजकें उघडून पाहिलें तेव्हां त्यांत एक सुंदर गोपाळकृष्णाची मूर्ति व एक गीतेची पोथी सांपडली. तेव्हां कृष्णरावास मोठा आनंद होऊन त्यांनीं ती मूर्ति व पोथी नित्याच्या पूजेंत ठेविली आणि तेव्हांपासून ते व त्यांचे वंशज कृष्णोपासक बनले. ही मूर्ति पितळेची, अर्ध्या वीत उंचीची अंगावर तांब्याचे अलंकार कोरलेली, बहुत सुंदर बनावटीची आहे. हल्लीं ती रामचंद्र गोविंद पानसे यांच्या देव्हाऱ्यांत आहे.

एकदां पानसे हे कर्नाटकांत मोहिमेवर असतां, एका गांवीं रात्रीस पेंढाऱ्यांनीं गांवास आग लावून लुटालूट केली. त्यावेळीं पानसे हे निद्रिस्थ होते. मागील प्रसंगा-

प्रमाणें च यावेळीं त्यांच्या स्वप्नांत एक ब्राह्मण येऊन त्यानें सांगितलें कीं, "मी अग्नीच्या ज्वालेंत सांपडलों आहें, त्यांतून तूं मला बाहेर काढ." पानसे हे लागली च गांवांत जाऊन तपास करीत असतां त्यांना असें आढळून आलें कीं, एका मंदिरास आग लागून तें जळत आहे. त्यांनीं ती मंदिरास लागलेली आग विझवून त्यांतून देवाची मूर्ति बाहेर काढली. ही मूर्ति तांडवकृष्णाची कानडी पद्धतीच्या बनावटीची आहे. ती पितळेची सहा अंगुलें उंचीची आहे. कुंजवनांत आपल्या खेळगड्यांत दीड पायावर उभे राहून श्रीकृष्ण नाचत असून, त्यांच्या दोन्ही हातांत लोण्याचे दोन गोळे आहेत व समोर दोन गाई त्यांच्या मुखाकडे पहात आहेत, अशी या मूर्तीची घडण आहे. ही हि मूर्ति वरीलप्रमाणे च हल्लीं रामचंद्र गोविंद यांचें देव्हाऱ्यांत आहे.

या वरील कारणांमुळें पानसे हे पुढें कृष्णोपासक बनले. श्रावणांत जन्माष्टमीचा उत्सव त्यांच्या घरीं फार मोठ्या प्रमाणांत होऊं लागला. श्रावण व॥ १ पासून नऊ दिवस कथाकीर्तनें होऊन, दशमीस गोपाळकाला व ललित होऊन एकादशीस सकाळीं उत्सव समाप्त होई. दहीहंडी फोडण्याचा मान सासवडकर सोपानदेवाच्या मठांतील मठपतीकडे दिला गेला, तो अद्याप चालू आहे. काल्याच्या दिवशीं सर्व गांवकऱ्यास प्रसाद मिळे. अद्याप अशा च रीतीनें उत्सव होत असतो.

इंग्रजी अंमल झाल्यानंतर सरंजामी उत्पन्न जाऊन खासगी व देवस्थानी उत्पन्न तेवढें शिल्लक राहिलें. त्यांत सोनोरी, वनपुरी, सांगवी, तुळजापूर, सावरदरी व गंगापूर हीं गांवें आलीं. पुढें जेव्हां पानसे घराण्यांत गांवांच्या मोठ्या वांटण्या झाल्या तेव्हां त्यांत देवाच्या उपभोगाचें गांव वनपुरी हे वरील सर्व गांवांत जमा करून एकंदर वांटणी केली. त्या प्रमाणें देवस्थानांच्या हि वांटण्या केल्या. विठ्ठलाचें देवस्थान एकीकडे, श्रीरामाचें दुसरीकडे, लक्ष्मीनारायणाचें तिसरीकडे जाऊन ज्यांनीं त्यांनीं आपल्या देवस्थानची व्यवस्था करण्याचें ठरलें. ही व्यवस्था तेव्हांपासून शके १८२६–२७ सालापर्यंत निर्वेध चालत होती. फक्त जन्माष्टमीचा उत्सव सर्वांनीं मिळून करावा असें ठरलें.

शके १८२५–२६ च्या सुमारास पानशांपैकीं कांहीं जणांनीं, वनपुरी हा गांव देवस्थानानिमित्त इनाम असून, त्या गांवचें उत्पन्न देवस्थानाकडे खर्च न होतां खासगी कडे होतें, तें तसें न व्हावें म्हणून सरकार मार्फत विल्हेवाट व्हावी असा मुद्दा काढून कज्जा उपस्थित केला. त्या वेळीं हा गांव सरदार यशवंतराव वामन पानसे यांचे नांवें खर्चीं पडत होता. हा वाद १०।१५ वर्षे चालू होता. वास्तविक देवस्थानाच्या खर्चाची तजवीज मागील पिढ्यांनीं केली होती. व ती व्यवस्था कित्येक वर्षे बिन बोभाट चालू होती, त्यामुळें तंट्याला कारण नव्हतें, पण निरुद्योगी मनाला स्वस्थ बसवत नाहीं, कांहीं तरी खटपटी लटपटी कराव्या लागतात, त्यामुळें हें भांडण सुरू झालें. शेवटीं, सर्व देव, व तो गांव, ज्यांच्या नांवानें खर्चीं पडत होता, त्यांचे ताब्यांत देऊन, त्यांनीं सर्व

देवांची व्यवस्था पाहावी व दरवर्षी जमाखर्च सरकारांत दाखल करावे, असा निकाल झाला. यामुळें पुढें ट्रस्टी म्हणून हा गांव सरदार यशवंतराव वामन यांचे कडे च राहिला व अशा रीतीनें त्यांचा जहागिरदारीचा मान त्यांच्याकडे कायम राहिला.

जन्माष्टमीच्यां उत्सवाकरितां पुढील प्रमाणें योजना केली होती. बादशाही इनामांत देशपांडेपणाचें जें उत्पन्न ( जमिनी ) होतें, त्या जमिनी ज्याच्या त्यानें वांटून घेतल्या. परंतु गांवचे वसुलांतून देशपांडेपणाबद्दल जो हिस्सा रोकड मिळत असे तो इंग्रज सरकारनें बंद करून त्या हक्काबद्दल नक्त नेमणूक ५५० रु. ची करून दिली होती. या नक्त नेमणूकीची निम्मी रक्कम पानगांवकर शिवाजी खंडेराव पानसे यांच्या वंशजाकडे गेली, बाकीची निम्मी रक्कम राहिली ती सोनोरीकर पानशांची राहिली. ही रक्कम वांटून न घेतां तिचा विनियोग जन्माष्टमीच्या उत्सवाकडे करण्याचें ठरलें. पुढें जे भाऊबंद स्वतंत्र उत्सव करण्यास तयार झाले, त्यांना त्यांच्या हिश्शांप्रमाणें वरील नक्त रकमेची वांटणी करून दिली. त्यामुळें एका उत्सवाचे, रामचंद्र गोविंद, गहिनीनाथ माधव, वामनराव यशवंतराव व गणपतराव दामोदर, यांच्याकडचे असे चार उत्सव झाले. याशिवाय पानगांवास हि पानसे हा उत्सव त्यांना मिळालेल्या उत्पन्नांतून करीत असतात. कृष्णराव दामोदर यांचे वडिलांनीं उत्पन्नांतील भाग मुळींच घेतला नाहीं, यामुळें उत्सव करण्याची जबाबदारी त्यांचेवर राहिली नाहीं. हे सर्व ठिकाणचे उत्सव मोठ्या थाटानें होत असतात. वर सांगितल्याप्रमाणें जी मूर्ति भटजीच्या गांठोड्यांत निघाली तिच्या बरहुकूम चांदीच्या नवीन उत्सवमूर्ति करून प्रत्येकांनीं तिची स्थापना आपआपल्या देवघरांत केली. अलीकडे १०।१५ वर्षांत धार्मिक भावनेच्या अभावामुळें व खर्चाचीं तोंडें वाढल्यामुळें आणि वनपुरी गांवचा तंटा उद्भवल्यानें उत्सवाचें मान कमी कमी होत चाललें आहे. हा कालगतीचा महिमा होय !

दिवें येथील अर्धले पानसे यांचे घराण्यांतील यशवंत आत्माराम हे राम–उपासक होते. त्यांनीं आपले घरीं रामाच्या मूर्ति स्थापून रामजन्माचा उत्सव सुरू केला. यास सुमारें पन्नास साठ वर्षे झालीं. अद्याप पर्यंत हा उत्सव चालू आहे.

याशिवाय इतर पानसे घराण्यांत त्यांच्या कुलदैवतांशिवाय इतर उपास्य दैवतें नाहींत.

## ३. पानसे घराण्याची शैक्षणिक प्रगति.

पानसे मंडळींनीं कालास अनुसरून निरनिराळ्या वेळीं निरनिराळ्या प्रकारें शिक्षण घेऊन आपली ऊर्जितावस्था करून घेतली असल्यानें या मंडळींत परिस्थित्यनुग्रहण ( Adaptability ) हा गुण प्रामुख्यानें वसत असल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें. प्रथम ही मंडळी जेव्हां कर्नाटकांतून बाळेघाटीं आलीं, तेव्हां त्यांनीं भिक्षुकी सोडून जोसपण,

कुळकरण आणि देशपांडकीचें शिक्षण घेतलें. त्यानंतर परशुरामपंत हे पुणें प्रांतीं आले. त्यांच्या वंशजांनीं राजकारणांत प्रवेश केला; आणि सरते शेवटीं पेशवाईमध्यें माणको विश्वनाथाच्या वंशजांनीं ब्रह्मकर्म सोडून क्षात्रकर्म अंगिकारिलें. आणि त्यांत इतकें प्रावीण्य मिळविलें कीं, इंग्रजासारख्या परकीयांनीं सुद्धां त्यांची त्या कामांतील कौशल्याची तारीफ केली. पेशवाईप्रमाणें गायकवाडींत हि पानशांनीं राजकारणी कामें केलेलीं आहेत.

सांप्रतच्या काळीं हि इंग्रजी शिक्षणांत या मंडळीनें बरी च प्रगति केली आहे. पानशांची मुख्य वस्ति तीन ठिकाणीं आहे. एक पानगांवीं, दुसरी नीरथडी बाजूस भोळी, तोंडळ, लोणीं, वाठार या गांवीं व तिसरी दिवें व सोनोरी या गांवीं. यांपैकीं पानगांवकर पानशांची मजल प्राथमिक शिक्षणापलीकडे फारशी गेलेली नाहीं. नीरथडीकरांनीं दुय्यम व क्वचित् उच्च शिक्षणापर्यंत धांव घेऊन, सरकारी नौकऱ्या धरल्या आहेत. या दोहों ठिकाणच्या पानसे मंडळीपेक्षां दिवे–सोनोरीकरांनीं शिक्षणांत पुष्कळ च अघाडी मारली आहे. याला कारण, दिवसेंदिवस विकट होत जाणारा जीवनार्थ कलह हें होय. पूर्वींसारखा पाऊस भरपूर पडत नसल्यानें पिकें चांगलीं येत नाहींत, भाऊबंदकीमुळें इनाम व मिराशी जमिनीची अत्यंत बारीक चीरफाड होत चालली व खेडेगांवांत चरितार्थाला इतर धंदे राहिले नाहींत. हीं व आणखीं इतर कारणें हि या गोष्टीला आहेत. त्यामुळे ३०।३५ वर्षांपूर्वीं पानसे मंडळी दिवें--सोनोरी सोडून बाहेर पडत नसत. ती स्थिति आतां बदलली आहे; आतां सदर गांवीं पानसे मंडळी फारशी राहिली नाहीं. या लोकांपैकीं पुष्कळांनीं आपलें गांव सोडून पुण्यास येऊन वस्ति केली आहे. त्यांनीं सर्व दर्ज्यांच्या सरकारी नौकऱ्यांत, व खासगी व्यवहारांत शिरकाव करून घेतला आहे. शिक्षक, प्रोफेसर, महालकरी, मामलेदार, इंजिनीयर, कंत्राटदार, डॉक्टर, वैद्य, फारेष्ट आफिसर, वकील वगैरे सर्व प्रकारचे खात्यांत ही मंडळी सांप्रत आढळतात. विद्यापीठाच्या सर्व शाखांच्या पदव्या मिळविलेले पुरुष पानसे मंडळींत असून पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या प्रतीचे सरदार व रावसाहेब, रावबहादूर या मानाच्या पदव्या भूषविणाऱ्या व्यक्ति हि यांच्यांत आहेत. स्त्रीशिक्षणांतील प्रगति हि या घराण्यांत हळुहळु होत चालली आहे. ट्रेनिंग कालेजांतून दुसरें वर्षाचें सरटिफिकीट मिळविलेल्या कांहीं स्त्रिया या घराण्यांत असून, सांप्रत एक बी ए, व एक एम्. ए अशा दोन पदवीधर स्त्रिया आहेत. साधारणपणें ज्या धंद्यांत अगर खात्यांत गणितासारख्या आंकडेमोडीची विशेष जरूर लागते अशा ठिकाणीं पानसे मंडळीचा जास्त शिरकाव झाला असून त्यांत ते आघाडीस येत आहेत. हा विषय या घराण्याच्या विशेष आंवडीचा दिसतो. ही सर्व शिक्षणांतील प्रगति गेल्या २५।३० वर्षांचे आंतील आहे. सारांश आम्हीं वर म्हटल्याप्रमाणें पानशांनीं परिस्थित्यनुग्रहणांत आपलें पाऊल आतांपर्यंत पुढें पुढें च टाकलें असून बुद्धिमत्तेंत ते कोणत्या हि प्रकारें इतरांपेक्षां कमी दर्जाचे नाहींत.

## ४. जाधवांचें उपाध्येपण.

दिवें गांवच्या हद्दींत जाधवांनीं वाडा बांधून त्या सभोंवतीं वस्ति केली, त्यास 'जाधवांची वाडी' असें म्हणतात. जाधवांचें उपाध्येपण पूर्वीपासून पानसे यांच्याकडे होतें. तत्संबंधीं श्री. शाहू छत्रपति यांचें एक पत्र उपलब्ध झालें आहे, तें इतिहासप्रसिद्ध पिलाजी जाधवराव यांचे नांवचें आहे. तें असें:—

" राजेश्री पिलाजी जाधवराव यास आज्ञा केली ऐसी जे, राजेश्री खंडो शिवदेव पानसे जोशी कुळकर्णी मौजे दिवें कर्यात सासवड यांचेकडे उपाध्येपण, अष्टाधिकार, पूर्वीपासून तुमचे घरचें आहे. त्यास गतवर्षीं राजेश्री सटवोजी जाधव हुजूर आले असतां, त्यांची उपाध्येपणाची वृत्ति त्यांस चालविणे, म्हणोन आज्ञा केली. त्याजवरून त्यांनीं यास उपाध्येपणाचें वृत्तिपत्र, राजेश्री मल्हार तुकदेव पुरंदरे देशपांडे कर्यात सासवड यांचे विद्यमानें करून दिलें, तें हुजूर मनास आणिलें. व राजश्री बाळाजी पंडित प्रधान यांनीं मनास आणिलें. तरी तुम्ही आपले उपाध्यक, उपाध्येपणाचा मान व धर्मांश व आचार्यत्व, अनुष्ठान प्रसंगाचे व देवार्चन व लग्नमुहूर्त वगैरे मानपान खंडो शिवदेव यासी देऊन याची उपाध्येपणाची वृत्ति यास चालविणें व सटवोजी जाधव यांणीं, शिवाजी खंडेराव यास, नेहमी येऊन राहाणें म्हणजे तुम्हांस एक असामी देऊन तुमचें उपाध्येपण तुमचे हातून घेऊं म्हणोन मान्य केलें होतें. त्यावरून यास सरकारांतून आज्ञा देऊन तुम्हांकडे पाठविले आहेत, तरी आपलें देवार्चन यांचे स्वाधीन करून उपाध्येपणाचें प्रयोजन यांचे हातून घेऊन यांचें चालविणें. हे आपले भाऊबंद अगर मुतालिक ठेवून उपाध्येपण चालवितील. दुसऱ्यास यांचें उपाध्येपणाचें प्रयोजन करण्यास दरकार नाहीं. मुक्कामी अगर स्वारींत उपाध्येपणाचें प्रयोजन यांचे हातून घेत जाणें. यांचें चालविणें स्वामीस जरूर असे. जाणिजे छ २१ साबान सल्लास आर्बैन मया व आलफ. "

## ५. पुरंदरे व पानसे यांचा शरीरसंबंध.

पुरंदरे व पानसे यांच्यांत शरीरसंबंध होत नाहीं. याला जें एक कारण घडलें तें धार्मिक नसून निराळेंच आहे. सगोत्र अगर सप्रवर वगैरे धार्मिक कारणें याच्या आड आलेलीं नाहींत. दोन्ही घराण्यांचीं गोत्रें भिन्न भिन्न आहेत. असें असतां खालीं दिलेली गोष्ट घडल्यापासून हा संबंध सुमारें गेल्या दोन तीन शें वर्षांत झालेला आढळत नाहीं.

एकदां या दोन घराण्यांत शरीरसंबंध होण्याचें ठरून तिथि-निश्चय झाला व वऱ्हाडी मंडळी हि लग्नास आली. लग्न लागण्यापूर्वी मानपानासंबंधानें कांहीं भांडण उपस्थित होऊन तें विकोपास गेलें व लग्न फिसकटलें. यावेळीं संताप येऊन दोन्ही घराण्यांतील पुरुषांनीं एकमेकांशीं शरीरसंबंध करूं नये अशा शपथा घेतल्या व तीच शपथ त्यांनीं आपल्या पुढील वंशजांस हि घातली.



श्री. माधव कृष्णराव पानसे, ओव्हरसीयर.



श्री. विठ्ठल केशव पानसे
M. A., S.T. C. D.

ही वरील हकीकत दंतकथेच्या आधारें दिली आहे. परंतु तपासाअंतीं या दोन्ही घराण्यांतील वंशजांनीं आजपर्यंत म्हणजे सुमारें दोन तीन शें वर्षांत ही शपथ पूर्णपणें पाळिली आहे. यावरून वरील दंतकथेंत बरेंच सत्य असावें.

## ६. पानसे आडनांवाचीं दुसरीं घराणीं.

आमच्या घराण्याचें गोत्र मुद्गल आहे. ज्यांचें गोत्र मुद्गल नाहीं पण आडनांव पानसे आहे अशीं कांहीं दुसरीं घराणीं आज महाराष्ट्रांत आहेत.

वाई तालुक्यांत वाई गांवापासून दोन कोसांवर पसरणी या गांवीं पानशांची वस्ति आहे. त्यांचें गोत्र शांडिल्य आहे. या शांडिल्य गोत्री पानशांचा मुद्गल गोत्री पानशांशीं शरीरसंबंध झाल्याचीं कांहीं उदाहरणें हल्लीं अस्तित्वांत आहेत.

तसें च नगर जिल्ह्यांत मौजे बेलवंडी तर्फ करडे येथें व सिनानदीच्या कांठीं मलठण गांवीं पानशांची वस्ति आहे; परंतु त्यांचें गोत्र वाशिष्ठ आहे. या वाशिष्ठगोत्री पानशांचा व मुद्गलगोत्री पानशांचा शरीरसंबंध झाल्याचें अद्याप आढळून आलें नाहीं.

वरील दोन भिन्न गोत्री पानसे घराण्यांखेरीज उमरावतीस एक पानशांचें घराणें आहे. परंतु तें यजुर्वेदी असून कौशिक गोत्री आहे.

## ७. तोफखान्यासंबंधीं मनोरंजक माहिती.

शुक्रवार पेठेंत पानशांचे वाड्याजवळ नवीन तोफा करण्याचा कारखाना होता. हल्लीं ज्या जागेवर सिटी पोलीस लाईन व मामलेदार कचेरी आहे, त्याच जागेवर हा कारखाना होता. कारखान्यास एक मोठें तटाचें आवार होतें. या आवाराची चतुःसीमा पुढील प्रमाणें एका लेखांत आम्हांस आढळली. ती येणें प्रमाणें:—

**पूर्वेस**:—गणपतीचें देऊळ, पश्चिमेस—शेवाळे यांचा वाडा, उत्तरेस—इमारतीचा मोठा दरवाजा, व दक्षिणेस—बारा इमामचा पीर. यांपैकीं गणपतीचें देऊळ व बारा इमामचा पीर हे हल्लीं कायम आहेत. हल्लींच्या पोलीस लाइनीजवळ असलेला मुख्य दरवाजा व तटाचा पडका भाग पाहिलेलीं वृद्ध माणसें अद्याप पुण्यांत हयात आहेत.

## तोफांचीं नांवें.

तोफखान्यांतील सर्व तोफांस नांवें होतीं. तीं कोणतीं हें आज समजत नाहीं; पण कांहीं कांहीं तोफांचीं नांवें आढळतात. शके १७०० मध्यें मशीरगडाहून पुण्यास पुढील नांवांच्या तोफा मागविल्याचा दाखला आढळतो.

१ **पंचरसीः**-सुरजमुखी, चांद, लक्ष्मी, सुमेरसिंग, गुलाब, यशवंती, मार्तंड, व्याघ्रमुखी, भवानीप्रसाद, वहिरीप्रसाद, लक्ष्मण तक्तराव व महबूब. **२ बिडीः**-काळा-पहाड, हटीहनमंत, जयवंती, दिलदार, दिलपसंत व बिंद्रावन.

याखेरीज इतर ठिकाणीं नांवें आढळतात तींः-जय, महंकाळी, हनमंत, सवाई लक्ष्मण, राम, दुर्गा, अस्मान्तडा, सत्यशकल, फत्तेजंग, ज्वालाभवानी, सबसिकल† फत्तेमूबारख* व सलाबतजंग,

शके १७१८ मध्यें शनवार वाड्यांतील पेशवेसरकारच्या गणपति-उत्सवांत ज्या तोफा उडविल्या त्यांचीं नांवेंः-

१ हुजूरवाड्याकडेः—रामबाण, समशेरजंग, चांद, संभूबाण, मनरंजन व महालक्ष्मी. २ कारखान्या बाहेरः-गंगासागर, फत्तेलष्कर, खुमशीभवानी, दर्याभवानी, लक्ष्मी, जयवंती, रेणुका, गुलबदन, नवरतन, व महताप. ३ संगमावरः—जंबुरे, सूर्य-मुखी व विनायक.

## ८. तोफखान्याच्या कारखान्याचा पसारा.

शुक्रवार पेठेंतील पानशांचे वाड्याशेजारीं त्यांच्या तोफखान्यांतील लोकांचा, नवीन तोफा ओतण्याचा व जुन्या दुरुस्त करण्याचा कारखाना होता. हा काळ्या हौदापासून थेट नागझिरीपर्यंत, पूर्व-पश्चिम पसरला होता. यांत च कारखान्यांतील कारागिरांचीं राहण्याचीं घरें होतीं. याशिवाय इतर ठिकाणीं हि कारखान्यांतील कामगार लोक रहात होते. कारखान्यांतील नोकर लोकांच्या रहाण्याच्या घरांची एक त्रोटक यादी आढळली आहे ती पुढें दिली आहे. त्यावरून कारखान्याच्या विस्तृत पणाची कल्पना येईल.

### शुक्रवार पेठ.

| | | |
|---|---|---|
| ४ सुतार | २ गोलंदाज | २ जेजालदार |
| ४ लोहार | १६ खलाशी जमादार | ३ ढालाईत |
| ७ बाणांचे कारागीर | २२ दर्यावर्दी जमादार | १ संदुकाचा हवालदार |
| १ गोळ्यांचा करीगार | २६ गाडीवान | ५ वेलदार |

† सबसिकल या तोफेच्या गोळ्यानें इष्टुर फांकडा वडगांवचे लढाईंत मारला गेला.

* या दोन तोफा हल्लीं पुणें येथें मामलेदार कचेरीच्या पुढील दरवाजाचे बाजूस पुरलेल्या आहेत. यांजवरील नांवें मोडी लिपींत असून फत्तेमुबारखपुढें ८८७॥ व सलाबतजंगपुढें ८८४॥ असें वजन दर्शविणारे आंकडे आहेत. हे आकडे बहुधां त्या त्या तोफेंतून किती शेर वजनाचे गोळे फेंकले जातात त्याचे दर्शक असावेत.

१ घणकरी
२ जिनगर
२ भालदार
३ जासूद
३ खासदार
१९ कामाठी

४ ओरकस
६ बाणदार
१ शिंपी
२ पखालवाले
१ परीट
२ कलाल

३ तबेलदार
१ फरास
३ कोठावळे
१ रक्तवान
१२ गाडदी
१ बारगीर

### गंज पेठ.

८ गारदी
२ शिंपी
१ बाणदार

### भवानी पेठ.

८ गारदी
२ शिंपी
१ बाणदार
१ गाडीवाला
१ गाडदी जमादार

### रविवार पेठ.

४ सांडणी स्वार
१ बाणदार
१ गारदी जमादार

### नानाची पेठ

१ कोठावळा
१ सुतार

### सोमवार पेठ

१ गाडदी

### मंगळवार पेठ

१ गाडदी

### सदाशिव पेठ.

१ सुतार

## ९. निशाण मारण्याचें कौशल्य.

एकदां एलफिन्स्टन साहेब यांनीं आपल्या इंग्रजी पलटणींतील सैनिकांची करामत दाखवून श्रीमंत रावबाजीचे मनावर इंग्रजांचे सामर्थ्याचा पगडा बसवावा म्हणून पुण्यानजीक गुलटेकडीवर निशाणबाजीचे प्रयोग करण्याचें ठरविलें व श्रीमंत पेशवे सरकारास तें कौशल्य पाहाण्यास बोलाविलें. यावेळीं एकंदर तोफखान्याचा कारभार रूपराम चौधरी याच्या दिमतीस गेला होता. इंग्रज सैनिकांची कवाईत व निशाण-बाजीचे प्रयोग झाल्यावर श्रीमंतांनीं आपल्या पदरचे लोक बोलावून त्यांस निशाणबाजी करण्यास सांगितलें. परंतु पहिल्या गोळीस कोणाचें च निशाण बरोबर लागेना. त्या-मुळें श्रीमंतांची मर्जी बहुत खट्टू झाली. तें पाहून एकानें श्रीमंतांना विनंति केली कीं, **गणपतराव विश्वनाथ पानसे** यांना बोलावून आज्ञा करावी म्हणजे ते निशाण बरोबर मारतील. यावरून गणपतरावांस आणून निशाण मारण्यास श्रीमंतांनीं आज्ञा केली. तेव्हां गणपतराव म्हणाले कीं, " श्रीमंतांनीं आमचेकडून सर्व कारखाना काढून घेऊन आम्हांस घरीं बसविलें, आतां निशाणाचा अभ्यास राहिला नाहीं, तथापि प्रयत्न करून पाहतों. " असें म्हणून निशाण लावून गोळी मारली. तों त्या पहिल्याच गोळीनें निशाण उडविलें. नंतर दुसरें निशाण लावून तें हि एका च गोळीनें उडविलें; या-

प्रमाणें पंधरा निशाणें पंधरा गोळ्यांनीं उडविलीं. तें पाहून एलफिन्स्टननें हि गणपतरावाच्या कौशल्याबद्दल प्रशंसा केली. श्रीमंतांनीं हि त्यावेळीं गणपतराव विश्वनाथ यांचा गौरव करून त्यांना बहुमूल्य पोषाक दिला.

## १०. कलावंतीण.

पानशांचे पदरीं, तत्कालीन पद्धतीस अनुसरून एक नृत्यगायनकलेंत निष्णात अशी **दिलजान शाव** नांवाची कलावंतीण सोनोरी येथें होती. आनंदोत्सवाच्या प्रसंगीं तिचें गायननर्तन होत असे. शिवाय, तेथील देवालयांत रोज तिला गायनाची हजेरी द्यावी लागे. याप्रमाणें तिचा सारा जन्म सोनोरी गांवीं गेला. तिच्या मागें तिची मुलगी हि हें च काम करी. तिच्या कौशल्याबद्दल तिच्या आईला जी नेमणूक होती तीं तिच्याकडे हि चालू होती. खेरीज पानशांनीं सोनोरीस सात विघे जमीन त्यांत बागवगीचा तयार करून तिला इनाम दिली. ती शके १७७० मध्यें वारली; तेव्हां तिला वारस नसल्यानें इनाम दिलेली जमीन खालसा केली. अद्यापि या जमीनीस " कलावंतिणीचें शेत " हें नांव चालू आहे.

## ११. फुलझाडांचा षोक.

पुरंदरे दप्तरांत गणपतराव विश्वनाथ पानसे यांस फुलझाडांचा फार शोक होता याबद्दलचें एक पत्र नुकतें च उपलब्ध झालें आहे. गणपतरावांनीं सोनोरी येथें आपल्या वाड्यासभोंवतीं जो बगीचा केला होता, त्यांत मोठ्या प्रयत्नानें लहान आकाराच्या दळाच्या बिल्ववृक्षांचीं रोपें मिळवून त्यांची लागवड केली होती. तीं झाडें पाहून नानासाहेब पुरंदरे यांनीं तशा जातीचीं रोपें पाहिजेत म्हणून मागणी केली. त्यांना पाठविलेल्या जबाबांत गणपतराव लिहितात कीं, " खानवडी गांवचे बागेंत रोपें तयार आहेत. तीं बाळ्या रासकर ( माळी ) यांजकडून घेऊन जाणें. फुलझाडांचा षोक अमीर व फकीर या दोघांनींच करावा, परंतु खानदानांनीं व दौलतदारांनीं तो केल्यास हरकत नाहीं." वरील बिल्ववृक्ष अद्यापपर्यंत सोनोरी येथें कायम आहेत. पुण्याजवळ हि गणपतरावांनीं एक सुंदर बगीचा तयार करून त्यास **माणिकबाग** हें नांव दिलें होतें. या बागेस माणिकबाग हें च नांव अद्याप चालू असून तो पानशांच्या च मालकीचा आहे.

## १२. जेजुरी येथील खंडेरावाची तरवार.

महिपतराव लक्ष्मण व रामराव लक्ष्मण पानसे यांनीं जेजुरीच्या खंडेरावास एक मोठी कांसवाच्या पाठीची ढाल व वजनदार तलवार ( तेगा ) अर्पण केली. तलवारीवर या दोघांचीं नांवें कोरलेलीं आहेत. तलवार फार जड सुमारें ८।९ शेर वजनाची आहे. हल्लीं या दोन्ही जिनसा जेजुरी येथें देवळांत देवाजवळ ठेविल्या असून प्रेक्षकांस पहावयास मिळतात.

## १३. चिलखत.

सोनोरी गांवीं पानशांचे वाड्यांत लोखंडी चिलखतांच्या तुकड्यांचा एक ढीग आम्हीं आपल्या लहानपणीं स्वतःचे डोळ्यांनीं पाहिलेला होता. चिलखतांवरील रंगी-बेरंगी कापड नाहींसें होऊन आंतील लोखंडी जाळ्या गंजल्यामुळें चिलखतांचे लहान मोठे तुकडे या ढिगांत होते. हल्लीं पुणें येथें इतिहाससंशोधक-मंदिरांत एक चिलखत ठोविलेलें आहे; तें याच पानशांच्या वाड्यांतील या ढिगापैकीं एक निवडून आणलेलें आहे.

# प्रकरण बारावें.

## वंश-विस्तार-विवेचन.

मूळ कर्नाटकांतून महाराष्ट्रांत आलेल्या गोविंदपंतापासून आज हयात असलेल्या पुरुषांपर्यंतची साग्र माहिति देणारा वंशवृक्ष या पुस्तकास जोडला आहे. वंशवृक्षावरून त्यांतील पुरुषांनीं केलेल्या कर्तबगारीचा उल्लेख होत नाहीं. राजदरबारीं अगर दुसऱ्या महत्त्वाच्या प्रसंगीं ज्या पुरुषांचे संबंध आलेले होते, त्यांचे उल्लेख मागें पूर्वार्धांत आलेले आहेत. परंतु त्याशिवाय इतर पुरुषांचा नामनिर्देश व त्यांच्या कामगिऱ्या तसेंच हल्लीं हयात असलेले पुरुष, त्यांचें वास्तव्य व व्यवसाय या संबंधाची माहिती देणें अवश्य असल्यामुळें ती या भागांत देण्याचें योजिलें आहे.

वंशवेलांतील एकंदर सर्व पुरुषांचे नामनिर्देश या प्रकरणांत आलेले नाहींत, परंतु कर्तृत्वाच्या मानानें ज्यांचीं नांवें आलीं आहेत त्यांचे संबंध त्यांचे मागील पुरुषांशीं अगर पिढीशीं जोडले आहेत; त्यामुळें वाचकांचा घोटाळा न होतां अमका मनुष्य अमक्याचा अमूक संबंधी हें नातें चटकन लक्षांत येईल. सारांश अशा रीतीनें वंश-वेल कोठेंही न तोडतां तो शेवटपर्यंत अखंड ठेविला आहे.

**गोविंदपंत** मूळ पुरुष कर्नाटकांतून बालेघाटावर आले. त्यांच्या पुढील पिढींतील वंशजांचीं नांवें प्रकरण १ यांत आलेलीं आहेत. गोविंदपंत धरून **भुतावा** हे त्यांच्या पुढील पिढींतील सातवे पुरुष होत. भुतावास **१ बालावा, २ परसावा** आणि **३ तानाजी** असे तीन पुत्र झाले.

१ बालावा भुतावाः—हे तोंडल गांवीं राहूं लागले म्हणून यांचे पुढील वंशजांस तोंडलकर असें म्हणूं लागले. यांच्या पुढील वंशाची माहिति (१) "**तोंडलकर पानसे**" या नांवाखालीं दिली आहे.

२ परसावा भुतावाः—यास लक्ष्मीधर या नांवाचे पुत्र होते. या लक्ष्मीधरास **परसावा** ( परशुराम ) **विठोबा** व **बाबाजी** असे तीन पुत्र झाले. पैकीं विठो-बाचा वंश पुढील दोन पिढ्यांत नष्ट झाला. म्हणून परशुराम व बाबाजी या दोन भावांत वतनवृत्ति वांटल्या गेल्या. त्या वेळेपासून बाबाजीच्या वंशजांस 'अर्धले' असें म्हणूं लागले; सबब (२) "**अर्धले पानसे**" या नांवाखालीं बाबाजी लक्ष्मीधर यांच्या वंशाची माहिती दिली आहे.

लक्ष्मीधराचे वडील चिरंजीव परशुराम यांस **लुखोवा, रामाजी, विसाजी, कृष्णाजी, केसो** व **रखमाजी** असे सहा पुत्र होते. लुखोवा व रखमाजी यास संतति झाली नाहीं. केसो याच्या वंशाचा पुढें दोन पिढ्यानंतर निर्वंश झाला. बाकी

राहिलेल्या तीन पुत्रांचा वंश (३) " **रामाजी परशुराम यांचा वंश** " (४) " **विसाजी परशुराम यांचा वंश** " (५) " **कृष्णाजी परशुराम यांचा वंश** " या नांवाखालीं दिला आहे.

३ तानाजी भुतावा:—यांस **बालावा, अंताजी** व **परशुराम** असे तीन पुत्र झाले. बालावा यांच्या वंशांत हल्लीं कोण पुरुष हयात आहेत व ते कोठें राहतात याचा तपास लागत नाहीं. अंताजी यानें वाठार गांवचें कुळकरण हें वतन मिळविलें, परंतु पुढें दोन पिढ्यांनंतर त्याच्या वंशांत कोणी शिल्लक राहिलें नाहीं. यामुळें त्याचे बंधूचे (परशुरामाचे) वंशज वतनाचे मालक झाले. परशुरामाचे पणतू **तानाजी** यास **सखाजी** व **दादाजी** या नांवाचीं दोन मुलें होतीं. सखाजी वाठारगांवीं राहून वृत्ति पाहूं लागले. म्हणून त्यांच्या वंशास वाठारकर असें म्हणूं लागले. या कारणामुळें सखाजी तानाजी यांचा वंश (६) " **वाठारकर पानसे** " या नांवाखालीं दिला आहे. दादाजी तानाजी हे आपले वडिलोपार्जित वृत्तीच्या भोळी गांवीं च कायम राहिले; यामुळें यास भोळीकर असें नांव पडलें. दादाजी तानाजीचा वंश (७) " **भोळीकर पानसे** " या नांवांखालीं दिला आहे.

## १. तोंडलकर पानसे.

### (बालावा भुतावा यांचा वंश.)

बालावास **रामजी** नांवाचे पुत्र झाले; रामजीस **बाप्पाजी, मल्हार** व **भुतोवा** असे तीन मुलगे होते. पैकीं भुतोवाचें नक्कल झालें. बाप्पाजीचे पुत्र **साबाजी** व साबाजीस **बहिरव, रंगो, बयाजी, आबाजी** व **रावजी** असे पांच पुत्र झाले. पैकीं रंगो, आबाजी व रावजी या तिघांचे नक्कल झालें; बहिरव यांचे पश्चात् त्यांच्या सहावे पिढींत कोणी पुरुष हयात राहिला नाहीं. बयाजी साबाजी यांच्या वंशांतील **बहिरव** हे पांचवे पुरुष होत, यास **श्रीधर** व **पांडुरंग** या नांवांचीं दोन मुलें झालीं, तीं हल्लीं तोंडल येथें रहातात.

मल्हार रामजी यास चार मुलें झालीं, पैकीं **मोरोपंत** व **गोविंद** या दोन मुलांचा नष्टांश झाला. **विसाजी** याचे वंशज हल्लीं कोठें आहेत त्यांचा तपास लागत नाहीं. फक्त **रामजी** याचा वंशविस्तार झाला. रामजीचे पुत्र **केसो** व केसो यास **कान्हो** या नांवाचे पुत्र होते. दिव्याच्या पत्रांत उल्लेख केलेले हेच कान्हो केशव होत. कान्हो याचे नातू **आनंदराव** व आनंदरावास **धोंडोदेव** या नांवाचे पुत्र झाले. धोंडोदेवास **बाबूराव** या नांवाचे पुत्र होते. बाबूरावास **कृष्णराव** या नांवाचे पुत्र होते. ते हल्लीं हयात असून आपल्या **गणेश** नांवाच्या मुलाच्या, शिक्षणासाठीं पुण्यास येऊन राहिले आहेत.

## २. अधेले पानसे.

### ( बाबाजी लक्ष्मीधर यांचा वंश )

बाबाजींचे पुत्र **बापूजी** व बापूजीचा नातू **निंबाजी** होता. निंबाजीस दोन मुलगे होते, वडील **बापूजी** व धाकटा **बाबाजी**. बापूजीस **सखाराम** हा पुत्र होता. त्यास **चिंतोपंत, आत्माराम** व **राघोपंत** या नांवाचीं तीन मुलें झालीं. चिंतोपंतास **हरि, विठ्ठल** व **वामन** हे मुलगे होते. हरि यांच्या तीन मुलांपैकीं वडील **गोपाळराव** हे हयात असून पुणें येथें दस्तऐवज लिहिण्याचें व मुखत्यार वकिलाचें काम करीत असतात. त्यांनीं स्वतः पुण्यांत घर ( शुक्रवार पेठ घ. नं. ६१७ ) बांधलें असून त्यांतच ते राहात आहेत.

वामन चिंतामण यांचे वडील पुत्राचें नांव **विनोबा** हें होतें. विनोबास **धोंडोपंत, गणपती, गोविंद,** व **अनंत** अशीं चार मुलें झालीं. धोंडोपंत यांचें लग्न उमरेजकर जोशी यांची कन्या **गंगूबाई** हिचेबरोबर झालें. धोंडोपंत अल्पायुषी वारल्यामुळें गंगूबाईवर त्यांचे बालवयांतच वैधव्याचा घाला आला. उमरेजकर जोशी हे शिक्षणखात्यांत नोकर असल्यामुळें त्यांनीं गंगूबाईस वैधव्यदशा प्राप्त झाल्यावर शिक्षण देण्यास सुरुवात केली. गंगूबाई या चलाख-बुद्धीच्या होत्या या व्हरनाक्युलर फायनल परीक्षा पास झाल्याबरोबर ट्रेनिंग कॉलेजांत गेल्या. तेथें तीन वर्षें राहून त्यांनीं तिसऱ्या वर्षाचें सरटिफिकेट मिळविलें. हल्लीं त्या पुणें म्युनिसिपल मुलींची शाळा नं. ४ येथें हेडमास्तरीण आहेत.

विनोबाचे दुसरे पुत्र गणपतराव, यांस **मोरोपंत** व **बाबूराव** हे दोन पुत्र झाले. मोरोपंत अल्पायुषी झाले. त्यांची स्त्री **शांताबाई** यांनीं पुढें शिक्षण घेण्यास आरंभ केला. त्या हिंगणे येथील कर्वे महिला विद्यापीठांत राहून जी. ए. झाल्या. हल्लीं त्या शिक्षणखात्यांत नोकर आहेत.

आत्माराम सखाराम यांचे पुत्र **यशवंत** हे राम-उपासक होते. दिवें गांवांत यांनीं मंदिर बांधून त्यांत रामाच्या मूर्ति स्थापन करून रामजन्माचा उत्साह मोठ्या प्रमाणांत सुरू केला. तो अद्याप त्यांचे वंशज करीत आहेत. यशवंतरावास दोन मुलें झालीं, पैकीं वडील मुलगा **दत्तात्रय** हा पुणें येथें फरग्युसन कॉलेजमध्यें विद्यार्थी आहे; व धाकटा **कृष्णा** हा इंग्रजी शाळेंत शिकत आहे.

बाबाजी निंबाजी यास **अनंत** हा पुत्र होता. अनंत याचे नातू **सदाशिव** हे होत. सदाशिव यांस **निंबाजी** म्हणून एक पुत्र झाला. ते सबरजिस्टरचें कामावर होते. त्यांनीं नोकरी पुरी केल्यावर पेन्शन घेतलें. ते हल्लीं पुणें येथें राहात आहेत. या निंबाजीस **गजानन, विनायक** व **पांडुरंग** या नांवाचे तीन मुलगे आहेत. वडील गजानन हे मिलिटरी अकाउंट आफिसांत नोकर आहेत. दुसरे विनायक हे शिक्षकाचें काम करितात व धाकटे शिक्षण घेत आहेत.

## ३. रामाजी परशुराम यांचा वंश.

**रामाजीस तुकोबा** हा पुत्र झाला. तुकोबांस सात पुत्र झाले. पैकीं **नारोबा, विठोबा** यांचा मात्र वंश वाढला. बाकीच्या पांचांचा वंश संतति न झाल्यामुळें खुंटला.

नारोबास **रंगोबा** व **हरिपंत** असे पुत्र होते. रंगोबा हे शिरवळ गांवाजवळ आपले वतनाचें लोणी गांव येथें जाऊन राहिले. रंगोबा हे सातारकर महाराज यांचे दरबारांत सभासद होते. शिवाय वंदन किल्लयावर यांना पंचवीस स्वारांची असामी होती, ती त्यांचे पश्चात् त्यांचे चिरंजीव **रामाजी** यांस मिळाली. रामाजी यास **खंडोपंत, विठ्ठलपंत** व **रंगोपंत** अशीं तीन अपत्यें झालीं. खंडोपंताचे वंशांत हल्लीं **रघुनाथराव** हे एकटेच पुरुष हयात असून ते इंदुराकडे आहेत अशी माहिती मिळते. विठ्ठलपंतास पणतू दोन; वडील **रामचंद्र** हे हल्लीं रेव्हिन्यु खात्यांत कारकून असून, दुसरे **हरिपंत** तारखात्यांत नोकर आहेत. रंगोपंत यास पुत्र **रावजी** हा होता. त्यास **महादेव, सदाशिव, बाळकृष्ण** व **वामन** अशीं चार मुलें झालीं. महादेव यांस **विष्णु** व **गणेश** अशीं दोन मुलें झालीं. पैकीं विष्णु मयत असून त्याचे चिरंजीव **महादेव** हे अज्ञान आहेत. गणेश विष्णु हे हयात असून त्यांच्या तीन मुलांपैकीं वडील मुलगा **नारायण** हे इंजिनीअर खात्यांत ओव्हरसियर आहेत व बाकीचे दोन अज्ञान आहेत.

वामन रावजी हे हल्लीं हयात आहेत. दिवें गांवीं राहून तेथील कुळकरणाचें काम यांनीं बरेच दिवस केले. आतां ते आपले घरीं लोणीस राहून शेतीभातीची व्यवस्था पाहतात. यांना **दामोदर, केशव** व **विनायक** असे तीन पुत्र झाले. पैकीं दामोदर हे निराकॅनालवर इरिगेशन खात्यांत तारमास्तर आहेत.

नारोबाचे चिरंजीव हरीपंत हे दिवे येथें राहिले. यास **यादव** व **भगवंत** अशीं दोन मुलें होतीं. यादव यास **केशव, नारायण** व **भिकाजी** अशीं मुलें होतीं. केशव यांचे नातवाचे नांव **विठ्ठल** असें होतें. त्यास **बळवंत**राव या नांवांचे पुत्र होते. बळवंतराव यांनीं पुणें येथें येऊन व्यापार धंदा केला. त्यांत त्यांनीं चांगलेंच यश संपादिलें. यांनीं पुणें येथें ( शुक्रवार पेठ घ. नं. ८२ ) राहण्यासाठीं घर बांधलें. यास तीन पुत्र **यशवंत, नरहरी** व **वामन** या नांवाचे झाले. पैकीं वडील यशवंत सॅनिटरी इंजिनियरचे ऑफिसांत नोकर आहेत. दोघे धाकटे शिक्षण घेत आहेत.

नारायण यादव यास **बाळाजी** व त्यास **गणेश** या नांवांचे मुलगे होते. गणेश यास **बळवंत** हा मुलगा होता. बळवंत हे पुणें येथें तुळपुळे वकील यांचेकडे कारकून होते. त्यास दोन पुत्र झाले. वडील **सखाराम**पंत हे पुण्यास वैद्यकी करतात व धाकटे **महादेव** हे इंजिनिअर खात्यांत ऑफिसमध्यें क्लार्क आहेत.

भिकाजी यादव यास **सखाराम** व **गोविंद** असे दोन पुत्र झाले. सखारामपंतास **वामन, लक्ष्मण** व **बळवंत** असे तीन पुत्र झाले. वामनराव यास **सखाराम, लक्ष्मण** व **केशव** असे पुत्र झाले. सखारामपंतास **धोंडोपंत** व **रघुनाथ** अशीं दोन मुलें झालीं. धोंडोपंत हे पुणें ट्रेनिंग कॉलेजांत दोन वर्षें राहून त्या परीक्षेंत पास झाले. ते हल्लीं पुणें जिल्ह्यांत लोकल बोर्ड मराठी शाळेंत हेडमास्तरचें काम करितात. रघुनाथ हे पोलीस खात्यांत कारकून आहेत. केशव वामन हे हल्लीं इंदूर येथें तुकोजीराव होळकर यांच्या ज्येष्ठ मातेकडे खासगी कारभारी आहेत.

गोविंद भिकाजी यास **रामचंद्र** या नांवाचा मुलगा होता, तो पुण्यास गोसावी-पुऱ्यांत आनंदगीर यांचेकडे नोकर होता. यास पुत्र **शंकरराव** हे हल्लीं तळेगांव कोर्टांत कारकुनीचे कामावर आहेत.

भगवंत हरी यांचे वंशांतील पुरुषांपैकीं हल्लीं कोण हयात आहेत व काय करतात यांची माहिती मिळत नाहीं.

विठ्ठल तुकदेव यास **चिमणाजी, लखमाजी, मुकुंद, महादेव** व **निळोबा** असे पांच पुत्र होते. चिमणाजी यास **विसोबा** पुत्र होता. विसोबास चार पुत्र होते. पैकीं **विठ्ठला**शिवाय बाकी तिघांच्या विस्तारासंबंधानें माहिती लागत नाहीं. विठ्ठलास **गणेश** व गणेशास **मार्तंड** या नांवाचा पुत्र होता. मार्तंड हे ओव्हरसियरची परीक्षा पास झाले होते. हे पुण्याजवळील खडकवासलें तलावाचें काम सुरू असतां त्यावर नोकर होते. तें काम संपल्यावर इंजिनियरिंग कॉलेजांत सबओव्हरसियरचे क्लासावर त्यांची शिक्षक म्हणून नेमणूक झाली. तेथेंच नोकरी पूर्ण करून त्यांनीं पेन-शन् घेतलें. यास **कृष्णराव** या नांवाचे पुत्र होते. ते बी. ए. झाल्यावर रेव्हिन्यु खात्यांत नोकर झाले. त्यांनीं पंढरपूर येथें कांहीं दिवस ॲक्टिंग मामलेदारीचें काम केलें. पुढें बार्शी येथें असतां त्यास अकालीं मृत्यु आला. त्यास **रामचंद्र, भगवान** व **प्रभाकर** अशीं तीन मुलें झालीं. रामचंद्र हे हल्लीं पुणें येथें इंजिनीयर खात्यांत ओव्हर-सियर आहेत. भगवंतराव वकिलीचे परीक्षेंत पास होऊन नाशिक येथें वकिली करीत आहेत. प्रभाकर हे शिक्षण घेत आहेत.

मुकुंद विठ्ठल—मुकुंदरावानें आपलें शेवटचें आयुष्य चतुर्थाश्रमांत घालविलें. त्यांस **मल्हार** हा मुलगा होता. मल्हारीस पुढें **सखाराम, लक्ष्मण,** व **जयराम** अशीं तीन मुलें झालीं सखाराम यांनीं मृत्युसमयीं संन्यास धारण केला होता. लक्ष्मण यास **गंगाधर** व **रंगोपंत** अशीं दोन मुलें झालीं. गंगाधर हे रेव्हेन्यु खात्यांत कारकुनीचे जागेपासून चढत चढत मामलदारीचे हुद्यावर चढले. नोकरी संपल्यावर त्यांनीं पेनशन् घेतलें. यास **बाळकृष्ण, नारायण** व **दत्तात्रय** अशीं तीन मुलें झालीं. बाळकृष्ण व नारायण हे दोघे बंधु सर्व्हे खात्यांत मोजणीदार होते. दत्तात्रय हे हल्लीं पुणें जिल्ह्यांत सरकल इन्स्पेक्टरचे कामावर आहेत. यास मुलें दोन; पैकीं वडील मुलगा **गोविंद**

हा होय. यांची ओव्हरसियरची परीक्षा पास झाली असून हल्लीं ते निराकॅनॉलवर ओव्हरसीयर आहेत.

रंगनाथ लक्ष्मण यांनीं बरींच वर्षें सोनोरी गांवचे कुलकर्ण्याचें काम केलें. नंतर ते पुणें येथें येऊन राहिले. पुण्यास असतांना जिल्ह्यांतील आफू कंत्राटदाराकडे ते म्यानेजरचें काम करीत होते, त्यांस **विष्णु, केशव,** व **दामोदर** अशीं तीन मुलें झालीं. विष्णु हे सर्व्हे खात्यांत मोजणीदार होते. नोकरी पूर्ण झाल्यावर त्यांनीं पेनशन घेतलें. यांना मुलें तीन. पैकीं वडील मुलगा **विनायक** हा हल्लीं रेलवेकडे नोकर आहे. रंगोपंतांचे दुसरे पुत्र केशव हे सबओव्हरसियरची परीक्षा इ. स. १८९१ सालीं पास होऊन त्यांचा नंबर गॅरंटीड जागेमध्यें आल्यावर त्यांची नेमणूक इंजिनियर खात्यांत खानदेश-जिल्ह्यांत झाली. त्याच जिल्ह्यांत त्यांनीं तेहतीस वर्षें नोकरी करून इ. स. १९२४ सालीं पेनशन घेतलें. हल्लीं ते पुण्यास आपले घरीं ( शुक्रवार पेठ ३५५ ) रहात आहेत. हे फार मेहनती असल्यामुळें यांचीं सरकारी कामें उत्तम प्रतीचीं, कमी खर्चांत व मुदतींत होत असत; म्हणून वेळोवेळीं यांची शिफारस त्यांचे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून होत असे. हे इ. स- १९१४ सालीं ओव्हरसियर झाले. यांना इ. स. १९१८ सालीं " रावसाहेब " हा किताब मिळाला. पुढें १९२१ सालीं हे असिस्टंट इंजिनियर झाले. व इ. स. १९२३ सालीं यांना ' रावबहादूर ' हा बहुमानाचा किताब सरकारांतून मिळाला. प्रस्तुत ग्रंथाचे संपादक केशव रंगनाथ ते हेच होत. यांस एक पुत्र **सदाशिव** या नांवाचे आहेत. त्यांची B. Sc. ची परीक्षा पास झाली असून हल्लीं ते इन्कमटॅक्स ऑफिसमध्यें नोकर आहे. ह्या ग्रंथांतलि स्थलविषयक चित्रांचे फोटो यांनींच घेतले आहेत. पानसे फयामिलींत हेच पहिले B. Sc. होत. दामोदर रंगनाथ हे स्कूल फायनलची परीक्षा पास झाल्यावर मुंबईत राहून, ज्युबिली टेकनिकल स्कूल येथें शिक्षण घेऊन L. M. E. झाले. हेच पानसे घराण्यांत पहिले L. M. E होत. हे सी. पी. मध्यें असतांना प्लेग होऊन अकालीं मृत्यूचे दाढेंत सांपडले. यास **अनंत** या नांवाचे चिरंजीव असून यांनीं इंजिनियरिंग कालेजांत शिक्षण घेऊन मेकॅनिकल व इलेक्ट्रिकल इंजिनियरिंगचे डिप्लोमे मिळविले आहेत.

जयराम मल्हार यास **आप्पा** या नांवानें लोक ओळखीत असत. इंग्रजी अमलाचे सुरवातीस ज्या वेळीं वकिलीची परीक्षा निघाली त्या पहिल्याचें वर्षीं हे त्या परीक्षेंत पास झाले होते. हे पुण्यास राहून वकिली करीत असत. यांनीं वकिलीचे धंद्यांत उत्तम प्रकारें यश संपादन करून नांव मिळविलें. यास पुत्रसंतति झाली नाहीं.

महादेव विठ्ठल यास **शामराव, गोपाळ** व **भुजंग** असे तीन पुत्र झाले. पैकीं गोपाळ व भुजंग यांचे वंशांतील पुरुषांनीं काय कामें केलीं व हल्लीं हयात असलेले पुरुष कोठें आहेत याचा तपास लागत नाहीं. शामराव यास **गजोबा** या नांवाचे पुत्र

होते. गजोबाचे कनिष्ठ चिरंजीव नारायण हे ट्रेनिंग कॉलेजांत दुसरे वर्षाचे परीक्षेत पास होऊन पुणें जिल्ह्यांत लोकल बोर्ड मराठी शाळेंत हेडमास्तरचें काम करीत होते. नोकरींत असतांना त्यांचा अंत झाला. यांस **महिपत** या नांवाचे एक मुलगे असून ते हल्लीं नाशिक जिल्ह्यांत रेव्हेन्यु खात्यांत सरकल इन्स्पेक्टर आहेत.

निळो विठ्ठल यांनींच सोनोरी येथील प्रसिद्ध असलेलें मुरलीधराचें देवालय बांधिलें. यास **सदोबा, आनंदराव, राघोबा. मोरोपंत** व **रामाजी** अशीं पांच अपत्यें झालीं. सदोबा हे पुण्यांत मराठे शाहींत तोफखान्याकडे नोकर होते. हे पानपतच्या लढाईंत गेले असतां गोळी लागून तेथेंच त्यांचा अंत झाला. रणांगणीं मृत्यु आल्यास साधुपुरुषाप्रमाणें त्यास सद्‌गति मिळते असें शास्त्रवचन आहे. सबब दररोज अर्ध्या भाकरीचा नैवेद्य सदोबास समर्पण करण्याची वहिवाट या घराण्याचे वंशांत असून ती अद्याप नियमानें पाळली जात आहे.

राघोबा निळकंठ यास **विष्णोपंत, तुकोपंत** व **श्रीपती** अशीं तीन मुलें झालीं, पैकीं विष्णुपंत यांचा वंशवृक्ष पुढें चालू राहिला. विष्णुपंतास **दामोदर, गणेश, राजाराम** व **बाळकृष्ण** असे चार पुत्र झाले. दामोदर यांचे वंशज मोरगांवाजवळ लोणी ( भापकर ) व बाळकृष्ण ह्यांचे शिरवळ जवळ भोळी गांवीं घरें बांधून शेतीभाती मिळवून स्थाईक झाले. दामोदर विष्णु ह्यांस **भगवंत** या नांवाचा मुलगा होता. भगवंतास **दामोदर** (तात्या) व **सखाराम** अशीं दोन मुलें झालीं. दामोदर हे हयात असून चिंचवड येथें देवस्थानाकडे नोकर आहेत. दामोदर यास दोन मुलें पैकीं वडील मुलगा **गणेश** दापोडी येथें व कनिष्ठ **सखाराम** पोलीस खात्यांत नोकर आहेत. बाळकृष्ण विष्णु यांस **गणेश** नांवाचा मुलगा होता. गणेशास दोन मुलें झालीं. पैकीं वडील **शंकर** रेलवेकडे नोकर आहेत व **पंढरीनाथ** घरींच राहून शेतोवाडीच्या उत्पन्नाची देखरेख करितात.

**नारो निळकंठ** यास माधवराव नांवाचे पुत्र होते. माधवरावास **गोपाळराव, वासुदेवराव, पांडोबा, राघोबा,** व **रामराव** या नांवाचे पांच पुत्र झाले.

गोपाळराव सोनोरीस सावकारी धंदा करीत असत. यांचा स्वभाव सात्विक व भोळसर असल्यामुळें यांच्या कुळांनीं यांस थापा मारून रकमेच्या फेडीची मुदत पूर्ण जाहल्यावर फिरून मुदत मागावी व यांनीं कायद्याचा विचार न करतां भरवंसा ठेवून कुळांना तोंडी मुदत द्यावी. या व्यवहाराचा परिणाम साहजिकच त्यांचे हयातीअखेर कागदोपत्रीं भरभराटीचा दिसून आला. परंतु सर्व रकम कायद्याबाहेर गेली असल्यामुळें बुडाली. लबाड लोकांनीं अशा रीतीनें त्यांच्या भोळसर स्वभावाचा फायदा घेऊन त्यांना बुडविलें. अशा रीतीनें या सावकारी धंद्यांत सर्वस्वीं बुडून शिवाय वडिलार्जित हीं थोडें-बहुत जवळ होतें तेंही गेलें. यास **कोंडोपंत** म्हणून पुत्र झाले, व कोंडोपंतास

**सावळारामपंत** पुत्र झाले. सावळारामपंत हे आपले वयाचे नववे वर्षींच पितृसुखास आंचवले; यामुळें यांच्या शिक्षणाचा सर्वस्वीं भार यांच्या मातोश्रीवर पडला. ती आपल्या मुलास घेऊन पुण्यास येऊन राहिली. आपल्या पूर्वजांच्या राहिलेल्या तुटपुंज्या उत्पन्नांत ( वर्षास सुमारें शेंदीडशें रु. ) मोठ्या कष्टानें व एक वेळ उपाशी राहून मुलास शिक्षण देण्याचें पवित्र काम ती करूं लागली. सावळारामपंतास त्यांच्या अल्प वयांतच या हलाखीच्या स्थितीची जाणीव झाली. म्हणून त्यांनीं इंग्रजी शिक्षण मॅट्रिकपर्यंत घेतल्यानंतर ते इंजिनियर कालेजांत सबओव्हरसियर क्लासांत गेले. त्यांत यशस्वी होऊन पुढें ते सरकारी नोकरींत शिरले. मोठ्या मेहनतीनें, नेटानें व कष्टांनीं यांनीं काम करून नोकरींत यश संपादन केलें. कल्याण–भिवंडी रस्त्यावरील मोठा लोखंडी पूल, पुणें, जुन्नर रस्त्यावरील काळंबचा पूल, पुणें सोलापूर रस्त्यावरील डाळजचा पूल आणि पुणें व भांबुरडें यास जोडणारा मुठा नदीवरील लाइड ब्रिज ( शेकसल्ला पूल ) हे यांचे देखरेखीखालींच पूर्ण झाले. पुलांवर लाविलेल्या शिलालेखांत यांचें नांव वाचकांस आढळून येईल व त्यावरून यांचे कर्तबगारीची कल्पना सहज करतां येईल. वरील पुलाशिवाय पुणें येथें लक्ष्मीरोडवर नवीन बांधलेले सिटी पोस्टऑफिस व भांबुरडें येथील कोर्टाच्या इमारती, या इंग्रजी अमदानींत आजपर्यंत पुण्यास बांधलेल्या सरकारी इमारतींत बऱ्याच उच्च दर्जाच्या असून त्या सावळारामपंत यांच्याच देखरेखीखालीं बांधल्या गेल्या आहेत. हे इ. स. १९१४ सालीं ओव्हरसीयर झाले व इ. स. १९२६ सालीं असिस्टंट इंजिनियर झाले. हे नुकतेच वारले. त्यांनीं पुणें येथें रास्ता पेठेंत स्वतांचे राहणेसाठीं घर नं. २४२ बांधलें आहे. हे फार पापभीरु असून मित्रांचे चाहते होते. यांची इच्छा प्रत्येकाच्या उपयोगीं पडावें अशी होती. स्वतां झीज सोसून ते निरलसपणें लोकांच्या उपयोगीं पडत असत. यांचें समाजांत यामुळें चांगलें वजन होतें.

वासुदेव माधव यास वासुदेव घमेंडी या नांवानें लोक ओळखीत होते. यांनीं आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात चतुर्थाश्रम धारण केला होता. यास पांच पुत्र. **हरी, बळवंत, विठ्ठल, त्र्यंबक** व **केशव** असे होते. विठ्ठल हे बडोद्यास अप्पासाहेब रोडे यांचेकडे खासगी कारभारी होते. केशवराव हे सोनोरीस राहात असत. यास **यशवंत** व **भास्कर** असे दोन पुत्र झाले. यशवंत हे कुलाबा जिल्ह्यांत रेंजफारेस्ट ऑफिसर आहेत. भास्कर हे वडिलार्जित इस्टेटीची देखरेख करीत असतात.

**राघोबा** व **रामराव** हे मोरो नीळकंठ यांचे कनिष्ठ पुत्र होत. हे आपल्या वयाच्या अनुक्रमें १८ व १२ या वर्षीं घरांतील माणसांशीं न पटल्यामुळें स्वतःचे पायावर उभें राहून स्वावलंबनानें कर्तबगारी करून पुढें यावें या हेतूनें सोनोरी गांव सोडून फिरत फिरत वैराग येथें गेले. मधुकरी मागून तेथें हे आपला चरितार्थ चालवीत असत. वैराग हा गांव पेशव्यांचा असल्यामुळें तेथें मराठीराज्यांत या काळीं

महालकरी हा मुख्य अधिकारी असे. हीं दोन्ही मुलें मधुकरी मागत असतां तेथील महालकरी यांनीं त्यांची हुशारी व चलाखपणा पाहून त्यांची चौकशी केली व आपले घरींच त्यांना ठेवून घेतलें. यामुळें चरितार्थाची त्यांस पुढें काळजी राहिली नाहीं. पुढें दोघांचीं लग्नें हि महालकरी यांनींच करून दिलीं. महालकऱ्याची नोकरी त्यावेळीं वंशपरंपरेनें चालणारी होती. त्या महालकऱ्यास पुत्रसंतति नसल्यामुळें त्यांनीं वृद्धपणीं आपली जागा राघोबास दिली. राघोबा महालकऱ्याचें काम करीत असतां त्यांचा अकालीं अंत झाला. राघोबा वारल्यानंतर रामराव यांचा सर्वस्वीं आधार तुटला म्हणून ते आपलें सर्व कुटुंब बरोबर घेऊन आपले सासुरवाडीस गेले व मेहुण्याचे ओळखीनें बीड जिल्ह्यांत नगदी कारकुनाची नोकरी त्यांनीं मिळविली. यास **विष्णुपंत**, ( दाजीसाहेब ) **शंकरराव**, **कृष्णराव** व **व्यंकटराव** असे चार पुत्र झाले. विष्णुपंत यांनीं मोगलाईंत चोवीस वर्षें तहशील कचेरींत चिटणिशीचें काम केलें; पुढें त्यांची हुशारी पाहून नबाब वजिरोद्दवला यांचे जहागिरीवर त्यांची नेमणूक झाली. तेथून पुढें राजा दुर्गाप्रसाद यांचे जहागिरीवर नायब महालकऱ्याची जागा यांना मिळाली. आयुष्याच्या उतारवयांत यांनीं नोकरीची यातायात कमी करून सोलापूर जिल्ह्यांतील माढे तालुक्यांत म्हैसगांवीं येऊन कायमचें वास्तव्य केलें. हे शके १७४० त वारले. यांस **रघुनाथ** या नांवाचा मुलगा आहे. हे माझलगांव जिल्हा बीड येथें जमावंदी कारकून आहेत. यास पुत्र **नारायणराव** हे फर्ग्युसन कॉलेजमध्यें B. A. क्लासमध्य आहेत. द्वितीय पूत्र **शंकरराव** यांनीं तहशील कचेरींत पंधरा वर्षें नोकरी केल्यावर त्यांची नेमणूक बशरूद्दालाचे इलाख्यांत पोलीस सबइन्स्पेक्टरचे कामावर झाली. तेथेंच त्यांनीं पेनशन घेतलें. हे शके १८३९त वारले. यांस तीन मुलें **देवीदास भवानराव** व **दुर्गादास**. देवीदास हे हल्लीं मोमिताबाद येथें फॉरेष्ट सबइन्स्पेक्टरेच हुद्यावर आहेत. दुर्गादास यांचें वय हल्लीं १७ वर्षांचें आहे. यांना लहानवयांतच उपरति झाल्यामुळें यांनीं सर्वसंगपरित्याग करून हे हल्लीं चारवर्षांपासून औरंगाबादेस अमृतेश्वराचे देवालयांत अयाचित् वृत्तीनें राहून व गायत्री पुरश्चरणाचें अनुष्ठान करीत आहेत.

रामरावाचे तृतीय पुत्र कृष्णराव हे पहिल्यानें मोंगलाईंत नगदी कारकून होते. पुढें वकिलीचा अभ्यास करून त्या परीक्षेंत पास झाल्यावर ते हैदराबाद व चिटगोपा येथें वकिली करूं लागले. वकिलींत यांनीं चांगला नांवलौकिक मिळविला. हे शके १८४० सालीं वारले. यांची संतती वांचली नाहीं, म्हणून आपला पुतण्या त्र्यंबक यास यांनीं दत्तक घेतलें. त्र्यंबकराव रामराव हे पहिल्यानें औरंगाबाद म्युनिसिपालिटींत कारकुनीचे कामावर लागले. ते पायगा इलाख्यांत, राजा दर्गाप्रसाद यांचे जहागिरीवर नायब दिवाण झाले, व या ठिकाणीं त्यांनीं वीस वर्षें नोकरी केली. या नोकरीवर असतांना त्यांनीं मव्यारपल्ली येथें बरीच जमीन खरेदी केली नंतर उतारवयांत म्हैसगांवीं येऊन राहिले. म्हैसगांवीं यांनीं पुष्कळ जमीन-जुमला मिळविला व तेथेंच घर बांधून ते स्थाईक झाले. हे कोऑपरेटिव्ह

सोसायटीचे ऑर्गनायझर होते. मोठ्या मेहनतीनें यांनीं पुष्कळ नवीन सोसायटया स्थापन केल्या. यांचें समाजावर चांगलें वजन होतें. हे ब्राह्मणवर्गातील पुढारी म्हणून सत्यशोधकी लोकांचे डोळ्यांत खुपूं लागले. पुढें त्याचें पर्यवसान यांचेवर खुनाचा आरोप येऊन न्यायासनासमोर यांना आरोपी म्हणून उभे राहण्याचा प्रसंग आला. " सत्यमेव जयते । " या न्यायानें पुढें हे निर्दोषी होऊन सुटले. पुढें हे औरंगाबादेस कांहीं कारणानिमित्त गेलें असतां शके १८४९ सालीं आपले वयाचे ६८ वे वर्षी वारले. यांस **रंगराव, माधवराव,** व **त्र्यंबकराव** अशीं तीन अपत्यें झालीं.

रंगराव हे कुर्डुवाडी स्टेशनवर हल्लीं कोचिंग क्लार्क आहेत व त्र्यंबकराव कन्नड तालुक्यांत मेझरिंग इन्स्पेक्टर आहेत.

## ४. विसाजी परशराम यांचा वंश.

विसाजी यास **१ त्र्यंबक, २ मोरो, ३ माणके, ४ गोविंद व ५ उद्धव** असे पांच पुत्र झाले.

१ वडील पुत्र त्र्यंबक यांस संतति झाली नाहीं, म्हणून त्यांनीं दत्तक घेऊन त्याचें नांव **शामजी** असें ठेविलें. शामजीस **जगजीवन** व जगजीवनास **शामजी** व **मल्हारी** असे दोन पुत्र होते. शामजी जगजीवन यास आन्या म्हणत. मल्हारी हे मलबा या नांवानें प्रसिद्ध झाले. हे शूर, लढवय्ये व मोठे मुत्सद्दी होते. हे पेशव्यांचे सन्निध नेहमीं असत व पेशवे त्यांची सल्लामसलत घेत असत. यांनीं बरेच वेळां पेशवाईत सैन्य घेऊन शत्रूशीं सामना देऊन मर्दुमकीचीं कामें केलीं आहेत; त्यांचीं वर्णनें प्रसंगानुरोधानें मागें आलेलीं आहेत. यांनीं सोनोरीस राहण्यासाठीं एक वाडा बांधला. तो हल्लीं अन्याचा वाडा या नांवानें प्रसिद्ध आहे. अन्याचे नातू **मल्हारपंत** यास **भगवंत** व **विनायक** हीं दोन मुलें झालीं. भगवंत हे बडोदें संस्थानमध्यें मोठ्या हुद्यावर नोकर होते. तेथें त्यांनीं बरीच संपत्ति मिळविली व ते आपल्या वृद्धापकाळीं मातृभूमि सोनोरी येथें येऊन राहिले. तेथेंच त्यांचा अंत झाला. त्यांस **दत्तात्रय, अनंत** व **रघुनाथ** असे तीन पुत्र होते. दत्तात्रय ऊर्फ सोनोपंत हे हयात असून त्यांचा एकुलता एक मुलगा **श्रीकृष्ण** गेल्या सालीं मॅट्रिकचे परीक्षेंत पास झाला आहे. दुसरे **अनंत** ( तान्होपंत ) हे पुण्यास राहात असून सावकारी लिहिणें, टिपणें वगैरे कामें करतात. तिसरे **रघुनाथ** हे मयत असून त्यांचे चिरंजीव **शंभोराव** रेल्वेकडे मुंबईस नोकर आहेत.

विनायक मल्हार यांचा वंश हल्लीं कोठें नांदत आहे त्याबद्दल माहिती मिळत नाहीं.

जगजीवन यांचे दुसरे पुत्र मल्हारी, यास **विठ्ठल** व विठ्ठल यास **शामराव, गणेश** व **दाजी** असे तीन पुत्र झाले. शामरावास **आत्माराम** व **पांडुरंग** असे पुत्र झाले. आत्मारामास **केशव** व **नारायण** हे पुत्र झाले. केशवराव यांचें लग्न पांडुरंग शामराव भडभडे यांचे कन्येशीं झालें. भडभडे यांस पुत्रसंतति नव्हती, एकच कन्या

होती, सबब त्यांनीं आपलें घर ( बुधवार पेठ घ. नं. २४ ) व इस्टेट जांवई यांस आंदण दिली. पांडुरंगपंत भडभडे हे वारकरी सांप्रदायिक होते. त्यांनीं आपले घरीं श्री. विठ्ठलाची मूर्ति स्थापन केली आहे. पुण्यास वारकरी सांप्रदायांत जी प्रमुख मंडळी होती त्यांत हे एक होते. यानंतर केशवराव यांनीं सोनोरीचे वडिलोपार्जित उत्पन्नावरचा आपला हक्क सोडून दिला व ते पुण्यास येऊन राहिले. यास **विठ्ठल** या नांवाचा पुत्र झाला. विठ्ठल याचें लक्ष लहानपणापासून शरीरसंपत्ति वाढविण्याकडे होतें. पुण्यांतील शाळेमध्यें अगदीं सुरुवातीस जो मिलिटरी सिस्टिमवर ड्रिल-क्लास सुरू झाला त्यांत यांनीं अग्रभागीं राहून बिग्युलरचें काम केलें. यांचें शिक्षण फरग्युसन कॉलेजमध्यें झालें. हे इ स. १९१३ त B. A , १९१५ M. A. व १९२१ सालीं S. T. C. D. चे परीक्षेंत पास झाले, पानसे घराण्यांतील हे पहिलेच M. A. S. T. C. D. होत. हल्लीं हे ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन पुणें येथें शिक्षकाचें काम करीत आहेत. गतवर्षीं मुंबई सरकारनें शरीरशिक्षणाचे बाबतींत सुधारणा करण्याकरितां कमेटी नेमली होती त्या कमेटीवर सेक्रेटरी म्हणून यांची नेमणूक झाली होती.

नारायण आत्माराम यास **मोरेश्वर** या नांवाचा मुलगा होता. त्यास **हेरंब, रामचंद्र** व **दामोदर** अशीं तीन मुलें झालीं, तीं आज हयात आहेत. हेरंब हे पुणें येथें म्युनिसिपल स्कूलमध्यें मास्तर आहेत व रामचंद्र हे दवाखान्यांत कंपाऊंडरचें काम करीत आहेत.

शामरावाचे दुसरे पुत्र पांडुरंग हे सावकारी करीत असत. सोनोरी गांवापासून दोन मैलांवर असलेल्या भवानी देवीचें नित्य नियमानें दर्शन घेण्याचा क्रम यांनीं आपल्या हयातीपर्यंत कोणत्याहि अडचणीस न जुमानतां सिद्धीस नेला. यांस पुत्र तीन, **विष्णु, वासुदेव** व **कृष्णाजी**. विष्णु हे सबरजिष्टर होते. नोकरी पूर्ण करून त्यांनीं पेनशन घेतलें होतें. हे नुकतेच मरण पावले. यास पुत्र तीन **विनायक, नरहरि** व **प्रल्हाद**. पैकीं विनायक हे रेव्हेन्युखात्यांत नोकर आहेत. वासुदेव यांचे पुत्र **शंकर** हे इंजिनीयर खात्यांत मिस्त्री आहेत. कृष्णाजी पांडुरंग हे पुणें येथें श्री शिवाजी मराठा हायस्कूल या संस्थेमध्यें शिक्षक आहेत.

गणेश विठ्ठल यास **धोंडोपंत, भगवंत, गोपाळ, खंडेराव** व **सखाराम** असे पांच पुत्र झाले. वडील पुत्र धोंडोपंत यांनीं सुमारें चाळीस वर्षे सोनोरी गांवचें कुळकरण केलें. हे फार हुशार व धाडशी असून त्याकाळीं पुरंदर तालुक्यांतील सर्व कुळकर्णी लोकांत प्रसिद्ध होते. यांस पुत्र न झाल्यामुळें यांचे मागें यांचे विधवेनें यांचा पुतण्या **मार्तंड** यास दत्तक घेतलें. मार्तंड हे पुणें येथील प्रसिद्ध नगरकर वकील यांचेकडे कारकून होते. तेथें नोकर असतांना त्यास रेसेसचा नाद लागला. रेसेसमध्यें यांनीं हजारों रुपये मिळविले. जुगारींत बहुधा कोणीच श्रीमंत होत नाहीं, या न्यायानें मिळविलेलें सर्व यांनी घालविलें. इतकेंच नाहीं, तर वडिलोपार्जित



श्री. यशवंत केशव पानसे.
रे. फा. आफिसर.



श्री. रघुनाथ विष्णु पानसे.
माजलगांव ( मोगलाई

इष्टेटीवर हि या व्यसनाचा परिणाम झाला. ते आज हयात असून त्यांचे चिरंजीव **यशवंत** हे हल्लीं पुण्यांत दिवाणी कोर्टांत कारकुनाचें काम करीत असतात.

गणेश विठ्ठलांचे द्वितीय चिरंजीव **भगवंत** हे होत. यांचे वडील पुत्र **वामनराव** होत. वामनरावास **भालचंद्र** या नांवाचे मुलगे असून ते हल्लीं टाटा हायड्रो इलेक्ट्रिक कंपनींत नोकर आहेत. कनिष्ठ **नागेश** हे कुलाबा जिल्ह्यांत लोकलबोर्डमध्यें ओव्हरसियरचें काम करतात.

**खंडेराव** गणेश यांचें लग्न न झाल्यामुळें यांचा जन्म अविवाहित स्थितींत गेला. यास पोहण्याचा व पाण्यांत बुडी मारण्याचा फार नाद होता. त्यांतच त्यांनीं प्रावीण्य मिळविलें होतें. यांचे या कामांतील प्रयोग गांवांत नेहमीं होत असत. यांनीं एक वेळ पाण्यांत बुडी मारली म्हणजे वरचें पाणी स्थिर झाल्यानंतर बराच वेळपर्यंत हे वर येत नसत. प्रेक्षकांचीं मनें, हे कोठें विहीरीच्या कपारींत अडकून राहिले कीं काय या शंकेनें अस्थिर होत असत. नंतर हळूच एका कोपऱ्यांत आपलें डोकें पाण्यांतून वर काढतांना हे दिसत. यांचें पोहण्यांतील कौशल्य पाहिलेलें बरेच लोक अद्यापि सोनोरी गांवीं हयात आहेत.

सर्वांत कनिष्ठ पुत्र **सखाराम** गणेश यास तीन पुत्र झाले. **गोविंद**, **लक्ष्मण** व **दिनकर**. गोविंद हे पुण्यांत सिटीम्युनिसिपालिटींत नोकर आहेत. लक्ष्मण यांस त्यांचे चुलते गोपाळराव यांचे मांडीवर दत्तक दिलें होतें परंतु पुढें ते मयत झाले.

२ मोरो विसाजी--यांचे नातु **केशवबाबा** हे परम ईश्वरभक्त होते. यांचें नांव संतनामावळींत आलें आहे. खंडोपंतांनीं 'शिवसुत' नांव धारण करून स्फुट काव्यें केलीं आहेत, त्यांपैकीं उपलब्ध असलेला भाग आम्हीं नुकताच प्रकाशित केला आहे. या काव्यांत त्यांनीं ज्या केशवबाबास गुरुस्थानीं मानून वंदन केलें तेच हे होत. केशवबाबास तीन पुत्र झाले. पैकीं दोघांचा वंश नष्ट झाला. मधील चिरंजीव **वासुदेव**, यास **मोरो** व **भगवंत** असे दोन पुत्र झाले. मोरोपंताचे पुत्र **गोविंद** हे होत. त्यांस **वासुदेव** व **कृष्ण** असे दोन मुलगे होते. कृष्ण यास **बाळाजी** व **राघोपंत** हे मुलगे होते. बाळाजीस **केशव** व **दाजिबा** हे पुत्र झाले. केशव यांचे नातू **भगवान गुंडो** हल्लीं बार्शी येथें लोकमान्य मिलमध्यें कॅशर आहेत. तेथेंच त्यांनीं घरदार करून कायमची वस्ति केली आहे. दाजिबा यास पानगांव येथील पानसे घराण्यांत दत्तक दिलें. भगवंत वासुदेव यांचा वडील पुत्र **नारायण** यांचा वंश हल्लीं कोठें आहे याचा तपास लागत नाहीं. सर्वांत धाकटे **केशवराव** नारायण होत. यांस **देवराव** आणि देवरावास **रंगोपंत** व **गंगाधर** असे दोन पुत्र झाले. रंगोपंतांचे पुत्र **बळवंतराव** हे हल्लीं सोलापूर जिल्ह्यांत माळशिरस तालुक्यांत मिरगव्हाण गांवीं तलाठ्याचें काम करीत आहेत. तेथेंच त्यांनीं घर बांधून व कांहीं जमीन जुमला खरेदी करून कायम वस्ति केली आहे.

२ माणको विसाजी—यास **शिवाजी, लक्ष्मण ऊर्फ शिवदेव, शामजी, सखाजी, अनंत, संभाजी, संकाजी** आणि **सावाजी** असे सात पुत्र झाले.

शिवाजी यांच्या वंशाचा विस्तार पानगांवीं झाला. हेच शिवाजी, शाहुमहाराज दिल्लींत औरंगजेबाचे कैदेंत असतां, त्यांच्याजवळ त्यांचे सेवेंत होते. यास **खंडो** या नांवाचा मुलगा होता. हाच शिवसुत काव्याचा कर्ता होय. यास संतति न झाल्यामुळें त्यांनीं शके १७१८ आधिक आश्विन व॥१३ गुरुवारीं दत्तक घेतला व त्याचें नांव **शिवाजी** असें ठेविलें. या शिवाजीचा नातू **खंडोपंत** यास **कृष्णराव, शिवराव** व **मैराळ** असे तीन पुत्र झाले. ते पुढें विभक्त होऊन तिघांनीं राहण्यास पानगांव येथें निरनिराळे तीन वाडे बांधले. याच तीन वाड्यांत सांप्रत पानशांचा वंश नांदत आहे. ते सर्व पुरुष आपल्या वडिलार्जित इष्टेटीची व्यवस्था पाहत आहेत.

लक्ष्मण ऊर्फ शिवदेव यास **माधवराव, यशवंतराव, महिपतराव, रामचंद्रराव** व **केशवराव** असे पांच पुत्र झाले. वडील पुत्र माधवराव यास संतति झाली नाहीं म्हणून त्यांनीं दत्तक घेऊन त्याचें नांव **कृष्णराव** असें ठेविलें. कृष्णरावास **माधवराव** व **श्रीपतराव** असे दोन पुत्र होते. माधवराव हे पेशवाई-अखेरचे धामधुमींत महाराष्ट्रांत राहाणें हितकर नाहीं म्हणून काशीक्षेत्रांत जाऊन राहिले व तेथेंच त्यांचा इ. स. १८२० साली अंत जाहला. माधवरावास **कृष्णराव त्र्यंबकराव** व **दामोदरराव** असे तीन पुत्र झाले. कृष्णराव माधव यास तीन पुत्र होते. **बापूराव, नारायणराव** व **गजाननराव** हे ते होत. पेशवाईअखेर पानशांच्या सरंजामाचें उत्पन्न ब्रिटिश सरकारनें जप्त करून त्याऐवजीं पोलिटिकल पेनशन दिलें. तें वरील तिन्ही भावांचे हयातीपर्यंत चालू होतें. बापूराव कृष्ण यांचे बंधु नारायणराव यास गोपाळराव जयवंत यांचे मांडीवर दत्तक दिलें. कनिष्ठ बंधु गजाननराव यास संतति न झाल्यामुळें त्यांनीं गोविंदराव बापूराव यांचे पुत्र **वामनराव** यास दत्तक घेतलें. हे वामनराव हल्लीं सोनवरीस राहतात.

बापूराव कृष्ण यांचें नांव सरदारपटांत तिसरे क्लासांत दाखल होतें. बापूराव यास सहा पुत्र झाले. **केशवराव, गोविंदराव, बाळकृष्णराव, शिवराम, शंकरराव** व **गंगाधरराव**. बापूरावाचे मागें त्यांचे वडील पुत्र केशवराव यांचें नांव सरदारपटांत दाखल होतें, त्यांचेपश्चात् त्यांचे जागीं त्यांचे बंधु गोविंदराव यांचें नांव दाखल झालें. गोविंदराव नुकतेच वारले. सरदारपटांत त्यांचे पश्चात् अद्याप कोणाचेंही नांव दाखल झालें नाहीं. गोविंदरावाचे पुत्र **रामराव** हे हल्लीं इनकम् टॅक्स ऑफिसमध्यें नोकर आहेत. त्यांनीं आपलें नांव सरदार-पटांत दाखल होण्याचा प्रयत्न करावा. बाळकृष्ण बापूराव यास दोन पुत्र झाले. वडील **उमाकांत** यांनीं मरेपर्यंत कडकडीत ब्रह्मचर्यव्रत आचरिलें. दुसरे **चिंतामण** बाळकृष्ण, हे हल्लीं पूर्वखानदेशांत जळगांवीं एक्झिक्युटिव्ह इंजिनीयरचे आफिसांत हेडक्लार्क आहेत. शिवराम बापूराव

यास चार पुत्र, वडील **मोरोपंत** हे नुकतेच वारले. ते रेव्हेन्यु खात्यांत नोकर होते. त्यांचे वडील चिरंजीव **दामोदर** पुणें येथें पोस्टांत नोकर आहेत. **अनंतराव** शिवराम हे सातारा जिल्ह्यांत इंजिनीयर खात्यांत ओव्हरसियर आहेत. **विश्वनाथ** शिवराम हे रेव्हेन्यू खात्यांत नोकर आहेत. **दत्तात्रय** शिवराम हे नासिक जिल्ह्यांत सबरजिष्टरचे कामावर आहेत.

माधवराव कृष्ण यांचे द्वितीय चिरंजीव त्र्यंबकराव यास तीन पुत्र **माधवराव रामराव** व **वळवंतराव.** माधवराव (भाऊसाहेब) हे हल्लींचे सचिवाचे आजे ज्या घराण्यांतून दत्तक आले, त्या रामजी काशी गांडेकर यांचेकडे भोर येथें खाजगी कारभारी होते. तेथें ते वरीच इष्टेट व नांवलौकिक संपादून स्थाईक झाले. यास एक पुत्र **गहिनीनाथ** या नांवाचे आहेत; ते बी. ए. एलूएल्. बी. असून सांप्रत भोर येथें वकिली करीत आहेत. पानसे घराण्यांत हेच पहिले बी. ए. एल् एल्. बी. होत. यांची वकिली चांगल्याप्रकारें चालली असून संस्थान-दरबारांत व समाजामध्यें त्यांचें वजन चांगलें आहे.

रामराव त्र्यंबक (आबासाहेब) हेही भोर स्टेटमध्यें नोकर होते. मामलतदारी व मुनसफी या दोन्ही हुद्यांचीं कामें त्यांनीं केलीं. यांची शरीरसंपत्ति उत्कृष्ट होती. यांना **वासुदेव** नांवाचा मुलगा होता. तो वकिलीचे परीक्षेंत पास होऊन सासवड कोर्टांत वकिली करीत असे. परंतु दुर्दैवानें त्यास अकालींच मृत्यूनें गांठिलें. तिसरे बंधु बळवंतराव (बाबासाहेब) त्र्यंबक हे सोनोरीस राहून जहागिरीची देखरेख करीत असत. यांस वैद्यकीचा फार नाद होता, त्यांतच त्यांनीं आपलें डोकें चालवून व जुने ग्रंथ वाचून चांगलें प्रावीण्य मिळविलें होतें. त्यांनीं वैद्यकीचा धंदा करणाऱ्या चांगल्या चांगल्या पारंगत लोकांस आपले गुणामुळें थक्क करून सोडलें होतें. गांवांत अंत्यजांपासून उच्च वर्गापर्यंत कोणी आजारी झाल्यास त्याचे घरीं, त्याचे आजाराचे मानानें एक वेळ, दोन वेळ व कधीं कधीं तीन वेळ जाऊन ते औषध व पथ्य पाण्याची व्यवस्था करीत असत. यांनीं वैद्यक्रियेबद्दल कधींही पैसा घेतला नाहीं; इतकेंच नव्हे तर माला, भस्में यासारखीं किंमतवान औषधें जवळ ठेवून सर्वत्रांस मोफत देण्याचा परिपाठ ठेविला होता. गांवांत परका मनुष्य आल्यास त्याची विचारपूस व त्याची सोय या गोष्टींत त्यांनीं हलगर्जीपणा कधींच केला नाहीं. आसपास परगांवचे रोगीही त्यांचेकडे नेहमीं येत असत. यांची वृत्ति सात्विक असून साधुसंताकडे यांचा ओढा फार होता. बेलापूरचे स्वामी विद्यानंद यांस सोनोरीस आणून त्यांचे सान्निध्यानें राहाण्याचा योग यांनीं पुष्कळ वेळां आणिला होता. हे चांगले कवि होते. यांनीं प्रसंगानुसार कांहीं पद्यें केलीं आहेत. तीं साधीं, भक्तिपर व प्रासादिक आहेत. यावरील गुणांमुळें सभोंवतालच्या १०।१५ खेड्यांतील समाजावर यांचें चांगलें वजन असे. यांस चार पुत्र जाहले. वडील **दिगंबर** हे मॅट्रिक होऊन रेलवेकडे नोकरी करीत असतां मृत्यूनें

त्यांस गांठिलें. दिगंबर पंतास एक **विश्वंभर** या नांवाचा मुलगा असून तो हल्लीं दापोडी येथें सरकारी वर्कशॉपमध्यें क्लार्क आहे. बळवंतरावाचे तृतीय पुत्र **रघुनाथ** यांनीं भोर संस्थानांत व सोलापूर म्युनिसिपालिटींत ओव्हरसियरचीं कामें केलीं, परंतु वडिलार्जित व्यवस्था पहाण्यास कोणी नसल्यामुळें हल्लीं सोनेरीस येऊन ते आपल्या इष्टेटीची देखरेख पाहात असतात.

श्रीपतराव कृष्ण—कृष्णराव माधवरावाचे हे कनिष्ठ चिरंजीव यांस संतती न झाल्यामुळें यांनीं माधवराव कृष्ण यांचे कनिष्ठ पुत्र दामोदरराव यास दत्तक घेतलें होतें. यांचा स्वभाव फार आनंदी असे. यांनीं मरतेसमयीं चतुर्थाश्रम धारण केला होता. यांचें शेतीकडे फार लक्ष होतें. यांनीं आपली शेती, डोंगराचे पायथ्याशीं, माळरानांतली व हलक्या प्रतीची असूनही फार मेहनतीनें, पैसा खर्च करून व ताली घालून सुपीक केली. त्याचा उपयोग आज त्यांचे नातू, पणतू आनंदानें घेत आहेत.

दामोदरराव यांना **श्रीपतराव, कृष्णराव, चिंतामणराव** व **रंगराव** असे चार पुत्र झाले. श्रीपतरावास **गणपतराव** या नांवाचे पुत्र असून हल्लीं ते सातारा जिल्ह्यांत देवी काढण्याचे खात्यांत इन्स्पेक्टर आहेत. कृष्णराव यास सहा पुत्र. वडील **माधवराव** हे पुणें जिल्ह्यांत इंजिनियर खात्यांत ओव्हरसियर आहेत. दुसरे **जनार्दन** हे रेव्हेन्युखात्यांत नोकर होते. ते आज हयात नाहींत. तिसरे **वामनराव** हे इंजिनीयर खात्यांत मिस्त्री आहेत. चवथे **विष्णुपंत** हे पुणें मुक्कामीं वैद्यकी व चष्म्याचा व्यापार करतात. पांचवे **गंगाधर** हे दत्तक दिले. सहावे म्हणजे सर्वांत धाकटे **नारायणराव** हे एल्. सी. पी एस परीक्षा पास होऊन हल्लीं स्वताचा दवाखाना काढून सोलापूर येथें रहात आहेत. पानसे घराण्यांत हेच पहिले एल्. सी. पी. एस. डाक्तर होत.

दामोदरराव यांचे तृतीय पुत्र चिंतामणराव यांनीं पुणें जिल्ह्यांत लोकलबोर्डमध्यें मराठी शाळेंत हेडमास्तरचें काम करून पेनशन घेतलें. ते पुण्यास बिऱ्हाड करून राहिले आहेत. यास **बाबूराव** या नांवाचा एक मुलगा असून, तो पुणें म्युनिसिपालिटींत आकाऊंटंट खात्यांत नोकर आहे. दामोदररावाचे सर्वांत धाकटे पुत्र **रंगराव** हे पुणें जिल्ह्यांत लोकलबोर्डमध्यें ओव्हरसियरचें काम करीत होते. यास अकालीं मृत्यु आला. यास तीन पुत्र आहेत. पैकीं वडील पुत्र **भगवान** हे रेलवेकडे नोकर आहेत.

यशवंतराव लक्ष्मण यांस पांच पुत्र झाले. हे सर्व तोफखान्याकडे नोकर असल्यामुळें त्यांचीं वर्णनें मागें आलींच आहेत. गोपाळराव जयवंत यांस पुत्र-संतति नव्हती म्हणून त्यांनीं कृष्णराव माधवचे द्वितीय चिरंजीव नारायणराव यास दत्तक घेतलें. नारायणरावही निपुत्रिकच असल्यामुळें त्यांनीं बापूराव कृष्ण यांचे चिरंजीव **शंकरराव** यांस दत्तक घेतलें. पानसे घराण्यांत पहिल्यानें इंग्रजी शिक्षण घेण्यास शंकरराव यांनीं सुरवात केली. इंग्रजी शिक्षणानें मनुष्य ख्रिस्ती बनतो, यामुळें तें त्याज्य अशी त्यावेळीं जनतेची समजूत होती. दोन चार बुकें इंग्रजी शिकलेली मंडळी या वेळीं

क्वचित् दिसत असत. त्याकाळीं तुटपुंजे ही इंग्रजी शिक्षण घेणारास मामलतदारी-सारख्या मोठ्या हुद्याच्या जागा मिळत असत. शंकरराव यांचें इंग्रजी शिक्षण बरेंच म्हणजे सातवे इयत्तेपर्यंत झालें होतें. त्यांत त्यांचा इंग्रजी विषय चांगला असून सरदार–घराण्यांत यांचा जन्म झाला असल्यामुळें मामलतदारीची जागा पतकरण्याविषयीं अधिकारी लोकांनीं त्यास आग्रह केला असल्यास नवल नाहीं. परंतु नोकरी करणें हें कमी दर्जाचें समजून व शिवाय साधारण मनुष्यासही मामलतदारी मिळते, तेव्हां निदान हुजूर डेप्युटीकलेक्टरची जागा दिल्यास पत्करावी अशी त्यांची इच्छा होती. या कामीं त्यांनीं प्रयत्न केला असता तर कदाचित् त्यावेळीं त्यांचें साधलें असतें. परंतु तो तसा प्रयत्न त्यांनीं केला नाहीं, व करण्याची त्यावेळीं त्यांना जरूरही नव्हती. यांस एक **गोपाळराव** नांवाचे पुत्र असून ते हल्लीं पुण्यांत आपले घरीं ( शुक्रवार पेठ घ. नं. २०२ ) राहून इष्टेटीची देखरेख करतात.

सखारामपंत हे यशवंतराव लक्ष्मण यांचे तृतीय पुत्र होत. यास **यशवंतराव** या नांवाचा एक पुत्र होता. यशवंतराव यास पुत्र न झाल्यामुळें त्यांनीं संभाजी माणको यांचे वंशांतील **वामनराव** यास दत्तक घेतलें. वामनराव यास **यशवंतराव, रंगराव, सिताराम व गणपतराव** असे चार पुत्र झाले. यशवंतराव हे फार सात्विक व धर्मशील होते. यांचें नांव सरदार-पटांत दुसरे क्लासांत दाखल होतें. यांस संतति न झाल्यामुळें यांनीं आपला पुतण्या **वामनराव** यास दत्तक घेतले. वामनराव हल्लीं सर्व कारभार पाहात आहेत. वामनराव यांनीं आपले वडिलांचे जागीं सरदार–पटांत नांव दाखल करून घेण्याची खटपट करावी अशी आमची त्यांस आग्रहाची विनंति आहे.

सीताराम वामन यास **कृष्णराव, वामनराव, गोपाळराव, नारायणराव** व **भिवराव** असे पांच पुत्र झाले. कृष्णराव हे हल्लीं पुणें जिल्ह्यांत दिवाणी कोर्टांत क्लार्क आहेत. गोपाळराव हे रेव्हेन्युखात्यांत कारकून आहेत. नारायणराव हे अकालीं मृत्यु पावले. भिवराव हे गांवीं राहून उत्पन्नाची देखरेख करीत असतात.

विश्वासराव यशवंत–सरदार पानसे अगर कलेक्टर पानसे म्हणून पुण्यास प्रसिद्ध असलेलें पानसे घराणें हें विश्वासरावाच्या वंशांतील होय. यांचा वाडा शुक्रवार पेठेंत ( घ. नं. ३७६ ) आहे. विश्वासरावाचे पुत्र **गणपतराव** हे पेशवाई अखेरपर्यंत इंग्रजांचे बरोबर पेशव्यांचे बाजूनें लढत होते. यास संतति झाली नाहीं, म्हणून यांनीं उडपी घराण्यांतिल मुलगा दत्तक घेतला व त्याचें नांव दामोदरराव असें ठेविलें. यांनीं आपल्या उतार वयांत चतुर्थाश्रम घेतला होता. दामोदरराव यास **गणपतराव** या नांवाचा मुलगा झाला.

गणपतराव यांचा जन्म इ. स. १८५९ त झाला. पुणें येथिल प्रसिद्ध **बाबा गोखले** यांचे शाळेंत मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यावर इ. स. १८८१ सालीं यांची नेम-

णूक असिस्टंट कलेक्टरचे जागेवर झाली. तें काम त्यांनीं बारा वर्षे केलें. पुढें विजापूर, भडोच, कारवार वगैरे जिल्ह्यांत कलेक्टरचें काम केल्यावर इ. स. १९१० सालीं यांनीं पेनशन घेतलें. यांचें नांव फर्स्ट क्लास सरदार-पटांत दाखल झालें होतें. सरकारी नोकरींत असतां मुंबई इलाख्याच्या लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्यें दक्षिणेंतील सरदारातर्फे प्रतिनिधि म्हणून निवडणुकीस उभे राहण्याची यास सरकारानें परवानगी दिली; व त्या निवडणुकीत ते यशस्वी झाले. कौन्सिलांत असतां यांनीं उत्तम प्रकारें कामगिरी बजाविली. यास पुत्र संतति नसल्याकारणानें हेबळीकर यांचे घराण्यांतील मुलगा यांनीं दत्तक घेतला. त्याचें नांव **दामोदरराव** असें ठेविलें. दामोदरराव हे येथील शिक्षण पुरें केल्यावर बॅरिस्टर होण्यासाठीं विलायतेस गेले. परंतु तेथील हवा न मानवल्यामुळें परत आले. यांचें नांव यांचें वडिलांचे पश्चात् सरदार-पटांत दाखल होतें. हे अकालींच वारले. यास तीन पुत्र असून ते हल्लीं अज्ञान आहेत. सबब इस्टेटीची व्यवस्था व मुलांच्या विद्याभ्यासाची सोय कोर्ट ऑफ वार्ड पाहात असते.

सखाजी माणको यांच्या वंशांपैकीं सांप्रत कोण पुरुष हयात व ते कोठें राहतात याचा तपास लागत नाहीं.

संभाजी माणको यास दोन पुत्र. **मुरार** व **परशुराम**. मुरार यांचे पणतु **हरिपंत** हे होत. यास **अनंत** नांवाचा मुलगा होता. अनंतराव यांना संतति न झाल्यामुळें त्यांनीं **गंगाधरपंत** यास दत्तक घेतलें. गंगाधरपंत हल्लीं मुंबईस ट्राम कंपनीकडे नोकर आहेत.

परशुराम संभाजी हे शिरवळजवळ सोंडल या गांवीं जाऊन स्थाईक झाले. त्यांना **गणपतराव**, **गोपाळ** व **भगवंत** अशीं तीन मुलें झालीं. गणपतरावाच्या वंशाचें पुढें नकल झालें. गोपाळ यास **यशवंत** व **यशवंत** यास **नारोपंत** या नांवांचे पुत्र झाले. नारोपंतास तीन मुलें झालीं. मधील **गणपतराव** यांस **बळवंतराव** नांवाचे पुत्र असून ते हल्लीं तलाठी आहेत. धाकटे **हरिपंत** यास **दत्तात्रय** व **विनायकराव** हे दोन मुलगे असून सांप्रत आपल्या गांवीं राहून शेतीभाती करतात.

गोविंद विसाजी यांचे वंशांतील कोणीही पुरुष आज हयात नाहीं.

उद्धव माणको यास **गोपाळपंत** हे पुत्र होते. गोपाळपंतास **गोविंदपंत** या नांवाचे पुत्र होते. गोविंदपंतास **त्र्यंबक** व त्र्यंबकास बाळाजी हे पुत्र होते. बाळाजीस तीन पुत्र **सखाराम**, **बापूजी** व **रावजी** असे झाले. बापूजी हे पहिल्यानें मुधोळकर घोरपडे यांचे पदरीं त्यांचे वकील या नात्यानें पुणें प्रांतांत त्यांच्या असलेल्या इष्टेटीवर देखरेख करीत असत. त्यांच्या मृत्यूनंतर ती जागा त्यांचे वडील बंधु सखारामपंत यांस मिळाली. ही जागा पुढें अजीबात कमी झाली. याचवेळीं होळकर दरबारास त्यांच्या दक्षिणेंत असलेल्या उत्पन्नावर देखरेखीकरितां एका अनुभवी वाकिलाची जरूरी होती व तशा मनुष्याच्या तपासांत असतां त्यांनीं ती जागा सखारामपंत यांस दिली; ती त्यांचेकडे त्यांच्या हयातीपर्यंत चालू होती. सखारामपंतास तीन

मुलें **विनायक, नारायण** व **नरहरि** अशीं होतीं. या मुलांचें शिक्षण त्यांच्या वडिलांचे खास देखरेखीखालीं पुण्यास झालें. विनायकराव हे ओव्हरसियरचे परीक्षेत पास झाल्यावर इंजिनीयर खात्यांत नोकर झाले. पुढें वाढत वाढत ते सब इंजिनीयर झाले होते. नुकतेंच त्यांनीं पेनशन घेतलें. यांस दोन पुत्र **माधवराव** व **गोविंदराव** हे आहेत. माधवराव हे B.A. झाले असून हल्लीं अमदाबादेस मिलमध्यें देखरेख करीत असतात. गोविंदराव हे B E. असून सातारा जिल्ह्यांत असिस्टंट एंजिनियर आहेत. नारायणराव सखाराम, हे पुणें येथें प्रोफेसर पानसे या नांवानें प्रसिद्ध आहेत. यांनीं मॅट्रिकचे परीक्षेत जगन्नाथ शंकरशेट यांची स्कॉलरशिप मिळविली. पुढें डेक्कन कॉलेज-मध्यें शिक्षण घेऊन इ. स. १८९० सालीं हे B. A. झाले. हेच पहिले पानसे घराण्यांतील B. A. होत. यांचा शिक्षणाकडे जास्त ओढा असल्यामुळें डेक्कन एज्युकेशन सोसायटींत लाईफ मेंबर होऊन यांनीं फरग्युसनकॉलेजमध्यें संस्कृत भाषेच्या प्रोफेसरीचें काम पतकरलें. तेथें बावीस वर्षे काम करून, इ. स. १९१४ सालीं ते रिटायर झाले. हल्लीं त्यांस सोसायटीकडून पेनशन मिळत आहे. युनिव्हरसिटींत संस्कृत विषयाचे हे १०।१२ वर्षे एक्झामिनर होते. अलीकडे त्यांनीं आपल्या पुढील पिढीस पुढें सर-कण्यास जागा मिळावी म्हणून परीक्षकाचें काम सोडलें. ग्वालेर दरबारकडून त्यांच्या दक्षिणेंतील इष्टेटीची व्यवस्था पाहण्याकरितां दरबारनें नारायणराव यांस वकील नेमलें आहे. हे फार मेहनती आणि कामाचे हौसी आहेत. हे फीमेल हायस्कूलमध्यें ऑन-ररी सेक्रेटरीचें काम पहात असून, हिंगणे येथील कर्वे महिला युनिव्हरसिटीचे ते सिनेटर आहेत. हे समाजसुधारक असून आपले समाजांत अंधश्रद्धेनें घातुक अस-लेल्या रूढि नाहींशा व्हाव्या अशा मताचे आहेत. इ. स. १८९१ सालीं पंचहौद मिशनमध्यें चहा घेतल्याबद्दल बेचाळीस इसमांवर जें काहूर माजलें होतें त्यांत नारा-यणराव हे एक होते. या झालेल्या चहापानकृत्यास शास्त्रांत प्रायश्चित्त नाहीं, परंतु शंकराचार्यांनीं प्रायश्चित्त घेतल्यास शुद्धीकरण होतें असा निर्णय दिला. नारायण-रावांनीं या वेळीं शंकराचार्यांकडून सवलत मिळविली. जें शास्त्रानें अशक्य तें शक्य झालें, सबब आपणही आतां जास्त हट्ट न धरतां प्रायश्चित्त घ्यावें, असें ठरवून त्या-प्रमाणें तें त्यांनीं घेतलें. यांना सहा मुली व एक **शरश्चंद्र** नांवाचा मुलगा आहे. मुलगा लहान असून प्राथमिक शिक्षण घेत आहे. यांच्या कन्यैपैकीं वडील **बारूबाई** ही कॉलेजमध्यें इंटर पास झाली असून तिचा विवाह बॅरिष्टर विश्वनाथ गणेश दाणी सासवडकर यांच्या बरोबर झाला. दुसरी कन्या **वेणूबाई** या इ. स. १९२६ सालीं M. A. व १९२७ सालीं B. T. चे परीक्षेत उत्तीर्ण झाल्या आहेत. हल्लीं त्या अवि-वाहित असून फीमेल हायस्कूलमध्यें शिक्षकाचें काम करीत आहेत. तिसरी कन्या **यमुताई** यांचें इंटरपर्यंत शिक्षण झाल्यानंतर यांचा विवाह नागपूरचे गोविंदराव वझर B. Ag. ( अमेरिका ) यांच्यांशीं १९२७ सालांत झाला. चतुर्थ कन्या **नलिनीबाई**, या हल्लीं फरग्युसन कॉलेजांत प्रिव्हियस क्लास मध्यें आहेत. पांचवी

कन्या **इंदुताई** या गेल्यावर्षी मॅट्रिकचे परीक्षेंत पास होऊन त्यांत त्यांनीं संपूर्ण, स्कॉलरशिप मिळविली. यांची सर्वांत लहान कन्या अद्याप अज्ञान आहे. नारायणरावांनीं हे स्त्रीशिक्षणाचे किती प्रेमी व अभिमानी आहेत, हें याजवरून दिसून येईल.


**नरहर** सखाराम हे नागपुराकडे कंत्राटदार आहेत.

**रावजी बाळाजी** यास **दामोदर** व **बळवंत** असे दोन पुत्र झाले. दामोदरपंत हे वकिलीची परीक्षा पास होऊन पुणें जिल्ह्यांत खेड येथें वकिली करीत होते, त्यांस अकालींच मृत्यूनें गांठिलें. त्यांस संतति झाली नाहीं.

## ५. कृष्णाजी परशुराम यांचा वंश.

परशुराम लक्ष्मीधर यांचे, कृष्णाजी हे चतुर्थ पुत्र होत. यांचे पुत्र **चिमणाजी** यास, **लक्ष्मण** या नांवाचे पुत्र होते. लक्ष्मण यास **मल्हार** व मल्हार यास **चिमणाजी**, **लक्ष्मण**, **रखमाजी**, **कृष्णाजी** व **परशुराम** असे पांच पुत्र झाले. चिमणाजी, लक्ष्मण व परशुराम या भावांचे वंशांत कोणी हयात पुरुष राहिला नाहीं. रखमाजी यांचे वंशांतील पुरुष सांप्रत कोठें आहेत त्याचा तपास लागत नाहीं. कृष्णाजीस **मल्हारी** या नांवाचे पुत्र होते व मल्हारीस **पांडुरंग**, **परशुराम** व **कृष्णाजी** असे तीन पुत्र झाले. पांडुरंग यास **रामचंद्र**, **माधव**, **केशव**, **नारायण** व **रघुनाथ** हे पांच पुत्र झाले. रामचंद्र यांचे चिरंजीव **धोंडोपंत** हे ट्रेनिंग-कॉलेजांत दुसरे वर्षाचे परीक्षेंत पास झाले. हल्लीं ते पुणें जिल्ह्यांत लोकलबोर्डांतील शाळेवर हेडमास्तर आहेत. माधवराव यास पुत्र दोन. **गणेश** व **बापू**. गणेश हे हल्लीं गाईकवाडांत रेव्हेन्यु खात्यांत नोकर आहेत, व बापू कोठें आहेत त्यांचा तपास लागत नाहीं. केशव पांडुरंग यांच्या **विनायक** नांवाच्या पुत्रास **नथुराव** व **बाबुराव** अशीं दोन मुलें आहेत. तीं बडोदा स्टेटमध्यें नोकर आहेत. परशुराम मल्हार यास **महिपत** व **गोविंद** असे दोन पुत्र होते. महिपत यास **दिगंबर** व **गोविंद**. गोविंद यास **गजानन** व **कृष्णा** या नांवाचीं मुलें झालीं. तीं हल्लीं गाइकवाडींत नोकर आहेत.

कृष्णाजी मल्हार हे लहानपणीं च आपलें दिवें गांव सोडून बडोद्यास नोकरी मिळविण्याचे उद्देशानें गेले. तेथें त्यांनीं नोकरी मिळविली. वाढत वाढत त्यांनीं श्री. खंडेराव महाराज यांचे कारकीर्दींत खुद्द दरबारांत मोठ्या सन्मानाची जागा मिळविली. यांचा सल्ला नेहमीं पोक्त व अचल असल्यामुळें यांस मुत्सद्दी असें म्हणत व कागदपत्रांत हि यांचे नांवामागें "मुत्सद्दी" हा बहुमानार्थी शब्द त्या वेळीं लावीत असत. पुढें श्री. सयाजीराव महाराज हे अज्ञान असतां राज्याचा कारभार सर. टी माधवराव यांचेकडे असतांना त्यांनीं या जागा कमी केल्या. त्यांत कृष्णाजीची जागा कमी होऊन त्यांस घरीं बसावें लागलें. यांस संतति झाली नाहीं. यांनीं आपल्या बंधूस बडोदें येथें



श्री. सदाशिव केशव पानसे.
B Sc



श्री. चिंतामण बाळकृष्ण पानसे
हे. क्लार्क ए. इंजिनियर, जळगांव.



श्री. नारायण कृष्णराव पानसे.
L. C P. S. सोलापूर

[illegible] त्याचे मु[illegible] ग तिकडे च त्यांना नोकऱ्या मिळवून देऊन घर-दार करून कायमचें स्था[illegible]लें.

## ६. वाठारकर पानसे.

### ( सखोजी तानाजीचा वंश )

सखोजीस पुत्र **बाबूराव** यांनीं वाठारगांवीं राहण्यासाठीं वाडा बांधला ( पान १२४ पाहा ). हा वाडा किल्ल्यावजा असून त्यासभोंवतीं चिरेबंदी दगडाचा सुमारें चार हात रुंदीचा व १०।१२ हात उंचीचा तट आहे. बाबूराव हे शिंदे सरकारचे लष्करांत नोकर होते व त्यांस तेथें पंचवीस स्वारांची असामी होती. बाबूराव यांस **गोविंद, भगवंत, माणको, जिवाजी** व **मल्हार** असे पांच पुत्र होते. गोविंद-पंत यांना नालखी पालखीचा मान होता. असा उल्लेख आढळतो. तो मान त्यांना कोणाकडून काय कारणानें मिळाला याची माहिती मिळत नाहीं, परंतु जुन्या नालख्या पालख्या आज मोडक्या स्थितींत घरांत पडलेल्या आहेत, शिवाय हे पानपतच्या लढाईत होते व तेथून परत आले असा हि उल्लेख आढळतो. यावरून वरील गोष्टीची सत्यता पटते. गोविंदपंतांचे पुत्र **कोंडोपंत**, यांस चार मुलें झालीं. पैकीं द्वितीय **भिकाजीपंत** व तृतीय **विष्णुपंत** यांचा वंश हल्लीं हयात आहे. भिकाजीपंतांस **सीताराम, गोविंद, माधव** व **श्रीधर** अशीं चार मुलें झालीं. कल्याण शेटजी म्हणून मुंबईचे एक प्रसिद्ध कंत्राटदार होते. या कॉन्ट्रॅक्टरचें भुसावळ ते खांडवा रेल्वे लाईनचें काम सुरू असतां त्या कामावर सीताराम व गोविंद हे नोकर होते. गोविंदरावास **भगवंत, सखाराम** व **अनंत** अशीं तीन मुलें झालीं. भगवंतराव हे हल्लीं पुणें जिल्ह्यांतील निरा कॅनॉलकडे ओव्हरसीअर आहेत. यांनीं पुणें येथें स्वतांचें राहाण्यासाठीं घर बांधलें आहे ( सदाशिव पेठ घ. नं. ३२५ ). सखाराम व अनंत हे रेल्वेकडे नोकर आहेत.

भिकाजी कोंडो यांचे कनिष्ठ पुत्र श्रीधर हे सर्व्हे डिपार्टमेंटमध्यें नोकर होते. ते पुढें जनरल ड्यूटी सरकल इन्स्पेक्टर झाले होते. ते हल्लीं पुण्यास पेन्शनर म्हणून रहात आहेत. यांस तीन मुलगे, **आण्णा, मधु** व **दिनकर** असे आहेत आण्णा हे खानदेशांत रेव्हेन्यु खात्यांत नोकर आहेत. मधुकर हे B. A. असून पुणें येथें कँप एज्युकेशन सोसायटींत शिक्षक आहेत. दिनकर दिवाणी कोर्टांत क्लार्क आहेत.

बाबूराव सखाजीचे द्वितीय पुत्र भगवंत व त्याचे पणतू **विश्वनाथ** यास **भास्कर** नांवाचे पुत्र होते. ते बारामती येथें वकिलाचे कारकून होते. हे नुकतेच वारले. यांस चार पुत्र, पैकीं **गोविंदराव** हे हल्लीं फर्ग्युसन कॉलेजमध्यें B. A. चे क्लासांत शिक्षण घेत आहेत.

बाबूराव सखाजीचे पणतू **पांडुरंग** यांचे नातू **लक्ष्मणराव** हे हल्लीं वाठार गांवचे तलाठी आहेत. लक्ष्मणराव यांस **धोंडोपंत** नांवाचा पुत्र आहे. धोंडोपंतास

**लक्ष्मण**, यांस **विनायक, गणपत** व **मोरोपंत** अशीं तीन मुलें झालीं. विनायक यांचे पुत्र **कृष्णाजीपंत** हे हल्लीं पुणें येथें ( फरसी, सिमेंट व चुन्याचे व्यापारी ) यांजकडे नोकर आहेत. गणपतरावांचे पुत्र **चिंतामणि** हे इरिगेशन खात्यांत ओव्हर-सीअर आहेत.

वाठार नांवाचीं गांवें दोन आहेत. निरा नदीचे उत्तर बाजूस वसलेल्या वाठारास पंताचें वाठार म्हणतात; हें भोर संस्थानांत आहे. दक्षिण भागीं सातारा जिल्ह्यांतील वाठारास वाठार बुद्रुक अगर चोराचें वाठार म्हणतात. पंताचे वाठार या गांवीं ब्राह्मण–वस्ति नाहीं. पानसे हे वाठार बुद्रुक गांवीं रहातात

## ७. भोळीकर पानसे.

### ( दादाजी तानाजीचा वंश )

दादाजीस **कृष्णाजी, निराजी** व **जनार्दन** असे तीन पुत्र झाले. त्यांपैकीं वडील कृष्णाजी याचा वंश वाढला. निराजी व जनार्दन यांचा वंश संतति न झाल्या-मुळें नष्ट झाला. कृष्णाजीस **सखाराम** व **राघोपंत** या नांवाचे दोन मुलगे होते. राघोपंत यांचा वंश पुढें संतति नसल्यामुळें खुंटला; सखाराम यास **दामाजी, नारो-पंत, गंगाधर** व **रावजी** अशीं चार मुलें झालीं. दामाजीचा मुलगा **काशिनाथ** हा हयात असून पुणें येथें छापखान्यांत म्यानेजरचें काम करीत आहे. नारोपंत यांचे पुत्र **कृष्णाजी** हयात असून, त्यांचीं **नारायण** व **वसंत** हीं दोन मुलें हल्लीं शिक्षण घेत आहेत. गंगाधर यांचें नक्कल झालें. रावजी यांस **गोविंद, दाजी, हरि, दादा** व **रंगोपंत** असे पांच पुत्र झाले. पैकीं गोविंद, दाजी व रंगोपंत यांस संतति झाली नाहीं. हरि यांचे पुत्र **पांडुरंग** सांप्रत हयात असून भोळीस शेतीवाडी करून राहतात. दादा यांचे पुत्र **दिगंबर** हे आपले वडिलार्जित इष्टेटीची व्यवस्था पहातात.

उत्तरार्ध समाप्त.

# परिशिष्टें.

## परिशिष्ट पहिलें.

### सोनोरी व दिवे येथील वतनासंबंधीं पत्रें.

#### सुरू सन इसन्ने आर्बैन.

खंडो शिवदेव उपनांव पानसे गोत्र मुद्गल सूत्र अश्वलायन, ज्योतिषी व कुलकर्णी मौजे दिवें कर्यात सासवड व मौजे सोनोरी तर्फ कऱ्हेंपठार प्रांत पुणें सरकार जुन्नर यांसी दिल्हें वतन–पत्र ऐसें जें, तुम्ही शाहुनगर नजीक किल्ले सातारा येथील मुक्कामीं स्वामीसन्निध विनंती केली. हरदो गांवचीं सदरहू दोनी वतनें पूर्वी गिधवी यांचीं होतीं. त्यांनीं आपल्या वडिलांस दान देऊन दानपत्र करून दिल्हें. त्यावरून वतन अनुभवूं लागले. त्यास मौजे सोनोरी येथील कुलकर्ण चालवावयासी कृष्णाजी गाऊजी उपनाम गांवखंडेराऊ मुतालिक ठेविला होता. त्याचा लेक रामाजी कृष्ण आपला आजा गोविंद विश्वनाथ यांसी कुळकर्णाबद्दल कजिया करूं लागला. याजकरितां महाराज राजश्री थोरले कैलासवासी स्वामीसन्निध किल्ले राजगड मुक्कामीं जाऊन वर्तमान निवेदन केलें. त्यावरून रामजीस हुजुरून आणून हरदो जणाचे कर्रीने मनास आणिले, आणि मौजे मोहुरी बुद्रुक तर्फ गुंजण मावळ प्रांत मावळ येथें दिव्य नेमून दिल्हें. तेथें दोघांनीं ही दिव्यें केलीं. रामाजी कृष्ण दिव्य–मुखें खोटा जहाला. त्यानें अजीजखत लेहून दिल्हें. तें महाराज स्वामींनीं मनास आणून दुमाल पत्रें करून दिल्हीं. त्याप्रमाणें वतन अनुभवीत आहों. परंतु पत्रें जीर्ण झालीं, भोगवटी यास पत्रें पाहिजेत. याजकरितां महाराजांहीं कृपाळू होऊन नूतन पत्रें करून देऊन वंशपरंपरेनें चालविलें पाहिजे. म्हणून विदित करून महाराज राजश्री थोरले कैलासवासी स्वामींचें पत्र व गिधवी यांचें दान–पत्र व रामाजी गांवखंडेराऊ याचें अजीजपत्र व थळपत्र ऐसीं चार पत्रें आणून दाखविलीं. पत्रें बितपशील:—

महाराज कैलासवासी यांचें पत्र दिल्हें. "अजरखतवरानें राजश्री शिवाजी राजे साहेब दामदौलत हू बजानेबू मोकदमानी व रयानी समस्त प्रजा मौजे सोनोरी परगणे पुणें बिदानद सुरूसन तिसा सितैन अलफ. गोविंद विश्वनाथ पानशी जोतिषी व कुळकर्णी मौजे मजकूर यासी व रामाजी कृष्ण गांवखंडेराऊ वरती कसबे सासवड यासी कुळकर्णाबद्दल भांडण लागलें होते. त्याचा निवाडा होऊन महजर झाला ऐसाजे. रामजी कृष्ण गांवखंडेराऊ हुजूर येऊन मालूम केलें जे, आपलें कुळकर्ण मौजे सोनोरी तर्फ कऱ्हेपठार परगणें पुणें आपली मिरास आहे. यांनीं गोविंद पानशी आपणासीं

कईणी (?) कुळकर्णाबद्दल भांडण आहे. तरी साहेबीं गोविंद विश्वनाथ यास हुजूर आणून आपली व त्याची बर हक्क मुनसुफी करून निवाडा केला पाहिजे. म्हणून मालूम केलें. त्यावरून गोविंद विश्वनाथ यास तलब करून आणून दोघाजणांची हकिकत मनास आणून तकरिरा घेतल्या छ १२ माहे सावान.

"गोविंद विश्वनाथें तकरीर केली ऐसीजे, गिधवी याची मिरास जोतिष व कुळकर्ण देहे २ तपशील. मौजे दिवें कर्यात सासवड व मौजे सोनोरी तर्फ कऱ्हेपठार परगणे पुणें सदरहु गिधवी याची: मिरासी. गिधवे आपले यजमान परंपरा, आपण त्यांचे उपाध्ये म्हणून गिधवी यांनीं आपला मूळ पुरुष लक्ष्मीधर भट पणजा होय त्यासी पाय धुवून दान दिधलें. दानपत्र गोही साक्षीनिशीं स्वहस्ताक्षरें वृत्ति लेकरांचे लेकरीं करून दिल्ही. त्यावर कित्येकादिवशीं गिधवे काशीस गेले. आपला पणजा लक्ष्मीधर भट लेहूं जाणत असें म्हणोन कुलकर्ण चालवावयासी हरदो गांवीं मुतालीक ठेविला असे. जोशी--पण चालवत असे. याचे पोटीं परशराम भट जाहला. तो आपला आजा होय. हा जाणता जाहला यावरी मौजे दिव्याचें कुलकर्ण चालवून असे व परशराम भटाचा भाऊ दुसरा भटपण जाणत असतो. दोही गांवचें जोतिष चालवून असे. व तिसरा भाऊ विठोबा व्यापारास जात असे. याबद्दल सोनोरीस मुतालीक हरकोणी ठेवून चालवीत असे. ती मग विठोबाचा नारोबा जाणता झालीयावरी सोनोरीचें कुलकर्णावर कित्येक दिवशीं ठेविला. याउपरी परशराम भट आपला आजा, त्याचे पोटीं आपला बाप विसाजी व चुलते जाहले. हे थोडे बहुत लेंहू शिकले. परंतु लहान लहान असत. मौजे दिव्याचें कुलकर्ण चालवून असत. यावरी आपल्या बापाचा मामा दाणी सासवडकर यांचें शेत मौजे सोनोरीस वोबाडीयानें करीत असे. त्या शेतावरी कृष्णाजी गांवजी खंडेराऊ खटपटीस ठेविला होता. त्यास आमचे वडिलांचे मामानें आमचे आज्याच्या हातीं मुतालिक ठेविला. मौजे सोनोरीचें कुलकर्ण चालवावयास जाणते होत, तोंवरी एक दोन वर्षें चालविणें, व शेताची खटपट जैसी करतात तैशी करणें. हे जाणते झाल्यावर आपलें कुलकर्ण चालवितील, म्हणून ठेविला होता. त्यावरी आपला बाप व चुलता हे लेहो शिकले, जाणते जाहले. मग कृष्णाजीस दूर करून दोन्ही गांवचें कुलकर्ण आपण चालवूं लागले. ऐसें असतां कित्येक दिवशीं, नाईकजी पाटील मोकदम मौजे मजकूर कुळकर्णाचा मुशाहिरा मागता मोकदमामध्यें व लखोबा आपला चुलता यामध्यें कटकट जाली. यावरी मोकदमें लुखोबास मारिलें. याबद्दल आपले वडील रूसोन माराच्या भेणें राहिले. पुढें नाईकजी पाटील यानें कृष्णाजी गाऊजीस बोलावून कुळकर्णाचें लिहिणें लिहूं लागल्यावरी, आपले वडिलीं कृष्णाजीस म्हटलें कीं, आपण रूसोन राहिलों आहों, आणि तूं मौजे मजकुरास जाऊन कुळकर्णाचें लिहिणें चालवितोस तें चालवूं नको. यावरी कृष्णाजी सासवडास उगाच राहिला. कुळकर्णाचे कामाचा बोभाटा पडूं लागला. याबद्दल आपले बापाचा मामा दाणी सास-

वडकर यानें आपले वडिलास म्हटलें जे, तुम्ही रूसोन घरीं राहिला. दिवाण काम चालत नाहीं. पाटलाची व तुमची समजाविसी होय तोंवरी चार दिवस कृष्णाजीस मुतालीक देऊन ठेवणें. त्यावरी आपले वडिलीं मुतालीक करून ठेविला. पाटलाची आमची समजाविसी झाली नाहीं. ऐशामध्यें रंगभट, दत्तभट, राखिया सेकिन सासवड दिव्यास आला होता. त्यानें एके घरीं निसरवा घेतला, म्हणून आपल्या चुलत्यानें मारिला. त्या दुःखें राखियानें काशीस जाऊन गिधवी याचा वंश त्याची भेट घेऊन त्यास सांगितलें कीं, तुमच्या वडिलाची मिरास मौजे दियेस व सोनोरीस आहे. येऊन चालवाना, हें उचित नाहीं. ऐसें त्यांनीं नाना प्रकारें उपदेश करून घेऊन आला. गिधवी यांनीं आपले वडिलास पुशिलें कीं, तुम्ही दोही गांवांचें कुळकर्ण व जोतिषपणा खातां कशावरून तें सांगणें. त्यांहीं त्या गिधवी याचें दानपत्र लिहून दिल्हें होतें व गोही लिहिलें होतें. पत्र पाहून गोही मनास आणून मागुती आपलीं हीं दानपत्रें करून दिल्हीं असतां, काशीचा वियोग करून आम्हांस घेऊन आला. ऐसें बोलोन ते मागुती काशीस गेलिया उपरी लुखोबा आपला चुलता त्यास देवाज्ञा झाली. पाटलाची व आमच्या वडिलाची समजाविशी झाली नव्हती. तैशामध्यें कारकीर्द राघो निंबाजी मुकसाई कसबे सासवड याचे वेळेस पाडांगळा जेजुरी श्री खंडेराऊ याचा भक्त व राघोजी मंबाजीही खंडेराऊ याचा भक्त याची हकिकत करून उभा राहिला कीं, मौजे दियें व मौजे सोनोरी दोही गांवचें जोतिष कुळकर्ण, आपली मिराशी, गिधवीया आधीं आपली मिराशी एसें बोलिला. त्यामध्यें व आपल्या वडिलामध्यें वाद झाला. मग निवाडीयासी श्री अमृतेश्वर मुक्कामीं म्हैसाळे कोंकणांत आहे, तेथें आपला बाप विसाजी परशराम व पाडांगळा गेले. ते जागीं आपले बापें दिव्य केलें, रवा काढिला. खरा झाला. म्हैसाळ्याचें थळपत्र दिल्हें, तें घेऊन विसाजी परशराम आला. पाडांगळा खोटा झाला. सदरहू हकीकत राघो मंबाजीस सांगितली व रवा काढिला, खरा जाहला, तें थळपत्र दाखविलें. त्यावरून राघो मंबाजीनें पाडांगळा यासी दटाविलें कीं, कईणी आमचा निशा केला कीं, एकाची मिराशी आपली म्हणोन तुटलासी. ब्राह्मण म्हणोन तुजला सोडिलें. ते वेळेस ऐसा निवाडा झाला. नाईकजी पाटील होता तो मृत्यु पावला., पुढें थोरला दुष्काळ पडला. आपला बाप गांवीं होता. आपण पांच भाऊ व कुटुंब थोर दुष्काळाकरितां पोट भरेना. तैशामध्यें आपल्या घरासी आगी लागोन जळालें. त्यामध्यें गिधवी याचे दानपत्राचे कागद होते ते व म्हैसाळां दिव्य केलें; तेथील कागदपत्र आपली बिशाद होती ते जळाली. आपण व आपले भाऊ लहान, लहान होतों. गांवावरी पोट भरेना. मग आपला बाप विसाजी परशराम कारकीर्द महाराज साहेब पुण्यास गेला. ते वेळेस नाईकजी पाटील यांचा लेक हंस पाटील व रत्नोजी पाटील, रामाजी कृष्ण ठाणीयास दिवाण कामाबद्दल आले होते. ते हंस पाटील, रत्नो पाटील आपले बापास बोलिलें.

कीं, नाईकजी पाटलामध्यें व लुखोबामध्यें कटकट झाली होती. ते दोघे मरोन गेले. आपण तुम्हांसीं कांहीं किलाफ धरीत नाहीं. आपण व तुम्ही मिरासभाऊ आहों. आपलें कुळकर्ण व ज्योतिष सुखें खाणें. ऐसें समाधान केलें. त्यावरी आपले बापें रामजीस म्हटलें कीं, कुळकर्णाचे निसवतीचे कागद तुजपाशीं आहेत ते समजाऊन मज देणें. अनमान असेल तर दादाजी कोंडदेव सुभेदार हकीम आहेत त्यांजपाशीं चाल. त्यावरी रामजीनें पाटलास म्हणोन आठा दिवसांची मुदत सांगोन मोईन केली जे, आठा दिवशीं येऊन कागद समजाऊन देईन. ऐसा नेम करून ठाणांतून गांवास गेला. आणि रामजीनें हंस पाटिलाचा धाकटा भाऊ बैजी होता, त्यासी घरोबा करून शफत घेतली जे, तूं मोकदमी करणें. आपण कुळकर्ण करीन. पानशी जोसपणों करितात तैसें करितील. त्यांचें कुळकर्ण आपणास देणें. या तहास हंस पाटीलामध्यें व बैजी पाटीलामध्यें कसूर वाढविला आणि रामाजी कागद नेदी, तो गांव टाकून कर्नाटक प्रांतीं गेला. त्यावरी आपले बापें पाटलास कागद लेहून दिल्हा कीं, रामाजीस आठ रोजा नेम करून तुम्ही घेऊन गेला. त्यास बोलास पंधरावीस दिवस झाले कागद पाठविले नाहींत म्हणून लिहिलें. शेवट हंस पाटील व रत्नो पाटील बैजीस म्हणत कीं, पानशी मिरासदार आहेत. आमची क्रिया गुंतली आहे कीं, याच्या हातें कुळकर्णाचें काम घ्यावें. आणि बैजी मजकूर म्हणे कीं, रामजीस हातीं धरावें. याबद्दल कुसूर वाढला. त्याकरितां आपला बाप गांवास गेला नाहीं. कोंकणामध्यें व्यापार करोन गेला. त्यावरी बैजीनें मारा करून आपला भाऊ हंस पाटील जिवें मारिला. आपला ही बाप कोंकणांत मरोन गेला. आपण धाकटे नेणते होतों. ते जाणते जाहलों. त्यावरी कारकीर्द महाराज साहेब नारो सुंदरास हवाला पुण्याचा होता. त्यांची भेट घेऊन आपली हकिकत सांगितली. त्यावरून ती ही कुलकर्णाची दुमाले चिट्ठी दिधली. मग रखमाजी पानशी आपला गोत्रज कुलकर्ण चालवावयास ठेविला. तो कुलकर्ण चालवीत असतां, रामाजीनें राजश्री महाराज साहेबास गलत माळुमात केली जे; मौजे सोनोरीचें कुलकर्ण आपली मिरास पांच पिढ्या खादलें आहे. आणि पानशी खळेल करितात, म्हणोन सांगितलें. त्यावरून महाराज साहेबीं नारो सुंदर हवालदार परगणे मजकूर यांस खुर्दखत दिधलें कीं, रामजी याची व पानशी याची बरहक मनसूफी करणें म्हणून सादर झालें. त्यावर नारो सुंदर यानें दोघे वादे व गांवचे मोकदम व मुख्तेसर बलुते व हमशाही गांवींचें गोत मिळवून मनसुफी करून निवाडा करावा तो केला नाहीं. व खुर्दखत कैसें आहे ते ही आपणास दाखल नाहीं. नारोसुंदर याचा हवाला पुरलिया उपरी खुर्दखत ठाणाचें घेतलें. तें ही कोणास ठावकें नाहीं व आपणांस ही हल्लीं वाद सांगतां कळलें. रामजी मजकूर गांवास येऊन रखमाजी पानशी, कुलकर्ण चालवावयासी आपण ठेविला होता, त्यास म्हणों लागला जे, महाराज स्वामीचें व ठाण्याचें खुर्दखत घेऊन आलों आहे, कुलकर्ण आपलें दुमाले केलें आहे. तूं आपणास कागद लेहून दे कीं, कुलकर्ण

आपलें नव्हे. त्यावरी आपले मनीं रखमाजीनें विचारलें कीं, त्र्यंबक विश्वनाथ [illegible] चाकरी करीत असतां, संभाजी मोहिते यानें धरिलें आहे. त्यामध्यें व नारो सुंदर यामध्यें आकस आहे. या करितां इलाज न चले. व बैजी पाटील व रामाजी दोघे एक होऊन आपणास जिवें मारतील. ऐसा विचार करून कागद मौजे दिवाच्या मोकदमाच्या नांवें ठाणां अर्जदस्त दिधली कीं, आपणांस व रामाजीस संबंध नाहीं. ऐसी अर्ज दस्त लेहून दिल्ही. त्यावर अफझलखानाचा गलबला झाला व अमीरउमराऊ नवाब शास्ताखानाचा गलबला झाला. मुलूख खराब पाडिला. त्यावर मौजे मजकूरही खराब पाडिले. पेस्तर मुलुखास कौल जाहला. जुजबी वसाहत झाली. तेंच वख्ती आपण हजीर झालों. रामाजी गैरहजर झाला. तो औरंगाबादेस जाऊन बाकोजी भोसले यापाशीं चाकर राहून वेजबी केली. ते वख्तीं त्या नजीक मालुमती करून महाराज साहेबाचें व नारो सुंदराचें खुर्द खत होतें तें दाखवून परवाना घेतला कीं, हरदोवादी यांची मनसुफी बरहक करणें. त्यावरून परगणे मजकुरास मशार निल्हे शामजी पंडित गुमास्ते दिवाण व कानोजी पंडित गुमास्ते अमिनाचे ये हि परगणे मजकूरचे देशमूख व देशपांडिये यांनीं हमशाही गांवास खुर्द खतें पाठविलीं कीं, पानशी याचा व रामजी गांवखंडेराऊ याचा मौजे मजकूरच्या कुलकर्णाचा अंमल कैसा आहे तो आपलाले इमान राखोन पूर्वज स्मरोन हक्क असेल तें लेहून पाठविणें. त्यावरून हमशाही गांवचे मिरासदारी आर्जास साक्ष साक्षीच्या लेहून पाठविल्या वितपशील:—

परगणे पुणें

१ मौजे लोणी काळभोर तर्फ हवेली
१ आळंदी तर्फ सांडस
३ तर्फ कऱ्हे पठार परगणे पुणें
१ पिंपळे १ बाणपुरी आंबोडी
१/६ सोनोरी बारा बलुतें

कर्यात सासवड

१ कसबा, येथील देशमुख, देशपांडे व स्थळकरी
१/२ मौजे दिवें

परगणे सुपें

१ सुपें खुर्द
१/२ कुंभार वळण

यांनीं लेहून पाठविलें कीं, मिरास पूर्वी दिवे व मजकूर येथील ज्योतिष व कुलकर्ण गिधवी यांचें. गिधवी यांनीं पानशास मिरास करून दिली. त्यावरून कित्येक दिवस पानशी चालवीत असतां, दरम्यान सोनोरीच्या मोकदम्यामध्यें लखोबा पानशी यामध्यें मुशाहिऱ्याबद्दल कटकट झाली. मग कृष्णाजी गांवखंडेराऊ वस्ती मौजे सासवड तेथें बोवडी यानें, दाणी यांनीं आपल्या शेतावर ठेविला होता. लखोबा रुसोन राहिला म्हणोन लखोबाचे मामा दाणी यांनीं पानशी यासी म्हणून कन ( ? ) मजकूर

ठेविला. तो पानाशिया मुतालीक होय. आपणास ठावके असे. ऐसे गोहीचे काग आलियावर आपणास दुमाले चिट्टी दिधली. कुलकर्ण आपले दुमाले केलें. महजर करावा तों देशमुख व देशपांडे औरंगाबादेस गेले, त्यांची वाट पहात आपला भाऊ मोरो विश्वनाथ पुण्यास राहिला. यावरी देशमुख व देशपांडे आले. त्यापाशीं आपला भाऊ मोरो विश्वनाथ बोलिला कीं, साक्षीप्रमाणें आपणास महजर करून देणें. ते बोलिले कीं, आम्ही जें करूं त्यास तुम्ही राजी आहां ऐसा कागद लिहून देणें. त्यावरून मोरो विश्वनाथ बोलिला जें साक्षीदार गुदरल्या आहेत; हल्लीं ज्योतिष खातों तसेंच कुलकर्ण खाणें म्हणून महजर थाल तर मान्य असो. अगर परस्थळास पाठवाल तर जाऊं. परंतु निवडिलिया अमलास मोघम कागद मागतां, तो उगाच देववत नाहीं. यावरी रामाजी गोत मान्य करीना. आणि ठाणांतून गैर हजर होऊन साहेबाचे शेवेशीं आला. हे तकरीर सही ”

“ तकरीर रामजी कृष्ण गांवखंडेराऊ यानें तकरीर केली जे, मौजे मजकूरचें कुलकर्ण आपले मिराशी आहे. आपला आजा गाऊजी, आपला बाप कृष्णाजी व आपण ऐसें कुलकर्ण कारकीर्द दरकारकीर्द खादलें आहे. पलीकडे ठावकें नाहीं. नाईक पाटील होता, तो आपणास मुशाहिरा नेदी, म्हणून त्यामध्यें व कृष्णाजी गाऊजी आपला बाप यामध्यें कटकट झाली. आपण पोट भरावयास गेलों. मागें लखोबानें कुलकर्ण चालविलें मागुती आपण येऊन कुलकर्ण चालवूं लागलों. त्यावर कारकीर्द महाराज साहेब, रखमाजी पानशी कुलकर्ण चालवीत होता. तो त्र्यंबक विश्वनाथानें ठेविला होता. तो आपणास महाराजांचें खुर्दखत आणिलें. तेणें प्रमाणें ठाणाचें खुर्दखत आणिलें आणि रखमाजीस दूर करून कुलकर्ण चालविलें. म्हणून तकरीर केली. सही ”

सदरहू दोघांच्या तकरीस मनास आणून दोघां वादी यांस म्हटलें कीं, तुम्ही गोताला राजी असाल तर गोतांत पाठवूं. अगर परस्थळास राजी असाल तर परस्थळास पाठवूं. अगर हमशाई गांवांचें मोकदम व मोख्तेसर व मौजे मजकूरचे मोकदम व बारा बलुते यांसी राजी असाल तर त्यांचें गोही वरून मनसुफी करून, जे गोष्टी तुम्हांस मानली ते सांगणें. यावरी रामजी गांवखंडेराऊ बोलीला कीं, पुणीयामध्यें आपणास मनसुफी करितां खोटें केलें आहे, तरी साहेबी भले लोक बैसवून बरहक निवाडा केला पाहिजे. मग गोविंद विश्वनाथ यांस पुशिलें, तूं कोणे गोष्टीस राजी आहे ? त्यावर गोविंद विश्वनाथ बोलिला जे जे गोष्टीस रामजी राजी असेल तेच गोष्टीस मान्य असे. ऐसे राजीनामे लेहून दिल्हे. यावर सभासदी हरदो जणांच्या तकरिराचें उत्तरें मनास आणितां, गाऊजी गांवखंडेराऊ रामजीचा आजा वृद्ध असतां, कृष्णाजी गाऊजी, रामजीचा बाप पानशी यांनीं मुतालिक ठेविला. मौजे मजकूरच्या कुलकर्णाबद्दल ठेविला होता. त्यापलीकडे त्याचा कांहीं भोगवटा नाहीं. रामजी लहान होता. तो थोर जालीयावर महाराज साहेबांचें खुर्दखत आणिलें. त्यामध्यें मालुमानी पांच पिढ्या कुलकर्ण चालविलें,



श्री. सीताबाई सावळाराम पानसे.



श्री. गंगुबाई पानसे, हेडमिस्ट्रेस् पुणें. म्यु. गर्ल्स स्कूल.

ऐसी मालुमात करून खुर्दखत आणिलें तर गाऊजी मजकूर रामजीच्या आज्ञा दाणी याचा पालक पुत्र पि. शी पांच पिढ्यास जागा नाहीं, ऐसें रामजीच्या मुखें खरें झालें; वरकड हीं कलमें रामजीच्या मुखें निरोत्तर झालीयावर रामजी बोलिला जे, मौजे मजकूरचे मोकदम मोख्तेसर व बलुते हमशाही गांवींचे गोहीदार बोलावून आणून त्यांचें गोहीवरून निवाडा केला पाहिजे. म्हणून त्यावरून मौजे मजकूरचे मोकदम व मोख्तेसर वं बलुते व हमशाही गोत हुजूर आणून त्यासी आण प्रमाण घालून पुशिलें. तींहीं गोही दिधल्या

बितपशील:–

कसबे सासवड येथील देशमुख व देशपांडे यांनीं व गांव लोक मिळोन रेऊ नाईक बिरादर देशमुख व अमाजी चिंजवडा नाईक वाडी व महार पाठविले.

**मौजे पिंपोळें**

२ मोकदम
१ चौगुला
१ भानाजी कुलकर्णी
४

**सुपें खुर्द. परगणें सुपें**

१ मोकदम
१ चौगुला
२

**मौजे कुंभारवळण परगणें सुपें**

१ मोकदम
१ चौगुला
२

**मौजे बेलसर, कसबे सासवड**

१ नारो बहिरव कुलकर्णी उमर वर्षें ९३

**मौजे वनपुरी**

१ येमाजी मोकदम
१ महार
२

१२

मौजे दिवें कर्यात सासवड

२ मोकदम
 १ खेरूजी उमर वर्षें ६०
 १ परसोजी उमर वर्षें ४०
१ कमळोजी बिन जानोजी चौगुला उमर वर्षें ४०
१ खंडोजी काळा उमर वर्षें ७०
१ येस मेहेतर माळी " वर्षें ९०
२ महार
 १ बाका उमर वर्षें ८०
 १ बरवा उमर वर्षें ६०

**मौजे सोनोरी**

२

१ माणकोजी बिन हंस पाटील
१ मोरोजी बिन रतन पाटील
२

१ जानोजी बिन दाऊजी बिरादर मोकदम
१ संताजी चौगुला
८ कुलवाडे
११ बलुते
 १ सुतार

**मौजे अंबोडी**

१ मावजी मोकदम
१ भानजी कुलकर्णी याची आर्दास

१ महार

३

१ वहीर दरणा
१ पीळ बरटा
२ चांभार
  १ मारुती
  १ निसणा

२

१ लक्ष्मी कुंभार
१ जैबा न्हावी
१ बहिरा धडसी
२ महार
  १ तुळज्या
  १ परसा
१ नाना मांग

१७

**मौजे हिवरे, तर्फ कऱ्हेपठार**

आर्दासा पाठवून दिल्हा आपल्या नांगरानिशी

१ लोणी काळभोर
१ आळंदी

२

येणेंप्रमाणें गोहीदारांस महारकुंड व चांभारकुंड काढून मांगी महारीचें वस्त्र तुमचे शिरीं आपलाले पूर्वज स्मरोन जैसें यथार्थ असेल तैसें सांगणें, म्हणून शपथ घातली. यावर गोहीदारीं गोही दिधली जे, मौजे मजकुराचें ज्योतिष व कुळकर्ण गिधवे मिरासदार होते. त्यांहीं पानशी यांच्या वडिलांस मिरास लेकराचे लेकरीं दिल्ही, हें आपणास ठावकें आहे. हें सत्य ऐसें. खेरीज जानोजी बोलिले. जानोजी बिन बैजी बिरादर मोकदम मौजे मजकूर हा बोलिला कीं, रामजी गांवखंडेराऊ हा मिराशी कुळकर्णी ऐसें आपला बाप बैजीनें सांगितलें होतें. तें खरें. ऐशी गोही (साक्ष) गुदरली व समस्ताजणांची एकच गोही गुदरली, आणि एकल्या जानोजीची निराळी गोही झाली. सदरहू गोही जाहली याबद्दल दोघांचाही कुसुर तुटावा याबद्दल हरदोजणास दिव्य नेमिलें. श्री अमृतेश्वर मुक्काम मौजे मोहरी बुद्रुक तर्फ गुंजणमावळ तेथें दोघांनीं वेगळालें दिव्य करावें. तपेली दोन व ताम्हणे दोन, रवे दोन तेल तूप एकसारखें वजन करून लावून बराबरीच दिव्य करावें. खरा होईल तो मिरास लेंकराचे लेंकरीं खाईल. खोटा होईल तो मिराशी वेगळा. दोघांही खरे झाले तर दोघांहीं निमे (निम) वांटून द्यावें. दोघे खोटे झाले तर दुरीच करावें. ऐसा तह होऊन दोघां वादीयांस पुशिलें. सदरहू प्रमाणें राजी झाले. यावरी हुजरून आवाजी मोरदेव चिटणीस मिरासदार, मौजे चिमण-

गांव, परगणे वाई व मलकाजी बिन वाघोजी कदम हल्लीं चाकर हुजुरात व गोहीदार सदरहू पैकीं मौजे मजकुराचे मोकदम व बलुते छ ०......राजानी मोहरीस पाठविले. तेथें मोहरीचे मोकदम व वाजे प्राश्निक लोक हमशाही गोत मिळोन दोघे वादी यांचीं उत्तरें मनास आणितां बोलिले वितपशील:—

गोविंद विश्वनाथें सांगितलें जें गिधवे पहिले मिरासदार होते तेही आपल्या वडिलास मिराशी करून दिल्ही हें सत्य.

रामजी कृष्णें सांगितलें जें आपण मिरासदार गिधवी यासी व पानशी यासी या मिराशीचा संबंध नाहीं. आपला आजा व बाप आपण कुलकरण खात आलों हें खरें.

येणेंप्रमाणें उत्तरें आयकोन गोहीदारांस पुशिलें. गोहीदारीं सदरहू लिहिलें तेणेंप्रमाणें साक्ष दिल्ही. यावरून रामजी मजकूर खोटा जाहला. या उभयतांपासून दिव्य करावें नलगे; ऐसें स्थळीचें प्राष्णिक बोलिले यावर आबाजी मोरदेव मलको हुजुरून पाठविले होते; हे व कोणी प्राष्णिक बोलिले जे, राजश्री...साहेबीं उभयतांस दिव्य करावयासी पाठविलें आहे. यापासून दिव्य न घेतां दोघांचें भांडण दूर होत नाहीं. श्री देवावरी भार देऊन निवाडीयाबद्दल स्थळास पाठविलें आहे. ती देवापुढें व अग्नीपुढें अकसकोसीस होणार नाहीं. दिव्यीं जें निवडेल तैसें दोघी वर्ततील. ऐसे बोलोन वेगवेगळालीं तपेलीं, वेगळालीं ताम्हनें, व वेगळालीं मंडळें व वेगळालीं तेलें, तुपें एकसारखीं व वेगळाले रवे एकसारखें वजन करून बराबरीच दिव्य करविलें. हरदोजणांचे शिरीं चीरपत्रें बांधोन मंडळें चालत आहे. आधीं गोविंद विश्वनाथें रवा काढून बाहेर ठेविला. गोविंद विश्वनाथ खरा झाला. रामजीनें ताम्हनांत हात घालून रवा काढितां बोटें जळालीं म्हणून रवा ताम्हनांतच टाकिला. पुरता रवा बाहीर काढिला नाहीं. बोटें भाजलीं; रामजी खोटा झाला. तेच समयीं तेथल्या लोकांस कळलें. मग पिशवी घालून लखोटे करून तिसरे दिवशीं मंगळवारीं हातां पाहिले तों गोविंद विश्वनाथ खरा झाला. रामजीचीं बोटें पोळलीं, तो खोटा जाहला. थळींचे निवाडीयाप्रमाणें निवाडपत्र घेऊन, हरदो घेऊन राजगडास आले. हुजुरूनही तमाम खलके हात पाहिले तों गोविंद विश्वनाथ निर्मळ खरा झाला. यावरून मौजे मजकुराचें कुळकर्ण, ज्योतिषपण लेंकरांचे लेंकरीं औलाद अफदाल चालवणें. रामजीचे हात पहातांच पांच ही बोटें भाजलीं. तो खोटा झाला. मिराशी वेगळा देवें केला. रामजीस अगर त्याचे भाऊबंद व दाईज गोत्रज असतील त्यांस मौजे मजकूरच्या कुळकर्णासी संबंध नाहीं. खोटा झाला तो दूर केला. अर्थाअर्थी संबंध नाहीं. येणेंप्रमाणें निकाल झाला. त्यास हिंदू होऊन अन्यथा करील त्यास काशीमध्यें गोहत्या व ब्रह्महत्येचें पातक असे; मुसलमान होऊन अन्य सारिखे करील त्यास मक्केमध्यें सोर मारल्याचें दोजक असे. गांव खंडेराऊ कित्येक मालु मातीची व वकिलातीचे बळें कागद दिवाणांतील व गोतांचे करून घेतले असतील, ते कुळीं रद्द असेल. गोविंद विश्वनाथानें लेकरांचे लेंकरीं औलाद आफलाद

परंपरेनें मोजे मजकूरचें कुळकर्ण व ज्योतिष खाऊन असावें. येणेंप्रमाणें निवाडा झाला आहे तर वर हुकूम निवाडा अंमल करणें. तालीक देऊन अस्सल पत्र गोविंद विश्वनाथ यासी परतोन देणें म्हणून महजर कैलासवासी स्वामीचा १

"दानपत्र शके १५४९ प्रभवनाम संवत्सरे, अश्विन शुद्ध त्रयोदशी, भृगुवासर ते दिवशीं लुखोबा परशुराम व विसाजी परशुराम पानशी कुळकर्णी व ज्योतिषी मौजे दियें कर्यात सासवड व मौजे सोनोरी तर्फ कऱ्हेपठार, परगणे पुणें यांसी रंगो त्र्यंबक व गणेश त्र्यंबक गिधवे, नमस्कार लेहून दिल्हे .ऐसे जे, आपले वडिलीं वेदमूर्ति लक्ष्मीधर भट पानशी यांस दोनी गांव ज्योतिष व कुळकर्ण दान दिल्हें. आमचे वडील काशीवास करावयासी गेले. त्यास त्यांचें देहावसान भागीरथी-तीरीं झालें. त्यास सांप्रत शके १५२७ रंगभट राख्ये तेथें आले. त्यांनीं आम्हांस वर्तमान सांगितलें कीं, तुमच्या वडिलांची वृत्ति पानशी बळें च खात आहेत. हे तिसरी पिढी चालत आहे. दत्तोबा राख्या तिसी तुमचे वृत्तीबद्दल भांडला. त्यास लुखोबानें तोंडचे तोंडीं मारला. त्यावरून आपण तुम्हांस वर्तमान सांगावयासी आलों. तुम्ही जाऊन आपली वृत्ति खाणें. वृत्तिसाठीं संन्यास ग्रहण. थोडे वृत्ति संरक्षण करावें. ऐसा बहुत प्रकारें बोध करून आम्हांस इकडे पाठविलें. त्यास आपण येथें आलों, तुमची भेट झाली. तुम्हांस वर्तमान पुशिलें त्यास तुम्ही आमच्या वडिलांचे नांवाचें व दस्तुरचें दानपत्र दाखविलें कीं, आमचे वंशीचा अवलाद आफलाद कोणी तुम्हास वृत्तीच वाद सांगेल त्यास गोहत्येचें, मातृगमनाचें, सुरापानाचें, व ब्रह्महत्येचें पातक असे. तुम्ही लेंकराचे लेंकरीं सुखी वृत्ति खाणें. आमचे अवलाद आफलादेस तुम्हांसीं भांडावयासी संबंध नाहीं. आपले वडिलीं लक्ष्मीधर भटाचे पाय धोवून दान दिल्हें. व दानपत्र लेहून दिल्हें. तें तुम्ही आम्हांस दाखविलें. त्या आपणांस वडिलांचें पत्र प्रमाण झालें. त्यावर तुम्हीं बोलिलेस कीं, आपलेंही पत्र करून देणें. त्यावरून हें पत्र तुम्हांस लेहून दिल्हें असे. सुखें लेंकरांचे लेंकरीं खाणें. आपली जे अवलाद आफलाद त्यास तुम्हांसी भांडावयाची गरज नाहीं. दोही गांवचें ज्योतिष, कुळकर्ण दरोबस्त सुखें खाणें. हें लिहिलें सही. बितपशील रंगो त्र्यंबक गिधवे. ओळी सुमार २५ पंचवीस. सही.

गोही

मोकदम मौजे दियें निषाणी नांगर ...१
पांडुजी वंजार मौजे दियें ...१
मालजी भापकर दियें ...१
भिळा वरटा
नाइकजी बिन मावजी पाटील ई बिन
बलुजी पाटील काळे मोकदम मौजे
गांव मेहेतर चांभार ...१
जानोजी चौगुले मौजे दियें व कुळवाडी
मौजे सोनोरी ... १
खंडोजी गाढवे कुळवाडी. मौजे सोनोरी १
भिका सुतार ...१
बहीर दरणा ...१

सोनोरी निशाणी नांगर ...१
येस माळी मौजे दियें ...

तिमनाक महार ...१

प्रमाणें दानपत्र बार असे.

"अजीज पत्र शके १५६० किलकनाम संवत्सरे, माघ वद्य प्रतिपदा, मंदवासर मुक्काम राजगड, ते दिवशीं गोविंद विश्वनाथ पानशी यासी रामजी कृष्ण गांवखंडेराऊ वस्ती कसबे सासवड सुरू सन तिस्सा तिसैन अलफ सन १०७८ कारणें अजीज पत्र लेहून दिल्हें ऐसें जे; मौजे सोनोरी, तर्फ कर्‍हेपठार, परगणें पुणें येथील कुळकर्णावर तुमचे चुलते लुखो परशुराम यांनीं आपल्यास मुतालक ठेविलें होतें. लुखोबामध्यें व पाटलामध्यें मुशाहिऱ्याबद्दल कटकट झाली. याजकरितां आपले कारकीर्द पावेतों कुलकर्ण चालविलें कित्येक काजिये तुम्हांस बेइमान सांगितले. कागदपत्र हीं माळुमातीचे आणित गेलों. त्यास तुम्ही आम्ही भांडत महाराजसाहेब यांजवळ आलों. महाराजसाहेबीं हमशाही गोताचा व पांढरीच्या साक्षी मनास आणितां; गिधवे यांचे दोन्ही गांव मौजे मजकूर व मौजे दिये गिधवे यांनीं पानशी यास दान दिल्हे, आणि ते काशीस गेले. त्यावरून महाराज साहेबीं हरदोजणांस दिव्य नेमून दिल्हें.' मौजे मोहरी तर्फ गुंजणमावळ येथें दिव्य करावयासी पाठविलें. तुम्हीं व आपण वेगळाले दिव्य केलें. तुम्ही खरे झालेस. आपणास रवा लागला. खोटा जाहलों. मिरासी वेगळा देवें केलें. देवाघरीं व राजघरीं व गोतघरीं खोटा जाहलों. तमाम खळके तुम्ही खरे म्हणोन टाळी पिटली. मग सभानायकीं आपणांकडून तुम्हांस पत्र लेहून देविलें तें दिल्हें. तर सुखरूप लेंकरांचे लेंकरीं तुम्हीं कुळकर्ण व ज्योतिषपण मौजे मजकूरचें खाणें. आपणांस व आपले वंशिज्यास व दाईज गोत्रजांस तुम्हांसी वृत्तीविषयीं भांडावयासी संबंध नाहीं. आपले घरीं वतनाविषयीं कित्येक कागदपत्र असतील ते कुळरद्द असेल. सानीनहाल आपला कोणीं तुम्हांसी काजिया करील तर गोताचा अन्यायी, दिवाणाचा गुन्हेगार. तुम्हीं सुखरूप आपलें वतन खाणें, हें लेहून दिल्हें. सही बिनतपशील अजमासें ओळी ३१ अस्सल पत्रीं.

गोही

मुकुंद कान्हो देशपांडीये परगणे पुणें १
रंगो माणकेश्वर जोशी कुळकर्णी मौजे बोपगांव परगणे पुणें ...१
मोकदम मौजे दियें निशाणी नांगर ...१
वाघोजी वीर माने मौजे दियें ... १
बैजो मुकुंद कुळकर्णी मौजे मोहरी बुद्रुक तर्फ गुंजणमावळ ...१

विठ्ठल पिलदेव सुभेदार प्रांत मावळ
नारो बहिरव कुळकर्णी व जोशी मौजे बेलसर ...१
माणकोजी व मोराजी पाटील मोकदम मौजे सोनोरी निशाण नांगर १
येस माळी मेहेतर मौजे दियें
तुका महार ...१

मालजी भापकर मौजे दियें ...१ नाना मांग ...१
जानोजी चांगुले मौजे दियें ...१

अजीज पत्र गोही साक्षीनिशीं

" थळपत्रें बेशमी श्रीसकळगुणसंपन्न सौजन्यसिंधुशिरोमणी परउपकार मूर्ति राजमान्य राजश्री राजमुद्रा व मोकदम शेटिये महाजन मौजे सोनोरी, तर्फ कऱ्हेपठार परगणें पुणें गोसावी यांस–राजमुद्रा व मोकदम व शेटिये महाजन महास्थळ महाप्रयेशिक सभा समर्थ मौजे मोहरी वुद्रुक तर्फ गुंजणमावळ सुरू सन तिस्सा सितैन अलफ. नमस्कार व अनुक्रमें रामराम विनंति उपरी, राऊळाचे गांवींचें कुळकर्ण अग्रवादी गोविंद विश्वनाथ पानशी व पश्चिमवादी रामजी कृष्ण गांवखंडेराऊ यांमध्यें मौजे मजकूरच्या कुळकर्णाचा कथला होता. याबद्दल हरदोजण राजश्री राजेसाहेब यांस राजगडास भांडत गेले. त्याउपरी राजेसाहेबीं ही गोष्ट मनास आणून निवाडा करीत होते. त्याउपरी हरदोजण दिव्य करावयास कबूल जाहले. मग साहेबीं बरावर आबाजी मोरदेव देऊन आपला हातरोखा आपणास पाठविला कीं, गोविंद विश्वनाथ पानशी व रामजी गांवखंडेराऊ या दोघांस मौजे सोनोरीच्या कुळकर्णाबद्दल भांडण लागलें आहे, त्यांस दिव्य करावें, ऐसा तह जाहला. हरदोजण दिव्यास कबूल झाले. तरी दोघांकडून दिव्य वेगळालें च करविणें. म्हणोन रोखा राजश्री आबाजी मोरदेऊ याबरोबर देऊन पाठविलें. त्याउपरी तेथें दोघांनीं तकरिरा लेहून दिल्ह्या.

" अग्रवादी गोविंद विश्वनाथ पानशी तकरीर केली कीं, मौजे सोनोरी, परगणें पुणें, येथील कुळकर्ण गिधवी यांचें, आपण उपाध्ये गिधवी यांचे, त्याउपरी गिधवे वाराणशीस जावयास निघाले, आणि आपले वडिलांस पाय धोवून दिधलें. याउपरी आपले वडील भट होते त्यांस लिहितां येत नव्हतें याबद्दल कित्येक मुतालीक ठेवीत गेले. त्यावरी आपले वडील लेहूं शिकलीयावरी कुळकर्ण चालवूं लागले त्याउपरी मुशाहिऱ्याबद्दल आपला चुलता लुखोबा घरीं रूसोन राहिला. मग रामजीचा बाप कृष्णाजी गाऊजी शेत करून बोवाडियानें होता. वस्ति सासवडीं असे. त्याउपरी कृष्णाजी मुतालीक करून ठेविला. यावरी आपला वडील चुलता मेला. त्यावरी कृष्णाजीनें चालविलें. त्या अलीकडे रामजी चालवीत होता. त्यावरी दोन वेळां हटकिलें, मग गैरहजीर झाला. आतां हल्लीं आपण रामजीस हटकिलें. त्यास रामजी म्हणतो कीं, कुळकर्ण आपलें, हें गिधवी यांचें हि नव्हे व तुमचें ही नव्हे म्हणतो, तरी हें लटकें. हा आपला मुतालिक खरा. आपणास गिधवी यांनीं पाय धोवून मिराशी दिधली आहे हें खरें, आपली वृत्ति होय हे तकरीर केली. "

" पश्चिमवादी रामजी कृष्ण गांवखंडेराऊ तकरीर केली ऐशीजे, मौजे सोनोरीचें कुळकर्ण आपली मिरास होय आपले वडिली पिढी दर पिढी, बाप, आजा व आपण खात येतों. ऐसें असतां हल्लीं गोविंद विश्वनाथ पानशी हा उभा राहिला आहे

कीं, मौजे मजकूरचें कुळकर्ण गिधवी यांचें. गिधवी वाराणशीस जातां आपल्या वडिलास पाय धोवून दान दिल्हें आहे. कुळकर्ण आपलें म्हणतो व आपणास मुतालिक ही म्हणतो. तरी आपण मुतालीक नव्हे, हें आपलें मिराशी होय. मौजे मजकुरास गिधवी यांस व पानसी यांस संबंध नाहीं. ऐसें आपण दिव्य करीन. देव देईल तरी घेईल ऐसी तकरार केली. ”

सदरहू प्रमाणें हरदोजणीं तकरिरा केल्या. हरदोजण दिव्यास राजी झाले. मग सदरहू प्रमाणें दिव्य करावें. ज्यास देव देईल त्यानें घ्यावें, ऐसें आमचे स्थळीं झालें. मग शनवारीं हाताचीं नखें हात धोवून हातीं पिशव्या घातल्या, सवेंच आदितवारीं पहिलें प्रहरीं तेल तूप आणून वेगळालें जोखून दोन्ही ताम्हनें मांडून टकबंदी अडीच अडीच शेर तेल तूप ऐसे लावून एक एका ताम्हनांत घातलें, ऐशीं ताम्हनें एक्याच पळामध्यें मांडून आंत रवे टाकून दोघांनीं बरावर दिव्य केलें. त्यावरी मागती दोघांचे हातीं पिशव्या घालून ठेविले. सवेंच सोमवारीं जाहला. मंगळवारीं हात पाहिले. हुजूर आबाजी मोरदेऊ. या उपरी रामजी कृष्ण खोटा जाहला. अग्रवादी गोविंद विश्वनाथ पानशी दिव्यीं खरा जाहला. मौजे मजकूरचें कुलकर्ण गोविंद विश्वनाथ पानशींचें सांभाळीं केलें. रामजी कृष्णास पुढें लेकराचे लेकरीं कुलकर्णास अगर जोसपणास संबंध नाहीं, ऐसा निवाडा जाहला. ते वख्ती सोनोरीकर व दिवेंकर हजीर होते. कळलें पाहिजे व रामजीच्या जामिनदाराकडून गोविंद विश्वनाथाचे पैके दिव्याचे टके चारूके १९॥।६ देविले पाहिजेत व रामजीपाशीं कुलकर्णाचे कांहीं कागदपत्र असतील ते रद्द असेत. राजगृहींचे व गोतपतीचे जे असतील ते कुळीं रद्द• असेत. तुम्ही या निवाडियाप्रमाणें त्यांचें कुलकर्ण सांभाळीं करणें शके १५९० कीलकनाम संवत्सरे, माहोशुद्ध त्रयोदशी, बुधवार एकूण पत्र ओळीखेरीज तकरिरा १०० शंभर हे विनंती. ” येणेंप्रमाणें चार पत्रें आणून तीं मनास आणितां निर्णय जाहलीं आहेत. याजकरितां स्वामी तुम्हांवरी कृपाळु होऊन हल्लीं हें नूतन पत्र करून दिल्हें आहे. त्याचे वंशीचा अगर गोत्र पुरुष कोणी असेल त्यास व रामजी गांवखंडेराऊ सोनोरीच्या कुलकर्णाकरितां भांडत होता तो दिव्य मुखें खोटा जाहला. त्याच्या वंशीजास अगर गोत्र पुत्रास व पूर्वीं दियाच्या व सोनोरीच्या वृत्तीस पाडांगळा उभा राहिला होता, ते समयीं तुमचा वडील विसाजी परशुराम पानशी यानें म्हैसळला दिव्य केलें. तेव्हां पाडांगळा खोटा जहाला, त्यावर खंडो मुरार जेजुरकर यांचे वंशीचा अगर त्याचा गोत्र पुत्र कोणी असेल त्यास हरदो गांवांशीं संबंध नाहीं. पाडांगळ्यापाशीं व गांवखंडेरावापाशीं वतन संबंधें कागद असतील ते रद्द असेत. तुम्ही आपले पुत्र पौत्रादि वंशपरंपरेनें हरदु गांवींचें ज्योतिषपण व कुलकर्ण अनुभवून सुखरूप राहणें, व जानोजी बिनहोजी काळा बिरादर मोकदम मौजे सोनोरी यानें रामजी कृष्ण गांवखंडेराऊ वतनदार खरा म्हणून लटकी गोही दिल्ही होती, याजकरितां महाराज राजश्री थोरले कैलासवासी त्याची जीभ कापीत होते. ते समयीं तुमचा आजा

गोविंद विश्वनाथ यांनीं दरबार खर्च करून जानोजी मजकुरास सोडविलें. याकरितां त्यानें व समस्त गांवकरी यांनीं गोविंद विश्वनाथ यास सदरहू दरबार खर्चाचे ऐवजीं तरटी ( शेताचें नांव ) चें शेत, गांव निसबतीनें जमीन डाग रूके ८६ चा इनाम करून दिल्हे आहे. ते ही तुम्ही आपले पुत्र-पौत्रादि वंशपरंपरेनें अनुभवीत जाणें. सदरहू जमिनीचा राजभाग होईल तो गांवकरी यांनीं तुम्हांस शेत दिल्हें ते समयीं पत्र लेहून दिल्हें आहे, त्याप्रमाणें गांवकरी देतील. गांवकऱ्यांच्या कराराप्रमाणें सदरहू शेत अनुभवून सुखरूप राहाणें. शके ९८ दुर्मती नाम संवत्सर, फालगुन शुद्ध चतुर्दशी, मंदवासर सुरू सन इसन्ने आर्बैन मया व अलफ येविषयीं पत्रें छ १७ सफरः—

१ मोकदम मौजे दियें व सोनोरी
१ मुख्य पत्र
१ देशमुख देशपांडे
१ देशाधिकारी
—
४

---

# परिशिष्ट दुसरें.

**महाराज शहाजीराजे यांनीं शके १६६० कालयुक्त नाम संवत्सरे कार्तिक शुद्ध १३ इंदुवासरीं महजर करून दिला त्यांतः—**

बाबाजी निंबाजी पानसी यांस विसाजी परशुराम यांचे वंशांतील माणको विश्वनाथ वगैरे पांच भाऊ यांनीं लेहून दिलें कीं, सोनोरी येथील ज्योतिष कुळकर्ण पानसी यांचें पुरातन असून त्यावर रामजी बिन कृष्णाजी या नांवाचा गुमास्ता ठेविला होता. यांनीं त्या वृत्या बळकावून ते त्यावर मालकी सांगूं लागले. त्यावरून निंबाजी बाबाजी यांचे वडील रखमाजी बापूजी, बाबाजी बापूजी, शिवाजी बापूजी व गोमाजी बापूजी या चौघांस वाद घालण्यासाठीं मदतीस बोलाविलें. त्यांनीं आपली परिस्थिति वाद घालण्यासारखी नाहीं, सबब तुम्हीं वाद घालावा असें सांगितलें. त्यावरून राजगड मुक्कामीं राजे साहेबांचे दरबारीं वाद सांगितला. त्यांनीं मोहरी मुक्कामीं अमृतेश्वरीं दिव्य करावें असें ठरविलें. दिव्य करण्याकरितां सर्वांच्या तर्फे गोविंद विश्वनाथ तयार झाले. अष्ट प्रधानांचे कारकून व हुजरे यांच समक्ष मोहरीं मुक्कामीं दिव्य केलें. त्यांत पानसी खरे ठरले. या कामीं सोनोरी येथील जानोजी बिन बाऊजी काळा यांनीं खोटी साक्ष पानशाचेविरुद्ध बाजूनें दिली. सबब महाराज साहेब यांनीं त्याची जीभ कापावी असा हुकूम केला. महाराजापुढें जीभ कापण्याचे वेळीं गोविंद विश्वनाथ पानसी यांनीं रदबदली केली व

संकटांतून त्यास सोडविलें. वरील प्रमाणें जयपत्र घेतल्यावर गांवास परत आले. नंतर रखमाजी बापूजी व बाबाजी बापूजी यांस दिव्य करण्याचे कामीं जो खर्च जाहला त्याची वांटणी मागितली. त्यांनीं खर्च देण्यास सामर्थ्य नाहीं. तुम्हीं श्रम, मेहनत व खर्च केला आहे, तरी सर्व उत्पन्न तुम्हीं खावें असें सांगितलें व त्याप्रमाणें त्यांनीं स्वसंतोषानें लिहून दिलें. पुढें ६०–६५ वर्षांनीं निंबाजी पानसी यांनीं वतनासंबंधानें पूर्वीं जाहलेल्या खर्चाचा हिस्सा घेऊन आमचें वतन आम्हांस द्यावें म्हणोन तंटा करण्यास आरंभ केला व दिवे येथें १–२ वेळां व वाघोली तर्फ हवेली येथें पिलाजी जाधव यांचे समक्ष १–२ वेळां तंटा तोडण्यासाठीं बैठिकी भराविल्या. परंतु कांहीं उपयोग जहाला नाहीं. नंतर बाबाजी मोरेश्वर व संभाजी माणकेश्वर पानसी यास परभारें एकटे गांठून त्यांस दाखवून व शिवाय जाधवांचे वजनावर निंबाजीपंतानें जोशी कुलकर्णपणांत आपले हिश्याबद्दल लिहून घेतलें. हे बाकीचे भावास समजल्यावर त्यांनीं पुरंदर मुक्कामीं बापूजी श्रीपत हकमाकडे या बाबत तक्रार केली. त्यांनीं निकाल होईपर्यंत उत्पन्न जप्त केलें. पुढें बरेच दिवसपर्यंत या प्रकरणाचा निकाल लागला नाहीं.

पुढें भुतोपंतांनीं मिळविलेलीं निरथडीचे पांच गांवांतील वतनें जिवाजी साबाजी, महादाजी चिंतामण, खंडो नागनाथ, कान्हो केशव पानसी हे दोन पिढ्या खात आहेत, त्याचे वांटणी संबंधानें सातारा येथें नारो शंकर पंतसचिव जिल्हेदार यांस भेटून त्यांचे समोर तक्रार केली. त्यांनीं मौजे चांदक प्रांत वाई ही जागा वादाचा निकाल करण्यासाठीं ठरविली. त्या वेळीं महादाजी चिंतामण पानशी यांनीं सांगितलें कीं, परभुणे यासी वाद करून शिरवळ मुक्कामीं दिव्य केलें; त्याबद्दलचा खर्च व्याजासुद्धां देणें व आपला हिस्सा घेणें. एकंदर खर्च पन्नास होन जाहले आहेत. तो दिल्यावर तंट्याचा आपसांत निकाल झाला. परंतु सोनोरीचे तंट्यामुळें एकंदर तंटा तसाच अपुरा राहिला. त्यावर लक्ष्मण माणकेश्वर हे श्रीमंत राजश्री बाजीराऊ पंडीत प्रधान याजकडेस मौजे खेडे राजोरी प्रांत मिरज येथें येऊन फिर्याद केली. त्यांनीं मल्हार तुकदेव पुरंदरे व महादाजी आबाजी पुरंदरे देशपांडे कर्यात सासवड यांस पंच नेमून कज्याचा निकाल करण्यास सांगितलें. आपसांत निकाल झाल्यास उभय पक्षीं उत्तम असें पुरंदरे यांनीं सांगितल्याबरून पानसी भावांनीं एकत्र बसून निकाल केला तोः—

१ सोनोरी गांवचें कुलकर्ण विसाजी परशुराम याचे वंशजानीं खावें. व त्यांनीं आपले बंधु रामजी परशुराम व कृष्णाजी परशुराम यांचे हिश्यांचे त्यांना द्यावें.

१ सोनोरी गांवचें ज्योतिष अर्धें निंबाजी पानसी यांनीं खावें व अर्धें विसाजी परशुराम, कृष्णाजी परशुराम व रामजी परशुराम यांनीं खावें.

१ भोळी, तोंडल, गुणंद व लोणी येथील जोशी कुलकर्णपणाचीं वतनें परसाव्यांचे. वंशजांनीं खर्च केल्यामुळें, निंबाजीचे घराण्यांत एक चतुर्थांश राहिलीं व बाकीचीं परसाव्याकडे आलीं.

वरील प्रमाणें एकमेकांचे सहीचे कागद पुरंदरे यांचे समक्ष एकमेकास स्वदस्तूरचे करून दिले.

---

## परिशिष्ट तिसरें.

**मौजे गिर्वी तालुके इंदापूर जिल्हा पुणें हा गांव इनाम व मौजे शेटफळें येथील जमिनी इनामः—**

खंडो शिवाजी पानशी यास, शाहु छत्रपति स्वामी यांनीं कृपाळू होऊन कुटुंबाचे योगक्षेमार्थ गिर्वी गांव व कसबे बावडें येथें एक चाहूर जमीन व मौजे शेटफळें येथें अर्धा चाहूर जमीन इनाम दिली. सदरचा गांव व जमीन, स्वराज्य व मोगलाई एकूण दुतर्फा इनाम, तिजाई व बाबती, सरदेशमुखी व साहोत्रा, हर्ली पट्टी व पेस्तर पट्टी, जल-तरू-काष्ट-पाषाण-निधि-निक्षेपसहित, खेरीज हक्कदार, कुलबाब, कुलकानु, दरोवस्त इनाम, महाराजांनीं छ ५ जमादिलावल, सन सलाम आर्बैन मया व अलफ. ( शके १६६४ आषाढ शुद्ध अष्टमी ) रोजीं दिला.

---

## परिशिष्ट चवथें.

**सोनोरी येथील इनाम जमीन.**

मौजे सोनोरी येथें श्रीमंत बाळाजी बाजीराव प्रधान यांनीं माधवराव शिवदेव, यशवंतराव लक्ष्मण, केशवराव लक्ष्मण, महिपतराव लक्ष्मण व रामचंद्र लक्ष्मण यांना योगक्षेमार्थ पंधरा बिघे जमीन छ २९ रबिलावल सु॥ अर्बा खमसैन मया व अलफ रोजीं इनाम दिली ( शके १६७५ माघ शुद्ध प्रतिपदा ).

---

## परिशिष्ट पांचवें.

### सावरदरी येथील निम्मे मोकदमी.

शके १६८८ व्ययनाम संवत्सरे, कृष्णाजी, माधवराव व भिवराव यशवंत ये बीन लक्ष्मण माणकेश्वर पानसी यांनीं, हुजूर कसबे पुणें येथें येऊन श्रीमंत माधवराव बल्लाळ पंडित प्रधान यांना विनंति केली कीं, मौजे सावरदरी येथील दरोबस्त मोकदमीपैकीं,

निम्मे कणशाची व निम्मे राऊताची. त्यास येसाजी वल्लद महादाजी, सखाजी वल्लद जिवाजी, गोविंदजी वल्लद निंबाजी कणसे यांस कर्ज फार जहालें. तेव्हां, त्यांनीं तें वारण्यास आमच्या घरीं सोनोरी मुक्कामीं येऊन, आम्हांस आपली मोकदमी अर्धी १००१ रुपयांस खुषखरेदी शके १६८१ पार्थिव नाम संवत्सरे माहे आश्विन शुद्ध पंचमी गुरुवारीं दिली. त्यास भोगवट्यास पत्रें करून दिलीं पाहिजेत. निमे मोकदमी दरोवस्त मानपानासह खरेदी दिली. याचा वितपशील:—

१ गांव नांगर वरते नांव पानसी खालते नांव राऊत.
१ पोळ्याचा बैल, बरावर.
१ शिराळ शेट बरावर.
१ गौरी गणेश बरावर
१ दसऱ्याचे गाडु ( ? ) पैकीं निमे
१ कोळ्याच्या ( कुंभाराच्या ? ) घागरी दोन, दोघांनीं घ्याव्या.
१ माळ्याची शेज निमेनिम.
१ साळ्याचे मागास पासोडी १ निमेनिम.
१ टिळा विडा, आधीं पानसी, मग राऊत.
१ धनगराचे मागास, चवाळे १ निमेनिम.
१ तेली याचे घाण्यास, तेल दररोज पावशेर पैकीं निमे.
१ इनाम पासोडी ( शेत ) जिराईत, खंडी १, पैकीं निमे.
१ दिवाळीची ओंवाळणी, पैकीं निमे.
१ चांभाराचे जोडे २ पैकीं निमे
१ सणाच्या मोळ्या, महाराच्या पैकीं निमे.
१ महाराची राबराबवणूक बरोबरीनें घ्यावी.

१ गुऱ्हाळास ढेप १, पैकीं निमे.
१ संक्रांतीस सुगडें दोघांची.
१ पानें विड्याचीं तांबोळी याचीं दररोज दुकानास १३ पैकीं निमे.
१ वानवळा होईल, त्यांपैकीं निमे.
१ बाजे हक्क, पाटीलकीसंबंधीं उत्पन्न होईल त्यापैकीं निमे.
१ घाटा व टोल रहदारी येईल, त्याचे निमे
१ घरठाणा निमे, मोकदमीचा तुमचा निमे राऊत.
१ होळीच्या पोळ्या २, पैकीं निमे.
१ दिवाणाचे शिरपांव ( पोषाक ) २ आधीं पानसी मग राऊत.
१ गांवांत लग्नमुहुर्ताचा शक, पैकीं निमे.
१ डाका, गोंधळ व मुहूर्त यांचा विडा, खोबऱ्याच्या वाट्या वगैरे उत्पन्नाचा निमे.
१ मिराशी शेतें, गतकुळी आहेत, त्यास, मिरास उभयतांनीं आपआपली निमे घ्यावी. गतकुळें दोघांनीं निमे वांटावी.

येणेंप्रमाणें मानपानासुद्धां मोकदमी ( निमे ) विकत घेतली. त्यावरून ती पेशवे सरकारांनीं मान्य करून पानसी यांस सनदपत्रें करून दिलीं.

# परिशिष्ट सहावें.

## मौजे खामगांव ( टेक ) येथील इनाम.

शके १६८२ आश्विन शुद्ध द्वादशी. सु॥ इहिद्दे सितैन मैया व अलफ रबिलावल छ ११ रोजीं श्रीमंत बाळाजी बाजीराव प्रधान यांनीं, कृष्णाजी माधवराव, भिवराव यशवंत, व्यंकटराव केशव, महिपतराव लक्ष्मण व रामचंद्र लक्ष्मण पानसी यांना मौजे खामगांव ( टेक ) या गांवीं अर्धा चाहूर जमीन इनाम करून दिली आहे, जाणिजे, आज्ञा प्रमाण.

---

# परिशिष्ट सातवें.

## ( पत्र दुसरें. )

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री सखाराम भगवंत गोसावी यांसी, पोष्य माधवराव बल्लाल प्रधान, नमस्कार, विनंती, उपरी येथील कुसल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणें, विशेष विठ्ठल राम पानसी यांची असामी किल्ले वंदनास होती, त्यास साल मजकरीं किल्ला तुमचे निसबतीस दिला. तेव्हां त्यांस बिघे ०१५ जमीन देऊन आसामी दूर केली. त्यास सदरहू ०१५ जमीन बेहड्यास नेमून दिली आहे. त्याशिवाय मौजे कालंगवाडी संमत निंब पैकीं पड जमीन बेहड्यास वजा घातली आहे. त्या जमिनीपैकीं जमीन बिघे ०१० हल्लीं करार करून दिली असे. तरी पेशही ०१५ बिघे जमीन दिली आहे; त्याशिवाय, सदरहू ०१० बिघे साल दरसाल चालविणें. जाणिजे छ ३ रबिलावल सु॥ सबा सितैन मया व अलफ. बहूत काय लिहिणें हे विनंती ( हें पत्र शके १६८८ च्या श्रावणांतील आहे ).

---

# परिशिष्ट आठवें

## ( पत्र ३ रें )

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री चिटकोपंत स्वामी गोसावी यांसीः–पोष्य सखाराम भगवंत नमस्कार, विनंती उपरी, येथील कुशल जाणोन स्वकीये लिहिणें, विशेष. राजश्री विठ्ठल राम पानसी यांची असामी किल्ले वंदनाकडे होती. ती सरकारांतून

दूर करून, पंधरा बिघे जमीन मशार निल्हेस नेमणूक करून दिल्हे आहे. त्याप्रमाणें चालतें. या शिवाय साल मजकुरीं, मौजे कालंगवाडी संमत निंब येथील पड जमीन वेहज्यास वजा पडली आहे. त्यापैकीं बिघे ८१० देणें, म्हणोन सनद सादर जहाली आहे. त्यावरोन हें पत्र तुम्हांस लिहिलें आहे. तरी कालंगवाडीचे पड जमिनीपैकीं जमीन बिघे ८१० मशारनिल्हेचे दुमाला करणें. रवाना छ २८ रमजान सुरू सन समान सितैन मया अलफ बहूत काय लिहिणें हे विनंती ( हे पत्र शके १६८९ माघ वद्य अमावास्येचें आहे ).

---

# परिशिष्ट नववें.

## ( पत्र चवथें )

आज्ञा पत्र राजश्री पंत प्रधान, तांहा, मोकदम मौजे किकवी संमत निंब प्रांत वाई सु॥ समान सितैन मया व अलफ. रा. विठ्ठल राम पानसी यांस मौजे मजकूरीं जमीन बिघे ४॥ गुदस्ता नेमून देऊन किल्ले वंदन येथील बेहज्यास करार करून दिले आहेत ऐशीयांस सदरहू जमीन मशारनिल्हेकडे सुरळीत चालविणें. जाणिजें छ २९ रमजान आज्ञा प्रमाण.

( हें पत्र शके १६८९ फाल्गुन शुद्ध प्रतिपदेचें आहे. )

---

# परिशिष्ट दहावें.

## निजगळ येथील लढाईचें बातमी पत्र.

चि. विजयीभव रा. रा. आप्पा[१] व राजबा[२] यास वैशाख व॥ ७ शके १६९२ मुक्काम शिरे येथून ( भिवराव पानसी यांचें पत्र ).

समस्त मंडळी सुखरूप आहेत. इकडील वर्तमान कीं, श्रीमंतांनीं निजगळ किल्ला हल्ला करून घेतला. आमची सर्वांची खैर झाली. राम तोफ फुटून श्रीमंत नारायणराव यांचे हातास चाटती गोळी लागली. खैर जाहली. सांडणी स्वाराबरोबर पत्र पाठविलें. त्या-वरून समजलें असेल. रा. त्र्यंबकराव मामा, हुजूरची फौज आठ हजार, गोपाळराव रास्ते, आनंदराव गोपाळ याप्रमाणें छावणीस ठेवून, कारखाना पांच तोफा आनंदराव

१ आपा—विश्वासराव यशवंत. २ राजबा—पुरुषोत्तम यशवंत.

माधव ठेऊन, आम्ही पुढें रवाना जहालों. श्रीमंतहि एक दोन दिवशीं, मुरारजी घोरपडे यांस निरोप देऊन, सत्वरच येतील. तोफखाना यंदा मुतलावीस छावणीस राहणार. तेथें जिरंजीव रावजीस महिना पंधरा दिवस लागेल. चिरंजीव बावा[3], आम्ही, एक दिवस मुतलावीस राहून पुढें जाऊं. आपले मंडळी, ती भाऊ मलवा[4] बापूपैकीं, आवा[5], कोणीं छावणीस राहिले नाहीं. तिघांतून कोणी राहण्याची निकड फार होती. कांहीं चिंता न करणें. आशीर्वाद.

---

## परिशिष्ट अकरावें.

### मौजे दिवें येथील इनाम जमीन.

शके १६९१ विरोधी नाम संवत्सरे आश्विन व॥ १ रोजीं कृष्णाजी माधवराव व भिवराव यशवंत जोशी, कुलकर्णी मौजे दिवें यांस श्रीमंत राजेश्री माधवराव नारायण पंडित प्रधान यांनीं योगक्षेमार्थ नूतन इनाम जमीन बिघे तीस मौजे मजकूर पैकीं देऊन आज्ञापत्र करून दिलें.

---

## परिशिष्ट बारावें.

### मौजे दिवे येथील इनाम जमीन ( २ ).

शके १६९१ विरोधी नाम संवत्सरे. राजश्री शामराव जगजीवन व मल्हार जगजविन पानसी राहणार मौजे सोनोरी यांनीं श्रीमंत माधवराव पंडित प्रधान यांस पुणें येथें येऊन विनंती केली कीं, आम्हीं स्वामीचे सेवा एकनिष्ठपणें केली. कुटुंबवत्सल आहों. आमचे स्वामीनें चालविले पाहिजे. त्यावरून श्रीमंतांनीं मौजे दिवे येथें गांवचे हद्दींत पंधरा बिघे जमीन वंशपरंपरेनें इनाम करून दिली.

---

## परिशिष्ट तेरावें.

### मौजे वनपुरी गांव इनाम.

स्वतिश्री राज्याभिषेक शके १०३ हेमलंबी नाम संवत्सरे जेष्ठ शुद्ध १० भानुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजाराम छत्रपती स्वामी यांनीं मोकदमानी मौजे वनपुरी त॥

---

३ बावा—जयवंतराव यशवंत. ४ मलबा बापू—मल्हार जगजीवन. ५ आबा—कृष्णराव माधव.

कर्‍हेपठार प्रांत पुणें यासी आज्ञा केली ऐसीजे. राजश्री माधवराव कृष्ण व भिवराव यशवंत उपनाम पानशी गोत्र मुद्गल सूत्र आश्वलायन यांनीं किल्ले सातारा येथील मुक्कामीं स्वामसिन्निध येऊन विनंती केली कीं, आपले वडिलांनीं मौजे सोनोरी त॥ मजकूर येथें देवालय बांधोन श्री लक्ष्मीनारायण व रामचंद्रजी व विठोबा देव यांची नूतन स्थापना केली आहे. त्याचे पूजा नैवेद्य व नंदादीपाचे खर्चाबद्दल राजश्री माधवराव पंडित प्रधान यांनीं मौजे मजकूर हा गांव किल्ले वज्रगडाकडे सरंजाम होता तो दूर करून, खेरीज मुकासा करून, स्वराज्याचा अंमल व मोगलाई एकूण दुतर्फा दरोबस्त सरदेशमुखी सुद्धां कुलबाब कुलकानु हल्लीं पट्टी व पेस्तर पट्टी देखील इनाम तिजाई जल--तरु--तृण--काष्ठ--पाषाण--निधी--निक्षेपसहित, खेरीज हक्कदार व इनामदार करून सन सीत सबैनांत ६१० मोहरमी नूतन इनाम देऊन पत्रें करून दिलीं. त्याजप्रमाणें गांव श्रीकडे चालत आहे. ऐशीयास महाराजांनीं इनाम करून देऊन चालविला पाहिजे. म्हणोन विदीत केलें. त्याजवरून मनास आणून श्रीची पूजा, नैवेद्य व नंदादीपाचा खर्च चालाविणें अवश्यक जाणून मौजे मजकूर हा गांव हुजुरून सदर्हू प्रमाणें इनाम करार करून दिल्हा असे, तरी तुम्ही यांसी व यांचे पुत्र-पौत्रादि वंशपरंपरेनें इनाम चालविणें-गांवचा आकार होईल तो श्रीचे पूजा, नैवेद्य व नंदादीपास खर्च करीत जातील. प्रतिवर्षी नवीन पत्राचा आक्षेप न करणें. या पत्राची प्रती लेहून घेऊन हें पत्र भोगवटे यासी याजवळ परतोन देणें. जाणिजे.

---

# परिशिष्ट चवदावें.

## मौजे सावरदरी येथील व्यापारी पेठ वसाहत.

आज्ञापत्र, पंतप्रधान, ताहा मोकदम मौजे सावरदरी तर्फ चाकण प्रांत जुन्नर येथें भिवराव यशवंत पानशी, हे गांवालगत खुली जागा पाहून, पेठ व्यापारी, उदमी, बेपारी, व्यवसाई पेठ वसविण्यास आज्ञा केली. पेठेंत थळमोड, थळभरीत, शिंगाशिंगोटी बैठकीर्चा पांच सालें, हांसील माफ केला आहे. तरी पानसी पेठ वसवतील त्यास पांच साल हांसिलाचा तगादा न करणें. सु॥ अर्बा सीतैन मया व अलफ ( शके १६८५ ).

---

# परिशिष्ट पंधरावें.

## भिवराव पानसे यास मुतालकी.

भिवराव यशवंत यांचे नांवें सनद कीं, तुम्हांस तोतयाचे पारिपत्यास बरावर फौज देऊन पाठविले आहे; त्यास मसलत संबधें कोंकणांत किल्ल्यास वगैरे कौल, सनदा,

पत्रें, द्यावीं लागतील, याकरितां हुजूरूनची शिक्के कट्यार सामानासुद्धां बहिरजी बोडिंगा व जानोची पवार खिजमतगार याजबराबर देऊन तुम्हांकडे पाठविली आहे. घेऊन मसलत संबंधें कागद पत्रावर शिक्के करीत जाणें, आणि याच खिजमतगाराजवळ वाळगावयासी देऊन शिके कट्यार पावल्याचा जाब पाठविणें, म्हणोन. छ १७ रमजान सु॥ सबा सबैन मया व अलफ ( आश्विन वद्य पंचमी शके १६९८ ).

---

# परिशिष्ट सोळावें.

## गंगापूर गांवच्या इनामाची सनद.

राजश्रीयाविराजित राजमान्य राजश्री रघुनाथराव नीळकंठ स्वामी गोसावी यांसीः–

पोष्य माधवराव नारायण प्रधान नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत जाणें, विशेष. राजश्री माधवराव कृष्ण व श्रीपतराव कृष्ण पानसी निसबत तोफखाना यांनीं विनंति केली कीं, " पांडुरंगराव गोविंद यांस फौजसुद्धां कर्नाटक प्रांतीं पाठविलें. ते समयीं डंबाळकर देसाई सरकार लक्षांत नव्हते. याज-करितां डंबाळकरांकडील ठाणीं सरकारांत घ्यावयाबद्दल गदक परगण्यांत सरकारची फौज येऊन डंबाळकरांकडील मौजे हिरेहाळ येथें ठाणें वसावयास मोर्चे लाविले. तेव्हां आपले तीर्थरूप कृष्णाजी माधवराव यांस मोर्चांत कपाळास गोळी लागून, सन सबा सबैन ( शके १६९९ वैशाख ) त ठार पडले. पुढें डंबाळकर देसाई सरकारांत रूजू जाहल्यावर, आपल्यास इनाम गांव, एक हजार रुपयांचा, कमाल आकाराचा, डंबाळ-कर देसाई यानें आपले देशकतीपैकीं द्यावा. याप्रमाणें राजश्री परशुराम रामचंद्र यांचे विद्यमानें बोलण्यांत आलें. त्यास, कराराप्रमाणें गांव आपले हवालीं व्हावा, तरी डंबाळकरांचे देशकतीचा अंमल फत्तेअल्लीखान यानें घेतला, त्याजमुळें गांव हवाला जाहला नाहीं. हल्लीं देशकतीचा अंमल सरकारांत आला. यास्तव पहिल्या करारा-प्रमाणें गांव करार करून दिल्हा पाहिजे " म्हणोन. त्याजवरोन कृष्णाजी माधव यांस मोर्चांत गोळी लागून ठार पडले, याजकरितां त्यांचे पुत्र उभयतां मशारनिल्हे यास एक गांव हजार रुपयांचें कमाल आकाराचा; डंबाळकरांचे देशकतीपैकीं इनाम द्याव-याचा पेशजी बोलण्यांत आला आहे; त्याप्रमाणें मौजे गंगापूर परगणे गदक हा गांव डंबाळकरांकडील देशकतीचा सालमजकुरापासोन एक हजार रुपयांचे कमाल आकाराचा इनाम द्यावयाचा करार करून, हे सनद तुम्हांस सादर केली आहे. तरी मौजे मजकूर हा गांव यांचे हवाला करून आकार लिहिल्याप्रमाणें त्यांचे नांवें इनामखर्च लिहीत जाणें. जाणिजे छ १९ जिल्काद. सु॥ सन सलाम तिसैन मया व अलफ. बहुत काय लिहिणें. हे विनंति ( शके १७१४ ).

---

# परिशिष्ट सतरावें.

## सोनोरी गांव इनाम.

श्रीमंत माधवराव नारायण प्रधान यांनीं कृष्णाजी माधवराव व भिवराव यशवंत यांस शके १६९९ हेमलंबी नाम संवत्सरे, पुरंदर मुक्कामीं, कुटुंबाचे योगक्षेमार्थ, सोनोरी, गांव, खेरीज मोकासा करून वंशपरंपरेनें इनाम करून दिला.

---

# परिशिष्ट आठरावें.

## सावरदरी गांव इनाम.

राज्याभिषेक शके १०३ हेमलंबी नाम संवत्सरे ज्येष्ठ शुद्ध १० भानुवासरे श्री राजाराम छत्रपति स्वामी यांनीं माधवराव पंडित प्रधान यांसी आज्ञा केली कीं, माधवराव कृष्ण व भिवराव यशवंत पानसी राहाणार सोनोरी तर्फ कऱ्हेपठार यांनीं किल्ले सातारा येथें येऊन विनंति केली कीं, आम्हीं स्वामींचें राज्यांत एकनिष्ठपणें सेवा केली, कुटुंब-वत्सल, सबब योगक्षेमार्थ माधवराव पंडित यांनीं आपले वडिलांस मौजे सावरदरी तर्फ चाकण प्रांत जुन्नर हा गांव खेरीज मुकासा करून इनाम दिला, तो अनुभवींत आहोंत. त्यासी महाराजांनीं कृपाळू होऊन नूतन इनाम करून दिला पाहिजे. त्यावर स्वामी यांनीं एकनिष्ठ सेवक म्हणोन सदरचा गांव वंशपरंपरेनें इनाम करून इनामपत्रें दिलीं.

---

# परिशिष्ट एकोणविसावें.

## सुतोंडा परगण्याचा जहागीर अंमल.

शके १६९९ फाल्गुन शुद्ध ११ श्रीमंत माधवराव नारायणराव प्रधान यांचे देशमुख, देशपांडे पे॥ सुतोंडा सरकार दौलताबाद यांस आज्ञापत्र. मोगलाईतून कबीर महंमद पातशाही बक्षी यांस दहा हजारांची जहागीर होती. त्यास पेशजी नबाब निजामअलीखान बहादूर यांजपासून साठ लक्षांची जहागीर सरकारांत घेतली; त्यांत त्यांनीं सदरहू दहा हजारांची जहागीर सरकारांत दिल्ही. ती सरकारांतून करार करून कबीर महंमद याजकडेस होती ती दूर करून, साल मजकूरपासोन, राजश्री भिवराव यशवंत यांजकडेस राऊतांचे सरंजामास जहागिरीचा अंमल करार करून दिला. अंमल सुरळीत करणें. छ ९ सफर सु॥ समान सबैन मया व अलफ.

---

# परिशिष्ट विसावें.

## कासुर्डी येथील इनाम जमीन.

शके १६८९ आज्ञापत्र. निळकंठ महादेव, ताहा मोकदम मौजे कासुर्डी तर्फ सांडस सु।। समान सीतैन मया व अलफ. कृष्णाजी माधवराव, भिवराव यशवंत, व्यंकटराव केशव, महिपतराव लक्ष्मण व रामराव लक्ष्मण पानशी यांस, एक चाहूर जमीन इनाम देणें. त्यापैकीं अर्धा चाहूर मौजे मजकूरपैकीं दिली आहे. त्याचीं इनाम--पत्रकें पाहून हें आज्ञापत्र सादर केलें आहे. तरी पानशी याजकडे इनाम वंशपरंपरेनें चालविणें.

---

# परिशिष्ट एकविसावें.

## मौजे जेजुरी येथील इनाम जमीन.

शके १७०० विलंबी नाम संवत्सरे माघ शुद्ध तृतीया सु।। तिसा सबैन मया व आलफ. छ १ मोहरम रोजीं, श्रीमंत माधवराव नारायण प्रधान यांनीं माधवराव कृष्ण व भिवराव यशवंत पानशी यांना १६ बिघे मौजे जेजुरी येथें जमीन इनाम करून दिली.

---

# परिशिष्ट बाविसावें.

## सावरदरी येथील सरदेशमुखी व सरपाटीलकी इनाम.

राजश्री भिवराव यशवंत उपनाम पानसा गोत्र मुद्गल सूत्र आश्वलायन गोसावी यांसः-

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य......प्रति सगुणाबाई दाभाडे दंडवत विनंती, उपरी येथील कुशल जाणून स्वकियें लिहीत जाणें विशेष. तुम्ही मौजे तळेगांव त।। चाकण येथील मुक्कामीं येऊन विनंती केली कीं, आम्हीं आपलें सरकारचें कामकाज बहुत दिवस करीत आलों, याजकरितां कुटुंबाचे योगक्षेमार्थ कांहीं नूतन इनाम करून दिलें पाहिजे. त्याजवरून मनास आणतां तुम्ही आमचे सरकारची सेवा एकनिष्ठपणें केली आणि तुम्ही कुटुंबवत्सल तुमचें चालविणें अवश्यक जाणून तुम्हांवरी कृपाळू होऊन आम्हीं आपलें वतन बाब पैकीं मौजे सावरदरी त।। चाकण प्रांत जुन्नर येथील सरदेशमुखी हे दोन अंमल दरोबस्त इनाम· तिजईसुद्धां, साल मजकुरापासोन इनाम करार करून देऊन इनाम--पत्र दिलें असे; तरी तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें सदहू दोन्ही अंमलचा अनुभव घेऊन सुखरूप राहाणें. यासी कोणी आमचे वंशींचें दिकत करील, त्यास श्री कुलदेवतेची शफथ असे. बहुत काय लिहिणें जे छ ५, माहे सवाल सुमा समान सबैन मया व आलफ. शके १६९९ हेमलंबी नाम संवत्सरे कार्तिक शुद्ध षष्ठी.

---

## परिशिष्ट तेविसावें.

### मौजे तुळजापूर व सावरदरी या गांवचा मुकासा अंमल इनाम.

श्रीमंत माधवराव नारायण प्रधान यांनीं, माधवराव कृष्ण व भिवराव यशवंत पानशी यांस पुरंदर मुक्कामीं विनंती केल्यावरून मौजे तुळजापूर प्रमाणें नेवासें व मौजे सावरदरी या गांवचा मुकासा अंमल कुटुंबाचे योगक्षेमार्थ इनाम करून दिला. छ १४ जिल्काद, सु॥ सन तिसा सबैन मया व आलफ. ( शके १७०० मार्गशीर्ष शुद्ध पौर्णिमा ).

---

## परिशिष्ट चोविसावे

### नाणवली गांव इनाम.

महादजी सिंदे यांनीं, माधवरावकृष्ण व भिवराव यशवंत पानसी यास, त्यांनीं तळेगांव नजीक इंदुरी मुक्कामीं विनंती कल्यावरून त्यांची एकनिष्ट सेवा पाहून, कुटुंबाचे योगक्षेमार्थ, मौजे नाणवली तर्फ चाकण हा गांव, हकदार व इनामदार, सरदेशमुखी व मुकासा खेरीज करून, इनाम करून, तो वंशपरंपरेनें चालवावा छ २६ मोहरम सु॥ तिसा सबैन मया व आलफ ( शके १७०० माघ वद्य त्रयोदशी ) .

---

## परिशिष्ट पंचविसावें.

### पानगांवचा मोकासा.

अनाम माधवराव कृष्ण व भिवराव यशवंत, उपनांव पानसी, गोत्र मुद्गल सूत्र आश्वलायन देशपांडे प्रगणें परांडे; यांसी माधवराव नारायण प्रधान सु॥ तिसा सबैन मया व आलफ. शके १७०० विलंबीनाम संवत्सरे. तुम्हीं हुजूर किल्ले पुरंदर येथील मुक्कामीं येऊन विनंती केली कीं, आपण बहूत दिवस स्वामिसेवा एकनिष्टपणें केली. कुटुंबवत्सल आहों. त्यास स्वामींनीं कृपाळू होऊन, कसबे पानगांव प्रगणें मजकूर येथील मुकासा राजश्री निंबाजी नाईक निंबाळकर याजकडेस सरंजाम होता, तो त्याजकडून दूर करून सरकारांत ठेविला आहे; तो आपणांस कुटुंबाचे योगक्षेमार्थ नूतन इनाम करार करून देऊन चालविले पाहिजे; म्हणोन, त्याजवरून मनास आणतां तुम्हीं बहूत दिवस स्वामिसेवा एकनिष्ठपणें केली; कुटुंबवत्सल आहां, तुमचें चालविणें आवश्यक जाणोन तुम्हांवरी कृपाळू होऊन कसबे मजकूरचा मुकासा निंबाळकरांकडे सरंजाम होता तो त्याजकडून दूर करून सरकारांत ठेविला आहे. तो हल्लीं, कुलबाब, कुलकानू, हल्लीं पट्टी व पेस्तर पट्टी, जल, तरू, तृण, काष्ठ, पाषाण, निधि, निक्षेपसाहित, खेरीज हकदार व इनामदार करून, दरोबस्त, तुम्हांस कुटुंबाचे योगक्षेमार्थ, सरकारांतून, नूतन इनाम

करार करून दिला असे. तरी सर्दहू प्रमाणें कसवे मजकूरचे मुकासा वेचा अंमल तुम्ही आपले दुमाला करून घेऊन तुम्ही व तुमचे पुत्र पौत्रादि वंशपरंपरेनें इनाम अनुभवून राहणें जाणिजे. छ १६ जिल्काद ( मार्गशीर्ष वद्य द्वितीया ).

---

# परिशिष्ट सव्विसावें.

## मौजे तुळजापूर गांव इनाम.

म॥ अनाम माधवराव कृष्ण व भिवराव यशवंत, उपनांव पानसी, गोत्र मुद्गल, सूत्र आश्वलायन, देशपांडे प्रे॥ पानगांव सरकार परांडे यांसी, माधवराव नारायण प्रधान सु॥ तिसा सबैन मया व आलफ. शके १७०० विलंबीनाम संवत्सरे. तुम्ही हुजूर किल्ले पुरंदर येथील मुक्कामीं येऊन विनंती केली कीं, आपण बहूत दिवस स्वामिसेवा एकनिष्ठपणें केली; कुटुंबवत्सल आहों. त्यास स्वामींनीं कृपाळू होऊन, मौजे तुळजापूर प्रे॥ नेवासे सरकार अहमदनगर हा गांव खेरीज मुकासा करून दरोबस्त आपणास ब॥ मु॥ ( बद्दल मुशाहिरा ) दिला आहे. तो हल्लीं कुटुंबाचे योगक्षेमार्थ नूतन इनाम करार करून देऊन चालविला पाहिजे, म्हणोन, त्याजवरून, मनास आणितां, तुम्हीं बहुत दिवस स्वामिसेवा एकनिष्ठपणें केली, कुटुंबवत्सल आहां, तुमचें चालविणें अवश्यक जाणोन, तुम्हांवरी कृपाळू होऊन, मौजे मजकूर खेरीज मुकासा करून, स्वराज्य व मोगलाई एकूण दुतर्फा, देखील सरदेशमुखी, तुम्हांकडे ब॥ मु॥ दिला आहे. तो कुलबाब, कुलकानु, हल्लीं पट्टी व पेस्तर पट्टी, जल-तरू-तृण-काष्ठ-पाषाण-निधि-निक्षेप-सहित, खेरीज हकदार व इनामदार करून, दरोबस्त, तुम्हास कुटुंबाचे योगक्षेमार्थ नूतन इनाम करून दिला असे. तरी मौजे मजकूर सदरहू प्रमाणें तुम्ही आपले दुमाला करून घेऊन, तुम्हीं व तुमचे पुत्र-पौत्रादि वंशपरंपरेनें इनाम अनुभवून सुखरूप राहाणें. जाणिजे छ १६ जिल्काद ( मार्ग-शीर्ष वद्य द्वितीया ) आज्ञा प्रमाण.

---

# परिशिष्ट सत्ताविसावें.

## सांगवी गांव इनाम.

राजश्री जयवंतराव यशवंत उपनाम पानसी गोत्र मुद्गल सूत्र आश्वलायन जोशी कुळकर्णी मौजे सोनोरी त॥ कऱ्हेपठार प्रांत पुणें गोसावी यांसः--

सेवक माधवराव नारायण प्रधान, नमस्कार, सुमा सलाम समानीन मया व अलफ शके १७०४ शुभकृत नाम संवत्सरे. तुम्हीं हुजूर कसवे पुणें येथील मुक्कामीं येऊन विनंति केली कीं, आपण बहुत दिवस स्वामिसेवा एकनिष्ठपणें केली, त्यास आपली मातुश्री भीमातिरीं राहाणार यास्तव त्यांचे सत्कालक्षेपानिमित्त स्वामींनीं कृपाळू होऊन

एक गांव नूतन इनाम करार करून देऊन चालविलें पाहिजे म्हणोन, त्याजवरून मनास आणतां तुम्हीं बहुत दिवस स्वामिसेवा एकनिष्ठपणें केली यास्तव तुमचें चालविणें अवश्यक जाणोन तुम्हांवरी कृपाळू होऊन तुमची मातुश्री भीमातिरीं राहाणार; त्याचे सत्कालक्षेपानिमित्य मौजे सांगवी ता॥ सांडस प्रांत मजकूर हा गांव खेरीज मुकासा करून, स्वराज्य व मोगलाई देखील सरंदेशमुखी दरोवस्त कुलबाव कुलकानु हल्लीं पट्टी व पेस्तर पट्टी जल-तरू-तृण-काष्ट-पाषाण-निधिनिक्षेपसहित, खेरीज हक्कदार व इनामदार करून, इनाम तिजाईसुद्धां, सरकारांतून नूतन इनाम करार करून दिला असे; तरी मौजे मजकूर सदरहूप्रमाणें आपले दुमाला करून घेऊन तुम्ही वडिलांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम अनुभवून सुखरूप राहणें. जाणिजे. छ ३ मोहरम. आज्ञा प्रमाण.

---

# परिशिष्ट अठ्ठाविसावें.

## ( भाषांतराच्या नकलेची नक्कल. )

## राजकीय खातें.

## नंबर १७ सन १८४२.

लंडन ता. २६ अक्टोबर १८४२.

मुंबई येथील आमचा गव्हरनर यांसः—

१ आम्हीं ता. ७ फेब्रुवारी १८३८ इसवी रोजीं मुख्य: सरकारास जे हु॥ केलें, त्या व॥हुकूम दक्षिणेंतील सरंजामी जमिनींचे नानाप्रकारचे वहिवाटदार यांचे हक्कांच पुन्हा विचार केल्याचा काय परिणाम जाहला, तो तुम्हीं आपले नंबर ५१, ता। २६ आगस्ट सन १८४१ चे ज्या राजकीय पत्रांत, आम्हांकडे लिहून पाठवितां, त्या तुमचे पत्राचा जबाब आम्ही खालीं पाठवितों.

२ दक्षिणेंतील जहागीरदारांच्या प्रतींचा जो पट, मिस्टर बार्डीन यांनीं तुमचे सरकारानें करून दिल्हेले नियमाप्रमाणें तयार केला व मिस्टर मारियेट यांनीं तपासून दुरुस्त केला, तो पट आम्हांकडे पाठविल्यानें वर लिहिलेले हुकूम करण्याचें कारण उपस्थित जाहलें. सदरहू नियमांत, त्यांपैकीं कोणते येक जणास, आपले जमिनीची वहिवाट करण्यास जी अति मोठी मुदत दिल्ही होती, ती काय ती, येक अधिक पिढीपर्यंत होती. जरी या व्यवस्थेमुळें जहागीरदार यांस दिलेलीं वचनें मोडलीं गेलीं नसतील, तरी ती व्यवस्था, मिस्तर एलफिन्स्टन यांनीं दप्तरीं लेहून ठेवलेले उद्देशांशीं पुष्कळ विरुद्ध होती व त्या बाबतींत आम्हीं मिस्तर एलफिन्स्टन यासीं पत्रव्यवहार केल्यावर, त्यांजकडून जो कागद आला त्याचे हसील आम्हीं इंडिया सरकारास लिहून पाठविलें. त्यांत जे नियम मांडून दिल्हे आहेत त्याप्रमाणें सरंजामाचे बाबतींत विचार करते वेळेस वागणूक करावी असें आम्ही फरमावीत आहोंत.

३ मिस्तर एलफिन्स्टन असें म्हणाले कीं, दक्षिणेंतील चीफांपैकीं पुष्कळ जणांस मीं उपजीविका देण्याची सूचना ( मुख्य सरकारास ) केली, ती लोकांची नाराजी न व्हावी व थोर सरदारांचे घराण्याचा अति सत्वर ऱ्हास न व्हावा या मतलबास्तव केली. परंतु इतर प्रकरणांत जी सिफारस मीं केली, ती उपभोग करणाराचे दावे वंशपरंपरेचे उपभोगावर होते, ते केवळ देहनग्याचे कारणानें नव्हते, तर बहुत मुदतीचे भोगवट्यामुळें आहे; असें मला वाटल्यावरून मीं ती केली. आणखी ते साहेब असें म्हणाले कीं, वर लिहिली सेवटची व्याख्या ज्या सरदारांचे घराण्याकडे, त्यांच्या जहागिरी मोंगल बादशहा अथवा सातारचे राजे यांजकडून चालत होत्या, त्या सर्व घराण्यांस लागू आहेत.

४ या साहेबांनीं पुढें आणखी असें कळविलें कीं, पेशव्यांचे जहागिरदारांची स्थिति निराळी आहे. जो राजवंश आम्ही पदच्युत केला, त्या वंशाचे वेळेस त्या जहागीरदाराचे उदय जाहले आहेत, व त्यांपैकीं कोणाचा हि कबजा सत्तर वर्षांहून अधिक मुदतीचा नसोन त्याजपासून नोकरीसबबी ( संबंधीं ) नें घेतली जात होती व त्याप्रमाणें च त्यांच्या खऱ्या प्रकारच्या व खऱ्या विस्ताराच्या स्थावर मिळकती प्रसंगोपात खालसांत केल्या जात होत्या. ह्यामुळें तें माझ्या ध्यानांत राहिलें आहे. तथापि, त्यांजकडे वास्तविक च अधिकार चालत होते. यामुळें त्याचा मान मोठा असून, त्यांचे योग्यतेनुसार, अथवा महत्त्वाप्रमाणें त्यास आपल्या जातीच्या जमिनी एक अथवा अनेक पिढ्यापर्यंत आपलेकडे ठेवण्याची परवानगी मिळत होती.

५ याप्रमाणें मिस्तर एलफिन्स्टन यांनीं दोन प्रतीचे सरदार कबूल केले. एक जे मोंगल बादशहाचे व सातारच्या राजांचे जे. या प्रतीविषयीं त्यांनीं अशी शिफारस केली कीं, या प्रतींतील जहागीरदारांच्या जमिनी शब्दांचे पुरे अर्थाप्रमाणें वंशपरंपरेनें चालवाव्या. दुसरी ( प्रत ) पेशवे यांचे जहागीरदार. या प्रतीविषयीं त्यांनीं असें सुचविलें कीं, त्यांचे दावे ( हक्क ) एक अथवा दोन पिढ्यापर्यंत या आपले जमिनीचे उपभोग करण्यावर आहेत.

ज्या नानाप्रकारचे प्रकरणांचा विचार चालला आहे, त्या प्रकरणांस वर दिलेले नियम लागू करण्याविषयीं यत्न करण्यांत मिस्तर मिल्स ( म्हणजे ) सरदार लोकांबद्दलचे त्या वेळचे ॲक्टिंग एजंट यांची गैरसमजूत जाहली, ती दुरुस्त करण्यांत तुम्ही चुकलां आहांत.

७ ते ( मिस्तर मिल्स ) असें म्हणतात कीं, दक्षिणेंतील सरंजामांपैकीं कोणता हि सरंजाम मिस्तर एलफिन्स्टन यांणीं केलेल्या पहिल्या प्रतींत येत नाहीं. कारण, ते दरोबस्त सरंजाम पेशवाई अंमल सुरू जाहल्यापासून दिलेल्या देणग्या आहेत. हा परिणाम, असें कळविल्यावरून जहाला कीं, पाहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ यांचें राज्य सन १७१४ इ॥ सालीं सुरू जाहलें व त्यामुळें अति प्राचीन देहनग्याची तारीख कळोन येत आहे, त्या देहनग्या सन १७१९ पूर्वीच्या आहेत.

८ परंतु सन १७१४ सालपुढें जाहलेलीं मराठी राज्यामधीं सर्व कृत्यें हीं सातारचे राज्याचीं होतीं, असें न मानतां तीं पेशव्यांचीं होतीं, असें त्या साहेबानें मानिलें. हें केवळ इतिहासाचे पूर्ण चुकीमुळें जाहलें. बाळाजी विश्वनाथ यांस पेशवाईचीं वस्त्रें सन १७१४ त. मिळालीं. परंतु, त्यांचा वस राज्यावर निर्वंधपणें न बसतां, ते सन १७२० ये अक्टोबर महिन्यांत मरण पावले. नंतर त्यांचा पुत्र बाजीराव यांची नेमणूक पेशवाई हुद्यांवर पुढें सात महिने पर्यंत जहाली नसान, सात महिन्यांचे अवकाशांत पेशवाईचें काम राज्यांतील इतर प्रधान करीत होते. व आपले घराण्याचा अधिकार निरंतर स्थापन करण्याविषयीं बाजीराव यांनीं जरी मोठी सिताफी केली, तरी ते शाहु महाराजांचे मुख्य कामगार व प्रधान, असे माल त्यांस मानितां येतें. शाहुराजा वारल्यावर च मराठी राज्याची पूर्ण मालकी प्रथमतः बाजीराव यांचे पुत्र बाळाजी बाजीराव यांनीं घेतली. तथापि हें बनावणें शाहुमहाराजांचे हयातींत पूर्णपणें सिद्धीस गेलें नाहीं. कारण जातीचा स्वतंत्रपणा म्हणजे मुख्य कारभार, हा जेथपर्यंत सांभाळण्याचे त्यांचे मर्जीस आलें, तोंपर्यंत तो त्यांचे हातांतून गेला नसान, त्यांचा देहांत सन १७४९ त जहाला. त्यापूर्वीं कांहीं थोडे दिवसपर्यंत त्यांनीं चालविला. आपला अंतकाळ होण्याचे सुमाराम आपला कायम मुकाम (प्रतिनिधी) नेमला. शाहूमहाराजाच्या मरणानंतर गडबड जाहली. त्यावेळेपासून पेशव्यांच्या राज्याधिकाराची तारीख बिन हरकत सुरू जाहली, व त्या सुरुवातीची वेळ म्हणून सन १७५१ हें साल उघड मानतां येतें.

९ याजकरितां आम्ही असें फरमावितों कीं, मिस्तर मिस्ल याचे पटांतील पहिले प्रतींत ज्या सरंजामाच्या तारखा सन १७५१ च्या पूर्वींच्या आहेत, ते सर्व सरंजाम मिस्तर एलफिन्स्टन यांचे शिफारसीप्रमाणें, शब्दांचे पुरे अर्थाप्रमाणें, वंश परंपरा चालवावें. व ज्या सरंजामाच्या तारखा माहीत नाहींत, पण जे प्राचीन असें माहीत आहे ते हि त्या सोबत वंश परंपरेनें चालवावें. शेवटीं लिहिली प्रत जरी लहान आहे, तरी पीर शेख मिरा व समशेर बहाद्दर व यशवंतराव दाभाडे ह्या तिघांच्या जहागिरी खालसांत केल्या आहेत. ह्यां पैकीं, पहिले इसमाची जहागीर ही शेवटच्याच्या उपभोग करणाराचे पुत्राकडे पूर्वीं च पुन्हा चालविण्यांत आली आहे, परंतु ती तहाहयात आहे. तत्रापि ती वंशपरंपरेचें असें समजलें पाहिजे. दुसरे व तिसरे इसमांच्या जहागिरी हल्लीं जप्तींत आहेत. या हि शेवटच्या उपभोग करणाऱ्यांत तसा सिधा वारस असला तर बहाल करावयाच्या आहेत व तिन्ही जहागिरीबद्दल जप्तीचे तारखेपासून उत्पन्न जमा जाहलें आहे. तें जहागिरदारास दिल्हें पाहिजे.

१० ह्या प्राचीन जहागिरीखेरीज ज्या जहागिरींची तारीख आलीकडची आहे, परंतु, ज्या प्राचीन मिळकती खालसांत जाहल्या त्याच मोबदला देण्यांत आल्या (कांहींची स्थिति असें असल्याचें कळोन येतें), त्या जहागिरी, वर लिहिलेल्या जहागिरींप्रमाणेंच वंश परंपरेच्या शर्तीनें चालवावयाच्या आहेत.

११ ज्या जहागिरी अधिक अलीकडच्या काळच्या आहेत त्यांचे बाबतींत मिस्तर मिल्स यांनीं दुसरी एक चूक केली आहे. ती अशी कीं, ज्या मिळकती मिस्तर एलफिन्स्टन यानें मूळचे शिफारसींत वंशपरंपरेच्या असें लिहिलें आहे, त्या मिळकती वंशपरंपरेनें चालवाव्या असा आम्हीं ठराव केल्याचें कळविलें आहे. परंतु आमचा उद्देश, आम्ही त्याविरुद्ध फक्त असा कळविला आहे कीं, ज्या पत्राचा जबाब आम्हीं लिहीत आहों, त्या पत्रासोबत पाठविलेलें (?) जेथें जहागिरदारांचे कमी हिताचे असतील तेथें दोहों पटापैकीं कोणते पटाप्रमाणें वागावें असें विचारपूर्वक मनांत आणावयाकरितां मिस्तर एलफिन्स्टनचें पट त्या पटासी मिळवून पाहावें.

१२ ज्या सरंजामांचे देहनश्यांची तारीख सन १७५१ च्या पुढची आहे, ते सरंजाम पेशव्यांचे मुलुख सर झाल्यापासून दुसरी पिढी गुजरल्यावर खालसांत करून त्याचे पुढले पिढीस त्या सरंजामाचे निव्वळ उत्पन्नाचे निम्में पेनशन तहहयात द्यावें, हा सर्वसाधारण नियम आहे. परंतु, ज्या प्रकरणांत मिस्तर एलफिन्स्टन यांनीं अधिक दूर काळापर्यंत गुजराथाची तजवीज करण्याविषयीं सिफारस केली असेल, त्या प्रकरणांत दरोबस्त सरंजामाचे अगर त्याचे एक भागाचे उपभोगाची मालकी आणखी मुदतपर्यंत वाढवून, वर लिहिलेले नियम सोडून वागण्यास, सरंजाम दाराचे घराण्याच्या नौकऱ्या अगर योग्यता येणें करून, अगर जी लोकप्रीतीचें कृत्य केलें तर होत आहे तेणेंकरून, पाहिजे तितकें कारण होतें किंवा कसें याचा पक्का विचार तुम्हीं व गव्हरनर जनरल इन-कौन्सिल यांनीं करावा. हे नियम सोडून वागणें आम्ही औदार्यत्वानें फर्मावितों; व जेथें जेथें अशाच कारणांनीं तसे च वागण्याची शिफारस होईल तेथें तसें वागण्याविषयीं आम्ही हुकूम देऊं. आणखी तर काय? परंतु ज्या प्रकरणीं मिस्तर एलफिन्स्टन यानें विशेष शिफारस केली नाहीं त्या प्रकरणीं सुद्धां आम्ही तसें वागण्याचा हुकूम करूं.

१३ वंश परंपरेचे जहागिरी करितां जहागिरदारांस दत्तक घेण्याचे बाबतींत मिस्तर मिल्स यानें जी शिफारस केली आहे, ती आम्ही अगदीं कबूल करूं शकत नाहीं. दत्तक घेतलेल्या वारसाचा उत्तराधिकारावरून हक्क कबूल करूं नये व दत्तक घेण्याची परवानगी एक बक्षिसी म्हणोन जहागिरदारांचे जातीची योग्यता व सरकारी निमकहलाली याबद्दल मात्र द्यावी, असे जे हुकूम आम्ही पुन्हा पुन्हा दिल्हे आहेत ते धरून वागावें म्हणजे जाहलें. पुढील दरोबस्त उत्तराधिकारांवर नजराणे बसवावे, असी जी मिस्तर मिल्स यांची आणखी सूचना तुम्ही विशेषेंकरून आमचे कानावर घातली, तिचेप्रमाणें हि आम्हांस करितां येत नाहीं. ज्या सरंजामाबद्दल दत्तक वारस होण्याची परवानगी आहे त्या सरंजामास उत्तराधिकारी होणाऱ्यावर मात्र नजराणा बसविण्याचा आहे.

[पानसे यांचें सरंजामी उत्पन्न कोणतें निमित्त लावून कमी केलें हें वरील मजकुरावरून लक्षांत येईल.]

---

# परिशिष्ट एकोणतिसावें.

## पानशांकडे असलेला सरंजाम.

### माधवराव कृष्ण

| रुपये | | | साल. इ. स. |
|---|---|---|---|
| ३०० | ... | ... | १७३५ |
| ३५० | ... | ... | १७३७ |
| ५३३ | ... | ... | १७४० |
| ५८३ | ... | ... | १७४२ |
| ७६७ | ... | ... | १७४४ |
| ९८४ | ... | ... | १७४५ |
| १३२२ | ... | ... | १७४६ |
| १८५३ | ... | ... | १७४८ |
| ३३०९ | ... | ... | १७५० |
| ४२०० | ... | ... | १७५० |
| १२००० | ... | ... | १७५४ |
| १६२३१ | ... | ... | १७७७ |

### यशवंतराव लक्ष्मण

| | | | |
|---|---|---|---|
| ३५०० | ... | ... | १७५३ |
| १०००० | ... | ... | १७७४ |

### भिवराव यशवंत

| | | | |
|---|---|---|---|
| १२००० | ... | ... | १७७६ |
| १६२८६ | ... | ... | १७७७ |

### विश्वासराव यशवंत

| | | | |
|---|---|---|---|
| ५००० | ... | ... | १७७४ |
| ८००० | ... | ... | १७७६ |
| ८७३१ | ... | ... | १७७७ |
| १३६३१ | ... | ... | १७९३ |

### महिपतराव लक्ष्मण

| रुपये | | | साल इ. स. |
|---|---|---|---|
| ३८५० | ... | ... | १७५३ |
| ४८५० | ... | ... | १७५८ |

### केशवराव लक्ष्मण

| | | | |
|---|---|---|---|
| ६००० | ... | ... | १७५८ |

### श्रीपतराव कृष्ण

| | | | |
|---|---|---|---|
| १७७१ | ... | ... | १७७७ |
| ४००० | ... | ... | १७९३ |

### जयवंतराव लक्ष्मण

| | | | |
|---|---|---|---|
| ६००० | ... | ... | १७७४ |
| ८५०० | ... | ... | १७७६ |
| १०७३१ | ... | ... | १७७७ |

### सखाराम यशवंत

| | | | |
|---|---|---|---|
| ४५०० | ... | ... | १७७४ |
| ६००० | ... | ... | १७७६ |
| ८२३१ | ... | ... | १७७७ |
| २५४१४ | ... | ... | १७९३ |

### पुरुषोत्तम यशवंत

| | | | |
|---|---|---|---|
| १५०० | ... | ... | १७७४ |
| ४००० | ... | ... | १७७६ |
| ४७३१ | ... | ... | १७७७ |

एकूण सर्व रक्कम. १०३७२४

पैकीं, भिवराव यशवंत, महिपतराव लक्ष्मण
व केशवराव लक्ष्मण यांची रक्कम पेशवाईंत
कमी झालेली वजा......... २७१३६

( संतति नसल्यामुळें ही सरकार जमा झाली. )

वाकी राहिले रु. ७६५८८

वरील रकमेंत गांवाचीं रकम व इतलाख खालील प्रमाणें: —

| नांव | गांव वाटणीची रकम रुपये | इतलाख रुपये | एकूण रुपये. |
|---|---|---|---|
| माधवराव लक्ष्मण ... ... | १०४१० ... ... | ५८२१ ... | १६२३१ |
| गणपतराव विश्वनाथ ... ... | ७९६० ... ... | ५६७१ ... | १३६३१ |
| ( विश्वासरावाचे पुत्र ) | | | |
| पुंडलीक गोपाळ ... ... | ८०८५ ... ... | ४४९६ ... | १२५८१ |
| ( जयवंतरावाचे नातु ) | | | |
| सखाराम यशवंत ... ... | १३४४० ... ... | ११९७४ ... | २५४१४ |
| श्रीपतराव कृष्ण ... ... | ० ... ... | ४००० ... | ४००० |
| रंगराव पुरुषोत्तम ... ... | ० ... ... | ४७३१ ... | ४७३१ |
| एकूण......... | ३९८९५ | ३६६९३ | ७६५८८ |

# परिशिष्ट तिसावें.*

## नीरथडी गांवच्या वतनासंबंधी पत्रें.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ६९ दुंदुभिनाम संवत्सरे भाद्रपद शुद्ध १३ सौम्यवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति यांनीं समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजेश्री बाळाजी पंडित प्रधान यांसी आज्ञा केली ऐसेजे.

जिवाजी साबाजी व कान्हो केशव व खंडो शिवदेव व माधवराव लक्ष्मण व बाबुराव सखाजी व दादाजी तानदेव उपनांव पानसी गोत्र मुद्गल सूत्र आश्वलायन कुलकर्णी व जोशी मौजे लोणी व मौजे तोंडल तर्फ नीरथडी प्रांत पुणं यांहीं शाहूनगरनजीक किल्ले सातारा येथील मुक्कामीं स्वामिसन्निध येऊन विनंति केली कीं, यादो रघुनाथ व नारो यादव व खंडो बापूजी यांचा व आमचा देहाय मजकूर येथील कुलकर्णाचा व ज्योतिषपणाचा कज्जा आहे; याबद्दल शार्वरीनाम संवत्सरे शके १६४२ मध्यें आपले वडील रत्नाजी बाहिरव व केसो राम हुजूर येऊन विदित केले, ते वेळेस राजेश्री खंडो बल्लाळ चिटनवीस यांजकडून मनसुबी करावयास यांस आज्ञा केली. ते समयीं हरदो वादी याचे करीणे व कागदपत्र मशारनिल्हे मनास आणिले. यादव रघुनाथ व बापूजी काशी हे खोटे झाले. एजीतखत न देतां गैरहजर राहिले. त्यावर मशारनिल्हे महा-

*या वतनपत्रांतील त्रोटक माहिती मागें पृष्ठ १२२ व १२३ वर आलेली आहे.

राजास अर्ज करून दोन गांवचीं ज्योतिष-कुळकर्णाच्या वृतीचीं राजपत्रें करून देवविलीं व मशारनिल्हे आपलें पत्र राजेश्री रायाजी जाधवराव मोकाशी यांसी निवाडा देण्याचें दिलें असतां मागती माधव रघुनाथ व खंडो बापूजी हरदू गांवचे ज्योतिषकुळकर्णी निम्में वतन आपलें म्हणून भांडतात. याजकरितां ते व आपण राजेश्री बाळाजी बाजीराव प्रधान यांजपाशीं सातारा मुक्कामीं आलों. त्यांनीं आम्हांस नरहर विश्वनाथ कुलकर्णी मौजे त्रिपुटी संमत कोरेगांव प्रांत वांई हे जमान घेतले व वादी यास जानो बल्लाळ बाघ कुलकर्णी मौजे अहिरें तालुके शिरवळ हे जमान घेतले. आणि आम्हां हरदू जणांच्या तकरीरी निळो विठ्ठल देशपांडे प्रगणे मजकूर यांच्या विद्यमानें लिहून घेतल्या. त्यावर राजेश्री पंतप्रधान स्वारीस गेले. आम्हां हरदू वादी यास राजेश्री मल्हारपंत पुरंदरे श्रीमंत पंडित मजकूर निसबत यांजपाशीं वादानिमित्त सातारीं पाठविलें, त्यास त्यांनीं महाराजांस विदित करून मनसुबीची आज्ञा घेऊन पुढील कागदपत्र आणावयास फर्माविलें. त्यावरून आम्ही हरदू वादी गांवास जाऊन पुढील कागदपत्र आणून दाखविले. वितपशील व तकरारी वितपशील:---

तकरीर कर्ते जिवाजी साबाजी वगैरे भाऊ यांनीं तकरीर केली, मौजे भोळी व मौजे तोंडल, गुणंद प्रगणे शिरवळ व मौजे लोणी व तोंडल प्रांत पुणें हे पांच गांव पुरातन आपले मिराशी. यांस पूर्वीं भवाळ आपले मिराशीवर शिरवळें देशच्या तीन गांवांत आपले म्हणून उठले होते. त्यास त्याचें आमचें भांडण पडलें. मग त्याशीं आम्हांशीं मोहरी तर्फ गुंजण मावळ........येथील देशमुख व देशपांडे यांसीं दिलें. तेथें आमचे वडिलीं दिव्य केलें. आपला वडील भूतो परशुराम खरा झाला; आणि भवाळ खोटे झाले. त्यावरी कित्येक दिवसीं सदरहू तीन गांवच्या शिरवळ देशीच्या परभुणे वादास उठले. परभुणे यांस आपले वडील साबाजी बायदेव यांस मौजे वाटेगांव प्रांत बत्तीस शिरोळे येथील स्थळ दिलें. तेथें परभुणे मजकूर दिव्य केलें. परभुणा खोटा झाला. परंतु........ते वेळेस कसबे शिरवळीं त्यांचा व साबाजी बायदेव यांसीं आपले वडील यांचा इनसाफ जाहला. श्री केदारेश्वरीं दिव्य साबाजी बायदेव यानें करावें असा निश्चय केला. ते समयीं आपले वडील शिवाजी बायदेव पानसी... ...म्हणून नामदेवभट बिन पन्हंभट वस्ति कसबे शिरवळ मुद्गल गोत्री म्हणून पाठीराखा भाऊ करून शिरवळ देशीच्या तीन गांवांत निम्मे तक्षीम देऊन त्याजकडून दिव्य करविलें. वृत्ति साध्य केली. परभुणे खोटा झाला. तो महजर व जिन्नस मनास आणावा. नामदेवभट याचें नक्कल झालें. त्याचे गोत्र पुरुष यादव रघुनाथ वगैरे याच गांवांत भोगवटा करून वृत्ति बळें च निम्मे खातात. शिरवळ देशीच्या तीन गांवांपैकीं निम्मे वृत्ति; नामदेवभटास दिली होती, त्याचें नक्कल झालें. दोन गांव पुणें देशीचे निर्वेध आहेत. दरोबस्त पांच गांवचें वतन आपलें आहे. नामदेवभटाचें बुडालें तरी आपण खाऊं. आपण बुडालों असतों तरी त्याचा वंश असता तरी तो खाता.

त्याच्या गोत्रपुरुषांस आपण कांहीं भाऊ केले नाहीं. हें गोतमुखें व पांढरीच्या मुखें व क्रियेनें खरें करून देऊं. मखलाशी करून इनसाफ करणार सेाा धनी आहेत म्हणून तकरीर केली.

तकरीर करेदे यादव रघुनाथ व खंडो बापूजी तकरीर केली ऐसिजे. मौजे भोळी, तोंडल, गुणंद प्रगणे शिरवळ व मौजे लोणी व तोंडल प्रांत पुणें हे पांच गांव आपण १३५ वर्षे अनुभवीत आहोंत. दरम्यान कज्जा करितात. ईल्लीं साहेबापाशीं आपण येऊन उभे राहिलों आहों. दिवाणाचा कागद आपणापाशीं आहे. तो मनास आणावा आणि आपला इनसाफ करावा. नामदेवभट आपले वडील त्यांचें नकल झालें म्हणतात. त्यास त्यांचें नकल झालें खरें च. परंतु आपण त्याचे भाऊबंद त्यांचे वृत्तीचे......हें गोतमुखें खरें करून देऊं. साबाजी बायदेव याच्या कारकीर्दीपासून वतन अनुभवीत आहों. परभुणे याचा रवा झाला. त्या वेळेस महजर जिवाजी साबाजी यांनीं काढला. आमचे कागद मनास आणून इनसाफ करावा म्हणून तकरीर केली.

पत्र महजर परभुणे याचे वेळेस रवा होऊन निर्वाह जाहला बीतपशील:—

महजर ता. छ २२ जिल्काद हजीर मज्यालस.

| गोही | गोही |
|---|---|
| XXXXX | XXXXX |

---

सुरू सन सीत व अलफ. श्री शके १५२७ विश्वावसुनाम संवत्सरे चैत्र व॥ ९ मंगळवार महजर झाला ऐसाजे. मौजे तीन बीतपशील:—मौजे भवाळी, मौजे तोंडल, मौजे गुणंद प्रगणे मजकूरचे ज्योतिष-कुळकर्णाबद्दल. नामदेवभट बिन पन्हंभट व साबाजी बिन बयाजी पानसी व गोमाजी बिन गणावा परभुणा याजला XXX साल-मजकुराकारणें अग्रवादी नामदेवभट बिन पन्हंभट, साबाजी बिन बयाजी पानसी, पश्चिमवादी गोमाजी बिन गणावा परभुणा उभा राहिले. व्यवहार भावी ( ? ) केले, बितपशील:—

अग्रवादी नामदेवभट बिन पन्हंभट व साबाजी बिन बयाजी पानसी. अग्रवादी, यांनीं व्यवहार गांवीं कजे २ मौजे तीन बितपशील:—

मौजे भवाळी, मौजे तोंडल, मौजे गुणंद. प्रगणे मजकूर येथील ज्योतिष-कुलकर्ण आपले मिराशी आपले वाडिलापासून खात आलों. दरम्यान गोमाजी परभुणा यानें व गणोजी निंबाळकर पुंड याचे कारकीर्दीस गोमाजी मजकूराचा बाद बयाजी बिन गणावा परभुणा हा रूपाई अवापाशीं चाकर होता. त्याची वग करून संदरहू गांव आपले मिराशी म्हणून जोरीनें घेतलें. त्यास त्यावर चालूं लागला. आपण गोतापाशीं

फिर्याद जाहलों. गोतानें त्यास बोलावून मौजे वाटेगांव प्रांत शिरवळ येथें दिव्य नेमून पाठविलें. उभयवर्ग तेथें गेलों. गोमाजी यानें रवा केला. तिसरे दिवशीं हात पाहिला. गोमाजी परभुणा मजकुरास रवा लागला. आपण जयपत्र मागत होतों. सभानाइकीं आपणास बोलिले. मग आपण ते सभेस बोंब मारून निघून शिरवळास आलों. सदरहू समाचार सभानाइकास सांगितला. तो गोमाजी व बयाजी परभुणा मजकूर ते हि खोट पत्र वाटेगांवचें आणिलें. सभेस दाखविलें. ते समयीं ते सभेस आपण बोल केले. खोट-पत्र आणेलें XXX मजकुरास रवा लागला. पाहिला. त्यावर सभानाइकीं हात पाहिला. मध्यें बोटीं फोड आला होता. सभानाइकीं देखिल्यावर बयाजी व गोमाजी मुतालीक रूपाई आवाचे वेळीं उठले. सुप्यास गेला. धाररावास भेटला. सदरहू समाचार सांगितला. धारराव फर्जंद व गणोजी मजकूर सदरहू गांव आपला दुमाला करविणें म्हणून कारकुनास व देशमुखास कागद दिला तो घेऊन महालास आलों. महालास कारकून यांनीं व देशमुखांनीं सदरहू गांव आपले दुमाला करून मिसली दिला. त्यावर बयाजी परभुणा यांनीं रूपाईकडून धाररावास सांगून सदरहू गांव मागून घेतलें. आम्हांस बाहेर घातलें. पुंडाचा खोटा खातो. सदरहू गांवीं ज्योतिष–कुलकर्णाची आपली मिराशी दिव्य रवा करून साधिलें. हे तकरीर सही.

पश्चिमवादी गोमाजी बिन गणावा परभुणा जोशी व कुलकर्णी मौजे भवाळी व तोंडल व गुणंद प्रांत मजकूर येथें व्यवहार भाविक असोन मौजे मजकूरचें ज्योतिष आपले मिरासी आपले वडील खात होते, त्याजपाशीं अलीकडे गेली होती. आपण कारकीर्द व गणोजी निंबाळकर याचे फर्जंद धारराव यासी मोकासा मजकूर होता. त्यास मालूम करून सदरहू गांव आपले मिराशी म्हणून घेऊन चालूं लागलों. त्यावर साबाजी बिन बयाजी पानसी प्रगणे मजकूर फिर्याद जाहला. निवाडा करितां आपली मिरास घेऊन खातों. त्यावर सभानाइकीं आपणांस बोलावून आणून दिव्य नेमून दिलें. मौजे वाटेगांव प्रगणे शिरवळ येथें साबाजी बिन बयाजी पानसी व आपणांशी पाठविले. तेथें उभय वर्ग गेलों. रवा काढला. तिसरे दिवशीं सभानाइकीं बसून हात पाहिला. रवा उतरला म्हणून पत्र देत. साबाजी बिन बयाजी पानशी बोलिला आणि निघोन आला. आपण जयपत्र घेऊन मागून आलों. प्रगणे मजकुरीं सभानाइकास दाखविलें. सभानाइकीं महजर देखिला. मग आपण सुप्यास जाऊन रूपाईस व धाररावास भेटलों. त्यास समाचार सांगितला. ते ही आपणास कागद देऊन सदरहू गांवास पाठविले. त्या तागाईत पांच वर्षें खात आहों. आपली मिरास हें सत्य.

यावर राजमुद्रा बोलिले जे सदरहू तकरीरा उभयतां लिहून दिलें आहे, हे अम्मल कसा आहे म्हणून साहेबीं सभेसी पुसिलें, त्यावर सभानाइकीं जाब दिला. उभय वर्गाचें दिव्य मौजे वाटेगांव प्रगणे शिरवळ येथें जाहलें. तेपासून प्रगणे मजकुरास आले. गोमाजी परभुणा यानें पत्र आणलें होतें तें दाखविलें. त्यावर साबाजी पानसी

बोलिला जे त्याचा हात पाहाणें. पत्र खोटें आणलें आहे. पत्र पाहातांच मथलें वोट रवा लागला होता हें तुम्हां सभा नाइकास कळलें. त्यावरी भिऊन प्रगणें मजकुराचा महजर दिला नाहीं. यावरी बयाजी व गोमाजी परभुणा सुप्यास जाऊन धारराव फर्जंद व गणोजीचा त्याचे खुद्द खत घेऊन आले. त्या तागाईत खात होता. हल्लीं उभय वर्ग साहेबापाशीं उभे राहिले आहे. त्याचा धर्मानें निवाडा केला पाहिजे. राजमुद्रा व समस्त संभानाइकीं मनास आणून श्री केदारेश्वरीं स्थानीं दिव्य होऊन निवाडा करावा असें केलें होतें. वादी यास उभय वर्गास योजल्यावरी शनिवारीं अग्रवादी नामदेव भट बिन पन्हंभट यांनीं दिव्यास उभा राहिला. मजकुराची निशाणी लिहून काढली. साबण व निंबें लावून हात धुतला. खलितीं घालून लखोटा केला. त्यावर पश्चिमवादी गोमाजी परभुणा त्याचीं नखें काढून हात धुतला. खलितीं घालून लखोटा केला. अदबखानीं (रात्रीं) राहिले. दुसरे दिवशीं चैत्र व॥ ७ आदितवारीं श्री केदारेस्थानीं सभा भरून अग्रवादी नामदेव भट पानसी पश्चिमभागीं गोमाजी परभुणा परटाचे पडदनी घेऊन (केदार-बावीस) आंघोळ करून केदारेश्वरापुढें केदारे सन्मुख उभे राहिले. तूप व तेल घालून थाळी सांडसी धरून ताम्रणामध्यें ओतिली. सातही मंडळें टाकून नामदेव भट अग्र-वादी याचे रवा काढला. तो गोमाजी परभुणा पश्चिमवादी यानें साउली केली. नाम-देव भट अग्रवादी रवा काढून खालता टाकिला. लखोटास हात घालून देवास प्रदक्षिणा करून आला. मग त्याचे हातीं खलिता घालून लखोटा केला. गोमाजी परभुणा पश्चिम-वादी याने हातीं साऊली केली. नामदेव भट अग्रवादी रवा काढून खालता टाकिला. लखोटास हात घालून देवास प्रदक्षिणा करून आला. मग त्याचे हातीं खलिता घालून लखोटा केला. गोमाजी परभुणा पश्चिमवादी याचे हातीं खलिता घालून लखोटा करून दोघे ते वादी तुरूंगांत राहिले. तिसरे दिवशीं मंगळवारीं समस्त सभानाईकीं बसवून हरदूवादी यास बोलावून लखोटा फोडून नामदेव पानसी याचा हात पाहिला. खरा निघाला. रवा उतरला तो गोमाजी परभुणा मजकूर हारविलें. खोटा झाला. त्यास हरदू गांवच्या ज्योतिष कुळकर्णाशीं संबंध नाहीं. नामदेव भट बिन पन्हंभट व साबाजी बिन बयाजी पानसी यांनीं ज्योतिष कुळकर्ण व मौजे भवाळी व मौजे तोंडल व मौजे गुणंद मिरासी जितली. हा महजर सही:--

---

राजेश्री शिवाजी जाधवराव गोसावी यास.

अखंडित लक्ष्मी अलंकृत रा. रा. खंडो बल्लाळ चिटणीस राम राम. उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे. यानंतर मौजे तोंडल मौजे लोणी तर्फ निरथडी येथील ज्योतिष कुळकर्णाची वृत्ति रा. रत्नाजी बहिरव व केसो राम याची आहे. त्यास तेथील निमे वृत्ति यादव रघुनाथ व बापूजी काशी आपले म्हणतात. या गोष्टीचा परिणाम

मनास आणता यादव रघुनाथ व बापूजीपंतास संबंध नाहीं. याज निमित्त यास रा. स्वामीचीं आज्ञापत्रें करून दिलीं आहेत. तुम्हांस हि पत्न आहे तरी तुम्ही रत्नाजी बहिरव व केसो पानसी याजपासून वतनाचा हिशेब घेणें. आणि याची सर्व प्रकारें चालविण्यास अंतर न करणें. बहुत काय लिहिणें.

आज दिवाण प्रांत वस्ति शिरवळ तहा मोकदमानी देहाय मौजे भवाळी व तोंडल व गुणंद परगणें मजकूर तोंडल व लोणी तर्फ नीरथडी परगणे पुणें या दोन्ही गांवास सुरू सन अर्बा अर्बैन अलफ, नामदेवभट पन्हंभट व साबाजी बयाजी पानसी हे वसुलीचे भांडणाकरितां ठाणें मजकुरास आले. त्यावरून देशमुख व देशपांडे व मोकदमाच्या विद्यमानें उभयता वर्षली करावयास हुकूम केला तरी त्याजपासून वर्षली प्रमाणें सेवा घेण्यास कोणी हरकत करील त्यास हुजरून परभारें ताकीद होईल जाणिजे छ २६ रविलावल.

सदरहू कागदांपैकीं जिवाजी साबाजी व खंडो शिवदेव पानसी यांनीं पूर्वील महजर व रा. खंडो बल्लाळ चिटणीस यांचें पत्र व राजपत्र रा. रायाजी जाधवराव यांचें नांवचें व देशमुख देशपांडे प्रांत पुणें यांच्या नांवचें व हरदू मोकदमाच्या नांवचें ऐसीं पांच पत्रें दाखविलीं व नारो माधव व खंडो बापूजी यांनीं वाट्याचें ताकीद पत्र दाखविलें. येणेंप्रमाणें कागद हरदू वादी याचे मनास आणितां पंचायत मतें निवाडा झाला. जे पूर्वीं महजर मनास आणिता त्यामध्यें शिरवळ देशच्या तीन ही गांवचा च मजकूर आहे व वादी परभुणा याचे तक्रीरांत वाटेगांवच्या स्थलांचावाद साबाजी बयाजी यांनीं सांगितला. त्यावरून दिसून आले कीं नामदेवभट शिरवळच्या रव्या पासूनच पाठीराखा केला. त्या पूर्वीं दाखला नाहीं. त्यांनीं वर पेशजी मनसुबी हुजूर आली ते समयीं रा. खंडो बल्लाळ चिटणीस यांनीं मनसुबी केली, ते समयीं यादव रघुनाथ गैरहजर होऊन एजितखत न दिलें. मग रत्नाजी बहिरव व केसो राम पानसी जिवाजी साबाजीचे चुलते यासी वृत्तीची दुमाल पत्रें हुजूरची राज्याभिषेक शके ४७ शार्वरीनाम संवत्सरे करून दिलीं. व रा. खंडो बल्लाळ यांनीं रायाजी जाधवराव मोकाशी देहाय मजकूर आपलें पत्र निवाड्याचें करून दिलें. हा मजकूर नारो यादव व खंडो बापूजी यांचे गुजारतीनें खरा झाला. त्यावर नारो यादव यानें वाट्याचें पत्र दाखविलें. त्यांत मखलासी मनास आणितां शिरवळ देशचा हक्क, याचा रोखा त्यामध्यें पुणें देशचे गांव लिहिले हे असंमत आहे व याचे × × × कोनाड्यामध्यें जागा ठेवून देशमुखाचा शिका केला त्यास हक्क याच्या कागदांमध्यें देशमुखीचा शिका होत नाहीं व देशमुखाच्या कारकीर्दीस नांव नाहीं व देशपांडे याचेंही कलम नाहीं व शिरवळ देशचे व पुणें देशचे गांव सरमिसळ रोखा झाला. त्यावरील शिरवळच्या देशमुख शिका करून हें ही घडणार नाहीं. शिका वाचावा तरी त्यांतील अक्षर उमजत नाहीं. तेव्हां पंचाईतीच्या मतें तो कागद दाखवून ठराविक यादव रघुनाथ व नारो यादव यासी

ठेवीची पुरसीस केली कीं, हुकूमाच्या कागदावर देशमुखाचा शिका म्हणितोस तरी देशमुखाच्या मोझा (?) घेऊन येणें. त्या वेळेस नारो यादव निरुत्तर झाला. त्यावर पंचाईतांनीं सांगितलें कीं जिवाजी सावाजी व यादव रघुनाथ श्रीकृष्णेमध्यें घालून याच गांवचें गोत आणून श्रांत घालून ज्यास ओढून काढतील त्यानें वतन अनुभवावें असा राजिनामा मागितला. त्यास यादव रघुनाथ व नारो यादव राजी न होय. वंशावळ मनास आणतां जिवाजी साबाजी यानें प्रांत पानगांव येथून वंशावळ लिहून दिली. यादव रघुनाथ यानें नामदेव भटापासून लिहून दिली. त्यामध्यें नामदेव भटाचें ते नकल. आणि आपण त्याच्या वंशाचा विस्तार म्हणून लिहिलें. अगोदर एक वंश म्हणत होतो. वंशावळ मनांत आणतां तींत असें दिसून आलें कीं, पानसी यांनीं नामदेवभट भाऊ केला त्याचें नकल झालें. तेव्हां पांच गांव पानसी यांचे पंचाईत मतें व देशमुख देशपांडे यांच्या मतें जिवाजी सावाजी व खंडो शिवदेव याचेच पांच गांव पूर्ववत् प्रमाणें दाखविले. त्यावर गोविंद यादव व व्यंकाजी कृष्ण देशपांडे परगणे शिरवळ हे हुजूर आले. त्यास विचारतां त्यांनीं ही नामदेव भटाची वस्ती तीन गांवांत शिरवळ देशीच्या परभुणे यांच्या वादापासून आहे म्हणून साक्ष दिली. त्यावर पंचाईतांनीं यादव रघुनाथ व नारो यादव व खंडो बापूजी यास आज्ञा केली कीं, मूळ वृत्ति जिवाजी साबाजी व खंडो शिवदेव यांची. तुम्ही नामदेव भटाच्या नांवावर खातां त्यास नामदेव भटाचें नकल झालें. या उपरी हे होऊन तुम्हांस वृत्ति देतील तें खाणें. नाहीं तर तुम्हांस मिळत नाहीं. मग यादव रघुनाथ व नारो यादव व खंडो बापूजी मिळून जिवाजी साबाजीस व खंडो शिवदेव यास वजीद होऊन एजितखत लिहून दिलें. जिवाजी साबाजी व खंडो शिवदेव यांनीं आपली नातवांनीं जाणून त्याचे एजितखत पंचाचे विद्यमानें निळो विठ्ठल देशपांडे प्रांत पुणें व अजम शेखनिरा व त्र्यंबकराव धायगुडे आज हात देशमुख परगणे. शिरवळ वगैरे वतनदार मार्फतीनें लिहून घेऊन हुजूर आणून दाखविले एजित बितपशील:—

एजितखत शके १६६४ दुंदुभी नाम संवत्सरे श्रावण शु॥ १ बुधवार ते दिवशीं जिवाजी साबाजी व खंडो शिवदेव व दादाजी तानदेव पानसी. जोशी कुळकर्णी मौजे भवाळी व तोंडल, गुणंद प्रगणे शिरवळ व मौजे लोणी व तोंडल तर्फ निरथडी प्रांत पुणें यासी यादव रघुनाथ व नारो यादव व खंडो बापूजी कुलकर्णी व जोशी मौजे भोळी व तोंडल व गुणंद प्रगणे शिरवळ सुरू सलास अर्बेन मया अलफ. सन इसार ११५२ कारणें लिहून दिलें. एजितखत ऐसिजे. तुमचा आमचा वाद मौजे तोंडल व लोणी तर्फ निरथडी प्रांत पुणें येथील जोशी कुलकर्णीपणाचा पडला. त्याजमुळें तुम्ही व आम्ही सातारा यास वादास आलों. श्रीमंत राजेश्री बाळाजी बाजीराव प्रधान याजपाशीं साताऱ्याच्या मुक्कामीं कजा पडला. तुम्हांस जमान नरहर विश्वनाथ कुलकर्णी मौजे त्रिपुटी संमत कोरेगांव प्रांत वाई हे घेतले व आम्हांस जमान जानो बल्लाळ वाघ कुळकर्णी

मुक्काम अहिरें प्रांत शिरवळ हे घेतले. व तकरारी तुम्हीं व आम्ही राजेश्री निळे विठ्ठल देशपांडे प्रांत पुणें याच्या विद्यमानें दिल्या. त्यावर ही हकिकत मनास आणितां तुम्ही मूळ वतनदार आम्ही पाठीराखे परकी असे पंचाईत मतें दिसून आलें. निर्वाह करावा तों श्री. रा. पंतप्रधान स्वारींत गेले. त्यावर राजेश्री मल्हार तुकदेव पुरंदरे हिंमत राजेश्री पंतप्रधान यांजपाशीं वादानिमित्त राहिले. त्यांस त्यांनीं महाराज राजेश्री स्वामीची आज्ञा घेऊन कागदपत्र आणावयास मागतें फर्माविलें त्यास आम्ही पेशजीच्या निवाड्याचे राज्यपत्र शके १६४२ शारवर्य नाम संवत्सरचा दाखविला. आम्हांस कागद आणावयास आज्ञा केली त्यास खंडो बापूजी कागद आणावयास मौजे तोंडल परगणें शिरवळ येथें पाठविलें त्यास श्रीवारणेश्वराचे देवळीं तुमचे भाऊ दादाजी तानदेव आम्हांकडील यादव रघुनाथ आपले बाप व पिसाजी यादव व बंडो बापूची आपले भाऊवतिं राहात सुलतानजी मोजे भवाळी व सिदोजी पाटील गावडे जाधव मौजे तोंडल परगणे शिरवळ असे बसून आमचे कागद मनास आणिले. मखलाशीं कारितां कागद दाखवून दिसून 'आलें. दरबारास आणावयास योग्य नव्हते. या दोघांत आमचे वडील व आम्हीं मिळून विचार केला कीं आपण जडे वृत्तीतील गांवचे शिरवळ देशचे हे गोतमुखें खरे होईल.

नामदेव भटाचें नक्कल झालें. वंशावळही मिळत नाहीं. असें असून सांगावें तरी शिरवळ देशीच्या तीन गांवच्या वाट्यास तूर्त अपाय होईल हे चित्तास आणून तुमचे पुणें देशीचे दोन्ही गांवांपैकीं निम्में वतन कांहीं दिवस आपण खात होतों त्यास दोन्हींचें तुमच्या स्वाधीन ज्योतिष व कुळकर्ण केलें असे. शिरवळ देशचे तीनही गांव तुमचे वसूली आम्हांस नामदेव भटास भाऊ करून निम्मे तक्षीम दिली आहे. त्यास ते आपण निम्मे खाऊन निमे तुम्ही आपली खाणें. पुणें देशच्या दोनही गांवांस या उपरी आपला कांहीं संबंध नाहीं. पुरातन महजराचा लेख मनास आणिला. परभुणे यांच्या वेळेस वाद तीनही गांवचा पूर्वीं पडला होता, तेव्हां नामदेव भटास साबाजी बयाजी पाठी-राखे करून शिरवळ देशीच्या तीन गांवांपैकीं तक्षीम दिली. दोन गांवचा कांहीं पूर्वीं वाद पडला नाहीं. दोन गांव पुणें देशीचे निर्वेध तुमचे आहेत. ते तुमचे तुम्ही घेणें. हें पत्र तुम्हांस आपले खुष राजीनें लिहून दिलें असे. या उपरी तुम्हांस अगर आमच्या कोणा भाऊबंदास पुणें देशच्या दोनही गांवांस वतनासीं अर्थाअर्थीं संबंध नाहीं. सुखरूप तुमचे गांव दरोबस्त ज्योतिष कुलकर्ण तुमचे तिघे भाऊ खाणें. यास कोणी आम्हीं अगर आमचा वंश हरकत करील तरी त्यास पंचमहापातकाची आण असे. व दिवा-णाचे गुन्हेगार व गोताचे अन्यायी. आम्हापाशीं कागदपत्र × × × × × असतील ते कुल रद्द असे. तुमच्या वडिलीं नामदेव भटास शिरवळच्या तीन गांवांत तक्षीम परभुणा गणावा बिन बावाजी याच्या वादापासून शके १५२७ विश्वावसूनाम संवत्सरे तक्षीम दिली आहे त्याप्रमाणें चालविणें. तुमची तक्षामि तीन तीन गांवांत आहेत. तुम्ही खाणें. याखेरीज मौजे लोणी तर्फ निरथडी प्रांत पुणें येथील वाडा व विहीर दोन

आहेत त्या तुमच्या तुम्ही अनुभवणें. हें पत्र लिहिलें. सही छ २९ माहे जमादिलावल बिकलम नारो यादव पत्र लिहिलें सही पत्री वळी ९१ सुमारें. पत्राप्रमाणें तर्जुमा खंडो बापूजी ज्योतिषी व कुलकर्णी मौजे भोळी, तोंडल, गुणंद परगणे शिरवळ एकूण वळी सुमारें ९४ सही.

साक्ष × × × × × ×

---

सदरहू एजितखत यादव रघुनाथ व नारो यादव व खंडो बापूजी यांनीं लिहून दिलें होतें. मनास आणून व पूर्वी पत्राची मखलाशी गोतमतें करून हरदू गांवचें ज्योतिष -कुलकर्ण जिवाजी साबाजी व खंडो शिवदेव पानसी यांजवरील स्वामी कृपाळू होऊन सदरहू वतन करार केलें असे. मौजे तोंडल व भोळी व गुणंद प्रांत शिरवल येथील ज्योतिष--कुलकर्णापैकीं निमें यादव रघुनाथ व नारो यादव यासी जिवाजी साबाजी व खंडो शिवदेव यांनीं आपले तर्फे दिलें होतें. त्यांनीं खाऊन असावें. बाकी तीन गांवचें ज्योतिष--कुलकर्ण निमें निमें जिवाजी साबाजी व खंडो शिवदेव हे अनुभवतील. सदरहू शिरवळ देशाच्या तीनही गांवच्या ज्योतिष--कुलकर्णास परभुणे यास संबंध नाहीं व मौजे लोणी व तोंडल प्रांत पुणें येथील ज्योतिष--कुलकर्ण यादव रघुनाथ व नारो यादव, खंडो बापूजी वगैरे त्याचें गोत्रपुरुषास संबंध नाहीं. वृत्ती संबंधाचे कागदपत्र भवाळापाशीं व परभुणे याजपाशीं असतील. ते यादव रघुनाथ याजवळ असतील ते रद्द असत.

नारो यादव यांनीं कागद लेहून दिला कीं, आपणापाशीं याउपरी वृत्तीचे कागदपत्र नाहींत. कांहीं काम काढून कज्या केला तर त्यास शिरवळ देशीच्या तिनिही गांवच्या निमे लक्षीमेंत संबंध नाहीं. जिवाजी साबाजी व खंडो शिवदेव यांनीं शिरवळ देशीचें निमें वतन आपलेतर्फे दिलें असे. मौजे लोणी प्रांत पुणें येथें विहिरी दोन व वाडा नारो यादव भोगवटी यासाठीं बळेंच अनुभवीत होता. त्यास दोन विहीरी व वाडा जिवाजी साबाजी व खंडो शिवदेव याच्या दुमाला केल्या. विहिरीचा वाड्याचा लागवडखर्च व कांहीं दिवस नारो यादव यानें कुलकर्ण अनुभाविलें त्याचा मुशाहिरा जिवाजी साबाजीकडून पंचाइतांनीं माफ करविला आणि विहिरीचा आणि वाड्याचा खर्च नारो यादव याजकडून माफ करविला. विहिरीस व वाड्यास या उपरी नारो यादव यास संबंध नाहीं व कुलकर्णाचा मुशाहिरा हीं हरदू गांवचा पेशजीचा जिवाजी साबाजी वगैरे यास मागावयास संबंध नाहीं. जिवाजी साबाजी व कान्हो केशव घर एक व खंडो शिवदेव, माधवराव लक्ष्मण घर एक व बाबूराव सखाजी व दादाजी तानदेव घर एक एकूण तीन भावांचा विस्तार यांनीं मिळून खावें. शिरवळ देशीचे तीन गांवचें निम्में वतन व पुणें देशीचे दोन्ही गांवचा बंदोबस्त ज्योतिष—कुलकर्ण पुत्र-पौत्रादि वंशपरंपरेनें चालवून दंडकप्रमाणें वतनाची सेवा याच्या हातें घेत जाणें व

कुलकर्णाचें इनाम मौजे लोणी थळ मुकाम पैकीं जमीन बिघे १५ व तोंडलपैकीं प्रांत मजकूर येथील भोपळदरा पैकीं जमीन बिघे २० मुदामत आहेत. हे ही त्याचे पुत्र-पौत्रादि निरुपद्रवी चालविणें. या वतनासंबंधें याच्या माथा शेरणी दुतर्फा बेरीज रुपये २०० करार करून वसूल निमे हुजूर व निमे जिल्हेकडे घेतला असे. प्रतिवर्षी नवीन पत्राचा आक्षेप न करणें. या पत्राच्या प्रती लावून घेऊन हें अस्सल पत्र भोगवटी याजपाशीं परत केलें. जाणिजे. बहुत काय लिहिणें तरी सुज्ञ असे. मोर्तब असे. सदरहूचे अस्सल महजरावर दर चिकट पानावर मोर्तब असत. अस्सल पत्र राजेश्री रामाजी महिपतराव पानसी जोशी कुळकर्णी मौजे मजकूर याचे घरीं असे व सदरहू महजरांत एजितपत्र वर केलें असे तें अस्सल एजितपत्र ही रामाजी महिपतराव यांचे घरींच असे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 3953
ग्रंथ गोळा शहर (मराठी)

समाप्त.

REFBK-0003953
REFBK-0003953

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३० | २६ | तुळदेव | तुकदेव |
| ३४ | १०, २४ | ६०९ | छ ९ |
| ३५ | ६ | ६०७ | छ ७ |
| ३९ | १५ | १[illegible]०४ | १६७४ |
| ४२ | २७ | दहा महिन्यांनीं | एक वर्ष दहा महिन्यांनीं |
| ५० | १० | पाठलाग व केला | पाठलाग केला |
| ५५ | १५ | धांयंपुडे | धायगुडे |
| ६० | २० | तांबेकर | तांबवेकर |
| ८६ | १६ | उभई | डभई |
| १०३ | २१, २८ | आण्णा | आप्पा |
| ११४ | २३ | सलान | सलास |
| ११५ | १६ | सलतवतची | सलतवनची |
| १२१ | ६ | नीरधडीकर | नीरथडीकर |
| १३५ | ३० | भंदे<br>भंद्याचा | भदे<br>भद्याचा |
| १५८ | २१ | मोमिताबाद | मोमिनाबाद |
| १७२ | १ | कइणी (?) | लाइणी |